# उल्हासनगर महानगरपालिका

दि:-५.४.२००१.

इतिवृत्त

दि. ५.४.२००१ रोजी घेण्यांत आलेल्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची पहिली महासभा ही शुक्रवार दिनांक ५.४.२००१ रोजी सकाळी ११.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्री. हरदास माखिजा हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१. मा. महापौर :- श्री. हरदास माखिजा.

२. मा. उपमहापौर :- श्री. धनंजय बोडारे.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३९. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ४०. | श्री.राजेश उर्फ राज जयसिंग असरोंडकर |
| ३ | श्री. सोनवणे नथु काशीराम | ४१. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४२. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ५. | श्रीमती.रामचंदानी भावना मनोहर | ४३. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ६. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४४. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ७. | श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास | ४५. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ८. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४६. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ९. | श्री. दिलीप गायकवाड | ४७. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४८. | श्री. पमनानी इश्वर (डेंडा)सतरामदास |
| ११. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४९. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १२. | श्रीमती. पाल अधारी राजाराम | ५०. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १३. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ५१. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५२. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १५ | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५३. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १६. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५४ | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५५ | श्रीमती. लक्ष्मी राहीदास ससाणे |
| १८. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन | ५६. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १९. | श्री. रेहडा श्यामसुंदर जानीलाल | ५७. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २०. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५८. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २१. | श्रीमती.गुप्ता आशा प्रभुनाथ | ५९. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २२. | श्री. नाना आनंदा पवार | ६०. | श्री.साधवानी मनोज लालचंद |
| २३. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ६१. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २४. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ६२. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २५. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६३. | श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास |
| २६. | श्री. शांताराम ओंकार निकम | ६४. | श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण |
| २७. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६५. | श्रीमती. किरण लखी माखीजा |
| २८. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६६. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २९. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६७. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |

| | | | |
|---|---|---|---|
| ३०. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६८. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| ३१. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६९. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३२. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ७०. | श्रीमती. इंदु रामचंद भठीजा |
| ३३. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७१ | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३४. | श्री. मोहन साधवानी | ७२. | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| ३५. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ७३. | श्रीमती. मालती राधाचरण करोतिया |
| ३६. | श्रीमती. जया मोहन साधवानी | ७४. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३७. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७५. | श्री. बेहराणी ठाकूरदास वरीयलदास |
| ३८. | श्रीमती. भावना रवी खिलनानी | | |

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सभेस दुपारी १२.१५ वाजता सुरूवात करण्यांत आली.

<u>मा. महापौरः-</u>आज माझ्या कार्यकालाची शेवटची सभा आहे. मी नविन आलेल्या सदस्यांचे पहिल्या महासभेत स्वागत करतो. तसेच ज्या अधिका-यांनी आम्हाला सहकार्य दिले त्यांनाही मी धन्यवाद देतो. त्यांनी असेच सहकार्य नविन महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती यांना दयावे. जेणेकरून शहराच्या विकास कामामध्ये कोणत्याही प्रकारची बाधा येऊ नये.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, नविन महापौरांची निवडणूक होत आहे. मला असे वाटते की, तत्त्पुर्वी नवनिर्वाचित सदस्य श्री. पहलाज छाब्रिया यांचे नुकतेच काही दिवसापुर्वी निधन झाले. त्यांना श्रध्दांजली अर्पित केली जावी. तसेच नवनिर्वाचित सर्व नगरसेवकांचा एक महिन्याचा नगरसेवक भत्ता त्यांच्या धर्मपत्नी यांना दिला तर बरे होईल.

<u>मा. महापौरः-</u>ठिक आहे. श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी दोन मिनिटे उभे राहु या.

<u>शोक प्रस्ताव :-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दुस-या सार्वत्रिक निवडणूकीत(२००२मध्ये ) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणुन प्रभाग क्र. २४ (अ) मधून निवडून आलेले नवनिर्वाचित सदस्य श्री. पहलाज छाब्रीया (तिडु)यांचे दि. २५.२.२००२ रोजी अकस्मित निधन झाले. नगरपालिकेच्या कालावधीत ही ते एकवेळा नगरसेवक म्हणून निवडून आले होते, शहरातील विकास कार्यात विशेषतः रस्ते व उद्याने यांचे विकास कामात त्यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग होता.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्याच्या आत्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

माहे एप्रिल २००२चे मानधनाची व बैठक भत्त्याची रक्कम कैलासवासी श्री. पहलाज छाब्रिया यांचे पत्नीच्या नावे वर्ग करून बॅंकेत कायम स्वरूपी ठेवणे बाबत आयुक्तांना प्राधिकृत करणेस प्रस्तावित.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.१</u> <u>दिनांक:-५.४.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंदसिंह भुल्लर

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. पहलाज छाब्रीया (तिडु)यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

तसेच ही महासभा या ठरावाव्दारे महानगरपालिकेच्या सर्व सदस्यांना मिळणारे माहे एप्रिल २००२ चे मानधनाची व बैठक भत्त्याची एकत्रित होणारी रक्कम कै. पहलाज छाब्रिया यांचे पत्नी श्रीमती भारती पहलाज छाब्रिया नावे वर्ग करून बॅंकेत कायम स्वरूपी ठेवीत ठेवणेबाबत आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:-</u> विषय क्र.१ वाचून दाखवितात.

विषय :-उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २००२ सार्वत्रिक निवडणुकीत निवडुन आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १९ मधील तरतुदीप्रमाणे महापौर (अनुसूचित जाती महिला) पदासाठी निवड करणे बाबत.

मा. सचिव:-

ज्यांच्याकडे मोबाईल फोन असतील त्यांनी ते कृपया सभागृहाबाहेर जमा करावेत.

महापौर पदासाठी दोन उमेदवार आहेत. त्यांची नावे मी वाचून दाखवितो. पहिल्या क्रमांकावर श्रीमती. मालती राधाचरण करोतिया व दुस-या क्रमांकावर श्रीमती. लक्ष्मीबाई रोहीदास ससाणे यांचे नाव आहे.

निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी कुणी उमेदवार आपली उमेदवारी मागे घेऊ इच्छित असेल तर ५ मिनिटांची वेळ दिली जात आहे. आता १२ वाजून २० मिनिटे झाली आहेत.

यावेळी दुपारचे १२ वाजुन २५ मिनिटे झाली आहेत. पाच मिनिटाची वेळ संपली आहे आणि कोणी आपली उमेदवारी मागे घ्यायला इच्छिुक दिसत नाही. महापौर पदासाठी एक पद रिक्त आहे. रिक्तपदापेक्षा जास्त उमेदवार असल्याने गुप्त मतदानाची आवश्यकता भासते.

<u>गुप्त मतदानाची रित :-</u> पुढील रितीने गुप्त मतदान घेण्यात येईल.

निवडणूक प्रक्रिया आणि गुप्त मतदानापुर्वी आवश्यक त्या सुचना मी आपणांस देवू इच्छितो, आपणांस अशा प्रकारची मतपत्रिका मिळेल. या मतपत्रिकेच्या वरच्या बाजूला छोटी छोटी छिद्र असतील, ज्यांस इंग्रजीमध्ये परफोरेशन असे म्हणतात. हया मतपत्रिकेवर महानगरपालिकेची मुद्रा (सिल) उमटविलेली असेल हया मतपत्रिकेवर पहिल्या क्रमांकावर उमेदवार श्रीमती. मालती राधाचरण करोतिया व दुस-या क्रमांकावर श्रीमती. लक्ष्मीबाई रोहीदास ससाणे यांचे नाव आहे. मतपत्रिका देतांना आपले नाव लिहून स्वाक्षरी घेऊन मतपत्रिका आपणास दिली जाईल.

श्री. जे.पी. शेंडे , मुख्य लेखा अधिकारी व श्री. ए. न. काळे मुख्य लेखा परिक्षक यांची नेमणूक परिनिरिक्षक म्हणून करण्यात आलेली आहे. मतदान होण्यापूर्वी मी आपणास मतपेटी रिकामी असल्याचे दाखवित आहे. कृपया ते पाहून घ्यावे आता ही मतपेटी वापरासाठी कुलूप लावून बंद करतो या प्रयोजनासाठी श्री.जे. एम. ढाकरे,उपायुक्त यांना मतदान अधिकारी म्हणून संबोधण्यात येईल आणि हया मतपेटीची किल्ली मी स्वतःजवळ ठेवत आहे. प्रत्त्येक पालिका सदस्य या सभागृहात मतदानासाठी जी जागा राखून ठेवण्यात आलेली आहे तेथे जाऊन मतदान करतील तिथे मतदान करण्यापूर्वी प्रत्त्येक पालिका सदस्यांचे मी नाव पुकारेल त्यानंतर प्रत्त्येक पालिका सदस्य मतदान अधिका-याकडे जाऊन मतपत्रिकेच्या स्थळप्रतीवर त्यांचे नावासमोर स्वाक्षरी देऊन एक मतपत्रिका घेईल. मतपत्रिका मिळाल्यानंतर पालिका सदस्य मतदान केंद्रात प्रवेश करून त्या प्रयोजनासाठी मतदान केंद्राजवळील एका टेबलापाशी जाऊन आपले मत नोंदविल, मतपत्रिकेची घडी घातल्यानंतर आपली मतपत्रिका मा. पिठासीन अधिकारी समोर ठेवलेल्या मतपेटीत टाकील. आणि लगेच आपल्या जागेवर बसतील. मा. महापौरांचे मतदानासाठी एका तासाची वेळ निश्चित करण्यांत येत आहे.

मतदान चालू असतांना कोणत्त्याही वेळी एखादा पालिका सदस्य दुस-याची मतपत्रिका पाहत असल्याचे किंवा आपली मतपत्रिका इतर कुणास दाखवत असल्याचे, मतदान अधिका-यास दिसून येईल तर तो उक्त मतपत्रिका मतपेटीत न टाकता, ती बाजूला काढून ठेवील व ती गोष्ट मा. पिठासीन प्राधिका-याच्या नजरेस आणून देईल व त्यानंतर तो ती मतपत्रिका रदद करवील. पालिका सदस्यास देण्यात आलेली मतपत्रिका अगर खराब होईल तेव्हा त्याला मा. पिठासीन प्राधिका-याच्या परवानगीने दुसरी मतपत्रिका देता येईल, खराब झालेली मतपत्रिका मा. पिठासीन प्राधिका-यांच्या उपस्थितीत ती नष्ट करण्यात येईल किंवा मोहोरबंद करण्यात येईल. वरीलप्रमाणे मतदानासाठी निश्चित करण्यात आलेली वेळ संपल्यानंतर मतदान अधिकारी मा. पिठासीन प्राधिका-याकडे मतपेटी आणतील व मतदान संपल्याचे ते तात्त्काळ घोषित करतील व अशा घोषणेनंतर कोणत्त्याही मतपत्रिका घेण्यात व स्विकारण्यात येणार नाही. मा. पिठासीन अधिकारी यांनी मतपेटी उघडल्यांनतर त्यातुन मतपत्रिका बाहेर काढतील व त्यावर स्वाक्षरी करून परिनिरिक्षकांचे स्वाधीन करतील.

परिनिरिक्षक, विधी अग्राहय मतपत्रिका कोणत्त्याही असल्यास, नाकारल्यानंतर प्रत्त्येक उमेदवाराला मिळालेली मते मोजील व उमेदवाराची नावे व प्रत्त्येक उमेदवारास मिळालेल्या एकूण मतांची संख्या दर्शाविणारी यादी तयार करील आणि अशी यादी मा. पिठासीन प्राधिका-याकडे सादर करील. मा. पिठासीन प्राधिकारी , यादीतील उमेदवारांची नावे व प्रत्त्येक उमेदवा-यास मिळालेली एकूण मते वाचून दाखविल. सर्वाधिक मते प्राप्त करणारा, त्यानंतर दुस-या मतांची सर्वाधिक मते प्राप्त करणारा उमेदवार याचप्रमाणे मा. पिठासीन प्राधिकारी कडुन घोषित करण्यात येतील.

जर समसमान मते पडली तर गुप्त मतदानाचा निकाल चिठ्ठया टाकुन करण्यांत येईल. असे मा. पिठासिन प्राधिकारी घोषित करतील, उपस्थित राहून मतदान करणारे बहुसंख्य सन्माननिय पालिका सदस्य ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठ्ठया काढण्यात येतील, ज्या उमेदवाराचे नावाची चिठ्ठी निघेल तो उमेदवार मा. पिठासिन प्राधिका-याकडुन नेमण्यात व निवडण्यात आल्याचे घोषित करण्यात येईल.

निवडणुक लढविणा-या उमेदवारास, मत मोजणीचे काम प्रत्त्यक्षांत चालू असेल त्या जागी हजर राहण्याचा हक्क असेल. एखादा उमेदवार हजर राहणार नसेल तर त्यास, मतमोजणीचे काम पाहण्यासाठी आपला प्रतिनिधी म्हणून इतर कोणत्त्याही सदस्यास, प्रतिनियुक्त करता येईल. मात्र मतदानात प्रत्त्यक्ष प्रारंभ होण्यापुर्वी पिठासिन प्राधिका-यास अशा प्रतिनिधीचे नावं लेखी कळविले पाहिजे.

<u>सूचनाः-</u>

१. तुम्हास एक मत आहे.
२. मत फुलीच्या (x)अशा खुणेत दाखवायचे आहे.
३. तुम्ही आपले मत कोणत्त्याही एका उमेदवारास तुमच्या पसंतीप्रमाणे देऊ शकता.
४. एका पेक्षा जास्त फुल्या करू नका.
५. उमेदवाराच्या नावासमोरील रकान्यात मताची खुण करणेची आहे.
६. तुम्हाला ही खुण दिलेल्या साहित्यानेच करावयाची आहे.

<u>मतपत्रिका खालील कारणांमुळे रदद होईल.</u>

१. सभासदाने मतपत्रिकेवर स्वाक्षरी केली किंवा ओळख पटेल असा शब्द लिहिला किंवा खुण केली तर.
२ मतपत्रिका स्थळ विभागापासून फाडूनघेण्यासाठी केलेल्या छिद्रांकित मर्यादा रेषेच्या (परफोरेशन) दोन्ही बाजुस मिळुन मुद्रेचा ठसा उमटविलेला नसेल तर.
३. मतपत्रिकेवर मत निर्देशक खुणा (फुली) नसेल किंवा ती संशयास्पद असेल तर.
४. मतपत्रिकेवर आधिक फुल्या असतील तर...

विषय :-उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २००२ सार्वत्रिक निवडणुकीत निवडुन आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १९ मधील तरतुदीप्रमाणे महापौर (अनुसूचित जाती महिला) पदासाठी निवड करणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर महानगरपालिका सन २००२मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्यांची मा. महापौर पदावर निवड करणे बाबतचा विषय दि. ५.४.२००२ च्या पहिल्या सभेच्या कार्यसूचीवर क्र. १ वर आहे. त्याआधी निवडणूक कार्यक्रमाच्या तरतूदीप्रमाणे दि. १.४.२००२ रोजी ज्या उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्रे दाखल केले आणि ज्यांची नामनिर्देशनपत्रे वैध झाली त्यांची नावे येणेप्रमाणे.

१. श्रीमती. करोतिया मालती राधाचरण
२. श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहीदास

वरील उमेदवरांपैकी विहित मुदतीत कोणत्त्याही उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतली नसल्याने रिंगणात दोन उमेदवार शिल्लक राहिले त्यामुळे गुप्त मतदानाची आवश्यकता भासल्याने निवडणुक प्रक्रिया सुरू करणेस व तदनंतर निवडणूक निकाल जाहिर करणेसाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. २</u> <u>दि. ५.४.२००२.</u>

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार ७५ पालिका सदस्यांनी केलेल्या गुप्त मतदानाअंती खाली दर्शविलेल्या प्रत्येक उमेदवारासमोरील मिळालेली मते जाहिर करीत आहे आणि सर्वात जास्त मते मिळालेल्या उमेदवार श्रीमती. करोतिया मालती राधाचरण यांना महापौर पदावर निवडून आल्याचे घोषित करित आहे.

| उमेदवाराचे नाव | मिळालेली एकुण मते |
|---|---|
| १. श्रीमती. करोतिया मालती राधाचरण | ५३ |
| २. श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहीदास | २१ |

वैध मते - ७४

अवैध मते - ०१

-------------

एकुण मते -७५

<u>मतदानाव्दारे मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :-</u> आता दुपारचे १ वाजून ३० मिनिटे झाले आहे. आता थोडयावेळात मा. महापौर निकाल जाहिर करतील.

<u>मा. महापौरः-</u>प्रत्येक उपस्थित सदस्यांच्या गुप्त मतदानाअंती आलेल्या निकालाप्रमाणे मी महासभेतर्फे श्रीमती. मालती राधाचरण करोतिया यांना ५३ मते तर दुसरे उमेदवार श्रीमती. लक्ष्मीबाई रोहिदास ससाणे यांना २१ मते मिळाले असुन श्रीमती. मालती राधाचरण करोतिया यांना सर्वाधिक म्हणजे ५३ मते मिळाल्याने त्या मा. महापौर पदी निवडून आल्याचे मी जाहिर करत आहे.

निवडणुक निकाल जाहिर झाल्यानंतर श्रीमती. मालती राधाचरण करोतिया महापौर स्थानी आसनस्थ झाल्या. तदनंतर मान्यवर विशेष अतिथी श्री. कृपाशंकर सिंह (गृहराज्यमंत्री), २. श्री. रामदास आठवले (खासदार), ३. श्री. पप्पु कालानी (आमदार) व इतर सर्व मान्यवरांनी, सभागृहाचे सदस्यांनी पुष्पगुच्छ देऊन मा. महापौर श्रीमती. मालती राधाचरण करोतिया यांचे स्वागत केले.

<u>मा.महापौर श्रीमती मालती करोतियाः-</u> सचिवजी, दुस-या विषयाला सुरुवात करा.

<u>मा. सचिव :-</u> विषय क्र. २ वाचून दाखवितात.

**विषयः**-उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २००२ सार्वत्रिक निवडणुकीत निवडुन आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १९ मधील तरतुदीप्रमाणे उपमहापौर पदासाठी निवड करणे बाबत.

मा. सचिवः-

उपमहापौर पदासाठी दोन उमेदवार आहेत. त्यांची नावे मी वाचून दाखवितो. पहिल्या क्रमांकावर श्री. रामदास उमाप व दुस-या क्रमांकावर श्रीमती. जया साधवानी यांचे नाव आहे.

निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी कुणी उमेदवार आपली उमेदवारी मागे घेऊ इच्छित असेल तर ५ मिनिटांची वेळ दिली जात आहे. आता २ वाजुन ३५ मिनिटे झाली आहे. पाच मिनिटाची वेळ संपली आहे आता २ वाजून ४० मिनिटे झाली आहे. आणि कोणी आपली उमेदवारी मागे घ्यायला इच्छिुक दिसत नाही. उप-महापौर पदासाठी एक पद रिक्त आहे. रिक्तपदापेक्षा जास्त उमेदवार असल्याने गुप्त मतदानाची आवश्यकता भासते.

<u>गुप्त मतदानाची रित :-</u> पुढील रितीने गुप्त मतदान घेण्यात येईल.

निवडणूक प्रक्रिया आणि गुप्त मतदानापुर्वी आवश्यक त्या सुचना मी आपणांस देवू इच्छितो, आपणांस अशा प्रकारची मतपत्रिका मिळेल. या मतपत्रिकेच्या वरच्या बाजूला छोटी छोटी छिद्र असतील, ज्यांस इंग्रजीमध्ये परफोरेशन असे म्हणतात. हया मतपत्रिकेवर महानगरपालिकेची मुद्रा (सिल) उमटविलेली असेल हया मतपत्रिकेवर पहिल्या क्रमांकावर श्री. रामदास उमाप व

दुस-या क्रमांकावर श्रीमती. जया साधवानी यांचे नाव आहे. मतपत्रिका देतांना आपले नाव लिहून स्वाक्षरी घेऊन मतपत्रिका आपणास दिली जाईल.

--८--

श्री. जे.पी. शेंडे , मुख्य लेखा अधिकारी व श्री. ए. न. काळे मुख्य लेखा परिक्षक यांची नेमणूक परिनिरिक्षक म्हणून करण्यात आलेली आहे. मतदान होण्यापूर्वी मी आपणास मतपेटी रिकामी असल्याचे दाखवित आहे. कृपया ते पाहून घ्यावे

आता ही मतपेटी वापरासाठी कुलूप लावून बंद करतो या प्रयोजनासाठी श्री. जे. एम. ढाकरे , उपायुक्त यांना मतदान अधिकारी म्हणून संबोधण्यात येईल आणि हया मतपेटीची किल्ली मी स्वत:जवळ ठेवत आहे. प्रत्येक पालिका सदस्य या सभागृहात मतदानासाठी जी जागा राखून ठेवण्यात आलेली आहे तेथे जाऊन मतदान करतील तिथे मतदान करण्यापूर्वी प्रत्येक पालिका सदस्यांचे मी नाव पुकारेल त्यानंतर प्रत्येक पालिका सदस्य मतदान अधिका-याकडे जाऊन मतपत्रिकेच्या स्थळप्रतीवर त्यांचे नावासमोर स्वाक्षरी देऊन एक मतपत्रिका घेईल. मतपत्रिका मिळाल्यानंतर पालिका सदस्य मतदान केंद्रात प्रवेश करुन त्या प्रयोजनासाठी मतदान केंद्राजवळील एका टेबलापाशी जाऊन आपले मत नोंदविल, मतपत्रिकेची घडी घातल्यानंतर आपली मतपत्रिका मा. पिठासीन अधिकारी समोर ठेवलेल्या मतपेटीत टाकील. आणि लगेच आपल्या जागेवर बसतील. मा. उप-महापौर पदाचे मतदानासाठी एक तासाची वेळ निश्चित करण्यांत येत आहे. कुणी सदस्य जर आले नसतील परंतु निवडणूक संपल्यापूर्वी जर सभागृहात आले तर ते मतदान करु शकतील.

मतदान चालू असतांना कोणत्त्याही वेळी एखादा पालिका सदस्य दुस-याची मतपत्रिका पाहत असल्याचे किंवा आपली मतपत्रिका इतर कुणास दाखवत असल्याचे, मतदान अधिका-यास दिसून येईल तर तो उक्त मतपत्रिका मतपेटीत न टाकता, ती बाजूला काढून ठेवील व ती गोष्ट मा. पिठासीन प्राधिका-याच्या नजरेस आणून देईल व त्यानंतर तो ती मतपत्रिका रदद करवील. पालिका सदस्यास देण्यात आलेली मतपात्रिका अगर खराब होईल तेव्हा त्याला मा. पिठासीन प्राधिका-याच्या परवानगीने दुसरी मतपत्रिका देता येईल, खराब झालेली मतपत्रिका पिठासीन प्राधिका-यांच्या उपस्थितीत ती नष्ट करण्यात येईल किंवा मोहोरबंद करण्यात येईल.

वरीलप्रमाणे मतदानासाठी निश्चित करण्यात आलेली वेळ संपल्यानंतर मतदान अधिकारी मा. पिठासीन प्राधिका-याकडे मतपेटी आणतील व मतदान संपल्याचे ते तात्त्काळ घोषित करतील व अशा घोषणेनंतर कोणत्त्याही मतपत्रिका घेण्यात व स्विकारण्यात येणार नाही. मा. पिठासीन अधिकारी यांनी मतपेटी उघडल्यांनतर त्यातुन मतपत्रिका बाहेर काढतील व त्यावर स्वाक्षरी करुन परिनिरिक्षकांचे स्वाधीन करतील.

परिनिरिक्षक, विधी अग्राहय मतपत्रिका कोणत्त्याही असल्यास, नाकारल्यानंतर प्रत्त्येक उमेदवाराला मिळालेली मते मोजील व उमेदवाराची नावे व प्रत्येक उमेदवारास मिळालेल्या एकूण मतांची संख्या दर्शाविणारी यादी तयार करील आणि अशी यादी मा. पिठासीन प्राधिका-याकडे सादर करील. मा. पिठासीन प्राधिकारी , यादीतील उमेदवारांची नावे व प्रत्त्येक उमेदवा-यास मिळालेली एकूण मते वाचून दाखविल. सर्वाधिक मते प्राप्त करणारा, त्यानंतर दुस-या मतांची सर्वाधिक मते प्राप्त करणारा उमेदवार व याचप्रमाणे इतर उमेदवार मा. पिठासीन प्राधिकारी कडुन घोषित करण्यात येतील.

जर समसमान मते पडली आणि मा. पिठासीन प्राधिकारी आपले निर्णायक मत देणार नाही तेव्हा गुप्त मतदानाचा निकाल चिठ्ठ्या टाकुन करण्यात येईल. असे मा. पिठासिन प्राधिकारी घोषित करतील, उपस्थित राहून मतदान करणारे बहुसंख्य सन्माननिय पालिका सदस्य ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठ्ठ्या काढण्यात येतील,



ज्या उमेदवाराचे नावाची चिठ्ठी निघेल तो उमेदवार मा. पिठासिन प्राधिका-याकडुन नेमण्यात व निवडण्यात आल्याचे घोषित करण्यात येईल.

निवडणुक लढविणा-या उमेदवारास, मत मोजणीचे काम प्रत्यक्षांत चालू असेल त्या जागी हजर राहण्याचा हक्क असेल. एखादा उमेदवार हजर राहणार नसेल तर त्यास, मतमोजणीचे काम पाहण्यासाठी आपला प्रतिनिधी म्हणून इतर कोणत्त्याही सदस्यास, प्रतिनियुक्त करता येईल. मात्र मतदानात प्रत्यक्ष प्रारंभ होण्यापुर्वी पिठासिन प्राधिका-यास अशा प्रतिनिधीचे नावं लेखी कळविलेले पाहिजे.

सूचनाः-

१. तुम्हास एक मत आहे.
२. मत फुलीच्या (x)अशा खुणेत दाखवायचे आहे.
३. तुम्ही आपले मत कोणत्त्याही एका उमेदवारास तुमच्या पसंतीप्रमाणे देऊ शकता.
४. एका पेक्षा जास्त फुल्या करू नका.
५. उमेदवाराच्या नावासमोरील रकान्यात मताची खुण करणेची आहे.
६. तुम्हाला ही खुण दिलेल्या साहित्त्यानेच करावयाची आहे.

मतपत्रिका खालील कारणांमुळे रदद होईल.

१. सभासदाने मतपत्रिकेवर स्वाक्षरी केली किंवा ओळख पटेल असा शब्द लिहिला किंवा खुण केली तर.

२ मतपत्रिका स्थळ विभागापासून फाडूनघेण्यासाठी केलेल्या छिद्रांकित मर्यादा रेषेच्या (परफोरेशन) दोन्ही बाजुस मिळुन मुद्रेचा ठसा उमटविलेला नसेल तर.
३. मतपत्रिकेवर मत निर्देशक खुणा (फुली) नसेल किंवा ती संशयास्पद असेल तर.
४. मतपत्रिकेवर अधिक फुल्या असतील तर...

विषय :-उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २००२ सार्वत्रिक निवडणुकीत निवडुन आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १९ मधील तरतुदीप्रमाणे उपमहापौर पदासाठी निवड करणे बाबत.

प्रस्तावनाः-

उल्हासनगर महानगरपालिका सन २००२मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्यांची मा. उपमहापौर पदावर निवड करणे बाबतचा विषय दि. ५.४.२००२ च्या पहिल्या सभेच्या कार्यसूचीवर क्र. २ वर आहे. त्याआधी निवडणूक कार्यक्रमाच्या तरतूदीप्रमाणे दि. १.४.२००२ रोजी ज्या उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्रे दाखल केले आणि ज्यांची नामनिर्देशनपत्रे वैध झाली त्यांची नावे येणेप्रमाणे.

१.श्री. उमाप रामदास राघोजी
२.श्रीमती. साधवानी जया मोहन



वरील उमेदवारांपैकी विहित मुदतीत कोणत्त्याही उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतली नसल्याने रिंगणात दोन उमेदवार शिल्लक राहिले त्त्यामुळे गुप्त मतदानाची आवश्यकता भासल्याने निवडणुक प्रक्रिया सुरू करणेस व तदनंतर निवडणूक निकाल जाहिर करणेसाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ३</u> <u>दि. ५.४.२००२.</u>

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार ७५ पालिका सदस्यांनी केलेल्या गुप्त मतदानाअंती खाली दर्शविलेल्या प्रत्त्येक उमेदवारासमोरील मिळालेली मते जाहिर करीत आहे आणि सर्वात जास्त मते मिळालेल्या उमेदवार श्रीमती. साधवानी जया मोहन उपमहापौर पदावर निवडून आल्याचे घोषित करित आहे.

| उमेदवाराचे नाव | मिळालेली एकुण मते |
|---|---|
| १.श्री. उमाप रामदास राघोजी | २२ |
| २.श्रीमती. साधवानी जया मोहन | ५२ |

वैध मते - ७४

अवैध मते - ०१

-------------

एकुण मते -७५

<u>मतदानाव्दारे मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :-</u> आता दुपारचे ३ वाजून ३० मिनिटे झाले आहे. आता थोड्यावेळात मा. महापौर निकाल जाहिर करतील.

<u>मा. महापौर / पिठासिन अधिकारी:-</u>प्रत्त्येक उपस्थित सदस्यांच्या गुप्त मतदानाअंती आलेल्या निकालाप्रमाणे मी महासभेतर्फे श्री. रामदास उमाप यांना २२ मते तर दुसरे उमेदवार श्रीमती. जया साधवानी यांना ५२ मते मिळाले असुन श्रीमती. जया साधवानी यांना सर्वाधिक म्हणजे ५२ मते मिळाल्याने त्या उपमहापौर पदी निवडून आल्याचे जाहिर करत आहे.

निवडणुक निकाल जाहिर झाल्यानंतर श्रीमती. जया मोहन साधवानी उपमहापौर स्थानी आसनस्थ झाल्या. तदनंतर मान्यवर विशेष अतिथी श्री. कृपाशंकर सिंह

(गृहराज्यमंत्री), २. श्री. रामदास आठवले (खासदार), ३. श्री. पप्पु कालानी (आमदार) व इतर सर्व मान्यवरांनी, सभागृहाचे सदस्यांनी पुष्पगुच्छ देऊन मा. उपमहापौर श्रीमती. जया मोहन साधवानी यांचे स्वागत केले.

--११--

<u>मा. महापौरः-</u>पुढचा विषय क्र. ३ सायंकाळी ४.३० वाजता घेण्यात येईल तोपर्यंत सर्वानुमते सदरची सभा स्थगित करण्यात येत आहे.

त्यानंतर सांयकाळी ४.४५ वाजता सभेची सुरुवात करण्यांत आली.

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

विषय :-उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २००२ सार्वत्रिक निवडणुकीत निवडुन आलेल्या सदस्यांपैकी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २० मधील तरतुदीप्रमाणे स्थायी समितीच्या १६ सदस्यांची नेमणुक करणे बाबत.

<u>मा. सचिव :-</u> स्थायी समिती सदस्य पदासाठी १८ उमेदवार आहेत. त्यांची नावे मी वाचून दाखवितो.

१. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
२. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम
३. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
४. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
५. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
६. श्री. रूपानी चिमन अमरूमल
७. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
८. श्रीमती. आहुजा निता प्रकाश
९. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
१०. श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण
११. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
१२. श्री. गायकवाड दिलीप दशरथ
१३. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
१४. श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल
१५. श्री. बच्चाराम बाशोमल रूपचंदानी
१६. श्रीमती. सिमा चंदीराम मोकल
१७. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
१८. श्री. ठाकुर अशोक भगवानदास

<u>मा. सचिव :-</u> आता सांयकाळचे ४ वाजून ४५ मिनिटे झाले आहेत. कोणी उमेदवार जर आपली उमेदवारी मागे घेऊ इच्छित असेल तर ५ मिनिटाची वेळ देण्यात येत आहे. ५ मिनिटाची वेळ संपली आहे. सांयकाळचे ४ वाजून ५० मिनिटे झाले आहे. श्री. चिमन रुपानी यांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे. अशी त्यांची सूचना आली आहे. इतर कोणी उमेदवार आपली उमेदवारी मागे घेऊ इच्छित नाही. त्यामुळे

स्थायी समिती सदस्य पदाकरीता १६ रिक्त जागा असल्याने रिक्त पदापेक्षा जास्त उमेदवार शिल्लक राहिले असल्याने गुप्त मतदानाची आवश्यकता भासते.



<u>गुप्त मतदानाची रित :-</u> पुढील रितीने गुप्त मतदान घेण्यात येईल.

निवडणूक प्रक्रिया आणि गुप्त मतदानापुर्वी आवश्यक त्या सुचना मी आपणांस देवू इच्छितो, आपणांस अशा प्रकारची मतपत्रिका मिळेल. या मतपत्रिकेच्या वरच्या बाजूला छोटी छोटी छिद्र असतील, ज्यांस इंग्रजीमध्ये परफोरेशन असे म्हणतात. हया मतपत्रिकेवर महानगरपालिकेची मुद्रा (सिल) उमटविलेली असेल मतपत्रिका देतांना आपले नाव लिहून स्वाक्षरी घेऊन मतपत्रिका आपणास दिली जाईल. या मतपत्रिकेवर प्रत्येक उमेदवाराच्या नावापूढे फुली करण्यासाठी जी जागा दिली आहे. त्याऐवजी इतर कुठेही फुली करावयाची नाही. प्रत्येक उमेदवाराच्या नावासमोर त्यात तुम्हाला मत दर्शवायचे आहे.

मतदान होण्यापूर्वी मी आपणास मतपेटी रिकामी असल्याचे दाखवित आहे. कृपया ते पाहून घ्यावे आता ही मतपेटी वापरासाठी कुलूप लावून बंद करतो या प्रयोजनासाठी श्री.जे. एम. ढाकरे ,उपायुक्त यांना मतदान अधिकारी म्हणून संबोधण्यात येईल आणि हया मतपेटीची किल्ली मी स्वत:जवळ ठेवत आहे. प्रत्येक पालिका सदस्य या सभागृहात मतदानासाठी जी जागा राखून ठेवण्यात आलेली आहे तेथे जाऊन मतदान करतील तिथे मतदान करण्यापूर्वी प्रत्येक पालिका सदस्यांचा मतपत्रिकेच्या स्थळप्रतीवर त्यांचे नावासमोर स्वाक्षरी देऊन एक मतपत्रिका घेईल. मतपत्रिका मिळाल्यानंतर पालिका सदस्य मतदान केंद्रात प्रवेश करुन त्या प्रयोजनासाठी मतदान केंद्राजवळील एका टेबलापाशी जाऊन आपले मत नोंदविल, मतपत्रिकेची घडी घातल्यानंतर आपली मतपत्रिका मा. पिठासीन अधिकारी समोर ठेवलेल्या मतपेटीत टाकील. आणि लगेच आपल्या जागेवर बसतील. मा. स्थायी समिती सदस्यांच्या पदाच्या मतदानासाठी एका तासाची वेळ निश्चित करण्यांत येत आहे.

मतदान चालू असतांना कोणत्त्याही वेळी एखादा पालिका सदस्य दुस-याची मतपत्रिका पाहत असल्याचे किंवा आपली मतपत्रिका इतर कुणास दाखवत असल्याचे, मतदान अधिका-यास दिसून येईल तर तो उक्त मतपत्रिका मतपेटीत न टाकता, ती बाजूला काढून ठेवील व ती गोष्ट मा. पिठासीन प्राधिका-याच्या नजरेस आणून देईल व त्यानंतर तो ती मतपत्रिका रद्द करवील. पालिका सदस्यास देण्यात आलेली मतपत्रिका अगर खराब होईल तेव्हा त्याला मा. पिठासीन प्राधिका-याच्या परवानगीने दुसरी मतपत्रिका देता येईल, खराब झालेली मतपत्रिका मा. पिठासीन प्राधिका-यांच्या उपस्थितीत ती नष्ट करण्यात येईल किंवा मोहोरबंद करण्यात येईल.

वरीलप्रमाणे मतदानासाठी निश्चित करण्यात आलेली वेळ संपल्यानंतर मतदान अधिकारी मा. पिठसीन प्राधिका-याकडे मतपेटी आणतील व मतदान संपल्याचे ते तात्त्काळ घोषित करतील व अशा घोषणेनंतर कोणत्त्याही मतपत्रिका घेण्यात व स्विकारण्यात येणार नाही. मा. पिठसीन अधिकारी यांनी मतपेटी उघडल्यांनतर त्यातुन मतपत्रिका बाहेर काढतील व त्यावर स्वाक्षरी करुन मतमोजणी अधिकारी स्वाधीन करतील.

मा. पिठासीन अधिकारी कोणत्त्याही  विधी अग्राहय मतपत्रिका नाकारल्यानंतर मतमोजणी अधिका-यांच्या मदतीने मताची मोजणी करेल. व सर्वाधिक मते मिळालेल्या सदस्य व त्त्यानंतर दुस-या क्रमांकाने सर्वाधिक मते मिळालेले सदस्य याचप्रमाणे



इतर सदस्य १६ पदाच्या प्रमाणात स्थायी समिती नियुक्त सदस्य म्हणून घोषित करण्यात येईल.

निवडणुक लढविणा-या उमेदवारास, मत मोजणीचे काम प्रत्त्यक्षांत चालू असेल त्त्या जागी हजर राहण्याचा हक्क असेल. एखादा उमेदवार हजर राहणार नसेल तर त्त्यास, मतमोजणीचे काम पाहण्यासाठी आपला प्रतिनिधी म्हणून इतर कोणत्त्याही सदस्यास, प्रतिनियुक्त करता येईल.  मात्र मतदानात प्रत्त्यक्ष प्रारंभ होण्यापुर्वी पिठासिन प्राधिका-यास अशा प्रतिनिधीचे नावं लेखी कळविले पाहिजे.

सूचनाः-

१. तुम्हास सोळा मते आहे.
२. मत फुलीच्या (x) च्या अशा खुणेत दाखवायचे आहे.
३. तुम्ही तुमची १६ मते कोणत्त्याही एका उमेदवारास वा १६उमेदवारास विभागुन तुमच्या मर्जी प्रमाणे देऊ शकता.
४. एकाच उमेदवाराच्या नावापुढे १६ पेक्षा जास्त फुल्या करू  नका.
५. उमेदवाराच्या नावासमोरील रकान्यात उमेदवाराच्या नावापुढे खुण व खुणा करणेची आहे.
६. (x) अशी फुलीची खुण तुम्हास दिलेल्या साहित्त्यानेच करणेची आहे.

मतपत्रिका खालील कारणांमुळे रद्द होईल.

१. सभासदाने मतपत्रिकेवर स्वाक्षरी केली किंवा त्त्याची ओळख पटेल असा शब्द लिहिला किंवा खुण केली तर.
२ मतपत्रिका स्थळ विभागापासून फाडून घेण्यासाठी केलेल्या छिद्रांकित मर्यादा रेषेच्या (परफोरेशन) दोन्ही बाजुस मिळुन मुद्रेचा ठसा उमटविलेला नसेल तर.
३. मतपत्रिकेवर मत निर्देशक खुणा (फुल्या) नसतील तर किंवा त्त्या कोणत्त्या उमेदवाराच्या नावापुढे केल्या आहेत त्त्याबददल संदेह उदभवल्या नंतर.
४. मतपत्रिकेवर एकाच उमेदवाराच्या नावापुढे सोळा पेक्षा अधिक फुल्या असतील तर व सोळा उमेदवारापेक्षा अधिक उमेदवाराच्या नावापुढे फुल्या असतील तर.
५ मतपत्रिकेवर फुली करण्यासाठी जी जागा आहे त्त्याऐवजी इतर कोठेही फुली केल्या तर.
६. तुम्ही एका किंवा अनेक उमेदवारांच्या नावापुढे एकुण फुल्यांपेक्षा जास्त फुल्या केल्या तर.

श्री. दत्त्ता भडकवाड , उप-आयुक्त व श्री. अजित कारचे, उपायुक्त यांची नेमणूक मतमोजणी अधिकारी म्हणून करण्यात आलेली आहे. या निवडणूकीत परिनिरिक्षक कोणी नसणार. मत वैद्य आहे का अवैद्य हे ठरविण्याचा अधिकार मा.

पिठासिन अधिकारी यांचा असेल. मागील निवडणूकीसाठी परिनिरिक्षक हा निर्णय घ्यायचे यावेळी पिठासीन अधिकारी निर्णय घेतील

जर समसमान मते पडली आणि मा. पिठासीन प्राधिकारी आपले निर्णायक मत देणार नाही तर गुप्त मतदानाचा निकाल चिठ्ठया टाकुन करण्यांत येईल. असे मा. पिठासिन प्राधिकारी घोषित करतील, उपस्थित राहून मतदान करणारे बहुसंख्य सन्माननिय पालिका सदस्य ठरवतील अशा व्यक्तीकडून



चिठ्ठया काढण्यात येतील, ज्या उमेदवाराचे नावाची चिठ्ठी निघेल तो उमेदवार मा. पिठासिन प्राधिका-याकडुन नेमण्यात व निवडण्यात आल्याचे घोषित करण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> परिनिरिक्षक नसतील काय?
<u>मा.सचिव :-</u> नाही, परिनिरिक्षकाची गरज नाही. कायदयात पण तसे नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> कायदयात नाही?

<u>मा. सचिव :-</u> नाही. आता निवडणूक प्रक्रिया सुरु होत आहे.

विषय :- उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २००२ सार्वत्रिक निवडणुकीत निवडुन आलेल्या सदस्यांपैकी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २० मधील तरतुदीप्रमाणे स्थायी समितीच्या १६ सदस्यांची नेमणुक करणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर महानगरपालिका सन २००२मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी स्थायी समिती रचनेकरिता १६ सदस्यांची नेमणुक करणे बाबतचा विषय दि. ५.४.२००२ च्या पहिल्या सभेच्या कार्यसूचीवर विषय क्र. ३ वर आहे. त्याआधी निवडणूक कार्यक्रमाच्या तरतूदीप्रमाणे दि. २८.३.२००२ रोजी ज्या उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्रे दाखल केले आणि ज्यांची नामनिर्देशनपत्रे वैध झाली त्यांची नावे येणेप्रमाणे.

१. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
२. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम
३. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
४. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
५. श्रीमती. नाथानी निना प्रकाश
६. श्रीमती. भठीया कोमल अमृत
७. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
८. श्री. रूपानी चिमन अमरूमल
९. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
१०. श्रीमती. आहुजा निता प्रकाश
११. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
१२. श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण
१३. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
१४. श्री. गायकवाड दिलीप दशरथ
१५. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण

१६. श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल
१७. श्री. बच्चाराम बाशोमल रूपचंदानी
१८. श्रीमती. सिमा चंदीराम मोकल
१९. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
२०. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के
२१. श्री. ठाकुर अशोक भगवानदास
२२. श्री. बहरानी ठाकुरदास वर्यलदास
२३. श्री. जाधव सुरेश मधुकर



वरील उमेदवरांपैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली.

१. श्री. रूपानी चिमन अमरूमल
२. श्रीमती. भठीजा कोमल अमृत
३. श्री. जाधव सुरेश मधुकर
४. श्रीमती. नाथानी नीना प्रकाश
५. श्री. बहरानी ठाकुरदास वर्यलदास
६. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती

वरील उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतल्या अंती रिंगणात १७ उमेदवार शिल्लक राहिले त्यामुळे गुप्त मतदानाची आवश्यकता भासल्याने निवडणुक प्रक्रिया सुरू करणेस व तदनंतर निवडणूक निकाल जाहिर करणेसाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ४</u> <u>दि. ५.४.२००२.</u>

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार ७५ पालिका सदस्यांनी केलेल्या गुप्त मतदानाअंती खाली दर्शाविलेल्या प्रत्येक उमेदवारासमोरील मिळालेली मते जाहिर करीत आहे आणि अनुक्रमांक १ ते १६ वरील उमेदवारांची स्थायी समिती सदस्य म्हणुन नेमणुक करीत आहे.

| उमेदवाराचे नाव | मिळालेली एकुण मते |
| --- | --- |
| १.श्रीमती. आहुजा नीता प्रकाश | ७१ |
| २.श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ७१ |
| ३.श्री. गायकवाड दिलीप दशरथ | ७१ |
| ४.श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम (कुमारी) | ८७ |
| ५.श्री. तलरेजा विनोद चंदीराम | ७० |
| ६.श्री. पमनानी ईश्वर सतरामदास | ७० |
| ७.श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | ७१ |
| ८.श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ७१ |
| ९.श्रीमती. मोकल सिमा चंदभान | ७२ |
| १० श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण | ७० |
| ११ श्री. रूपचंदानी बच्चाराम बाछोमल | ७२ |
| १२ श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ७२ |
| १३ श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) | ७० |
| १४ श्री.वलेचा पृथ्वी व्यापारीमल | ७० |

१५ श्री. शर्मा कमला गंगाधर ७१
१६ श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल ६६
१७ श्री. ठाकुर अशोक भगवानदास ५५

<u>मतदानाव्दारे मंजुर</u>
महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

--१६--

<u>मा. सचिव :-</u> आता रात्रीचे ८ वाजून ४५ मिनिटे झाले आहे. आता मा. महापौर निकाल जाहिर करतील.

<u>मा. महापौर (श्रीमती मालती करोतिया):-</u>प्रत्येक उपस्थित सदस्यांच्या गुप्त मतदानाअंती आलेल्या निकालाप्रमाणे मी महासभेतर्फे वरील १६ उमेदवार स्थायी समिती सदस्य पदी निवडून आल्याचे जाहिर करीत आहे.

<u>मा.सचिव:-</u>विषय क्र. ४ वर मा. उच्च न्यायालयाकडुन स्थगन आदेश आले आहेत. म्हणुन तो विषय घेता येणार नाही त्यामुळे आपल्याला ही सभा पुढील सुचना मिळेपर्यंत स्थगित करावी लागेल.

कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर रात्री ९. ०० वाजता सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-२६/४/२००२.

इतिवृत्त

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२६/४/२००२ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दि. २६ ४ २००२ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती.मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शाविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.

२)मा.उपमहापौर :- श्रीमती. जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ४०. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ४१. | श्री.राजेश उर्फ राज जयसिंग असरोंडकर |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ४२. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४३. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ७. | श्रीमती.रामचंदानी भावना मनोहर | ४४. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४५. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ९. | श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास | ४६. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| १०. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४७. | श्री. दर्शनासिंह खेमाणी |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४८. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४९. | श्री. पमनानी इश्वर (डेंडा)सतरामदास |
| १३. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ५०. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १४. | श्रीमती. पाल अधारी राजाराम | ५१. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १५. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ५२. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १६. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५३. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १७. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५४. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १८. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५५ | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १९. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५६ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| २०. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन | ५७. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २१. | श्री. रेहडा श्यामसुंदर जानीलाल | ५८. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २२. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५९. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २३. | श्रीमती.गुप्ता आशा प्रभुनाथ | ६०. | श्री.साधवानी मनोज लालचंद |
| २४. | श्री. नाना आनंदा पवार | ६१. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २५. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ६२. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २६. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ६३. | श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास |
| २७. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६४. | श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण |
| २८. | श्री. शांताराम ओंकार निकम | ६५. | श्रीमती. किरण लखी माखीजा |
| २९. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६६. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| ३०. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६७. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६८. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| ३२. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६९. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३३. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ७०. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३४. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ७१. | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| ३५. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७२. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३६. | श्री. मोहन साधवानी | ७३. | श्री. बेहराणी ठाकूरदास वरीयलदास |
| ३७. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | | |
| ३८. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | | |
| ३९. | श्रीमती. भावना रवी खिलनानी | | |

तर

मा. सदस्या श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे व श्रीमती. इंदु भठिजा ह्या सभेस अनुपस्थित होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. आयुक्तांच्या अनुपस्थितीत त्यांनी याबाबत प्राधिकृत केलेले उपायुक्त श्री. जे.एम.ढाकरे यांना महासभेत उपस्थित रहाण्याचा व त्यात होणा-या चर्चेत भाग घेण्याचा अधिकार प्रदान केल्याने ते आयुक्त स्थानी आसनस्थ झाले.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप सही करून सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा.सचिव :-</u> या सभेतील पहिला विषय सुरू करण्यापुर्वी मा. महापौरांनी मला आदेश दिले आहेत की, सभागृह नेता, विपक्ष नेता, गटनेत्त्यांची नावे घोषित केली जावीत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u> सचिव साहेब, महापौर मॅडम मागच्या आठवडयात आम्हाला प्रशिक्षण दिले होते की, सभागृहात कसे बोलले पाहिजे. परंतु आजच्या सभेत आयुक्त साहेब गैरहजर आहेत तर त्यासाठी काय केले जावे?

<u>मा.सचिव :-</u>मा. आयुक्त साहेबांनी श्री. जे.एम. ढाकरे साहेबांना अधिकृत केले आहे. त्याच्या आसनावर बसून कार्यभार सांभाळावा.

श्री. किशोर नारायणदास वनवारी यांचे नाव सभागृह नेत्त्यासाठी सुचविले आहे. यांचे नाव मा. महापौरांना मान्य आहे. श्री. रमेश महोदव चव्हाण यांचे नाव विरोधी पक्षनेत्त्यासाठी सुचविले आहे. यांचे पण नाव मा. महापौरांना मान्य आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस तर्फे श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांचे नाव सुचविले आहे. त्यास देखिल मान्य केले जात आहे. भाजपा पक्षातर्फे श्री. जमनादास पुरस्वानी यांचे नाव गटनेत्त्यासाठी सुचविले आहे. त्यास देखिल मान्य केले जात आहे. कॉंग्रेस पक्षातर्फे मोहनदास बेहरानी यांचे नाव सुचविले आहे त्यास मान्य केले जात आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u> सन्माननिय महापौर महोदय, सभेचे कामकाज सुरू होण्यापुर्वी एका महत्त्वाच्या प्रश्नावर मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, सकाळ पासुन महापालिका मुख्यालयाच्या बाहेर काही पत्रकारांचे उपोषण सुरू

आहे. आणि माझ्या माहितीप्रमाणे त्या उपोषणाची नोटीस त्यांनी आपल्याला जवळ जवळ एक आठवडापासुन दिली होती. परंतु त्याकडे अजिबात लक्ष दिले गेलेले नाही. त्यांची एक साधीशी अशी मागणी आहे की, त्यांचे जे वर्तमानपत्रे आहेत किंवा जी साप्ताहिक आहेत. ती महापालिका मुख्यालयात वाटण्यास त्यांना रोखले गेले आहे. अशा प्रकारचे खरे म्हणजे कुठलाही राष्ट्रीय दैनिक किंवा साप्ताहिक अशा पध्दतीने आपण याची वर्गवारी वर्तमानपत्राची करू शकत नाही. त्यामुळे जर एखादया वर्तमानपत्राबददल किंवा साप्ताहिकेबददल कुठल्याही प्रकारचा आयुक्तांना प्रशासनाला किंवा प्रशासनातील कुठल्याही अधिका-यांना जर काही आक्षेप असतील आपत्ती असेल तर तशा प्रकारचा आक्षेप त्या वर्तमान पत्रात ते नोंदवु शकतात. परंतु वर्तमानपत्र हे महापालिकेच्या मुख्यालयामध्ये येऊच न देणे हे खरे म्हणजे जे आपल्याला हक्क मिळाले आहेत. त्या हक्काच्या सुध्दा विरोधामध्ये आहे. अशा या प्रशासनाच्या कृतीचा मी याठिकाणी निषेध करतो. आणि अशी मागणी करतो की, त्यांची जी मागणी आहे ती आपण मान्य केली पाहिजे. त्यासाठी चर्चा केली पाहिजे. आणि ते उपोषण लवकरात लवकर समाप्त होईल. अशा पध्दतीने त्याची चर्चा करून उपाययोजना काढल्या पाहिजेत.

<u>मा. महापौरः-</u>जशी ही सभा संपेल तसे आपण तिथे जाऊ.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>त्यांची दुसरी पण मागणी आहे की, जनसंपर्क अधिकारी पद भरले जावे. प्रत्त्येक महापालिकेत ते पद असते याच महापालिकेत ते पद नाही.

<u>मा. महापौरः-</u>तुम्ही जे या सर्वांविषयी बोलत आहात त्यावर आपण सभा संपल्यावर निर्णय घेऊ.

<u>मा.सचिव :-</u>मा. महापौर व उपमहापौर हे सभागृह नेता, विपक्ष नेता व गटनेता यांचे पुष्पहार देऊन स्वागत करतील.

मा. महापौर व उपमहापौर यांनी पुष्पहार देऊन सर्वांचे स्वागत केले.

<u>मा. सचिव :-</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय :-<u>प्रभाग समित्त्यांची स्थापना करणे बाबत.</u>

<u>मा. सचिव :-</u>प्रशासनातर्फे जो प्रस्ताव आला आहे त्याच्या परस्पर विरोधात एक प्रस्ताव आला आहे. प्रस्तावाचे सुचक आहेत श्री. जमनादास पुरस्वानी व अनुमोदक आहेत श्री. राजेंद्रसिंह भुल्लर. त्यांनी फेरबदल सुझाव दिला तो पुढील प्रमाणे आहे. प्रशासनातर्फे प्रभाग समिती १ मध्ये त्यांनी काही बदल सुचविलेला नाही. दुस-या प्रभाग समितीमध्ये कोणकोणत्त्या प्रभागाचा समावेश आहे ते मी वाचुन दाखवितो. ६ ,७ ,८ ,२२ ,२३ ,२५ व विरोधी प्रस्तावात प्रभाग सुचविले आहेत ते या प्रमाणे प्रभाग क्र. ६ ,७ ,८ ,२२ ,२३ ,२४ ,२५ प्रभाग समिती क्र. ३ प्रशासनातर्फे आहे १५ ,१६ ,१७ ,१८ ,१९ ,२४ व विरोधी प्रस्ताव यात-हेने आहे ९ ,१५ ,१७ ,१८ ,१९

प्रभाग समिती क्र. ४ प्रशासनातर्फे आहे प्रभाग क्र. ९,१०,११,१२,१३,१४ त्याविरोधात आहे १०,११,१२,१३,१६.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>प्रभाग समिती ४ चे पुन्हा सांगा.

मा. सचिव यांनी वरील प्रमाणे सर्व प्रभाग वाचुन दाखविले.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आमचे असे म्हणणे आहे की, प्रशासनातर्फे जो प्रस्ताव आला आहे. तो बरोबर आहे. त्यांनी सर्व गोष्टी लक्षात घेऊन तो प्रस्ताव बनवला आहे.

<u>मा. सदस्य जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौर, हा प्रस्ताव महापौरांतर्फे आला आहे की आयुक्तांतर्फे?

<u>मा. सचिवः-</u>प्रशासनातर्फे आला आहे. गोषवा-यावर आयुक्त साहेबांची सही आहे.

<u>मा. सदस्य जमनादास पुरस्वानीः-</u>आमच्या विरोधाचे कारण हे आहे की, इथे ज्या चार प्रभाग समित्त्या स्थापन केल्या आहेत. त्याचे मुख्य लक्ष्य हे आहे की लोकांना त्याचा फायदा झाला पाहिजे. लोकांना महापालिका लांब पडते त्यांच्या सुविधेसाठी म्हणुन प्रभाग समिती स्थापन केली जाते व त्यासाठी चार प्रभाग समित्त्या स्थापन केल्या जात आहे. परंतु प्रभाग समिती दोन मध्ये प्रशासनातर्फे आलेले प्रभाग ६,७,८,२२,२३,२५ व व्हीटीसी मैदानात आला आहे २४ नंबर. आज ढाकरे साहेब आयुक्तांच्या जागी आसनस्थ आहेत. २४ नंबर प्रभाग आहे. जे महापालिकेच्या जवळ राहतात ते देखिल महापालिकेत येऊ शकत नाहीत. ते ४ नंबर व्हीटीसीला जाणार? त्यांना ते मैदान इतके जवळ आहे का? व रेल्वे फाटकावर जी हदद आहे. निवडणुकीच्यावेळी पण आम्ही त्या हददीचा वापर केला होता प्रभाग बनवतेवेळी. इथे पण ती रेल्वेची हदद पण लक्षात घेतली नाही. आणि २४ नंबर प्रभागाचा व्हीटीसी मैदानात समावेश केला आहे. तो प्रभाग यात्री निवास मध्ये आला पाहिजे. मी आयुक्त साहेबांना असे निवेदन करेन की, याविषयी त्यांना माहिती दयावी.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>आयुक्त साहेब, सदर प्रभाग समितीची रचना करताना प्रशासनातर्फे कोण कोणते निकष लावले आहेत. त्याची माहिती जरा सभागृहाला दया. कुठला निकष लावुन या प्रभाग समित्त्या स्थापन केल्या आहेत. त्याची माहिती जरा सभागृहाला दया.

<u>श्री. जे. एम. ढाकरे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी):-</u>प्रभाग समितीची रचना भौगोलिक दृष्टया नागरिकांची सुविधा व शासनाचे मार्गदर्शन तत्त्व याप्रमाणे तयार केल्या आहेत याबाबत जास्त सविस्तर माहिती आमचे शहर अभियंता आपल्याला देतील.

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, ही जी प्रभाग समितीची रचना केलेली आहे त्याचा नकाशा मी तुम्हाला दाखवु शकतो. त्यातील सर्व भौगोलिक परिस्थिती पाहुन त्याची रचना केलेली आहे. तुम्ही म्हणता २४ नंबर प्रभाग तो २ नंबरमध्ये का नाही समाविष्ट केला गेला. कारण आम्ही

७ ,६ ,६ , अशा त-हेने रचना केलेली आहे. जर तुम्हा कुणाल पाहायचे असेल तर तिथे येऊन मी तुम्हाला प्लान दाखवु शकतो.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः</u>-तुम्ही इकडे येऊन दाखवायची आवश्यकता नाही. ७ , ६ ,६ , असे कोणत्त्या कायदयात लिहिले आहे का? तिथे जर एखादया म्हाता-या व्यक्तीला जावे लागले तर तो कसा जाणार?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः</u>-जरुरी आहे का ७ ,६ ,६ पाहिजे कशाला? यात्री निवास जवळ पडेल की व्हि.टी.सी.ग्रॉऊंड?

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :</u>-इकडे येऊन टेबलाजवळ सांगण्याची गरज नाही तेथुनच सांगावे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः</u>-इकडे जर कुणी २४ नंबर प्रभागाचा नगरसेवक असेल त्यांनी सांगावे की महापालिका जवळ पडेल की व्ही.टी.सी. ग्रॉऊंड?

<u>श्री. चिजवानी(शहर अभियंता):</u>-असे काही कायदयात नाही की ७ ,६ ,६ प्रभाग असले पाहिजे. २५ प्रभागाच्या हिशोबाने आम्ही प्रत्येक समितीत इतके इतके प्रभाग पाहिजेत असे ठरविले. ४ समित्त्या बनवायच्या आहेत. शासन निर्णयाने मार्गदर्शन दिले आहे त्याप्रमाणे केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः</u>-तुम्ही तिथे व्हिजीट नाही का दिली? तुम्ही २४ नंबर प्रभागात स्वतः नाही का गेलात?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):</u>-हि जी पध्दत आहे तीच असावी असे नाही. अनेक पध्दतीने रचना करतात.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः</u>-२४ नंबर प्रभागाच्या लोकांनी ४ नंबरमध्ये जावे हे योग्य आहे का? ही रचना तुम्ही केली आहे का?

इकडे दोन-तीन सदस्य बोलत असताना....

<u>मा. महापौरः</u>-कृपा करून एकेकाने बोलावे. अशाने कोण काय बोलत आहे ते समजत नाही.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः</u>-मा. महापौर, मला बोलायचे आहे. २४ नंबर प्रभागाची हदद पवई येथे संपते. व्हीटीसी ग्राऊंड पवई पासुन लांब नाही. हिराघाटच्या बाजुचे गार्डन आहे तिथ पर्यंत या प्रभागाची हदद आहे. २४ नंबरच्या प्रभागातील नगरसेवकाची जर हरकत नाही तर हे कशाला हरकत घेतात?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः</u>-प्रभाग समिती नागरिकांच्या सेवेसाठी आहे की, नगरसेवकांच्या सुविधेसाठी बनवत आहेत का?२४ नंबरच्या प्रभागातील लोकांना व्हीटीसी ग्राऊंडवर पळवायचे आहे का? इथे महापालिकेत लोक येत

नाहीत व्हीटीसी मध्ये जाणार आहेत. तुम्ही बनवले आहे का हे?यात जनतेला सुविधा मिळणार आहे की, असुविधा?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले होते आम्ही तिथे बसुन केले आहे. आम्ही आमच्यातर्फे पुर्ण प्रयत्न केला आहे की, प्रभाग समितीची रचना चांगल्या त-हेने होईल.आम्ही पुर्ण प्रयत्न करून ते तयार केले आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-सदनातील सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की, हा प्रस्ताव प्रशासनाने आणला आहे त्यावर संशय नाही घेतला पाहिजे. २४ नंबर प्रभाग आमच्या सदस्याची हरकत नाही तुम्ही कशाला टेंन्शन घेता?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-आम्ही जनतेचा विचार करून बोलत आहोत आमच्यासाठी नाही. तुम्ही सदस्यांविषयी नका बोलु जनतेविषयी बोला.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-तुम्ही पुर्ण ऐकत जा. अर्धे ऐकल्यावरच भडकुन जाता. मला पुर्ण बोलु तर दया. जसे हे बोलत आहेत तसे विधानसभेत पण झाले पाहिजे. नागपुरचे आमदार नागपुरातच राहिले पाहिजे. पुण्याचे आमदार पुण्यातच राहिले पाहिजे. विधानसभेत कशाला जातात. प्रशासनाने जे तयार केले आहे ते तसेच असले पाहिजे. जसे आहे तसा स्विकार केला जावा. काही फायदा होणार नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मा. महापौरजी.....

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-आता मी बोलत आहे तुम्ही गप्प बसा. दोन-दोन जण उठुन बोलत आहात प्लीज मला बोलु दया. तुम्हाला संधी दिली जाईल.

मा. महापौर:-कृपया ऐकेकानेच बोलावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मॅडम यांना पण संधी दया बोलण्याची माझे झाल्या नंतर. माझे म्हणणे आहे प्रशासनाने जो प्रस्ताव तयार केला आहे. आम्हाला ते मंजुर आहे आयुक्त साहेबांनी सही केली आहे. गोषवारा सर्वांना दिला आहे. जमनुभाई विचारतात की हे सत्ताधारी पक्षाने बनविले आहे की, आयुक्तांनी याचा अर्थ त्यांनी अजुन कार्यसुची पाहीली नाही, गोषवारा वाचला नाही, त्याच्या खाली आयुक्तांची सही आहे. तर मेहरबानी करून थोडेसे अंतर असेल तर चालेल सर्व काम काही प्रभाग समितीत होणार नाही. काही स्थायी समितीत पण कामे होतात काही महासभेत पण होतात. प्रभाग समित्त्या याआधी पण होत्त्या. मागच्या वर्षी तुमच्या मागणीमुळेच प्रभाग समित्त्या स्थापन करण्यात आल्या होत्त्या. तुमची मागणी लक्षात घेऊनच आम्ही प्रभाग समित्त्या स्थापन करित आहोत तर मेहरबानी करून सर्वसंमतीने मंजुर करावे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मा. महापौर मी सभागृहनेत्त्यांना हे सांगु इच्छितो की, प्रशासनाने दिले आहे ते बरोबर आहे. प्रशासनाने दिले ते जर

बरोबर असते तर लोकशाही नसती. निवडणुका झाल्याच नसत्त्या. नगरसेवक निवडुन आले नसते. प्रशासनावर अंकुश लावण्यासाठी शासन बनविले आहे. प्रशासनाची जी चुक आहे ती दुरूस्त करणे आपले कर्तव्य आहे. प्रभाग समिती रचनेसाठी आम्ही कधी विरोध केला नाही. परंतु रचना योग्यत-हेने झाली पाहिजे जेणेकरून लोकांना त्याचा उपयोग झाला पाहिजे. म्हणुन मी आपणांस विनंती करतो की, २४ नंबर पॅनल यात्री निवास येथे करावे. व आम्ही दिलेला प्रस्ताव मंजुर करावा. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-चिजवानी साहेब तुम्ही आम्हाला काही समजवण्यासाठी उभे आहात काही तरी समजवा आम्हाला. म्हणजे आम्ही चर्चा करू शकु.

मा. महापौरः-मी सचिव साहेबांना सांगते की, सदर प्रस्ताव मतदानासाठी घ्यावा.

मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-तुम्ही आम्हाला समजवा २४ नंबर प्रभाग कुठे येतो त्याची हदद काय? त्यात कोणकोणते क्षेत्र येते. तिकडुन इकडे यायला नागरिकांना काय सुविधा आहेत? जवळ लांब कुठे आहे हे सर्व तुम्ही पाहिले असेल ना? जरा आम्हाला समजवा. तुम्ही स्वतः तयार केले आहे ना?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-हो मी स्वतः बनविले आहे.

मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः'-तुम्ही रेल्वे फाटक पण लक्षात घेतले नाही.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-पवईचा रेल्वे उड्डाणपुल लक्षात घेऊन केलेले आहे.

मा.सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-तुम्ही थोडी हदद सांगा.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-तुम्ही म्हणता ते सर्व मुददे लक्षात घेतले आहे.

मा.सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-कुठे घेतले आहेत?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-नकाशा नुसार सर्व केले आहे. पवईच्या रेल्वे उड्डाण पुलाला ते लागुन आहे. तिथे काही समस्या नाही.

मा.सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-काय समस्या नाही?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-आता एका महिन्यात तो पुल तयार होईल. लोकांना येण्या जाण्यात त्रास होणार नाही.

मा.सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-तुम्ही लोकांची काय सोय केली?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):- लोकांची सोय लक्षात घेऊनच तयार केले आहे.

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>लोकांच्या सुविधेकडे तुम्ही काय लक्ष दिले सांगा जरा. त्यांना महापालिका जवळ आहे की, व्हीटीसी ग्राऊंड.*

*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>चार प्रभाग समित्त्या आहेत कुणाला ना कुणाला तरी ठिकाण लांब वाटणार आहे. सर्वांना पावकिलोमीटर अर्धा किलोमीटर मध्ये सोय मिळणार नाही.*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>तुम्ही जाणुन बुजून इकडच्या लोकांना तिकडे केले आहे.*

*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>असे नाही. आम्ही कुठे जरी कार्यालय ठेवले तर कुणाला तरी लांब पडणार?*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>जिथे तुम्ही चुक केली आहे त्यावरच आम्ही बोलत आहोत.*

*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>पाच नंबर वाल्यांना हि महापालिका लांब पडते एक नंबर वाल्यांना जवळ पडते. असा थोडा बहुत फरक कुणावर तरी पडणारच आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>जर काही सुधारणा करायची असेल तर आयुक्त साहेब तुम्ही करू शकता का? तुम्हाला आयुक्तांनी अधिकार दिले आहेत का? तुम्ही आयुक्तांच्या जागी बसला आहात. तुम्हाला काही अधिकार आहेत का?*

*<u>श्री. जे. एम. ढाकरे (आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी):-</u>शासनाच्या मार्गदर्शनानुसार भौगोलिक परिस्थिती पाहुन प्रस्ताव सादर केला आहे. बदल करण्याचे अधिकार तुम्हाला आहेत.*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>शासनाने काय मार्गदर्शन केले आहे की, जनतेला त्रास दया. त्यात लिहिले आहे का,जनतेला त्रास दिला जावा. तुम्ही जरा शासनाने काय मार्गदर्शन केले ते सांगा. म्हाता-या व्यक्तीला तीन किलोमीटर इतके लांब पाठवायचे का? आम्ही जो प्रस्ताव दिला त्यात काय चुक आहे आणि तुम्ही जो प्रस्ताव दिला त्यात काय विशेष आहे ? सांगा जरा.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>आमचे उल्हासनगर शहर तेरा कि.मी. मध्ये वसले आहे. १३ कि.मी. ला चारने भागले तर ३ कि.मी. ऐकेकाच्या वाटणीला येणारच आहे. हे जाहीर आहे. या शहरात ५ कॅम्प आहेत. प्रभाग समिती ४ आहेत. लोकांना त्रास होणारच आणि तो त्रास ते सहन करतील. आम्हाला सर्व गोष्टी मान्य आहेत. जर विरोधी पक्ष सहकार्य देत नसेल तर तुम्ही बहुमताने प्रस्ताव पारीत करा.*

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>महापौर साहेब, प्रभाग समितीचे कार्यालय जर कुणाला लांब वाटत असेल तर इथे महापालिकेत यायची त्याला मनाई नाही आहे. इकडे येऊनसुध्दा ते काम करू शकतात.*

*__मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-__प्रभाग समिती स्थापन झाल्यावर उपायुक्त तिकडे बसणार महापालिकेत नाही बसणार.*

*__मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-__मा. महापौर, सभेचे डेकोरम पुर्ण पाळले गेले पाहिजे.*

*__मा. महापौरः-__मी सचिव साहेबांना सांगते की, त्यांनी सदर प्रस्ताव मतदानास टाकावा.*

*__मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-__सभेचा जो डेकोरम व प्रोटोकॉल लक्षात घेऊन सभा चालली पाहिजे. तुम्ही सांगितले की, आधी प्रशासन प्रस्तावावर जस्टीफीकेशन देईल. त्यानंतर तुम्ही जो परस्पर विरूध्द प्रस्ताव दिला आहे. त्यावर स्पष्टीकरण देईल. अजुन त्यावर काही चर्चा झाली नाही. तुम्हाला इतकी घाई काय आहे. पास-पास करण्याची. यावर चर्चा होणे जरूरी आहे. कारण आम्ही जो प्रस्ताव दिला आमच्या माहितीप्रमाणे तो बरोबर आहे. प्रशासनाने जो प्रस्ताव दिलेला आहे. प्रभाग समितीची जी रचना होते ती नगरसेवकांची सोय लक्षात न घेता त्या विभागातील नागरिकांच्या दृष्टीने सोयीस्कर व्हावी अशी रचना असते. याठिकाणी मुददे उपस्थित केले गेले. सात-सहा-सहा अशी रचना होती. ती बरोबर होती. आमच्या नगरसेवक भुल्लर महाराजांनी उपस्थित केलेला मुददा कोणत्त्याही कायदयामध्ये असे नमुद केलेले नाही की, वार्डाची संख्या सारखी असावी. उदा. कल्याण महानगरपालिकेमध्ये एका वार्ड कमिटीमध्ये सात आहेत एका मध्ये नऊ आहेत. एका वार्ड कमीटीमध्ये १८ आहेत. अशी वेगवेगळी विभागणी केली आहे. त्या त्या विभागातील लोकांना तिथे सोयीस्कर व्हावे अशा प्रकारची वार्ड कार्यालये तिथे उभी केली जातात. ओढुन ताणुन आणून लोकांना गैरसोयीचे होईल. नगरसेवकांना फायदयाचे होईल व सोयीचे होईल हे लक्षात न घेता जनतेला सोयीचे व फायदयाचे कसे होईल या दृष्टीने विचार करावा. जसे आमच्या जमनु पुरस्वानीनी सांगितले की, २४ नंबरचा प्रभाग तिकडे टाकण्यात काही अर्थ नाही. त्याऐवजी तिकडचे वार्ड सहा आणि पाचमध्ये विभागणी केल्यास लोकांना फायदेशीर ठरेल. आता याठिकाणी प्रशासनाकडुन या वार्ड कमिटीच्या बाबतीत काही विश्लेषण न करता फक्त सत्ताधारी पक्ष त्याचे विश्लेषण करतात याचा अर्थ प्रशासनाने सत्ताधारी पक्षांच्या वतीने हा प्रस्ताव आणला आहे. असे लक्षात येते. प्रस्ताविक सत्ताधारी पक्षाने सुध्दा आम्ही हा प्रस्ताव दिला आहे. त्यावर विचार करणे गरजेचे होते तसे न करता प्रशासनाने दिलेले त्याला फक्त होय बाय करत आहेत ते चुकीचे आहे. आपण विचार करा. प्रस्ताव चांगला असल्यास आमच्यात सामील व्हा. ही आपणांस विनंती करतो.*

*__मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-__मा. महापौर महोदया,....*

*__मा. महापौरः-__एक मिनिट बसा. प्रस्ताव मतदानासाठी टाकत आहोत.*

*__मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-__आम्हाला बोलु तर दया.आपल्या माध्यमातुन मी सभागृहासमोर आणु इच्छितो की, जसे श्री. धनंजय बोडारे यांनी सांगितले की, कल्याण डोंबिवली महापालिकेत जी सदस्य संख्या आहे......*

__मा. महापौरः-__राजजी, आपण बसा. मी प्रस्तावावर मतदान घ्यावे असे घोषित केले आहे. मतदान होऊ दया.

__मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-__आम्हाला आमचे बोलणे तर पुर्ण करू दया. मतदान घ्यायला खुप वेळ आहे.

__मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-__मतदानासाठी खुप वेळ आहे.

__मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-__मा. महापौरजी, जे आमचे बंधु आता बोलत आहेत. त्याच्याशी मी पण सहमत आहे. प्रोटोकॉल प्रमाणे कल्याण डोंबिवली महापालिकेचे कामकाज चालते. आठ-आठ सदस्य एकाच वेळी, एकाच विषयावर बोलत नाहीत.

__मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-__सभागृह नेता आधी बोलत नाहीत. सर्वात शेवटी बोलतात.

__मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-__महाराजजी पण तेच बोलले बोडारे पण तेच बोलले आता तुम्ही पण तेच बोलत आहात. एक-एक गोष्ट दहा वेळा बोलणार का? २४ नंबर, २४ नंबर याच मुदयावर बोलत आहात.

__मा. महापौरः-__राजजी तुम्ही पण बसा ते पण बसतील.

मा. सदस्य श्री. श्यामसुंदर रोहडा, श्री. राजु टेकचंदानी, श्री. ईश्वर पमनानी, श्री. गोविंदराम लुंड सभागृहातुन बाहेर पडले.

__मा. सचिवः-__मा.महापौरांनी सदरचा प्रस्ताव मतदानासाठी आपणांसमोर ठेवला आहे. जे सन्माननिय सदस्य प्रशासनाने आणलेल्या प्रस्तावाशी सहमत आहेत व विरोधी पक्षाच्या सुधारणा प्रस्तावाशी सहमत नाही त्यांनी आपले हात वर करावेत.

**प्रशासनाच्या प्रस्तावाच्या बाजुने मते व विरोधी पक्षाच्या सुधारणा प्रस्तावा विरूध्द मते.**

१. श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर
२. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
३. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
४. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
५. श्रीमती. पाल आधारी राजाराम
६. श्री. ऐडके गणपत गोविंद
७. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
८. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
१०. श्रीमती. गुप्ता आशा प्रभुनाथ
११ श्री. पवार नाना आनंदा
१२ श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
१३ श्री. रूपाणी चिमन अमरूमल

१४ श्री. निकम शांताराम ओंकार
१५ श्री. ठकुर विनोद लालसिंग
१६ श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे)
१७. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
१८. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
१९ .श्री. वनवारी किशोर नारायणदास
२०. श्री. जेसवानी सतराम पुनमदास
२१ श्रीमती. खिलनानी भावना रवि
२२ श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
२३ श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल
२४ श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
२५श्रीमती. पंजाबी दिपा नारायण
२६ श्री. साधवानी मनोज लालचंद
२७ श्रीमती. भठिजा कोमल अमृत
२८. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास
२९. श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण
३०. श्रीमती. माखिजा किरण लखी
३१. श्री. लबाना होशियारसिंग हरीसिंग
३२. श्री. ठकुर नरेंद्रकुमार केवलराम
३३. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
३४. श्रीमती. नाथानी निना प्रकाश
३५. श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश
३६. श्रीमती. दासानी मिनु राजकुमार
३७. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
३८. श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ
३९. श्री. जाधव सुरेश मधुकर
४० श्री. टाले प्रमोद नामदेवराव
४१ श्री. साधवानी मोहन
४२ श्रीमती. साधवानी जया
४३ श्री. भालेराव गौतम यशवंत
४४ श्रीमती. वसिटा बेबी
४५ श्री. ठकुर अशोक भगवानदास
४६ श्री. वेहरानी मोहन वर्यलदास
४७ श्रीमती. करोतिया मालती राधाचरण
४८ श्री. वेहरानी ठकुरदास वर्यलदास

<u>मा. सचिव:-</u> जे प्रशासनाने आणलेलया प्रस्तावाशी सहमत नाही. व विरोधी पक्षाच्या सुधारणा प्रस्तावाशी सहमत आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

<u>विरोधी पक्षाच्या सुधारणा प्रस्तावाच्या बाजुने मते व प्रशासनाच्या प्रस्तावाच्या विरोधात मते :-</u>

१. श्रीमती. जावळे संगिता रमेश
२. श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास
३. श्रीमती. मोकल सिमा चंद्राराम
४. श्री. पुरस्वानी जमनादास खुपचंद
५. श्री. रूपचंदानी बच्चाराम बाशोमल
६. श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग
७. श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश
८. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग विरसिंग
९. श्री. सोनावणे नथु
१० श्री. गायकवाड दिलीप
११ श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन
१२ श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा
१३ श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
१४ श्री. चव्हाण रमेश महादेव
१५ श्री. बोडारे धनंजय बाबुराव
१६ श्री. पाटील विश्वनाथ गौतम
१७ श्री. चौधरी राजेंद्र शांताराम
१८ श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल

<u>मा. महापौरः-</u>विरोधी पक्षाचा सुधारणा प्रस्ताव बहुमताने अमान्य करण्यात येत आहे. प्रशासनाचा प्रस्ताव जसा आहे तसा बहुमताने समंत करण्यात येत आहे.

सुचक :- श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदक :- श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

<u>सुधारणा प्रस्ताव</u>

दि. २६.४.२००२ रोजीच्या महासभेच्या कार्यसूचीवर विषय क्र.१ ''प्रभाग समित्त्यांची स्थापना करणे बाबत'' असा आहे. त्याअर्थी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ) प्रमाणे शहरातील लोकसंख्येच्या आधारे प्रभाग समित्त्यांची स्थापना करणे कामी प्रशासनातर्फे पूढील प्रभागांचा समावेश असलेल्या ४ प्रभाग समित्त्यांची पूर्नः स्थापना करणेस प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | प्रभाग समिती कार्यालय | प्रभाग क्रमांक | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|
| १ | गोल मैदान | १ ,२ ,३ ,४ ,५ ,२० ,२१ | ७ |
| २ | यात्री निवास | ६ ,७ ,८ ,२२ ,२३ ,२५ | ६ |
| ३ | व्हि.टी.सी. मैदान | १५ ,१६ ,१७ ,१८ ,१९ ,२४ | ६ |
| ४ | पाणी पुरवठा | ९ ,१० ,११ ,१२ ,१३ ,१४ | ६ |

प्रशासनाचा प्रस्ताव कलम २९ (अ) च्या तरतुदी प्रमाणे प्रस्तावित आहे असे वाटत नाही म्हणून त्यामध्ये सुधारणा करणे करिता पुढील प्रभागांचा समावेश असलेल्या ४ प्रभाग समित्त्यांची पुर्नः स्थापना करणेस सुधारित प्रस्ताव मान्यतेसाठी प्रस्तुत आहे.

| अ. क्र. | प्रभाग समिती कार्यालय | प्रभाग क्रमांक | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|
| १ | गोल मैदान | १ ,२ ,३ ,४ ,५ ,२० ,२१ | ७ |
| २ | यात्री निवास | ६ ,७ ,८ ,२२ ,२३ ,२४ ,२५ | ७ |
| ३ | व्हि.टी.सी. मैदान | ९ ,१४ ,१५ ,१७ ,१८ ,१९ | ६ |
| ४ | पाणी पुरवठा | १० ,११ ,१२ ,१३ ,१६ | ५ |

महासभा ठराव क्र. ४ अ दि.२६.४.२००२.

हि महासभा वरील सुधारणा प्रस्तावास मान्यता देत नाही.

**बहुमताने मंजुर**

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**विषय :- प्रभाग समित्त्यांची स्थापना करणे बाबत.**

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेची पहिली सार्वत्रिक निवडणूक १९९७ मध्ये झाली होती त्या निवडणूकीमध्ये महानगरपालिकेमध्ये ६९ पालिका सदस्य निवडून आले होते तसेच त्यावेळी बहूसंख्य प्रभागांची रचना झालेली नव्हती, त्यावेळी त्या परिस्थितीप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ)अन्वये लागुन असलेल्या प्रभागांच्या समावेश असलेल्या ४ प्रभाग समित्त्या महासभा ठराव क्र. ३ , दिनांक २१/४/२००१ प्रमाणे स्थापन करण्यांत आल्या होत्त्या. दुसरी सार्वत्रिक निवडणूक २००२ मध्ये झाली आहे. महापालिकेत सद्या एकंदर २५ बहूसंख्य प्रभाग आहेत आणि निवडून आलेल्या पालिका सदस्यांची संख्या ७६ आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) प्रमाणे शहरातील लोकसंख्येच्या आधारे ४ प्रभाग समित्त्यांची पुर्नः स्थापना करणे आवश्यक आहे. म्हणुन लागून असलेल्या प्रभागांचा समावेश असलेल्या चार प्रभाग समित्त्यांची पुर्नः स्थापना करणेस प्रस्तावित आहे.



महासभा ठराव क्र. ५ दि. २६.४.२००२.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. ठाकुरदास बेहरानी.

हि महासभा उल्हासनगर शहरात पूढील तक्त्यानुसार लागून असलेल्या प्रभागांचा समावेश असलेल्या पुढील ४ प्रभाग समित्त्याची पुर्नः स्थापना करित आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती कार्यालय | प्रभाग क्रमांक | एकूण प्रभाग | समाविष्ट भाग |
|---|---|---|---|---|
| १ | गोल मैदान | १ ,२ ,३ ,४ ,५ ,२० ,२१ | ७ | शहाड स्टेशन, सेंच्युरी रेयॉन, धोबी घाट, फक्कड मंडली, झुलेलाल मंदिर, बेवस चौक, भारत चौक, गोल मैदान, चोपडा कोर्ट, सी. ब्लॉक. |
| २ | यात्री निवास | ६ ,७ ,८ ,२२ ,२३ ,२५ | ६ | नेहरू चौक, शिरू चौक, बालकनजी बारी, शासकीय रूग्णालय, कामगार रूग्णालय, टाऊन हॉल, राधास्वामी सत्संग हॉल, चांदीबाई कॉलेज, उल्हासनगर रेल्वे स्थानक, इंदिरा गांधी भाजी बाजार, शिवाजी चौक, सपना गार्डन. |
| ३ | व्हि.टी.सी. मैदान | १५ ,१६ ,१७ ,१८ ,१९ ,२४ | ६ | शांतीनगर, उद्योग विहार, विठ्ठलवाडी रेल्वे स्थानक, ॲडमिनिस्ट्रेटेड ऑफीस, पवई चौक, मराठ सेक्शन ,सेक्शन २५ ते सेक्शन ३० सतरामदास रूग्णालय, व्ही.टी.सी. स्पोर्टस कॉम्प्लेक्स, उल्हासनगर महानगरपालिका कार्यालय. |
| ४ | पाणी पुरवठा | ९ ,१० ,११ ,१२ ,१३ ,१४ | ६ | लालचक्की चौक, सुभाष टेकडी, कानसई रोड, कुर्ला कॅम्प, कैलाश कॉलनी, स्वामी शांतीप्रकाश |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | आश्रम, दुधनाका, साई वसणशाह दरबार, निजधाम आश्रम, गांधी रोड, ओमकारानंद आश्रम, नेताजी हायस्कुल, प्रभात चौक, व्हिनस सिनेमा चौक. |

तसेच पूढील सभेकडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता वरील ठरावा अंर्तगतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>बहुमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिवः-</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विशेष समित्यांची नेमणूक करणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौर, सदर विषयाचा गोषवारा दिला नाही. कोणतीही माहिती याविषयी दिली नाही.

<u>मा. सचिव :-</u>या प्रस्तावासाठी गोषवा-याची आवश्यकता नाही. कारण की, यात समिती जी बनते ती तुम्ही तुमच्या मधुन सदस्य निवडता व समितीची स्थापना होते. हि प्रशासकीय बाब नाही. यापुर्वी देखिल अशारितीने समिती स्थापन केली आहे. सत्ताधारी पक्षातर्फे जो प्रस्ताव आला आहे विशेष समितीचा ते आठ समिती बनवु इच्छितात. त्यांची नावे खालील प्रमाणे आहे.

१. सार्वजनिक बांधकाम समिती.
२. नियोजन व विकास समिती
३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती.
४. आरोग्य व परिरक्षण समिती
५. महिला व बालकल्याण समिती



६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

७. क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती
८. माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती

प्रत्त्येक समितीत नऊ सदस्य असतील त्यांची नावे पण दिली आहेत.

१. सार्वजनिक बांधकाम समिती

सदस्य

१. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम
२. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
३. श्री. वनवारी किशोर नारायणदास
४. श्री. पवार नाना आनंदा
५. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
६. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
७. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
८. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास
९. श्रीमती. भठिजा इंदु रामचंद

२. नियोजन व विकास समिती

सदस्य

१. श्री. खेमाणी दर्शनसिंग
२. श्री. चिमन रूपानी अमरूमल
३. श्री. ठाकुर विनोद लालसिंग
४. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
५. श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो)
६. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम
७. श्री. साधवानी मोहन
८. श्री. वलेचा पुथ्वी व्यापारीलाल
९. श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ

३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती.

सदस्य

१. श्री. ऐडके गणपत गोविंद
२. श्रीमती. पाल आधारी राजाराम
३. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
४. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
५. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
६. श्री. जेस्वानी सतराम पुनमदास
७. श्री. साधवानी मनोज लालचंद
८. श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश
९. श्री. बेहरानी ठाकुरदास वर्यलदास

४. आरोग्य व परिरक्षण समिती

सदस्य

१. श्रीमती. दासानी मिनु राज
२. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास
३. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
४. श्रीमती. सोंडे मीना सोनेजी



५. श्रीमती. वसिटा बेबी तुलसीदास
६. श्री. जाधव सुरेश मधुकर

७. श्री. वनवारी किशोर नारायणदास
८. श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग
९. श्री. जेसवानी सतरामदास पुनमदास

५. महिला व बालकल्याण समिती — सदस्य

१. श्रीमती. नाथानी नीना प्रकाश
२. श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर
३. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
४. श्रीमती. पाल आधारी राजाराम
५. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
६. श्रीमती. वनवारी मोना अशोक
७. श्रीमती. खिलनानी भावना रवि
८. श्रीमती. करीरा रेखा मन्नुमल
९. श्रीमती. भटिजा कोमल अमृत

६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती — सदस्य

१. श्री. ठाकुर अशोक भगवानदास
२. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
३. श्री. ऐडके गणपत गोविंद
४. श्री. निकम शांताराम ओंकार
५. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
६. श्री. ठाकुर विनोद लालसिंग
७. श्री. पवार नाना आनंदा
८. श्री. भालेराव गौतम यशवंत
९. श्रीमती. गुप्ता आशा प्रभुनाथ

७. क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती — सदस्य

१. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२. श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ
३. श्री. रूपानी चिमन अमरूमल
४. श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग
५. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
६. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
७. श्रीमती. माखिजा किरण लखी
८. श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश
९. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास



८. माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती — सदस्य

१. श्री. निकम शांताराम ओंकार

२. श्री. साधवानी मनोज लालचंद
३. श्री. ठाकुर अशोक भगवानदास
४. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
५. श्रीमती. खिलनानी भावना रवि
६. श्रीमती. भाटिजा कोमल अमृत
७. श्रीमती. माखिजा किरन लखी
८. श्रीमती. दासानी मिनु राज
९. श्रीमती. करीरा रेखा मन्नुमल

मा.सदस्य श्री. श्यामसुंदर रोहडा, श्री. पमनानी ईश्वर, श्री. राजु टेकचंदानी , श्री. यादव लालबिहारी सभागृहात आले.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u>:-मा. महापौर उल्हासनगर महानगरपालिका गठित झाल्यावर जेव्हा नियमावली तयार केली गेली कल्याण महापालिकेची नियमावली पाहून उल्हासनगर महापालिकेची नियमावली तयार केली गेली. कुठे कुठे तर कल्याण महापालिका हे नाव खोडायला पण विसरले होते. कल्याण नाव खोडुन फक्त उल्हासनगर नाव टाकून जशी कल्याणची आहे तशी उल्हासनगरची नियमावली तयार केली गेली. जेव्हा आपण एखादे कार्य करतो तेव्हा कल्याण व ठाणे महापालिकेचा पध्दतीचा अवलंब करून त्यांच्या मागे चालतो. यापूर्वीचे पाच वर्ष जे होते , त्यात प्रभाग समित्या नव्हत्या म्हणून आम्ही आठ विशेष समिती तयार केल्या. परंतु शासनातर्फे प्रभाग समिती तयार करणे सक्तीचे झाले आहे. आपण जर चार प्रभाग समिती तयार केल्या आहेत तर आठ विशेष समिती तयार करण्याची आवश्यकता नाही. जवळ जवळ प्रत्येक समितीवर महापालिकेचा २० ते २५ हजाराचा खर्च होतो. विशेष समित्या स्थापन केल्यामुळे जवळ जवळ २५ लाख खर्चाचे ओझे दरवर्षी महापालिकेला सहन करावे लागत आहे. जर आपल्या नजीकच्या कल्याण महापालिकेकडे पाहिले तर तिकडे चार प्रभाग समित्या असल्यामुळे आठ विशेष समित्या नाहीत. त्यामुळे मी तुम्हाला निवेदन करतो की, जर आपण कल्याणची पध्दत अवलंबन आहोत, कल्याण व ठाण्याची नियमावली आपण पाहतो त्यानुसार त्याचा अवलंबन करतो. तर उल्हासनगर महापालिकेत देखील कल्याण महानगरपालिकेप्रमाणे चार विशेष समित्या व चार प्रभाग समित्या स्थापन करण्यात याव्यात.

<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी</u> :-मा. महापौर साहेब मी माझ्या मित्रांना सांगु इच्छितो की, काही दिवसांपूर्वीच आम्हा नगरसेवकांना स्थानिक स्वराज्य संस्थेतर्फे प्रशिक्षण दिले गेले होते. इतके सदस्य होते पण कुणी पण हा प्रश्न विचारला नव्हता की, विशेष समित्या आम्ही किती तयार करु शकतो? मी विचारले होते तेव्हा त्यांनी सांगितले होते की, तुम्ही कितीपण समित्या तयार करु शकता. या समित्या शहराच्या विकासासाठी तयार केल्या जातात. माझे हे मित्र या आधी पण सार्वजनिक बांधकाम समिती व पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समितीचे सभापती होते. परंतु आज त्यांना असे का वाटत आहे ?

मा. सदस्य श्री. यादव लालबिहारी सभागृहात आले.



<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले</u>:-मला या गोष्टीची माहिती हवी की प्रभाग समिती व विशेष समिती यांच्यामधील कामकाजात प्रभाग समितीत कोणते विभाग येतात व

विशेष समितीत कोणते प्रभाग येतात. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम मध्ये प्रभाग समितीची स्थापना झाल्यावर विशेष समिती किती स्थापन होऊ शकतात.

__मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:__-काही दिवसापूर्वीच स्थानिक स्वराज्य संस्थेतर्फे प्रशिक्षण देण्यासाठी जे वरिष्ठ आले होते..........
__इकडे काही विपक्ष सदस्य :__-तुम्ही कशाला मध्ये बोलता आम्ही महापौरांना विचारले आहे.

__मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व राजेंद्र चौधरी__ :-त्यांना वरती महापौरांच्या जागी बसवा.

मा. सदस्या श्रीमती. मोना वनवारी यांनी सभागृहात प्रवेश केला.
__मा. महापौर:__-आपण सर्व बसा मी सचिव साहेबांना उत्तर दयाला सांगते.
__मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:__-सचिव साहेब याचे जरा स्पष्टीकरण दया.

__मा.सचिव :__- ७४ वी घटना दुरुस्तीनुसार शासनाने कामकाज क्षेत्राचे विभाजन ही गोष्ट लक्षात ठेऊन प्रभाग समितीच्या रचनेत सुधारणा आणली होती. उल्हासनगर हे छोटेसे शहर आहे. इतर ठिकाणी मोठे शहर असते. लोकांना मुख्यालयापर्यंत येण्यासाठी वेळ लागतो. म्हणून कामकाजाचे वाटप होण्यासाठी प्रभाग समितीची रचना होणे आवश्यक आहे. प्रभाग समितीत शहराला काही भागात वाटले जाते. हे विभाजन लोकसंख्येच्या आधाराने केले जाते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम २९ अ नुसार उल्हासनगर महानगरपालिकासाठी जास्तीत जास्त चार प्रभाग समिती स्थापन करु शकतो. शहरातील प्रभागांचे विभाजन करून समित्त्या स्थापन केल्या जातात. प्रभाग लागून असले पाहिजे. प्रभाग समितीचा उद्देश आहे की लोकांचे ज्या तक्रारी आहेत त्या तात्त्काळ सोडविणे गरजेचे असते. त्यासाठी ड्रेनेज, सेनिटेशन आणी पाण्याच्या समस्या या विषयी ज्या समस्या लोकांना वाटतात. व त्यापासून त्यांना लवकर समाधान हवे असते. त्यांच्यासाठी प्रभाग समिती आहे. प्रभाग समितीचे अधिकार मर्यादित आहेत. लहान सहान कामे ड्रेनेज, सेनिटेशनचे. ती कामे करण्यात येतील. प्रभाग समितीला पाच लाखापर्यंत प्राकलनाला प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्याचे अधिकार आहेत. प्रभाग समितीची रचना होणे आवश्यक आहे. व विशेष समित्त्या मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०व महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्त्यादी कामकाजातील नियमातील नियम ४ (अ)प्रमाणे प्रत्त्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र महासभेतर्फे निश्चित करण्यात येते एच्छिक आहे. आणि अशा कोणत्त्याही क्षेत्रात समाविष्ट केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमतः समुचित समितीपुढे ठेवले पाहिजे व ते अशा समितीच्या शिफारसी सह महासभेपुढे सादर केले पाहिजे. तसेच महासभेला तशाच ठरावाव्दारे आपले अधिकार व कर्तव्य विशेष समित्त्यांकडे प्रत्त्यायोजित करता येईल. महापालिका आपल्या सदस्यामधून ९ सदस्यांची अशी प्रत्त्येक समिती तयार करते. उदा. नियोजन व विकास समिती एखादा प्रश्न महासभेत येण्यापूर्वी त्या समितीत आधी जाईल. व तिथे ते आभ्यास करून आपला अहवाल देतील. व महासभा त्यावर नंतर निर्णय घेईल. १९९७ मध्ये एक ठराव केला होतो. त्यावेळी त्यांचे कामकाज निश्चित केले होते त्यांचे कर्तव्य काय हे पण निश्चित केले होते. त्यांचा ॲडवायझरी रोल आहे. त्या ठरावात त्यांना अधिकार प्रदान केले होते. तीन ते पाच लाखापर्यंत जर प्राकलन आले तर त्यांना प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्याचा अधिकार दिला होतो. तीन ते पाच



लाखापर्यंत अधिकार या करीता देण्यात आले होते कारण की त्यावेळी कलम ७३ नुसार आयुक्तांना फक्त तीन लाखापर्यंत प्राकलनास मंजुरी व संविदेचे अधिकार

होते. कामाचे अधिकार होते. नव्या सुधारणेनुसार मा. आयुक्तांना १० लाखापर्यंत अधिकार देण्यात आले आहेत. आता ज्या विषय समित्त्या स्थापन केल्या जात आहे, त्यांच्याकडे जर एखादा प्रश्न गेला तर ते अॅडवायझरी म्हणून काम पाहायचे आहे. आता समित्त्या किती स्थापन करायच्या हे तुम्हाला पाहायचे आहे. माझ्या व प्रशासनाचे मताप्रमाणे एकुण पाच संख्येपेक्षा अधिक समित्त्यांची आवश्यकता भासणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. प्रमादे टाले</u>:-सचिव साहेब मी साधा प्रश्न विचारला होता. की प्रभाग समितीमध्ये काम करत असतांना कुठ कुठले विभाग त्यामध्ये येतात. तुम्ही सांगितले वॉटर सप्लाय , सेनिटेशन सार्वजनिक बांधकाम विभाग, ड्रेनेज प्रभाग समितीला तीन ते पाच लाखापर्यंत काम करायचा अधिकार आहे. प्रभाग समितीचे अध्यक्ष काय काम करणार त्यांचे अधिकार काय आहेत. जर विशेष समितीला हे अधिकार आहेत तर प्रभाग समिती बनविण्यात काय अर्थ आहे. एकतर प्रभाग समित्त्या बनवा किंवा विशेष समित्त्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये पीडब्ल्यूडी वॉटर सप्लाय ,सेनिटेशन या व्यक्तीरिक्तच्या समिती विशेष समिती म्हणून स्थापन करण्यास काय हरकत आहे?

<u>मा सदस्य श्री. सुरेश जाधव:-</u> आता इथे प्रभाग समितीविषयी चर्चा होत होती. काही प्रभागातील लोकांना दुसरीकडे जाण्यास त्रास होणार आहे. जर प्रभाग समितीची रचना होते चार नंबर साठी पाच नंबरसाठी तर लोकांना इकडून तिकडे जायला त्रास होईल, म्हणून जर महापालिकेत आठ विशेष समित्त्या तयार केल्या गेल्या तर लोकांची सोय हाईल. ते लोक इथे येऊन आपले काम करु शकतात. म्हणून या आठ समित्त्या तयार करण्यास काही हरकत नसावी.

<u>मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u>:-विषय संपला आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :</u>-सचिव साहेब, मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्त्तर दया.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी</u>:-मा. महापौर साहेब, मी सर्वांचे ऐकले आहे. आता मी बोलणार आहे, सभागृह नेता शेवटी बोलतात असे हे म्हणतात.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u>:-अजून बोलणे व्हायचे आहे तुम्ही सर्वात शेवटी बोला.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :</u>-ठिक आहे, अजून बोला मी नंतर बोलतो. मा. महापौर आता जो प्रभाग समिती व विशेष समितीवर चर्चा चालली आहे. खास करुन तेच सदस्य प्रश्न विचारत आहे जे इथे पूर्वी समितीचे सभापती होते. ज्यावेळी नगरसेवकांना प्रशिक्षण देण्यात आले होते त्यावेळी मी प्रश्न विचारला होता की विशेष समिती आम्ही किती तयार करु शकतो. ते म्हणाले तुमचा अधिकार आहे तुम्ही पन्नास सुध्दा समित्त्या स्थापन करु शकतात. तरीपण आम्ही आठच समित्त्या तयार करतो. त्यांनी अजून खूप काही सांगितले. ट्रान्सपोर्ट समिती,सुधार समिती जे नाही सुधारत त्यांना सुधारण्यासाठी . अशा खुपश्या समित्त्या मुंबईत तयार केल्या आहेत. मला हे विचारायचे आहे की प्रश्न तेच विचारत आहेत जे पुवी समित्त्यांचे सभापती होते.

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>मी सभापती होतो म्हणुनच बोलत आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आमचे मा. सभापती होते प्रभाग समितीचे. आता नारायण भाई म्हणाले की, आमच्या युतीमध्ये जमनादास पुरस्वानी होते तेव्हा ते पण स्थायी समितीत सदस्य होते. इतर समितीवर सभापती व सदस्य होते. जे प्रश्न विचारत आहेत त्यांना सर्व माहित आहे. ते वरिष्ठ पण आहेत त्यांना स्वतःला या प्रश्नाची उत्तरे माहित आहेत. महापौरांना माझी विनंती आहे की, मेहरबानी करून प्रत्त्येक सदस्याला एकेकदाच बोलु दयावे. एकेक गोष्ट आठवते व उठुन उभे राहुन प्रश्न विचारतात. एका सदस्याने एकदाच बोलावे चार-चारदा बोलतात.*

*इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.*

*<u>मा. महापौर :-</u> टालेजी, बसा एकालाच बोलु दया.*

*<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारीः-</u>मला बोलु दया. मला असे पण म्हणायचे आहे की, एक सदस्य प्रश्न विचारतो तोच प्रश्न ९ सदस्य विचारतात. आता हे कल्याण महापालिकेची पध्दत समजावत आहेत. इथे प्रत्त्येक पक्षातुन एकेक सदस्य बोलत आहेत. नंतर विपक्ष नेता बोलतो. व शेवटी सभागृहनेता बोलतो. नंतर महापौर रूलिंग देतात. तिथल्या पध्दतीचा अवलंब केला तर खुप चांगले होईल. लवकर सभा संपेल. तुम्ही जे बोलु इच्छिता ते एका सदस्यांनी सांगितले तरी आम्हाला समजेल तुमची भावना काय आहे.दहा जरी बोलले तरी उददेश तोच असतो. मेहरबानी करून ऐकेकाने बोलावे.*

*<u>मा. महापौरः-</u>मला वाटते श्री. प्रमोद टाले मागील पाच वर्षात सभापती नव्हते का?*

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>मी जो प्रश्न विचारला तो सरळ सरळ प्रश्न होता वारंवार प्रश्न विचारण्याची माझी सवय नाही. परंतु मी जे विचारले होते की, मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमानुसार प्रभाग समिती स्थापन झाल्यावर किती विशेष समित्त्या स्थापन करू शकतो. इतका साधा सरळ प्रश्न विचारला त्याचे उत्तर मला दिले नाही. म्हणुन मी वारंवार प्रश्न विचारत आहे या प्रश्नाचे मला उत्तर दया.*

*<u>मा. सचिवः-</u>तुम्ही जे प्रश्न विचारले त्याचे उत्तर मी दिले आहे. तुम्हाला जर अजुन स्पष्ट उत्तर पाहिजे असेल तर बोला.*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>सचिव साहेब, टालेजींनी जे विचारले तेच मी तुम्हाला विचारत आहे. किशोरजींना जर हरकत असेल तर मी गप्प बसतो. त्यांना घाई आहे सभा लवकर संपवायची आहे. त्यापेक्षा इथे येऊन जनगणमन करून जात जाऊ. जर असे सभागृहनेता असतील तर कशी सभा चालवतील. सभागृह नेता यावर वेरीगुड म्हणतात तर त्यांच्याकडुन अजुन काय अपेक्षा करावी. सभा याच करता घेतली जाते की, विषयावर विचारविनिमय केला जावा. चांगला उपाय*

त्यातुन मिळो जेणेकरून शहराचा विकास होईल. चर्चा नाही झाली पाहिजे असे वारंवार म्हणत आहेत हे चुकीचे आहे. सभागृहनेता जर असे म्हणत असेल तर ते योग्य नाही. प्रभाग समितीची जी रचना केली आहे. ते अधिकार विकेंद्रीत करण्यासाठी केली आहे. जिथले काम तिथेच झाले पाहिजे. तरीही प्रभाग समिती ३ तेथील सॅनिटेशनचे काम सांभाळेल तेथील पाण्याचे काम सांभाळेल. व आपण म्हणालात पी.डब्लु.डी. चे काम सांभाळेल. चार प्रभागाच्या मिळुन चार समित्त्या जर हे काम सांभाळणार आहेत तर हे त्या पुर्ण शहराचे काम सांभाळणार आहे. तर विशेष समित्त्या काय काम करणार? दोन व्यक्ती आहेत वेगवेगळया एकाच प्रश्नावर जर विचार करतील तर त्यात संघर्ष निर्माण होतील. त्या प्रभागात संतोष नगर आहे. प्रभाग क्र. ७४ मध्ये जर कुठली समस्या आहे तर तेथील प्रभाग समितीच्या अध्यक्षाचा वेगळा विचार असेल व जर ते इथे पाणी पुरवठा समितीच्या सभापतीकडे आले तर त्यांचा तर्कवितर्क वेगळा असेल तर त्या दोघांमध्ये संघर्ष निर्माण होईल. त्यातुन आपल्याला काहीच साध्य होणार नाही. जसे किशोर वनवारी म्हणाले कितीही समित्त्या तुम्ही स्थापन करू शकता परंतु ते तेव्हा शक्य असते जेव्हा महापालिकेची आर्थिक स्थिती चांगली असते. आमच्या महापालिकेची जी परिस्थिती आहे ती बिकट आहे. एम.आय.डी.सी. ने आजपण पाण्यात कपात केली आहे.मागील तीन दिवसापासुन चार व पाच नंबरची जनता पाण्याची अडचण सहन करत आहेत. लोक पाण्यासाठी वणवण भटकत आहेत. महापालिकेच्या पैशाचा दुरूपयोग होत आहेत. तरी सदनाला माझी विनंती आहे की, जितके काम चालले पाहिजे तितक्याच समित्त्या स्थापन झाल्या पाहिजेत. जेणेकरून महापालिकेवर आर्थिक बोजा पडला नाही पाहिजे जसे की, कल्याण महापालिका, मुंबई महापालिका, ठाणे महापालिका या मोठमोठया महानगरपालिकेमध्ये देखिल प्रभाग समित्त्या असल्याने इतक्या विशेष समित्त्या नाही तर आपल्या १३ चौरस कि.मी. क्षेत्राच्या आत बारा समित्त्यांचे काम काय? हे समिती विषयी झाले. इथे पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती आहे मी पण शिक्षण समितीचा सभापती होतो तेव्हा प्रभाग समिती नव्हती. त्यावेळी लक्षात आले की, अध्यक्षांना काम काहीच नाही. कारण की,पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती या समितींचे जे क्षेत्र आहे तिथे शाळाच नाहीत. ना माध्यमिक शाळा आहेत ना पुर्व प्राथमिक शाळा तर सभापती काय करणार? समिती काय करणार? तेव्हा मी प्रस्ताव ठेवला होता. परंतु तो प्रस्ताव जसाच्या तसा आहे. त्यावर काही कुणी लक्ष दिले नाही. आयुक्त साहेब म्हणतात आर्थिक परिस्थिती बिकट आहे. ना पुर्व प्राथमिक शाळा तयार होऊ शकत ना माध्यमिक शाळा तयार होऊ शकत तर त्या समितीचा फायदा काय हे तुम्ही मला सांगा व मी जे सांगितले त्यावर विचार करा.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः</u>-मा. महापौरजी, मला जेवढे समजते त्याप्रमाणे आपली भारतीय राज्यघटना हि जिना पध्दतीची आहे. प्रभाग आहेत, प्रभाग समिती आहेत. प्रभाग समिती नंतर विशेष समित्त्या आहेत.महापालिका आहे अशात-हेने व्यापक पणा वाढत जातो. ज्याप्रमाणे लोअर कोर्ट आहे. सत्र न्यायालय आहे, दिवाणी न्यायालय आहे, उच्च न्यायालय त्यावर सर्वोच्च न्यायालय. जर त्यामध्ये वाद होत नाही तर इथे पण जे जेष्ठतेनुसार अशी पध्दत अवलंबली जात आहे. व नियमाप्रमाणे होत आहे त्यामुळे काही वादविवाद करण्याची आवश्यकता नाही. कोणतेही काम जर खालच्या पातळीवर बरोबर होत नाही तर ते वरच्या पातळीवर बरोबर होईल. त्यांच्याकडुनही नाही झाले तर त्यापेक्षा जे वरीष्ठ असतील त्यांच्या पातळीवर ते सेटल होईल. हिंदुस्थानाचा जो

*कायदा आहे त्याप्रमाणे हे चालले आहे. ज्याप्रमाणे प्रथम शहर नंतर जिल्हा नंतर राज्य व नंतर राष्ट्रीय पातळी अशात-हेने आहे. माझ्यामते यामध्ये काही व्दिधा मध्ये पडण्याची आवश्यकता नाही. वाद घालावा असे काही नाही जे पण होत आहे ते बरोबर होत आहे व चांगल्यात-हेने केले जात आहे. आमच्या काही मित्रांनी काही हरकती घेतल्या आहेत मी त्यांना हे सांगु इच्छितो की, ते पण मागे समितीत अध्यक्षस्थानी होते. ते प्रभाग समितीचे सभापती म्हणुन होते. नवे काही होते आहे असे नाही याकरिता मला नाही वाटत की, कुणाला काही हरकत असावी. धन्यवाद.*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>या दोघां समितीचा दर्जा समान आहे कनिष्ठ व वरिष्ठ असे काही नाही. हे उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय नाही.*

*इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.*

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>मला माझ्या प्रश्नाचे उत्तर दया.*

*<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः-</u>विशेष समितीवर विरोधी पक्षातर्फे काही शंका उपस्थित केल्या गेल्या आहेत. मी विशेष समितीविषयी काही बोलु इच्छितो की, धारेणात्तमक निर्णय जर एखादया विषयावर घ्यायचा असेल तर त्यासाठी विशेष समिती असणे आवश्यक आहे. जवळ जवळ पाच लाख लोकसंख्या असलेले हे शहर आहे. व इतक्या लोकांना नागरिक सुविधा जर उपलब्ध करायची असेल. त्यांची जर इतर काही समस्या असेल तर त्या समस्येचे निराकरण करण्यासाठी विशेष समितीची अत्यंत आवश्यकता असते. व धोरणात्तमक निर्णय घेणे व त्यासाठी समिती असणे यावर लोकप्रतिनिधींचा अधिकार आहे व तो कायदयानुसार आहे. जर विशेष समित्त्या तयार केला तर त्याचा फायदा जनतेला होणार आहे. शासन व प्रशासन या दोघांमध्ये जो समन्वय साधला जातो तो विशेष समितीव्दारे साधला जातो. व प्रशासनाला जी मदत मिळते ती विशेष समिती व्दारा मिळते. म्हणुन विशेष समिती बनणे अत्यंत आवश्यक आहे असे आमचे मत आहे.*

*<u>मा. सचिवः-</u>विशेष समित्त्या ज्या आहेत. त्या स्थापन करण्याचा कायदयान्वये महासभेला अधिकार आहे. परंतु किती बनवायच्या, किती आवश्यक आहेत हे आपणांस ठरवायचे आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>आठ विशेष समित्त्या आधी पण होत्त्या, चार प्रभाग समित्त्या आधी पण होत्त्या आता पण तेच होत आहे नविन असे काही नाही. यानंतर जर काही समित्त्या तयार करायच्या असतील तर नंतर करू.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>मा. महापौर महोदया, महापालिकेच्या कामकाजामध्ये स्थायी समिती आयुक्तांना वरीष्ठ आहे. आणि जी महासभा आहे ती स्थायी समितीला वरीष्ठ आहे. बरोबर आहे ना? अशा प्रणालीमध्ये प्रभाग समिती व विशेष समितीचा समावेश होतो तर त्यांचा अनुक्रमांक कसा लावला जाईल त्याचे जरा स्पष्टीकरण झाले तर बरे होईल.*

*<u>मा. सचिवः-</u>मी आधी पण सांगितले की, हिची भुमिका ॲडव्हायझरसारखी असेल.*

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>यापुर्वी ज्या सल्लागार समित्त्या होत्त्या. त्यांनी कधी असा सल्ला दिला होता का आतापर्यंत.

<u>मा. सचिवः-</u>जरा पुन्हा सांगा ऐकु आले नाही.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-:-</u>यापुर्वी ज्या ॲडव्हायझर समित्त्या होत्त्या. त्यांनी कधी असा सल्ला दिला होता का आतापर्यंत.

<u>मा. सचिवः-</u>तुम्हाला जर आठवत असेल तर जे पण ठराव विशेष समितीत झाले आहेत ते इथे कायम करण्यात आले आहेत.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>महापालिकेच्या पैशाचा गैरवापर होत आहे आमचा विरोध आहे.

<u>मा. महापौरः-</u>सदर प्रस्ताव मतदानासाठी टाकण्यात येत आहे.

<u>मा. सचिवः-</u>जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी हात वर करावेत.

१. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२. श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर
३. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
४. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
५. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
६. श्रीमती. पाल आधारी राजाराम
७. श्री. ऐडके गणपत गोविंद
८. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
९. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
१० श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
११. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
१२. श्रीमती. गुप्ता आशा प्रभुनाथ
१३ श्री. पवार नाना आनंदा
१४ श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
१५ श्री. रूपाणी चिमन अमरूमल
१६ श्री. निकम शांताराम ओंकार
१७ श्री. ठाकुर विनोद लालसिंग
१८ श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे)
१९ श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
२० श्री. गायकवाड सुरेश नामदेव
२१ श्रीमती. वनवारी मोना अशोक
२२ श्री. वनवारी किशोर नारायणदास
२३. श्री. जेसवानी सतराम पुनमदास
२४. श्रीमती. खिलनानी भावना रवि
२५ श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग

२६ श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल
२७ श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
२८ श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
२९ श्रीमती. पंजाबी दिपा नारायण
३० श्री. साधवानी मनोज लालचंद
३१ श्रीमती. भठिजा कोमल अमृत
३२. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास
३३. श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण
३४. श्रीमती. माखिजा किरण लखी
३५ श्री. लबाना होशियारसिंग हरीसिंग
३६. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
३७. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
३८. श्रीमती. नाथानी निना प्रकाश
३९. श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश
४०. श्रीमती. दासानी मिनु राजकुमार
४१. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
४२ श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ
४३ श्री. जाधव सुरेश मधुकर
४४ श्री. टाले प्रमोद नामदेवराव
४५ श्री. साधवानी मोहन
४६ श्रीमती. साधवानी जया
४७ श्री. भालेराव गौतम यशवंत
४८ श्रीमती. वसिटा बेबी
४९ श्री. ठाकुर अशोक भगवानदास
५० श्री. बेहरानी मोहन वर्यलदास
५१ श्रीमती. करोतिया मालती राधाचरण
५२ श्री. बेहरानी ठाकुरदास वर्यलदास

<u>मा. सचिवः-</u>जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावेत.

१. श्रीमती. जावळे संगिता रमेश
२. श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास
३. श्रीमती. मोकल सिमा चंद्राराम
४. श्री. पुरस्वानी जमनादास खुपचंद
५. श्री. रूपचंदानी बच्चाराम वाशोमल
६. श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग
७. श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश
८. श्री. यादव लालबिहारी बुझारत
९. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग विरसिंग
१० श्री. सोनावणे नथु
११ श्री. गायकवाड दिलीप
१२ श्रीमती. वामणकर नंदिनी गजानन

१३ श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा
१४ श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
१५ श्री. चव्हाण रमेश महादेव
१६ श्री. बोडारे धनंजय बाबुराव
१७ श्री. पाटील विश्वनाथ गौतम
१८ श्री. चौधरी राजेंद्र शांताराम
१९. श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव बहुमताने पारीत करण्यांत येत आहे.

विषय :- विशेष समित्त्यांची नेमणूक करणे बाबत.

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये महानगरपालिकेस आवश्यक वाटतील त्याचप्रमाणे ठराव करून आपल्या पालिका सदस्यामधून विशेष समित्त्या नियुक्त करता येतील. महापालिका स्थायी समिती परिवहन समिती इत्त्यादीचे कामकाज विषयक नियमातील नियम ४ (अ) अनुसार निम्नलिखित एक वा अधिक विशेष समित्त्या नियुक्त करता येतील.

१. सार्वजनिक बांधकाम समिती.
२. नियोजन व विकास समिती
३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती.
४. आरोग्य व परिरक्षण समिती
५. महिला व बालकल्याण समिती
६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती
७. क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती
८. माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती

दि.१५.५.९७ च्या महासभा ठराव क्र. ६ व्दारे प्रत्त्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित केले आहे. आणि अशा कोणत्त्याही क्षेत्रात समावेश केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमच समुचित समितीपुढे ठेवले जातील व ते अशा समितीच्या शिफारशीसह महासभेत येतील म्हणुन विशेष समित्त्यांची नेमणुक करणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र. ६ दि. २६.४.२००२.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. ठकुरदास बेहरानी.

हि महासभा प्रत्त्येक विशेष समितीत ९ पालिका सदस्यांचा समावेश असलेल्या पुढील आठ विशेष समित्त्यांची नेमणूक करित आहे.

१. सार्वजनिक बांधकाम समिती — सदस्य

१. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम
२. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
३. श्री. वनवारी किशोर नारायणदास
४. श्री. पवार नाना आनंदा
५. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
६. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
७. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
८. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास
९. श्रीमती. भठिजा इंदु रामचंद्र

२. नियोजन व विकास समिती — सदस्य

१. श्री. खेमाणी दर्शनसिंग
२. श्री. चिमन रूपानी अमरूमल
३. श्री. ठाकुर विनोद लालसिंग
४. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
५. श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो)
६. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम
७. श्री. साधवानी मोहन
८. श्री. वलेचा पुथ्वी व्यापारीलाल
९. श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ

३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती. — सदस्य

१. श्री. ऐडके गणपत गोविंद
२. श्रीमती. पाल आधारी राजाराम
३. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
४. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
५. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
६. श्री. जेस्वानी सतराम पुनमदास
७. श्री. साधवानी मनोज लालचंद
८. श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश
९. श्री. बेहरानी ठाकुरदास वर्यलदास

४. आरोग्य व परिरक्षण समिती — सदस्य

१. श्रीमती. दासानी मिनु राज
२. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास
३. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
४. श्रीमती. सोंडे मीना सोनेजी
५. श्रीमती. वसिटा बेबी तुलसीदास
६. श्री. जाधव सुरेश मधुकर
७. श्री. वनवारी किशोर नारायणदास
८. श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग
९. श्री. जेसवानी सतरामदास पुनमदास

५. महिला व बालकल्याण समिती — सदस्य

१.श्रीमती. नाथानी नीना प्रकाश
२.श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर
३.श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
४.श्रीमती. पाल आधारी राजाराम
५.श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
६.श्रीमती. वनवारी मोना अशोक
७.श्रीमती. खिलनानी भावना रवि
८.श्रीमती. करीरा रेखा मन्नुमल
९.श्रीमती. भटिजा कोमल अमृत

६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती — सदस्य

१. श्री. ठाकुर अशोक भगवानदास
२. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
३. श्री. ऐडके गणपत गोविंद
४. श्री. निकम शांताराम ओंकार
५. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
६. श्री. ठाकुर विनोद लालसिंग
७. श्री. पवार नाना आनंदा
८. श्री. भालेराव गौतम यशवंत
९. श्रीमती. गुप्ता आशा प्रभुनाथ

७. क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती — सदस्य

१.श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२ श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ
३ श्री. रूपानी चिमन अमरूमल
४.श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग
५ श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
६ श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
७ श्रीमती. माखिजा किरण लखी
८ श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश
९ श्रीमती. मसंद माया घनश्यामदास

८. माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती — सदस्य

१.श्री. निकम शांताराम ओंकार
२.श्री. साधवानी मनोज लालचंद
३.श्री. ठाकुर अशोक भगवानदास
४.श्री. गायकवाड सुरेश नामदेव
५.श्रीमती. खिलनानी भावना रवि
६.श्रीमती. भटिजा कोमल अमृत
७.श्रीमती. माखिजा किरन लखी
८.श्रीमती. दासानी मिनु राज
९.श्रीमती. करीरा रेखा मन्नुमल

तसेच पूढील सभेकडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता वरील ठरावा अंर्तगतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>बहुमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिवः-</u>आजच्या सभेतील कार्यसूची वरील दोन्ही विषय संबंधीत ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता त्वरीत अंमलात आणण्यांत येईल. असे सुचविण्यात आले होते म्हणून मी या सभेत दोन्ही ठराव वाचून दाखवले होते आपली संमती आहे ना?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>बरोबर इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>सभापती व उपसभापती आजच जाहिर करा ना?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>महापौर साहेब, सभा सुरू झाल्यावर आमचे बंधु श्री. जमनादास पुरस्वानी व इतर नगरसेवकांनी सांगितले होते की, पत्रकार बंधु उपोषणाला बसले आहेत. सर्व सदस्यांनी तिथे गेले पाहिजे त्यांच्या तक्रारी ऐकुन घेतल्या पाहिजे व आयुक्तांपर्यंत नेल्या पाहिजे व आयुक्तांना सांगुन त्यांच्या तक्रारीचे निवारण केले पाहिजे.

<u>मा. सचिव :-</u>कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.४० वाजता मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :-१७/५/२००२.

इतिवृत्त

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि१७/५/२००२ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दि. १७५२००२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शाविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३३. | श्री.राजेश उर्फ राज जयसिंग असरोंडकर |
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३४. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३५. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ५. | श्रीमती.रामचंदानी भावना मनोहर | ३६. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ६. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३७. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ७. | श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास | ३८. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ८. | श्री. दिलीप गायकवाड | ३९. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| ९. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४०. | श्री. पमनानी इश्वर (डेंडा)सतरामदास |
| १०. | श्रीमती. पाल अधारी राजाराम | ४१. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ११. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४२. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १२ | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४३. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १३. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन | ४४. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १४. | श्री. रेहडा श्यामसुंदर जानीलाल | ४५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १५. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १६. | श्रीमती.गुप्ता आशा प्रभुनाथ | ४७. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १७. | श्री. नाना आनंदा पवार | ४८. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १८. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ४९ | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १९. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५०. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २०. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५१. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २१. | श्री. शांताराम ओंकार निकम | ५२. | श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास |
| २२. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५३. | श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण |
| २३. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५४. | श्रीमती. किरण लखी माखीजा |
| २४. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५५. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २५. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५६. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २६. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५७. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २७. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ५८. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २८. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५९. | श्रीमती. इंदु भठिजा |
| २९. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६०. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३०. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६१. | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| ३१. | श्रीमती. भावना रवी खिलनानी | ६२. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३२. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६३. | श्री. बेहरानी ठाकूरदास वरीयलदास |



तर

मा. उपमहापौर १. श्रीमती. जया साधवानी व मा. सदस्य २ श्री. टेकचंदानी राजु मथुरादास , ३.श्रीमती. सीमा चंदाराम मोकल , ४ श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, ५ श्री. ऐडके गणपत गोविंद, ६ श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल, ७ श्री. उमाप रामदास राघोजी,८ श्री. मोहन साधवानी, ९ श्री. रमेश महादेव चव्हाण, १० श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास,११. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, १२. श्री.साधवानी मनोज लालचंद हे/ हया सभेस अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. २५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:'-**आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नगरसेवक श्री. महेंद्र मुलचंदानी यांच्या काकांचे निधन झाले आहे. त्यांचे आज साडे पाच ते सहा वाजेपर्यंत तीजा आहे. मला असे वाटते की त्यांना दोन मिनिटांची श्रध्दांजली दिली जावी. व या सभेचे कामकाज लवकरात लवकर पुर्ण केले जावे. जेणेकरून आम्ही साडेपाच ते सहा वाजेपर्यंत त्यांच्या तीजाच्या कार्यक्रमास जावू शकु.

**मा. सचिव :-**श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी कृपया सर्वांनी उभे रहावे.

**शोक प्रस्तावः-**

**प्रस्तावना**

१० फेब्रुवारी २००२ मध्ये झालेल्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या दुस-या सार्वत्रिक निवडणूकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या तिकीटांवर प्रभाग क्र. ४ अ मधून निवडून आलेले सन्माननिय सदस्य श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम यांचे चुलते श्री. मुलचंदानी चंदीराम यांचे दि. १५.५.२००२ रोजी निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**सर्वसाधारण महासभा ठराव क्र.** ६ अ **दिनांकः-१७.५.२००२.**

सुचकाचे नाव :- श्री. ठाकुर नरेंद्रकुमार.
अनुमोदकाचे नाव :- श्री. पंजाबी नारायण

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम यांचे चुलते श्री. मुलचंदानी चंदीराम यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने मंजुर**
महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-सन्मानानिय महापौरजी,सन्मानानिय आयुक्त साहेब, आजच्या या सभेचे कामकाज चालु करण्यापुर्वी मी आपणांस विनंती करतो की, दि. १४ मे २००२ रोजी नवाकाळ या दैनिक वर्तमानपत्रामध्ये एक बातमी छापुन आली होती, ती उल्हासनगर महानगरपालिकेच्या संबंधित होती. त्या बातमीचा आपण इथे खुलासा केला तर बरे होईल, आपण या महापालिकेचे आयुक्त आहात, आम्ही या महापालिकेचे सदस्य आहोत त्या बातमीचा खुलासा या महासभेत झाला तर बरे होईल.

मा. आयुक्त (श्री. बा.र. पोखरकर ):-मा. महापौर महोदया, १४ मे २००२च्या दैनिक नवाकाळ मध्ये एक बातमी आली होती. ज्यात असे म्हंटले गेले की, उल्हासनगर शहरात गॅस्ट्रोने एका मुलीचे निधन झाले आहे. मी त्वरीत आमचे वैद्यकीय अधिकारी श्री. लांजेवार यांना बोलवले होते व त्यांना हॉस्पीटलमधुन माहिती घेण्याबाबत सांगितले होते. त्यांनी त्वरीत माहिती गोळा करून मला सांगितले की, त्याबाबतचा नमुना घेवुन पृथकरणासाठी पाठविले आहे व त्याचा अहवाल येणे बाकी आहे. तर तो अहवाल आल्यानंतरच आपणांस माहित पडेल की, ही जी घटना झाली आहे ती कोणत्त्या कारणामुळे झाली आहे. व महानगरपालिकेने त्या घटनेची दखल घेतलेली आहे. व त्याबाबतीत महानगरपालिकेने एक सूचना प्रसिध्द करण्यासाठी आदेश दिले आहेत. शासन किंवा महानगरपालिका यांच्यावतीने पावसाळयात येणा-या साथीच्या रोगाबाबत प्रतिबंधात्त्मक सूचना जारी करत असते की नागरिकांनी या साथीच्या रोगांबाबत कोणती काळजी घेतली पाहिजे. व एक-दोन दिवसातच प्रतिबंधात्त्मक काळजी घेण्याबाबतची जाहिर सूचना वर्तमानपत्रामध्ये छापुन येईलच. व मला आशा आहे की, नमुन्यांबाबत लवकरच आम्हाला अहवाल प्राप्त होईल. निश्चित स्वरूपाने ती घटना कोणत्त्या कारणामुळे घडली ते कळू शकेल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-महापालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत जी बातमी होती की, महापालिकेची आर्थिक स्थिती खराब असल्याने विशेष समित्त्यांच्या सभापतींना वाहन भत्ता दिला जाणार नाही. असे आपले निवेदन त्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाले होते ते खरे आहे का?

मा. आयुक्त (श्री. बा.र. पोखरकर ):-मा. महापौर महोदया,अशाप्रकारचे निवेदन मी कोणत्त्याही वृतपत्रास दिले नाही.

मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानीः-मा.महापौरजी, आपले लक्ष वेधु इच्छितो की, मागच्या वेळी आपण पत्रकारांसाठी म्हणाला होतात की, महापालिकेत वर्तमानपत्र वाटप करण्यास त्यांना परवानगी दिली जाईल. अदयाप पर्यंत त्याची अंमलबजावणी झालेली नाही. खास करून आयुक्तांचे जे निर्देश आहेत ते मौखिक स्वरूपाचे आहेत. लेखी निर्देश दिलेले नाहीत. संसद असो, विधानसभा असो अशा कुठल्याही ठिकाणी वर्तमानपत्र वाटपा संदर्भात अशा प्रकारची तानाशाही नाही. एक तर आदेश रद्द केले जावेत. किंवा बाहेर अशा प्रकारचा फलक लावावा की, पोखरकर प्रायव्हेट लिमिटेड, हि महापालिका आहे. याबाबत आपण काय म्हणु इच्छिता? कारण की जनतेचा असा संदेश आहे की, श्री पोखरकर स्वतः बद्दल वाईट काही न छापण्यासाठी वर्तमानपत्र वाटु देत नाहीत.

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आताच आमचे बंधु श्री. अनिल जयसिंघानी यांनी वर्तमानपत्र वाटण्याविषयीचा जो मुददा उपस्थित केला. आजपासुन आपण महानगरपालिकेत वर्तमानपत्र वाटु शकता. आता आमचे बंधु श्री. जयसिंघानी यांनी जी मागणी केली ती अगदी बरोबर आहे की, कुठेही वर्तमानपत्र वाटण्यावर कोणत्त्याही प्रकारची पाबंदी नसते. व मला असे वाटते की, आमच्या आयुक्त साहेबांनी आमच्या बरोबर सहभाग घेवुन त्यांना वर्तमानपत्र वाटण्यास परवानगी दयावी. तशाच त्यांच्या इतर काही मागण्या आहेत त्या सुध्दा त्यांच्या बरोबर चर्चा करून सोडवाव्यात. एवढी माझी विनंती आहे. धन्यवाद.*

*<u>मा. महापौरः-</u>मा. आयुक्त साहेब, उपमहापौर आलेल्या नाहीत. त्यांची तब्येत बरोबर नाही. ज्यादिवशी आमचे पत्रकार बंधु उपोषणाला बसले होते. अन्न पाण्यावाचुन ते लढत होते. त्यांनी तसे करावे याच्याशी आम्ही सहमत नव्हतो. तेव्हा आमचे सर्व नगरसेवक जसे श्री. मोहन बेहरानी, श्रीमती. ज्योती भाभी इत्त्यादी सर्व जण आमच्या बरोबर होते. त्यावेळी आम्ही पत्रकार बंधुना सांगितले होते की, आयुक्त साहेब आज नाहीत. आम्ही आयुक्तांशी बोलु व महापालिका मुख्यालयात वर्तमानपत्र वाटण्याबाबत आपणांस परवानगी दिली जाईल. तर मी आयुक्त साहेबांना विनंती करते की, जेवढे काही पत्रकार बंधु आहेत त्यांना त्यांचे वर्तमानपत्र महापालिका मुख्यालयात वाटप करण्यास परवानगी दिली जावी.*

*<u>मा. आयुक्त (श्री. बा.र. पोखरकर )</u>:-मा. महापौर महोदया ,मागील महासभेत मी काही कारणास्तव अनुपस्थित होतो. त्यावेळी पत्रकार बंधुनी मला जी माहिती दिली त्यानुसार त्यादिवशी ते उपोषणास बसले होते. त्या पार्श्वभुमीबाबत निवेदन करण्यास महापौर महोदयांनी मला सांगितले आहे. त्याबाबत, त्याची पार्श्वभुमी आपणांस सांगु इच्छितो. आपल्या उल्हासनगर शहरामध्ये बरेचसे पत्रकार बंधु आहेत. व बरीचशी वर्तमानपत्रे, दैनिके, साप्ताहिके निघतात. मला असे वाटते की, ज्या बातम्या येतात त्यातील ब-याचशा बातम्या वस्तुस्थिती दर्शक नसतात. त्यामुळेच मी सुरक्षा विभागाला तसा आदेश दिला होता की, जी काही दैनिके आहेत ती महापालिकेत येता कामा नयेत. त्यामागे माझी भुमिका अशी होती की, जसे पत्रकार बंधुना लिहिण्याचे स्वातंत्र्य आहे. तसेच जे वाचक आहेत त्यांनाही स्वातंत्र्य असते. माझी आपणासर्वांना विनंती आहे की, मागच्या रविवारचा लोकसत्त्तेचा अंक वाचला तर, आमच्या बाजुच्या शहरामध्ये एक प्रसिध्द लेखक रहातात. त्यांचे नाव आहे श.ना. नवरे ते अजुन आहेत. त्यांना मी दिर्घायुष्य चिंतीतो. त्यांचा वाचक नावाचा एक लेख कृपया आपण वाचा. त्याची कमी शब्दात मी आपणांस मध्यवर्ती कल्पना सांगु इच्छितो. त्यांनी त्यामध्ये लिहिले आहे की, एक नविन लेखक असतो. तो एक पुस्तक प्रसिध्द करू इच्छितो. प्रसिध्द केल्यानंतर त्याची एक प्रत तो त्यांना पाठवतो. व जे प्रसिध्द लेखक श.ना. नवरे आहेत त्यांना सांगितले जाते की, आपण हे पुस्तक वाचुन मला त्याबाबत अभिप्राय दया. हि मागील रविवारचीच गोष्ट आहे. रविवारच्या लोकसत्त्तेच्या अंकातील ही गोष्ट किंवा लेख आपण वाचु शकता. श. ना. नवरे यांना बरीचशी पुस्तके अशा प्रकारे मिळतात. परंतु ते ती परत पाठवितात. कारण हे आहे की, त्यांचे म्हणणे असे आहे की, पुस्तक छापण्याचा आपणांस जरूर अधिकार आहे. परंतु आपण सक्तीने त्याचे वाचन करण्यास कसे सांगता? याबाबत मी जरूर विचार करत आहे. परंतु माझी भुमिका मी आपणांसमोर ठेवत आहे. याबाबत शासनाकडुनही अहवाल मागविला आहे. मी माझा अहवाल शासनाकडे पाठविला आहे. व अदयाप शासनाने त्याबाबत काहीही निर्देश दिलेले नाहीत. जे वृत्तपत्र वाचण्या योग्य असते ते आम्ही खरेदी करत असतो. माझी अशी भुमिका आहे की, पत्रकार*

बंधुना आपले वृतपत्र शहरातील वाचकांपर्यंत पाहोचवायचे असेल तर त्यांनी ते जरूर पाहोचवावे. परंतु जसे मी सांगितले की, आपणांस छापण्याचा अधिकार आहे. तसेच या संस्थेचा प्रमुख मी आहे. त्यामुळे या संस्थेत योग्य ते निर्बंध घालण्याचा मला अधिकार आहे. आमचे कर्मचारी, अधिकारी येथे काम करण्यासाठी येतात वर्तमानपत्रे वाचण्यासाठी येत नाहीत. या भुमिकेने मी हे निर्बंध जारी केले होते. व मला असे वाटते की ते बरोबर आहे परंतु सर्व सन्माननिय सदस्य, महापौर महोदयांचा सन्मान करून मी असे बोलु इच्छितो की, मी हे निर्बंध उठवित आहे.

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. १
प्रश्नोत्तरे.

प्रश्न क्र. १ हा श्रीमती. भावना रामचंदानी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र१ :-</u> हावु मेनी मेटर्स आर इनस्टाल्ड बाय एम. आयडी. सी फॉर मेजरमेंट ऑफ सप्लाय ऑफ वॉटर टू द सीटी ॲन्ड वेअर दे आर प्लेसड्?

<u>उत्तरः-</u> देअर आर सेवन टेपिंग ऑन एमआयडीसी मेन लाईन ॲन्ड एमआयडीसी हॅड प्रोवाइडेड वॉटर मेटरस् टू इच टेपिंग लोकेशनस् आर ॲज फर्दर १. ओल्ड एम. बीआर २. न्यु एमबीआर ३. बिर्ला गार्डन४. शहाड ब्रीज ५. शांतीनगर ६. पाले. ७. सी. ब्लॉक.

<u>मा. सदस्या श्रीमती. भावना रामचंदानी :-</u>उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिवः-</u> प्रश्न क्र. २ हा श्रीमती. भावना रामचंदानी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. २:-</u> हॅड ॲनी ऑफ दिज मेटरस् गॉन आउट ऑफ ऑर्डर, इफ यस, पॉइंट द डेट ऑफ आउट ऑफ ऑर्डर पोझिशन ऑफ इच मेटर.

<u>उत्तरः-यस</u>. वॉटर मेटरस इनस्टॉल्ड ॲट लोकेशन नं. ३ अन्ड ४ ॲन्ड हेविंग स्मॉल सेक्शनड् क्युटा ऑफ ३ एमएलडी. इन टोटल आर आउट ऑफ ऑर्डर सिन्स लॉग बॅक. रेस्ट ऑफ आउट ऑफ ऑर्डर मेटरस् आर.
१ न्यु एमबीआर सिन्स १६.१०.२००१ टू २६.४.२००२.
२ ओल्ड एमबीआर. २१.९.२००१ टू १६.४.२००२
३ शांतीनगर १०.९.२००१ टू २२.१२.२००१.

<u>मा. सदस्या श्रीमती. भावना रामचंदानी :-</u>उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिवः-</u> प्रश्न क्र. ३ हा श्रीमती. भावना रामचंदानी यांचा आहे.

प्रश्न क्र. ३:-प्लीज स्पेसिफाय द डेट ऑफ मेटर इफ ॲनी रिपेअर्स ॲन्ड पुट टू ऑर्डर.
उत्तरः- १. न्यु एमबीआर १७.४.२००२
२. ओल्ड एमबीआर १७.४.२००२
३ शांतीनगर २३.१२.२००१

<u>मा. सदस्या श्रीमती. भावना रामचंदानी :-</u>उत्तर ठिक आहे.

मा. सचिवः- प्रश्न क्र. ४ हा श्रीमती. भावना रामचंदानी यांचा आहे.

प्रश्न क्र. ४:-हाउ वील यु सेटल्ड द पेमेंट ऑफ वॉटर सप्लाय टू एम.आय.डी.सी डयुरींग द मेटरस् इन क्वेश्चन वॉज वेअर आउट ऑफ ऑर्डर.

उत्तरः-ऑन द बेसिस ऑफ अेवरेज क्वालिटी ऑबझरव्हड बीफोर इनस्टॉलेशन ऑफ रिपेअर्स वॉटर मेटर.

मा. सदस्या श्रीमती. भावना रामचंदानी :-उत्तर ठिक आहे.

मा. सचिवः- प्रश्न क्र. ५ हा श्रीमती. भावना रामचंदानी यांचा आहे.

प्रश्न क्र. ५:-हु इज बी हेल्ड रीस्पॉन्सीबल फॉर नेगिगेन्स ऑफ डिले इन गेटींग द मेटस् रिपेअर्ड.

उत्तरः-एक्झीटींग वॉटर मेटरस् आर प्रॉपर्टी ऑफ एम.आय.डी.सी हाउएव्हर एम.आय. डी.सी टू रिपेअर्स एक्झीटींग वॉटर मेटर्स ऑर इनस्टॉल न्यु वॉटर मेटर, अेकॉरडींगली युएमसी हॅज इश्युड वर्क ऑर्डर टू केप्सन कंपनी फॉर न्यु वॉटर मेटरस्.

मा. सदस्या श्रीमती. भावना रामचंदानी :-हे उत्तर बरोबर नाही.

मा. सचिवः-उत्तर?

मा. सदस्या श्रीमती. भावना रामचंदानी :-उत्तर बरोबर नाही. चुकीचे आहे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-मा. महापौर महोदया, सचिव साहेब व आयुक्त साहेब, श्रीमती. भावना रामचंदानी यांनी जो प्रश्न विचारला आहे की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडुन आमच्या शहरासाठी जो पाणीपुरवठा होतो त्यातील काही पाण्याचे मीटर बंद आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-श्रीमती. भावना रूपचंदानी यांचा प्रश्न आहे. त्या बोलण्यासाठी उभ्या आहेत त्यांना बोलु दया ना?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-त्यांनी सांगितले आहे उत्तर बरोबर नाही. या प्रश्नासंदर्भात आम्ही बोलु शकत नाही का? मी महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. मी महापौरांना अगोदरच संबोधित केलेले आहे. त्यांना जर काही हरकत असती तर त्यांनी मला खाली बसावयास सांगितले असते.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे नेमके समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-उत्तरामध्ये असे दर्शविण्यात आले आहे की, आमचे काही पाणी मीटर अमुक अमुक तारखेपासुन बंद आहेत. ज्यामध्ये आमचा न्यु एमबीआरचा सहा महिने दहा दिवस मीटर बंद होता. व ओल्ड एमबीआर मीटर सहा महिने पंचविस दिवस बंद होता. व शांतीनगरचा मीटर तीन महिने बारा दिवस बंद

होता. या कालावधीमध्ये आमच्या शहरास जेवढा पाणी पुरवठा झाला काय या कालावधीतील पाणी पुरवठयाचे प्रमाण बरोबर होते काय? एम.आय.डी.सी आम्हाला जी बिलाची आकारणी करते ती बरोबर नाही. या कालावधीत पुर्ण शहरामध्ये पाण्याची खुपच टंचाई जाणवत होती.

<u>श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-</u>हा जो कालावधी दाखविण्यात आला आहे याकालावधीत मीटर बंद होते. एम.आय.डी.सी ने सरासरी आकार आकारला आहे. हे जे मीटर लावण्यात आलेले आहेत ते एम.आय.डी.सी कडुन लावण्यात आलेले आहेत. त्यांनी ११.६.२००१ला आपणांस एक पत्र दिले होते. जर हे मीटर दुरूस्त केले नाहीत किंवा बदलले नाहीत तर ती आपली जबाबदारी राहिल अन्यथा दंड आकारला जाईल. त्यानुसार आपण कार्यवाही केली असून मीटरची ऑर्डर दिलेली आहे.

<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>परंतु ज्या कालावधीत मीटर बंद राहीले. त्याकालावधीत आमच्या शहरामध्ये पाणी टंचाईची भिषण समस्या निर्माण झाली होती. शहरात खुपच कमी पाणीपुरवठा झाला आहे. याचा निर्णय कोण करेल? आम्ही म्हणतो आमच्या शहरात खुपच कमी पाणी पुरवठा झाला आहे.

<u>श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-</u>आपली चुक होती. त्यामुळे त्यांनी सरासरी आकार आकारला आहे. त्यासाठीच तात्काळ कार्यवाही करून नविन मीटरची ऑर्डर दिलेली आहे.

<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>एम.आय.डी.सीची लाईन आपल्या पाण्याच्या टाकीपर्यंत येते जेथे पाण्याचा साठा होतो तेथपर्यंत. ही लाईन तोडुन आजुबाजूचे गाववाले, म्हारळ गावचे व इतर गावचे लोक पाण्याची चोरी करत आहेत. पाण्याची ही जी चोरी होत आहे. एम.आय.डी.सी.ने तर सरासरी नुसार आमच्या शहरासाठी बरोबर पाणी सोडले परंतु गाववाल्यांनी जी पाण्याची चोरी केली त्याचे काय?

<u>श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-</u>ती एम.आय.डी.सीची जबाबदारी आहे. व जे पाण्याचे मीटर लावले आहे ते पाण्याच्या टाकीच्या जवळ लावलेले आहेत. तर ती एम.आय.डी.सीची जबाबदारी आहे आपली नाही.

<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>मीटर बंदच्या कालावधीत शहरास कमी पाणी पुरवठा झाला आहे. आपण म्हणता बरोबर पाणी पुरवठा झाला आहे. एक प्रकारे आपण त्यांचा बचाव करत आहात. प्रत्त्यक्षात आमच्या शहरात पाणी पुरवठा बरोबर नव्हता, त्याचे काय झाले?

<u>श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-</u>जेव्हा मीटर काम करत नव्हते. त्यामुळे त्यांनी सरासरी आकार आकारला आहे. त्यास आपण आव्हान करू शकत नाही. ॲज पर नॉर्म्स ते बील चार्ज करत असतात व आपणांस ते स्वीकारावेच लागेल. आता आपण मीटर लावले आहेत. आता अशी काही अडचण येणार नाही.

<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>आमच्या शहरात कमी पाणीपुरवठा होत होता. आमच्या मा. आमदार साहेबांनी पाण्याचा पुरवठा वाढवुन दिला आहे. त्यानंतर पाण्याची बरोबर मोजणी होत आहे काय?

*<u>श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-</u>सध्या १०५ ते १०६ दशलक्ष लिटर पाणी पुरवठा होत आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>पहिले १०१ दशलक्ष लिटर पाण्याचे बिल आपण सरासरी नुसार भरत आहोत. मी एम.आय.डी.सी मध्ये जावुन चौकशी करून आलो आहे. तर आता जे पाणी बरोबर येत आहे. परंतु त्याची मोजणी बरोबर नाही?*

*<u>श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-</u>नाही त्याची मोजणी बरोबर आहे. सध्या जे मीटर काम करत नव्हते. त्यामुळे आपण जी मीटरची ऑर्डर दिली आहे. कार्यादेश दिल्यानंतर आणखी दोन-तीन महिने याकामी लागतात. म्हणुन एम.आय.डी. ला विनंती केली होती की, सध्या जे मीटर आहेत ते आपण आपल्या स्तरावर दुरूस्त करावेत. त्यासाठी त्यांनी ६७ हजाराची मागणी केली होती ते आपण त्यांना दिले आहेत किरकोळ दुरूस्ती करण्यासाठी, सर्व मीटर आता काम करत आहेत. केवळ दोन मीटर फक्त काम करत नाहीत. की जेथुन खुपच कमी प्रमाणात पाणी पुरवठा होत आहे. २.५व २.६ दशलक्ष लिटर एवढा पाणी पुरवठा तेथुन होत आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>६७ हजार रूपये देवून आम्ही मीटरची दुरूस्ती करून घेतली आहे. जर सहा महिन्यापुवी ही दुरूस्ती केली असती तर काय झाले असते?*

*<u>श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-</u>त्यावेळी ते मान्य करीत नव्हते.*

*<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>आता कसे त्यांनी मान्य केले?*
*<u>श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-</u>त्यांना ही अट सांगण्यांत आली मीटरची ऑर्डर दिलेली आहे. मीटर तयार करणारी कंपनी आहे. तिला दिलेली ऑर्डर त्यांना दाखविली. ते कमीत कमी दोन महिने याकामी लागतील म्हणुन एम.आय.डी. सी कडुन या मीटरची किरकोळ दुरूस्ती करून घेण्यांत आली.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u> आता आमच्या दशोरे साहेबांनी सांगितले की, एम.आय.डी.सी चे मीटर आहेत. त्यामध्ये जो काही बिघाड होतो तो बिघाड काढण्याचे काम कुणाचे आहे? याची जबाबदारी कुणाची आहे?*

*<u>श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-</u>प्रत्यक्षात काय होते, जबाबदारी आपली आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u> कशी आपली आहे, जर मीटर एम.आय.डी.सी. चे आहेत. अटी काय आहेत?*

*<u>श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-</u>प्रत्यक्षात ग्राहकाची ती जबाबदारी आहे. आपण ग्राहक असल्याने जबाबदारी आपली आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u> मी आपणांस एक विचारू इच्छितो, समजा महानगरपालिकेने घरांमध्ये मीटर लावले तर ती कुणाची जबाबदारी आहे ? महापालिकेची की त्या घरमालकाची?*

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-सुरवातीला त्यांनी मीटर लावले होते आता आपण म्हणत असु तर ते त्यांचे मीटर काढ  ून घेतील.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-मी आपणांस विचारू इच्छितो की, शर्ती काय आहेत? जेव्हा मीटर एमआयडीसी चे लावले होते. महापालिका व एमआयडीसीमध्ये शर्ती काय होत्त्या. जर मीटर खराब झाले तर त्यांची दुरूस्ती महापालिका करेल की, एमआयडीसी करेल?

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-नाही. ते काम तर महापालिकाच करेल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-शर्ती तशा आहेत?

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-नाही. अटी तशा नाहीत. जेव्हा आपण पाणी पुरवठा योजना हस्तांतरीत करून घेतली.....

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः- मग कसे आपण म्हणता? महापालिका दुरूस्ती करेल हे आपण कसे म्हणता. अटी शर्ती काय आहेत? एमआयडीसीच्या अटी काय होत्त्या. आम्ही आपणांस एक गोष्ट सांगतो. जेव्हा एमएसईबी. आपले मीटर लावते त्यामध्ये जर काही बिघाड झाला तर त्याची दुरूस्ती कोण करते? एम. एसईबी करते.

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-त्याचे शुल्क दयावे लागते.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-कसले शुल्क?

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-मीटर जेव्हा काम करेनासा होतो........

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः- आपण असे म्हणता की, महापालिकेची जबाबदारी आहे? आपण दुस-यांदा म्हणता की, शुल्क दयायचे आहे यात महापलिकेची जबाबदारी आहे. महापालिकेची जबाबदारी कुठून आली? जेव्हा एमआय. डीसी ने मीटर लावले आहेत.

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-तेव्हा एमआयडीसीने आपणांस सांगितले आहे ना.....

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः- कधी सांगितले आहे? तोंडी सांगितले आहे की, लेखी दिले आहे?

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-त्यांनी लेखी आपणांस दिले आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः- कधी दिले?



श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-ते दिले आहे २२.६.२००१ला.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः- यांचे मीटर कधी लावले होते?

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-मीटर ९४च्या पुर्वी लावले आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः- ९४ पासुन आजपर्यंत काय होत होते. दुरूस्ती कोण करत होता?

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-आजपर्यंत मीटर मध्ये जोकाही बिघाड झाला होता त्याची दुरूस्ती त्यांनी केलेली आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः- तर आता का नाही दुरूस्ती करत?त्यासाठी आपण काय केले? काल पर्यंत ते दुरूस्ती करत होते आज म्हणत आहेत की, आपण पैसे भरा. याचे कारण काय?

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-असे त्यांनी कधी लेखी दिले नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः- मी काय विचारतो, समजा त्यांनी अचानक पत्र दिले ,२२.६.२००१ की आपण दुरूस्ती करा. २१. ६ पर्यंत ते दुरूस्ती करत होते. २२.६.२००१ ला पत्र देण्याचे कारण काय?

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-ग्राहकाची जबाबदारी आहे ना?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-पहिले नव्हती? पहिले आम्ही ग्राहक नव्हतो? २१.६.२००१ पर्यंत आम्ही ग्राहक नव्हतो का? आपण मोघम उत्तर देत आहात. व्यवस्थित अभ्यास करून सांगा. २१.६.२००१ पर्यंत आमची जबाबदारी होती का?२१.६.२००१ पर्यंत नव्हती. तर मग २२.६.२००१ला आम्ही ती जबाबदारी का घ्यावी? आपण एम.आय.डी.सी ला का सांगत नाही की, २१.६. पर्यंत आपण दुरूस्ती केली आहे. अचानक त्यानंतर आदेश आलेत का?

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-त्यांनी लेखी दिले आहे. या अगोदर असे लेखी त्यांनी कधी दिले नव्हते.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः- समजा त्यांनी लेखी पत्र दिले परंतु महापालिकेचे काम काय आहे? उदया एम.एस.ई.बी ने आपणांस लेखी पत्र दिले की, आपण ५० ,०००/- रू. भरा पहिले आपण असे पैसे भरत नव्हतो.

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-२८.६.२००१ ला त्यांनी एक स्मरण पत्र दिले आहे. आपण जर मीटरची दुरूस्ती केली नाही तर आपणांस दंड आकारला जाईल.



मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः- मी असे विचारतो की, त्यांचा कुणीतरी जबाबदार व्यक्ती असेल चीफ इंजिनिअर असेल, मंत्री असेल कुणी तरी असेल ना? २१.६.२००१ पर्यंत आम्हाला कसे देत होते दुरूस्ती करून? २२.६.२००१ ला अचानक कसे आले? त्याचे कारण काय?

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-साहेब, ग्राहक म्हणुन आपली ही जबाबदारी आहेच.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-श्री. दशोरे २१.६.२००१ पर्यंत कुणाची जबाबदारी होती? २१.६.२००१ पर्यंत आम्ही ग्राहक नव्हतो? २२.६.२००१ नंतर आम्ही ग्राहक झालो आहोत का?

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-या अगोदर वेळोवेळी मीटर नादुरूस्त झाले नव्हते.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:- आपण बरोबर उत्तर दया. आपण मोघम उत्तर देत आहात. आपण त्यांच्याशी पत्रव्यवहार करा. नारायण पंजाबी यांनी सांगितले की,त्यावेळेला शहरात पाणी पुरवठा खुपच कमी होता. आम्हाला कमीत कमी बिल आकारणी केली पाहिजे.

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-नॉर्म्सच्या हिसाबाने सरासरी बिल आकारले जाते.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:- नॉर्म्स कोणी बनवले? आपण का?

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-नाही. शासनाचे नॉर्म्स आहेत. एम. आय.डी.सी चे नॉर्म्स आहेत. आता त्यांनी या पत्रामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे आपण हे मीटर बदलले नाहीत तर ५० टक्के दंड त्यानंतर १०० टक्के दंड आकारला जाईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:- नाही. नाही, दंडाबाबत ते बोलत आहेत. त्यांचे कुणी वरीष्ठ असतील ना? समजा आपण येथे आहात आपल्या वरीष्ठ आयुक्त आहेत आयुक्तांचे वरीष्ठ मंत्री महोदय आहेत. त्यानुसार त्यांचे पण कुणीतरी वरीष्ठ असतील ना की ज्यास आम्ही याबाबत आम्ही बोलु शकु. त्यांनी लिहिले म्हणुन आम्ही मंजुर करायचे? आमचा त्यांच्याशी करार झाला आहे ना? असे कसे चालणार? आपण म्हणता २२.६.२००१ ला त्यांनी पत्र लिहिले, बस्स. २२.६. २००१ला कसे पत्र लिहिले २१.६.२००१ पर्यंत काय होते? ते काहीही लिहितील आम्ही ते मान्य करू का?

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-ग्राहकाची जबाबदारी आहे. त्यामुळे दयावेच लागेल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-२१.६.२००१पर्यंत काय होते? करारामध्ये काय लिहिले आहे?



श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-करारामध्ये सुध्दा ग्राहकाची जबाबदारी आहे असे लिहिले आहे?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आपण बिल्कुल मोघम उत्तर देत आहात. करारामध्ये काय आहे ते आपण सांगा. व पुढच्या सभेमध्ये आम्हाला बरोबर उत्तर दया.

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा) :-ठिक आहे.

मा. सचिव:-प्रश्न क्र. ६ श्री. बच्चाराम रूपचंदानी यांचा आहे.

प्रश्न क्र ६:-हाउ मेनी स्वीपर्स ॲन्ड मुकादमस आर अपॉइंटेड इन पॅनल नं. १३ प्लीज गीव देअर नेमस ॲन्ड एरिया ऑफ वर्कस्.

उत्तर:-इन पॅनल नं. १३ ,३४ स्वीपर्स ॲन्ड ५ मुकादमस आर अपॉइंटेड ॲन्ड लिस्ट ऑफ मुकादमस् ॲन्ड स्वीपर्स ऐरियावाईज इज बीइंग गीवन टू हॉनरेबल कॉनसिलर्स.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:- कारचे साहेब बोला, आपण जे उत्तर दिले आहे. पॅनल क्र. १३ मध्ये ३४ सफाई कामगार व ५ मुकादम आहेत. संपुर्ण उल्हासनगर शहरासाठी किती सफाई कामगार व मुकादम आहेत?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-संपुर्ण उल्हासनगर शहरासाठी ११९७ सफाई कामगार आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:- किती पॅनल आहेत? २५ ना?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-२५ पॅनल आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-त्यानुसार प्रत्येक पॅनलसाठी किती सफाई कामगार नेमले पाहिजेत.

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-पॅनल निहाय सफाई कामगार वाटपाचे काम चालु आहे त्यास अदयाप अंतिम स्वरूप देण्यात आलेले नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-तर ते कधी होईल?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-या मे महिन्याच्या अखेरीस होईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-ठीक आहे.

मा. सचिव :-प्रश्न क्र. ७ हा श्री. बच्चाराम रूपचंदानी यांचा आहे.



प्रश्न क्र. ७ :-हाउ मेनी डब्लुसी ब्लॉकस् इनक्लुडींग नं ऑफ सिटस् ॲन्ड गारबेज डंपिंग प्लेस गीव डीटेलस् ऑफ लोकेशन्स.

उत्तरः-देअर आर १० सिटस् ऑफ ८ लेटरिंनस् १२ सिटस् ऑफ वन लेटरिन ॲन्ड ६ सिटस् ऑफ १ लेटरीन. इन ऑल टोटल १० लेटरिंग्स अन्ड ९८ सिटस्. देअर आर २३ गारबेज प्लेसेस इन पॅनेल नं. १३.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>सार्वजनिक शौचालयाबाबत आपण जी यादी दिली आहे. ती आपण पहा व आपण जे उत्तर दिले आहे ते पहा. प्रश्न क्र. ७ चे उत्तर पहा.

<u>श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-</u>१० बैठकीची आठ शौचालये आहेत. १२ बैठकीचे एक शौचालय आहे. सहा बैठकीचे एक शौचालय आहे. एकुण १० शौचालये आहेत. व ९८ शिटस् आहेत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>सांगा, विभाग सांगा.

<u>श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-</u>आपणांकडे जी यादी दिली आहे. त्यानुसार खडी मशिन जवळ १० शिटचे एक शौचालय आहे. महात्मा फुले नगरमध्ये एक व नगरसेवक यांचे घराजवळ १० शिटचे एक शौचालय आहे. शिवसेना ऑफीसच्या मागे एक १० शिटचे शौचालय आहे, पटेल नगरमध्ये १० शिटचे एक शौचालय आहे. नेहरू नगरमध्येय एक १० शिटचे शौचालय आहे. गेस्ट हाउस जवळ एक १० शिटचे शौचालय आहे. व मधुकर काळे यांच्या घराजवळ एक १० शिटचे शौचालय आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>किती शिटस् झाल्या?

<u>श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-८०</u> शिटस, ८ शौचालये.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>बाकी? बारा शिटचे सार्वजनिक शौचालय कुठे आहे? याचा अर्थ तुम्ही मोघम उत्तर दिले आहे.

<u>श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-</u>मी तपासुन पाहातो.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>मी एक महिना अगोदर प्रश्न दिला होता अदयाप आपण तपासुन पाहिले नाही? त्यानंतर ६ शिटचे शौचालये कुठे आहे? बारा शिटचे शौचालयही आपणांस मिळत नाही ना? ६ शिटचे शौचालय कुठे आहे ते सांगा नाहीतर मी सांगतो ते कुठे आहे ते?

<u>श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-</u>आपण सांगा मी लोकेशन तपासुन पाहातो.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>नाही, नाही आपण सांगा ना? मी प्रश्न विचारला आहे ना आपणांस, मला माहित असते तर मी प्रश्न कशाला विचारला असता? उत्तर आपणांस दयायचे आहे. साध्या प्रश्नाचे उत्तर देवू शकत नाही तर इतर प्रश्नांची काय उत्तरे देणार? अजुन बरेचसे प्रश्न आहेत. या प्रश्नातच आपण इतकी वेळ घेत आहात.



<u>श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-</u>सांगतो. मी तपासुन आपणास उत्तर देतो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-तो पर्यंत हा प्रश्न वगळायचा का? काय करायचे?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-आपणांस पाहिजे असेल तर याप्रश्नाची आणखी सविस्तर माहिती नंतर देतो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-मला नाही पुर्ण सभागृहास पाहिजे. कामाची पध्दत कशी आहे ती मला सांगा. तसे तर मला सर्व माहित आहे काम कसे चालते ते. पुढच्या प्रश्नाकडे वळु या.

मा. सचिव :- प्रश्न क्र. ८ श्री. बच्चाराम रूपचंदानी यांचा आहे.

प्रश्न क्र.८ :-हाउ मेनी डस्टबीन्स आर केप्ट इन पॅनल नं. १३ प्लीज गीव द लोकेशन्सस्.

उत्तरः-देअर आर २० डस्टबिन्स केप्ट इन पॅनल नं. १३ अ लिस्ट ऑफ लोकेशन्स इज ॲटेचड्.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-कचरा कुडयांबददल सांगा. कितीची संख्या आपण दिली आहे यादी कितीची आहे.

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- कचरा टाकण्याच्या २३ जागा आहेत. आणि २० कचरा कुंडया आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-तीन बिगर कचराकुंडया आहेत.

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- बीना कचराकुंडयांचे तीन विभाग आहेत. कचरा कुंडयांवाले २० आहेत.

मा.सचिवः-प्रश्न क्र. ९ श्री. बच्चाराम रूपचंदानी यांचा आहे.

प्रश्न क्र. ९ :- हाउ मेनी ट्रीप्स आर बीइंग मेड टू लिफ्ट गारबेजस् डेली.

उत्तरः-फ्रॉम अबव २३ प्लेसेस, टोटल डेली १०-१२ ट्रीप्स आर मेड.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-कचरा कसा उचलला जातो? आपण लिहिले की, १३ ट्रक होतात.

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- कचरा कुंडी निहाय ही सविस्तर माहिती आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आपण लिहिले आहे की, दहा ते बारा ट्रक कचरा होतो. तो या २३ ठिकाणी खाली होतो? हे नक्की का?



श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- आपल्याकडे तसा अहवाल आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-नाही, नाही मी तुम्हाला विचारतो. अहवालात तर बरेच काही असते.

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- अहवाल पक्का आणि लेखी स्वरूपात आपणांकडे आहे.

मा.सचिवः-प्रश्न क्र. १० श्री. बच्चाराम रूपचंदानी यांचा आहे.

प्रश्न क्र. १०:-हाउ मेनी टाईम सेनिटरी इन्स्पेक्टर, चीफ सॅनिटरी इन्स्पेक्टर ॲन्ड डेप्युटी कमिश्नर हेल्थ वीझीट द पॅनल नं. १३ वेदर दे रिपोर्ट टू देअर हायर ॲथराइज्ड.

उत्तरः-एस.आय/ डेली विझीटेड ॲन्ड सम टाईमस अल्टरनेट डे चिफ एस.आय. विझीटस् वन्स इन अ वीक ॲन्ड डी.एम.सी विझीटस् ॲटलिस्ट टवीस इन मन्थ. दे रिपोर्ट हॉनेबल कमिश्नर इफ ॲनी स्पेसिफीक ॲटेन्शन इज टू बी ड्रॅन.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-मुख्य स्वच्छता निरिक्षक केव्हा केव्हा येतात?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- आठवडयातुन एकदा.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-ते कधी येतात, कोणत्त्या दिवशी येतात व काय काय करतात ते आम्हाला सांगाल? त्यांनी आपणांस काय अहवाल दिला आहे?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- आतापर्यंत अशी स्थिती नव्हती की ते सांगुन जात नव्हते परंतु आता पॅनल पध्दती झाली तर पॅनल निहाय त्यांचा वार ही निश्चित केला जाईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-श्री. कारचे साहेब मी विचारल्यानुसार आपण म्हणता की, मुख्य स्वच्छता निरिक्षक भेटी देतात. त्यांनी जर आपणांस कधी सांगितले आहे की, अमुक एका पॅनलमध्ये इतका कचरा आहे? पॅनल क्र. ६ मध्ये किती गाडयांची आवश्यकता आहे. याबाबत आपणांस काही सांगितले आहे?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- नाही, नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-याचा अर्थ ते भेटी देतात असे आपणांस वाटते?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- आठवडयातून एकदा भेट देतात.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-तर ते काय करतात? आपणांकडे अहवाल देत नाहीत, मग काय करतात. आपणांस अहवाल देत नाहीत मग कसे म्हणता भेट



देतात म्हणुन? सांगा ना? आपण म्हणता भेटी देतात त्या भेटीमध्ये काय झाले ते सांगितले जावे. मला माहित आहे कोणकोणत्त्या विभागात किती कचरा आहे.

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- पहिले ते दैनंदिन हजेरी पत्रक तपासतात. त्यानंतर त्याचा अहवाल मुख्यालयास देतात.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-एका आठवडयात बस एवढेच काम करतात? मुख्य स्वच्छता निरिक्षक आठवडयातुन एकदा जावून भेटी देतात. मी आपणांस विचारतो आपण उत्तर दया. मुख्य स्वच्छता निरिक्षक आठवडयातुन एकदा फक्त हजेरी पत्रक तपासण्यासाठी येतात? की प्रभागामध्ये भेटी देतात?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-प्रभागात सुध्दा जातात.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-सांगा ना आपणांस कधी त्यांनी सांगितले आहे? फेब्रुवारी पासुन आजपर्यंत या तीन चार महिन्यामध्ये त्यांनी आपणांस कधी सांगितले आहे. अमुक एका ठिकाणी खुप कचरा होता. आम्ही स्वच्छता निरिक्षकास मी मेमो दिला आहे. मुकादमांना मी अशी ताकीद दिली आहे. असे काही झाले आहे का?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-तोंडी माहिती दिलेली आहे. लेखी अशी काही माहिती दिलेली नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-म्हणजे महापालिका मौखिक आदेशांवर चालते का? सर्व काही तोंडीच चालते का?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- आता आम्ही त्यांना त्यांची कार्य पध्दती विकसित करून देत आहोत. यापुढे ते लेखी अहवाल देत राहतील.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-उपायुक्त साहेब आपण आमच्या पॅनलमध्ये किती वेळा भेट दिली. व तेथे काय पाहिले?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- आजपर्यंत आपल्या पॅनल मध्ये मी पाचवेळा भेट दिली.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-त्यामध्ये आपण काय पाहिले?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- त्यामध्ये आम्ही महात्मा फुले नगरयेथे जी समस्या होती ती पाहिली. पटेल नगरमध्ये जी समस्या होती ती पाहिली. आपल्या पॅनल नं. १३ची हदद पाहिली. जेथुन कचरा उचलण्याची जागा नाही. ज्याबाबत आपण आम्हास सांगितले होते. ते पॉइंटस् आम्ही पाहिले. संबंधित स्वच्छता निरिक्षक व ठेकेदार यांना देखिल आम्ही सूचना दिलेल्या आहेत की, ज्या ज्या आपल्या समस्या आहेत अडचणी आहेत त्या दुर केल्या जाव्यात.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-भेट देण्यासाठी आपण कधी आला होतात?कोणती तारीख होती?



श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- तारीख निहाय सविस्तर माहिती माझ्याकडे सध्या उपलब्ध नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः- पंधरा दिवसापुर्वी, चार दिवसापुर्वी, दोन दिवसापुर्वी कधी आला होतात?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- आपल्या बरोबरच दोन-तीन वेळा मी आलेलो आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-कधी?आठ दिवस झाले असतील, पंधरा दिवस झाले असतील, दोन दिवस झाले असतील, कधी? आजपर्यंत त्यात किती सुधारणा झाली? त्याचा काही अहवाल आपणांकडे उपलब्ध आहे? आपण ज्या समस्या / अडचणी पाहील्या त्यांच्यामध्ये काही सुधारणा झाली?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- होय. सुधारणा आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-कुठे? हे पहा महात्मा फुले नगरमध्ये आपण जावू या. तेथे काय सुधारणा आहे?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- महात्मा फुले नगर मधील जो नाला आपण सांगितला होता त्या नाल्यामधील गाळ काढण्यासाठी माणसे लावलेली आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-मी आपणांस कचरा उचलण्यास सांगितले होते. दिडशे गाडी कचरा तेथे आहे. महात्मा फुले नगरमधुन कच-याच्या किती गाडया निघाल्या? पटेल नगर मधुन किती गाडया निघाल्या आहेत?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- याची सविस्तर माहिती मी नंतर आपणांस देईन.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-आपण म्हणता मी सुधारणा घडवून आणली आहे. आपण काय केले आहे, सर्व माहिती नंतर देणार? महासभेमध्ये प्रश्न विचारला आहे आपण म्हणता नंतर माहिती देवू.

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- हे जे प्रश्न आहेत ते......

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-त्या प्रश्नांशीच संबंधित आहेत. आपण त्या प्रभागात खुप कचरा पाहिलात अदयाप तो तसाच तेथे पडुन आहे. आपणांस आम्ही नाला दाखविला तोही तसाच आहे. आपला मुख्य स्वच्छता निरिक्षक येतो पण काहीच करत नाही. स्वच्छता निरिक्षक काहीच करत नाही, मुकादम काहीच करत नाही तर आम्ही येथे येवून कुणाला बोलायचे?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):- कार्यपध्दतीत सुधारणा होईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-तर मी अशी अपेक्षा करू की पुढील सभेत आपण बरोबर उत्तर दयाल?



श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-बिल्कुल, बिल्कुल.

*<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u> कारचे साहेब, एक प्रश्न आहे. आपले जे सफाई कामगार आहेत त्यांची कामाची वेळ काय आहे?*

*<u>श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-</u>सफाई कामगारांची कामाची वेळ सकाळी ७. ३० ते दुपारी ३ . ०० .*

*<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>माझ्या माहिती प्रमाणे सकाळी ७. ३० ते ११.३० त्यानंतर ११.३० ते १२.०० पर्यंत अर्ध्या तासाची जेवणाची सुट्टी असते. व १२.०० ते ३.०० ते पुन्हा कामावर येतात म्हणजे एकुण ७.३० तासात कामाचे तास सात होतात. परंतु आता जे नविन सफाई कामगार घेतले आहेत कालपासुन त्यांच्या कामाची वेळ काय?*

*<u>श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-</u>आठ ते पाच.*

*<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>आठ ते पाच म्हणजे आठ ते एक सकाळी पाच तास काम करतात व दुपारी एक ते दोन त्यांची जेवणाची वेळ असते आणि दोन ते पाच पर्यंत अशा प्रकारे एकुण नउ तास ते काम करतात. म्हणजे कायम सेवेतील सफाई कामगार व रोजंदारी वरील सफाई कामगार यांच्या कामाच्या तासांमध्ये काही फरक आहे का?*

*<u>श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-</u>नाला सफाई साठी जे कामगार लावले आहेत त्यांना आपण आठ तासाचे काम दिले आहे. आणि दोन सत्रामध्ये त्यांना यासाठी काम दिले आहे सकाळच्या सत्रात काही अडचण असेल तर सकाळीच त्यांच्याकडुन ते काम करवून घेतले जाते व दुपारच्या सत्रामध्ये काही काम असेल तर ते दुपारी करून घेता यावे म्हणुन त्यांना आठ तासाची कामाची वेळ देणे हे नॉर्म्स प्रमाणे आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>नियमानुसार यांना जर आठ तास म्हणता तर कायम सेवेतील सफाई कामगारांना सात तास काम का? या कामगारांचा एक तास कमी केल्यामुळे ११९७ सफाई कामगारांचे आपले ११९७ कामाचे तास कमी होतात. आणि त्यामुळे खुप कचरा साठून राहतो.*

*<u>श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-</u>कायम सेवेतील सफाई कामगारांची कामाची जी वेळ आहे ती पुर्वापार पासुन आपल्याकडे चालत आलेली आहे. ती नविन ठरवलेली नाही. व ही जी आहे ती हंगामी आहे. मागे ज्याप्रमाणे आपण नाले सफाई साठी कामगार घेत होतो. त्याप्रमाणे हे सफाई कामगार घेतले असून सकाळी आठ ते पाच ही कामाची वेळ ठेवलेली आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>एकुण कायम सफाई कामगार ११९७ असून त्यांचा एक तास कमी केल्यामुळे ११९७ तास होतात. आणि त्यामुळे ११९७ कामाच्या तासाचा कचरा शिल्लक रहातो. याची जबाबदारी नगरपालिकेची नाही का?*

*<u>श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-</u>हा धोरणात्मक विषय आहे. त्यांचा कामाचा एक तास जो पुर्वापार चालत आलेला आहे. तो कमी करायचा की वाढवायचा हे सभागृहाने ठरवायचे आहे.*



*<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>नियमाप्रमाणे कामाचे तास आठ असले पाहिजेत. नविन लोकांना सुध्दा आठ तासाचेच काम दिले पाहिजे. याचा विचार करावा.*

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-साहेब, नाला सफाईसाठी जे कामगार भरती करत आहोत ते कामासाठी करत आहात की फक्त सफारी घालुन फिरण्यासाठी भरती करत आहात? जुना प्रभाग क्र. ३१ मध्ये, मोरे नावाचा स्वच्छता निरिक्षक आहे. त्यांनी असे दोन कामगार भरती केले आहेत की ते फक्त सफारी घालुन फिरत असतात. नाला सफाईसाठी तर ते नाल्यात उतरतच नाहीत. त्यातील एकाचे नाव आहे पगारे व दुसरा त्याचाच मित्र आहे. हे काय चालले आहे? ब-याचशा प्रभागात असेच चालु आहे. असे लोक पगार घेतील आणि काम होणार नाही.

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-असे होणार नाही. मी लिहुन सुध्दा घेतलेले आहे. आयुक्तांच्या सक्त सूचना आहेत की, ज्यांनी मागच्या वर्षी काम केलेले आहे.त्यांनाच कामावर घ्यायचे आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-साहेब, हे मागच्यावर्षी सुध्दा सफारी घालून फिरत होते. काही काम करत नव्हते. त्याच लोकांना पुन्हा घेतले आहे. तर याबाबत काय करत आहात?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-मोरेंकडे?
मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-होय. मोरे स्वच्छता निरिक्षक यांच्याकडे पगारे नावाचा कामगार आहे.

मा. सदस्य श्री. मोहन वेहरानीः-मा. महापौरजी, श्री. कारचे साहेबांनी श्री. बच्चाराम रूपचंदानी यांच्या प्रश्नासंबंधी जे उत्तर दिले की, नंतर माहिती देतो म्हणुन. माझी आपणांस व आयुक्तांना विनंती आहे की, उत्तर देण्यासाठी जे उपायुक्त येतात त्यांनी तयारी करून यावी. महासभेत येवून त्यांनी असे सांगावे की, आम्ही नंतर माहिती देतो हे बरोबर नाही. त्यांनी प्रश्नाची तयारी करून आलेच पाहिजे.

मा.सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-कारचे साहेब, आपल्याकडील जे कायम सेवेतील सफाई कामगार आहेत काही प्रभागात आठ सफाई कामगार दिलेत तर काही प्रभागात दहा सफाई कामगार दिले आहेत. त्यातील बरेचसे सफाई कामगार सुट्टीवर गेलेले असतात. या दोन-तीन महिन्यामध्ये असे आढळुन आलेले आहे. कायम सफाई कामगार सुट्टीवर गेल्यानंतर त्याठिकाणी खाडा बदली सफाई कामगार ठेवले पाहिजे ते आपण ठेवले नाहीत. प्रभागामध्ये दोन ते तीनच सफाई कामगारांवर अवलंबुन राहुन कामे होत नाहीत त्यामुळे प्रभागामध्ये असंख्य ठिकाणी असा कचरा साठलेला असतो. व त्याठिकाणी धोकादायक असे आजार पसरण्याची शक्यता असते. अशावेळेस तरी नविन खाडाबदली सफाई कामगार का ठेवत नाहीत? तर ते ठेवले पाहिजेत?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-पुर्वी आपल्याकडे खाडा बदली सफाई कामगारांची पध्दत होती ती काही दिवसापासुन बंद करण्यांत आली आहे. सध्या आपल्याकडे खाडा बदलीचे सफाई कामगार घेतले जात नाहीत.

मा.सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-खाडा बदली सफाई कामगार घेण्याची पध्दत पुन्हा चालु करावी अशी आमची विनंती आहे.



मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-जे सफाई कामगार महिना महिना, दोन दोन महिने वैद्यकीय रजेवर राहातात त्यांच्यावर आपण काही कारवाही करू शकत नाही का? त्यांच्यावर कारवाई करा. जुना प्रभाग क्र. ३० मध्ये फक्त दोन कामगार काम

करतात. जिथे आठ माणसे आपण नेमली आहेत तिथे दोनच माणसे काम करत असतात. गेल्या पाच-सहा महिन्यापासुन असेच आढळते. कारवाई करू शकतो ना कायदयाने?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य):-करू शकतो.

मा.सदस्य श्री. चिमन रूपानी :-कारचे साहेब, एक प्रश्न आहे. रविवारच्या दिवशी सुट्टी असल्याने कुणीही सफाई कामगार कामावर येत नाही. म्हणतात की आमची सुट्टी आहे. तर अशी व्यवस्था का केली जात नाही की, सुट्टीच्या दिवशी सुध्दा काही कामगारांना कामावर बोलवुन त्यांना दुस-या दिवशी सुट्टी दिली जावी. जेणेकरून शहरामध्ये पुर्ण सफाई व्हावी. नाहीतर सुट्टीच्या दिवशी पुर्ण शहरामध्ये रस्त्यावर कचरा साठलेला असतो.

मा. सचिव :-प्रश्न क्र. ११ श्री. राजेंदसिंह भुल्लर यांचा आहे.

प्रश्न क्र. ११:-श्री. गिध्रुमल बालचंद रा. बॅ. क्र. ९५०, खोली क्र. १९,२० से २२, उल्हासनगर-३ येथिल पालिकेच्या इमारत मंजूर आराखडा टीपीडी /बीपी/२६२/२०००/५६६, दिनांक २५.९.२००१ नुसार सदर इमारतीचे बांधकाम मंजूर आराखडयानुसार झाले आहे का? तसेच सदर इमारत बांधकामास बांधकाम पुर्णतःचा दाखला घेतला आहे का?

उत्तर :- जागेवर मंजुर आराखडयानुसार बांधकाम केलेले नाही. बांधकाम पुर्णतेचा दाखला घेतलेला नाही.

मा. सचिव :-उत्तर ठिक आहे.

मा.सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-उत्तर ठिक आहे?

मा. सचिवः-प्रश्न क्र. १२ श्री. राजेंदसिंह भुल्लर यांचा आहे.

प्रश्न क्र.१२:- श्री. गिध्रुमल बालचंद मालकीच्या बॅ. क्र. ९५० खोली क्र. १९,२०,२१ सेक्शन २२, उल्हासनगर-३ येथील मंजूर आराखडयानुसार बांधकाम पुर्णतेचा दाखला दिला नसल्यास वाढीव बांधकाम केले आहे का? वाढीव बांधकाम केले असल्यास किती? अगर त्याच्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे का?

उत्तर :- १. वाढीव बांधकाम केलेले आहे.
२. एकूण वाढीव बांधकाम ३५४.२० चौ.केलेले आहे.
३. एकूण ३५४ चौ.मी
४. अनाधिकृत बांधकाम पाडून टाकण्यासाठी अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम विभागामार्फत दि. ६.५.२००२ रोजी कायदेशिर नोटीस बजावण्यात आलेली आहे.

मा. सचिव :-उत्तर ठिक आहे?



मा.सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-उत्तर ठिक आहे.

__मा. सचिवः-__प्रश्न क्र. १३ श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

प्रश्न क्र. १३:- दिनांक २०.६.२००१ च्या सर्वसाधारण महासभेत बाळकृष्ण नगर ते क्रांतीनगर ए ब्लॉक मधील मुख्य नाला खुला करण्याबाबत लक्षवेधी सुचनेनुसार तत्त्कालीन मा. आयुक्तांनी सदर मुख्य नाल्याचे इस्टीमेंट बनवुन नागरिकांसाठी त्वरीत खोलण्याचे ठाम आश्वासन भरमहासभेत दिले होते. त्या अनुषंगाने सदर मुख्य नाला कधी खोलला जाईल?

उत्तर :- उल्हासनगर महानगरपालिकेत असलेले तांत्रिक सल्लागारांकडून उक्त नाल्याचे प्लेन टेबल सर्व्हे व लेव्हल घेवून सविस्तर तांत्रिक अहवाल मागविण्यंता आला आहे. तांत्रिक अहवाल प्राप्त झालेनंतर सदरचे काम हाती घेण्यात येईल.

__मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-__सन्माननिय महापौरजी व आयुक्त साहेब, त्या नाल्याचे आपण काय करणार आहात? सांगा जरा. असे लोक बसले आहेत. काय होणार आहे? एक वर्षापासुन ओरडत आहे. एक वर्षापासुन हेच उत्तर देत आहात ना आपण? हे जे उत्तर दिले आहे ते बरोबर आहे का? सांगा आपण काय मार्ग काढला आहात? लोक त्यामध्ये बुडाले तर काय होईल?

__मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-__महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी राजीव गांधी नगर येथील नाल्याचा प्रश्न उपस्थित केला आहे. ही जी अडचण आहे ती खुपच जुनी आहे. आज काल निर्माण झालेली नाही. व यामध्ये काही कायदेशिर गुतागूंतीच्या समस्या आहेत. त्यामुळे या अडचणीमधून योग्य असा मार्ग अदयाप पुढे आला नाही. प्रश्न हा आहे की, तेथे पहिले नाला होता किंवा नाही. याबाबत बरेचसे कागदोपत्री पुरावे शोधण्याचे आम्ही प्रयत्न केले परंतु कोणताही कागदोपत्री पुरावा आम्हाला मिळाला नाही. त्यामुळे कायदेशिर जे आदेश काढावे लागतात त्या कायदेशिरपणापर्यंत आम्ही पोहचु शकलो नाही. त्यामुळे यातून आणखी काही मार्ग शोधण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. व दुसरा प्रश्न असा की, चंदुमल असे काही त्यांचे नाव आहे.

__मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-__चंदु (xxxxxx)
__मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-__जे काही नाव आहे. चंदु (xxxx) त्याची जी जागा आहे. तेथुन पाणी जाणे संभव आहे असंभव आहे. याबाबत आमचे शहर अभियंता आहेत त्यांचा अभिप्राय घेतला होता. ते योग्य ते सांगु शकले नाहीत. पहिले असे की, याबाबत काही कागदोपत्री पुरावा आम्हाला मिळत नाही. त्यामुळे कायदेशिर आदेश काढण्यामध्ये अडचणीचे होत आहे. दुसरा प्रश्न असा उपस्थित होतो की, जर आम्ही कायदेशिर आदेश काढु शकत असू तर त्यामुळे आमचे जे तांत्रिक सल्लागार आहेत. त्यांचा अभिप्राय मागविण्यात आला आहे. व त्यांचा अभिप्राय आल्यानंतर आम्ही निर्णायक मतापर्यंत पोहचु. हा जो नाल्याचा प्रश्न आहे तो गेल्या चार-पाच वर्षापासुन चालत आलेला आहे. व दुसरा असा एक रस्ता निघत आहे की, जेथुन आता पाण्याचा प्रवाह चालु आहे. एक चंदु (xxxx) व दुसरा जो रस्ता आहे जो सदयस्थितीत आहे. तेथुन जे पाणी जाते तेथे पुलावर एक मोठी पाईपलाईन आहे. त्याबाबत आम्ही पत्रव्यवहार करत आहोत.हा पाईप हटविला तर पाण्याचाप्रवाह सुरळीत होऊ शकतो.त्याच्या पुढेही रेल्वेचा जो रस्ता आहे तेथुन पाणी



जाण्यास त्रासाचे होत आहे. जेव्हा रेल्वेचे रूळ तेथे टाकले गेले होते त्यावेळी तेथे काही लोकवस्ती नव्हती. त्यावेळी पाण्याचा प्रवाह कमी होता. त्यामुळे त्याचा जो

सेक्शन तयार केला तो त्यावेळी छोटा तयार केला होता. तो मोठा करण्यासाठी काय प्रयत्न केले जाऊ शकतात याबाबत आमचा पत्रव्यवहार चालु आहे. मला असे वाटते की, लवकरच यातुन काहीतरी मार्ग निघेल. व आम्ही काही करू शकु.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>साहेब, लवकरच या आपल्या आश्वासनावर आम्ही काय विश्वास करायचा? ३.१.२००२ ला आपल्या जागेवर आयुक्त साहेब म्हणुन श्री. ढाकरे बसले होते त्यांनी त्याचवेळी म्हंटले होते की, आताच जेसीबी घेऊन जा. व नाला मोकळा करा. ३ दिवसामध्ये त्याचा अहवाल पाहिजे. ३.१.२००२च्या महासभेच्या इतिवृत्तांतात पृष्ठ क्र. २३ आपण पहा. ते इतिवृत्त कायम झाले आहे. त्यावेळी सांगण्यांत आले होते ३ दिवसामध्ये हा नाला मोकळा केला जाईल. तर आपल्या बोलण्यावर काय विश्वास करायचा? सांगा ना?आपण म्हणता नाला मोकळा केला जाईल काहीतरी रस्ता निघेल. एक दिवस जरी जोरात पाऊस पडला तरी तेथील लोकांची घरे बुडतील. ३.१.२००२ च्या महासभेच्या इतिवृत्तांताचे पृष्ठ क्र. २३ काढुन बघा त्यावर महापौरांनी दिलेल्या निर्णयाची नोंद आलेली आहे. व आयुक्तांच्या आसनावर श्री. ढाकरे साहेब बसले होते. त्यांनी निर्णय दिला होता की, तीन दिवसामध्ये नाला मोकळा केला जाईल. आताच्या आता जेसीबी घेऊन जा व नाला मोकळा करण्याचे काम चालु करा. परंतु काय केले आहे? सांगा ना आपण?

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>याबाबत आताच मी आपणांस जे सांगितले की. ....

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>तेच ना ,आणखी काही नाही, नाला मोकळा केला जाईल. उल्हासनगर मधील नाले असेच हडप केले जातील. आपण म्हणता रेकॉर्ड नाही. हॉस्पीटल रोडवर नाल्यावर स्लॅप टाकला आहे. आपल्या कालावधीमध्ये नाले बंद होत आहेत. पाण्याचा प्रवाह चालु करण्यासाठी लोकांना जागा हवी आहे. व आपण नाले बंद करण्याच्या मागे लागला आहात? आपल्या अशा करण्याने उल्हासनगर शहर बुडून जाईल.

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबानाः-</u>मा. महापौरजी,...

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u> मला अगोदर माझे बोलणे पुर्ण करू दया. सांगा आपण काय मार्ग काढत आहात?

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>आपण जे म्हंटलात नाले हडप करणे असा काही आमचा उददेश नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u>हॉस्पीटल एरियात नाल्यावर स्लॅप टाकला आहे,आपण सांगता तसे थोडे काम चालणार आहे? मागे एका महासभेमध्ये याबाबत माझी एक लक्षवेधी सुध्दा होती. २०.६.२००१च्या महासभेत लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावेळी सुध्दा सांगितले होते की, एक महिन्यामध्ये होईल. आपले असे हे बोलणे किती दिवस चालेल? सांगा ना आपण?

*<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>मी आपणांस सांगितले आहेच की, काल परवा निर्माण झालेली ही समस्या नाही. मागील चार-पाच वर्षापासुन ही चालत आलेली आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-</u>आपण म्हणता की, आम्ही तांत्रिक सल्लागारांकडुन अहवाल मागवत आहोत. अहवाल मागवत आहोत. तंत्रज्ञानास किती वेळ लागतो? काम करणा-यांना काही वेळ लागत नाही. सेटींग करणा-यांचे सर्व काही चालते?*

*<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u> सेटींग झाली आहे असे आपण म्हणता ती अतिशय गंभिर अशी बाब आहे. सेटींग झाली आहे असे आपले म्हणणे आहे. त्याबाबत कोणतीही चौकशी केली जाईल. मी तर असे समजतो की, हा प्रश्न बाजुला ठेऊन सेटींग बाबत चौकशी केली जावी.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-</u>पुन्हा पुन्हा नाला बंद करण्यास सेटींग शिवाय संधीच मिळु शकत नाही. बिना सेटींग ने हे होत आहे का?*

*<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>आपले असे म्हणणे आहे तर सेटींग बाबत आपण काही पुरावा दया. त्याबाबत चौकशी नेमेन.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-</u>सेटींगचा पुरावा असतो का? ते तर टेबलाखालुन होत असते ना? मा. महापौरजी, मागील महापौरांनी नाला मोकळा करणाबाबत निर्देश दिले होते. यांना अक्कल नाही. आपण सुध्दा नाला मोकळा करण्याबाबत यांना निर्देश दया. आयुक्त साहेब म्हणतात पुरावा दया, टेबलाखालुन झालेल्या सेटींगचा पुरावा असतो काय? एक दिवसाच्या पावसाने तेथील हजारो लोक बेघर होतील त्यास जबाबदार कोण?*

*<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>हे पहा महापौर महोदया, हे जे म्हणतात ते अक्कलबिक्कल ची गोष्ट मला योग्य वाटत नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-</u>महापौरांना सांगावे लागेल ना अक्कल देण्यासाठी. आपण म्हणता होईल, होईल. पाच वर्षा पुर्वीचा, सहा वर्षापुर्वीचा हा प्रश्न आहे. हा तर आपला काम करण्याचा मनोदय नाही. शुळ साहेबांनी त्याचवेळी नाला मोकळा केला होता. त्यानंतर शिंदे साहेब आले होते त्यांनी सुध्दा नाला मोकळा केला होता.*

*<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>काढला तर मग आताच काय अडचण आली. आता तर बंद झाला आहे ना?*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-</u>आपल्या कालावधीतच बंद झाला आहे.*

*<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u> असे थोडेच झाले आहे. आपण आता असा आरोप लावू शकता परंतु वस्तुस्थिती तशी नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-</u>ही तर एका वर्षापुर्वीची गोष्ट आहे परंतु आता काय होत आहे? आता आपल्या समोर नाल्यावर स्लॅब पडला आहे. आपण*

काय केले? श्री. गोवर्धन गिधवानी, यु नं. ४७ त्याबाबत आपण काय करत आहात? कधी तोडणार आपण त्यास?

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>हा तर वेगळा प्रश्न आहे. याबाबत आपण लेखी स्वरूपात विचारले तर त्याचे उत्तर दिले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-</u>माझा वेगळा प्रश्न नाही याप्रश्नाशि निगडीत प्रश्न आहे. पुर्ण शहराशी निगडीत हा प्रश्न आहे. पंधरा दिवसांनंतर पावसाळा सुरू होणार आहे. पुर्ण शहरास माहित आहे की, त्या नाल्यामुळे तो पुर्ण प्रभाग पाण्यात बुडून जातो. व त्यानंतरही त्या नाल्यावर आपल्या समोर एवढा मोठा स्लॅब पडला व आपण काहीच करू शकला नाहीत. कोर्टाचा स्थगीती आदेश ४ तारखेला येतो व ५ तारखेला स्लॅब भरला जातो. नगरसेवक म्हणुन आम्ही लोक तेथे पोहोचतो व आयुक्त म्हणुन आपण तेथे जात नाही. व कोणत्त्याही प्रकारची कार्यवाही होत नाही. आपल्याकडुन चार ओळीच एक पत्र दिले जाते त्यांना ना हरकत दाखल मिळतो. तेथे नाल्यावर स्लॅब टाकला जातो हे काय आहे? पुर्ण उल्हासनग्र म्हणते की, आयुक्त, उपआयुक्त हे सर्वजण त्यांना मिळाले आहेत. व त्यांच्या आर्शिवादानेच हे काम होत आहे. आम्हा नगरसेवकांचे जर ऐकले जाणार नसेल तर सर्वसामान्य जनतेचे हे काय ऐकणार आहेत? माझ्यामते या प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी झाली पाहिजे.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>महापौर महोदया, असा प्रश्न विचारणे अनुचित आहे. कारण........

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-</u>लोकांशी निगडीत हा प्रश्न आहे. यासाठी....

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u> आपण हा जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबत जेव्हा मला माहित पडले त्याचवेळी, आधी जे प्रभारी आयुक्त होते त्यांनी मे २००१ मध्ये त्यांनी असा काही आदेश दिला होता.

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-</u>नोटीस दिली असेल.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>जसेही मला माहित पडले त्यास स्थगिती दिली गेली. व स्थगिती दिल्यानंतरही हे काम चालु झाले तेव्हा मी आमच्या संबंधित अधिका-यास जागेवर पाठवून फोटो घेतले. दोन-तीन वेळा माझे अधिकारी तेथे गेले होते व त्यांना सांगण्यांत आले की, काम बंद करा. त्याप्रमाणे काम बंद सुध्दा केले होते. परंतु त्यांनी कोर्टातुन स्थगिती आदेश आणुन जैसे थे स्थिती ठेवली त्यानंतरही त्यांनी काम चालु केले त्यामुळे अवमानतेची कार्यवाही आम्ही चालु केली आहे. व त्याबाबत जी काही कायदेशिर कार्यवाही करायची असेल ती आम्ही करू. आपण जे आरोप करत आहात की, त्यामध्ये अधिकारी, कर्मचारी सहभागी आहेत आपल्या या आरोपात काही तथ्यांश नाही. आपणांस जर त्यामध्ये काही तथ्यांश वाटत असेल तर कोणतीही चौकशी करण्यास आम्ही तयार आहोत.

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-</u>४ तारखेला स्थगिती आदेश मिळाला आहे. आणि एक वर्षापासुन काम चालु आहे. आता आपला नगररचनाविभागाचा अहवाल प्राप्त झाला आहे की, जवळ जवळ त्यांचे ८०३८चौ. मी. चटई क्षेत्राचे उल्लंघन आहे.

चटई क्षेत्राची ही चोरी एक दिवसात तर झालेली नाही? पुर्ण एक वर्षापासुन काम चालु आहे. त्याबाबत आपण काय सांगाल?

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u> हा तर वेगळा प्रश्न आहे. जर आपण लेखी विचारणा केली तर उत्तर दिले जाईल. असा अनियमित स्वरूपात आपण प्रश्न विचारू शकत नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-</u>म्हणजे त्याबाबत आपणांस लेखी दयावे लागेल?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेबांनी सांगितले नाही की, नाला केव्हा मोकळा केला जाईल ते? आपण निर्देश दिल्यानंतर सुध्दा ,साहेब सर्वांना कामे आहेत, येथे फालतु कुणीही नाही. महापौरजी, आयुक्तांना सांगा ना किती दिवसामध्ये तो नाला मोकळा केला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-</u>मा. महापौरजी, आमच्या भुल्लर महाराज यांनी तसेच श्री. होशियारसिंग यांनी नाल्यांवरील बांधकामाबाबत जे विचार व्यक्त केले आहेत. त्यांनी जे म्हटले ते त्यांचे व्यक्तीगत मत आहे असे नाही त्यांनी सत्य ते व सर्वसामान्य जनतेच्या मनातील विचार सभागृहासमोर मांडले आहेत. तर मी अशी आशा व्यक्त करतो की, आमच्या शहरामध्ये जी काही चुकीची कामे होत आहेत. नाल्यांवर जी अनाधिकृत बांधकामे केली आहेत. त्यावर कठोरात कठोर कारवाई केली जावी. अशी माझी विनंती आहे. व नगररचनाविभागाचा सभापती या नात्याने मी आशा व्यक्त करतो की, अतिशय कठोरपणे अशा या अनाधिकृत बांधकामांवर अंकुश ठेवण्याचा आम्ही प्रयत्न करू. यामध्ये आमच्या मा. महापौर, मा.आयुक्त व आम्ही सर्व नगरसेवक अधिकाधिक प्रयत्न करू. व विनंती करतो की, मा. महापौरजी व मा. आयुक्त यांनी निर्देश दयावेत की, शहरातील मोठ-मोठया नाल्यांवर अशा प्रकारची अनाधिकृत बांधकामे होवू नयेत. त्यासाठी आमच्या वतीने जे काही सहकार्य लागेल ते आम्ही जरूर देवू. धन्यवाद.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>मा. महापौर महोदया, निश्चित अशी तारीख तर सांगु शकत नाही. कारण की, मी त्याचा जो अभ्यास केला त्यामध्ये ज्या अडचणी आहेत त्या मी आपल्यासमोर मांडल्या आहेत. व मी हे सुध्दा आपणांस सांगितले आहे की, काही वर्षापुर्वी रेल्वेने तो रस्ता बनविला होता तेथुन किती पाणी जावू शकते त्याचे मोजमाप करून रस्ता तयार केला होता. सत्यता तर ही आहे की, तेथे अनाधिकृत झोपडपटटी वसली आहे. व अनाधिकृत झोपडपटटीचे जे बरेचसे सांडपाणी जमा होते व तो सखल भागातील विभाग आहे. त्यामुळे अडचणी येत आहेत. पहिले ती अडचण नव्हती. एरियाचा डीप्रेशन झाल्यामुळे व डिप्रेशनमध्ये जी झोपडपटटी आहे व जी अनाधिकृत आहे. एक मानवतावादी भुमिकेतुन त्या झोपडपटटयामधील लोकांची पुर प्रसंगी आम्ही मदत केली होती. यावेळेस आम्ही कायदयानुसार त्या बाबत मार्ग काढत आहोत. काढण्याचा प्रयत्न करत आहोत. परंतु काही निश्चित कागदोपत्री पुरावा नसल्याने मार्ग निघाला नाही. व मी सन्माननिय सदस्यास थोडया वेळापुर्वी विनंती केली की, आपणांकडे जर काही पुरावे असतील तर आम्हास दिले जावेत.

*<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-</u>पुरावे काय ऐवढा मोठा पुल तेथे तयार झाला आहे. पुलाच्या समोरून नाला जात आहे. तो पुल काय असाच तयार केला आहे. महापालिकेचा पैसा काय फुकटचा फेकण्यासाठी तेथे लावला आहात का? ऐवढा मोठा पुल तयार केला, नाल्यासाठीच तयार केला ना? ऐवढा मोठा पुल आहे तो दिसत नाही म्हणे पुरावा पाहिजे नाला होता म्हणुन, महापौर महोदया महासभा चालेल की नाही? काही ठोस उत्तर दयावे ना, पुरावा पाहिजे, पुरावा पाहिजे म्हणतात नुसते. कधी यांनी झोपडपट्टीवासियांची व्यवस्था केली? कोणत्त्याही प्रकारची व्यवस्था केली नाही. व झोपडपट्टीचे पाणी तेथे येत नाही. पुर्ण उल्हासनगरचे पाणी तेथुन वाहते. आयुक्त साहेब म्हणतात की, झोपडपट्टीचे पाणी येते म्हणुन पुर येतो. परंतु प्रत्त्यक्षात पुर्ण उल्हासनगर शहराचे पाणी या नाल्यातुन वाहत असते.*

*<u>मा. महापौरः-</u>मा. आयुक्त साहेब व सचिव साहेब या नाल्याबाबत जनतेला पावसाळयात खुपच त्रास सहन करावा लागतो. आम्ही सुध्दा पावसाळयामध्ये कधी कधी सर्व्हे करण्यास तेथे जात असतो. तर नाल्याबाबत मी आपणांस सांगु इच्छिते की, पुढील महासभेपर्यंत नाल्याबाबत कार्यवाही केल्याचे मला आढळुन आले पाहिजे. नाल्याच्या साफ सफाई बाबत आपण लक्ष दिले तर खुप मेहरबानी होईल. धन्यवाद.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-</u>यांना सांगा जेसीबी लावुन नाला मोकळा करून घ्या.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>मा. महापौर महोदयांच्या असे निर्दशनास आणुन देवू इच्छितो की, सन्माननिय नगरसेवक श्री. भुल्लर महाराज यांनी ज्या नाल्याबाबत माहिती दिली आहे. त्याबाबत थोडीशी माहिती माझ्याकडे सुध्दा आहे. हा नाला दोन ठिकाणाहुन काढण्यात आला होता ५० वर्षापासुन. त्याचे काही ठिकाणी पुल सुध्दा आहेत. जो नाला बंद करण्यात आला त्याचे नाव सुध्दा देण्यात आले. तो नाला त्याठिकाणी पाणी जाण्याचे बंद केल्यानंतर त्यापलिकडे नवअंबिका नगर हि आठ इमारतींची १८४ फ्लॅटची सोसायटी आहे. त्या सोसायटीमध्ये माझ्या स्वतःच्या मालकीचे दुकान असुन तेथील दुकानांमध्ये, घरांमध्ये चार फुटा पर्यंत पाणी येते. आणि या ठिकाणी पाणी बंद केल्यामुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला फक्त नव अंबिका नगर याठिकाणी पाणी भरत असल्यामुळे १कोटी २१ लाख रूपयाचे प्राकलन पास करून मा. नगरसेवक रमेश खोत यांनी नाल्याचे काम तेथुन पुर्ण करून दोन ठिकाणवरून पाणी वळविले आहे. नव अंबिका नगरपासुन सेंच्युरी केमीकल पर्यंत पाईप लाईन गेलेली आहे. व त्याप्रमाणे श्री शुभ मार्बल ज्याठिकाणी आहे तेथुन शहाड मॅरेजहॉल झालेला आहे त्याठिकाणी वळविला आहे. मला आपणांस एकच सांगायचे आहे की, जे पाणी दोन ठिकाणी वळविले आहे. त्याप्रमाणे हा जो नाला चंदर या व्यक्तीने बंद केला आहे. तो नाला जुना आहे. तो बंद केल्यामुळे ते पाणी पुढे न जाता पाठीमागे येते. व वसाहतीमध्ये साठते. दोन वर्षापुर्वी जेव्हा आर.डी. शिंदे साहेब आयुक्त होते तेव्हा. त्यांनी तेथे जेसीबी लावुन नाला तोडला होता. सन्माननिय उपमहापौर श्री. धनंजय बोडारे साहेबही त्यावेळी तेथे उपस्थित होते. तर आपणांस मी ऐवढे सांगु इच्छितो की, तो जो नाला आहे तो लवकरात लवकर मोकळा करून पाण्यास जाण्यासाठी वाट करून दयावी. पावसाळयात लोकांची जी जनहानी व वित्तहानी होते ती आपण थांबवु शकता. अशी माझी विनंती आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेबांना सांगावे की, पुढील महिन्यामध्ये पावसाळा सुरू होण्यापुर्वी तो नाला मोकळा केला जावा. याबाबत आपण निर्णय दया.*

<u>मा. महापौरः-</u>भुल्लर साहेबांच्या या प्रश्नाविषयी मी आयुक्त साहेबांना विनंती करते की, तो नाला लवकरात लवकर मोकळा केला तर बरे होईल.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मा. महापौर महोदया, माझी आपणांस विनंती आहे की, पुढील महिन्याच्या महासभे पुर्वी तसेच पावसाळयापुर्वी या नाल्याचे काम करावे. अन्यथा पावसाळयामध्ये बरीच असुविधा होईल. अशास्थितीत पावसाळयापुर्वी ते काम चालु करून शहरास राहत देण्यासाठी आपण आयुक्तांना आदेश दया की, पुढील महिन्यात पावसाळयापुर्वी त्या नाल्याचे सफाईचे काम चालु झाले पाहिजे. पुढल्या महासभेत आम्ही येवू तेव्हा तेथे पुर येता कामा नये. अशी आमची आपणांस विनंती आहे.

<u>मा.महापौरः-</u>मी सभागृहास सांगु इच्छिते की, आयुक्त साहेब यातुन मार्ग काढतील तर खुपच चांगले होईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>आपण निर्णय दिला तर होईल ना?

<u>मा. महापौरः-</u>मी निर्णय दिला आहेच ना?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>निर्णय दिला आहात ना? ठिक आहे.

<u>मा.सचिवः-</u>प्रश्न क्र. १४ श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

प्रश्न क्र. १४ :- येत्त्या पावसाळयात मुख्य नाला खुला केला गेला नाही तर सदर परिसर पुरमय होवुन माठी वित्त व जिवित हानी होईल त्यास पालिकेचे संबंधित अधिकारी व प्रशासन जबाबदार राहील काय? येणा-या अप्रिय घटनेस पालिका जबाबदार राहील काय?

उत्तर :- सदरची परिस्थिती नगरपरिषद अस्तित्त्वात असल्यापासुनची आहे. दरवर्षी पावसाळयांत पुरहानी होवू नये म्हणून उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत पुरग्रस्तांसाठी स्वतंत्र विभाग उघडण्यांत येत असते व पुरामुळे मोठी वित्तिय व जिवित हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येते. सालाबादाप्रमाणे यावर्षी देखिल पावसाळयात पुरामुळे हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>प्रश्न क्र. १४ चे उत्तर दिले जावे. आपण कोठे कोठे काय काय व्यवस्था केली ते जरा मला सांगा. मागच्या वर्षी कोठे कोठे व्यवस्था केली होती. कुठे कुठे आपण लोकांना जेवण वाटप केले आहे. व कोठे आपण लोकांची राहण्याची व्यवस्था केली व पुढे करणार आहात. सांगा जरा. साहेब आता सांगावे लागेल ना?याचे उत्तर कोण देईल? कुठे कुठे व्यवस्था केली आहे?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, आजच्या महासभेत ब-याच वेळेपासुन नाला सफाई बाबत चर्चा चालु आहे. अतिक्रमणाबाबत चर्चा चालु आहे. आमच्या ज्या सदस्यांनी येथे आपले विचार मांडले. जसे श्री. महाराज भुल्लर यांनी विचार मांडले. आमच्या श्री. होशियारसिंग यांनी विचार मांडले. नगररचना समितीच्या सभापतींनी विचार मांडले. आमच्या आयुक्त साहेबांना आमची विनंती आहे, त्यांना

वाईट वाटले नाही पाहिजे. या सदस्यांनी बाहेर काय काय चालले आहे ते आपणांस सांगितले की, लोक म्हणतात की संबंधित अधिकारी एकमेंकांना मिळाले आहेत. लोक काही पण बोलतात. कामाची कार्यवाही दिसत नाही म्हणुन लोक बोलत असतात. व जनता जनार्दन पेक्षा दुसरी कोणतीही ताकद मोठी नाही. व आपण ही गोष्ट प्रतिष्ठेची न करता हे दोन्ही नाले पावसाळयापुर्वी जरूर मोकळे करा. अशी माझी विनंती आहे  व जसे आमचे बंधु श्री. मोहन बेहरानी यांनी सांगितले की, पुढच्या महासभेत जेव्हा आम्ही येथे येऊ तेव्हा ते दोन्ही नाले मोकळे झालेले व साफ झालेले असावेत. पुढची सभा नाही आम्ही ही सभा स्थगित करून नाले सफाई होण्याची वाट पाहु. माझी आंपणास विंनती आहे की, हे दोन्ही नाल्यांचे मुददे गंभीर मुददे आहेत. आज आमचे बंधु श्री. भुल्लर महाराज व श्री. होशियारसिंग यांनी जे सांगितले तो नाल्यांचा मूददा आहे त्यांचा वैयक्तिक मुददा नाही. जनतेच्या हितासाठी ते बोलत आहेत. पुर येता कामा नये म्हणुन ते बोलत आहेत. आपल्या सारखा सक्षम प्रामाणिक आयुक्त असताना आम्हाला आपल्या राज्यात या प्रकारचा त्रास होता कामा नये.  आम्हाला हे माहित आहे की, ज्या काही अडचणी, समस्या येतात त्यांना तोंड देण्यास आपण सक्षम आहात. तसेच महाराज भुल्लर यांचा नाला मोकळा करण्याबाबतची जी समस्या आहे ती थोडया दिवसामध्ये दुर करून दोन्ही नाले मोकळे करून दया ही आमची संपुर्ण महासभेची सर्व संमतीने आपणांस विनंती आहे. व मी मा. महापौरजींना विनंती करेन की, यापुढे आपण आयुक्तांना विनंती न करता आयुक्तांना आदेश दया  तो आपला अधिकार आहे. आपण विनंती, विनंती करू नका आदेश दया. आपण पिठासिन अधिकारी आहात. आपण महासभेमध्ये आयुक्तांना आदेश देवू शकता की हे करा.हे आपणांस करावे लागेल. माझी आपणांस विनंती आहे की, भविष्यात आपण त्यांना आदेश दया. जसे की मी आपणांस सांगितले होते की, आमचे नगरसेवक श्री. महेंद्र मुलचंदानी यांच्या काकांच्या तिजाची वेळ होत आली आहे. साडे पाच ते सहा वाजेपर्यंत वेळ आहे. व आमच्या दोन मा. सदस्यांची जी मागणी आहे ती  अतिशय महत्त्वाची मागणी आहे. अतिशय गंभीरतेने या दोघांचीही मागणी पुर्ण केली पाहिजे. ते आपल्या घरासाठी ही मागणी करत नाहीत. जनतेच्या हितासाठी ते बोलत आहेत.  सत्ताधारी, विरोधी पक्षीय, पदाधिकारी, अधिकारी , प्रशासन या सर्वांना बाजुला सारून आम्ही सर्व जण एक आहोत असे असे विषय जेव्हा महासभेत उपस्थित होतील तेव्हा ते भलेही सत्ताधारी पक्षाचे असोत, विरोधी पक्षाचे असोत आम्ही सर्व जण आपसामध्ये भाऊ भाऊ आहोत. शहराच्या मुदयात कुणीही सत्ताधारी नाही किंवा विरोधी पक्षीय नाही.  तर माझी आपणांस विनंती आहे की आपण आयुक्तांना आदेश दया. व ही महासभा स्थगित करून दुसरा कुठलाही दिवस निश्चित करा तोपर्यंत ही दोन्ही कामे झाली पाहिजेत.

<u>मा. सचिव :-</u>प्रश्नोत्तराची वेळ संपली.
एक लक्षवेधी सुचना आली आहे. तीचे सुचक आहेत श्री. राज असरोंडकर व अनुमोदक आहेत श्री. धनंजय बोडारेजी.

<u>लक्षेवधी सूचनाः-</u>

उल्हासनगर महापालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट झाला असतानाच्या काळात शहरातील नाल्यांवर सुध्दा मोठया प्रमाणावर अतिक्रमणे झालेली आहेत.  त्यामुळे नाले सफाईचे काम जिकीरीचे बनलेले असून ते समाधानकारकरित्त्या पार पाडले जात नाही. जलनिःसारणाचा प्रश्न त्यामुळेच निर्माण झाला आहे. मात्र हा प्रश्न सोडविण्याऐवजी प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे अधिकाधिक गुंतागुंतीचा होण्याची शक्यता आजच्या स्थितीतही शाबुत आहे. महापालिकेकडून

बांधकाम आराखडे मंजूर करून घेतलेल्या इमारतींच्या कुंपणभिंती बिनदिक्कतपणे नाल्यांच्या भिंतीवर अतिक्रमण करून बांधल्या जात आहेत. त्यातच नाल्यांचा सर्वसाधारण मार्ग मनमानीपणे वळवुन बिल्डरांच्या सोयीने नगररचनाकारांनी बांधकाम आराखडे मंजुर केल्याची उदाहरणे समोर आली आहेत. महापालिकेच्या परवानगीनेच नाल्यांवर अतिक्रमणे होत असतील तर ती गंभीर बाब आहे. तिची तितकीच गंभीर दखल महासभेने घेणे आवश्यक आहे.

तरी , १ नाल्यांवर झालेली अतिक्रमणे त्वरेने हटविण्यासाठी २. त्यास जबाबदार असलेल्या कर्मचारी अधिका-यांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी तसेच ३. नाल्यांचे मार्ग वळविण्याची व नाल्यांवर बांधकामे करण्याची परवानगी देवू नये यासाठी महासभेने आयुक्तांना आदेश द्यावेत, अशी मागणी सदरच्या लक्षवेधी सुचनेव्दारे करीत आहोत.

मा.सचिवः-आपली लक्षवेधी स्विकृत केली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-सर्व नाले साफ झाले पाहिजेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-जर नाल्यावरील स्लॅब तोडण्याकरिता कोर्टाच्या स्थगिती आदेश आहे तर तो लवकरात लवकर हटवून नाल्यावरील स्लॅब तोडला जावा.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-नाल्यावर जो स्लॅब बांधले आहेत. ते तोडावे लागतील ना नाला साफ करण्यासाठी.

मा. सचिवः '-सभा कधी ठेवायची? २४ तारखेला ४. ०० वाजता?

मा. महापौरः-आजच्या या सभेचे उर्वरीत काम स्थगित करून हि सभा दि. २४. ५.२००२ रोजी सांयकाळी ४. ०० वाजेपर्यंत पुढे ढकलण्यांत येत आहे.

मा. सचिवः-कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५. ४५ वाजता मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी सभेचे कामकाज पुढे ढकलल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-२४/५/२००२

**इतिवृत्त**

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२४/५/२००२ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दि. १७.५.२००२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती सदर सभेचे कामकाज स्थगित करून पुढे ढकलण्यांत आल्याने सदरची सभा स्थगित करून शुक्रवार दि. २४.५.२००२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.

२)मा. उपमहापौर:- श्रीमती. जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३५. | श्रीमती. भावना रवी खिलनानी |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३६. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३७. | श्री.राजेश उर्फ राज जयसिंग असरोंडकर |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ३८. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३९. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ८. | श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास | ४० | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ९. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४१. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४२. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ११. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४३ | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| १२. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४४. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| १३. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १४. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १५. | श्री. उमाप रामदास राघोजी | ४७. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १६. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४८. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १७. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन | ४९. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १८. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५०. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १९. | श्रीमती.गुप्ता आशा प्रभुनाथ | ५१. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| २०. | श्री. नाना आनंदा पवार | ५२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| २१. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५३. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २२. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५४. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २३. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५५. | श्री.साधवानी मनोज लालचंद |
| २४. | श्री. शांताराम ओंकार निकम | ५६. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २५. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५७. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५८. | श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५९. | श्रीमती. किरण लखी माखीजा |
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६०. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २९. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६१. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| ३०. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ६२. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६३. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३२. | श्री. मोहन साधवानी, | ६४. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६७. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३४. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | | |



तर

मा. सदस्य / सदस्या १. श्रीमती.रामचंदानी भावना मनोहर,२ श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, ३. श्रीमती. पाल अधारी राजाराम, ४. श्री. रेहडा श्यामसुंदर जानीलाल, ५. श्री. पमनानी इश्वर (डेंडा)सतरामदास,६. श्रीमती. पंजाबी दिपा नारायण, ७ श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास,८ श्रीमती. इंदु भठिजा, ९ श्री. बहरानी मोहन वर्यलदास १०. श्री. बेहरानी ठाकूरदास वरीयलदास हे / हया सभेस अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. २० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिवः-</u>मागील सभेत जी लक्षवेधी सूचना दिली होती त्याचे सुचक होते श्री. राज असरोंडकर व श्री. धनंजय बोडारे.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>मागच्या वेळी सात दिवसासाठी सभा स्थगित करण्यात आली. तेव्हा सांगण्यांत आले होते की, सात दिवसात नाला उघडण्यात येईल. नाल्याविषयी काय झाले? आयुक्त साहेब सांगणार का? नाहीतर जो पर्यंत नाला उघडत नाही तोपर्यंत सभा पुन्हा स्थगित करा. आयुक्त साहेब सांगा याबाबतीत. सभागृह नेता नाले उघडले गेले नाहीत तरीपण सभा सुरू करत आहेत. काही ना काही तरी झाले पाहिजे ना?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>मा.महापौरजी, मा. आयुक्त साहेब नाल्याचा जो विषय निघाला होता त्यावेळी आम्ही असे उत्तर दिले होते की, सर्व्हे करण्यासाठी उत्तम इंजिनिअरींग कन्सलटंन्सींग यांना सांगितले आहे. त्यांनी अहवाल दिला त्यानुसार नाल्याचा जो डाऊन स्ट्रीम आहे. रेल्वे ट्रॅक्सच्याबाजुला तिथे ८८ से.मी. उंच आहे मागच्या बाजूने परंतु तिथे सिल्ट जमा झाली आहे तिथे एक ट्रायल फिट घेऊन ते सर्व साफ करून कुठपर्यंत खोल आहे ते पहावे लागेल. दुसरे तिथे नाला होता की, नाही हे पहावे लागेल. त्यासाठी आम्ही पी.डब्लु.डी. इथे पत्र लिहीले आहे. त्यात टोबोशिटमध्ये पुर्ण सर्व्हे केला त्याची माहिती असते. ती माहिती पण आम्हाला एका आठवडयात मिळेल. व दुस-या काही कायदेशिर अडचणी आहेत. तो भुखंड श्री. चंदर बावलानी याचा असून त्याला सनद वगैरे मिळाली आहे. म्हणुन तेथून जो नाला काढायचा आहे त्यासाठी ज्या कायदेशिर बाबी आहेत त्या पुर्ण करून नंतर पुढील कार्यवाही केली जाईल. अजुन दोन गोष्टी मी जोडु इच्छितो आम्ही रेल्वेवाल्यांना पण एक पत्र लिहिले होते तिथे जे ट्रॅक्स आहेत तेथुन खालुन थोडा मोकळा रस्ता दयावा. तेव्हा त्यांनी त्यासाठी ४ तारखेला बैठक आयोजित केली आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे लोअरींग ऑफ स्लुव्हॉल्ह तो जर तिथुन निघाला तर राजीव गांधी येथुन पाणी निघुन जाईल. त्यासाठी आम्ही २८ तारखेला बैठक आयोजित केली आहे. नाला सफाईसाठी आम्ही ड्रेनेज सेक्शनला लिहिले आहे. पावसाळयाआधी तो नाला साफ केला जाईल. तर आमच्या वतीने सर्व परीने प्रयत्न चालु आहे. व लवकरच त्याचा परिणाम दिसेल.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>नाला मोकळा करण्यासाठी तुम्ही कायदेशिर नोटीस दिली आहे का?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>ती नोटीस तर आधी दिली आहे ना?

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>तुम्ही आता कायदेशिर नोटीस दिली आहे का? समजा उदया नाला काढावा लागला तर?*

--३२--

*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>नोटीस तर आधीच दिली होती.*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>काय नोटीस दिली होती जरा सांगा तर? आयुक्त साहेब तुम्ही सांगा काय नोटीस दिली त्यांना. नोटीस दिल्याशिवाय नाला निघु नाही शकणार? परत महिनाभर नोटीससाठी भटकावे लागेल. कायदेशिर नोटीस काय दिली आपण काय पध्दत आहे?*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>सन्माननिय महापौर साहेब, चिजवानी साहेब महाराज यांची तक्रार आजची आहे का? किती दिवसापासुन तक्रार आहे. त्याविषयामुळे आपण दोनदा महासभा स्थगित केली आहे. आज तुम्ही त्यावर उपाय शोधता. जे काही करायचे होते प्लेनटेबल सर्व्हे रेल्वेला पत्र लिहायचे होते ते त्याचवेळी का नाही केले. पावसाळा येईल मग सर्व बुडतील. नंतर तुम्ही करणार का?*

*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>नाही आमचा पत्रव्यवहार तर आधीपासुन सुरू आहे. त्यांनी बैठकीच्या तारखा पण दिल्या आहेत.*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>तुम्ही कायदेशिर कार्यवाही काय करणार ते सांगा? कायदेशिर नोटीस काय देणार ते सांगा.*

*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>त्यांना नोटीस आधीच दिली होती.*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>काय नोटीस दिली सांगा ना?आम्ही आधीची महासभा होण्याआधी आयुक्तांना भेटलो होतो. आयुक्त साहेबांनी सांगितले सचिव साहेब याबाबतीत सहकार्य देत नाहीत. सचिव साहेब सुट्टीवर गेले ते सहकार्य करत नाहीत म्हणुन नाल मोकळा होत नाही नोटीस देता येत नाही. कायदेशिर काय आहे ते सांगा.*

*<u>मा. सचिवः-</u>तुमची ही नाल्याची समस्या १९९७ पासुन सुरू आहे. चंदर बाबलानी नामे व्यक्तीला १९९१ मध्ये एका भागाची सनद होती. तिथे त्यांनी कंम्पाऊंड वॉलची परमिशन घेतली त्यावेळचे जे मुख्याधिकारी होते त्यांच्याकडुन ती परवानगी घेतली होती. त्यानंतर ९५ मध्ये त्यांनी कंम्पाउंड वॉलची परमिशन घेतली होती. त्यांनी कोर्टात दावा देखिल दाखल केला होता त्या कंम्पाऊंड वॉल निष्कासन करणे कामी कलम ५३ व ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती, की कंम्पाऊंड वॉलची जी परमिशन घेतली ते प्रकरण कोर्टात न्याय प्रविष्ठ होते त्यावर स्थगिती आणली होती. त्यामुळे त्यांचे कंम्पाऊंड वॉल तोडण्यास आम्हाला प्रतिबंध होता. ९७ साली आपण जसे म्हंटलो होतो की, गुलशन नगर व राजीव गांधी नगर येथे पाणी जमा होवून तेथिल रहिवासीना त्रास होतो. त्यावेळी मा. आयुक्त शुळ साहेब होते. तेव्हा त्यांनी त्यांचे कंम्पाउंडवाल तोडुन तेथुन जमिन खोदुन प्रोक्लेन मशिनने नाला काढला होता. तात्पुरता नाला काढला होता. ज्यावेळी त्यांनी ही कार्यवाही केली त्यावेळी महापालिकेवर स्थगती होती. स्थगती आदेश असुन देखिल त्यांनी ते काम केले होते. त्यानंतर चंदर बाबलानी यांनी उच्च न्यायालयात कोर्टाचा अवमान केल्याबददल याचिका दाखल केली. व त्यांनी सांगितले की यांनी घुसपैठ केले आहे. व ८० हजार नुकसान भरपाई मागितली होती. त्यानंतर शुळ साहेबांनी पुन्हा त्यांना रिपेअर*

परमिशन दिली होती की पुन्हा कंम्पाऊंड वॉल बांधा. मग त्यानंतर पुन्हा जेव्हा हि समस्या उदभवली तुम्ही त्याविरूध्द आवाज उठविला त्यानंतर त्यांचे कंम्पाउंड वॉल तोडुन पुन्हा नाला बांधण्याचा प्रयत्न सुरू केला. अशात-हेने चार-पाच वर्ष झाले हे प्रकरण सुरू आहे. आता स्थगती आदेश नाही आहेत. परंतु आमच्या चिजवानी साहेबांचा जो अहवाल होता त्यांचे असे म्हणणे होते की, कलवर्डशी उंची जुळत नसल्यामुळे पाणी सखल भागात जमा होते



त्यामुळे आम्हाला व्यवस्थित सर्व्हे करावा लागेल. असे त्यांनी मा. आयुक्तांना अहवाल दिला आहे. मा. आयुक्त साहेबांचे म्हणणे असे होते की, ही जी समस्या आहे ती खरी आहे. ड्रेनेज समस्या निर्माण होत आहे. परंतु त्यासाठी व्यवस्थित रितीने असा नाला काढावा लागणार आहे. जेव्हा त्यांनी शहर अभियंता उपायुक्त आरोग्य व ड्रेनेज विभागातील अधिकारीना बोलावले. तेव्हा त्यांनी एकच प्रश्न विचारला होता की, यापुर्वी तिथे नॅचरल फोर्स नाला होता का? परंतु कुणी उत्तर दिले नाही की, तिथे नाला होता कीवा नव्हता. नंतर त्यांनी चिजवानी साहेबांना सांगितले की, ओसवाल साहेबांकडुन सर्व्हे करून घेवून पुर्ण परिस्थिती माझ्यासमोर ठेवा परंतु मागील तीन महिन्यांपुर्वी जेव्हा तुम्ही हा प्रश्न विचारला होता. त्यावेळी आम्ही त्यांना १६२ कलमान्वये नोटीस दिली होती. ती नोटीस याकरिता दिली जाते जेव्हा शेजारच्यांना ड्रेनेज निकालाची समस्या निर्माण झाली असेल व इतर कोणता मार्ग नसेल. व हा एकमेवच मार्ग उरला असेल तर मा. आयुक्तांना १६२ कलमान्वये अधिकार आहे की, ज्याच्या जमिनीतून तो नाला जात असेल त्याला तसे आदेश देणे प्रथम नोटीस देणे की तुमच्या जमिनी शिवाय इतर कोणता पर्याय ड्रेनेज निकाल करण्यास नसल्याने हा मार्ग आहे अशी नोटीस दिल्यावर त्याची हरकत ऐकुन घ्यावी. त्यानुसार मा. आयुक्तांनी तशी नोटीस केव्हाच दिली आहे. त्यास तीन-चार महिने झाले त्या नोटीसाच्या उत्तरात श्री. चंदर बावलानी यांनी काही प्रतित्त्युतर दिले नाही म्हणुन अजुन त्या नोटीशीवर पुढे कार्यवाही करण्यात आली नाही. मी सुट्टीवर जाण्यापुर्वी एक दिवस आधी साहेबांनी मला सांगितले होते. की या नाल्याच्या ज्या कायदेशिर बाबी आहेत त्याची पुर्तता करून दया. म्हणुन मी त्यांना आदेश तयार करून दिले होते. जेव्हा मी १६ तारखेला परत आलो. तेव्हा अधिकारींची सभा झाली. खुप काही गोष्टी समोर आल्या. तांत्रिक अडचण ,कायदेशिर अडचण त्यांचे म्हणणे होते की, समजा त्यांच्या जमिनीतुन आपण नाला काढला तर तो आपणाकडून भरपाई मागेल कारण त्या जमिनीची त्याच्याकडे सनद आहे. व दुसरे किती खर्च येईल. सर्व्हे झाला पाहिजे. आपण जर नाला बनवला तर उपयोगी असणार की नाही. हे सर्व लक्षात घेतले पाहिजे. १६२ कलमान्वये जर साहेब कार्यवाही करतात. तर त्यांचे असे म्हणणे होते की, शेजारी जे गुलशन नगर राजीव गांधी नगर आहेत त्यांना पण आदेश दयावे लागले असते की, अनुमती देतो नाला बनवा व चंदर बावलानी यांना सुध्दा परवानगी दयावी लागली असती. परंतु साहेबांचे असे म्हणणे होते तिथे जो नाला आहे. असे केले तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उदभवु शकतो. कारण की तिथे जमाव एकत्र होईल. म्हणुन कायदेशिर व तांत्रिक अडचणी दुर करून कायदेशिर रित्या नाला मोकळा करू.

<u>मा.सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-</u>चिजवानी साहेब, आपण सर्व्हे केला तेथुन पाणी जाऊ शकते की नाही ते सांगा.

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>आम्ही जो सर्व्हे केला त्यानुसार क्लीटींग नसल्यामुळे निश्चित असे काही सांगता येत नाही.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-अडीच फुट उंचीवर असून देखिल आपण असे बोलता. तर तिथुन पावसाचे पाणी जाणार की नाही जाणार?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-अडीच फुट उंचावर असल्याने वरचे पाणी तेथुन जाऊ शकेल.

--३४--

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-पुराचे पाणी काढण्यासाठीच नाल्याची मागणी करत आहोत ना. पावसाचे पाणी जाण्यासाठी म्हणुनच नाल्याची मागणी करत आहोत ना? पावसाचे तर पाणी जाईल तिथुन?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-नाल्याचा जो तळ आहे आणि त्याची जी पातळी आहे त्यामुळे पाण्याची पातळी वर राहील त्यामुळे या पातळी वरील पाणी जाईल व या पातळीच्या खालील पाणी तेथेच राहिल.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-खालचे पाणी राहु दे तसेच वरचे तर जाईल ना?लोकांच्या घरी पुर तर नाही येणार ना त्यानी? लोकांच्या घरात पाणी तर नाही भरणार ना?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-ते नाही गेले पाहिजे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-मग नाला मोकळा करण्यात काय समस्या आहे?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-बाकीचे जी कायदेशिर बाब आहे ती पुर्ण झाल्यावर तेथुन नाला मोकळा करण्यात येईल.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-कधी पर्यंत होणार? सांगा आम्हाली. एखादी तारीख तर दया. चॉकलेट कितीदा खायचे? आयुक्त साहेब तारीख दया की, या तारखे पर्यंत नाला मोकळा होईल. पाऊस आला तर लोकांच्या घरी पाणी गेले तर लोकांची हालत खराब होईल. चिजवानी साहेबांना सगळे माहित आहे चांगल्याप्रकारे. सन्माननिय महापौर, उपमहापौर काहीतरी करा याबाबतीत.

मा. महापौरः-मी आयुक्तांना आदेश देते की, त्यांनी याबाबतीत निर्णय दयावा.

मा. आयुक्त (श्री. बा.र. पोखरकर):-मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज वारंवार हा प्रश्न उपस्थित करतात. त्यांच्या म्हणण्याला अर्थ आहे. माझी पण इच्छा आहे की तिथे नाला असला पाहिजे. मागच्या महासभेमध्ये (मी मराठीतच बोलतो म्हणजे मला व्यवस्थित सांगता येईल) तर हा जो प्रश्न आहे हा अतिशय जुना प्रश्न आहे पाच-सहा वर्षापुवीचा आणि हा प्रश्न जर एवढा सरळ असता तर याचे उत्तर आणि याची सोडवणुक तावडतोब झाली असती असे मला वाटते. परंतु प्रश्न असा गंभीर आणि गुंतागूंतीचा झाला आहे त्यामुळे त्याच्यामधुन तावडतोब सोडवणुक होऊ शकत नाही, किंवा त्याची पुर्तता होऊ शकत नाही. पाच-सहा वर्ष यामध्येच गेलेली आहेत. हि जी जमिन आहे ती खाजगी मालकीची आहे. त्या मालकाचे नाव चंदर बाबलानी असे आहे. आणि त्यांना या जागेची सनद पण मिळाली आहे. ज्याला आपण जमिनीचे कागदपत्रे म्हणतो किंवा मालकी हक्काचे कागदपत्र म्हणतो ते बोलतात ते त्यांना मिळाले आहे. नाला बांधण्यासाठी त्याठिकाणी

आपल्याला जो निश्चित स्वरूपाचा कागदोपत्री पुरावा लागतो ज्याला डॉक्युमेंन्टरी इव्हीडंन्स म्हणतात. हे अत्यावश्यक असते. तो आपणांस मिळत नाही तो मिळविण्याचा आम्ही प्रयत्न करत आहेत. आणि अशा परिस्थितीमध्ये नाला तिथे होता किंवा नाही हे पाहण्यासाठी आम्ही सिटी सर्व्हेची जी शिट असते. डेव्हलपमेंट प्लान असतो आणि व्हिलेज मॅप असतो. असे दोन तीन पडताळण्या केल्या पण कुठेही नाल्याचे अस्तित्त्व दिसत नाही त्यामुळे काय झाले आहे की याच्यामध्ये अडचणी येत आहेत. पुर्वीच्या आयुक्तांनी जे शुळ साहेब होते. कुठल्यातरी दबावाखाली नाला काढण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी केलेल्या कार्यवाहीला कोर्टात आव्हान दिल्यामुळे कोर्ट ॲक्शन झाली

--३७--

आहे. आणि दुर्दैवाची गोष्ट अशी की, याला सनद तर आहेच परंतु त्याठिकाणी तीन ते चार वेळा आपल्याकडील नगररचना विभागाने त्यांना ९१ पासुन कंम्पाऊंड वॉल बांधण्याची परवानगी पण दिली आहे. खाजगी जागेला जशी कंम्पाऊंड बांधायची परवानगी दिली जाते तशी याला पण दिली आहे. ऐवढेच नव्हे तर त्याच्या जागेला गेट बनविण्यासाठी पण परवानगी दिली आहे. म्हणजे ती जागा खाजगी आहे असे महानगरपालिकेने आपल्या कागदोपत्री किंवा पुराव्यानिशी परवानगीने मान्य केलेले आहे. असा त्याचा अर्थ होतो. आता देखिल जेव्हा आम्ही त्यांना नोटीस दिली. १६२ बी.पी. एम. सीच्या कलमान्वये तेव्हा त्यांनी कोर्टामध्ये आव्हान दिले आहे. आम्ही जी नोटीस काढली त्याला उत्तर पण दिलेले नाही आणि अशी परिस्थितीमध्ये महापालिकेने कंम्पाऊंड वॉल बांधण्याची परवानगी दिली आहे. गेट बनवायची परवानगी दिली आहे. म्हणजे दुर्दैवाने म्हणा किंवा काही कारणास्तव महापालिकेने जशी खाजगी जागा असल्याचं एक प्रकारे हे मान्य केले आहे. असेच म्हणावे लागेल तर अशा परिस्थितीमध्ये नाला त्याठिकाणी जर बनवायचा असेल तर आपल्याला त्याची भुमि संपादन करावी लागेल. नंतर अधिका-यांकडुन यासाठी किती खर्च येईल त्याचे प्राकलन बनवावे लागेल. २०-२१ लाखाचे प्राकलन होत आहे. आणि दुसरा असा एक मुददा उपस्थित केला की समजा हे सर्व करूनही ओपन नाला काढला. तर पाण्याचा उतार चढाव योग्य त-हेने मिळेल की नाही. हे बघण्यासाठी मी शहर अभियंता यांना सांगितले होते ते निश्चित स्वरूपाचा असा काही अहवाल देवू शकले नाही. त्यामुळे आपले जे तांत्रिक सल्लागार ओसवाल आहेत. त्यांच्यावर हे काम सोपवले आहे. तर मग परवा मी जेव्हा चर्चा केली तेव्हा त्यांनी काही सूचना केल्या आहेत. सूचविल्याप्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे.त्याच्यानंतरच तांत्रिक दृष्टया त्याठिकाणाहुन पाणी जाईल किंवा नाही. हे आपल्याला निश्चित स्वरूपात समजु शकेल. या संबंधात रेल्वेचे जे अधिकारी आहेत. त्यांना पण मी पत्र लिहिलेले होते. त्या पत्राचे उत्तर मला प्राप्त झालेले आहे. काल मी ते उत्तर बघितले. त्यांनी असा मुददा उपस्थित केला आहे की, ज्याठिकाणाहुन आता अस्तित्त्वात असलेला नाल्याचा प्रवाह जातो. त्याठिकाणी पाईप आहे. त्या पाईपलाईनच्या संबंधित सभा मला वाटते २७ की २८ तारखेला बोलावली आहे.या गोष्टीला चालना देण्यासाठी पाईप काढण्यासाठी ४ तारखेला एक सभा बोलावण्यात आली आहे. आणि त्या रेल्वेच्या अधिका-यांनी जे उत्तर पाठवले आहे. त्यामध्ये असे स्पष्ट म्हंटलेले आहे की, १०० वर्षापुर्वी हा जो रेल्वेचा कलवर्ट झाला आहे. तेव्हा त्याठिकाणाहुन पाणी जात होते. आज पाणी का जात नसेल असा तर्क व्यक्त केला आहे की, त्याठिकाणी लो लाईन ऐरियात काही बांधकामे झाली असल्यास त्याला आम्ही काही जबाबदार नाही. तर अशा परिस्थितीमध्ये या प्रश्नांची कायदेशिररित्त्या पुर्णपणे छाननी करणे आणि तांत्रिक दृष्टया पुर्णपणे छाननी करून निर्णय घेणे. उचित होणार आहे. अन्यथा घाईगर्दीमध्ये जर आपण त्वरेने निर्णय घेतला तर त्यामध्ये कदाचित कोर्टामध्ये उल्हासनगर महानगरपालिका अडचणीत येवू शकते. आणि हे अडचणीत येऊ नये म्हणुन कायदेशिरदृष्टया योग्य ती बाजु भक्कम बघुन आणि तांत्रिक दृष्टया

त्याठिकाणी नाला बांधल्यानंतर उतार चढाव मिळेल किंवा नाही हे बघणे आवश्यक आहे. आता कायदेशिरदृष्टया म्हणजे लिगली त्याठिकाणी नाला अस्तित्त्वात आहे की नाही हे मी आपणांस सुरवातीला सांगितले की यासंबधी पुरावे निर्माण करण्याचा मी प्रयत्न केला. आता शेवटचा एक प्रयत्न आहे. तो सुध्दा आमच्या अधिका-यांनी असा सल्ला दिला. की यामध्ये टोपोग्राफीकल शिटस असा एक प्रकार असतो. आणि तो शासनाचे जे पी.डब्लु.डी विभाग असतो त्यांच्याकडे उपलब्ध असते. टोपोग्राफीकल शिटस् मध्ये त्यांनाही तसे लिहिले आहे आणि सात-आठ दिवसात त्याचे उत्तर अपेक्षित आहे. टोपोग्राफीकल शिट मध्ये नाल्याचा प्रवाह दाखवला असेल तर आपल्याला कुठल्याही प्रकारचे महापालिकेला भुमी संपादन न करता नाल्याचा प्रवाह त्याठिकाणी कायम करता येईल. किंवा नाला त्याठिकाणी काढता येईल. तर



थोडक्यात हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ असल्याने कायदेशिर बाजुची आम्ही तांत्रिकदृष्टया त्याठिकाणाहुन पाणी जाईल किंवा नाही याची खात्री केल्यानंतरच याबाबत निर्णय घेणे उचित ठरेल. आणि त्यानंतरच उचित असा निर्णय घेतला जाईल असे मी या क्षणी सांगु इच्छितो.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>पावसाळयापुर्वी होणार की नाही तेवढे सांगा.

<u>मा. आयुक्त (श्री. बा.र. पोखरकर):-</u>याचे तर मी तुम्हाला नक्की उत्तर देऊ शकत नाही. एक गोष्ट जरूर सांगु शकतो की, जो नाला आहे तेथील जे रहिवासी आहेत त्यांना त्रास नाही झाला पाहिजे. किंवा त्यांना त्रास होवू नये यासाठी आपतकालीन कक्ष या महानगरपालिकेत दरवर्षी उघडले जाते यावर्षीही उघडले जाईल. त्याठिकाणचा जो नाला आहे खालचा गाळ आहे तो पुर्णपणे साफ केला जाईल. ऐवढेच नव्हे तर याठिकाणी हे संवेदनशिल किवा धोकादायक परिस्थिती आहे. म्हणुन याठिकाणी काही महानगरपालिका कर्मचारी देखिल नियुक्ती केले जातील की जेणेकरून ही उपलब्ध जागा आहे, उपलब्ध कोर्स आहे. पाणी जाण्यासाठी जो भाग आहे त्याठिकाणी कचरा अडकुन पाणी मागे थांबु नये आणि एक आपतकालीन कक्षात देखिल अधिक माणसांची नियुक्ती केली जाईल. आणि जर पाणी साचले तर अधिक माणसे पाठवुन कचरा साफ केला जाईल. आजच स्थायी समितीमध्ये मला वाटते नाला सफाईचा प्रस्ताव मंजुर झाला आहे आणि हाच नव्हे तर सगळेच नाले पावसाळयामध्ये साफ ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल. मागच्या वर्षी देखिल हा प्रश्न त्याठिकाणी होता. एक दोन जागा सोडल्या तर गेल्यावर्षी देखिल हा प्रश्न तेथील रहिवासींना भेडसावला नाही असे मला वाटते.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटीलः-</u>अतिमहत्त्वाची बाब म्हणुन हया प्रश्नाबाबत महापालिकेकडे काही तरतुद नाही का?

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u> महापौर महोदया, उपमहापौर, आयुक्त व सभेत उपस्थित असलेले सर्व सहयोगी. मागच्या महासभेत श्री. कारचे साहेबांनी सांगितले होते की, तुमच्या प्रश्नाचे उत्तर आम्ही पुढच्या सभेत देऊ. त्यावेळी ते म्हणाले होते मला माहिती नाही पुढच्या सभेत उत्तर देईन. माझ्या प्रश्नाचे उत्तराची त्यांनी तयारी केली आहे का?

<u>मा. महापौरः-</u>मागच्या सभेत त्यांनी दिले होते ना?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-मी शौचालया विषयी विचारले होते. ते म्हणाले होते मी पुढच्या सभेत उत्तर देईन. दोन महिन्या नंतर उत्तर देणार का?

मा. सचिव:-कृपया लक्ष दया. मा. महापौरांनी मला आदेश दिल्याने मी बोलत आहे. मागच्या सभेत तुमच्या प्रश्नाचे तुम्हाला लेखी उत्तर दिले होते त्यानंतर तुम्ही त्यावर काही उपप्रश्न विचारले व माहिती मागितली.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-नाही नाही मी त्याच प्रश्नाविषयी बोललो होतो. त्यांना सांगितले तुम्ही जे उत्तर दिले ते सांगा. ते उत्तर देऊ शकले नाही ते म्हणाले मला पुर्ण माहिती नाही. मी पुढच्या सभेत उत्तर देईन. त्याला एक आठवडा झाला आहे. एका आठवडयात त्यांनी उत्तर दिले नाही. किती सफाई कामगार आहेत ते त्यांना माहित नाही. ते म्हणाले मी नंतर माहिती देतो. बारा शौचालये आहेत असे त्यांनी उत्तर दिले.



मा. सचिव:-तुम्हाला जे पण विचारायचे आहे. जी सभागृहाची पध्दत आहे त्यानुसार विचारायचे आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-तेच म्हणाले होते की, मी पुढच्या सभेत उत्तर देईन. त्यांचे कर्तव्य नव्हते का त्यावेळी उत्तर दयायचे. तेच म्हणाले होते की माझ्याकडे आता पुरेशी माहिती नाही मी पुढच्या सभेत उत्तर देईन. कोणत्त्या महासभेत उत्तर मिळेल. तुम्ही आम्हाला पध्दत सांगता तुम्ही सांगा कधी उत्तर देणार? त्यांनी स्वतःच लिहिले की, तुमच्या प्रभागात बारा बैठकीचे शौचालय आहे.

मा. सचिव:-तुम्हाला पुढच्या महासभेत उत्तर देईन म्हणाले होते ही स्थगित सभा आहे. ही पहीलीच सभा आहे दुसरी सभा नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-कोणत्त्या सभेत देणार? नंतर तुम्ही म्हणाल तुमचा प्रश्न नाही. ही महासभा आहे ना? नाही तर सांगा दोन महिन्या नंतर उत्तर देतो. कधी देणार उत्तर?

श्री. कारचे (उपायुक्त आरोग्य विभाग):-मा. महापौर, उपमहापौर, मा. आयुक्त साहेब व सभागृहात जमलेले सर्व नगरसेवक, मागील महासभेत मी बच्चारामजीच्या प्रश्नावर असे म्हणालो होतो की, पुढील महासभेत मी या विषयी अधिक माहिती देईन परंतु ही पुढली महासभा नाही स्थगित झालेली महासभा आहे. व स्थगित सभा ही पुढची महासभा नसते. ही मागचीच स्थगित सभा आहे. पुढच्या सभेत मी जरूर याचे उत्तर देईन.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-श्री. कारचे जरा थांबा. मी जे प्रश्न विचारले त्याचेच तुम्हाला उत्तर मागितले आहे. तुम्ही लिहिले आहे बारा बैठकीचे शौचालय आहे. ते आठ बैठकीचे शौचालय आहे. कधी उत्तर मिळणार?

मा. सचिव:-त्यांनी सांगितले ना पुढील महासभेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-पुढील सभेत असे म्हणु नका तुमचा प्रश्न नाही आता आम्ही उत्तर देवू शकत नाही. तुम्ही म्हणाल प्रश्नच नाही उत्तर कसे देणार?आता म्हणता स्थगित सभा आहे नंतर म्हणाल प्रश्न नाही.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मा. महापौरजी, माझे असे म्हणणे आहे की, लक्षवेधीवर चर्चा चालु आहे. मध्येच हा विषय कसा सुरू झाला आहे. मला वाटते आपण लक्षवेधीकडे लक्ष दिले पाहिजे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-लक्षवेधीवर चर्चा नाही चालु आहे. नाल्यावर चर्चा चालु आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.महापौरः-तुम्ही सर्व जण खाली बसा मी सचिवांना उत्तर दयायला सांगते.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-आम्हाला उत्तर कोण देणार?

मा. महापौरः-मी सचिव साहेबांना सांगितले आहे.

--३८--

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-सचिव साहेबांना अधिकार आहेत का? त्यांना बोलण्याचा अधिकार आहे का?

मा. महापौरः-तुम्हाला सचिव साहेब उत्तर देत आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-त्यांना अधिकार आहेत का उत्तर दयायचे.

मा. महापौरः-नियम सचिव साहेबांना माहित आहेत ते तुम्हाला उत्तर देतील.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-सचिव साहेब उत्तर देणार आयुक्त साहेब देणार नाहीत. अधिकार कुणाला आहेत?

मा. महापौरः-नाही या विषयावर नाही याचे उत्तर तुम्हाला पुढच्या सभेत देतील.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-मला आयुक्तांकडुन उत्तर हवे आहे.

मा. महापौरः-तुमच्या प्रश्नाचे उत्तर पुढच्या सभेत दयायचे आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-सचिवांना अधिकार आहेत का उत्तर दयायचे?

मा. महापौरः-आपण बसा ते उत्तर देतील.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-मी बसायला तयार आहे पण सचिवांना अधिकार आहे का उत्तर दयायचा. सचिव उत्तर देणार की आयुक्त?

मा. महापौरः-तुम्ही बसा सचिव उत्तर देत आहेत.

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः- हे तर उगाच सभेचा वेळ वाया घालवत आहेत उत्तर त्यांना दिले आहे तरी ते ऐकत नाही. मेहरबानी करून सभेची कार्यवाही सुरू करण्यात यावी.

७७

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-तुम्हाला काय त्रास होतो? ही काय पध्दत आहे. यांना काय त्रास होतो हे का मध्ये बोलतात?

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-मी मा. महापौरांशी बोलत आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-तुम्हाला कोणी अधिकार दिले बोलायचे?

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-माझ्याशी मेहरबानी करून बोलु नका मी मा. महापौरांशी बोलत आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-तुम्हा लोकांना मध्ये बोलायची सवय आहे.

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-माझ्याशी बोलु नका मी मा. महापौरांशी बोलत आहे. मी तुमच्याशी बोलतच नाही.



मा. महापौरः-तुम्ही दोघेही शांत बसा.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-सन्माननिय महापौर, १७ तारखेची जी सभा स्थगित केली. मला दुस-या विषयावर बोलायचे आहे.

मा. महापौरः-सचिवांना बोलु दया नंतर तुम्ही बोला. मी त्यांना सांगितले तर तुम्ही बसा.

मा.सचिवः-नियम काय आहेत. आता आमचे सन्माननिय सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी यांनी प्रश्नोत्तरावर जी चर्चा केली. मी आपणांसर्वांना सांगतो अधिकारी असो वा सन्माननिय सदस्य असो, मा. महापौर असो, उपमहापौर असो वा आयुक्त साहेब असो यांची काही कर्तव्ये आहेत यांना काही बंधने आहेत. त्यासाठी नियमावली आहे. नियमावली प्रमाणे कोणत्त्याही सन्माननिय सदस्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. परंतु त्याच नियमावलीत असे पण म्हंटले आहे की, प्रश्नावर चर्चा करता येणार नाही. तरी पण इथे सर्व सदस्यांची भावना पाहुन मा. पिठासिन अधिकारी जे कुणी असतील ते त्यांना चर्चा करण्याची संधी देतात. त्याच नियमावलीत असे पण आहे की तुम्ही प्रश्न विचारला आणि त्याचे लेखी उत्तर तुम्हाला मिळाले तर त्याबाबत जर तुम्हाला अधिक माहिती हवी असेल व उपप्रश्न विचारायचे असतील तर ज्या अधिका-यासमोर हा प्रश्न असेल त्याच्या समोर त्याविषयी काही माहिती उपलब्ध असेल तर त्याचेवेळी त्यांनी सांगायची आहे. जर माहिती नसेल तर तुम्हाला पुढील प्रश्न विचारायचा आहे. तर पुढच्या वेळी विचारायचे उपप्रश्नाचे उत्तर जर त्यांच्याकडे नसेल तर पुढच्या वेळेस तुम्हाला लेखी दुस-यांदा प्रश्न विचारायचा आहे. व यात-हेने जर प्रत्येक सदस्य असे म्हणाला की, माझे मागील प्रश्नाचे उत्तर राहिले आहे. पुढच्या सभेत दया. पुढच्या सभेत दया तर अशाने कुठेही ही प्रक्रीया संपणार नाही. मग नियमावलीचा काय उपयोग नाही. एकदा मा. महापौरांनी आदेश दिल्यावर त्यावर पुन्हा वादविवाद होऊ शकत नाही. जर मा. महापौर म्हणाले तुम्ही बसा तुमचा प्रश्न घ्यायचा नाही तर तुम्हाला तिथेच थांबावे लागेल. हे नाही म्हणायचे की आयुक्त साहेब उत्तर देणार का दुसरे

कुणीतरी उत्तर देणार. नियमावली बंधनकारक आहे व त्यानुसार आपणांस वागायचे आहे. आपणास पहिल्या सभेत नियमावलीची पुस्तिका  या कारणामुळे पुरविण्यात आली होती की कुणी असे नाही म्हणाले पाहिजे की, अधिकाराच्या लढाईत कर्तव्य विसरले.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u>सचिव साहेब, ही नियमावली तुम्ही आधीच सांगायला पाहिजे होती. जे कारचे साहेबांनी उत्तर  दिले ते सचिव साहेबांनी दयायला पाहिजे होते. नियम असे म्हणतो की, स्थगित केलेल्या सभेत उपप्रश्न विचारू शकत नाहीत त्यासाठी उपायुक्तांना वरती बोलवायची गरज नाही. तुम्ही या सभेचे सचिव आहात. सभा चालवणे तुमचे काम आहे. ही नियमावली सर्वांना माहित आहे. तुम्ही योग्य वेळी हे सांगितले असते तर वादविवाद झाला नसता. उपायुक्तांनी उत्तर न देता सचिवांनी दयायला पाहिजे होते. ते विचारत होते सचिव उत्तर देणार का? सचिवांचे हे काम होते सांगणे की स्थगित सभेत कोणत्याही प्रश्नाचे उत्तर दिले जाणार नाही.

<u>मा. सचिव:-</u>मी तसे त्यांना आधीच उत्तर दिले होते परंतु तरीही त्यांचा आग्रह होता की, त्या संबंधित अधिकारींना येऊन उत्तर दयावे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>ठिक आहे. दुसरी गोष्ट अशी की, अधिकारींनी जास्त चर्चा होणार नाही अशा रितीने समर्पक उत्तर दिले पाहिजे. हे दोघांकडुन झाले पाहिजे.  जर लापरवाही बेजबाबदारपणी उत्तर दिले तर त्यावर चर्चा होणारच. म्हणुन त्यांनी याची काळजी घेतली पाहिजे.

--४०--

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी,

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, आता आमचे सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्यासंबधीत मागच्या सभेत आमच्या उपायुक्त आरोग्य यांनी त्यांना उत्तर दिले होते की, पुढील महासभेत आम्ही तुम्हाला या प्रश्नांची उत्तरे देवू. तरीपण सचिव साहेबांनी सांगितले की ही स्थगित सभा आहे. हि दुसरी महासभा नाही आधीचीच आहे. तरी पण ते चर्चा करू लागले. त्यानंतर ते म्हणाले सचिवांचा काही संबंध नाही त्यांना ते अधिकार नाहीत. जेव्हा ते असे बोलले तेव्हा नाईलाजाने सचिवांना उत्तर दयावे लागले. व आमच्या सन्माननिय सदस्य श्री. बोडारे म्हणाले की तुम्ही नियमावली आधी सांगायला पाहिजे होती. माझ्या मते सर्वांना नियमावली दिलेली आहे. सर्व सदस्यांनी वाचुन यायला पाहिजे. इकडे सचिवांना वांरवार नियमावली सांगायची गरज नाही. आज आमचे सन्माननिय सदस्य जे इथे प्रश्न विचारतात त्यांना माहित आहे की, उपप्रश्न.......

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>सभागृहनेता मी.....

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मी तुम्ही बोलत असताना मध्ये बोललो का? आता मला बोलु दया ना.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>तुम्ही चुकीचे बोलत आहात.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. महापौरः-</u>बोडारे साहेब तुम्ही बसा आता सभागृह नेतांना बोलु दया. त्यांनी परवानगी घेतली त्यांना बोलु दया.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>मागील सभेत सभागृह नेता बोलत होते नाला मोकळा केला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>सभागृह नेता परवानगी घेऊन बोलत आहेत तुम्हा सर्वांना बोलायची गरज काय? तुम्ही परवानगी घेतली नाही. कृपया सभागृह नेत्त्यांना बोलु दया.

<u>मा. महापौरः-</u>सर्वजण बसा. सभागृह नेता यांना बोलु दया.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>नाल्याचा जेव्हा प्रश्न होता तेव्हा तुम्ही बोलला नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मी उत्तर श्री. बोडारे साहेबांना देत आहे चिड बच्चाराम रूपचंदानी यांना येत आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>मला तुम्ही बोलत आहात.



<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मला तुम्ही बोलणे पुर्ण करू दया. हे काहीही बोलतात आम्ही काही बोलत नाही तरी. बोलु का आता. ठिक आहे. नियमावली पण आपणच तयार केली आहे ना? महापालिकेने नियमावली तयार केली आहे. नियमावली सर्व सदस्यांना माहित आहे. की उपप्रश्न विचारायचा असेल तर महासभेत विचारायचा आहे. जसे बोडारे साहेब म्हणाले त्याच्याशी मी सहमत आहे. जर कुणा सदस्यांला व्यवस्थित उत्तर मिळाले नाही तर तो चर्चा करू शकतो. ते तर सचिव साहेब पण म्हणाले इथे तशी प्रथा आहे. जर कुणी सदस्य चर्चा करू इच्छितो तर तो त्याविषयावर करू शकतो व श्री. बच्चारामजी म्हणाले की, मला समाधानकारक उत्तर मिळाले नाही. त्यावर परत चर्चा करतात मला असे तर नाही म्हणणार की हा तुमचा प्रश्न नाही आता विचारू नका. जर आपणांस उपायुक्त म्हणत आहेत की मी सर्व प्रश्नाचा खुलासा करून देईन तर तुम्ही हे सर्व दुस-या महासभेत विचारले पाहिजे. मी कुणावर टिका करत नाही किंवा कुणाला दुःख होईल असे बोलत नाही. तर मी असे म्हणतो की, जशी इथे प्रथा आहे त्याप्रमाणे आपण वागु व सभागृहात शांती ठेवाल नियमावली प्रमाणे वागाल. तर खुप बरे होईल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>सन्माननिय महापौर, हि सभा ज्या कारणासाठी स्थगित झाली त्यापैकी एक विषय महाराज यांच्या येथील नाल्याचा व दुसरा फर्निचर बाजार येथील नाल्याबाबत होता त्याचे काय झाले? सभा तर तुम्ही सुरू केली परंतु दुस-या नाल्याचे काय झाले?

मा. सचिवः-लक्षवेधीचे जे सुचक होते श्री. राज असरोंडकर व अनुमोदक होते श्री. धनंजय बोडारे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-ते नंतर साहेब, आधी ज्या कारणास्तव सभा स्थगित झाली एका नाल्याविषयी आयुक्त साहेबांनी सांगितले दुस-या नाल्याचे काय झाले. लक्षवेधी नंतर याविषयी चर्चा करा.

मा. सचिवः-लक्षवेधी नंतर त्यावर चर्चा करा.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-सभा स्थगित त्याच कारणासाठी केली होती. सभा स्थगीत दोन नाल्याच्या कारणांसाठी केली होती. सभागृह नेता पण त्यावेळी बोलले होते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-११ नंबरच्या पॅनलमध्ये तो नाला आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-लक्षवेधी विषयी नाही बोलत सभा स्थगित का केली त्या विषयी बोलत आहोत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-लक्षवेधी पण नाल्यासंबंधी आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-तो दुसरा नाला आहे. एका नाल्याविषयी बोलले फर्निचर बाजारातील नाल्याचे काय झाले? दर्शनसिंगजी तुमच्याच लोकांचा प्रश्न होता आमचा नंतर प्रश्न होता. आतो तुम्ही गप्प का आहात. आता काय नाल्याचा त्रास नाही. प्रभागात पाणी येणार नाही का?

मा. महापौरः-लक्षवेधी नंतर यावर चर्चा करू.

--४२--

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मला असे वाटते की, जी लक्षवेधी आणली गेली आहे. ती याविषयावरच आहे. मला पण फर्निचर बाजार येथे असलेल्या नाल्याविषयी बोलायचे आहे पण मला असे वाटते जी लक्षवेधी आहे ती नाल्याविषयीच आहे. ती सुरू केली की आम्ही याविषयीपण बोलु.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-दर्शनसिंगजी मी तुम्हाला आठवण करून देतो की, सभागृह नेता म्हणाले होते नाल्यांचा जेव्हा प्रश्न सुटेल तेव्हाच पुढील महासभा घेण्यात येईल. इतिवृत्तात ते आले असेल. नाल्याचा अजुन प्रश्न सुटला नाही सभा कशी सुरू करण्यात आली. त्यावेळी आपण चुकीचे बोलला होतात का?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मग असे करू नाल्याचा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत सभा स्थगित करू. मा. महापौरजी लक्षवेधी

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः- मा. महापौरजी लक्षवेधी अजुन सुरू झाली नव्हती. लक्षवेधी सुरू होण्याआधीच मागे महासभा स्थगित करण्यात आली होती. महाराज भुल्लरजी यांच्या प्रश्नावर होशियारसिंगने दुस-या नाल्याचा विषय काढला

होता. उपप्रश्न विचारला होता त्यावर ही सभा स्थगित करण्यात आली होती. लक्षवेधी तर नंतर सुरू होईल. सभा स्थगित करण्यापुर्वी सभागृह नेता म्हणाले होते की, सभा याकरिता स्थगित करत आहोत दोन्ही नाले मोकळे करण्यात येतील. नाला उघडण्यात आल्यावर सभा घेण्यात येईल. एका नाल्यावरच चर्चा झाली दुस-या नाल्यावर चर्चा झालीच नाही.

<u>मा. सदस्य श्री. दर्शनसिंग खेमाणीः-</u>मा. महापौर, लक्षवेधी सुरू करणार आहात की, मी त्या फर्निचर बाजारातील नाल्याविषयी चर्चा करू.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>सभा सुरू होण्यापुर्वी दुस-या नाल्याबाबत उत्तर दया. एका नाल्याविषयी आयुक्त साहेबांनी उत्तर दिले आहे. काय झाले सेटींग झाली का?

<u>मा. सचिवः-</u>फर्निचर बाजार येथील नाल्याविषयी आपण बोलत आहात त्यावेळी सन्मानानिय सभागृह नेता असे पण म्हणाले होते की, तो विषय न्याय प्रविष्ठ आहे. स्थगती आदेश त्यावरचे रदद झाल्यावर त्यावर पुढे कार्यवाही करण्यात येईल. उन्हाळी सुटटीमुळे १० जुन पर्यंत कोर्ट बंद आहे. त्यामुळे पुढील कार्यवाही होऊ शकत नाही. उन्हाळी सुटटी नंतर कोर्टाचे काम सुरू झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>त्यावेळी मी पण असे बोललो होतो की त्या नाल्याबाबतीत स्थगती आदेश आहेत तो ओपन करता येईल का? तेव्हाच तुम्ही सांगायला पाहिजे होते की त्यावर स्थगती आदेश आहेत.

<u>मा. सचिवः-</u>त्यावेळी सन्मानानिय सभागृह नेत्त्यांनी हे सर्व सांगितले होते त्यावर स्पष्टीकरण केले होते.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>नव्हते स्पष्टीकरण केले.



<u>मा. सचिवः-</u>केले होते. १० जुन नंतर कोर्टाचे काम सुरू होईल त्यानंतर त्यावर कार्यवाही करण्यात येईल. आता लक्षवेधीचे सुचक श्री. राज असरोंडकर यांनी आपली सुचना मांडावी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी यांनी असे म्हंटले की, जसे सभागृह नेता म्हणाले होते की जोपर्यंत नाले उघडणार नाहीत तोपर्यंत सभा स्थगित करा. त्यावेळी मी जो खुलासा केला होता तो त्यांच्या लक्षात नाही. मी असे म्हंटलो होतो की, कायदेशिर व तांत्रिक काही अडचण नसेल तर नाला उघडण्यात यावा. ते त्यांनी त्यावेळी ऐकले नाही. त्या नाल्याबाबतीत कोर्टाचा स्टे आहे. आणि ते यासाठी लांबले आहे कारण की, उन्हाळी सुटटीमुळे कोर्ट बंद आहे. महाराजांच्या नाल्याच्या प्रश्नाबाबत आपण प्रशासनाला वेळ दिली की, तुम्ही त्यावर अभ्यास करा. आयुक्त साहेबांनी स्पष्टपणे मराठीत सांगीतले आम्हाला तर पुर्ण मराठी समजत नाही. तुम्ही समजला असाल पुर्ण स्पष्टीकरण आयुक्तांनी केले. सभा स्थगित करताना मी असे पण म्हणालो होतो की, आमचे मा. सदस्य महेंद्र मुलचदांनी यांच्या काकांचे निधन झाल्यामुळे साडेपाच ते सहा पर्यंत त्यांचा तिजा होता. म्हणुन पण सभा स्थगित केली जावी. मी मागे हे पण म्हणालो शासन

प्रशासन, सत्ताधारी विपक्ष जर शहरात काही नाल्याबाबत अडचण निर्माण झाली तर सर्वजण आपण एकत्र आहोत. सर्वांचे लक्ष्य हे आहे की, कोणताही नाला चोकअप नाही झाला पाहिजे. पावसाळयात पाणी भरले नाही पाहिजे. कुठेही पुर नाही आला पाहिजे. आता आयुक्त साहेबांनी सांगितले की, आम्ही तशी काळजी घेवु १६२ कलमाखाली कार्यवाही करणार आहोत. आज दुपारीच स्थायी समितीत नाला सफाई बाबतचे निविदा काढण्याचे मंजुर करण्यात आले. त्या नाल्यावर जेसीबी व प्रोक्लेन मशिनचा वापर करून नाले साफ करण्यात येतील. आम्ही पुर येणार नाही याची काळजी घेवू. इथे अतिदक्षता विभाग असेल ती टीम इथे उपस्थित असेल, कुठूनही निरोप आला तर मदतीसाठी म्हणुन धावत जातील. पुर येवू देणार नाही. ऐवढे जर आश्वासन आयुक्त साहेब देत आहेत. तसेच ते म्हणाले की, दोन्ही नाल्याबाबत जी पण तांत्रिक किंवा कायदेशिर अडचण आहे ती दुर झाल्यावर नाल्यावरील अवैध बांधकाम तोडण्यात येईल. व जितक्या नाल्यावर उल्हासनगरमध्ये बांधकाम झाले आहे ते पण तोडण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>ते एकाच नाल्याविषयी बोलले दोन नाल्याविषयी नाही बोलले.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>तर मी आयुक्तांना विनंती करतो की, उल्हासनगर मध्ये एक किंवा दोन नाले नाही. हजारो नाले असले तरी व या नाल्यावर कुठेही अनाधिकृत बांधकाम असले तर ते त्याचवेळी तोडले जावे. ही माझी आपणांस विनंती आहे. जर कुणी शहरवासी जमिन हडप करत असेल नाल्यावर बांधकाम करत असेल. नाला ही महापालिकेची संपत्ती आहे. महानगरपालिकेचा प्लॉट आहे जर कुणी त्याला हडप करतो परंतु जर कायदेशिर अडचण असेल त्यावर एम.आर.टी.पी.ची केस किंवा खटला वा इतर काही त्रास जो त्यांना देवू शकू तो देवून व येणा-या पुरास थांबवले पाहिजे. दोन्ही नाल्यांवर प्रथम लक्ष दिले जावे. जेणेकरून आमचे जे नगरसेवक आहेत ज्यांना लोकांच्या हिताची चिंता आहे. कोणीही सदस्य स्वतःसाठी ओरडत नाही आहे तर प्रभागात किंवा विभागात पुर येऊ नये म्हणुन ते बोलत आहेत. याकडे जास्तीत जास्त लक्ष देण्यात यावे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :-</u>सन्माननिय महापौर महोदया व सन्माननिय सदनाच्या अनुमतीने मी एका लक्षवेधी सुचनेवर आपले काही विचार मांडु इच्छितो. ही जी लक्षवेधी सूचना मी आणली होती त्याचे कारण असे आहे की, पुर्ण शहरात नाल्यावर बांधकामे झाली आहेत. त्याकडे प्रशासनाचे लक्ष वेधु इच्छितो. आम्ही आता



पाहिले की, सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज यांच्या प्रश्नावर किती चर्चा झाली. इथे आता माहिती पडले की, ९७ पासुन हे प्रकरण चालु आहे. याचा अर्थ मागील पाच वर्षापासुन हे प्रकरण वारंवार विचारले गेले आहे यावर प्रशासनाने उत्तर दिले ते उत्तर गोलमाल होते. सन्माननिय सदस्यांचे यावर काही समाधान झाले नाही. व त्यांनी वारंवार हा प्रश्न पुन्हा पुन्हा विचारला. आज पाच वर्ष झाल्यानंतर पुन्हा निवडणुका झाल्या नविन बॉडी निवडुन आली. परंतु त्या मुददयावर काही मार्ग निघाला नाही. मला असे वाटते की, याचे एकच कारण आहे की, प्रशासनाची इच्छा शक्ती नाही अशा विषयांवर कार्यवाही करण्याची. किंवा या समस्येची गंभीरता ही प्रशासनांच्या अधिका-यांकडे नाही. नाल्यावर जे अतिक्रमण आहे त्याविषयी मी तीन प्रकारे वर्गीकरण करू इच्छितो. सर्वात पहिली गोष्ट अशी की, उल्हासनगरमध्ये अनाधिकृत बांधकामाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात पुर्वीपासुनच आहे यात काही शंका नाही परंतु आजच्या तारखेत लक्षवेधीच्या माध्यमाने ही समस्या याकरिता पुढे आणली आहे. कारण की, मी शहरात असे पाहिले की, नगरसेवक म्हणुन निवडुन

आल्यानंतर महापालिकेच्या परवानगीने कायदेशिर प्रोजेक्ट सुरू आहेत. त्या कायदेशिर प्रोजेक्ट मध्ये देखिल नाल्यावर बांधकामे चालु आहेत. अतिक्रमण केले जात आहे. यास तीन प्रकारे वर्गीकरण करू शकतो प्रथम हे की, हा जो कायदेशिर प्रोजेक्ट तयार होत आहे तिथे कंम्पाऊंड वॉल टाकताना जो बिल्डर आहे तो एक फुट जागा सुध्दा सोडायला तयार नाही. प्लॉटच्या पाठमागुन ज्या छोटया नाल्या वाहत आहेत त्या नाल्याच्या बाजुने एक-एक फुटाच्या ज्या भिंती आहेत. त्यांना पण बिल्डरने सोडलेले नाही. जेव्हा मी प्रभागात पहाणी करत होतो तेव्हा भाटीया चौकावर शिवलिला मार्केट नावाची इमारत तयार होत आहे अजुन पुर्ण झाली नाही त्या इमारतीत मी पाहिले की, इमारत तयार होण्यापुर्वी तेथुन जो नाला वाहत होता त्या नाल्याला महापालिकेने वळविण्याची परवानगी दिली आहे. परंतु कोणीही तिथे जावून पाहिले नाही की कशा रितीने नाला वळविण्यात आला आहे. त्यावर कोणीही सुपरव्हिजन केलेले नाही. ना कोणी सॅनिटेशन कडुन "ना हरकत दाखला" घेतला आहे. यासर्व गोष्टी कोणीही तेथे जावून तपासल्या नाहीत. यावर कुणाचेही सुपरव्हिजन झाले नाही त्याचे परिणाम आम्ही तिथे भोगत आहोत. ते डायव्हरशन चुकीचे केले आहे. विजय पॅलेस हॉटेलच्या इथुन रस्त्याखालुन जो नाला वाहत येतो तो नाला जवळ जवळ साडे सात फुटाचा आहे परंतु जेव्हा त्या भागात तो नाला शिरतो. तिथे अडीच फुटच रूंदी आहे. म्हणजे साडे सात फुटाची रूंदी आहे ती तिथे जाता जाता अडीच फुटाची होते. यावर कुणाचेही नियंत्रण नाही. एक तर डायव्हरशन चुकीचे झाले आणि बिल्डरने त्यावर बांधकाम देखिल केले आहे. मला जेवढी माहिती आहे त्या बांधकामाला कायदेशिर परवानगी नाही आहे. जेव्हा मी प्रभागात पहाणी करत होतो. तेव्हा या बाबतीत चौकशी केली असता. अतिक्रमण विभागात तेव्हा मला सांगितले गेले की, १०० टक्के तो लिगल प्रोजेक्ट आहे. यात एक इंचाचे पण वायोलेशन नाही. मी त्याचा पाठपुरावा केला असता मला टाळाटाळीची उत्तरे देण्यात आली. २६ मार्चला मी आयुक्तांना पहिले पत्र लिहिले त्यांनी ते नगररचना विभागाकडे पाठविले. त्यात मला आश्चर्यकारक उत्तर मिळाले. त्यांनी पत्र लिहिले पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंतांना व आरोग्य विभागाच्या उपायुक्तांना पत्र लिहिले व त्या पत्रात त्यांनी विचारले की, जेव्हा या प्लॉटमध्ये नाला होता. जेव्हा महापालिकेने हे काम केले होते. तेव्हा त्या प्लॉटच्या मालकाची परवानगी घेतली गेली होती का? मला समजले नाही की, महापालिकेचे प्रशासन ज्या समस्या आम्ही लोकप्रतिनिधी आणतो. त्यावर समाधान करतात की, टाळाटाळ करतात. जेव्हा मी या गोष्टीचा पाठपुरावा करत होतो. त्यावेळी शहरात कॅम्प नं. २ मध्ये फर्निचर मार्केट येथे नाल्यावर स्लॅब टाकला आहे अशी चर्चा शहरात सुरू होती. जर आपण दोन्ही प्रकरणे समोर ठेवली तर कळेल प्रशासनाने कशात-हेने याकडे लक्ष दिले आहे यावर काय कार्यवाही केली आहे? तर हे स्पष्टपणे दिसते की, प्रशासनाने यावर कार्यवाही करण्यात टाळाटाळ केली आहे. जर ऐकेका सदस्यांनी याविषयावर चर्चा केली तर खुप काही अनियमितता व इतर बाबी



चर्चेव्दारा सभागृहासमोर येतील. माझे हे लक्ष्य नाही की, भाटीया चौकावर शिवलिला नावाच्या इमारतीला टारगेट करू. किंवा मला असे नाही वाटत की, दोन नंबर येथील नाल्यावर तयार होत असणा-या स्लॅबला टारगेट करू. या अगोदर स्टेशनवर एक निकु प्लाझा नावाची इमारत उभी आहे. ती पुर्णपणे नाल्यावरच उभी आहे. तसेच १ नंबर येथे राहुल पॅलेस नावाची जी इमारत आहे ती पण नाल्यावर उभी आहे. जर आपण पुर्वीपासुन यावर उपाययोजना केल्या असत्त्या तर हे प्रकरण आज ऐवढे गंभीर नसते झाले. २ नंबर येथील नाल्याचे जर पाहिले तर त्याचा जो प्रवाह आहे. तेथुन पुढे जावून पाहिले तर महापालिकेतर्फे तिथे रस्ता बांधण्यात आला आहे. व तो रस्ता तयार करताना महापालिकेने काही खबरदारी घेतली नाही. त्या रस्त्याच्या पुढे

चौहान फर्निचर नावाची इमारत उभी आहे ती तर नाल्यावरच वसली आहे. एक-दिड वर्षापुर्वी वुडलँड नावाचे एक बांधकाम तयार झाले. ज्याचा फ्लॅटच नाल्यावर आहे. मा. सदस्य श्री. नरेंद्र राजानी यांनी मागे सभागृहात हा मुददा मांडला होता व त्यावर चर्चा पण झाली होती. योग्य ती खबरदारी यापुर्वीच जर प्रशासनाने घेतली असती तर मला नाही वाटत की आज आज हे पाऊल उचलावे लागले असते. ही एक गंभीर बाब आहे. मी याकरिता हा मुददा मांडला की ज्यावेळी शहरात अवैध बांधकाम बंद होते तेव्हा देखिल नाल्यावर अतिक्रमण करण्यात आले आहे. परंतु आज महापालिकेच्या परवानगीने जे कायदेशिर प्रोजेक्ट तयार होत आहेत. त्यावर देखिल नाल्यावर अतिक्रमण केले जात आहे ही एक गंभीर बाब आहे. सभागृहाने हे सर्व गंभीरतेने घेतले पाहिजे. याबाबतीत काहीतरी धोरण आखले पाहिजे की, या शहराचे जे मुख्य नाले आहेत त्यांचा एक तर सर्व्हे केला पाहिजे. की कशात-हेने त्याचा प्रवाह आहे. कुठे जाऊन हे प्रवाह जुळतात यावर किती अतिक्रमण झाले आहे. किती आपण अतिक्रमण हटवु शकतो. किती हटवू शकत नाही. यावर अभ्यास करून महासभेने यावर काही धोरण आखले पाहिले. यावर कसा मार्ग काढू शकतो. व प्रशासनाला कसे लाचार करू शकतो की जेणेकरून ते या समस्येचे लवकरात लवकर समाधान करतील. तर मला असे वाटते की, या सुचनेवर जी सभागृहात चर्चा होईल ती चर्चा काहीतरी मार्ग निघेल अशी असो. आणि याकरिता जोकोणी कर्मचारी अधिकारी जे जबाबदार आहेत. ज्यांच्यामुळे मी स्पष्टपणे म्हणतो की भ्रष्ट लोकांमुळे ही समस्या निर्माण झाली आहे. अशा लोकांना टारगेट केले पाहिजे. यावर कडक कार्यवाही झाली पाहिजे. या सर्व्हेबराबेरच त्यांना पण जबाबदार धरले पाहिजेत. व एक चांगला असा उपाय महासभेने दिला पाहिजे. अशी अपेक्षा मी माझ्या लक्षवेधी बाबत करतो. जय महाराष्ट्र.

<u>मा. सदस्य श्री.धनंजय बोडारेः-</u>सन्माननिय महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब आमचे सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी आताच लक्षवेधीव्दारे आपणां सर्वांचे लक्ष वेधुन ......

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>हिंदीमध्ये बोललात तर बरे होईल आम्हाला समजेल.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>नाही मी नंतर हिंदीमध्ये बोलेन. जशी आयुक्तांची समस्या आहे तशी माझी आहे. मराठीत मी व्यवस्थीत मांडु शकेन. सभागृह नेता तर समजुन जातील. त्यांना समजले म्हणजे सर्वांना समजले. नाही मला मराठीतच बोलायचे आहे. मी नंतर हिंदीत बोलतो नाहीतर सॅडविच करतो अर्धे हिंदी अर्धे मराठी बोलुन. तर श्री.राज असरोंडकरनी सर्व सभागृहाचे लक्ष वेधले आहे. मुददा महत्त्वाचा आहे. वास्तविक या प्रश्नासाठी लक्षवेधी सूचना यायला नको पाहिजे होती. परंतु याठिकाणी सभागृहामध्ये वर्षानुवर्षे एकाच प्रश्नाची चर्चा होते आमचे श्री. भुल्लर महाराज एकाच विषयावर चर्चा करतात. त्याच्यातुन मार्ग काही नाही व तांत्रिक अडचणी निर्माण



होतात. श्री. राज असरोंडकर यांनी कुठल्याही एका जागेचे किंवा एका बांधकामाचे उदाहरण दिलेले नाही. (राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सर्व महिला सदस्य सभागृहा बाहेर पडल्या) कोणा एकालाच टारगेट करण्याचा त्यांचा उददेश नाही. ज्यामुळे उल्हासनगरमध्ये जेव्हा अनाधिकृत बांधकामाचा सुळसुळाट चालला होता त्याचा परिणाम म्हणुन या उल्हासनगरची लोकसंख्या वाढली. प्लानिंग ॲथोरीटीने काही काम केले नाही त्यामुळे पाण्याची समस्या साफसफाईच्या समस्या आरोग्याशी निगडीत अशा समस्या याठिकाणी निर्माण झाल्या. याठिकाणी श्री. तिनईकर आणि श्री.

सुखथनकर यांची समिती नेमली होती त्यांनी त्यांच्या अहवालामध्ये या गोष्टी स्पष्टपणे नमुद केल्या होत्त्या की याठिकाणी नाल्यावर सुध्दा बांधकामे झालीत त्यामुळे साफसफाईचे काम व्यवस्थीत होत नाही. नाले सफाई व्यवस्थित होत नाही त्यामुळे आरोग्यास बाधा आहे. कॉलरासारखे याठिकाणी रोग होत आहेत. अशाप्रकारचे रिमार्कस् त्यांनी महापालिकेबाबतीत केले असताना आज याठिकाणी १०० टक्के लिगल बांधकाम १०० टक्के लिगल बांधकाम असे मिरवत असताना त्याठिकाणी कशा प्रकारचे बांधकाम चालले आहे ते आपणांस थोडक्यात सांगु इच्छितो वास्तविक या प्रश्नाचा पाठपुरावा आमचे सन्माननिय सदस्य श्री. मोहन गाडे यांनी १६.५.२००१ मध्ये सातत्त्याने केलेला आहे. शिट नं. ४७, यु.नं. ९९ या प्रश्नाबाबत मोहन गाडेंनी १६.५.२००१ ला एक पत्र दिले आहे. १.१०.२००० ला एक पत्र दिले आहे. ४.३.२००१ला दिले आहे. तिथल्या रहिवाशी संघटनेने ६.३. २००२ला एक पत्र दिले आहे. ९.३.२००२ ला पत्र दिले. १६.३.२००२ ला एक पत्र दिले. असा सतत पाठपुरावा करून देखिल आज त्यामध्ये आमचे टाउन प्लानर श्री. शिंदे साहेब यांनी स्पष्ट अभिप्राय दिला होता. १०.५.२००२चा एक अभिप्राय आहे. नाल्यापासुन तीन मीटर अंतर सोडणे आवश्यक होते. वास्तविक ते अंतर सोडले गेले की नाही ते पहाणे प्रशासनाचे काम होते. अतिक्रमण विभाग व नगररचना विभाग त्यांनी ते पाहिले नाही. त्यानंतर त्याच प्रकारचे बांधकाम साईट नं. १४७ बी आज याठिकाणी उल्लेख केला आहे वुडलॅड मार्केट त्याठिकाणी सुध्दा तसेच करण्यात आले. त्याठिकाणी सुध्दा हे नियम लागु होत होते. व त्याकडे दुर्लक्ष केले गेलेले आहे. प्रकरण १२चे बी.पी.एम.सी ॲक्ट कलम १५३ ते १६० संपुर्ण अधिकार दिलेले आहेत. जरी नाला त्या खाजगी प्रॉपर्टीमधुन जात असला तरी त्याठिकाणी तो नाला ॲक्वीझेशन करून ती जागा सोडायला भाग पाडणे हे त्यामध्ये नमुद असताना सुध्दा आपण ते केलेले नाही. त्यानंतर बी.पी.एम.सी ॲक्ट प्रकरण ९ चे कलम १,२,३ यात स्पष्टपणे उल्लेख आहे की, प्रशासनामध्ये आयुक्तांना महापालिकेला अधिकार आहेत की जर एखादयाच्या मालकीची जागा असेल आणि त्यामध्ये अगोदरचा नाला असेल तर तो नाला तसाच अबाधित ठेवून त्याबाबतीत त्याची जी जागा असेल त्याचा जो एफ.एस.आय. असेल तो मालकाला दयावा. त्याप्रमाणे तरतुद केली असताना सुध्दा त्यांनी उलट या फर्निचर मार्केटच्या ठिकाणी आपण नाल्यावर त्याला स्लॅब टाकण्याची मला वाटते परवानगी दिली आहे. ही संपुर्ण चुकीची आहे. स्लॅब टाकायला परवानगी देणे उलट चुकीचे आहे. नाल्यापासुन तीन मीटर अंतर सोडले पाहिजे. त्याने अंतर सोडले नाही परंतु त्याला आपण नाल्यावर स्लॅब टाकण्याची परवानगी दिली आहे. आणि त्याचा जर पहिल्यापासुन पाठपुरावा केला गेला असता तर आज हि तांत्रिक बाब म्हणुन निर्माण झाली नसती. त्याला कोर्टात जायला आम्ही संधी दिली आणि त्यामुळे आजच्या या प्रश्नावर प्रशासनाकडुन उत्तर आले की, न्यायप्रविष्ठ असल्यामुळे आम्ही काही करू शकलो नाही. म्हणजे प्रशासन अगोदर त्यालोकांना न्यायालयामध्ये जाण्यासाठी वेळ देतो. ही सांगड आहे असे वाटते परंतु नसेलही कदाचित आयुक्त त्याबाबतीत बोलतीलच. पण वर्षानुवर्ष भेडसावणा-या या ज्या समस्या आहेत त्या कुठेतरी थांबल्या पाहिजेत यामुळे उल्हासनगरमध्ये जटील समस्या अतिभयानक होतील याची कृपया सर्व सभागृहानी दखल घ्यावी. जे श्री. राज असरोंडकर यांनी याठिकाणी नमुद केले आहे तीच माझी भावना आहे. धन्यवाद.

--४७--

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब बोडारे साहेब मराठीत बोलु ना कारण तुम्ही बोलायला लागल्यावर इकडचे उठुन गेले. मी पण जर मराठीत बोललो तर सर्वच उठुन जातील.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-**कायदा मराठीत कारभार करा असे सांगतो. महाराष्ट्रात राहुन मराठी येत नाही तर काय फायदा.

**मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः-**सर्वच उठुन गेले तर बोलायचे कुणाशी? श्री. राज असरोंडकर यांनी नाल्याबाबत जी लक्षवेधी सूचना आणली आहे त्याविषयी माझे असे मत आहे की, मागच्या महानगरपालिकेच्या कालावधीमध्ये भुल्लर महाराजांनी वारंवार प्रश्न उपस्थित केला होता. वारंवार प्रश्न उपस्थित करतानाही प्रत्येक महासभेमध्ये त्यांना अधिका-यांनी टोलवाटोलवीची उत्तरे दिली होती. वारंवार प्रश्न धसास लावायचा प्रयत्न जेव्हा भुल्लर महाराज करतात तेव्हा तेच अधिकारी वारंवार टोलवाटोलवीचे प्रयत्न करतात. याचे कारण असे आहे की, या उल्हासनगर शहराबददल भुल्लर महाराजांना आस्था असेल पण अधिका-यांना कुठलीही आस्था नसेल. त्यांना जर आस्था असती, त्यांना जर या शहराबददल प्रेम असते, येथील जनतेबददल जर प्रेम असते तर त्यांनी पाच वर्षापुर्वी विचारलेला प्रश्न केव्हाच निकालात काढला असता. अधिकारी आणि जे काम करतात ते यांच्यात ऐवढे साठेलोटे असतात की ते जाणुन बूजून या नगरसेवकांना सदस्यांना अशी चुकीची उत्तरे देतात, टोलवाटोलवीची उत्तरे देतात. आणि त्यामध्ये नगरसेवकांचा वेळ घालवतात. माझी आयुक्तांना पण विनंती आहे की, कल्याण शहरामध्ये बघा, डोंबीवली शहरामध्ये बघा जेव्हा चंद्रशेखर आयुक्त होते. पन्नास-पन्नास, शंभर-शंभर वर्षापुर्वीचे बांधकाम उध्वस्त झालेले आहे. का झाले आहे? शहराच्या विकासासाठी, लोकांच्या विकासासाठी लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी. जर इथे लोकांचे प्रश्न सोडविण्याची अधिका-यांना जर इच्छाच नसेल तर हे अधिकारी आमच्या शहरातील लोकांचे काय प्रश्न सोडवणार आहेत? सुरेश वाधवाचे उदाहरण घ्या, चंदर बाबलानीचे उदाहरण घ्या, गोवर्धन गिडवानीचे उदाहरण घ्या. ही कामे काय आताच सुरू झाली का? ही कामे केव्हा पासुन सुरू झाली होती? त्यावेळचे अधिकारी काय करत होते? त्यावेळी सॅनिटरी इन्स्पेक्टर काय करत होते? सॅनिटरी विभाग काय करत होता? अतिक्रमण विभाग काय करत होते? त्यावेळी त्यांना कळले नाही की असा असा प्रश्न उदया उपस्थित होणार आहे. जाणुन बूजुन फक्त पर्टीक्युलर एका व्यक्तीच्या स्वार्थासाठी हे अधिकारी लोक काम करत आहेत. शहराच्या विकासासाठी काम करत नाहीत. शहराच्या लोकांच्या हितासाठी काम करत नाही. माझी आयुक्तांना विनंती आहे की ही जी प्रकरणे दिली आहेत. सुरेश वाधवाचे प्रकरण आहे, चंदर बाबलानीचे प्रकरण आहे. अजुन जे जे यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. यांनी जी जी उदाहरणे दिली आहेत. ती कामे ज्या दिवसापासुन चालु झाली असेल त्या दिवसापासुन आतापर्यंत जे जे अधिकारी त्याच्यात इन्व्हॉल्व होतील त्यांच्यावर पहिल्यांदा कार्यवाही झाली पाहिजे.

(राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सर्व महिला सदस्या पुन्हा सभागृहात आल्या)

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-**सन्माननिय महापौरजी, आजच्या या लक्षेवधीव्दारे मी माझ्या प्रभागातील नाल्याचा प्रश्न मांडु इच्छितो. माझ्या प्रभागामध्ये गेल्या अनेक वर्षापासुन बालानी नावाच्या इसमाच्या जागेतुन एक मोठा नाला जात आहे. त्या नाल्याला साफ करण्यासाठी आम्ही आत जेसीबी मशिन टाकत असतो, जेसीबी मशिनव्दारे साफ करत असतो. पण आता यावेळी त्यांनी जेसीबी जाण्याकरिता जे गेट होते ते गेट बंद केलेले आहे. तो नाला साफ कसा करणार हा आमच्यापुढे मोठा प्रश्न आहे. तो नाला साफ झाला नाही तर तिथल्या नागरिकांच्या घरामध्ये पुराचे पाणी शिरेल. त्याला जबाबदार कोण राहिल यावर पण आपण निर्णय दयावा. अशी विनंती करतो.

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः</u>-मा. महापौरजी, मा. सदस्य श्री. राज असरोंडकरयांनी जी लक्षवेधी सूचना आणली आहे. हा एक गंभीर विषय आहे. लोकांची सर्वात मोठी समस्या साफसफाई. तसेच पाणी व पावसाळयापुर्वी नाल्याची सफाई जेणेकरून पुर येता कामा नये. मी सभागृह नेता व सर्व सदस्यांना अनुरोध करतो की, जसे ते म्हणतात की, शहराच्या हितासाठी आम्ही सर्वजण एकत्र राहु. तसेच या विषयाबाबतही सर्वांनी एकत्र राहुन ज्याकाही नाल्याबाबत समस्या आहेत नाल्यावर स्लॅब बांधले आहेत त्यांना लवकरात लवकर हटविले जावे. व यापुढे अशाप्रकारची कोणतीही परवानगी देवू नये ज्यामुळे नाल्यावर स्लॅब बांधले जातील. मी आपले लक्ष नेहरू चौक ते गोल मैदान पर्यंत जो रस्ता जातो तेथे आकर्षित करू इच्छित आहे. दिड वर्षापुर्वी तेथे जे रस्त्याचे काम चालु होते तेथे आमच्या जिचवानी साहेबांनी एक ऑफीस बनवले होते. जे ठेकेदारस दिले होते. नाल्यावर ते कार्यालय बांधले होते. त्याआधी एक वर्षापुर्वी तेथे नेहरू चौक ते गोल मैदान पर्यंत पुर आला होता. कमीत कमी चार ते पाच फुट सर्व घरे व बॅरेकमध्ये पाणी आले होते. व त्याचवेळी आम्ही ते ऑफीस तेथुन हटविले होते. ज्यावेळी ज्योती कालानी स्थायी समितीच्या सभापती होत्या त्यावेळी त्यांनी एका व्यक्तीस झुणका भाकर केंद्र चालविण्याची परवानगी दिली होती. ते झुणका भाकर केंद्र अजुनही नाल्यावर सुरू आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः</u>-मी श्री. जमनु पुरस्वानी यांना स्पष्टीकरण देतो की, ते काम भाभी ज्योती कालानीच्या वेळी नव्हते.त्यावेळी शिवसेना व भाजपा सत्ताधारी पक्ष होता.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः</u>-झुणका भाकर केंद्र कुठेही चालु शकले असते. खुपशा जागा होत्त्या. तेथे सर्व श्रीमंत वर्ग राहतो तेथे कुणी झुणका भाकर खाणारा नाही. झुणका भाकर केंद्र झोपडपट्टी विभागात असते. आजपर्यंत तेथे एकही झुणका भाकर विकले गेले नाही. झुणका भाकर केंद्र चालविण्याची परवानगी झोपडपट्टी एरियात दिली पाहिजे आणि त्यांनी परवानगी दिली ती पण नाल्यावर. मी आता पण स्पष्ट सांगतो की, यापुर्वी तो कुमार आयलानीचा प्रभाग होता आता तो श्री. नारायण पंजाबी यांचा आहे. पावसाळयामध्ये पाच-सहा घरांमध्ये पाणी शिरेल लोकांचे नुकसान होईल असे काही होण्याआधीच तो नाला मोकळा केला पाहिजे. नाल्यावर जो स्लॅब आहे. तो काढुन टाकला पाहिजे. व झुणका भाकर केंद्र तेथुन हटविले पाहिजे. जर काही प्रशासक अडचण येत असेल नाही तर नेहरू चौक ते गोलमैदान पर्यंत जे पण क्षेत्र आहे ते पुरग्रस्त होईल. धन्यवाद जयहिंद जयमहाराष्ट्र.*

*<u>मा. महापौरः</u>-मी पाणपट्टे साहेबांना सांगते की त्यांनी याबाबतीत स्पष्टीकरण दयावे.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः</u>-नाल्यावर बांधकामाविषयी जी चर्चा चालु आहे. मला त्याबाबतीत थोडी माहिती आहे की, फर्निचर बाजार येथील नाल्यावर स्लॅब टाकला गेला आहे. तर त्या नाल्यावरील स्लॅब वर स्थगिती आदेश आहे की त्याच्या बाजुला जे बांधकाम आहे त्यावर स्थगिती आदेश आहे.*

*<u>श्री. पाणपट्टे (उपायुक्त अतिक्रमण विभाग)ः</u>-दोघांवर स्थगिती आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः</u>-दोघोवर आहे ठिक आहे. हा स्थगिती आदेश कधी पर्यंत लागु  आहे.*

<u>श्री. पाणपट्टे (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-</u>कोर्ट सुरू झाल्यावर ते निश्चित करतील.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>दोघांवर स्थगती आदेश कधी आणले आहेत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>चर्चा झाली पाहिजे हे प्रश्नोत्तरे करत आहेत.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>आमचे हे मित्र नविन आले आहेत त्यांना जर काही स्पष्टीकरण घ्यायचे असेल तर त्यांनी महापौरांकडुन घ्यावे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>तुम्हीच घ्या स्पष्टीकरण प्रश्नोत्तरे काय करता.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>तुम्ही तुम्हाला हवे ते स्पष्टीकरण घ्या मी मला जे हवे ते प्रश्न विचारतो. आणि मेहरबानी करून मध्ये बोललात नाही तर बरे होईल.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>मी तुमच्याशी नाही महापौरांशी बोलत आहे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>ठिक आहे. पाणपट्टे साहेब सांगा स्थगती आदेश कधी आणणार आहे.

<u>श्री. पाणपट्टे (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-</u>१० मे २००२ रोजी.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>दोन्ही वेगवेगळे स्थगती आदेश आहेत का कसे?

<u>श्री. पाणपट्टे (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-</u>एकाच स्थगती आदेशात दोन्हींचा समावेश आहे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>स्थगती किती तारखेपर्यंत आहे.
<u>श्री. पाणपट्टे (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-</u>१० मे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>१० मे ला स्थगती आदेश आले ते कोणत्त्या तारखेपर्यंत आहेत.

<u>मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>हा दावा २९ तारखेला दाखल केला होता त्याची पुढची तारीख होती ३० तारीख. दाव्यात स्थगिती आदेश एकतर्फी असल्याने विकासकर्त्याने आम्हाला ३० तारखेची सूचना दिली नव्हती. त्यांना दुसरी तारीख ४ मे दिली होती. आधी २९ एप्रिल तारीख होती नंतर ४ मे होती. ४ मे ला त्यांनी आम्हाला परत सुचित केले नाही. त्यांनी कोर्टाची प्रोसेस फी न भरल्यामुळे कोर्टाने आम्हाला पण सूचित केले नाही. ५ तारखेला रविवार होता याचा फायदा घेवून त्यांनी नाल्यावर स्लॅब बांधला होता. ६ तारखेला त्यांनी आम्हाला सूचित केले की याबाबत स्थगती आदेश आले आहेत. व आम्हाला तशी सूचना पण मिळाली.



१६ तारखेला त्यांनी महापालिकेतर्फे उत्तर दाखल केले की, नाल्यावर स्लॅब टाकल्यामुळे पूर्ण शहरात पुर येऊ शकतो त्यामुळे लवकरात लवकर स्थगती आदेश

हटवावेत असा आम्ही कोर्टात अर्ज केला आहे. १० जुन तारीख दिली आहे त्याआधीची तारीख मागितली असता कोर्टाने ऐकले नाही. १० जुन ही तारीख दिली.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>थोडयावेळापुर्वी तुम्ही सांगितले होते की, हे मेटर सेज्युडाइज्ड आहे. याबाबतीत जी पण कार्यवाही होईल ती १० तारखेनंतर होईल. जोपर्यंत काही कार्यवाही होवो स्टे वेकेट होवो तोपर्यंत यावर चर्चा केली जावी व महापालिकेच्या अधिकारींनी याकडे लक्ष दिले गेले पाहिजे की, या प्रकरणावर पुन्हा नविन स्थगती आदेश कोणी घेवून नाही आले पाहिजेत किंवा स्टेची मुदतवाढ दिली नाही गेली पाहिजे. दुसरी गोष्ट जेव्हा २.१०२००१रोजी नोटीस दिली होती. ती ३० दिवसाची नोटीस होती. त्यानंतर देखिल तेवढया कालावधीपर्यंत तिथे बांधकाम चालु होते. महापालिकेनी काही कार्यवाही केली नाही. आपले जे प्रशासन आहे. त्यांची झोप जेव्हा उघडली तेव्हा नाल्यावर स्लॅब टाकला गेला. हा खुप गंभीर विषय आहे खुपच चुकीचे आहे. इतके मोठे बांधकाम रस्त्याच्या बाजुने त्याला आठ मीटर सोडायचे आहे त्यांनी काही जागा सोडली नाही. नाल्याच्या बाजुने तीन मीटर सोडायचे आहे ती पण त्यांनी सोडली नाही. मागील बाजुने पण त्याला तीन मीटर सोडायचे आहे ते पण त्यांनी सोडले नाही. बाजारपेठेच्या बाजुने सोडायचे आहे ते पण त्यांनी सोडले नाही. आणि असे आहे की त्यांनी प्लीन्थ पातळी पासुन वायोलेशन सुरू केले आहे. इतके मोठे बांधकाम आहे. त्यावर सुध्दा जर आपल्या अधिकारीची नजर जात नसेल तर हे चुकीचे आहे. माझे हेच म्हणणे आहे की, नाल्यावर जो स्लॅब आहे तो तर तोडलाच जाईल. परंतु हे जे बांधकाम आहे ते पुर्णतः बेकायदेशिर आहे. व त्याने कुणाचीही पर्वा न करता हे बांधकाम केले आहे. तरी या बांधकामा व स्लॅब लवकरात लवकर त्वरीत कार्यवाही केली जावी. असे माझे आपणांस निवेदन आहे. व दुसरी गोष्ट अशी की, हे जे आठ हजार-नऊ फुटचे वायोलेशन होते व आपले क्षेत्रिय अधिकारी किंवा इतर अधिकारी त्यांना हे समजले नाही. मला असे विचारायचे आहे की, त्यांनी प्लीन्थ सर्टीफिकेट घेतले आहे की नाही. ते सांगा. तळमजला अधिक दोन तीन मजल्याची परवानगी मिळते. मग त्याला प्लीन्थ सर्टीफिकेट दिले आहे असा कसा कारभार चालतो. मी तर म्हणतो ठेकेदाराचे आपण उपकार मानले पाहिजे त्यांनी नाल्यावर स्लॅब टाकून आपले डोळे उघडले आहेत. नाहीतर त्या इमारतीवर वैध बांधकामाचा फलक लावला गेला असता. प्लीज स्पष्ट करा.
<u>श्री. शिंदे (नगररचनाकार):-</u>बरोबर आहे प्लीन्थ सर्टीफीकेट दिल्यानंतर त्यांनी बांधकाम केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>तुम्ही त्यांना प्लीन्थ सर्टीफीकेट दिले. चुकीचे आहे. प्लीन्थ लेवलपासुनच त्यांनी वायोलेशनला सुरूवात केली आहे.
<u>श्री. शिंदे (नगररचनाकार):-</u>प्लीन्थ सर्टीफिकेट दिल्यानंतरच त्यांनी अनाधिकृत बांधकामांना सुरूवात केली.
<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>ठिक आहे माझे हे म्हणणे आहे की, तुम्हाला याबाबत माहिती मिळाली आहे. आम्ही पण दिली आहे. जेव्हा स्थगती आदेश संपुष्ठात येतील त्यानंतर या दोन्ही बाबतीत तुम्ही कडक कारवाई केली पाहिजे. प्रशासनाला कोणी असे नाही समजले पाहिजे की, जसे आम्ही चालवु तसे चालेल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>मॅडम, आता श्री. दर्शनासिंग यांनी सांगितले २.११. २००१ला नोटीस दिली होती ३० दिवसाची आणि त्यावर स्थगती आदेश आले आहेत प्रशासनाने सांगितल्याप्रमाणे १० मे २००२ला की २९ एप्रिल २००२ला २.११. २००१ ते

आजपर्यंत म्हणजे ५ महिने त्यांना मिळाले. ५ महिन्यापर्यंत प्रशासनने काय कार्यवाही केली. म्हणजे प्रशासनाचे लक्ष असे होते की, तो कोर्टात कधी जातो आणि महासभेसमोर कधी सांगतो की, न्यायप्रविष्ठ आहे आम्ही काही करू शकत नाही. २.११.२००१ ला नोटीस दिली असे दर्शनसिंगनी सांगितले बरोबर ना दर्शनसिंगजी म्हणजे वायोलेशन आहे की नाही हे जाहिर झाले होते. ते पाडण्यात का नाही आले ३० दिवसाच्या नोटीस नंतर अजुन ५ महिने का लागले. आणि ५ महिन्यानंतर आता ७व्या महिन्यात उत्तर येते की, न्यायप्रविष्ठ बाब आहे. आम्ही काही कार्यवाही करू शकत नाही. हे पाच-सहा महिने कशासाठी लागले तुम्हाला? ३० दिवसाची नोटीस दिली होती अगोदर याचे उत्तर दया मग चर्चा चालु करा? २.११.२००१ला नोटीस दिली होती.

श्री. पाणपट्टे (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-मध्ये सार्वत्रिक निवडणुक असल्यामुळे पुर्ण कर्मचारी वर्ग व्यस्त होता.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-निवडणुका केव्हा संपल्या. १५ तारखेला आपली निवडणुक प्रक्रिया पुर्ण झाली.

श्री. पाणपट्टे (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-नंतर पोलीस उपलब्ध नव्हते.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-नंतर पोलिस उपलब्ध नव्हते? तसा रिपोर्ट दिला का त्यांनी तुमच्याकडे?

श्री. पाणपट्टे (उपायुक्त अतिक्रमण विभाग):- तसा रिपोर्ट वेळोवेळी दिला आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः- काय?

श्री. पाणपट्टे (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-पोलिस फोर्स वेळोवेळी मिळाला नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः- इतके दिवस तुम्हाला पोलिस संरक्षण मिळाले नाही. २.११.२००१ नंतर एक महिन्याची मुदत पुर्ण झाल्यानंतर निवडणुक प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर तुमच्याकडे एकही दिवस पोलिस बंदोबस्त नव्हता.

श्री. पाणपट्टे (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-मध्यंतरी विकासधारकांनी रिवाईज बांधकामासाठी अर्ज टाकला होता.
मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः- रिवाईज प्लान म्हणजे तुमचे लक्ष होते का याच्यापुढे तो काय करतो. रिवाईज प्लान केव्हा टाकतो. तुमच्या परवानगीने टाकले का? रिवाईज प्लान टाकतो मी हे असे असे चालले आहे. हे सर्व तुमच्या परवानगीने चालले होते का?

श्री. पाणपट्टे (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-नाही. नाही. रिवाईज प्लान साठी एक पत्र अतिक्रमण विभागाला आले होते.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः- अतिक्रमण विभागाचे काम होते की, त्यांनी नोटीस संपल्यावर लगेच डेमोलेशन करायला पाहिजे होते. नोटीस देण्यात अर्थ काय होता. त्याच्या मागचा उददेश काय होता. नोटीस काय फक्त सर्व्ह करायची?

__श्री. पाणपट्टे (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-__ तसा उद्देश काही नव्हता. एम.आर.टी. पी ॲक्ट खाली केस देखिल दाखल केली. तोडण्यासाठीच तर एफ.आय.आर. दाखल केला नोटीस दिली.

__मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-__ तुम्ही सांगता पोलिस प्रोटेक्शन नव्हते. एक दिवस देखिल पोलिस प्रोटेक्शन मिळाले नाही. १५ फेब्रुवारीला आपल्या निवडणूका संपल्या त्यानंतर २९ एप्रिल पर्यंत तुम्हाला पोलिस प्रोटेक्शन मिळाले नाही. किती दिवस नव्हते पोलिस प्रोटेक्शन? ही सर्व उत्तरे जी आहेत समर्पक नाहीत. सभागृह नेता बोला आता यावर मागच्या वेळी तुम्ही सभा स्थगित केली होती. त्याचे जर समाधान झाले असेल तर राहु दया. चार महिने पोलिस प्रोटेक्शनच मिळाले नाही. ब-याच वेळा तुम्ही इतर ठिकाणी नोटीसा पाठविल्या तेव्हा पोलिस प्रोटेक्शन मिळाले?

__श्री. पाणपट्टे (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-__ हे मोठे बांधकाम होते त्याठिकाणी पोलिस बंदोबस्त जरूरी होता. ॲक्टिव्हिटी बघुन आम्ही पोलिस फोर्स मागवतो.

__मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-__ उत्तरे याठिकाणी कशी देतात. उद्देश स्पष्ट होतो. सभागृहासमोर कळते काय चालले आहे ते.

__श्री. पाणपट्टे (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-__ उद्देश स्पष्ट आहे म्हणुन नोटीस पाठविली. बांधकाम तोडण्यासाठी तर नोटीस दिली होती. ५(४) एम. आर.टी.पी. ॲक्ट खाली आम्ही गुन्हा देखिल दाखल केला आहे. विकास दाखल्यावर डेव्हलप करणा-यावर व आर्कीटेक्टवर.

__मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-__ गुन्हा दाखल केला तर संपले का? नोटीस दिल्यानंतर बांधकाम का नाही तोडले. कारवाई का नाही करण्यात आली.

__श्री. पाणपट्टे (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-__ स्थगती आदेश संपुष्ठात येताच कार्यवाही करण्यात येईल.

__मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-__ नोटीस दिली ती नोटीस यासाठीच होती की कोर्टात जा. त्यानंतर वारंवार विचारले तुम्ही कोर्टात का नाही गेलात. नंतर तुम्ही सांगायला मोकळे ही बाब न्यायप्रविष्ठ आहे मी काही करू शकत नाही. उद्देश प्रशासनाचा किंवा संबंधित अधिकारीचा काय होता हे सभागृहासमोर मांडावे असे मला वाटले म्हणुन मी बोललो यापुढे काय कार्यवाही करायची ती तुम्ही करा.

__मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-__ म्हणतात की, वो लिडर क्या जिसके फॉलावर नहीं वो रूलिंग क्या जिसकी अपोझिशन नही. हा मुददा पुर्ण शहराचा आहे. मन मोकळे करून सर्वांनी चर्चा केली. सदनाच्या भावनांची कदर केली पाहिजे. आमचे सन्माननिय सदस्य श्री. राज असरोंडकरनी खुप चांगल्या त-हेने नाल्याच्या मुददयावर खुप व्यवस्थित चर्चा केली. बरे वाटले लक्ष पण त्याकडे जात होते. आम्ही भले महाराष्ट्रात राहतो परंतु आमच्या वेळी मराठी विषय बहुतेक नव्हता. म्हणुन आम्ही मराठी शिकलो नाही. आम्हा सदस्यांची अशी भावना असते की, तुम्ही हिंदीत बोलावे. म्हणजे आम्हाला चांगल्यात-हेने समजेल. सदनाच्या भावनेची कदर केली पाहिजे. प्रश्न राहीला नाल्याचा. नाल्यावर जितके पण बांधकाम आहे. हा एक सर्वसाधारण मुददा आहे. शहर तुमचे पण आहे आमचे पण आहे सर्वांचे आहे. नाल्यावरील बांधकाम त्याचवेळी थांबवले पाहिजे हा सर्वोत्तम उपाय आहे. अजुन एक

दुःख आहे आमचे सन्माननिय सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी माझे नाव घेवून सांगितले की,

--९३--

ज्योती कालानीच्या आदेशाने नेहरू चौकच्या मोठया नाल्यावर झुणका भाकर केंद्र उघडण्याची परवानगी दिली गेली तर माझे बंधु, ज्योती कालानीला ऐवढा अधिकार नाही. जर मी त्यावेळी स्थायी समिती सभापती असेल व जर प्रस्ताव आला असेल मला काही आठवते की, आमचे ठाणा जिल्हयाचे पालकमंत्री यांनी पण लिखित दिले होते की, या या व्यक्तीला झुणका भाकर केंद्र दिले जावे. तुम्ही पण स्थायी समितीचे सदस्य होतात आपल्या संमतीने पण झाले असते. म्हणुन मी विनंती करते की, माझा काही तिथे वैयक्तिक रस नव्हता. तुम्ही चांगले केले हा मुददा घेतला जर माझ्या म्हणण्यानुसार जर ते बांधले आहे तर मी आता विनंती करते की, आजच्या आज किंवा उदया हे बांधकाम तोडले जावे. कारण की, झुणका भाकर केंद्र योजना महाराष्ट्र शासनाने बंद केली आहे. त्याला पण एका वर्षासाठी परवानगी दिली असेल. हे म्हणतात की ज्योती कालानीच्या आदेशाने बांधले तर आता मी आदेश देते की उदयाच्या उदया तोडले जावे व नाला एकदम साफ करून मार्ग मोकळा केला जावा. तर माझी सदनाला विनंती आहे की, कुणाचेही नाव न घेता जे बोलायचे ते बोला. नाल्याबाबतीत चर्चा चालु आहे. नाल्यावर कोणतेही बांधकाम नाही झाले पाहिजे. जर असेल तर ते काढुन टाकण्यात यावे. जर कायदेशिर काही अडचण असेल तर सर्व सदनाची भावना ही आहे की, नाल्यावर जितके पण बांधकाम आहेत ते प्रयत्न करून हटविले जावेत. जेणेकरून शहरात पुर येवू नये. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>मा. महापौरजी, मी माझ्या पॅनेलतर्फे हि विंनंती करतो की, लवकरात लवकर हे झुणका भाकर केंद्र तोडले जावे. दुसरी गोष्ट ही योजना भारतीय शिवसेना जनता पार्टीच्या राज्यात होती. त्यावेळी नारायण राणे मुख्यमंत्री होते त्यावेळी ती योजना बंद झाली होती. ज्योती भाभींना माहित नाही. त्यांच्या आधी असणा-या सत्त्ताधारी पक्षाने ते मंजुर केले होते. एका वर्षासाठी परवानगी दिली होती परंतु अजुन ते केंद्र चालु आहे. त्या केंद्राखाली नाला आहे. नाल्यावरील स्लॅब पण त्यामुळे तोडायचा राहीला आहे. तिथे एक आधी कार्यालय होते. जयराज कल्याणीला देण्यात आले होते. रोड वायडिंग करताना ते कार्यालय तोडले. तर मेहरबानी करून त्याला तोडण्याचे आदेश दयावेत. जेणेकरून तिथे नाला साफ करता येईल. मेहरबानी करून महापौर साहेब तुम्ही आयुक्त साहेबांना सांगा.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः-</u>आज जी लक्षवेधी सभागृहासमोर आणली गेली आहे. त्या लक्षवेधी सूचनेव्दारे मी माझे मत सभागृहासमोर व्यक्त करू इच्छितो. उल्हासनगर शहरात खुपसे असे मोठे नाले आहेत. आणि कोणत्त्याही नाल्यावर महानगरपालिकेचे नियोजन नाही. दरवर्षी पावसाळयात आम्ही पाहिले आहे की शहराचा खुप मोठा हिस्सा पाण्यामध्ये असतो. असे कोणते वर्ष नाही की, पुर आला नाही वा नाल्याचे पाणी वस्त्त्यांमध्ये गेले नाही असे एकही वर्ष नाही. असे कोणतेही वर्ष नाही. अजुन त्याविषयावर सभागृहात चर्चा नाही झाली. नाला विकाससाठी देखिल चर्चा व्हायला पाहिजे होती. मी सभागृहास एक विंनती करू इच्छितो की, हे जे सर्व मोठे नाले आहेत या नाल्यांसाठी एक धोरण बनविले जावे, एक पॉलीसी बनविली जावी की, कोणता नाला पावसाळयात सर्वात जास्त वस्त्त्यांना त्रास देतो. त्यापासुन किती हानी होते? त्याची क्षमता काय आहे? ते पावसाचे पाणी वसाहतीमध्ये शिरले नाही पाहिजे. ज्या त-हेने शहरात विकासाची इतर कामे चालु आहेत तसेच नाल्याच्याही विकासाचे काम होणे अत्त्यंत आवश्यक आहे. मी जे बोलु इच्छितो की, हि बिकट समस्या उल्हासनगर शहराची आहे. नाला वाहणे हि काही

मामुली समस्या नाही. हा जो वालधुनी नाला आहे तो अंबरनाथ हददीपासुन ते कल्याण हददीपर्यंत या शहरातुन जातो. व हजारो घरामध्ये कारखान्यामध्ये पावसाळयात या नाल्याचे पाणी मोठया प्रमाणात जावून मालमत्तेचे नुकसान करतात. काही वषापुर्वी जिवित हानी देखिल झाली होती. ही एक बिकट समस्या या शहराची आहे.या महासभेने धोरण आखावे की एक नाला ऐवढया फुटाचा आहे. त्याची लांबी, रूंदी, इतकी असली पाहिजे.

--५४--

जेणेकरून पावसाचे पाणी योग्य त-हेने बाहेर पडेल. मा. आयुक्तांकडे मी अपेक्षा करतो की, या लक्षवेधीच्या उत्तरात त्यांनी पावसाचे पाणी नाल्यात जावून नाल्यामुळे जो शहरात पुर येतो त्याचे पण उत्तर त्यांनी दयावे ही अपेक्षा ठेवून मी माझे विचार इथेच संपवतो. जयभिम.

<u>मा. महापौरः-</u>मी आयुक्तांना सांगते की, त्यांनी लक्षवेधीचे उत्तर दयावे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>महापौर साहेब, जरा मी जे सांगितले ते तोडण्यास सांगितले तर बरे होईल.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>महापौर महोदया, श्री. राज असरोंडकर यांनी नाल्याविषयी लक्षवेधी मांडली आहे. या लक्षवेधीवर सन्माननिय सदस्य श्री. धनंजय बोडारे, श्री. टाले , श्री. चौधरी, श्री. देवेंद्रसिंग, श्रीमती. ज्योती कालानी, श्री. नाना पवार यांनी आपले विचार मांडले. मी या लक्षवेधीविषयी सर्व सदस्यांना आश्वासन देवू इच्छितो की ज्या ज्या नाल्यावर जे जे बांधकाम मग ते अनाधिकृत असो किंवा अधिकृत त्यामुळे पावसाळयात पाण्याची समस्या उपस्थित होते ते काम निष्कासित करण्याचे माझे मनोदय आहे. मी अधिकारी व सन्माननिय सदस्यांना विनंती व आव्हान करू इच्छितो की, जिथे जिथे हि समस्या उपस्थित होईल त्याठिकाणी इनस्पेक्शन करतील, सर्व्हे करतील व जिथे जिथे आवश्यक वाटेल तिथे जरूर कार्यवाही केली जाईल. परंतु सन्माननिय सदस्यांनी देखिल त्यांच्या प्रभागात अशी काही समस्या निर्माण होणार असेल ती जागा दाखवली आणि आम्हाला वाटले कार्यवाही करणे जरूरीचे आहे तर योग्य ती कार्यवाही जरूर केली जाईल. सन्माननिय सदस्यांनी लक्षवेधीच्या माध्यमानी अनाधिकृत बांधकामाविषयी काही प्रश्न विचारले. मी आपणांस सांगु इच्छितो की, जे जे कर्मचारी अधिकारी यात सामील आहेत किंवा त्यांचा सक्रिय सहभाग आहे. त्यांच्या विरूध्द काही पुरवा असेल तर त्याविरूध्द कार्यवाही झाली पाहिजे. हे जे नाल्यावर बांधकाम आहे. अनाधिकृत बांधकाम आहे. मी सर्व अशा बांधकामांवर कार्यवाही करू इच्छितो. फक्त तुमचे सहकार्य हवे. नंतर असे नाही झाले पाहिजे की, सहयोगच मिळणार नाही. हि चांगली गोष्ट आहे की,खुपशा सदस्यांनी असे आश्वासन दिले आहे की, नाल्यामुळे जी अडचण येणार आहे त्याबाबतीत सर्वांनी स्वतः सहयोग देण्याचे आश्वासन दिले आहे. मी थोडक्यात तुम्हाला आश्वासन देतो की, नाल्यांवर जे बांधकाम आहे वा जे अनाधिकृत बांधकाम आहे. त्यावर कार्यवाही केली जाईल. व आगामी पावसाळयात उल्हासनगर नगरवासियांना काही पण अडचण येता कामा नये. असे पुर्ण त-हेने प्रयत्न प्रशासनातर्फे केले जातील. सन्माननिय उपमहापौरांचे म्हणणे आहे की, झुणका भाकर केंद्राविषयी उत्तर दिले जावे. आता आमच्या उपायुक्त मुख्यालय यांनी सांगितले हे जे झुणका भाकर केंद्र आहे हे काही वर्षापुर्वी असलेल्या सरकारच्या कारकीर्दीत सुरू होते. त्याचे अनुदान शासनातर्फे मिळाले आहे. महानगरपालिकेने फक्त त्यांना ना हरकत दाखला दिल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या निधीने ते केंद्र उभारण्यात आले आहे यात महापालिकेचा काही निधी नाही. आता माझ्या माहिती प्रमाणे झुणका भाकर केंद्र ही योजना बंद झाली आहे. मला असे

सांगण्यात आले आहे की, जी झुणका भाकर केंद्रे बंद पडली आहेत त्याबाबतीत शासनाने असे निर्देश दिले आहेत. त्या झुणका भाकर केंद्राचा उपयोग तलाठी कार्यालय किंवा कोणते सार्वजनिक कार्यालय शासनासाठी उघडण्यात यावे. परंतु हे झुणका भाकर केंद्र ज्यामुळे प्रशासन व सभागृहाजा वाटते की त्यामुळे पावसाळयात काही अडचण येत आहे. हा मुददा लक्षात घेऊन ते झुणका भाकर केंद्र बी.पी.एम.सी. ॲक्ट मध्ये जी तरतुद आहेत त्यानुसार कार्यवाही केली जाईल.

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

--५५--

विषयः- मागील सभेचे दि. २६.४.२००२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा.सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>मागील सभेच्यावेळी पत्रकार वर्ग उपोषणाला बसले होते तेव्हा त्यांची ही पण मागणी होती की, इथे जनसंपर्क अधिकारी नियुक्त केला जावा. अजुन त्यांची ती मागणी पुर्ण झाली नाही. असे वाटते की, जे आपण सभेत बोलतो त्यावर अंमलबजावणी केली जात नाही. एक महिना होऊन गेला तरी त्यावर काही कार्यवाही झाली नाही. यावर जरा स्पष्टीकरण दयावे.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्यांनी जनसंपर्क अधिकारी नियुक्ती विषयी प्रश्न विचारला आहे. आपण सर्व सदस्यांना हे माहित आहे की, महाराष्ट्र शासनाने सर्व भरती वर ज्यात सफाई कामगारांचा समावेश आहे. त्यात अनुकंपा व वारसा पध्दतीने हे पण सामील आहे. यासर्व नियुक्त्यांवर त्यांनी निर्बंध लावले आहेत. मी जेव्हा या महानगरपालिकेचा पदभार सांभाळला त्यावेळीच मला असे वाटले की, उल्हासनगर शहरात पत्रकार बंधुची संख्या खुप वाढली आहे. समस्या वाढल्या आहेत व या समस्येचे निवारण सर्व नागरिकांसमोर स्पष्टपणे जात नाही. त्याचवेळी मी ठरविले की, एक जनसंपर्क अधिकारी यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने मी सुरूवात पण केली होती. परंतु महाराष्ट्र शासनाने यासंबंधी निर्बंध टाकलेत आणि त्याचा पुर्नविचार किंवा पुन्हा पुन्हा आदेश देवून सर्व महानगरपालिकेंचे लक्ष वेधले आहे की, महापालिकेत कुठलीहि नियुक्ती करताना शासनाची मंजुरी आवश्यक आहे. अन्यथा मी तर जनसंपर्क अधिकारी नियुक्त करण्याच्या समर्थन देतो. आणि विशेष करून उल्हासनगरमध्ये तर त्याची जास्त गरज आहे. आम्ही प्रयत्न करत आहोत की, शासनाने हे निर्बंध काढुन टाकावे. ते निर्बंध काढल्यानंतर पी. आर. ओ ची नियुक्ती केली जाईल. पत्रकार बंधुना एक कक्ष दयायचा आहे तो कक्ष जनसंपर्क अधिकारीची नियुक्ती झाल्यानंतर देण्यात येईल. कारण त्यांची जी व्यवस्था बघायची आहे ती जनसंपर्क अधिकारींना बघायची आहे. मी वैयक्तिक पणे शासनाकडे जेव्हा मंत्रालयात जाईन तेव्हा परवानगी घेण्याचा प्रयत्न करू नये. परवानगी मिळताच जनसंपर्क अधिकारींची नियुक्ती केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>सचिव साहेब, विशेष समितीच्या नियुक्ती बाबत सन्माननिय सदस्य श्री. प्रमोद टाले यांनी प्रस्तावाच्या बाजुने मतदान केले होते की, विरोधात.

<u>मा. सचिवः-</u>प्रस्तावाच्या बाजुने मतदान केले होते.

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी:-</u>त्यांचे तर म्हणणे आहे की, माझी तटस्थ भुमिका होती.*

*<u>मा. सचिव:-</u>असे त्यांनी त्यावेळी नव्हते सांगितले.*

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>प्रभाग समितीचा जो विषय होता त्यात मी प्रस्तावाच्या बाजुने मतदान केले.*

*<u>मा. सचिव:-</u>आणि विषय समिती विषयी....*

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>मी तटस्थ बोलतो.*

*--५६--*

*<u>मा. सचिव:-</u>म्हणजे तुमचे नाव कमी केले जावे.*

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>होय.*

*<u>मा. सचिव:-</u>ठिक आहे. पास?*

*<u>काही. सदस्य:-</u>पास. पास.*

*<u>मा. महापौर:-</u>सदरचे इतिवृत्त वरील सुधारणेसह सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

*<u>मा. सचिव::-</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.*

*विषय:- श्री. जेठानंद शर्मा व श्री. शंकर मालवणकर या महापालिकेच्या कर्मचा-यांविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे तरतुदी अनुसार खटला भरणेस मंजूरी देणे बाबत.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>मंजुरी देण्याआधी हे पहा. याच्याशी संबंधित विषय नवाकाळ या वर्तमानपत्रात छापुन आले आहे. सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकाने दिले आहे की, महापालिका उपायुक्त, बीट मुकादम यांची मागणी खुप वाढत आहे. तसेच प्रभाग समितीचे सभापती व विशेष समितीचे सभापती हे लोकांना ब्लॅकमेल करत आहेत. आजच्या नवाकाळ वर्तमानपत्रात हि बातमी आली आहे. जर त्यांच्या नावाचा खुलासा झाला तर बरे होईल. पुढच्या महासभेत त्यांच्यावर कार्यवाही करण्याची परवानगी देता येईल.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>महापौर साहेब, मी याविषयी बोलु इच्छितो की जेव्हा एखादा सदस्य वर्तमानपत्र सभागृहात आणतो तेव्हा सांगितले जाते की,....*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>सत्ताधारी पक्षाचे सभापती दमदाटी करतात. त्यांनी उपायुक्तांवर आरोप लावला आहे की ब्लॅकमेल करतात.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>बाहेर कुणाकुणावर काय काय आरोप केले जातात हे तुम्ही नीट ऐकत नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>ही नगरसेवकांची बदनामी आहे शहराची नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>वर्तमानपत्र सभागृहात आणणे एकदम चुकीचे आहे. असे म्हंटले जाते.*
*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>कोण म्हणते सांगा असे सचिव साहेब तुम्ही सांगा. सभागृहात जो विषय आहे......*
*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मग आम्ही पण वर्तमानपत्र सभागृहात आणु. तुमच्या विरूध्द वर्तमानपत्रात येते ते पण दाखवु.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>आणा आणा.*

--५७--

*<u>मा. सदस्य श्री. दर्शनसिंग खेमाणीः-</u>वर्तमानपत्रे आणणे जर मंजुर असेल तर आम्ही पण आणु.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>आणा. आणा. आम्ही पण पेपराची कटींग आणली आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. दर्शनसिंग खेमाणीः-</u>आपण पेपरची कटींग आणली आहे,मी तर पुर्ण पेपरच आणला आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः</u>-मग वाचा यात स्पष्ट लिहिले आहे की प्रभाग समिती, विषेश समिती यांचे सभापती ब्लॅकमेल करतात. सभापती तुमचेच आहेत . ही शहराची बदनामी आहे. कोण आहेत असे सभापती त्त्यांची नावे तर समोर आली पाहिजेत. ब्लॅकमेलर आहेत म्हणून आणि सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकानेच आरोप लावला आहे.*

*<u>मा. महापौरः</u>-सचिव साहेब उत्त्तर देत आहे, आपण सर्व बसा.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः</u>-सचिव साहेब सांगा, वर्तमानपत्र आणण्याची परवानगी आहे की नाही ते सांगा.*

*<u>मा. सदस्य दर्शनसिंग खेमानीः</u>-यांनी तर वर्तमानपत्राची कटिंग सांगितली आहे. मी तर पुर्ण वर्तमानपत्र आणले आहे. जेव्हा एखादे अवैद्य बांधकाम होते, ते तोडायला जातात तेव्हा काही लोक येऊन अधिकारीला दमदाटी करतात. मी सभापती आहेत मी माझ्या कार्यकालात कधीही कुणा अधिकारी व कर्मचारीला दमदाटी केली नाही. हे आपल्याला शोभत देखील नाही. अवैद्य बांधकाम आहे ते चुकीचे आहे की बरोबर? हा भाग वेगळा. परंतु कुणा अधिकारी व कर्मचारीला दमदाटी देणे हे योग्य नाही, कमीत कमी ते मला तरी सहन होत नाही.*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद चौधरीः</u>-हिम्मत आहे तर वर्तमानपत्र दया आम्ही आयुक्तांकडे दिले आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः</u>-दर्शनसिंगजी , तुमची इच्छा आम्हाला समजली , तुमचे म्हणणे बरोबर आहे.*

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.महापौरः-तुम्ही सर्वजण बसा, सचिव साहेब उत्तर देत आहे.

मा. सदस्य श्री दर्शनसिंग खेमानीः-मा. महापौर मी काय म्हणत आहे, हे समजून घ्या. अवैद्य निर्माण हे चुकीचे आहे की बरोबर, ते उचित आहे की अनुचित....

मा.सदस्य श्री. धनंजय बोडारेः-ते मागच्या वेळेस जे चुकीचे होते ते या आठवडयात बरोबर कसे?

मा. महापौरः-तुम्ही तिघेजण बसा ,सचिव साहेब उत्तर देत आहे.

मा. सदस्य श्री. दर्शनसिंग खेमाणीः-माझे म्हणणे समजून घ्या. बोडारे जी मी तूम्हाला निवेदन करतो. एखादे अवैद्य बांधकाम अनुचित आहे की उचित आहे. हि



गोष्ट बाजूला ठेऊन , देअर शुड बी प्रॉपर वे. प्रेझेंटिंग युअर केस. असे झाले पाहिजे, अधिकारीला दमदाटी दिली असे नाही झाले पाहिजे. वर्तमानपत्रात आले हे वर्तमानपत्रानी आणले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-मा. महापौरजी, आजच्या विषयाशी हे संब्रंधित आहे. सभागृह नेता तुम्ही सांगा....

मा. महापौरः-महाराजजी तुम्ही बसा. सचिव साहेब उत्तर देतील.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-मा. महापौर, मला विषय क्र. ३ वर बोलायचे आहे.

मा. सचिवः-कोणत्त्याही वर्तमानपत्रात आलेली बातमी सभागृहात आणुन विषय म्हणुन तो घेता येत नाही. जर सन्माननिय सदस्याचे म्हणणे आहे की, कुणावर आरोप आहे तर त्याचे खंडन करणे पण चुकीचे नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-आरोप चुकीचा आहे म्हणुन त्याचे खंडन करा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-महाराजजी तुम्ही ऐकले नाही. सचिव साहेबांनी सांगितले की वर्तमानपत्र आणणे चुकीचे आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-हा आरोप आहे त्याचे खंडन तर करा. याचा अर्थ आपल्या प्रभाग समितीचे सभापती ब्लॅकमेलर आहेत. याचा अर्थ हा होतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः- तुम्ही जे मुददे उठवतात त्याच्यातपण सेटिंग आहे.

मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-याचा अर्थ तुम्ही मान्य करता की तुम्ही सेटिंग करता?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-तुम्ही जे मुददे उठवता त्यात पण सेटिंग असते.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चव्हाण**:-तुमचेच सदस्य तुम्हाला ब्लॅकमेलर म्हणाले.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर**:-तुमचेच सदस्य तुमच्या सभापतींना ब्लॅकमेलर म्हणाले.

**मा.सदस्य श्री. शांताराम निकम**:-मा. महापौर, मला विषय क्र. ३ वर बोलायचे आहे. विषय क्रमांक ३ प्रशासनातर्फे आला आहे. महाराष्ट्र शासन प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. सीडीआर/१०९९ /प्र.क्र. ६७/ ९९ /११ अ, मंत्रालय , मुंबई-३२ , दिनांक ३ एप्रिल, २००० नुसार एक जिआर आहे शासनाचा निर्णय झाला आहे. आणि त्या निर्णयानुसार हा जो खटला दाखल करण्यासंबंधी जो निर्णय दिला आहे. शासन निर्णय असा झाला आहे, महाराष्ट्र प्रतिबंध अधिनियम १९८८ अंतर्गत लोकसेवका विरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यासाठी , मंजूरी प्राप्त करण्यासाठी लाचलूचपत प्रतिबंध खात्त्याकडुन प्राप्त प्रकरणी खालील विहित केलेल्या पध्दती अवलंबण्यात यावी अशा प्रकारचा शासन निर्णय आहे. आणि त्यामध्ये एकूण सात मुददे दिले आहेत. सात मुदयापैकी चौथा मुददा याठिकाणी मला घ्यायचा आहे. चौथा मुददयातील अ मध्ये असे म्हटले आहे. न्यायालयीन अभियोग दाखल करण्याचे



प्रकरणी प्रशासकिय विभागाने सक्षम प्राधिकारी म्हणून निर्णय घेतांना शासनाची मंजूरी घेणे अभिप्रेत आहे. गृह विभागाकडुन प्रशासकिय विभागात प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधित विभागाने स्वतंत्रपणे विस्तृत छाननी करुन अभियोग दाखल करण्यास मंजुरी दयावयाची किंवा नाही याबाबत विधी परामर्शाचा सल्ला घेवून निर्णय घ्यावा. त्यानंतर संबंधित विभागाने ज्याचे वेतन १० ,६५०/-रू पेक्षा कमी आहे त्यांच्या बाबतीत प्रभारी मंत्रीमहोदयां मार्फत मा. उपमुख्यमंत्री यांची मान्यता घ्यावी. असे या निर्णयात म्हंटले आहे. तर माझा मुददा असा आहे की, मालवणकर आणि जेठानंद शर्मा यांची वेतनश्रेणी ही १० ,६५०/-रू च्या आत असावी. जर त्यांची वेतनश्रेणी १० ,६५०/-च्या आत असेल तर मा. उपमुख्यमंत्री यांच्याकडुन त्यांच्यावर खटला दाखल करण्यासाठी परवानगी घेण्यात आली आहे काय? त्याच निर्णयामध्ये पुढे पाचव्या मुददयात असे म्हंटले आहे प्रस्तावावरील कार्यवाहीचे वेळापत्रक त्यामध्ये दिले आहे. त्यात म्हंटले आहे लाचलुचपत प्रतिबंधक खात्त्याकडुन लाचेचा सापळा किंवा आपसंपत्तीच्या बहुतांशी प्रकरणी करावयाच्या तपासणीच्या दरम्यान फार मोठा कालावधी विचारात घेतला जातो. कागदपत्रे व तपशिल क्लिष्ट व मोठे असते याबाबी विचारात घेता सक्षम प्राधिका-याने प्रकरण तपासताना लक्षपुर्वक तपासणी केली किंवा नाही असा संशय घेण्यास न्यायालयास वाव मिळु नये यादृष्टीने छाननीच्या टप्यावर पुरेसा कालावधी मिळणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने पुढील वेळापत्रक त्यांनी त्याठिकाणी दिले आहे. वेळापत्रकात क्र. १ मध्ये असे म्हंटले आहे. लाचलुचपत प्रतिबंधक खात्त्याने सापळा प्रकरणी घटना घडल्यानंतर तीन महिन्याच्या आत तपासाचा अंतिम अहवाल अभियोग प्रस्ताव संबंधितांकडे सादर करावा. सबंधितांकडे म्हणजे महापालिकेकडे किंवा इतर अन्य प्रकरणी एका वर्षाच्या कालावधीमध्ये अहवाल दयावा. मालवणकर यांना दि. ३.७.२००१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक अधिकारी यांनी सापळा रचुन रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडले आहे. त्यानंतर लाचलुचपत खात्त्याने २.१०.२००१ रोजी पर्यंत म्हणजे तीन महिन्याच्या आत ते तपासाचा अंतिम अहवाल अभियोग प्रस्ताव संबंधितांकडे दाखल करावयास हवा होता परंतु तशी मागणी त्यांनी पत्र क्र. सीशा /२३०/ठाणे/२०१ /६४८ दिनांक १९.१. २००२ अन्वये महापालिकेकडे दिले आहे. त्यांनी केलेली मागणी हि तब्बल सहा महिने सोळा दिवसांनी केली आहे. त्यांनी ३ महिन्याच्या आत मागणी करावयास हवी होती. परंतु मागणी करताना त्यांनी सहा महिने सोळा दिवस लावले आहेत आणि त्यास प्रशासनाने सदर प्रस्ताव महापालिकेच्या मंजुरीस आणण्यासाठी आणखी तीन महिने

आणि २८ दिवस अधिक घेतलेले आहे. म्हणजे  चार महिने अधिक लागले आहेत. तसे पाहिले तर सदर प्रस्ताव तीन महिन्यामध्ये महासभेमध्ये यायला पाहिजे होता. परंतु त्याला यायला जवळ जवळ दहा महिने लागले आहेत. आजची जी १७ तारखेची सभा होती. ती स्थगित करून पुढे आणली आहे. १७ तारखेच्या महासभेत अगोदर आणि १९.१.२००२च्या अगोदर जवळ जवळ पाच महासभा झाल्या आहेत. या पाच महासभांमध्ये हा प्रस्ताव आपल्याला आणता आला असता परंतु असा प्रस्ताव आणण्यास शासनाकडुन किंवा प्रशासनाकडुन दिरंगाई झालेली आहे असा माझा याठिकाणी आक्षेप आहे. मुददा क्र. ५ मधुन शासनाचा जो निर्णय आहे अ मध्ये आणखी पुढे असे म्हंटले आहे की, लाचेचा सापळा प्रकरणी खटला दाखल करण्यासाठी जास्तीत जास्त कालावधी हा सहा महिन्यापेक्षा जास्त नसावा. सहा महिन्याच आत आपल्याला लाचेच्या सापळा प्रकरणी अभियोग दाखल करता येवू शकतो. लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयाने अगोदरच मुळात सहा महिने उलटुन गेल्यानंतर तब्बल सोळा दिवसांनी केली आहे. सहा महिन्यानंतर सोळा दिवसांनंतर मागणी केली आहे. व सदर प्रस्ताव त्यांच्या मागणी नंतरही तीन महिने २८ दिवसांनी महासभेमध्ये येत आहे. त्यामुळे सदर मागणी हि कालबाहय झालेली असुन शासनाचा शासन निर्णय क्र. सीडीआर १०९९ /प्र.क्र. ६२ / ९९/११ अ मुंबई ३२ दि. ३ एप्रिल २००२ नुसार हा शिस्तभंग आहे. त्यामुळे सभेने हि मागणी स्विकारणे किंवा मान्य करणे म्हणजे हे बरोबर नाही असे मला वाटते. त्याचप्रमाणे सदर शासन निर्णयात मुददा पाच प्रमाणे शेवटी असे म्हंटले आहे की वर



नमुद केलेल्या विहित कालमर्यादेत सक्षम प्राधिका-याने कोणताही निर्णय घेतला नाही तर त्याप्रकरणात अपचार्याचे निलंबन विहित केलेला कालावधी संपल्यानंतर लगेच त्याच्या दुस-या दिवशी संपुष्टात आले असे समजावे. तसेच निलंबन समर्थनिय नसेल अशाप्रकरणी निलंबनाचा कालावधी देखिल कर्तव्यकाल म्हणुन गणन्यात यावा. या प्रकारचे आदेश र्निगमित होण्यास प्रशासकीय विलंब झाला तर ते आदेश विहीत कालावधी संपल्याच्या दुस-या दिवसापासुन अंमलात आणण्याचे गृहीत धरण्यांत येईल असे निलंबन संपुष्टात आणण्याचे आदेशात स्पष्ट लिहिलेले असावे. मात्र अशा विलंबनात जबाबदार असणारा अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी. तरी महोदय सदर प्रस्ताव महासभेत आणण्यास खुपच उशिर झाला असल्याने न्यायालयात खटला दाखल करण्यात आपणांस अडचण येऊ शकते कारण असे प्रकरण मोहमद अली अफरोत याला ज्यावेळी पकडण्यात आले जो पाकीस्तानचा अतिरेकी होता. पकडण्यात आल्यानंतर सहा महिन्यानंतर खटला दाखल करण्यांत आला तर शासनाचे म्हणणे कोर्टाने मानुन घेतले नाही. शासनाची त्याठिकाणी नाचक्की झालेली आहे. अशा प्रकारची नाचक्की आपल्या महापालिकेची होवू नये. कोर्टाने हा जो खटला आहे. हा अमान्य करू नये. म्हणुन हा वेळीच याठिकाणी दाखल करू नये असे माझे म्हणणे आहे. त्याचबरोबर लाचेच्या सापळा प्रकरणी एसीपी कडुन अहवाल प्राप्त झाल्यानंतर अपचारी अधिकारी किवा कर्मचारी यांना निलंबित करण्यासाठी कार्यवाही सक्षम प्राधिका-यांनी करावी. अशाप्रकारचे त्यामध्ये पुन्हा म्हंटले आहे. सदर घटना ३.७.२००१ रोजी सायंकाळी ७.५५ मिनिटांनी कार्यालयिन वेळेनंतर झाली आहे. त्यानंतर लगेचच दोन दिवसांनी शंकर मालवणकर व जेठनंद शर्मा यांना २४ तासाच्या आत, ४८ तासाच्या आत निलंबित करण्यात आले आहे. परंतु अशीच घटना उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये सध्या झालेली आहे. आणि हि घटना ३.२.२००२ रोजी पालिकेमध्ये लाचेचा सापळा प्रकरणी झाली आहे त्यामध्ये कुमारी भाटीया आणि साळुंके या दोघांवर सुध्दा त्यांना इथे नगरपालिकेमध्ये पकडण्यात आले होते. त्यांच्यावर गुन्हा सुध्दा लादलेला आहे. परंतु...

.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-सन्माननिय सदस्यांना निवेदन आहे आम्ही खुप वेळेपासुन ऐकत आहोत पण आम्हाला समजत नाही तरी मेहरबानी करून भले थोडे मराठीत बोला नंतर हिंदीत समजवा. प्लीज.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-शासन निर्णय सर्व मराठीतच आहेत त्यामुळे मला मराठीतच बोलावे लागेल. हिंदीमध्ये बोललो तर गोंधळ होण्याची शक्यता आहे. आणि आता फक्त दोनच मिनिटे मी घेणार आहे.

मा. महापौरः-मी आता काय बोलु. मला तर मराठी येतच नाही. मी तर आधीच बोलले होते की हिंदीत बोला.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-शासनाचे निर्णय जर मराठीत आहेत तर मी काय करणार?

मा. महापौरः-भाभीला समजत नाही.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-मी फक्त शासन निर्णय वाचुन दाखवतो दुसरे तर काही नाही. महानगरपालिकेचा जो ठराव झाला आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-सचिव साहेबांनी सांगावे मा. सदस्यांनी काय सांगितले किंवा संबंधित अधिका-यांनी सांगावे.



मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-महापौर साहेब, महापालिकेचा एक ठराव झाला आहे. मराठी येत असेल तर मराठी बोलायचे आणि नंतर हिंदीमध्ये. जर मराठीत जमत नसेल तर हिंदीत बोलायचे अशा प्रकारचा महापालिकेत ठराव झालेला असताना मराठी बोलण्यास का हरकत घेतली जाते हे मला समजत नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मराठी समजत नाही.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-तुम्ही मग इतिवृत्तात पहा ना.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-मला वाटते आमचे सदस्य हे मराठी शाळेत शिक्षक आहेत. म्हणुन हिंदी अजिबात बोलत नाहीत.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-काही हिंदीत काही मराठीत बोलेन. तर शंकर मालवणकर यांना ४८ तासाच्या आत त्यांना निलंबित केले होते. परंतु राणी भाटीया आणि साळुंखे यांना अजुन तीन महिने झाले तरी निलंबित केले नाही. माझ्या म्हणण्याचा अर्थ आहे एकाला वेगळा न्याय दुस-याला वेगळा न्याय असे या महापालिकेत आहे का? आणि याचत-हेचे जे निलंबनाचे मुददे आहेत शेजारच्या महापालिकेत पण अशा घटना घडल्या आहेत. बदलापुर नगरपालिकेत, कल्याण महापालिकेत. सहा महिन्याच्या आत त्यांना परत कामावर घेतले गेले तर माझे म्हणणे आहे शंकर मालवणकर यांचा हा प्रस्ताव आपण पारीत केला तर न्यायालयाकडुन आपल्याला अडचण येण्याची शक्यता आहे म्हणुन मी सर्वांना विनंती करतो की हा प्रस्ताव पारीत न करता शंकर मालवणकर व जेठनंद शर्मा यांना

सहा महिने झाल्यानंतर कामावर परत घ्यायला पाहिजे होते अशी मी येथे विनंती करून मी माझे बोलणे संपवतो.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>मा. महापौरजी, उपमहापौर, आयुक्त साहेब, सर्व संबंधित नगरसेवक शंकर मालवणकर आणि जेठानंद शर्मा यांच्या लाचलुचपत संबंधि मंजुरीचा जो प्रस्ताव आला आहे. असे प्रस्ताव ब-याचदा ब-याचशा अधिकारीबाबतीत आले होते त्यावेळेस आपण काही ठिकाणी मंजुरी दिलेली आहे, काही ठिकाणी मंजुरी दिलेली पण नसेल. परंतु माझे म्हणणे असे आहे की, महानगरपालिका जेव्हा मंजुरीसाठी प्रस्ताव महासभेमध्ये पाठवते त्यावेळेस त्या मंजुरीचा जो कालावधी असतो तो महानगरपालिकेने पाळला पाहिजे. महानगरपालिकेमध्ये जर सहा महिन्याचा आतमध्ये मंजुरीचा प्रस्ताव पाठवला जात असेल तर तो बहुमताने किंवा सर्वसंमतीने कसेही तो पास करण्यास काही हरकत नाही. परंतु जर आपणच महानगरपालिका यामध्ये चुकली असेल तर तांत्रिक बाबतीत काही चुकली असेल तर मला वाटते तो मंजुरीसाठी का पाठवला गेला नाही. सहा महिने अगोदर का पाठवला जात नाही. याचे पण उत्तर अधिका-यांनी दिले पाहिजे. जर आपण चुकला असाल तर हा प्रस्ताव मंजुर न करता त्याला तावडतोब कामावर घ्यावे ऐवढी मी विनंती करतो.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>सन्माननिय महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब व सदनातील सर्व सदस्य, सचिव साहेब हा जो विषय आहे तो निलंबनाचा विषय नाही. हे मी आपणाला स्पष्ट करू इच्छितो. हा फौजदारी गुन्हा आहे. लाचलुचपत प्रतिबंधक कायदयान्वये हा गुन्हा आहे. अशा गुन्हा करणा-यास आपण संरक्षण देवू शकत नाही. दुसरी गोष्ट अशी की, जेव्हा अपराध घडला त्याचवेळी त्यांना निलंबित केले. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमानुसार कुणालाही निलंबित केल्यास सहा महिन्याच्या आत महासभेपुढे निलंबन कायम करण्यासाठी प्रस्ताव



आणायचा आहे. या सहा महिन्याच्या आत कनफरमेशन महासभेत दिले गेले आहे. निलंबनाचा विषय आज नाही. नियुक्त प्राधिकारी म्हणुन ॲन्टी करप्शन ॲक्ट १९८८ सेक्शन १९ मध्ये जी तरतुद आहे त्यामध्ये नियुक्त प्राधिकारी आहे त्याला पोलीस केस आहे. चार्जशिट जी त्यांनी तयार केली आहे ती न्यायालयात खटला चालविण्यासाठी आम्हाला परवानगी दयावी लागते नियुक्ती प्राधिकारी म्हणुन. महापालिकेचा जितका पण कर्मचारी वर्ग आहे त्यांचे नियुक्त प्राधिकारी ही महासभा आहे. व महासभेत न्यायालयात खटला चालविण्यासाठी परवानगी दयायची आहे. म्हणुन हा विषय तुमच्यासमोर आला आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>त्याचा कालावधी असेल की नाही? तुमचे दोन विषय आहेत इथे एक लाचलुचपतसाठी दुसरा निलंबनासाठी.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>ॲन्टी करप्शन १९८८ ॲक्ट मध्ये तसा काही कॉलम नाही. यांनी जे शासन परिपत्रक वाचले आहे ती साधारण मार्गदर्शन लाईन आहे. त्या गाईड लाइन्स गर्व्हनमेंट सर्व्हेन्ट साठी आहेत. मुंबई प्रांतिक अधिनियमान्वये आपल्या नियुक्त्या होतात आणि ॲन्टी करप्शन ॲक्ट १९८८ मध्ये त्यात असा कोणताही कालावधी नमुद केला नाही. परिपत्रकापेक्षा कायदा श्रेष्ठ आहे म्हणुन मंजुरी दयावी लागेल.

**<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>**वर्ष दोन वर्ष किती वर्ष जावू शकतील त्याला. तुम्ही लाचलुचपतसाठी परवानगी मागता फौजदारी गुन्यासाठी. त्याला काही ठराविक वेळ असेल की नाही. महिन्यात दयायचे, दोन महिन्यात दयायचे, वर्षात दयायचे की दोन वर्षात दयायचे की चार वर्षात दयायचे की दयायचेच नाही. बी.पी.एम.सी ॲक्ट मध्ये असे काही ठरले आहे का?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>साधारण ज्या मार्गदर्शन सूचना आहेत न्यायालयात जास्तीत जास्त वेळ लागु नयेत आणि ज्या कर्मचा-याचा दोष नाही. त्या कर्मचा-यावर अन्याय होवू नये. म्हणुन राज्य शासनाने मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. ती लाचलुचपत या खात्त्यातील पोलिसांनी हि सर्व कार्यवाही तातडीने करून दिड महिन्याच्या आत पुर्ण करून पाठवायच्या आहेत परंतु त्यांच्याकडुन विलंब झाला म्हणुन आपण मुळ कायदयामध्ये जी तरतुद आहे. जी आपल्याला कोर्टामध्ये परवानगी दयायची आहे ती देणार नाही अशी भुमिका आपल्याला घेता येणार नाही. फौजदारी गुन्हयामध्ये महासभा नियुक्त प्राधिकारी म्हणुन आपल्याला यासाठी परवानगी देणे आवश्यक आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>माझा मुददा तुम्ही समजलात नाहीच. माझा मुददा असा आहे फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी.....

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>मी आपल्याला बोललो मार्गदर्शक सूचना कायदयामध्ये नाहीत परंतु कर्मचा-यावर अन्याय होवू नये. न्यायालयात बराच वेळ जातो असा वेळ टाळण्यासाठी तीन महिन्याच्या आत पोलिसांनी तपासणीकरून अभियोग चालविण्याची परवानगी सक्षम प्राधिकारीकडे दयावी. अशा या मार्गदर्शक सूचना आहेत.  हे कायदयामधले रूलिंग नाही. या शासनाच्या मार्गदर्शक सूचना आहेत त्याप्रमाणे जरी समजा पोलिसांकडुन विलंब झाला असेल तेवढया एका कारणासाठी आपल्याला कायदयाची तरतुद डावलता येणार नाही.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>आपल्याकडे ते प्रकरण कधी आले आहे.



<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>आपल्याकडे १९.१.२००२ला आले आहे.

<u>मा.सदस्य श्री. शांताराम निकम :-</u>महापौर साहेब, आता उपायुक्त साहेबांनी काय सांगितले आहे आपल्याला अशी अडचण येणार नाही. परंतु महमदी अप्रोच हा जो अतिरेकी होता पाकीस्तानचा तो सहा महिन्यानंतर त्याच्यावर खटला दाखल करण्यास शासन गेले तेव्हा शासनाचा खटला कोर्टाने अमान्य केला आणि त्याला तिथे सोडुन देण्यात आले. त्यामुळे शासनावर अब्रु नुकसानीचा दावा त्यांनी केला आहे. दहा कोटी रू. त्यांनी शासनाकडे मागितले आहे तर अशी आपल्यावर वेळ येणार नाही का? आपल्याला तीन महिन्याच्या आत खटला दाखल करायचा होता. जास्तीत जास्त सहा महिने परंतु सहा महिन्यापेक्षा जास्त दिवस म्हणजे १८ दिवस जास्त झाले आहेत.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>अप्रोचची जी केस आहे आणि ही केस वेगळी आहे. मुळ शासन आणि निमशासकीय ज्या ज्या संस्था आहेत त्यामध्ये शासनाचे स्पष्टपणे आदेश आहेत की लाचलुचपतीच्या प्रकरणात भ्रष्टाचाराची पाळमुळ खणुन काढण्यासाठी कुठल्याही ॲन्टी करप्शन ॲक्ट खाली लाचेचा सापळा

रचल्यानंतर रंगेहाथ पकडलेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. पोलिसाच्या तपासामध्ये जो काही वेळ काळ गेला आहे त्यामुळे आपण कोर्टात अभियोग चालविण्याची परवानगी दयायची नाही हि भुमिका आपली चुकीची आहे. हि भुमिका शासनाच्या मुळ उददेशापासुन विचलित होईल त्यामुळे महासभेने यासाठी परवानगी देणे आवश्यक आहे.

<u>मा.सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>महासभेमध्ये प्रश्न आणताना वेळेची मर्यादा लक्षात घेतली पाहिजे. वेळ उलटुन गेली आहे कालबाहय झाली आहे. जर आपण विलंब केला तर या दोघांना तुम्ही किती दिवस निलंबित ठेवणार आहात?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>त्याच्यामध्ये असे आहे की, संबंधित कर्मचा-यांच्या विरोधात आम्ही महासभेसमोर तसा प्रस्ताव पाहिजे असेल तर देवु की महापालिकेकडुन विभागीय चौकशी तयार करून त्यांना जर ते जास्त काळ निलंबित रहावे लागत असेल तर विभागीय चौकशीत जर ते दोषी आढळले असतील तर विभागीय चौकशीमध्ये त्यांमध्ये कोर्टाच्या आदेशाच्या अधिन राहुन त्यांना जर कामावर घ्यायचे असेल तर ते महासभेने ठरवायचे आहे नियुक्ती प्राधिकारी म्हणुन.

<u>मा.सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>त्यांच्यावर अन्याय होवू नये त्यांच्या कुटूंबियांवर अन्याय होवू नये म्हणुन आपण असा प्रस्ताव याठिकाणी आणुन कोर्टात खटला दाखल केल्यानंतर देखिल जोपर्यंत ते दोषी ठरत नाहीत तोपर्यंत त्यांना कामावर घेवू शकत नाही का?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>अशा प्रकारचे ठराव करण्याचे नियुक्ती प्राधिकारींना अधिकार आहेत. आपण महासभेने ठरवा त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

<u>मा.सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>आभारी आहे.

<u>मा. सचिवः-</u>खटला भरण्यास परवानगी आहे.

--६४-

<u>काही सदस्य :-</u>पास.

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

<u>विषयः-</u> श्री. जेठानंद शर्मा व श्री. शंकर मालवणकर या महापालिकेच्या कर्मचा-यांविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे तरतुदी अनुसार खटला भरणेस मंजूरी देणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

श्री. अशोक छाब्रिया रा. उल्हासनगर-३ यांच्या मालकीची जागा बॅरेक नंबर ९९८ रूम नंबर ५ शिट नंबर २७ ही जागा श्री. दिनेश मोरंदमल जवरानी उल्हासनगर १ बिल्डर यानात्याने विकसित केलेली आहे.

दिनांक २६.६.२००१ रोजी बांधकामाच्या ठिकाणी सकाळी ११.३० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेतील अतिक्रमण विभागातील काम करणारे बीट इन्सपेक्टर श्री. जेठानंद शर्मा व श्री. शंकर मालवणकर यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करणारे श्री. दिनेश जव्हरानी यांचा भाऊ श्री. नरेश जवरानी यांना विचारले की सदर विकसित केलेले बांधकाम हे २ ते ३ फुटांनी जास्त आहे. करीता ज्यादा बांधकाम केले म्हणुन पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करू असे श्री. जेठानंद शर्मा यांनी संबधितास सांगितले तसेच सदरचे बांधकाम हे नकाशा प्रमाणे नसल्यामुळे महापालिकेकडे तक्रार केल्यास सदरचे बांधकाम पाडण्यात येईल असे देखिल त्यांनी सांगितले.

सदरचे बांधकाम वाचविणेसाठी श्री. जेठानंद शर्मा व श्री. शंकर मालवणकर यांनी तक्रारदार यांच्याकडुन रक्कम रूपये बारा हजार लाचेची मागणी केली त्यावेळेस तक्रारदार यांनी १ ला हप्ता म्हणून रक्कम रूपये पाच हजार तक्रारदार यांचा भाऊ श्री. नरेश जवरानी यांच्या समक्ष दिले तक्रारदार श्री. दिनेश मोरंदमल जवरानी यांनी दिनांक ३.७.२००१च्या पत्रान्वये मा. पोलीस निरिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय ठाणे यांच्याकडे तक्रार नोंदविली त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक अधिकारी यांनी दिनांक ३.७.२००१ रोजी सापळा रचून श्री. शंकर मालवणकर यांना व्दारकानाथ अपार्टमेंट महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन येथे उर्वरीत रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडले आहे. अशा प्रकारे श्री. जेठानंद शर्मा मुकादम व श्री. शंकर मालवणकर बीट इन्स्पेक्टर यांनी महानगरपालिका उल्हासनगर पाहिलेचे नौकर या नात्याने पदाचा व अधिकाराचा दुरूप्योग व गैरवापर करून स्वतःचा आर्थिक फायदा केलेला आहे. यास्तव लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे येथील अधिकारी यांनी सेंट्रल पोलीस स्टेशन उल्हासनगर ३ यांजकडे गुन्हा रजि नंबर II-९-२००१ ला प्र. का. सन १९८८ चे कलम ७,१२,१३, (१(ड)सह १३ (२) प्रमाणे दिनांक ४.७. २००१ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

भारतीय राज्य घटनेच्या कलम ३११ नुसार लोकसेवकास नोकरीवरून कमी करण्याचे त्यांना पुन्हा नेमणुक करण्याचे अधिकार असलेल्या सक्षम अधिकारी यांच्या परवानगीची आवश्यकता आहे तसेच लाचलुचपत प्रतीबंधक कायदा सन १९८८ चे कलम १९ (१)(क) अन्वये न्यायालयात खटला दाखल करणेस नियुक्ती प्राधिका-याची मंजुरी आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मा. पोलीस उपआयुक्त / पोलीस अधिक्षक (२) ॲन्टीकरप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य



मुंबई, यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सीआ/२३०/ठाणे/२०१/६४८ / दिनांक १९.१. २००२ अन्वये श्री. जेठानंद शर्मा, मुकादम व श्री. शंकर मालवणकर कर बीट इन्स्पेक्टर यांच्यावर खटला दाखल करणे कामी महानगरपालिकेकडे विनंती केली आहे.

संबंधीत कर्मचारी श्री. जेठानंद शर्मा व श्री. शंकर मालवणकर हे महापालिकेचे स्थायी कर्मचारी असून लाचलूचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८चे कलम १९ (१)नुसार संबंधितांविरूध्द खटला दाखल करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये, उल्हासनगर महानगरपालिका नियुक्ती प्राधिकारी या नात्याने सक्षम आहे. म्हणून संबंधितांविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८चे कलम १९ (१) अन्वये खटला दाखल करणेची मंजुरी मिळणेसाठी सदर प्रस्ताव प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ७ दिनांक:-२४/७/२००२.

सुचकाचे नाव :-श्री. भालेराव गौतम.

अनुमोदकाचे नाव :-श्री. रूपानी चिमन.

हि महासभा वरील गुन्हयाचे संदर्भात श्री. जेठानंद शर्मा व श्री. शंकर मालवणकर हे महापालिकेचे स्थायी कर्मचारी असून त्यांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेतून काढुन टाकण्याचे अधिकार महासभेला प्रदान करण्यांत आलेले असून श्री. जेठानंद शर्मा व श्री. शंकर मालवणकर यांच्यावर वरील नमुद केलेल्या कृत्यांमुळे प्रस्तावित होणा-या अपराधांसाठी लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७,१२,१३ (१)(ड) सह १३ (२) प्रमाणे सक्षम न्यायालयात खटला भरणेस मंजुरी देत आहे.

सुचकांची सही-

अनुमोदकांची सही-

एकमताने मंजुर

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:-विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

विषय:- उल्हासनगर महानगरपालिकेची मैदाने व उद्याने यांचे भुईभाडे पुर्न:निश्चित करणे व त्यासंबंधी पूर्वीच्या महासभा ठराव क्र. ८ व १७ मध्ये आवश्यक ते फेरबदल किंवा रद्द करणे बाबत.



मा.सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-कोण बघते उद्यानाचे काम. आम्हाला माहितच नाही उद्यान अधिक्षक कोण आहे कोण सांभाळतो.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मा. महापौरजी आता जो विषय आणला आहे यात लिहिले आहे. उल्हासनगर महानगरपालिकेची मैदाने व उद्याने तर मी विचारू इच्छितो मैदाने व उद्याने या दोघांमध्ये फरक काय आहे. मैदान व उद्याने सर्व एकातच आणले का. फरक काय मैदान कोणते उद्यान कोणते? जरा याबाबतीत माहिती दया.

श्री. पाटणकर (उपायुक्त मालमत्ता):-अ.क्र. २ मध्ये ठिकाणांचा स्वयंस्पष्ट उल्लेख केला आहे.

*__काही सदस्यः-__हिंदीत बोला.*

*(श्री. पाटणकर उपायुक्त  यांनी हिंदीमध्ये सांगितले.)*

*__मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-__हि जी यादी दिली आहे त्यात मैदान कोणते उद्यान कोणते. या सोळा यादीमधुन मैदान कोणते उद्यान कोणते? पाटणकर साहेब तुम्ही यादी पाठवली आणि तुम्हाला माहित नाही की मैदान कोणते उद्यान कोणते.*

*__श्री. पाटणकर (उपायुक्त मालमत्ता)__:-हे बघा स्वयंस्पष्ट खुलासा तिथे केला आहे. यापुर्वी पण असा ठराव झाला आहे.*

*__मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-__मग तुम्ही सांगा ना यातील मैदान कोणते उद्यान कोणते.*

*__श्री. पाटणकर (उपायुक्त मालमत्ता)__:-इथे स्वयंस्पष्ट खुलासा केला आहे ना. रेकॉर्डवर जी नावे आहेत तीच इथे लिहिली आहे.*

*__मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-__तुम्ही सांगा ना?*

*__श्री. पाटणकर (उपायुक्त मालमत्ता)__:-इथे पण लिहिले आहे ना.*

*__मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-__कुठे लिहिले आहे? साधु वासवानी उद्यान असे लिहिले आहे. मैदान कोणते यात? नाहीतर मैदान शब्द काढा. एकपण मैदान नाही.*

*__श्री. पाटणकर (उपायुक्त मालमत्ता)__:-सात नंबर आयटम दसरा मैदान आहे. आठ नंबर दसरा मैदान, सोळा नंबर दसरा मैदान उल्हासनगर-५.*

*__मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-__आम्ही शहरात जे गार्डन बनवतो. उद्यानाचा विकास करण्यासाठी निधी ठेवतो. याआधी जी स्थायी समितीची सभा झाली होती. त्यात मा. आमदार साहेबांकडुन एक निधी उपलब्ध झाला होता. उद्याने विकसित करण्यासाठी जेव्हा आपण उद्यानांवर खर्च करतो , मुलांना खेळण्यासाठी बाग तयार करतो लोक तिथे फिरावयास येतात. शहराचा पैसा उद्यानाच्या विकासासाठी लावतो. त्याच उद्यानांचा सत्यानास करण्यासाठी आपण भाडयाने कसे देवू शकतो. तुम्ही एक*



*निश्चित करा की, काय भाडयाने दयायचे मैदान की उद्याने की दोन्ही दयायचे आहेत.*

*__श्री. पाटणकर (उपायुक्त मालमत्ता)__:-तेच तर ठरवायचे आहे म्हणुन तर प्रस्ताव तुमच्याकडे पाठवायचा आहे.*

*__मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-__मैदान पण दयायचे आहे, गार्डन पण दयायचे आहे मग हा खर्च कशाला करता तुम्ही उद्याने विकसित करण्यासाठी. उद्यानासाठी जो निधी आहे तो ठेवू नका. एका बाजुने तुम्ही उद्यानाच्या विकासासाठी शहराचा पैसा खर्च करता आणि दुस-या बाजुने थोडया पैशाच्या उत्पन्नासाठी उद्यानाचा*

सत्त्यानाश करत आहेत. हे उद्याने आणि मैदाने कोणते सांगत नाही. पुर्ण शहरात महापालिकेची दोन मैदाने आहेत का? बोट क्लबवर उल्हासनगर महापालिकेची मालकी आहे का? ते सांगा. नऊ नं. वर आपण लिहिले आहे जिजामाता उद्यान. तिथे किती जागा आहे भाडयाने देण्यासाठी. किती क्षेत्रफळाची जागा उरली आहे. त्यानंतर १५ नंबर स्वामी टिकमदास उद्यान वार्ड नं. ३५ कुठे येते? शहरात कुठे आहे टिकमदास उद्यान? प्रभाग क्र. ३५ माझा आहे. आपण लिहिले आहे उल्हासनगर ५ तर आपण सांगा मला तो प्रभाग कोणता आहे. आताचा आहे की दहा वर्षापुर्वीचा आहे. हा अहवाल आपण एकदम चुकीचा आणला आहे. याबाबतीत आपल्याला काही माहिती नाही आहे. यात मैदान कोणते गार्डन कोणते? कोणती वस्तु आपण देवू शकतो. काही माहिती नसताना तुम्ही सोळा मैदाने व उद्याने आणले कृपया यावर योग्य ती माहिती दया.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>सन्माननिय महापौर महोदया, सन्माननिय सदस्य सभागृहासमोर हा जो विषय आणला आहे. याचा इतिहास असा आहे की, १९.१.२००० व ३०.६.२००० यावर्षात आधीच याबाबतीत महापालिकेचा ठराव झाला. त्यात काही मैदान उद्यान भाडयाने देण्याचे व काही विनामुल्य देण्याचा ठराव झाला होता. आता आपल्यासमोर जो ठराव आणण्यात आला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या ७९ कलमान्वये कोणती महापालिकेची संपत्ती विनामुल्य दिली जात नाही. व हे जे उद्यान व मैदान ज्याविषयी सन्माननिय सदस्यांनी मुददा उपस्थित केला आहे. उद्यानात जी रिकामी जागा त्याविषयी आहे. मैदान तर रिकामे आहे परंतु उद्यान यासाठी म्हंटले आहे की, त्या नावाने ते ओळखले जातात. अन्यथा प्रत्येक उद्यानात रिकामी जागा आहे. ती भाडयाने देण्याचा प्रश्न आहे. मुददा हा आहे की, कलम ७९ अन्वये कोणती संपत्ती विनामुल्य नाही. आणि जर विनामुल्य दिली तर महापालिका एक सेवाभावी संस्था आहे. आता वांरवार मी सदनासमोर असे सांगितले आहे की, आपले उत्पन्न वाढले पाहिजे. थेंबे थेंबे तळे साचे याप्रमाणे जो पैसा विकासकामी उपयोगात आणला जाईल. यासाठी हा प्रस्ताव आपल्या समोर मांडला आहे. याचा उददेश जास्त उत्पन्न मिळविणे असे नाही. परंतु मागील काही ठराव माझ्यासमोर आले खुप प्रमाणात शासन आणि नेत्त्यांकडुन अशी उत्तरे यायची की, एखादे मैदान उद्यान कमी भाडयाने दिली गेली पाहिजे. मी आता सांगितले की, कोणतीही संपत्ती विनामुल्य दिली जात नाही. आम्ही थोडे भाडे तर जास्त लावले कारण त्यांचा बचाव सुध्दा करायचा आहे. ज्याचा वापर करायचे आहे त्याचे संरक्षण तर करायचे आहे. तर मला वाटते त्याची मागणी कमी होईल. ज्याला परवडेल तोच याचा वापर करेल याने महापालिकेचे उत्पन्न वाढणार नाही. या चांगल्या हेतुने प्रस्ताव आपल्या समोर मांडला आहे. आधी त्याचे दर जे ठरविले होते ते मला वाटते १९८७ साली निश्चित केले गेले होते. यावेळी आम्ही तरी पण वाजवी दर लावले आहेत. जे काम समाजासाठी उपयुक्त आहे. त्यासाठी आम्ही सहा नंबर रकान्यात भाडे प्रस्तावित केले आहे. जे काम कमर्शिअल आहे, सेवाभावी नाही त्याबाबत पाच पट भाडे आकारणी करण्यासाठी प्रस्ताव ठेवला गेला. मी आता आपणांस स्पष्ट केले की, उत्पन्न पण



थोडे वाढले पाहिजे व यावर प्रतिबंध पण लागला पाहिजे. म्हणुन जर थोडे भाडे जास्त लावले तर जरा प्रतिबंध लागेल. आणि जर कोणते चांगले काम असेल, सेवाभावी काम असेल, महापालिकेला पाठिंबा देणारे पुरक काम असेल तर मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम ६६ मध्ये २५ व २६ वर त्याचे उददेश दिले आहेत. तो अधिकार आयुक्तांकडे ठेवण्यात आला आहे. कारण की त्याचे किमान दुरूपयोग होवो, भाडे पण मिळो, जास्त भाडे न मिळो या

उददेशाने हा प्रस्ताव आणला गेला आहे. आणि मला वाटते मी आपणांस विनंती करतो जर हा प्रस्ताव पारीत केला गेला तर उत्पन्नात थोडी भर पडेल व आमचा जो कार्यभार आहे तो पण मुं.प्रा.म.पा.अधिनियम यानुसार चालेल.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, हा जो ठराव पास झाला तर यावर अंमलबजावणी होईल का? यानुसार कार्यवाही करण्यात येईल. या प्रस्तावानुसार वागले जाईल का? याची खात्री आहे का? यासाठी एक ठराव महासभेत पास झाला होता की सपना गार्डन कुणाला भाडयाने दयायचे ते तो ठराव पास झाल्यानंतरही सपना गार्डन दिले गेले. यागोष्टीची काय खात्री आहे की, ठराव पास झाल्यानंतर त्यावर अंमलबजावणी करण्यात येईल.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>मा. महापौर महोदया, हे म्हणणे बरोबर आहे. जेव्हा एखादा ठराव होतो त्याला प्रेशर आणि पुल्स जास्त असतात. आताचा जो प्रस्ताव आहे मला असे वाटते त्यावर पुर्णपणे अंमलबजावणी केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>यापुर्वी एक ठराव आला होता. त्याचा यात उल्लेख नाही. ८७चा ठराव आपण आणला आहे. एक असा ठराव होता की सपना गार्डन कुणालाही भाडयाने देता येणार नाही. असा एक ठराव सर्व संमतीने पारीत झाला होता. त्यानंतर देखिल सपना गार्डन भाडयाने दिले गेले.

<u>मा. सदस्य श्री. नरेंदकुमार ठाकुरः-</u>महासभेच्या ३६ नंबर ठरावात हे मंजुर झाले होते की, सपना गार्डन भाडयाने दयायचे नाही. आता जो ठराव दिला आहे त्यात ८ व १७ नंबरचा उल्लेख केला आहे ३६ नंबरचा उल्लेख केला नाही.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>जर सपना गार्डन राहिले गेले असेल तर त्याचा स्वतंत्र आम्ही प्रस्ताव आणु.

<u>मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-</u>नाही नाही. हि सभागृहाची दिशाभुल केली जात आहे. कार्यसुचीवर ८ व १७ नंबर ठरावाचा उल्लेख केला आहे ३६ नंबरचा उल्लेख केलाच नाही. मागे सपना गार्डनचे दर निश्चित केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः-</u>मा. महापौरजी,

<u>मा. सदस्य श्री. नरेंदकुमार ठाकुरः-</u>सपना गार्डनला लायन गार्डन देवून भाडे निश्चित केले आहे. यात सपना गार्डन कोणते लायन गार्डन कोणते? माझ्या मते उपायुक्तांनी सांगितले तर बरे होईल. दोन वेगवेगळे आहेत काय?

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>महापौर महोदया, हा ३६ ठराव जो आता मला प्राप्त झाला. त्याची तारीख आहे २८.२.२००१ त्याची पण अंमलबजावणी केली जाईल आणि हा जो प्रस्ताव ठेवला आहे. ३ अ ते पण केले जाईल.



<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>महापौर साहेब, यापुर्वी आपल्या महापालिकेच्या तरण तलावाच्या इकडे लग्नकार्य व्हायचे त्याचा पण इथे उल्लेख केला नाही. तरण

तलावाच्या दोन्ही बाजुला खुप लग्ने यापुर्वी झाली आहेत. त्याचा यामध्ये उल्लेख नाही.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>तो प्रस्ताव स्वतंत्रपणे आणला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>मा. महापौरजी, हा जो विषय आलेला आहे. उद्याने आणि मैदाने भुईभाडयाने देण्याबाबत. आम्हाला माहिती आहे की, आपल्या शहरामध्ये महानगरपालिकेची आर्थिक स्थिती कमकुवत आहे. आम्हा नगरसवेकांना नगरसेवक निधी पण व्यवस्थित मिळत नाही. त्या दृष्टीकोनातुन आयुक्त साहेब वेगवेगळया मार्गाने उत्त्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करतात. आम्हाला हे पसंत आहे. उद्याने आणि मैदाने जे इतर लोक वापरतात त्याच्याकडुन भाडे घेणे निश्चितपणे आवश्यक आहे. परंतु त्या भाडयाचे दर समजा काही चांगल्या ठिकाणच्या क्षेत्रात ते दर आणि इतर ठिकाणी इतर दर हे जर पाहिले तर मला वाटते यामध्ये बदल होणे आवश्यक आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की यात साडे तेरा कि.मीच्या उल्हासनगर क्षेत्रात आज मैदाने आणि उद्याने फार कमी राहिलेली आहेत. आज या शहरामध्ये जर शहराचे नाक जर कुठले असेल तर आपण आज गोल मैदान समजतो. आज शहराचा आकर्षण बिंदु जर म्हंटला तर सपना गार्डन समजले जाते. बरोबर ना कुमारीजी? आणि या शहराच्या धकाधकीच्या जीवनामध्ये इथल्या जनतेला थोडयाफार विसाव्याची संधी मिळाली पाहिजे कुठेतरी शांतपणे बसले पाहिजे या दृष्टीकोनातुन काही मैदाने राखीव असणे आवश्यक आहे. जर हि मैदाने तुम्ही उदया गोल मैदान झाले, सपना गार्डन झाले जर तुम्ही एखादया कार्याला देणार असाल, किंवा जत्रेला देणार असाल, फनफेअरला देणार असाल तर त्यामधुन तुम्ही शहराला काय देणार आहात? मागच्या वेळेस हा रिपोर्ट होता फनफेअरच्या नावाखाली अक्षरक्षः जुगार चालतो. तुम्ही हे सर्व जुगार करण्यासाठी देणार आहात का? या शहरातील लोकांची तुम्ही मानसिकता बदलवणार का? कमीत कमी गोलमैदान आणि इतरही मैदाने किंवा उद्याने जत्रेसाठी किवा फनफेअरसाठी किवा जुगारासाठी देवू नये इतर कार्यक्रमासाठी देण्यात काही हरकत नाही. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>सन्मानानिय महापौर महोदया, हा जो विषय सभागृहासमोर आणला आहे. मला असे वाटते की, एक तर प्रशासनाने याविषयाची व्यवस्थित तयारी केलेली नाही. जर आपण बघितले की, १९८७ ला जे भाडे दाखविले आहे साधुवासवानी उद्यान १००० रू आणि त्याप्रमाणे जर प्रत्त्येक वर्षी १० टक्के वाढ करायची झाली तर प्रत्त्येक वर्षी १० टक्के वाढ केल्यानंतर जे एकत्रित भाडे होते त्यावरती पुन्हा १० टक्के दुस-या वर्षामध्ये वाढ करायची आहे. हा हिशोब जर आपण बघितला तर प्रत्त्येक भाडे ५ पट होते. मग ज्याठिकाणी १००० रू भाडे आहे त्याठिकाणी १५ वर्षानंतर <u>८०००/-</u> रू. इतके भाडे होते. ज्याठिकाणी <u>३०००/-</u> रू. असे भाडे दाखवले आहे. त्याठिकाणी १५ वर्षानंतर जर चक्रवाढ पध्दतीने बघितले तर <u>१५०००/-</u> रू. इतके भाडे होते. तर आपण हा प्रस्ताव तयार करताना मुळामध्ये हे बघितले पाहिजे की, हा प्रस्ताव प्रात्त्यक्षिक स्वरूपाचा आहे का? जर अशाप्रकारे आपण १०-१० टक्याचा हिशोब जर धरणार असु तर जे भाडे ॲक्चुअलमध्ये त्याठिकाणी जो आकडा येईल तो मला नाही वाटत की, कोणतीही पार्टी उद्याने किंवा मैदाने घेईल त्याला ते परवडेल. आपण याठिकाणी नमुद केलेले आहे की, उपरोक्त मैदाने व उद्याने नागरिकांच्या सार्वजनिक वापरासाठी उपलब्ध रहावीत म्हणुन विनामुल्य देण्यात येवू नयेत. आपला मला एक उददेश कळत नाही की हा प्रस्ताव तयार करताना नेमका कोणता उददेश आपण डोळयासमोर ठेवलेला आहे. एकतर लोकांना उद्याने उपलब्ध व्हावीत हा आपला उददेश आहे की ती भाडयाने देवून उत्त्पन्न मिळावे

हा आपला उददेश आहे आपण हया प्रस्तावात दुहेरी धोरण ठेवले आहे. एक तर आपण एका बाजुला हे क्रेडीट घ्यायला बघता की आपण लोकांना मैदाने उपलब्ध होईल त्यासाठी प्रयत्न करीत आहात. आणि दुस-या बाजुला आपण महापालिकेसाठी उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहोत अशी भावना तुम्ही त्यातुन प्रगट करू इच्छिता. मला असे वाटते की, अशाप्रकारचा जो राजकारणाचा भाग आहे. त्याच्यावर आपण ऐवढे लक्ष केंद्रीत करण्याची गरज नाही. एक तर आपण स्पष्टपणे सभागृहासमोर हा विषय ठेवला पाहिजे की उद्यान आणि मैदाने जी आहेत ती विनामुल्य देण्यात येवू नयेत. किंवा एक तर कुणालाच देण्यात येवू नये. आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, उद्याने आणि मैदाने यामध्ये आपण सरळ सरळ वेगळेपणा दाखविला पाहिजे. जी उद्याने आहेत ती कोणत्त्याही कार्यक्रमासाठी देण्यात येवू नये. आणि जी मैदाने आहेत त्यांचाच फक्त विचार कार्यक्रमांना देण्यासाठी करण्यात यावा. आणि ते सुध्दा प्रात्यक्षिक बाजारात जे दर चालु आहेत त्या दराने दयावेत. दुसरे आपण म्हंटले आहे की, आपण व्यापारी कामासाठी पाच पट भाडे आकारणी प्रस्तावित केलेली आहे. जर आपण मैदानाचा विचार भाडेपटटीने देण्यासाठी करत असु तर मला असे वाटते की त्याबददल व्यापारी कामासाठी दुप्पट कर आकारणी केली तर ते सुध्दा परवडू शकेल. तर माझी अशी सभागृहाला विनंती आहे की, उद्यान आणि मैदान यामध्ये वेगळेपणा आणावा या प्रस्तावातुन उद्याने सरसकट गाळण्यात यावी. आणि फक्त मैदानांचा कार्यक्रमांसाठी भाडयाने देण्यासाठी विचार करण्यात यावा. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>आज हा जो विषय आपण सभागृहात आणला आहे. यापुर्वी आयुक्तांनी जे सांगितले त्यांचा उददेश असा होता की प्रस्ताव पण आणला पाहिजे आणि भाडयाने पण नाही दिला पाहिजे. आयुक्त साहेब म्हणतात की, याकरिता दर असे ठेवले आहेत की, कमीत कमी वापर व्हावा. मला हे समजत नाही की, आयुक्त साहेबांना पाहिजे काय? एका बाजुने विचार करतात उत्पन्न वाढले पाहिजे दुस-या बाजुने त्यांचे असे म्हणणे आहे की आम्ही तर याकरिता जास्त ठेवले जेणेकरून कमीत कमी लोक आपल्याकडे येतील. हा प्रस्ताव सर्वसंमतीने मंजुर झाल्यानंतर देखिल मी आयुक्तांना हे विचारू इच्छितो की, हिराघाट बोटक्लब येथिल उद्यान कोणी मागितले तर आपण देवू शकाल का? कारण की ते उद्यान इतके उध्वस्त आहे खुप वाईट स्थितीत आहे. कुणी ते घेणार नाही. कारण की, उल्हासनगरमध्ये जितकी पण उद्याने आहेत तिथे वॉचमन नाही, माळी नाही, पाण्याची पुरेशी व्यवस्था नाही ना ही तेथे महापालिकेचे उद्यान अधिक्षक आहेत. हे मंजुर करून असे वाटते की, आपण स्वतःला खुश करतो. ठराव पास केला असे वाटते आपण जणु खुप काही केले आहे. परंतु प्रशासनातर्फे काही पुर्ण तयारी नाही. जसे टिकमदास उद्यान त्यांनी लिहिले आहे. मी त्यांना विचारू इच्छितो ते कुठे आहे. व उद्यानांचे क्षेत्रफळ किती आहे. तिथे काय काय सुविधा आहे. याबाबत आम्हाला काही माहिती नाही. अशीच सोळा नावे दिली गेली आहेत. आमची पण इच्छा आहे उत्पन्न वाढले परंतु तुमच्या प्रशासनातर्फे तयारी काय. समजा लग्नकार्यासाठी मैदान घेतले तर तिथे महापालिकेचा वॉचमन नसणार, माळी नसणार तिथे काय संरक्षण व्यवस्था आहे. तर असे वाटते की तुम्ही फक्त प्रस्ताव आणला आहे तुम्ही त्यावर अंमलबजावणी करू नाही शकणार. मी आयुक्तांकडुन खुलासा घेवू इच्छितो की, हे मंजुर केल्यानंतर त्यावर अंमलबजावणी करू शकणार का? तुम्ही जी पण नावे दिली आहेत ते तुम्ही लोकांना देवू शकाल का?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-</u>१२ नंबरमध्ये एक नियम लिहिला आहे की, परवानगीची मुदत संपल्यावर सकाळी ११ वाजेच्या आत मैदाने रिकामी करण्यात

यावी नाही तर प्रतिदिन २०० रू. आकारण्यात येईल. समजा श्री. किशोर वनवारी यांनी १० तारखेला मैदान बुक केले, ११ तारखेला मी बुक केले ते माझा



कार्यक्रम असफल करू इच्छितात ते पुर्ण दिवस सामानाच उचलणार नाही. २०० रू. दंड भरतील तर मग मी काय करणार, मी काय करणार ११ तारखेला. माझ्या कार्यक्रमाचे मी काय करणार याबाबत सुध्दा खुलासा करा.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>मा. महापौर, मला हे विचारायचे आहे की, जिजामाता उद्यानात किती एरिया अजुन शिल्लक आहे.

<u>काहि सदस्य :-</u>काही नाही उरले.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>यांना सांगु दया. तुम्ही त्याचे भाडे किती ठेवले आहे. जागा नाही तर कोणत्त्या हिशोबाने तुम्ही दर ठरविले? यांनी तुलना बघा कशी केली आहे. जिजामाता उद्यानाचे देखिल <u>७५०/-</u> रू आणि दसरा मैदानाचे देखिल <u>७५०/-</u> रू. या मैदानात काही तरी जागा उरली आहे का? मा. आयुक्त साहेब हा प्रस्ताव पुन्हा चांगल्यात-हेने तयार करून पुढच्या वेळेस आणा.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>आमची इच्छा आहे व्हावे परंतु प्रस्ताव बरोबर नाही.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>सर्व चुकीचे आहे. आयुक्त साहेब.

<u>श्री. पाटणकर (उपायुक्त मालमत्ता विभाग)</u>:-सदर ठिकाणी पाण्याच्या टाकीचे काम सुरू आहे. साधारणपणे ७ टक्के एरिया पाण्याच्या टाकीने व्यापलेला आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>काय काय आहे तिथे?

<u>श्री. पाटणकर (उपायुक्त मालमत्ता विभाग):</u>-पाण्याची टाकी.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>दुसरे अजुन काय आहे तिथे? तुम्हाला ज्या गोष्टीची माहिती नाही त्यागोष्टी तुम्ही इथे कशाला आणता? अजुन तिथे काय काय आहे सांगा तुम्ही? फक्त पाण्याची टाकी आहे काय? तिथे किती फुटाची जागा शिल्लक आहे? तुम्ही स्वतः पहाणी केली का? तिथे जागाच उपलब्ध नाही.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>महापौर महोदया, हा जो प्रस्ताव प्रशासनाने आणला आहे आम्ही प्रस्तावित केलेले भाडे आहे कदाचित जागा पण नसेल. कुणाला पाहिजे तर ते घेवू शकतात ना. आपण काय त्यांना सक्ती करणार नाही. प्रस्ताव करण्यावर आपल्याला कुणाचे बंधन नाही ना. ज्याला परवडेल तो ते घेईल. थोडीशी जागा तिथे आहे. खुप सारे प्रस्ताव येत असतात. फटाक्यासाठी, छोटया छोटया कामासाठी कमर्शिअल होवू शकते, उत्त्पन्न वाढु शकते.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>दहा चौ.फुटाला पण तोच दर आणि दहा हजार चौ. फुटालापण तोच दर लावणार. आपण मग फरक काय पाहिला. आपण दोघांचे समान दर लावणार?

*<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>मी आता सन्माननिय सदस्यांना सांगितले की, आपण कुणावर सक्ती करणार नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>तुम्ही पुढच्या वेळेस व्यवस्थित आणा आम्ही पास करू.*

--७१--

*<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>प्रशासनातर्फे आलेला प्रस्ताव परिपुर्ण असेलच असे नाही. सभागृहासमोर यासाठीच आणले जाते की त्यात काही सुधारणा केली जावु शकेल. प्रशासनाचा प्रस्ताव बरोबर असतो असे माझे बिल्कुल म्हणणे नाही. या आशेने मी बोलतो की त्यात काही चुका असतील. असे म्हंटले जाते की, रिदम ऑफ दी हाउस प्रिव्हेंन्ट ओव्हर त्यामुळे तुम्ही काही सुधारणा करून मार्ग काढुन दयावा हे तुमचे कर्तव्य आहे असे मी समजतो. आमचा प्रस्ताव परिपुर्ण नसल्याने तुम्ही त्यावर सुधारणा जरूर सुचवू शकता. प्रशासन जरूर त्यावर कार्यवाही करेल.*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u> सुधारणा करून पुढच्या सभेत आणावे.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौर, जेव्हा हा प्रस्ताव महासभेच्या कार्यसूचीवर आणला होता. तेव्हा मी सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. त्यात आमचे बच्चाराम रूपचंदानी सदस्य व गटनेता जमनु पुरस्वानी उपस्थित होते. आमचे विरोधी पक्षनेता व तीन चार इतर शिवसेना सदस्यांना बोलावले होते. विरोधी पक्षनेता गावी गेले होते. मी याविषयावर चर्चा केली होती. यावर काय केले पाहिजे. आणि आमच्या मा. सदस्यांनी काही सूचना दिल्या होत्त्या. ज्या आम्ही केल्या व असे म्हंटले की, जर महापालिकेचे उत्पन्न वाढत असेल तर उद्याने भाडयाने देण्यास काही हरकत नाही.  सर्व संमतीने पास करू.*

*<u>मा.सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी / श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>आम्ही आता पण तेच म्हणत आहोत परंतु प्रस्ताव बरोबर नाही.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मला पुर्णपणे बोलु दया ना. तुम्ही चिंताग्रस्त का होता. माझे बोलणे ऐका. आता पण सदनाचे मत तेच आहे. सर्वसंमतीने मंजुर करू इच्छितात. यात दोन चार ठिकाणी संशोधन करायचे आहे. ते महासभा मध्ये व्हावे म्हणुन तर ठराव आणला आहे. जर कुणाला काही सुझाव दयायचे असतील , कुणाला काही बदल करायचा असेल जसे मी लिहिले आहे. एक तर कोणतेही मैदान व उद्यान फनफेअरसाठी देण्यात येवू नये. यात सर्वांचे एकमत आहे. जुगार खेळण्यासाठी कुणाला दिले जाणार नाही. दुसरे यांनी लिहिले आहे की, मुंबई प्रांतिक अधिनियमांव्ये यापुर्वी आम्ही धार्मिक व राजकीय कार्यक्रमासाठी विनामुल्य देत असु. परंतु आयुक्तांनी लिहिले आहे मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमाच्या एका कलमात असे लिहिले आहे की, आपण कोणतीही मालमत्ता कोणत्त्याही संस्थेला विनामुल्य देवू शकत नाही. यासाठी कोणतेही धार्मिक वा राजकीय कार्यक्रम असो त्यासाठी ५०० रू. दर लावले आहेत. आणि जर व्यावसायिक स्वरूपाचे कार्यक्रम किंवा लग्नकार्य असते तेव्हा ते लोक तेथे कचरा करतात. खाणे-पिणे त्यात उद्याने अस्वच्छ होतात त्याचे चार्ज घेतले गेले पाहिजे. बाकी इतर ठिकाणी तर लग्नाच्या हॉलचे लाख-लाख रूपये भाडे आकारले जाते इथे तर तरीपण कमीत कमी दर लावलेले आहे. आणि अजुन असे की, इथे लिहिले आहे की, जर कुणाचा वाढदिवस असेल किंवा व्यापारी कामासाठी ५ टक्के भाडे जास्त घेतले जावू नये. जर कुणी शिबिर लावले*

शोरूमसाठी किंवा काही प्रदर्शन भरविले त्यासाठी जे दर आहेत ते बरोबर आहेत व लग्नकार्यासाठी जे दर लावले आहेत ते बरोबर आहेत. आमच्या गटनेत्यांनी सांगितले कुमारी साहेबांनी की, सपना गार्डन कुणालाही वापरण्यास देण्यात येवू नये. कोणत्याही कामासाठी दिले जावू नये. त्या गार्डनला सोडुन इतर जितकी उद्याने आहेत त्यामध्ये जर सन्माननिय सदस्यांना काही बदल करायचा असेल तर महासभा ठरवेल. नाहीतर महापालिकेची परिस्थिती जशी आहे तर उत्पन्न वाढविण्यासाठी हे लहान सहान कामे झाली पाहिजेत. ''थेंबे थेंबे तळे साचे'' याप्रमाणे हे मंजुर झाले पाहिजे



आणि स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, स्विमींगपुल जर टाऊनहॉलचा वाद मिटला असेल तर ते पण भाड्याने दिले पाहिजे. आधी तरण तलाव भाड्याने दयायचे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>तिथे बिअर बार नाही उघडला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>नाही. बिअरबार नाही. तो मुददा मागच्या कार्यकालात होता. ते तुम्ही पाहिले आता सत्ताधारी पक्षाची स्थिती बघा. तर माझी एक विनंती आहे तो टाऊन हॉल स्पोर्टस् कॉम्प्लेक्स स्विमींगपुल हे सर्व भाड्याने दिले जावे व पे आणि पार्कचा जो विषय मंजुर केला आहे. पुढे फेरीवाला क्षेत्र कोणते होणार आहे कोणते नाही असा प्रस्ताव मंजुर होणार आहे. त्यासाठी उपमहापौर खुप प्रयत्न करत आहेत. तो प्रस्ताव महासभेत आणला जावा जेणेकरून त्यांच्याकडुन पण उत्पन्न मिळेल. जे पण उत्पन्नाचे मार्ग आहेत ते सुरू करावेत. व मेहरबानी करून हे पारीत केले जावे जर कुणाला त्यात काही बदल करायचा असेल तर ते करू शकतात.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>जिजामाता उद्यानाचे काय? ते वगळा. तिकडे जागाच नाही. त्याच्यातुन गाळण्यात यावे जिजामाता उद्यान.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>जसे सपना गार्डन वगळले तसे जिजामाता उद्यान देखिल वगळण्यात यावे. तिथे पाण्याची टाकी आहे,जिजामातेचा सुंदर पुतळा आहे जागा तिथे शिल्लक नाही.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>एक चुकी झाली आहे त्याविषयी मी सांगु इच्छितो, कुणा सन्माननिय सदस्यांनी अ.क्र. १२ वर लक्ष वेधले आहे. असे लिहिले आहे की, परवानगीची मुदत संपल्यानंतर सकाळी ११ पर्यंत मैदान रिकामे करण्यात यावे. अथवा प्रतिदिन लिहिले त्याऐवजी प्रतितास पाहिजे. हि प्रशासनाची चुकी आहे, टायपिंग चुक आहे. अन्यथा प्रतिदिन ऐवजी प्रतितास पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>महापौर साहेब, मला काही दिवसापासुन एक व्यक्ती भेटतो तो महापालिकेला प्रति वर्ष ३ लाख रू. तरण तलावाचे दयायला तयार आहे. व तिथे दारू देखिल न चालविण्याचे आश्वासन दिले आहे. परंतु मालमत्ता विभागाचे कर्मचारी त्यांना महत्त्व देत नाहीत. काय आहे? वर्षाचे तीन लाख रूपयाचे आपले नुकसान होत आहे. बिल्ट आणि ऑपरेट सिस्टमने कोणी घ्यायला तयार नाही. जर या स्थितीत कुणी घ्यायला तयार आहे. मला वाटते तुमच्याकडे पण तो आला होता तर त्याला का नाही देण्यात येत? इतका उशिर का होत आहे? मी नाहीतर सोमवारी तुम्हाला भेटतो.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-तरण तलावाच्या विषयी निविदा मागविण्यात याव्या.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-३ लाख नाही १० लाख देखिल येवू शकते.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-बरोबर निविदा मागविल्या पाहिजे ना इतका विलंब का लावला आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-महापौर महोदय, मी आधीपण सांगितले आयटम नं. १७ टिकमदास उद्यान हे कुठे आहे? प्रभाग क्र. ३७ मध्ये पण नाही.

--७४--

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-हि प्रिंटीग मिस्टेक आहे. तिथे पितमदास गार्डन आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-वॉर्ड नं. ३७ देखिल चुकीचे लिहिले आहे. बर जसे सभागृह नेता म्हणाले आम्ही हे मंजुर करण्याच्या बाजुनेच आहोत परंतु आम्ही म्हणालो की, आपल्यातर्फे, प्रशासनातर्फे तिथे काही सोय केली जाईल. समजा कुणी आपणाकडे बोट क्लब मागितले ते तर उजाड झाले आहे. ते तुम्ही त्याला कसे देणार? जसे जिजामाता उद्यानाविषयी हे बोलले. तिथे जागा बिल्कुल नाही. त्याची एरिया किती आहे. आम्हाला जे माहित नाही. आम्ही जे बोललो आहे त्यावर आयुक्तांनी स्टेटमेंट दयावे. ते काय सोय करणार? माळी नाही, चौकीदार नाही, कुणी नाही तर कसे होणार? सांगा.

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-महापौर महोदय, सन्माननिय सदस्यांनी प्रश्न केला आहे की, तिथे काही सुविधा नाही, कुणी व्यक्ती नाही. ही वस्तुस्थिती आहे उल्हासनगर महानगरपालिकेची हा जो प्रस्ताव आहे ॲज इट इज वेअर इज बेसिस आहेत. परंतु जेव्हा भाडयाने दिले जाईल तेव्हा उद्यान विभागाला थोडे ॲक्टीवेट करावे लागेल व त्याचवेळी गार्डन विभागाचे जे पर्यवेक्षक आहेत कर्मचारी यांना त्यावेळी व्यवस्था पाहण्याचे आदेश दिले जातील. दुसरी गोष्ट हि आहे की, सन्माननिय सदस्य असे पण म्हणाले की, तरण तलाव आहे , बोटक्लब आहे त्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव येईल. जेव्हा तो प्रस्ताव येईल तेव्हा आपोआपच हा प्रस्ताव त्यामधून रदद केला जाईल किंवा गाळण्यात येईल. बोटक्लब किंवा तरणतलावाचा प्रस्ताव आम्ही रदद केला आहे. मला आशा आहे थोडया दिवसाने महासभेसमोर आणला जाईल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मा. महापौरजी, ही उद्याने लग्न, मुंज, वाढदिवस पाच पट ही ओळ गाळण्यात यावी. इथे जे लिहिले आहे व्यापारी कामासाठी ते चालेल.

मा. सचिवः-मला जरा हे स्पष्ट करा की, मागच्या वेळी जेव्हा असा प्रस्ताव आला होता तेव्हा कुणीतरी प्रदर्शनासाठी म्हणुन मैदान घेतले होते तिथे पण जुगार चालु होता. आपला उददेश असा असला पाहिजे की, जुगारासाठी मैदाने व उद्याने दिली नाही पाहिजे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-तिथे जर जुगार खेळला गेला तर त्याची परवागनी रदद करावी व त्याच्यावर दंड आकारण्यात यावा. त्याला अधिकारी

जबाबदार असेल मागच्यावेळी पण असे झाले होते प्रदर्शनासाठी भरविले आणि आतमध्ये जुगार चालु होता.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>मैदान भाडयाने देते वेळीस प्रत्येक वेळी ही अट घातली जावी की तेथे जुगार खेळला जाणार नाही.

<u>मा. सचिवः-</u>तुम्ही असे पण दिले आहे की, लग्न मुंज, वाढदिवस यासाठी पाच पट लिहु नये असे सांगितले आहे तर किती घ्यावे सांगावे कारण की मला ठराव तयार करायचा आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>वाढदिवसासाठी किंवा मुंजच्या वापरासाठी दर पाच पट आकारण्यात येऊ नये.

--७५--

<u>मा. सचिवः-</u>म्हणले कमर्शिअलसाठी पाच पट लावले जावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>लग्न कार्यासाठी पण पाच पट लावले जावे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>कमर्शिअलसाठी पाच पट लावावे.

<u>मा. सचिवः-</u>आणि धर्मदाय कामासाठी तुम्ही सांगितले ५०० रू.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>कुणी सतसंगसाठी सांगितले तरी ५०० रू.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>हे पहा तुम्ही ठराव बनविण्याआधी महासभेत पुर्णपणे वाचुन दाखवा.

<u>मा. सचिवः-</u>लग्नकार्यासाठी पाच पट घेण्यात यावे असे हे म्हणत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>लग्न कार्य काय व्यावसायिक आहे काय?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>होय. लग्नकार्य व्यावसायिक आहे. पाचपट घेण्यात यावे.

<u>मा. सचिवः-</u>वाढदिवस सोडुन पाच पट घेण्यात यावे असे ते म्हणत आहेत. सपना गार्डन दिले जाणार नाही. जिजामाता उद्यान पण दिले जाणार नाही. ठिक आहे. सदरचा प्रस्ताव वरील सुधारणेसह समंत करण्यात येत आहे. पास.

<u>विषयः-</u> उल्हासनगर महानगरपालिकेची मैदाने व उद्याने यांचे भुईभाडे पुर्नःनिश्चित करणे व त्यासंबंधी पूर्वीच्या महासभा ठराव क्र. ८ व १७ मध्ये आवश्यक ते फेरबदल किंवा रद्द करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

उल्हासनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ८, दिनांक ३०.६.२००० अन्वये उल्हासनगर महापालिका मालकीची मैदाने व उद्याने यांचे भुईभाडे निश्चित केलेले आहे. तसेच उल्हासनगर महापालिका सर्वसाधारण सभा ठराव

क्रमांक. १७, दिनांक १९.७.२००० अन्वये उल्हासनगर महापालिकेची मालकीची उद्याने व मैदाने नोंदणीकृत ट्रस्ट व नोंदणीकृत संस्था व इतरांना केवळ सार्वजनिक पुजा अर्चा, सार्वजनिक धर्मदाय प्रयोजनासाठी किंवा राजकीय पक्षांच्या सभेसाठी तसेच खेळांच्या स्पर्धासाटी इत्त्यादीसाठी किंवा त्यांच्या वापरासाठी किंवा फायदा मिळविण्यासाठी वापरण्याचा उददेश नाही अशा कामासाठी अर्जदाराच्या वेळोवेळच्या गरजेनुसार आयुक्त ठरवतील अशा कालावधीस, अटी व शर्तीवर विनामुल्य देण्यास मंजुरी दिलेली आहे.

उपरोक्त उल्हासनगर महानगरपालिका सर्वसाधारण ठराव क्रमांक १७, दि. १९.७.२००० व ठराव क्रमांक ८, दि. ३०.६.२००० हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ शी परस्पर विरोधी आहेत. मुंबई प्रांतिक



महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये महापालिकेच्या जागा, मैदान इत्त्यादी विनामुल्य देण्याबाबत कायद्यात्मक तरतुद नाही.

सबब सदरचा उपरोक्त महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीशी विसंगत असल्याने रदद करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच महानगरपालिकेस सर्वसाधारण ठराव क्रमांक ८, दिनांक ३०.६.२००० अन्वये महानगरपालिका मालकीची मैदाने, उद्याने यांचे भुईभाडयाचा उल्लेख असलेले दर १९८७ रोजी तत्त्कालीन नगरपालिका ठराव क्रमांक ६५४, दिनांक १९.११.८७ अन्वये ठरविलेले होते. सदर भुईभाडे हे सध्याच्या बाजारमुल्यापेक्षा फारच कमी असल्याने तत्त्कालीन भाडयामध्ये प्रतिवर्ष १० टक्के भाडेवाढ गृहित धरल्यास महापालिका मालकीची मैदाने व उद्यानाचे भुईभाडे खालीलप्रमाणे येत आहे.

| अ. क्र. | ठिकाण | प्रतिदिन भाडे | प्रतिवर्षी १० टक्के भाडेवाढ | एकुण वर्षे १५ प्रमाण वाढीव १० टक्के भाडेवाढ | प्रस्तावित प्रतिदिन भाडे (२४ तासांसाठी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | साधु वासवानी उद्यान, निलकमल अपार्टमेंट समोर, उल्हासनगर-१ | १००० | १०० | १५०० | २५०० |
| | अ) साधु वासवानी उद्यान, सतनाम डी समोरील भाग, उल्हासनगर-१ | ७५० | ७५ | ११२५ | १८७५ |
| | ब)साधु वासवानी उद्यान, गुलमोहर अपार्टमेंट, उल्हासनगर-१ | १००० | १०० | १५०० | २५०० |
| | क)साधु वासवानी उद्यान, भगवंती नावानी स्टेज समोर, उल्हासनगर-१ | १००० | १०० | १५०० | २५०० |
| | ड)साधु वासवानी उद्यान, | १५०० | १५० | २२५० | ३७५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | भगवंती नावानी स्टेज समोर, उल्हासनगर-१ | | | | |
| २ | म्युन्सिपल बाल उद्यान, बोटक्लब, पवई चौक, उल्हासनगर-३ | ३००० | ३०० | ४५०० | ७५०० |
| ३ | अ) लायन उद्यान, सपना टॉकीजच्या बाजुला | १००० | १०० | १५०० | २५०० |
| | ब)लायन उद्यान, सपना टॉकीजच्या जवळ | १००० | १०० | १५०० | २५०० |
| | क) लायन गार्डन, अ व ब | १५०० | १५० | २२५० | ३७५० |
| ४ | म्युन्सिपल लॉन (महापालिका मुख्यालय मागील भाग ) | १५०० | १५० | २२५० | ३७५० |
| ५ | उद्यान कम यात्री निवास, कलानी महल समोर, उल्हासनगर-२ | १००० | १५० | २२५० | ३७५० |
| ६ | पप्पु सोसायटी समोरील उद्यान, उल्हासनगर-३ | ४०० | ४० | ६०० | १००० |
| ७ | दसरा मैदान, उल्हासनगर-३ | १००० | १०० | १५०० | २५०० |
| ८ | दसरा मैदान, उल्हासनगर-३ विवाहा व्यतिरिक्त अन्य व्यापारीसमारंभ/कार्यक्रमांसाठी | १५०० | १५० | २२५० | ३७५० |
| ९ | जिजामाता उद्यान, उल्हासनगर-४ | ७५० | ७५ | ११२५ | १८७५ |
| १० | गगन बालाजी उद्यान, उल्हासनगर-४ | ४०० | ४० | ६०० | १००० |
| ११ | बॅ.नं १६३ जवळील उद्यान, उल्हासनगर-४ | ४०० | ४० | ६०० | १००० |
| १२ | कुर्ला कॅम्प उद्यान, वार्ड न. २८ उल्हासनगर-५ | ७५० | ७५ | ११२५ | १८७५ |
| १३ | स्वामी भोजराज उद्यान, वार्ड ३७ उल्हासनगर-५ | ४०० | ४० | ६०० | १००० |
| १४ | बॅ. नं. १८२२ जवळील उद्यान उल्हासनगर-५ | ५०० | ५० | ७५० | १२५० |
| १५ | स्वामी प्रीतमदास उद्यान, उल्हासनगर-५ | ४०० | ४० | ६०० | १००० |
| १६ | दसरा मैदान, उल्हासनगर-५ | ७५० | ७५ | ११२५ | १८७५ |

उपरोक्त उद्याने, मैदाने नागरिकांच्या सार्वजनिक वापरासाठी उपलब्ध रहावीत म्हणुन विनामुल्य देण्यात येवू नयेत. तसेच त्यांचे भुईभाडे अधिकतम ठेवल्यास एकतर महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्न मिळेल व भाडे अधिक असल्याने ते वापरण्यासाठी मागण्याची प्रवृत्ती कमी होईल.

म्हणुन उपरोक्त उद्याने /मैदाने नोंदणीकृत ट्रस्ट व नोंदणीकृत संस्था व इतरांना तसेच केवळ सार्वजनिक पुजा , अर्चा सार्वजनिक धर्मदाय प्रयोजनासाठी किंवा राजकीय पक्षांच्या सभेसाठी तसेच खेळाच्या स्पर्धेसाठी किंवा त्यांच्या वापरासाठी फायदा मिळविण्याचा उददेश नाही अशा कामासाठी दिल्यास उपरोक्त

परिशिष्टामधील रकाना क्रमांक ६ प्रमाणे भाडे आकारणी करण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे. उपरोक्त मैदाने / उद्याने लग्न समारंभ/ मुंज/वाढदिवस / व्यापारी कामासाठी / कार्यक्रमासाठी देण्याचे झाल्यावर ५ पट भाडे आकारणी करण्याचे प्रस्तावित आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (२५)व (२६) प्रमाणे खालील उद्देशासाठी किंवा महापालिकेतर्फे आयोजित कार्यक्रमासाठी विनामुल्य देण्यासाठी महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करणेत येत आहे.

सदरचे मैदाने / उद्याने उपरोक्त भाडयाने दिल्यास वापराबाबत पुढील अटी शर्ती शिवाय योग्य त्या अटी शर्ती टाकण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना राहतील. तसेच मैदाने / उद्याने यांचे व महापालिकेच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्यांची भरपाई देण्याचे बंधन वापरणारावर राहील व ती रक्कम वसुल करण्याचा आयुक्तांना अधिकार राहील.

१. उद्याने /मैदाने नोंदणी करते वेळेस १ भाडे व भाडया एवढया अनामत रक्कमेचा रोख भरणा करावा लागेल.



२. ज्या उद्देशासाठी परवानगी देण्यात आलेली आहे त्या उद्देशा करिताच मैदानाचा वापर करण्यात यावा.
३. संस्थेने /परवानाधारकाने विद्युत पुरवठा हा स्वतःच्या खर्चाने घ्यावा.
४. उद्याने /मैदानातील रस्ते, लॉन्स इत्यादी ठिकाणी खड्डे खोदु नयेत.
५. वीज पुरवठा हा महानगरपालिकेच्या खांबावरून न घेता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या परवानगीने वीज मंडळाच्या मुख्य खांबावरून घ्यावा.
६. ध्वनी प्रदुषण होणार नाही याची काळजी घ्यावी.
७. अग्निशमन प्रतिबंधक उपाययोजना करण्यात यावी.
८. परवानगी समाप्त होताच जागेवर कुठल्याही प्रकारचा कचरा वा टाकावु वस्तु/ अवशेष ठेवु नयेत.
९. सदर कार्यक्रमास पोलीस विभागाची परवानगी घेण्यात यावी.
१०.सदर जागेवर कोणतेही बांधकाम करू नये.
११.कार्यक्रमाच्या ठिकाणी शांतता /सुव्यवस्था व सुरक्षा राखण्याची जबाबदारी परवाना धारकावर राहील.
१२.परवानगीची मुदत संपल्यावर सकाळी ११ वाजेच्या आत मैदान खाली करण्यात यावे अन्यथा प्रती तास २०० रू. दंड आकारण्यात येईल.
१३. अंतर्गत सुशोभिकरण करताना मंडप ठेकेदाराने उद्यानाच्या / मैदानाच्या /रस्त्याच्या ठिकाणी खड्डे खोदु नये.

१४. वापरातील जागेवर कचरा टाकल्यास, खड्डे केल्यास किंवा महापालिकेच्या मालकत्तेचे नुकसान केलेले असल्यास तेवढी रक्कम किंवा त्याबद्दलचा खर्च किंवा नुकसान भरपाई म्हणून अनामत रक्कमेमधुन वसुल केला जाईल.

उपरोक्त प्रस्तावास महासभेची मान्यतेस सादर करण्यात येत आहे.

**सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ८** दिनांक:-२४/५/२००२.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंदसिंह भुल्लर.

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार पुर्वीच्या महासभा ठराव क्र. ८ दि. ३०. ६.२००० व ठराव क्र. १७ दि. १९.७.२००० मध्ये बदल करून वरील अटी शर्ती व निर्बंध आणि त्याव्यतिरिक्त आयुक्त ठरवतील अशा अतिरिक्त अटी शर्ती व निर्बंधांवर उल्हासनगर महानगरपालिकेची प्रत्येक उद्याने व मैदाने यांचे समोरील उक्त कोष्टकातील ६ व्या स्तंभात निर्दिष्ट केलेल्या रक्कमेचे भुईभाडे आकरणेस मान्यता देत आहे.

परंतु ——

१. उपरोक्त उद्याने / मैदाने नोंदणीकृत ट्रस्ट व नोंदणीकृत संस्था व इतरांना सार्वजनिक पूजा-अर्चा किंवा सार्वजनिक धर्मादाय प्रयोजनासाठी किंवा राजकीय पक्षांच्या सभेसाठी किंवा खेळाच्या स्पर्धांसाठी ज्यांचा फायदा मिळविण्याचा उददेश नाही अशा वापरासाठी स्तंभ क्र६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रक्कमे ऐवजी केवळ ५०० रू. भुईभाडे आकारण्यांत येईल.



२. लायन उद्यान व जिजामाता उद्यान कुठल्याही प्रयोजनासाठी भाडयाने देता कामा नये.
३. उपरोक्त मैदाने / उद्याने लग्न समारंभ किंवा व्यावसायिक कामासाठी किंवा इतर कुठल्याही कार्यक्रमाच्या वापरासाठी स्तंभ क्र६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रक्कमे ऐवजी त्याच्या ५ पट रक्कम भुईभाडे म्हणुन आकरण्यांत येईल.
४. उपरोक्त मैदाने / उद्याने फनफेअर, जुगार आणि अवैध वापरासाठी देता कामा नयेत.
५. उपरोक्त मैदाने / उद्याने मुंज किंवा वाढदिवसाच्या प्रयोजनासाठी स्तंभ क्र. ६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रक्कमेच्या आकाराप्रमाणे वापरण्यास देण्यात येतील.
६. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ६६ (२५) व (२६)मध्ये नमुद केलेल्या प्रयोजनासाठी आणि महानगरपालिके तर्फे आयोजित कार्यक्रमासाठी विनामुल्य देणेस आयुक्तांचे स्वइच्छाधीन राहील.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:-</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

<u>विषय:-</u> मागील सभेच्या ठराव क्र. ६ अन्वये माध्यमिक

शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समितीवर श्रीमती. मिनू दासानी यांची नेमणुक झाल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला असुन त्यांच्या ऐवजी इतर कोणत्त्याही सदस्यांची नेमणूक करणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>राजीनामा का देत आहे?

<u>मा. सचिव:-</u>त्यांना ती समिती नको.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>मग त्यांच्या जागी कोण येत आहे.

<u>मा. सचिव:</u>- श्री. महेंद्र मुलचंदानी यांचे नाव प्रस्तावित केले गेले आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>त्यांना आधी विचारा ते येवू इच्छितात का? नाहीतर परत राजीनामा देतील.

<u>मा. सचिव:-</u>त्यांचे लेखी पत्र आले आहे. हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता त्वरीत अंमलात आणण्यात येईल. असा प्रस्ताव आहे.

--८०--

<u>विषय:-</u> मागील सभेच्या ठराव क्र. ६ अन्वये माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समितीवर श्रीमती. मिनू दासानी यांची नेमणुक झाल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला असुन त्यांच्या ऐवजी इतर कोणत्त्याही सदस्यांची नेमणूक करणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

दि. २६.४.२००२ च्या विशेष महासभेतील ठराव क्र. ६व्दारे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये ८ विशेष समित्त्यांची नेमणुक करण्यात आली होती. प्रत्येक समितीत ९ पालिका सदस्यांचा समावेश आहे. त्यामधील पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समितीच्या ९ सदस्यांपैकी श्रीमती. मिनु दासानी या सदस्यांनी दि. ३.५.२००२ रोजी या समितीतून राजीनामा दिला आहे. त्यामुळे त्या समितीत एका सदस्याचे पद रिकामे झाले आहे.

त्याअर्थी श्रीमती मिनु दासानी हया पालिका सदस्याऐवजी नवीन सदस्य पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समितीत नेमणुक करणेस या महासभेपुढे प्रस्तावित.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. </u> ९ <u>दिनांक:-२४/५/२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्रीमती. ज्योती कालानी
अनुमोदकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

हि महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता श्री. महेंद्र मुलचंदानी यांना माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समितीवर श्रीमती. मिनु दासानी यांच्या जागी नेमणूक करित आहे.

तसेच पूढील सभेकडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता वरील ठरावा अंर्तगतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकांची सही/-

अनुमोदकांची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७. ३० वाजता सभा संपल्याचे मा. महापौर यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

दिनांकः-२०/६/२००२

<u>इतिवृत्त</u>

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/६/२००२ रोजीच्या</u>
<u>सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरूवार दि. २० ६ २००२ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती.मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शाविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

<u>१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.</u>
<u>२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३५. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३६. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३७. | श्रीमती. भावना रवी खिलनानी |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ३८. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ७. | श्रीमती. रामचंदानी भावना | ३९. | श्री.राजेश उर्फ राज जयसिंग असरोंडकर |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४० | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ९. | श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास | ४१. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १०. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४२. | श्री. जाधव सुरेश मधुकर |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४३ | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४४. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| १३. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४५. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| १४. | श्रीमती. पाल अधारी राजाराम | ४६. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १५. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४७. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १६. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४८. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १७. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४९. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १८. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५०. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १९. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५१. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| २०. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन | ५२ | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| २१. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५३. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| २२. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५४. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| २३. | श्रीमती.गुप्ता आशा प्रभुनाथ | ५५. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २४. | श्री. नाना आनंदा पवार | ५६. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २५. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५७. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २६. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५८. | श्री.साधवानी मनोज लालचंद |
| २७. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५९. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २८. | श्री. शांताराम ओंकार निकम | ६०. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २९. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६१. | श्री. जयसिंघानी अनिल |
| ३०. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६२. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| ३१. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६३. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| ३२. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६४. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३३. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६५. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३४. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | | |



तर

मा. सदस्य / सदस्या १. श्रीमती. वनवारी मोना अशोक, २ श्री. मोहन साधवानी, ३. श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल ४ श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण, ५ श्रीमती. किरण लखी माखीजा,६ श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना,७ श्रीमती. छाब्रिया भारती, ८. श्रीमती. इंदु रामचंद भठिजा, ९. श्री.बहरानी मोहन वर्यलदास १०. श्रीमती. मीनू दासानी, ११. श्री. बेहरानी ठाकूरदास वरीयलदास हे / हया सभेस अनुपस्थित होते / होत्त्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ३५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. १ ....

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>मा. महापौरजी, आमचे भाजपाचे गटनेता श्री. जमनादास पुरस्वानी यांच्या मातोश्रींचे निधन झाले आहे. त्यांना श्रध्दांजली अर्पित करण्यांत यावी.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>अजुन एक शोक प्रस्ताव आहे. आपले अतिक्रमण विभागाचे कर्मचारी श्री. मुरली भोईर यांचे निधन झाले आहे.

मा. सचिवः-कृपया सर्वांनी दोन मिनिटे श्रध्दांजलीसाठी उभे राहावे.

शोक प्रस्ताव :-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या अतिक्रमणे व अनाधिकृत बांधकामे नियंत्रण विभागात कार्यरत असलेले श्री. मुरली दामोदर भोईर हे उल्हासनगर ३ येथे एक अनाधिकृत बांधकाम निष्कासनाचे काम करत असताना दि. ६ ६.२००२ रोजी विजेच्या धक्याने त्यांचे अकस्मित निधन झाले. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेचे नगरसेवक श्री. जमनादास पुरस्वानी यांच्या मातोश्री श्रीमती ईश्वरीबाई खुबचंद पुरस्वानी यांचे पण नुकतेच निधन झाले.



त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ९ अ दिनांकः-२० ६.२००२.

सुचकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रमेश चव्हाण.

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. मुरली दामोदर भोईर तसेच श्रीमती. ईश्वरीबाई खुबचंद पुरस्वानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

इकडे सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळुन श्रध्दांजली अर्पित केली.

मा. सचिवः- विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषयः- सन २००२ व २००३ करिता करांचे दर निश्चित करणे आणि स्थायी समितीच्या अर्थसंकल्पिय अंदाजास अंतिम

स्विकृती देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आज २००२-२००३चे अंदाजपत्रक सादर करण्यात येत आहे. त्याबाबतीत काल व्यापारी महामंडळ व शहराचे मा. आमदार श्री. सुरेश पप्पु कालानी ,उल्हासनगर मॅन्युफॅक्चररस् असोसिएशन, महापौर, उपमहापौर, मी , श्री. बच्चाराम रूपचंदानी इत्त्यादी सर्वांनी याबाबतीत एकमत व्हावे यासाठी बैठक बोलावली होती. माजी महापौर श्री. हरदास माखिजा यांनी सांगितले की, तुम्ही व्यापारी वर्गाशी बैठक घेवून त्यांचे मत घ्या. नाही तर उल्हासनगर मॅन्युफॅक्चररस् असोसिएशन, व्यापारी महामंडळाने उल्हासनगर बंदचे आव्हान केले आहे. त्यांचे म्हणणे असे होते की, तुम्ही जकात बाबींवर करवाढ करत आहात त्यात काही बाबींवर आमची हरकत आहे. व काही अशा बाबी आहेत ज्यावर तुम्ही



दर वाढवायचा पाहिजे होते तिथे वाढविले नाहीत. अशी एक सर्व पक्षीय बैठक ज्यात काही पक्षाचे नेतेगण राहीले होते. रविवारी व्यापारी वर्ग व सर्व पक्षीय गटनेते यांची बैठक घेवून काही तरी ठोस निर्णय घेतला जाईल. नंतर महासभेत अंदाजपत्रक सादर केले जावे असे सर्वांचे मत त्यावेळी होते. महासभा स्थगित करून २७ तारखेला ४.०० वाजता ठेवण्यात यावी. व रविवारी सर्व पक्षीय गटनेते व व्यापारी वर्ग यांची संयूक्त बैठक बोलावली जाईल. त्यात हे ठरवू जेणेकरून व्यापारी वर्गाला पुढे त्रास होणार नाही. तसेच उल्हासनगर महापालिकेची आर्थिक स्थिती पाहुन आम्ही जी दरवाढ केली आहे. आयुक्तांनी ही परिस्थिती पाहुन वृध्दी केली होती. आधी असे ठरले होते की, जकात सोडुन मालमत्ता कर व पाण्याचे दर यात काही वाढ करायची नाही. जकात बाबींवर दर वाढ केली असता व्यापारी वर्ग हरकत घेत आहे. म्हणुन रविवारी बैठक बोलावण्यात येत आहे. म्हणुन मी मा. महापौर, सर्व पक्षीय गटनेता या सर्वांना विनंती करेन की आजची सभा स्थगित करून २७ तारखेला ४.००वाजता ठेवली तर बरे होईल.

<u>मा. सचिव:-</u>कुणाची काही हरकत आहे का?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-</u>महासभा स्थगित करण्याचा अधिकार महापौरांचा आहे. परंतु आज सकाळी यु.एस.ए. केबल ने टिव्ही वर एक स्ट्रिप चालवली होती त्यामध्ये हे सांगितले होते की, आजची सभा स्थगित करून ही सभा २७ तारखेला ठेवली आहे. महापौर व या सभेला तो निर्णय घेण्याचा अधिकार आहे. हा अपमान आहे. हे अधिकार यु.एस.ए. केबलला कुणी दिले हा मुददा इथे उपस्थित होतो. सभागृहाचे मत घेण्याआधी तुम्ही यु.एस.ए. ला मुलाखत दिली होती का ही सभा स्थगित केली जाईल.

<u>मा. महापौर:-</u>आम्ही यु.एस.ए. केबलवाल्यांची याविषयी तपासणी करू.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-</u>हे चुकीचे ठरले तर त्यावर कार्यवाही करण्यांत यावी.

मा. महापौरः-ठिक आहे. त्याविषयी चौकशी करू. आजची सभा सर्वानुमते दि. २७.६.२००१रोजी सायंकाळी ४. ०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

मा. सचिवः-
कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर मा. महापौर यांनी दि. २७.६.२००१रोजी सायंकाळी ४. ०० वाजेपर्यंत सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-२७/६/२००१

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२७/६/२००१ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दि. २०.६. २००१ रोजी सांयकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती सदर सभा स्थगित करून गुरूवार दि. २७.६.२००१ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती.मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शाविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.

२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ४१. | श्री.राजेश उर्फ राज जयसिंग असरोंडकर |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ४२. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ४३. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४४. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ७. | श्रीमती. रामचंदानी भावना | ४५. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४६. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ९. | श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास | ४७ | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| १०. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४८. | श्रीमती. कारीरा रेखा |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४९. | श्री. पमनानी इश्वर सतरामदास |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ५० | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १३. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ५१. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १४. | श्रीमती. पाल अधारी राजाराम | ५२ | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १५. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ५३. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १६. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५४. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |

| | | | |
|---|---|---|---|
| १७. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १८. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १९. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५७. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| २०. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन | ५८. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २१. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५९. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २२. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ६० | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २३. | श्रीमती.गुप्ता आशा प्रभुनाथ | ६१. | श्री.साधवानी मनोज लालचंद |
| २४. | श्री. नाना आनंदा पवार | ६२. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २५. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ६३. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २६. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ६४. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २७. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६५. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २८. | श्री. शांताराम ओंकार निकम | ६६. | श्रीमती. किरण लखी माखिजा |
| २९. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६७. | श्री. होशियारसिंग हरीसिंग लबाना |
| ३०. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६८ | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| ३१. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६९. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| ३२. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ७०. | श्रीमती. डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३३. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ७१. | श्रीमती. भारती छाब्रिया |
| ३४. | श्री. वनवारी मोना | ७२. | श्रीमती. इंदु भठिजा. |
| ३५. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७३. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३६. | श्री. मोहन साधवानी. | ७४. | श्री. बेहरानी मोहन |
| ३७. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ७५. | श्रीमती.मीनु दासानी |
| ३८. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७६. | श्री.बेहरानी ठाकुरदास |
| ३९. | श्रीमती. भावना रवी खिलनानी | | |
| ४०. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | | |

तर

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ३५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. १.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, विषय सुरू करण्याआधी मी शहरात आलेल्या पुराविषयी बोलु इच्छितो. शासन व प्रशासनाच्या लापरवाहीमुळे फक्त २४ तासाच्या पावसाने या शहराला पाण्यात बुडविले. सत्तापक्षाचे काही नगरसेवक व विपक्ष नगरसेवक पाणी काढत होते.

<u>मा. महापौरः-</u>ही बजेटची सभा आहे याबाबतीत पुढच्या सभेत बोला.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>हा गंभीर विषय आहे शहराचा प्रश्न आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी / मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>हा गंभीर विषय आहे याविषयी चर्चा झाली पाहिजे.

<u>मा. महापौरः-</u> हा विषय पुढच्या सभेत घेवू.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-शहरात पुर आला होता व आयुक्त शहराबाहेर होते. आम्ही फोन केला होता त्यांनी मोबाईल बंद करून ठेवला होता. काही उत्तर मिळत नव्हते. किती झोपडया पाण्यात वाहिल्या.

मा. महापौरः-आयुक्त शहराबाहेर होते तरी व्यवस्था करण्यात आली होती. हा विषय पुढच्या सभेत घेवू.



मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-पुढच्या सभेपर्यंत शहरच शिल्लक नाही राहिले तर तुम्ही काय करणार?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-पुढच्या सभेपर्यंत शहर बुडाले तर तुम्ही जबाबदार राहणार का?

मा. महापौरः-ही बजेटची सभा आहे आता विषयाला सुरूवात करा.

मा. सचिव :-विषय क्र. १ पुन्हा वाचुन दाखवितात.

विषय :-सन २००२-२००३ करिता करांचे दर निश्चित करणे आणि स्थायी समितीच्या अर्थसंकल्पिय अंदाजास अंतिम स्विकृती देणे बाबत.

मा.महापौरः-मी मा. स्थायी समिती सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांना मंचावर आमंत्रित करते.

इथे मा. स्थायी समिती श्रीमती. ज्योती कालानी हया मंचावर आसनस्थ झाल्या.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-मा. महापौरजी, सभापतीनी अंदाजपत्रक प्रस्तुत करण्याआधी मी आयुक्तांना सांगु इच्छितो की, दरवर्षी एप्रिल महिन्यात आयुक्तांचे हे कर्तव्य असते लेखा विभागाचा अहवाल अंदाजपत्रकाआधी दयायला पाहिजे होता. स्थायी समिती सभेच्या आधी त्यांनी दिले नव्हते. मी आयुक्तांना विचारू इच्छितो मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ९४ कलम हे महापालिकेला लागु नाही का? कारण की बजेट तयार होण्याआधी आम्हाला हे माहिती पाहिजे की आपल्यावर दायित्त्व किती आहे? आपल्याला काय खर्च करायचा आहे? यावर्षात महापालिकेत आपण काय केले आहे? अंदाजपत्रक प्रस्तुत करण्याआधी आयुक्तांनी यावर प्रकाश टाकावा.

मा. महापौरः-ही बजेटची मिटींग आहे इतर विषय काढु नका.

काही विपक्ष सदस्यः-हे बजेट संदर्भातच बोलत आहेत.

मा. सदस्य जमनादास पुरस्वानीः-९४ कलमात स्पष्ट लिहिले आहे.

मा. महापौरः-तुम्ही आता काही बोलु नका. पुढच्यावेळी बोला.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-आम्ही बजेटवरच बोलत आहोत इतर काही नाही.

मा. महापौरः-आधी भाभींना बजेट प्रस्तुत करू दया नंतर त्याविषयी चर्चा करू.



मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-इथे लिहिले आहे बजेट कसे सादर केले पाहिजे.

काही विपक्ष सदस्यः-आम्ही बजेट विषयी बोलत आहोत.

मा. महापौरः-जे काही बोलायचे आहे ते भाभींनी बजेट प्रस्तुत केल्यानंतर बोला.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-आयुक्तांनी आधी लेखा शिर्ष अहवाल दिला पाहिजे त्यांनतर बजेट सादर केले पाहिजे.

मा. महापौरः-तुम्ही खाली बसा. काय बोलायचे ते नंतर बोला.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-सचिव साहेब तुम्ही सांगा ९४ कलमान्वये आयुक्त साहेबांना पुर्ण सविस्तर अहवाल दयायचा आहे. त्यांनी ३ महिने अर्थसंकल्प तयार केला होता. आम्हाला त्यांनी सविस्तर अहवाल दिला पाहिजे.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-मॅडम, तुम्हाला समजत नाही तर सचिव साहेब बोलत आहेत ना?

मा. सचिव :-सन्माननिय स्थायी समिती सभापती अंदाजपत्रक सादर करतील त्यानंतर तुम्हाला बोलण्याची संधी दिली जाईल. हे जरी बजेट संदर्भीत असले तरी आधी त्यांना बजेट प्रस्तुत करू दया.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-मागच्या सभेत सभागृह नेता म्हणाले होते की, आजची सभा स्थगित करून पुढच्या वेळेस घेवू त्या दरम्यान सर्व पक्षीय गटनेते यांना व व्यापारी महामंडळाच्या लोकांना बोलवून बैठक घेवू. परंतु अशी काही बैठक आयोजित केली नाही. आम्हाला बोलावले नाही. विरोधी पक्ष नेत्यांना बोलावले नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः- याचे स्पष्टीकरण दया.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-सन्माननिय महापौरजी, मी बजेट सादर करण्याआधी काही सांगु इच्छितो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-नंतर तुम्हाला बोलण्याची संधी दिली जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-तुम्ही सभा चालु करण्याआधी बोलला होता. सभागृह नेता एकावेळी एक बोलतात, दुस-यावेळी दुसरे बोलतात.

मा. महापौरः-मा सभापतीना अंदाजपत्रक सादर करावे.
मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-वनवारी साहेब तुम्ही एकावेळी एक बोलता दुस-यावेळी दुसरे तुम्हीच म्हणाला होतात सर्व पक्षीय गटनेत्त्यांना बोलवू.



मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-अजुन जर एखादे मंडळ किंवा संस्था शिल्लक राहीले असेल तर त्यांनाही बोलवा त्यांची पण परवानगी घ्या. सामान्य जनतेला विचारायची तुम्हाला गरज वाटत नाही. गरीब माणसांना तुम्ही नका विचारू.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-सगळया व्यापारी मंडळांची झाली का मिटिंग. नाही तर त्यांना पण काही हरकत असेल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-जर निर्णय घरात किंवा बाहेर होणार असतील तर महासभेत ठेवण्याची गरज काय?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आमचे मा. विरोधी पक्षनेता श्री. रमेश चव्हाण व मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांनी जो मुददा उपस्थित केला. आताच मा. महापौरांनी श्री. जमनादास पुरस्वानी व श्री. बच्चाराम रूपचंदानी यांना सांगितले की, ९४ कलमाचा मुददा बजेट संदर्भात आहे. परंतु तुम्हाला जे काही मुददे उपस्थित करायचे आहेत. ते आधी स्थायी समिती सभापतींना अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक अंदाज प्रस्तुत करू दे त्यानंतर करा.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-नंतर तरी संधी देणार ना? नाही तर म्हणाल पास पास.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-तुम्हाला दोन दोन मिनिटे संधी दिली जाईल.

सायंकाळी ५.०० वाजता मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया या सभागृहातुन बाहेर पडल्या त्यांच्या आसनावर मा. उपमहापौर श्रीमती. जया साधवानी या पिठासिन अधिकारी स्थानी आसनस्थ झाल्या.

मा. स्थायी समिती सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी पुढीलप्रमाणे अंदाजपत्रक सादर केले.

--६--

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः</u>-मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, गटनेता, प्रभाग समिती तसेच इतर समितींचे सभापती सन्माननिय नगरसेवक नगरसेविका अधिकारी कर्मचारी पत्रकार बंधु, उपस्थित नागरिक आपणांसर्वांचे नव्याने गठित झालेल्या महानगरपालिकेच्या पहिल्या वर्षाच्या बजेट सभेमध्ये सर्वांचे हार्दिक स्वागत करत आहे.

कोणतेही काम करताना आपण एक योजना तयार करतो. आणि ती योजना आपल्याला उपलब्ध असलेल्या साधनाव्दारे विहित वेळेत पुर्ण करू इच्छितो. काम करते वेळेस आपण आपल्या मागच्या वेळेचा परफॉमन्स लक्षात घेतो. व त्यानुसार योजनांमध्ये जरूरी ते फेरबदल करतो. जेणेकरून आपण योजलेल्या कार्यात त्याची मदत होते. आपण आपल्या वैयक्तिक आयुष्यातपण अशाप्रकारच्या प्रक्रिया करत असतो परंतु आपल्याला त्याची जाणीव सुध्दा नसते. ते काय आहे? " **तो आहे अर्थसंकल्प** " ही आपल्या जीवनाची एक आवश्यक बाब आहे.

फेब्रुवारी २००२मध्ये शासनाव्दारे निर्धारित केलेल्या निवडणुक प्रक्रिया फेब्रुवारी २००२मध्ये पार पडल्या. शहराला २५ प्रभागामध्ये विभागले गेले. प्रत्येक प्रभागाचे क्षेत्र पहिल्या पेक्षा जास्त केले गेले. या नव्या निवडणूक प्रणाली मध्ये कित्येक नगरसेविक, नगरसेविका पहिल्यांदा निवडून आल्या असून आज आपल्याबरोबर उपस्थित आहे. मी त्यांचे या अर्थसंकल्पीय सभेत विशेष स्वागत करते.

आपण सर्व लोकांचा विश्वास जिंकुन महापालिकेचे प्रतिनिधी म्हणुन निवडून आले आहेत. त्यामुळे शहरातील जनतेच्या नागरी सेवा संबंधी काही अपेक्षा आपल्याबरोबर संलग्न आहेत. निवडून आलेले प्रतिनिधी आपल्या कालावधीत प्रभागात काय काय योजना राबवायच्या याचे चित्र आपल्या मनात रेखाटतात. आणि या योजना पुर्ण व्हाव्यात अशी त्यांची इच्छा असते. यासर्व अपेक्षांचा सरळ संबंध महापालिकेच्या अर्थसंकल्पाशी निगडीत आहे. म्हणुन कृपया सर्वांनी आपले लक्ष बजेटवर केंद्रीत करावे.

मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी हे सभागृहातुन बाहेर पडले.

मराठीमध्ये म्हण आहे " अर्थसंकल्प ही तारेवरची कसरत आहे" ज्या त-हेने एक कलाकार हातात काठी घेवुन तारेच्या एका बाजुने दुस-या बाजुकडे जाताना आपला समतोल साधुन असतो अशाच त-हेने अर्थसंकल्प तयार करतेवेळी उत्पन्न व खर्च यामध्ये समतोलपणा राखावा लागतो. उत्पन्न जरूरीपेक्षा जास्त व्हावे हे योग्य नाही. कारण की महानगरपालिका ही सेवाभावी संस्था आहे. याच त-हेने अवाजवी खर्च करणे हे पण ठिक नाही. कारण की, टॅक्स च्या माध्यमातुन वसुल केलेला पैसा हा जनतेचा पैसा आहे.

मा. आयुक्तांनी ११ जून २००२ रोजी स्थायी समिती समोर १०४ करोड रू. उत्पन्न व १५३. ४२करोड रू. खर्चाचा अंदाज सादर केला होता. उत्पन्न आणि खर्च या दरम्यान ४९ करोड रू. ची तुट पूर्ण व्हावी म्हणुन प्रशासनाने जकात, मालमत्ता तसेच पाण्याच्या दरांमध्ये जास्त प्रमाणात दरवाढ प्रस्तावित केली होती. आयुक्तांव्दारे आणल्या गेलेल्या विविध दरांमध्ये वाढ तसेच उत्पन्न आणि खर्चाच्या

प्रस्तावावर स्थायी समितीच्या सर्व सदस्यांनी संबंधित अधिका-यांशी चर्चा करून स्थायी समिती ठराव क्र. १७ दि. १४.६.२००२ नुसार जे अंदाजपत्रक तयार केले ते मी तुमच्यासमोर सादर करीत आहे.



१ <u>जकात :-</u>

शहरात आयात होणा-या विविध वस्तुंना उल्हासनगर महानगरपालिका जकात नियमानुसार ८६ भागात दर्शाविले आहे. त्यापैकी प्रशासनाने ४० वस्तुंवर दरवाढीचा प्रस्ताव सुचविला आहे. व त्याप्रमाणे २४. २७ करोड रू. ची अपेक्षा केली आहे.

२ <u>मालमत्ता कर :-</u>

उल्हासनगर शहरातील सर्व घरांवर लावले जाणारे ४१. ५ टक्के कराला ७०. ५ टक्के पर्यंत वाढविण्याचे तसेच बिगर घरगुती वापरासाठी ९०. ५ टक्के वाढविण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर आणला गेला होता. त्याच बरोबर मालमत्ता नाव बदलीसाठी २ टक्के कर वाढविण्याचा प्रस्ताव ठेवला गेला होता. यासर्व कर वाढीमुळे १०. २० करोड रू. चे उत्पन्न मिळेल असा अंदाज केला होता.

मा. सदस्या श्रीमती. इंदु भठिजा या सभागृहातुन बाहेर पडल्या.

३ <u>पाणी पुरवठा :-</u>

इतर करांप्रमाणे पाणी पुरवठा दरात देखिल जवळपास दुप्पट वाढ करण्याचे प्रस्ताव प्रशासनाने स्थायी समिती समोर ठेवून १५ करोड रू. ची वाढ दाखवली होती. प्रस्तावित दरांचे विवरण खालील प्रकारे आहे.

अ)

| अनुक्रमांक | बांधकामाचा प्रकार | प्रचलित दर | प्रस्तावीत दर |
|---|---|---|---|
| | | (दर महा) | (दर महा) |
| १ | आरसीसी व टिअर गर्डर | १०० | २०० |
| २ | पत्राचे छत व विट बांधकाम | ५० | १२५ |
| ३ | व्यापारी घरपट्टी धारक (सर्व प्रकारचे बांधकाम) | ६० | १०० |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | झोपडी | ४० | ७५ |



महानगरपालिकेची ही तिन्ही उत्पन्न साधने प्रमुख आहे परंतु खर्चाचा जो प्रश्न आहे तो बेहिशोबी आहे. याशिवाय

१. महानगरपालिकेच्या कर्मचा-यांच्या पगारात दरवर्षी दोन-तीनदा वाढ निश्चित आहे.
२. नागरी सुविधा जसे की रोड, रोषणाई, साफ-सफाई इत्यादीवर दिवसेंदिवस वाढत जाणारा खर्च.
३. शहरात पाणी वितरण सेवा सवलत दरांमध्ये देण्यामुळे दर वर्षी जवळ जवळ १५ ते १६ कोटी रू. चे नुकसान.
४. महापालिकेच्या जुनी देणी न फेडणेची असमर्थता.
५. एम.आय.डी.सी ला पाणी बिल भरण्यास असमर्थता आणि यामुळे एम.आय.डी. सी व्दारा विलंब शुल्क आकारण्यात आले.
६. भारतीय संविधानातील ७४व्या घटना दुरूस्तीमुळे महानगरपालिकेवर नव्याने लादले गेलेले. कार्य आणि कर्तव्य जसे की, दारीद्रय निर्मुलन, घन कचरा व्यवस्थापन ,सामाजिक आणि आर्थिक विकास इत्यादी.
७. महानगरपालिकेला मिळणा-या अनुदानामध्ये दिवसेंदिवस कपात.
८. जनतेच्या महानगरपालिकेशी नागरी सेवा संबंधी दिवसेंदिवस वाढत्या अपेक्षा.

राज्यातील बहुतेक नगरपालिका तथा महानगरपालिकांचे उत्पन्नाची साधने मर्यादीत आहेत. तसेच आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस वाढत जाणा-या नागरी सुविधांसाठी सक्षम नाही. ही गोष्ट लक्षात घेवून भारतीय संविधानामध्ये वित्त आयोग गठित करण्याची तरतुद केली आहे. या तरतुदी अन्वये राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य वित्तिय आयोगाचे पाच वर्षापुर्वी गठित केले होते. राज्य वित्त आयोगाने महापालिका तथा नगरपालिकेच्या आर्थिक बाबींशी निगडित असलेले बारकाव्यांची समिक्षा आपल्या कार्यकालात केली आहे. पंरतु इतक्या वर्षानंतर देखिल आजपर्यंत महापालिकेची आर्थिक स्थिती मजबुत करण्यासठी काही ठोस मार्ग निघाले नाही परिणाम हा झाला की ''स्वत: कमवा आणि स्वत: खा''. ''स्वावलंबी बना'' आणि कुठल्याही प्रकारची कायम स्वरूपी मदतीची अपेक्षा कुणाकडुन करू नका.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी हे सभागृहातुन बाहेर पडले.

वरील दर्शविलेली वस्तुस्थिती लक्षात घेतली गेली तर प्रशासनाने सुचविलेल्या दर वाढ प्रस्तावास मान्य करण्याशिवाय काही पर्याय नाही असे वाटते. परंतु मराठीमध्ये असलेल्या म्हणी प्रमाणे तारेवरची कसरत करून स्थायी समितीच्या सर्व सन्माननिय सदस्यांनी आवश्यक वाटणा-या सर्व जकात दरामध्ये प्रस्तावित केल्या गेलेल्या २४ करोड रू. च्या वाढीमध्ये काही वस्तुंच्या दरामध्ये कपात करून १६ करोड पर्यंत वाढ मर्यादित केली गेली.

आणल्या गेलेल्या मालमत्ता कर, पाणी पटटी तसेच नाव बदली या दरांमध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव नामंजुर केला गेला. शिल्लक राहिलेला तोटा भरून काढण्यासाठी महानगरपालिकेची जुनी थकबाकी येणी, वसुली, मालमत्तेचे मोजमाप तसेच उत्पन्नाच्या छोटया छोटया माध्यमातुन भरपाई करण्याचा निर्णय स्थायी समितीच्या सर्व सदस्यांनी एकत्र येवून घेतला आहे. एकुण मिळून

अंदाजपत्रकातल्या सर्व लेखाशिर्षामधुन १६३.१४ करोड रू. चे लक्ष्य स्थायी समिती व्दारे निश्चित केले आहे. याचे विवरण याप्रकारे आहे.



<u>जमा बाजू :--</u>

| | | | |
|---|---|---|---|
| | <u>प्रारंभिक शिल्लक</u> | :- | ४.०९ कोटी |
| १ | जकात | :- | ६२.०० ,, |
| २ | घरपट्टी | :- | ४०.०० ,, |
| ३ | पाणीपट्टी | :- | ४०.०० ,, |
| ४ | अनुदाने | :- | ३.७७ ,, |
| ५ | महानगरपालिका मालमत्ता/मार्केट / लायसन्स फी / दवाखाना | :- | १.५१ ,, |
| ६ | एम. आर. टी.पी ॲक्ट खाली वसुली | :- | ०.६३ ,, |
| ७ | अनामत व शासकीय वसुली | :- | ५.७१ ,, |
| ८ | कर्ज | :- | ५.०० ,, |
| ९ | संकीर्ण | :- | ०.४३ ,, |
| | एकूण | :- | १६३.१४ कोटी |

महानगरपालिका क्षेत्रातील लोकांकडुन वसुल केलेला टॅक्स स्वरूपाच्या पैशाचा जनतेच्या सुखसोयीसाठी उपयोग झाला पाहिजे. तसेच त्या बरोबर महानगरपालिका कर्मचा-यांचे हित लक्षात घेवून अंदाजपत्रकात खर्चाची तरतुद ठेवली आहे. त्याचे विवरण मी आपल्या समोर मांडत आहे.

<u>१ आस्थापना खर्च :-</u>

वर्ष २००२-२००३ मधील १६३ कोटीच्या अपेक्षित उत्त्पन्नामधुन जवळ जवळ २६ करोड रू. कर्मचा-यांचे वेतन भत्ते तथा पेन्शनसाठी ठेवले आहे. आम्ही जो मागच्या वर्षी पाचव्या वेतन आयोगामुळे मिळणारे ऐरियस दयायचे वचन दिले होते त्यानुसार कर्मचा-यांना दरमहा १००० रू दिले जात आहेत. तीच प्रथा चालु ठेवून येणा-या वर्षाच्या अंदाजपत्रकात देखिल प्रती कर्मचारी १००० रू. दरमहा देण्यासाठी तरतुद ठेवली आहे. आम्हाला हे सांगताना आनंद होत आहे की, १३ जून रोजी महाराष्ट्र सरकारने महानगरपालिकेच्या आस्थापनावर असणा-या नव्या पदांना मंजुरी दिली आहे. महानगरपालिकेत अस्थायी स्वरूपात काम करणा-या सर्व योग्य कर्मचा-यांना त्यांच्या पदावर कायम करण्यात यावे.

<u>२. एम. आय. डी. सी:-</u>

महानगरपालिकेकडे पाणी उत्त्पादनासाठी स्वत:चे साधन नसल्याने महानगरपालिका एम.आय.डी.सी कडुन पाणी खरेदी करून शहरात वितरीत करते. कित्त्येक वर्षापासुन शहरवासियांना खरेदी भावापेक्षा अर्ध्या भावाने पाणी पुरवठा करत होतो. यामुळे जवळ जवळ ८५ करोड रू. एम.आय.डी.सीचे देणे महापालिकेला आहे. या देणीमध्ये ४० कोटी रूपये विलंब शुल्क आकार याचा समावेश आहे. आम्हाला हे सांगताना आनंद होत आहे की, आमचे शहराचे आमदार मा. सुरेश पप्पु कालानी यांच्या अथक प्रयत्त्नामुळे दि. १८.७.२००२ रोजी मंत्रालयात मा. मुख्यमंत्री, श्री विलासराव देशमुख तसेच उपमुख्यमंत्री मा. श्री. छगनराव भुजबळ यांच्या निर्देशानुसार नगरविकास प्रधान सचिव मा. श्री. रामानंदजी तिवारी तसेच श्री. सुभाष लालाजीच्या अध्यक्षतेखाली

उल्हासनगर शहराच्या अनेक समस्या तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवर विचार विमर्श करण्यासाठी बैठकीचे आयोजन केले होते. त्या बैठकीत --१०--



महानगरपालिकेला विशेष अनुदान एम.आय.डी.सी व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणव्दारा आकारण्यात आलेले विलंब शुल्क आकार रदद करणे तसेच शहराशी संबंधित किंवा अन्य समस्यांवर मुददे मांडले गेले होते . या सर्व समस्यावर महानगरपालिकेच्या बाजुने ठोस निर्णय घेतला जाईल असे आम्हाला आश्वासन दिले आहे.

## ३. रस्ते विकास कार्यक्रमः-

विस्तीर्ण आणि स्वच्छ रस्ते पाहुन शहराची छवी तयार होते. वर्ष २०००-२००१मध्ये शहराच्या ३३ मुख्य रस्त्यांचे विकास काम करण्यासाठी एम.एम. आर.डी.ए. कडुन १८ करोड कर्ज तसेच महानगरपालिका निधीतुन एकुण मिळून ४० करोड रूपयांची योजना हाती घेतली गेली होती. या योजने अंतर्गत रस्त्त्याचे काम पुर्ण होत आले आहे. या योजनेत समाविष्ट असणा-या पवई आरओबी विस्तीर्ण करण्याचे काम शवेटच्या टप्यात आहे. शहरात प्रवेश करतेवेळी या आरोबी जंक्शन मधुन जावे लागते. तसेच शहरातील एका भागातुन दुस-या भागात जाण्यासाठी या मार्गावर भरपुर रहदारी असल्याने अडचण निर्माण होते. ही गोष्ट लक्षात घेवून हे पुर्ण जंक्शन तसेच वाकोइंडस्ट्रिज पेट्रोलपंप जंक्शन पर्यंतचा रस्ता २५ लाख रूपये देऊन सिमेंट कॉक्रीटने तयार करण्यासाठी रिवाईज एस्टीमेंट मंजुर केले गेले आहे. आरोबी जंक्शनच्या आजुबाजूचे पुर्ण काम या वित्तिय वर्षात संपन्न होईल याचे आम्ही आश्वासन देत आहोत. उल्हासनगर रेल्वेच्या बाजुला उड्डाण पुलासाठी दहा पिलर्स, दोन अबर्ट तसेच १० मी. स्लॅब टाकण्याचे काम पुर्ण झाले आहे. उरलेले काम देखिल युध्द पातळीवर सुरू आहे. या सर्व योजना पुर्ण करण्यासाठी आवश्यक त्या निधीची तरतुद अर्थसंकल्पात ठेवली गेली आहे. परंतु या बरोबर आणखीन काही नव्या रस्त्त्यांचा विकास करण्यासाठी अंदाजपत्रकाम तरतुद केली आहे. ज्या नव्या रस्त्त्यांचा विकास करायचा आहे ते खालील प्रमाणे आहे.

१. सिरू चौक ते बाशाराम अपार्टमेंट उल्हासनगर-२
२. बेवस चौक ते हिल व्हियू अपार्टमेंट उल्हासनगर-१
३. साधुबेला हायस्कुल ते हनुमान मंदिर, मोती अपार्टमेंट मार्गे उल्हासनगर-१
४. हनुमान मंदीर ते इएसआयएस हॉस्पीटल गेट उल्हासनगर-३
५. कॅनरा बॅक से मानेरा रोड गुरूराणी आश्रम, २६ सेक्शन मार्गे उल्हासनगर-४
६. कांती नगर शेरावाली अपार्टमेंट ते बॅरेक नं.१९६९ उल्हासनगर-५

## प्रभाग समित्त्या :-

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात स्थापन केलेल्या चार प्रभाग समितीसाठी २७४ लाख रू. तरतुद पहिल्यांदा केली गेली आहे. या रक्कमेतुन प्रभाग समिती व्दारा शिफारीश केल्या गेलेल्या उद्यान सौदर्यीकरण संबधि काम पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती काम तथा रस्ते देखभाल दुरूस्ती काम केले जाईल.

## बिल्ट ऑपरेट ट्रान्सफरः-

शहरात काही लोकोपयोगी प्रकल्प बि.ओ.टी. तत्त्वावर सुरू करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे. याआधारावर महानगरपालिकेचे तरणतलाव तसेच बोट

क्लब उद्यानाचे सौदर्यीकरण संबंधी तयार केलेला प्रस्ताव लवकरच महासभेसमोर मांडला जाणार आहे.



साफसफाई :-

पुर्ण शहरात जमा होणारा कचरा उठविण्यासाठी एक ठेकेदार मेसर्स व्ही.आर. पनवेलकरच्या नियुक्ती नंतर शहरातील कचरा समस्येपासुन बहुतः सुटकारा मिळाला आहे. चालु वर्षात देखिल याच ठेकेदाराला काम मिळाले असल्याने कचरा उचलण्याचे काम व्यवस्थितरित्त्या चालेल अशी आमची अपेक्षा आहे.शहरात स्वच्छता राखण्यासाठी सार्वजनिक आरोग्य खाते अंतर्गत ११० लाख रू. ची तरतुद जंतुनाशक किटकनाशक, फवारणी इत्त्यादी खरेदीसाठी केली गेली आहे.

वृक्षारोपणः-

पर्यावरण स्वच्छता राखण्याची जबाबदारी शहरातील प्रत्त्येक नागरिक तथा संस्थेवर आहे. महानगरपालिका शहरातील सर्वात मोठी तसेच महत्त्वपुर्ण संस्था असल्यामुळे पर्यावरण स्वच्छता राखणे तिचे कर्तव्य आहे. हि गोष्ट लक्षात घेवून महानगरपालिकेने रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत रस्त्त्यावर वृक्षारोपण करण्याचे काम हाती घेतले आहे. त्यावर लागणा-या १३ लाख रू. खर्चाच्या निविदा काही दिवसात मंजुर केल्या जातील आणि हे वृक्षारोपण सुरू करण्यात येईल.

महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती व नगरसेवक निधीः-

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार उत्त्पन्नाच्या केवळ २ टक्के रक्कम नगरसेवक निधीसाठी राखण्याची तरतुद आहे यासाठी ४ लाख रू. प्रति नगरसेवक याप्रमाणे ३०४ लाखाचा निधी उपलब्ध केला गेला आहे. या व्यतिरिक्त अन्य लेखा शिर्षाशी जसे की, लाईट, गार्डन, ड्रेनेज व पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती इत्त्यादी साठी पुरेशी तरतुद केली गेली आहे. महापौर, उपमहापौर तसेच स्थायी समिती सभापती निधी दरवर्षाप्रमाणे यावर्षी देखिल ५० लाख व २५ लाख प्रत्त्येकी तरतुद केली गेलेली आहे.

स्ट्रीट लाईट :-

उल्हासनगर शहरातील सर्व रस्त्त्यांवरील रोषणाई राखून ठेवण्यासाठी फिटींग तथा पोलच्या देखभाल दुरूस्तीसाठी २४२ लाख रू. ची तरतुद केली गेली आहे. मा. आमदार श्री. पप्पु कालानी व्दारा प्राप्त आमदार निधी मधुन श्रीराम जंक्शन येथे आधुनिक हायमास्ट लावण्याची योजना आहे. विद्युत बिलाच्या दरात होणारी लगातार विद्युत बिलरमणसे होणारी वाढ लक्षात घेवून महानगरपालिकेच्या मुख्यालयामध्ये सोलार या हवा माध्यमाने म्हणजे नॉन कर्नव्हरशनल एनर्जीवर आधारीत प्रकल्प कार्यान्वीत करण्यासाठी १० लाख रू. ची तरतुद वेगळी केली गेली आहे. हा प्रकल्प जर सफल झाला तर पुढे देखिल अशे प्रकल्प राबवण्यात येतील.

<u>पाणी पुरवठा :-</u>

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणी वाटपाची शहरात जी योजना सुरू आहे. त्यावर एकूण मिळून खर्च १८ करोड रू. आहे. यामध्ये लाईफ इन्शुरन्स कंपनी कडुन पाच करोड रू. कर्जाचे स्वरूपात मिळणार आहेत. परंतु एल.आय.सी ने फक्त १.१० करोड देवून बाकी रक्कम अदा न केल्याने सदरच्या प्रकल्पाचा वेग कमी झाला आहे. मागील महिन्यातही लाईफ इन्शुरन्स कंपनीने ४.२० कोटी रू. चे कर्ज मंजुर केले आहे यात-हेने योजना प्रगती पथावर आहे. योजनेतील ४१ करोड रू. चा एक टप्पा अजुन आहे. जे कार्यरत होण्यासाठी आणखी काही वर्ष लागतील. अशामध्ये पाणी वितरण समस्येचा निकाल लावण्यासाठी मा. आमदार श्री. सुरेश (पप्पु) कालानीजींच्या प्रयत्नाने ५ ते ७ एम.एल. डी. जादा पाणी प्रति दिवस मंजुर केले गेले आहे. त्यामुळे शहरातील काही भागात पाण्याचे समस्येचे समाधान झाले आहे. याशिवाय पाणी पुरवठा विभागा अंतर्गत नविन पाईप लाईन नविन बोअरवेल, जुनी पाईप लाईन तसेच जुन्या बोअरवेलची दुरूस्ती तसेच इतर खर्चासाठी जवळपास ३०० लाख रू. निधी उपलब्ध केला गेला आहे.

मागील वर्षी अदा न केल्या गेलेल्या ठेकेदार तथा सप्लायर्स यांचे जवळ जवळ १४ करोड रू. चे बिलांच्या भुगतानासाठी संबंधित लेखाशिर्ष अंतर्गत तरतुद केली गेली आहे. स्थायी समितीच्या मा. सदस्यांनी खर्चाच्या अदांजात फेरबदल करून जो निर्णय घेतला आहे त्याचे विवरण या प्रकारे आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | वेतन व पेन्शन | :- | २५.९७ | करोड |
| २ | प्रशासकीय खर्च | :- | २.०३ | ,, |
| ३ | एमआयडीसी | :- | २७.०० | ,, |
| ४ | स्ट्रीट लाईट: | :- | ५.६२ | ,, |
| ५ | सार्वजनिक बांधकाम | :- | ४०.४९ | ,, |
| ६ | अग्निशमन | :- | ००.७७ | ,, |
| ७ | गार्डन | :- | ००.३८ | ,, |
| ८ | सार्वजनिक आरोग्य | :- | ३.९९ | ,, |
| ९ | पाणी पुरवठा | :- | ५.५४ | ,, |
| १० | भुयारी गटार | :- | १.३३ | ,, |
| ११ | डेनेज | :- | २.७५ | ,, |
| १२ | प्राथमिक शिक्षण | :- | ४.६३ | ,, |
| १३ | माध्यमिक शिक्षण | :- | ०.०५ | ,, |
| १४ | महिला बाल कल्याण | :- | ०.२५ | ,, |
| १५ | स्पोर्टस | :- | ०.१५ | ,, |
| १६ | हॉस्पिटल व डिसपेन्सरी | :- | ०.५२ | ,, |
| १७ | भुयारी गटार कर्ज परतफेड | :- | १०.०० | ,, |
| १८ | हुडको कर्ज परतफेड | :- | ००.५४ | ,, |
| १९ | किर्लोस्कर वॉटर स्पलाय स्कीम कर्ज परतफेड | :- | ९.२९ | ,, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | एम एम आर डी अे कर्ज परतफेड एस्क्रा खाते | :- | ०२.६४ | ,, |
| २१ | महाराष्ट्र जीवन प्राधिककरण पाणी पुरवठा थकबाकी | :- | १.२० | ,, |
| २२ | अनामत व शासकीय वसुली | :- | १२.९६ | ,, |
| २३ | प्रभाग समित्या | :- | २.७४ | ,, |
| २४ | संकीर्ण | :- | २.०१ | ,, |
| | एकूण | :- | १६२.८५ | ,, |
| | तूट | :- | ००.२९ | ,, |

---

शहरवासियांचे हित लक्षात घेवून अर्थसंकल्पात प्रस्तावित केले गेलेले विविध योजना तथा नागरी सुविधा लोकांना उपलब्ध करून दयावा या हेतुने प्रशासन लवकरात लवकर कार्यवाही सुरू करेल अशी आम्ही अपेक्षा करतो.

स्थायी समितीच्या मा. सदस्यांव्दारा मंजुर केल्या गेलेल्या अर्थसंकल्पात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १०० अंतर्गत महासभेचे सर्व सदस्यांनी अंतिम मंजुरी दयावी अशी आम्ही विनंती करत आहेत.

स्थायी समितीच्या सर्व सदस्यांनी अंदाजपत्रक तयार करताना जे सहकार्य दिले त्याबददल मी वैयक्तिकपणे त्यांचे आभार प्रकट करते. अर्थसंकल्प तयार करताना ज्या अधिकारी व कर्मचा-यांनी परिश्रम केले आहे त्यांचा आम्हाला अभिमान आहे.

मा. आयुक्तांचे आभार मानुन मी आपले निवेदन समाप्त करत आहे. जयहिंद.



<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>आपण आता सांगितले की, स्थायी समितीच्या सर्व सदस्यांनी याला मंजुरी दिली आहे. जे चुकीचे आहे, आपण स्वत: इथे लिहिले आहे की, बहुमतोने मंजुर झाले. तिथे सर्व संमतीने नाही बहुमताने पास करण्यांत आले.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>तिथे जे सर्व उपस्थित होते. त्यांच्यासंमतीने.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:-</u>आपण स्वत: पण तिथे होतात रूपचंदानीजी तुम्ही स्वत: मंजुर केले.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>हे पहा तुम्ही इथे बहुमताने लिहिलेले आहे. आणि भाभीजी म्हणाल्या की सर्व सदस्य उपस्थित होते. ही महासभा चालु आहे तुमच्या घरचा कार्यक्रम नाही चालु आहे.

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, स्थायी समिती सभापती, स्थायी समितीकडुन महासभेकडे बजेट आले आहे ते पुर्णपणे बोगस बजेट आहे. अंदाजपत्रक गोलमाल करून, आपल्या मनाने आकडे घालुन तयार केलेला अर्थसंकल्प आहे. मी विचारू इच्छितो की, इथे जे ४० करोड रूपये पाणी पुरवठा विभागाकडुन उत्पन्न दाखविले आहे तर कृपया पाणी पुरवठा विभागाच्या अधिकारींनी येऊन सांगावे की वर्षाला चाळीस करोड रूपये म्हणजे जवळ जवळ तीन करोड तीस लाख रू. आजपर्यंत कोणत्त्या महिन्यात वसुली झाली आहे किंवा मागील वर्षात किती वसुली झाली ते सांगा. याची खात्री कोण घेईल. आयुक्त साहेब सांगतील का? चाळीस करोड रू. पाणीपरवठा विभागाकडुन कसे वसुल होणार? दर न वाढवता कशी वसुली होणार? पाणी पुरवठा विभागाच्या अधिकारींनी यावर चर्चा करावी. आणि आयुक्तांनी सांगावे की, त्यांनी १०४ करोड रू. चे वर्षाचे उत्पन्न दाखवले आहे. तर १६३करोड रू. चे उत्पन्न कसे येणार? आयुक्त वा पाणी पुरवठयाचे अधिकारी वा कर विभाग अधिकारी कुणी पण स्पष्टीकरण दयावे. एकेका विषयावर चर्चा करू.*

*<u>मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-</u>जमनुजी तुम्ही एकेक विषय वाचून घ्या नंतर सभापती महोदया तुम्हाला उत्त्तर देतील.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>सभापती महोदयांनी एकाच वेळी...........*

*<u>मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-</u>तुम्ही एकाच वेळी जे काही बोलायचे आहे ते बोला. मुददे मांडा. तुम्हाला नंतर उत्त्तर दिले जाईल.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मी आयुक्त साहेबांना विचारू इच्छितो हे जे आकडे आहेत १०४....*

*<u>मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-</u> तुम्ही एकाच वेळी जे काही बोलायचे आहे ते बोला. मुददे मांडा. तुम्हाला नंतर उत्त्तर दिले जाईल.*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>मा. महापौर महोदया, आताच स्थायी समिती सभापती यांनी सांगितले की,अंदाजपत्रक तयार करणे ही एक तारेवरची कसरत*



*आहे. वैयक्तिक जीवनाचा एक भाग आहे. मी त्त्यांचे अभिनंदन करतो पहिल्यांदाच मी त्त्यांना मराठीत बोलताना ऐकले. त्त्याबददल मी त्त्यांना विशेष धन्यवाद देतो. आमचे कान किती दिवसापासुन व्याकुळ झाले होते. त्त्यांचे मराठी बोलणे ऐकण्यासाठी. सत्त्ताधारी पक्षाने अंदाजपत्रक सादर करण्यासाठी एक आठवडा घेतला. त्त्या अंदाजपत्रकाला घाईने पास, पास करून ओरडुन मंजुर करणे असे नाही झाले पाहिजे यावर विस्तृत चर्चा झाली पाहिजे. यात असे पण म्हंटले होते की, उल्हासनगर शहरासाठी ब-याचशा योजना देखिल आखल्या आहेत. अशा कोणत्त्या योजना आहेत. त्त्यावर सत्त्ताधारी पक्ष व विपक्ष पक्ष त्त्या दोघांनी मिळुन चर्चा केली पाहिजे. अंदाजपत्रकावर विस्तृत चर्चा होणे जरूरी आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>मी आधीच हरकत घेतली होती कलम ९४ विषयी. आयुक्तांनी यावर उत्त्तर दयावे.*

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-कृपया हे सांगा प्रशासनावर किती खर्च दाखवला आहे. एकही नाला वा सी.सी पॅसेज नाही बनवले तर फक्त प्रशासनावर खर्च किती ते सांगा.

( इथे सभागृह नेता बोलण्यासाठी उभे राहिले असता.....)

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-कृपया सभागृहनेता यांनी सर्वात शेवटी बोलावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मी सर्वात शेवटी बोलणार आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः- मग तुम्ही खाली बसा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-तुम्ही कोण मला खाली बसविणारे मला महापौरांनी परवानगी दिली आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-जमनु तुम्ही परवानगी देणार का मी देणार? ते माझ्या परवानगीने बोलत आहेत. आपण खाली बसा.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मला माझ्या प्रश्नाचे उत्तर आधी दया.

मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-मी तुम्हाला सांगितले बसा ते माझ्या परवानगीने बोलत आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौरजी, भाजपा गटनेता श्री. जमनु पूरस्वानी म्हणाले की सभागृह नेत्यांनी सर्वात शेवटी बोलले पाहिजे. मी सर्वात शेवटी बोलणार होतो परंतु आता जे मुददे उपस्थित केले जात आहेत. आमच्या मा. सभापती स्थायी समिती यांनी जे अंदाजपत्रक प्रस्तुत केले. महासभेसमोर ठेवले. महासभा फायनल ॲथोर्टी आहे. कृपया टीका न करता आकडयांवर चर्चा करा. अधिका-यांशी चर्चा न करता आकडयांवर चर्चा करा. आपणास जर असे वाटत असेल की, कर



वसुली इतकी होऊ शकत नाही तर तो आकडा कमी करा. तुम्हाला असे वाटत असेल की पाणी पुरवठ्याची वसुली इतकी होऊ शकणार नाही. तुम्ही सुझाव दया. प्रशासनावर आपण जबाबदारी टाकु शकत नाही का? आपण इतकी वसुली करा. लोकांकडे आपली थकबाकी नाही का? श्री. चंद्रशेखर साहेबांनी वीस करोड रू. नऊ महिन्यात वसुल करून दाखवले होते. आपण पण प्रशासनाला एक रक्कम ठरवुन देऊ ती त्यांने वसुल करावी. जर आपणांस असे वाटत असेल की, वसुली ऐवढी ठेऊ नये तर मग काय कर वाढवायचे? तुमचे असे मत आहे का? आम्ही कर वाढ करू इच्छित नाही. आमची ही इच्छा आहे की, लोकांकडे आपली थकबाकी शिल्लक आहे. तीच वसुली करावी जनतेवर जास्त ओझे टाकु नये. आमचे मा. नगरसेवक जे तीन वर्ष उपमहापौर पदी होते ते म्हणाले की, भाभी ज्योती कालानी मराठीमध्ये बोलल्या ते ऐकायला त्यांचे कान व्याकुळ झाले होते. त्यांची हिंदी भाषा ऐकायला आमचे कान व्याकुळ झाले होते. ते हिंदी बोलले त्याबददल मी त्यांना धन्यवाद देतो. बाहेर वर्तमानपत्रात चुकीचे स्टेटमेंट दिले जाते की, मराठी बोलत असताना भाभी सभागृहातुन बाहेर पडल्या. त्या उठून नव्हत्या गेल्या. कुणा सदस्यांला जर काही

काम असेल किंवा जरूरी कामासाठी बाहेर जायचे असेल तर कुणीही जावू शकतो. ते मराठीत बोलत होते म्हणुन आम्ही नव्हतो गेलो. आम्ही वेळोवेळी मा. सदस्यांना विनंती करतो की तुम्ही मराठी न बोलता हिंदीत बोला म्हणजे आम्हाला चांगल्या त-हेने समजेल मराठी येत नाही याचे आम्हाला दुःख आहे. आज त्त्यांनी मनाची उदारता दाखवून हिंदीमध्ये बोलले. मी त्त्यांना विनंती करेन पाच वर्षापर्यंत त्त्यांनी असेच हिंदी बोलावे आम्ही त्त्यांचे आभार मानु. दुसरे असे की, आता आमच्या स्थायी समिती सभापतींनी जे अंदाजपत्रक समोर मांडले आहे. त्त्यावर त्त्यांनी जे आकडे लिहिले आहेत. मागच्यावर्षी पण तीच रक्कम अपेक्षीत होती. रक्कम वाढवली गेली नाही. माझे असे म्हणणे आहे की, शॅल वी कम टू द बिझनेस. कामाचे बोलावे. जरूरी जे सुझाव आहेत किंवा सल्ले आहेत. जर तुम्ही सल्ले दिले तर फक्त कपात नका करू. कसे समायोजन करायचे त्याचे पण सुझाव दया. जसे विकास आराखडयात एखादया जागेचे जर आरक्षण रदद करायचे असेल तर त्याऐवजी दुस-या ठिकाणी आरक्षण दाखवायचे आहे. तुम्ही कुठेही दर कमी करा पण ते उत्त्पन्न वाढवायचे कसे याचे पण सुझाव दया. आम्ही तुमचे स्वागत करू. कृपया मेहरबानी करून मुददयावर या. मी सर्वात शेवटी बोलेन सर्व सदस्यांना बोलण्याचा अधिकार आहे. महासभेवर टिका करण्यासाठी हि सभा नाही. महासभा आज अंदाजपत्रक तयार करणार आहे. सत्त्ताधारी व विपक्ष पक्षाने एकमेंकाना सहयोग देवून जर अंदाजपत्रक तयार केले तर बरे होईल. माझे पण काही सुझाव आहेत दरात बदल करण्याचे. दुसरे पण समायोजन करायचे आहे. मी नंतर बोलेन आधी जर सन्माननिय सदस्य बोलु इच्छितात तर त्त्यांनी बोलावे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. स्थायी समिती सभापती मी सभागृह नेत्त्यांचे स्वागत करतो. ते म्हणाले की, चंद्रशेखर साहेब असताना खुप वसुली झाली होती. तुम्ही १६३ करोड उत्त्पन्न दाखवले आहे. त्याबददल तुम्हाला धन्यवाद देतो की, तुम्ही १६३ करोड रू. उत्त्पन्न वसुल करणार आहात. त्याचबरोबर मी असे बोलु इच्छितो की, ही जी १६३ करोड रू. चे उत्त्पन्न होत आहे. तर जकात बाबींवर जी तुम्ही वाढ करत आहात ती काढुन टाका. कारण की, सत्त्ताधारी पक्षाने शहराला आश्वासन दिले होते की, आमची सत्त्ता आल्यावर कोणत्त्याही प्रकारची कर वाढ करणार नाही. जकात बाबींवर वाढविलेल्या दरांमुळे १६ करोडचे ओझे व्यापारी वर्गावर पडत आहे. ते जर कमी केले तर १४८ करोड रू. उत्त्पन्न येईल. आणि आयुक्त्तांनी जे खर्च व उत्त्पन्नाचा अंदाज सादर केला. त्त्यांनी खर्च १५३ करोड दाखवला आहे. जर आयुक्त्तांनी दर्शाविलेले आकडे लक्षात घेतले तर १५३ करोड खर्च



व तुम्ही सादर केलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे १४६ करोडचे उत्त्पन्न लक्षात घेतले तर फक्त सहा करोडची तुट राहते. पुर्ण महाराष्ट्रात कुठेही महापौर, उपमहापौर,स्थायी समिती सभापती यांच्यासाठी निधी नाही त्यातुन जर हे एक करोड कमी केले तर फक्त पाच करोड शिल्लक राहतील. शहरावर कराचे ओझे पडणार नाही. पाणी पुरवठा विभागाचे दर वाढणार नाही. जकातीचे दर वाढणार नाही. हा पाच करोडचा खर्च कमी करून सार्वजनिक बांधकाम विभागात बराच खर्च दाखविला आहे. शिक्षण मंडळात मागच्यावर्षी पन्नास लाख रू. खर्च झाला. आता ४ करोड ६३ लाख खर्च दाखवला आहे. इथे जर कुणी शिक्षण मंडळाचे अधिकारी असतील तर त्त्यांनी सांगावे उल्हासनगरमधील महापालिकेच्या प्राथमिक शाळेत किती विद्यार्थी शिकतात. आजपर्यंत शिक्षण मंडळावर एवढा खर्च झाला नाही. एक वर्षात काय, चार वर्षात सुध्दा एवढा खर्च झाला नाही. जर हे चार करोड कमी केले तर हे अंदाजपत्रक चांगल्या त-हेने तयार होईल. कोणतीही करवाढ न करता अंदाजपत्रक तयार होईल. यात-हेने जर अंदाजपत्रक तयार केले तर शहरातील प्रत्त्येक नागरिक खुष होईल. मी आपणांस विनंती करतो की, तुम्ही जे उत्त्पन्न दाखवले ते ठेवावे व खर्च आयुक्त्तांनी दाखविले

तो ठेवावा. शिक्षण मंडळाचे तुम्ही जे चार करोड ठेवले ते कमी करावे . महापौर ,उपमहापौर, स्थायी समिती निधी ठेवण्यात येऊ नये. यात-हेने सहा करोड कमी करून ताळेबंद असे अंदाजपत्रक तयार होईल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>मा. महापौर, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष मी मराठीतच बोलतो. आज हे जे बजेट स्थायी समिती सभापतींनी जे ठेवलेले आहे. आयुक्तांनी दिलेले बजेट ४९ कोटीचे त्रुटीचे बजेट आणि त्याच्यावर तारे वरची कसरत जी सभापतींनी केलेली आहे. ती निश्चितच अभिनंदनीय बाब आहे. बजेट बनवताना त्रुटी कशी कमी करता येईल. आणि त्यानंतर शहराचा विकास करता येईल. या दृष्टीकोनातुन हे बजेट बघितले तर काही मुददे असे थोडक्यात जाणवले. तर त्याच्यावर चर्चा होणे आवश्यक आहे. गरीबांना दिलासा देणारा हा अर्थसंकल्प आहे असे मला वाटत नाही. याचे कारण असे आहे की याच्यामध्ये साखर, चहा आणि केरोसिन हा १.६० ते सत्तर लाखाचा निधी आहे. आयुक्तांनी तो वाढविलेला होता. स्थायी समिती मध्ये पण मला वाटते तीच रक्कम ठेवली आहे. याच्यावर मा. सभापतींनी जरूर विचार करून ता पुर्वीसारखाच जर ठेवला तर फार बरे होईल. मालमत्ता करामधुन जे १०.२० कोटी निघत आहेत. त्याच्यामध्ये विशेष सफाई कर हा तुम्ही गाळलेला आहे. विशेष सफाई करामधुन ब-याचशे औदयोगिक कारखाने आहेत. तिथे आपली साफसफाई योजना राबविली जाते. हॉटेल्स वगैरे असतात. तिथे जर विशेष सफाई कर लावला तर त्यातुनही आपल्याला थोडेफार उत्पन्न मिळु शकेल. पाणीपटटी विषयी जर बोलायचे म्हंटले तर निश्चितच पाणी हा प्रत्येकाच्या जीवनाचा अंग आहे आणि प्रत्येकाला पाणी जेवढया स्वस्तात मिळवता येईल तेवढया स्वस्तात मिळाले पाहिजे परंतु त्यातुन जो २७ कोटीचा खर्च दाखविला आहे. आणि उत्पन्न साडे दहा कोटीचे दाखविले आहे. १७ कोटीची तुट दाखविली आहे. परंतु माझे म्हणणे असे आहे प्रचलित दर कायम ठेऊन नळ जोडणी, तोडणी, प्लंबर, अनामत रक्कम, मीटर तपासणी फी, अनाधिकृत नळ जोडणी अधिकृत करणे बाबतची जी फी आहे. आयुक्तांनी विनिदिष्ट केल्याप्रमाणे जर ठेवली तर मला वाटते त्यातुनही आपले थोडेफार उत्पन्न वाढू शकेल आणि त्याचा फरक सामान्य माणसाला फारसा पडणार नाही. अनाधिकृत कनेक्शनपण थांबले जातील. पाणी पण सर्वांना सोयीस्कर मिळू शकेल या दृष्टीकोनातुन यावर पण आपण विचार करायला पाहिजे. मागच्या बजेटमध्ये गलिच्छ वस्ती आणि दलित वस्तीमध्ये जवळपास दिड कोटीचा फंड ठेवला होता. यावेळेस तुम्ही तो एक कोटीवर आणलेला आहे. कारण की त्याचे देयत्त्व दाखवले आहे २.४३ आणि ६९ असे जे देयत्त्व दाखविले आहे त्या हिशोबाने



आपल्याला यावर्षी फक्त एक-एक कोटीचाच फंड मिळत आहे. तो जर तुम्ही दिड कोटी पर्यंत जर घेतला तर मला वाटते स्लम विभागामध्ये किंवा गलिच्छ विभागात ब-याचशा सोयी सुविधा उपलब्ध करता येईल. तिसरा जो आणखी एक मुददा आहे नाला सफाई बददल. कालचा जो प्रकार बघितला की, नाला सफाई नसल्यामुळे, किंवा नाल्यावर बरीचशी अनाधिकृत बांधकामे झाल्यामुळे आयुक्तांनी कदाचित दुर्लक्ष केले असेल नसेल त्यावर उपाययोजना केल्या असतील. परंतु या नाला सफाई किंवा नाला विकास कार्यक्रमांतर्गत आपण कुठली योजना केली नाही. हुडकोच्या या बजेटमध्ये कमीत कमी पाच कोटीची तरी योजना त्या दृष्टीकोनातुन सभापतींनी त्याबाबतीत थोडे लक्ष दिले पाहिजे. या शहरामध्ये गेल्या आठ-नऊ वर्षापर्यंत मला वाटते आमदार बाहेर असल्यामुळे चौमुखी विकास झालेला नव्हता. परंतु जसे सुरेश पप्पु कालानी जेव्हा आज शहरामध्ये आहेत, शहराचा चौमुखी विकास करण्यामध्ये ते कुशल नेतत्त्व करत आहेत. माझी या मिटिंगच्या माध्यमातुन कालानींना विनंती आहे की त्यांनी विलंब शुल्क माफ करण्याचे जे आश्वासन दिलेले आहे. माझी तर

अशी मागणी आहे की संपुर्ण एमआयडीसी. चे जे कर्ज आहे. व थकबाकी आहे ती माफ करण्यासाठी त्यांनी जास्तीत जास्त प्रयत्न करावेत. आणि आपल्या शहराला विकासाची नवी दिशा दाखवावी. हा बजेट आज सादर केल्याबद्दल सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांचे पुन्हा अभिनंदन करून दोन शब्द संपवतो. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचदांनीः-</u>महापौर महोदया, सर्वात प्रथम मी आयुक्तांना दोनदा आग्रह केला आहे की, ९४ कलमाचा त्यांनी खुलासा करावा. जर ते करू इच्छित नाही किवा शेवटी खूलासा करणार आहेत तर मी अर्थसंकल्पाविषयी बोलु इच्छितो. पान नं. १२ वर प्रशासनाचा खर्च एका वर्षात वाढवला आहे त्याचे कारण काय ते आम्हाला सांगण्यात यावे. त्यांनतर पान नं. १४ , २१ नंबर. कर विभागाचा खर्चही वाढविला आहे. त्यानंतर वाहन विभाग त्यांचा पण खर्च वाढवला आहे. उल्हासनगर महापालिकेला स्वतःचे वाहन नाही. बाहेरून खाजगी वाहने घेतली जातात. त्यानंतर जादा वेळ कामाचा भत्ता. महापालिकेमध्ये ओव्हरटाईम दिला जातो का? पान नं. १४ वर लिहिले आहे. त्यात पण वाढ दाखविली आहे. महापालिकेत ओव्हरटाईम भत्ता दिला जातो का? जर दिला जातो तर कोणत्त्या पध्दतीने व का? एवढे कामाचे ओझे महापालिकेवर आहे का? त्यांनतर स्टेशनरीचा खर्च पण जास्त दाखवला आहे. मागच्यावर्षी पेक्षा जास्त दाखवला आहे. स्टेशनरी जास्त लागणार आहे? लागणार आहे तर का लागणार आहे? पान नं १७ वर वाहन दुरूस्तीचा खर्च वाढवला आहे. हे सांगावे कोणते वाहन दुरूस्त करणार आहेत. महापालिकेकडे स्वतःच्या मालकीची वाहने नाहीच आहेत. इथे असे दर्शविले आहे की, वाहने बाहेरून घेतली जातात. मग कोणत्त्या वाहनांची दुरूस्ती करणार आहेत? त्यांनतर १७ मध्येच बी १ वर स्ट्रीट लाईट लॅम्प वर खर्च दाखवला आहे. त्यामध्ये पण वाढ दाखवली आहे. ती का केली आहे? त्यानंतर स्ट्रीट लाईट मेंन्टेनन्स वर पण खर्च जास्त दाखवला आहे. पान नं. १९ वर खरेदी वर जास्त खर्च दाखवला आहे. आधी कमी खर्च होता.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>मा. सदस्यांना मी सांगु इच्छिते की, जिथे अधोरेखित केलेले आहे ती रक्कम मागील थकबाकी जोडुन लिहिलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपंचदानीः-</u>ते सोडुन इतर बाबतीत वाढ का केली ते सांगा. पान नं. ३० वर उद्यानांचा विकास व देखभाल दुरूस्ती खर्च दाखविला आहे. उल्हासनगरमध्ये आधीच उद्याने कमी आहेत. यावर्षात काय दुरूस्ती करणार उद्यानांची? त्यांनतर झाडे खरेदी. पुर्ण पाच वर्षात कुठेही रोपे, झाडे लावली गेली नाहीत. आता पावसाळा सुरू झाला आहे आणि तुम्ही इथे दाखवले आहे ते कसे



दाखवले? आधी पन्नास हजार रक्कम होती. आता पाच लाख दाखवली आहे. त्यानंतर मेंटेनन्स ऑफ मार्केट आधी दोनशे होते आता २,५०० हजार दाखवला आहे. त्यानंतर आतिथ्य खर्च दाखवला आहे. त्यानंतर मेंन्टेनन्स ऑफ टाऊन हॉल बाबत तुम्ही कसा खर्च करणार त्याबाबतीत निविदा पण निघाल्या आहेत तुम्ही ठेकेदारांना दिल्या आहेत का महापालिका स्वतः खर्च करणार? ठेकेदाराला दिले त्याचे काय झाले? महापालिका दुरूस्ती करते तर ठिक आहे नाहीतर हा दहा लाख खर्च का दाखवला? इथे दुसरी एक समस्या आहे एके ठिकाणी दाखवले आहे इम्पुव्हमेंट ऑफ गार्डन आणि दुस-या ठिकाणी मेंटेनन्स ऑफ गार्डन पान नं. २४ वर. यावर्षी उद्याने जास्त विस्तृत करणार आहेत का? उद्यानांची दुर्दशा झाली आहे. तुम्ही काही योजना आखली आहे का? उद्याने वाढविणार आहात का?

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः</u>-सन्माननिय महापौर महोदया, याठिकाणी अंदाजपत्रकावर ज्यावेळेला सभागृहामध्ये चर्चेची सुरूवात झाली. त्या सुरवातीलाच सभागृहनेत्त्यांनी दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला की, जी चर्चा आपल्याला करायची आहे. एक तर आपल्याला उत्त्पन्नाचे आकडे चुकीचे वाटत असतील तर ते जुळवून दया. मुळामध्ये तुम्ही या अंदाजपत्रकामध्ये आकडयांची जुळवाजुळव करताना इतकी मोठी सर्कस केली आहे की त्या सर्करशीतुन प्रथम म्हणजे बाहेर पडणे हे मोठे कठीण काम झाले आहे. आपण ज्या पध्दतीने निवडणुकीच्या काळामध्ये भाषणात आपण सांगितले होते. की आपण कोणकोणत्त्या नविन योजना शहराला देणार आहात. एका बाजुला आपण सांगता जे अंदाजपत्रक आहे ते जसे आपल्या वैयक्तिक जीवनामध्ये अंदाजपत्रकाला जेवढे महत्त्व आहे तेवढेच याठिकाणी सुध्दा आहे. आणि दुस-या बाजुला उत्त्पन्नाचा जरा सुध्दा अंदाज न घेता आण भरमसाठ कर्जाचे मात्र प्रस्ताव ठेवता. एक आपण आधी बघितले पाहिजे की, जे खर्च ज्यापध्दतीने वाढत गेले आहेत. जे प्रशासकीय खर्च आहेत ते का वाढले किंवा इतर जे बाकीचे जे भांडवली खर्च आहेत ते का वाढले त्याची मुळामध्ये कारणे सुध्दा त्याचे याठिकाणी स्पष्टीकरण झाले पाहिजे आणि मुळामध्ये या सगळयाचे गोष्टीची चर्चा करत असताना या अंदाजपत्रकावर आमचा ऐवढया साठीच केवळ तुमच्यावर भरोसा नाही. कारण याठिकाणी ही सत्ता येण्याच्या पुर्वीसुध्दा आणि त्या वेळेला सुध्दा तुम्ही १७३ कोटीच्या जमेचे अंदाजपत्रक तुम्ही तयार केले होते त्यामधले अवघे ७० ते ८० कोटी प्रशासनाच्या हातात पडले. ज्या ज्या वेळेला आयुक्तांनी उल्हासनगर महापालिकेच्या आर्थिक स्थिती बाबत चर्चा केली. गटनेत्त्यांच्या बैठकीमध्ये गेले, नगरसेवकांच्या बैठकीमध्ये गेले किंवा त्यांनी पत्रकारांशी बोलताना सुध्दा चर्चा केली त्यावेळी त्यांनी सांगितले की, गेल्या वेळचे जे अंदाजपत्रक आहे. ते अजिबात प्रात्त्यक्षिक अंदाजपत्रक नव्हते. आणि त्यामधील जे आकडे आहेत ते प्रत्त्यक्ष ज्या पध्दतीची वसुलीची टक्केवारी होऊ शकते त्यापेक्षा फुगवून दाखवलेले आकडे आहेत अशा प्रकारची भावना त्यांनी प्रशासकीय भाषेतुन व्यक्त केली परंतु ती त्यांची मुळ भावना होती. आज सुध्दा त्यांनी हे स्पष्ट केले पाहिजे कारण अंदाजपत्रक जरी आपण तयार केले , कायम केले, मंजुर जरी केले. त्यामध्ये पुन्हा तुम्ही सांगता की आपण आकडयाची फिरवाफीरव करा. ठिक आहे तयार आहोत आकडयांची फिरवाफिरव करायला. परंतु आकडयांची फिरवाफीरव आपण करीत असताना या संपुर्ण अंदाजपत्रकाची अंमलबजावणी आहे ती प्रशासनाला करायची आहे, आयुक्तांना करायची आहे. आपल्याला विसरून चालणार नाही. आणि त्यामुळे तुम्ही जे अंदाजपत्रक स्थायी समितीच्या बैठकीमध्ये तयार केले आहे. त्या अंदाजपत्रकाची प्रत्त्यक्ष अंमलबजावणी एका वित्तिय वर्षात प्रत्त्यक्ष होवू शकते का? त्यामध्ये दाखविलेले जे उत्त्पन्नाचे आकडे आहेत. ते प्रत्त्यक्षामध्ये उतरू शकतात का? याचे सुध्दा स्पष्टीकरण आयुक्तांनी या महासभेमध्ये केले पाहिजे. माझ्याकडे एक खर्चाची सार्वजनिक आरोग्य*



*विभागाची आकडेवारी आहे. की ९८-९९ ला सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आस्थापनेवरती पाच कोटी ४८ लाख ऐवढा खर्च झाला होता. आणि आज आपण २००२-२००३ यावर्षामध्ये दहा कोटी ४९ लाख तीन हजार ऐवढा खर्च आपण प्रस्तावित करत आहोत. गेल्या पाच वर्षामध्ये पाच कोटी ४८ लाख हा जो खर्च प्रत्त्यक्ष दाखवला होता. तो अवघ्या पाच वर्षामध्ये दहा कोटी ४९ लाख दाखवला आहे अवघ्या पाच वर्षात एवढा खर्च वाढण्याचे कारण काय?याचा खुलासा इकडे झाला पाहिजे. सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये अशा कोणत्त्या घडामोडी घडल्या. कुठली अशी क्रांती घडली. लोकांना कुठे समाधान मिळाले की पाच कोटीचा खर्च लोकांच्या कामी आला आहे. जो तुम्ही चार कोटी नव्वद लाख सहा हजार खर्चाची तरतुद केली आहे त्याची सुध्दा आपण फोड करून बघु या. या चार कोटी, सहा*

लाख , नव्वद हजार सार्वजनिक आरोग्य विभागावर खर्च आहे. त्या खर्चामधले दोन कोटी, ७६ लाख हे फक्त कचरा उचलण्यावरती खर्च होणार आहेत. ८० लाखाची जंतुनाशक खरेदी प्रस्तावित करण्यात आली आहे. आणि १५ लाखाची गेल्या वर्षातील देणी तुम्ही त्या खर्चामध्ये दाखवली आहेत. म्हणजे हा सर्व आपण खर्च वगळला तर चार कोटी सहा लाखामधले अवघे ३५ लाख रू. हे लोकांच्या ज्या प्रत्त्यक्ष आरोग्य विषयक सेवा आहेत त्यासाठी उरतात. म्हणजे अशादृष्टीने आपण आपल्या आरोग्य विभागामध्ये काम करणार आहोत का? आणि अशा दृष्टीने आरोग्य विभागामध्ये काम चालणार असेल. म्हणजे याठिकाणी आपण बघितले तर आपल्या शहरामध्ये  मलेरिया निर्मुलन, कृष्ठरोग निर्मुलन , एड्स, टिबी किंवा कुटूंब नियोजन योजना किंवा वेडे, अपंग यांच्या पुर्नवसनासाठी आपण जो खर्च दाखवलेला आहे. गेल्या दोन तीन वर्षामधला जो खर्च आहे तो निरंक दाखविण्यात आलेला आहे. म्हणजे प्रत्त्यक्ष लोकांच्या आरोग्याशी निगडित जे प्रश्न आहेत यामध्ये आपण अत्त्यंत उदासिन आहोत. आणि त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. प्रशासनाने सांगितले दहा कोटी खर्च आहे, आपण त्याला हो म्हणायचे आणि दहा कोटी खर्च दाखवत रहायचा पण लोकांच्या पदरामध्ये काय पडते ते आपण बघणार आहात का? एका बाजुला तुम्ही जे सांगितलेत की, अर्थसंकल्प बनविणे तारेवरची कसरत आहे. तारेवरची कसरत जर असेल तर शासनाच्या काही मार्गदर्शक सूचना आहेत की जर तुम्हाला अंदाजपत्रक बनवायचे असेल तर सर्वप्रथम तुम्ही तुमच्या उत्त्पन्नाचा अंदाज घेतला पाहिजे. आणि उत्त्पन्नाचा अंदाज घेतल्यानंतर त्यामध्ये आपल्याला आपल्या खर्चाचा ताळेबंद बसवायचा आहे.  आपण इकडे काय केले आहे. आधी आपण आपल्या खर्चाचे आकडे फिक्स केले आहेत त्यानंतर आपण उत्त्पन्नाचे आकडे त्याच्याबरोबर जुळवत बसलेलो आहोत.  एकीकडे आपण सांगतो की, खर्चावरती काटकसर पण केली पाहिजे. दुस-या बाजुला सार्वजनिक बांधकामांवरती जर तुम्ही पाच वर्षाचे आकडे जर बघितले तर त्यावर गेल्या पाच वर्षामध्ये चार ते बारा करोड जास्तीत जास्त खर्च झाला आहे. यावेळी तो खर्च तुम्ही थेट चाळीस करोडवर नेला आहे. आणि त्या खर्चावर जी तुम्ही वाढ केली आहे. जवळ जवळ तुम्ही त्याच्यामध्ये २८ कोटीची वाढ सुचविलेली आहे. त्या २८ कोटीच्या वाढीचे जर क्लासिफीकेशन केले असते की कोणकोणत्त्या नविन योजना त्यामध्ये येणार आहेत. त्या किती किती खर्चाच्या आहेत. त्याचे जर स्पष्टीकरण झाले असते तर ते कदाचित सभागृहाच्या दृष्टीने त्यावर जरा प्रकाश पडला असता. आपण वांरवार नाव घेतले आपल्या शहरातील आमदारांचे आणि आपण सांगितले की त्यांनी शासनाकडे या शहरातील अनेक समस्यां बाबत पाठपुरावा केला आहे. चांगली गोष्ट आहे की शहरामध्ये जर या चर्चेमधुन काही चांगले पडणार असेल तर ती खरे म्हणजे आनंदाची गोष्ट आहे परंतु प्रत्त्यक्षामध्ये पडणार आहेत का की नुसती आश्वासने आहेत. कारण तुम्ही निवडणुकीपुर्वी चार महिन्यापुर्वी दिलेल्या आश्वासनावर अगदी ठाम राहिला नाहीत तर तुम्ही लोकांना आश्वासन दिले होते की, आम्ही कुठल्याही प्रकारची कर वाढ लोकांवर लादणार नाही किंवा आम्ही कुठल्याही



प्रकारचे जकातीचे खाजगीकरण करणार नाही. आज तुम्ही तुमच्या त्या भुमिकेवर ठाम राहिले नाही आहात. तुमची भुमिका आता सत्त्तेवर आल्यानंतर बदलली आहे. आणि तुम्ही केवळ एवढयासाठीच करवाढ सुचविली आहे. आमचा असा आरोप आहे. की तुम्ही शासनाकडे अशा काही योजना घेवून गेलेले आहात आणि त्या योजना पदरामध्ये पाडुन घेण्यासाठी शासनाचे जे तुम्हाला निर्देश आहेत की, महापालिका हि स्वावलंबी असली पाहिजे, स्वत:च्या पायावर उभी असली पाहिजे केवळ तेवढयासाठी तुम्ही अनेक मालमत्ता करामध्ये,पाणीपटटी करामध्ये, जकातवाढीमध्ये तुम्ही करवाढ सुचवू इच्छित होतात.  त्याला शिवसेना-भाजपानी ज्यावेळेला विरोध केला त्यावेळेला तुम्ही मालमत्ता कर आणि पाणीपटटी करामध्ये जी करवाढ होती ती मागे घेतली

आणि अजुनही तुम्हाला शासनापुढे जे तुम्ही आश्वासन दिलेले आहे शासनाला की आम्ही करवाढ करून आमची महापालिका आहे ती स्वयंपुर्ण बनवू या केवळ आश्वासन पुर्ततेसाठी तुम्ही ही जी सोळा कोटीची किंवा दहा कोटीची जी काही कर वाढ आहे ती तुम्ही या अंदाजपत्रकामध्ये सुचवू इच्छित आहात. आयुक्तांचे जे अंदाजपत्रक होते ते १०४ कोटी जमेचे आणि १५३ कोटी असे खर्चाचे होते. त्या १५३ कोटी खर्चावर जरी आपण टिकून राहिलो असतो आणि त्यामध्ये आपण जर पी.डब्लु. डी किंवा सार्वजनिक आरोग्य किंवा अन्य ठिकाणी जे महापौर निधी, उपमहापौर निधी, स्थायी समिती निधी जे आहेत ते जर रदद केले जे महाराष्ट्रामध्ये कुठल्याही महापालिकेमध्ये अशाप्रकारच्या निधीची तरतुद नाही. तर अशाप्रकारच्या निधीमध्ये काटकसर करून खर्चामध्ये सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या खर्चामध्ये काटकसर करून आपणही खर्चामध्ये कपात केली पाहिजे. आणि जे प्रत्यक्ष उत्पन्नाचे जे आकडे आहेत. त्यामध्येच हा अंदाजपत्रकाचा ताळेबंद बसवला पाहिजे. मी आयुक्तांना विनंती करतो की, जे स्थायी समितीचे अंदाजपत्रक या महासभेसमोर ठेवलेले आहे. आणि जे मान्यतेसाठी सभागृहाच्या समोर आहे. ते प्रत्यक्षामध्ये उतरू शकते का? त्याची अंमलबजावणी प्रत्यक्षामध्ये होवू शकते का? यावर त्यांनी कृपया जर खुलासा केला तर फार बरे होईल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>मा. महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, आयुक्त, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता सर्व सभासद मी आता मराठीतच बोलतो. कारण अतृप्त राहिले तर लवकरच जातील त्यांना अतृप्त ठेवा अशी माझी इच्छा आहे. म्हणजे वर्षानुवर्ष ते सभागृह नेता म्हणुन आम्हाला पाहायला मिळतील. मी तेच म्हंटले अतृप्त आहेत, अतृप्त राहु दे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>तुम्ही आमचे मराठी बोलणे पसंत केले आम्ही तुमचे हिंदी बोलणे.
<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>ओ.के. ठिक आहे. अर्थसंकल्पावर चर्चा चालु आहे. सभापती मॅडमनी सांगितल्या प्रमाणे जसे घरगुती बजेट असते तसेच महापालिकेचे बजेट असावे त्यापध्दतीने ते सादर केलेले आहे. आता याठिकाणी चर्चा करताना श्री. प्रमोद टाले यांनी महत्त्वाचा मुददा मांडला की हे बजेट सादर करताना सर्व सामान्य जनतेचा याठिकाणी अजिबात विचार केला गेलेला नाही. त्यानंतर श्री. राज असरोंडकर यांनी आरोप केला की, हे एक फेक बजेट असे आहे. फक्त आकडयाची जुळवाजुळव केली गेली आहे प्रशासनाकडुन व त्याच आधारावर स्थायी समिती कडुनही. या अर्थसंकल्पामध्ये जमनु पुरस्वानीने जे नमुद केले होते. सभागृह नेता यांचे अभिनंदन करतो की, त्यांनी खिलाडी वृत्तीने ही सभा चालवली आहे त्याबददल त्यांना धन्यवाद देतो. त्यांनी अगोदरच सांगितले की बजेट स्थायी समितीने सादर केले आहे. त्यामध्ये फेरफार करण्यासाठी महासभेमध्ये आणलेले आहे. ते ही त्यावर चर्चा करतीलच. हे



अंदाजपत्रक सादर केले प्रशासनाने. प्रशासनाने स्थायी समितीला सादर केले त्यामध्ये १६२ कोटी ६८ लाख हा स्थायी समितीने खर्च दाखवला आहे आणि उत्पन्न दाखविले आहे १६३ कोटी १४ लाख ३५ हजार तर आयुक्तांनी प्रशासनाच्या वतीने जे बजेट दिले आहे त्यामध्ये उत्पन्न आहे १०४ कोटी ३५ हजार आणि खर्च आहे १५३ कोटी ३८ लाख ५७ हजार प्रशासनाने दिलेला खर्च, अंदाजित खर्च आणि उत्पन्न यामध्ये शंका अशी आहे की जेव्हा दायित्त्व दिले तेव्हा असेट देणे गरजेचे होते. प्रशासनाकडुन १४ कोटी सोळा लाखाची दायित्त्व दिले आहे. परंतु त्याचबरोबर मागची थकबाकी किती आहे, मार्ग काय आहेत ते याठिकाणी दिले

नाहीत ते देणे आवश्यक होते असे मला वाटते. आयुक्त साहेब बरोबर काय? मत्ता सुध्दा असणे आवश्यक होते ते यामध्ये दिलेले नाहीत.

__मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-__आयुक्त नंतर उत्तर देतील.

__मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-__सभागृह नेता विचारणे गरजेचे आहे. फक्त सभागृह नेत्त्यांना नियम माहित आहेत सदस्यांना नाही. इथे ॲसेस्ट दिलेले नाहीत. त्त्यानंतर याठिकाणी दरवाढ सुचविलेली आहे. स्थायी समितीने त्त्यांना मंजुरी दिलेली आहे. जकातीच्या माध्यमातुन त्त्यामध्ये खादयतेल, रॅकेल वगैरे या घरगुती वापरायच्या वस्तुंवर दरवाढ केली आहे. जकात वाढीचा प्रस्ताव याठिकाणी मंजुर केला आहे स्थायी समितीने. ते करत असताना त्त्यापासुन आपल्याला सोळा कोटीचे उत्त्पन्न मिळणार आहे तसेच इतर माध्यमातुन सुध्दा जवळ जवळ १६३ कोटीचे उत्त्पन्न दाखवले आहे. मागच्या वर्षीचे बजेट आणि यावर्षीचे बजेट तुलना करणे आवश्यक आहे. वाढणा-या उत्त्पन्नाबरोबर लोकांवर आम्ही जे कर ठेवत आहोत जे कर वसुल करतो त्त्यातुन आम्ही लोकांना काय सुविधा देतो ते पाहणे जरूरीचे आहे. लोकांच्या अपेक्षा पाणी साफसफाई आरोग्याशी निगडित असे जे प्रश्न आहेत. दैनंदिन गरजा आहेत त्त्या आम्ही पुर्ण करू शकत नाहीत. याठिकाणी योजना नजरेसमोर ठेवून बजेटमध्ये तरतुद करून वाढ केली आहे परंतु योजना कुठे दिसत नाहीत. जे मागच्या वर्षी होते त्त्याचेचे फक्त आकडे फुगविले आहेत. त्त्याची उदाहरणे आमचे श्री. राज असरोंडकर, श्री. जमनु पुरस्वानी यांनी दिलेले आहेत. टाऊन हॉल सारखा महत्त्वाचा मुददा वर्षानुवर्ष याठिकाणी गाजत असताना त्त्याचा निर्णय काही लागला नाही परंतु अशा पध्दतीच्या योजना आपण उल्हासनगर वासियांना देवू इच्छिता की नाही. स्थायी समिती किंवा प्रशासनाच्या वतीने याचाही याठिकाणी काही उल्लेख नाही. फक्त साफ सफाई जी पी.डब्लु.डी. च्या माध्यमातुन वर्षानुवर्ष ज्या पध्दतीने कामे चालु असतात त्त्या पध्दतीने कामे चालु राहतील. प्रशासनाचा व स्थायी समितीचा एक गलथांब कारभार नमुद केला जातो हे मुददामुन सांगण्या सारखे आहे. ज्या गार्डन डिपार्टमेंटचे बजेट आहे. फक्त साडे पंधरा लाखाचे आहे. त्त्याचावरचा प्रशासनाचा खर्च एक कोटी ४७ लाखाचा आहे. एक कोटी ४७ लाख कर्मचारी वा प्रशासनावर खर्च आहे. आणि बजेट फक्त गार्डन आणि झाडे खरेदी यांना फक्त १५ लाख, साडे पंधरा लाख खर्च आहे. हे कशापध्दतीचे बजेट बनवले आहे याठिकाणी. आमच्या श्री. बच्चु रूपचंदानी यांनी सांगितल्याप्रमाणे ब-याच ठिकाणी अशा वाढी नमुद केलेल्या आहेत दाखविल्या आहेत. या उल्हासनगरमधील जनतेला कुठल्याही प्रकारची करवाढ न करता प्रशासनाने जे १५३ कोटी ३८ लाख ५७ हजारचा जो खर्च प्रस्तावित केला होता. आणि स्थायी समितीने जे उत्त्पन्न दाखविले आहे. १६३ कोटी यामध्ये जकात कर उत्त्पन्न जे सोळा कोटी दाखवलेले आहे. १६३ मधुन सोळा कोटी वजा करता १४७ कोटी उरतात म्हणजे प्रशासनाने खर्चाचा आकडा दिला आहे १५३ आणि स्थायी समितीच्या उत्त्पन्नाचा जो आकडा आहे १४७ ज्यामध्ये जवळपास सहा कोटीचा फरक दिसतो तो सहा कोटीचा फरक आहे आज प्रशासनाकडुन नगरसेवक निधीच्या बाबतीत



एक नियम केला जातो. बाकी महानगरपालिकांमध्ये जेवढे उत्त्पन्न आहेत. त्त्याच्या टक्केवारीनुसार न्नगरसेवक निधी आकारला जावा किंवा ठेवला जावा परंतु इतर सर्व महापालिकेमध्ये महापौर निधी, उपमहापौर निधी, स्थायी समिती निधी नसताना प्रशासनाने कशासाठी तो ठेवला आहे हेच कळत नाही. एका बाजुला आपण इतर महानगरपालिकेचे उदाहरण देता आणि याठिकाणी मात्र जाणुन बुजून दुर्लक्ष केले जाते. प्रशासनाने कशासाठी केले. ते याठिकाणी नमुद केले. जर इतर महान्नगरपालिकेमध्ये नियम नगरसेवक निधीबाबत लावत असाल तर या निधीबाबत तो नियम लावला तर बरे होईल त्त्यामुळे एक करोड खर्चाच्या बाजुने कमी होते.

बाकी राहीले पाच करोड. ते मी सांगतो की उल्हासनगरमधील जनतेवर आपण नमुद केलेल्या प्रस्तावित करवाढीशिवाय काहीही करवाढ न करता आपण १५३ कोटीचा प्रशासनाचा जो खर्च आहे तो पुर्ण करू शकतो. एक करोड ते कमी झाल्यानंतर पी. डब्लु.डी. मध्ये जी अचानक चाळीस कोटीची म्हणजे जवळ जवळ मागच्यावर्षीच्या मागच्या वर्षी आम्ही फक्त साडे बारा कोटी फक्त तरतुद केली होती. आणि देणी काय बाकी वीस कोटी वा बावीस कोटी आहे. तर वीस आणि बावीस कोटी ऐवजी चाळीस कोटी म्हणजे दुप्पट करण्याची काही आवश्यकता नाही. जर त्यातले चार कोटी कमी केले तर आमचे बजेट हे जवळ जवळ प्रशासनाने दिलेल्या १५३ कोटीच्या खर्चा एवढे पुर्ण होईल. आणि अशा पध्दतीने जर केले, खर्चात कपात केली अनावश्यक खर्च टाळले आणि यातुन सुध्दा बाकीचे जे खर्च आहेत अनावश्यक ते खर्च टाळून ज्या विविध योजना आहेत त्या राबविल्यास उल्हासनगरवासियांना आनंद होईल. आम्ही त्यामध्ये सहभागी होवू. धन्यवाद. जयहिंद. जयमहाराष्ट्र.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, आज जे महासभेत बजेट वर चर्चा होत आहे. त्यावर मी काही बाबीवर खुलासा करू इच्छितो. जसे सांगितले गेले की, कर्मचारींचा पगार एक करोड ४७ लाख रूपये आहे. आणि गार्डन विकासासाठी पंधरा लाख रूपये आहेत. तर माझ्या माहितीनुसार कर्मचा-यांचा जो खर्च आहे. गेल्या पाच वर्षात आम्ही कोणताही कर्मचारी वर्ग वाढविला नाही. जे कर्मचारी आहेत तेच काम करत आहेत. त्यांना पगार तर दयावा लागेल. त्यामध्ये तर कपात नाही करू शकत. आधीच त्यांचा बोनस, अनुदान बंद झाले आहे. त्यांना जो पगार मिळतो तो तर दयायला पाहिजे. ते तर देणे आवश्यक आहे. दुसरे आता सांगितले गेले की, जकात बाबीवर दरवाढ करण्यात आली. मालमत्ता कर व पाण्याचे कर यात काही वाढ करण्यात येऊ नये. असा सुझाव भाजपा, शिवसेना, कॉग्रेस , अपक्ष, राष्ट्रवादी कॉग्रेस सर्वांचा विचार होता. सर्वदलिय बैठक आम्ही तीन दिवस बोलावली होती त्यात सर्वांचे असे म्हणणे होते की, मालमत्ता कर व पाणीपट्टी दर वाढविण्यात येवू नये. त्यांनतर असे म्हणण्यात आले की, बहुमताने प्रस्ताव मंजुर करण्यात आला. जे सदस्य उपस्थित नव्हते त्यांचे मत तर गणले नाही जाणार. जे उपस्थित होते त्यांनी त्याचवेळी सर्वांनी स्थायी समितीत मंजुर केले.
(इकडे श्री. बच्चाराम रूपचंदानी बोलण्यासाठी उभे असताना...)आधी मला बोलु दया मध्ये बोलु नका नंतर तुम्ही बोला. मी जे बोलु इच्छितो की स्थायी समितीत अंदाजपत्रक सादर झाले. त्यावेळी आम्ही एकमत व्हावे म्हणुन तीन दिवस सर्वपक्षीय बैठक घेतली होती. आज जी जकात बाबीमध्ये दरवाढ केली आहे त्यामध्ये उल्हासनगरचे जे व्यापारी महामंडळ (उमा) आहे. आमचे आमदार श्री. सुरेश पप्पु कालानी यांनी विपक्ष, सर्व व्यापारी महामंडळ यांच्याशी मिळुन एकमताने ठरविले की जे कंपनीचे आयटम आहेत. त्यावरच दरवाढ करण्यात यावी. त्यात पण मी सुझाव देतो की, स्थायी समितीने......

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>तुम्ही आम्हाला बोलावले नव्हते.



<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आम्ही बोलावले होते, बिल्कुल बोलावले होते. माजी महापौर श्री. हरदास माखिजा यांनी फोन केला होता सर्व पक्षीयांना. आम्हाला पण व्यापा-यांनी बोलाविले होते. श्री. बच्चाराम उपस्थित आहेत त्यांना विचारा. आम्ही स्वतः व्यापा-यांनी निमंत्रण दिल्यावर जायचा. माझे पुर्ण होवू दया मग तुम्ही बोला.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:</u>-आयुक्त साहेबांनी स्थायी समिती समोर जो अर्थसंकल्प सादर केला होता. त्यामध्ये २ टक्याच्या हिशोबाने नगरसेवक निधी एक लाख रू. होता. मागील वर्षाचे आकडे लक्षात घेवुन आम्ही त्या एक लाखाचे चार लाख केले होते, २ टक्याच्या हिशोबाने. दुसरे असे की, महापालिकेचा नगरसेवक निधी २ टक्के झाल्यामुळे, शहरामध्ये असे बरेचसे नगरसेवक आहेत ज्यांना आपल्या प्रभागामध्ये जलवाहिनी टाकुन घ्यायची आहे. ज्यांना रस्त्यावर सार्वजनिक दिवाबत्तीसाठी खांब व विद्युत फिटींग करून घ्यायची आहे. आम्ही त्याची सुध्दा यामध्ये तरतुद ठेवली आहे, कुण्या नगरसेवकाच्या प्रभागात उद्यानाचे काम असेल ते सुध्दा यामध्ये ठेवले आहे, दिड लाखाचे. तसेच प्रत्त्येक सदस्याच्या प्रभागात सार्वजनिक दिवाबत्ती खांबासाठी व फिटींगसाठी एक लाखाची तरतुद ठेवली आहे. एक लाखाच्या आत कोणतीही जलवाहिनी टाकायची असेल तर त्याचीही तरतुद करून ठेवली आहे. ५० हजारा पर्यंतचे कोणतेही दुरूस्तीचे काम, ते मग सी.सी पॅसेज असो, रोड असो ते करता येईल. यासर्व कामांची तरतुद ठेवली आहे. दुर्बल घटकांचे जे पाच टक्याची जी रक्कम आहे. त्यातुनही सर्व सदस्यांना निधी मिळेल. त्याव्यतिरिक्त गलिच्छ वस्ती निर्मुलन योजनेअंतर्गत आम्ही जो निधी ठेवला आहे. त्यातुन ज्या ४८ अधिकृत झोपडपट्टया आहेत त्यामध्ये विकास कामे होतील. तर जवळ जवळ प्रत्त्येक नगरसेवकाच्या प्रभागात १०-११ लाखाचे काम होईल. तर महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार दोन टक्केच्या हिशोबाने नगरसेवक निधी ठेवला आहे. बाकी जी कामे होतील ती सर्वसाधारण निधीतुन होतील. व ती शहरातच होतील यासाठी तरतुद ठेवली आहे. आताच आमचे बंधु यांनी सांगितले की, महापौर निधी, उपमहापौर निधी, स्थायी समिती सभापती निधी का ठेवला आहे? हे निधी आजच ठेवलेले नाहीत. यापुर्वीच्या बॉडीमध्ये तीन वर्षापासुन हे निधी आहेत. आमचे जे उपमहापौर होते श्री. धनंजय बोडारे साहेब त्यांना सुध्दा या निधीतुन २५-२५ लाखचा निधी तीन वर्ष मिळाला होता. तो निधी डोनेशन म्हणुन दिला जात नाही. शहराच्या विकासासाठी कामी येतो. उपमहापौर, महापौर, स्थायी समिती सभापती हे सर्वजण कॅम्प नं. १ ते ५ पर्यंत कुठेही काम करू इच्छित असतील, त्यांच्याकडे जी निवेदने येतात. त्यांच्याकडे जे लोक येतात त्यांची कामे करण्यासाठी अर्थसंकल्पात याकामी तरतुद केलेली आहे. त्यानंतर आताच आमच्या बंधुनी सांगितले की, आम्ही वास्तविकता दर्शाविणारे आकडे ठेवले तर बरे होईल. वास्तविक आकडयांचा अर्थसंकल्प तयार करून आम्ही प्रशासनापुढे ठेवला आहे. करांची वसुली करणे शंभर टक्के रिझल्ट देणे हे त्यांचे काम आहे. आज आम्ही प्रशासनाकडुन ही अपेक्षा ठेवतो की त्यांनी प्रयत्न करावेत जेवढे उत्पन्न वाढेल तेवढे वाढविण्याचा प्रयत्न करावा. आज आयुक्तांचे आम्ही ॲप्रिशिएट करतो, श्री. चंद्रशेखर साहेबांच्या नंतर त्यांनी या दहा-बारा महिन्यांमध्ये चांगल्या प्रकारे करांची वसुली केली आहे. व शहराच्या विकास कामांमध्ये आणखी आम्हाला रिझल्ट देतील. आम्ही त्यांच्याकडुन ही अपेक्षा ठेवतो. व नाला सफाईसाठी जे दहा-दहा रोजंदारी हंगामी सफाई कामगार ठेवलेले आहेत. ज्याबाबत आम्ही स्थायी समितीने जे दोन महिन्याच्या कालावधीसाठी आम्ही ठराव पारीत केला आहे. परंतु प्रशासनाने त्यांची टप्पा टप्याने आदेश काढले आहेत. आधी एक महिन्याचा नंतर पंधरा दिवसाचा. आता पंधरा दिवसानंतर दिड महिना ते बसणार*

*(इथे मा. आयुक्त सभागृहाबाहेर पडले.)*



*आहेत. काल जो पुर आला होता तो केवळ उल्हासनगर मध्ये नाही तर पुर्ण महाराष्ट्रात आला होता. मुंबई बुडाली होती. कल्याण-डोंबिवली आतापर्यंत बुडाले आहेत. अंबरनाथ सुध्दा बुडाले आहे. काल नाल्यांची सफाई का झाली? कारण की, नाला सफाई कामी नेमलेले दहा-दहा रोजंदारी सफाई कामगार आपल्याकडे होते. मला वाटते की, त्यांचा कार्यकाल आणखी एक महिना वाढविला जावा. दोन*

महिन्याऐवजी तीन महिने केला जावा. कारण की, त्या कर्मचा-यांनी दोन महिन्यांमध्ये सर्व नाल्यांच्या सफाईचे काम पुर्णपणे नियंत्रणात आणले होते. म्हणुन या कर्मचा-यांचा कालावधी दोन महिन्यांऐवजी तीन महिन्याचा केला जावा. कारण की, प्रत्येक नगरसेवकांच्या प्रभागात जेथे पुराचे पाणी येते तेथे तो आवश्यक ते काम करू शकेल. कमीत कमी लोकांना दिलासा तर देवू शकेल. नगरसेवकांकडुन लोक अशी अपेक्षा करतात. व आम्ही मा. आयुक्तांना विनंती करतो की, त्यांनी दोन महिन्यासाठी रोजंदारीवरील हंगामी सफाई कामगारांची जी नेमणुक केली आहे. त्यांचा कालावधी आणखी एक महिना वाढवून दिला तर, जसे काल दोन तासामध्ये पुरावर नियंत्रण आणता आले अशा प्रकारचा पुर पुन्हा येवू नये परंतु आला तर व आपणांकडे कर्मचारी उपलब्ध असतील तर लोकांना आपण पुरापासुन तात्त्काळ दिलासा देवू शकु. आता स्थायी समितीमध्ये मिळकत कराच्या दरामध्ये जी वाढ केली होती.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>आयुक्त साहेब कुठे आहेत?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आयुक्त साहेब येत आहेत सध्या त्यांच्या आसनावर श्री. भडकवाड साहेब बसलेले आहेत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>जसे आपण केले, महापौरांच्या आसनावर उपमहापौरांना बसविले तसे त्यांनी केले....

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आता आपणास हवे असेल तर जे बदल झाले आहेत ते मी वाचुन दाखवितो नाहीतर श्री. ढाकरे साहेब वाचुन दाखवितील. मी प्रस्तावित करतो, स्थायी समितीने जकात दरांमध्ये १६ कोटी ९ लाखाची जी वाढ सुचविली आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>नाही. नाही. आम्ही जशा सूचना केल्या आहेत तशा आपण सुध्दा करा ना?आपण कसे वाचुन दाखविता?आपण वाचुन दाखविता तेच अंतिम आहे का?आम्ही सूचना केल्या आहेत की, जकात दरामध्ये वाढ करू नये. तशाप्रकारे आपण सुध्दा सूचना करा. जशा आम्ही सूचना दिल्या आहेत की, अमुक-अमुक असे करा त्याप्रकारे आपणही सूचना करा. पिठासिन अधिकारी अंतिम निर्णय देतील काय करायचे ते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>तर मग मी काय म्हणत आहे? बदल करण्याबाबत मी विनंती करत आहे.

<u>श्रीमती. जया साधवानी (पिठासिन अधिकारी):-</u>सध्या तरी ही सूचना आहे, यांना यांचे बोलणे पुर्ण करू दया. आपण कृपया खाली बसावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>श्री. ढाकरे साहेब, वाचुन दाखवतील.



<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>नाही. नाही. आम्हाला ज्या सूचना करायच्या आहेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आपण दोन वेळा सूचना दिल्या आहेत. आणखी काही दयायच्या आहेत का? माझ्या मते दोन वेळा तर आपण सूचना देऊन झाल्या आहेत आणखी काही सूचना करायच्या आहेत का?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>आपणांस ज्या सूचना करायच्या असतील त्या आपण करा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u> ठिक आहे.

| वस्तू गट कमांक | वस्तूचे नांव | आयुक्तांनी प्रस्तावित केलेले दर (टक्के) | स्थायी समितीने प्रस्तावित केलेलेदर (टक्के) | महासभेपुढे प्रस्तावित करत असलेले दर (टक्के) |
|---|---|---|---|---|
| ५ब | अन्य प्रकारची खादय तेले | २ | १.५ | १.५ |
| ६ | साखर ,गुळ ,ऊस | २ | १.२५ | १.२५ |
| ७ | मद्य व मद्यार्क, बीअर, | ४ | ४ | ४ |
| ११ | चहा ,कॉफी व कॉफीच्या बिया | २ | १.५ | १.५ |
| १३ | कॅन्फेक्शनेरी, जेली ,मासळी ,किराणा माल इ . | ३ | ३ | ३ |
| १४ब | औषधे | २ | २ | १.१० |
| ३२ | विजेचे बल्ब किंवा गॅसच्या प्रकाशासाठी असलेल्या वस्तू | ४ | ४ | ४ |
| ३३अ | सर्व प्रकारचे साबण(कमाल दर २: असल्यामुळे) | २ | २ | २ |

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u> एक मिनिट, महापौर महोदया, सभागृहनेता महासभा महासभा करत आहेत. महासभेने अदयाप मंजुर दिलेली नाही.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>ते विनंती करीत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मी विनंती करीत आहे. सर्व संमतीने झाले तर बरे होईल. आता आपण सांगा काय बोलु? माझा प्रस्ताव आहे असे म्हणू?

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३४ | पोठ्याश , रिठा, सोडा, इ . | ४ | ३ | २.५ |
| ३७ | काष्ट मद्यार्क | ४ | ४ | ४ |
| ३८अ | सर्व प्रकारचे पेट्रोल, खनिजतेल व स्पिरीट इत्यादी | ४ | ४ | २.५ |
| ३८क | एलपीजी | ४ | २.५ | ४ |
| ३८ड | केरोसिन | ४ | ४ | ३.२५ |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४०ब | केमिकल्स | | | |
| ४५ | कोळशाचे डांबर (कोलटार )अस्फाल्ट, इ . | ४ | ४ | ४ |
| ४६ | संगमवरी दगड ,विटा ,फलोरिंग टाईल्स | ४ | ४ | ४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | इत्यादी | | | |
| ४८ | पेन्टस ,डिस्टेंपर व कलर वॉर्नीस इ . | ४ | ४ | ३ . ५ |
| ४९ | काच ,काचेच्या वस्तु | ४ | ४ | ३ |
| ५१ | सर्व प्रकारचे लाकूड | ४ | ४ | ३ . ५ |
| ५२ | प्लायवूड ,सॉफ्टबोर्ड व त्यापासून तयार केलेल्या वस्तू | ४ | ४ | ३ . ५ |
| ५३अ | केसाचे तेल ,सुगंधी तेल इ . | ४ | ४ | ४ |
| ५३ब | कात्र्या , वस्तरे ,सर्व प्रकारची कटलरी | ४ | ३ | २ . २५ |
| ५३(क) | प्लास्टीक व बेकालाईट इ . | ४ | ३ | २ . ५ |
| ५३ड | लाकडी फर्निचर इ . | ४ | ४ | ४ |
| ५८अ | बिछोरा ,फाडी ,सुरमा , चुरामाल ,धंतल | ४ | ४ | ४ |

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>सभागृहनेता , ही बाब काय आहे जरा स्पष्ट करा. आपण प्रस्तावित केले आहे , काय वस्तु आहे?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मराठीत तर वाचुन दाखवित आहे. माझ्या पेक्षा आपणांस जास्त चांगल्या प्रकारे समजले पाहिजे. सुरमा कूरमा ....ठिक आहे हे नंतर समजावतो. महापौर महोदया , बाब क्र. लिहुन घेतला जावा यांना नंतर समजावून सांगायचे आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५८ब | तंबाकू | २ | २ | २ |
| ५९ | बिड्या व तपकिर | ४ | ४ | ४ |
| ६१ | सर्व प्रकारचे कापड | २ | २ | १ . ६० |
| ६४ | कच्ची किंवा न कातलेली लोंकर , इ . | ४ | ४ | ४ |
| ६५ | सुत व सर्व प्रकारचा दोरा | ४ | २ . ५ | २ . १० |
| ६८ | चप्पल ,स्लिपर ,सॅन्डल व पट्टे धरुन कातड्याच्या सर्व वस्तू | ४ | ३ . ५ | ४ |
| ६९अ | सायकलीसाठी नसलेले रबरी टायर्स व टयूब्ज | ४ | ४ | ४ |
| ७० | रबर माल | ४ | ४ | ३ . ५ |
| ७१ | हार्डवेअर , लोखंड व पोलाद | ४ | ४ | ३ |
| ७२ | लोखंड व पोलाद भंगार | २ | २ | २ |
| ७४ | मशिनरी व त्याचे सुट्टेभाग | ४ | ४ | ४ |
| ७६ | उपकरणे , उपकरणसंच ,उपयंत्रे व त्याचे भाग | ४ | ४ | ४ |
| ७७ | पितळ ,तांबे ,टिन ,ॲल्युमिनियम व इतर अलोह धातू | ४ | २ | १ . ४० |
| ७९ | पेपर पुठ्ठा , | ४ | ४ | ४ |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८० | लाख व बुच कॉर्क त्यापासुन केलेल्या वस्तु | ४ | ३ | ३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८२ | चिनीमाती भांडी, पोर्सेलेन भांडी व वीज कन्सुलेटर्स | ४ | ३ | ३ |

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>व तीन-चार बाबी अशा आहेत. ज्यांच्या जकात दरामध्ये थोडयाफार प्रमाणात बदल करायचा आहे. जसे की चप्पल आहे तीच्या जकात दरामध्ये बदल केला पाहिजे. तसेच रबराच्या बाबींच्या दरामध्ये थोडाफार बदल केला पाहिजे. त्याबाबत प्रस्ताव मी दिलेला आहे. आता जे सोळा करोड ९ लाख रू. स्थायी समितीने जकात दर वाढवुन उत्पन्न वाढविण्याचे ठरविले होते. त्यामध्ये आठ करोड आणि इतर काही वसुली प्रस्तावित उत्पन्नातुन कमी करून एकुण सोळा करोड ९ लाखामधुन ते कमी करून उत्पन्न दाखविले जावे. पाणी बिलामध्ये ३ करोडची वाढ दाखविण्यात यावी. आपण पाणी पुरवठा विभागाचे चालु मागणीचे बिल भरतो व सहा करोड थकबाकीचे बिल भरतो त्याविषयी मी आपणांस सांगु इच्छितो की, उल्हासनगरमध्ये जास्तीत जास्त सुविधा मिळाव्या म्हणुन आमचे मा. आमदार श्री. सुरेश पप्पु कालानी यांचा महाराष्ट्र शासनाशी वार्तालाप सुरू आहे. त्याचे इतिवृत्त पण तयार आहे. त्याबाबतीत घेतलेला निर्णय इथे अजुन यायचा आहे. त्यानुसार विलंब शुल्क आकारणी याबाबतचा निर्णय काही दिवसातच येईल विलंब शुल्क माफ केले जाईल. व जो ४० कोटी आणि इतर जे विलंब शुल्क आहे माफ केले जावे. व ४४ कोटी आपल्याकडे थकबाकी आहे. ते आमच्याकडुन दहावर्षात घेतली जावी. आणि पहिल्यावर्षी फक्त एक करोड रूपये घ्यावे. आम्ही त्यासाठी सहा करोडची जी तरतुद ठेवली आहे ती रदद करून फक्त एक करोडची तरतुद ठेवण्यात यावी. आणि वाहने भाडयाने घेण्यासाठी आम्ही जी तरतुद ठेवली आहे. त्यामधुन २५ लाख रू. कमी करून वाहन भत्ता अधिका-यांना देण्यात यावा. असे महाराष्ट्र शासनाचे निर्देश आहेत. जे अधिकारी कार्यालयाचे वाहन वापरतात त्याऐवजी ते जर वाहनभत्ता घेवू इच्छित असतील, ते दहा हजार होवोत १२ हजार होवोत. जसे शासनाचे निर्देश आहेत. त्या हिशोबाने आमच्या महापालिकेत जे १६ अधिकारी आहेत त्यांना जर हा वाहन भत्ता दिला गेला तर त्यामुळे आमच्यावर कोणतेही आर्थिक ओझे पडणार नाही. जसे भाडयाच्या गाडया घेतो त्याप्रमाणे त्यांना वाहन भत्ता देवू. ही सुध्दा माझी एक सूचना आहे. त्यानंतर जकातीचा जो ठेका आहे. जसे की यावर्षी आमच्या निविदेस उशिर झाला म्हणुन एप्रिल, मे, जुन चे आपणांस जे ११ कोटी रू , ४३ कोटी ६७ लाखाच्या हीशोबाने ११ कोटी मिळाले आहेत. ऑक्ट्राय टेंडर बेसिक मिनिमम प्राईज लास्ट यिअर टेंडर ४३ करोड ६७ लाख, त्यावर दहा टक्के वाढ यावर्षी केली जावी. चार करोड या हिशोबाने वाढतील. जकात दरामध्ये केलेल्या वाढीमुळे १६ कोटी ९ लाखा ऐवजी ९ कोटी वाढ करत आहोत. एकुण होतात ५७ करोड. व हे टेंडर ज्या दिवसापासुन दिले जाईल त्यादिवसापासुन एक वर्षासाठी ते असेल. आमच्या जकात ठेकेदाराची मुदत २ जुलै रोजी संपुष्ठात येत आहे. निविदेची प्रक्रिया पुर्ण होण्यासाठी पंधरा-वीस दिवस लागतील तर तोपर्यंत जकात वसुलीचे काम महापालिकेने करावे. जर आमचे कर्मचारी जकात ठेकेदारापेक्षा जकातीची जास्त वसुली करून देत असतील तर आम्ही जे आश्वासन दिले होते की, जकात वसुलीचे काम महापालिका करेल त्या आश्वासनाची आम्ही पुर्तता करू. आमच्या आमदार साहेबांनी आश्वासन दिले होते की, जकात वसुलीचे काम महापालिका करेल. तर आज आमच्याकडे जो कर्मचारी वर्ग आहे व आमचे आयुक्त आहेत ते सक्षम आहेत. २ जुलै रोजी जकात ठेकेदाराचा कालावधी पुर्ण होत



आहे. त्यानंतर पंधरा दिवस लागोत की, एक महिना, ही एक आव्हानाची वेळ आहे, कर्मचा-यांसाठी आणि आयुक्तांसाठी. आम्ही जी निविदा काढत आहोत. त्यामध्ये अशा प्रकारच्या अटी असाव्यात. निविदा भरणा-या व्यक्तीची भांडवली स्थिती देकार

रक्कमेच्या पाच टक्के एवढी असावी. मागील तीन वर्षाच्या लेखा परिक्षणाचा अहवाल, जकात पथकर यासारख्या क्षेत्रामधील कामाचा अनुभव या ज्या अटी आहेत त्या त्यामध्ये असल्या पाहिजेत. जेणेकरून जकातीचा ठेका भरणारी व्यक्ती अनुभवी असावी. ठेका घेतल्यानंतर लोकांना त्यांनी त्रास देता कामा नये. जसे की, आज पर्यंत आपणांकडे अशी एक दोन प्रकरणे झाली आहेत. ज्याबाबत शहरामध्ये थोडा रोष झाला होता. जकात ठेकेदाराच्या कर्मचा-यांकडुन शहरातील काही व्यापा-यांबाबत काही प्रकार घडले होते. याप्रकारच्या अटी टाकल्यामुळे एक चांगल्या प्रकारचा ठेकेदार ठेका घेईल. जेणेकरून तो भविष्यात चांगल्याप्रकारे कामकाज चालविल आणि ठेकेदाराचा जो कालावधी आहे ज्या दिवसापासुन त्याला ठेका दिला जाईल त्यादिवसापासुन एक वर्षाचा असावा. एम.एस.आर.डी.ए. मध्ये ज्या प्रकारे निविदेचे कामकाज चालते. त्यांची पुस्तिका माझ्याकडे आहे. महाराष्ट्र स्टेट रोड डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड, मुंबई. त्यांच्या जशा अटी शर्ती असतात त्याप्रमाणे केले गेले तर खुप चांगले होईल. एम.एस.आर.डी.ए.च्या पध्दतीप्रमाणे ठेका दिला जावा. म्हणजे कमीत कमी ५७ कोटीचे जे लक्ष आम्ही ठेवले आहे. ५७ कोटी यासाठी ठेवले आहे की आणखी स्पर्धेतुन निविदेची रक्कम वाढु शकेल. ५९ ,६० ,६१ कोटीची सुध्दा निविदा भरल्या जावु शकतील. परंतु आम्ही ५७ कोटीचे लक्ष्य ठेवत आहोत. जेणेकरून कुणाही ठेकेदाराने ठेका घ्यावा. व त्या दरम्यानचा जो कालावधी आहे. त्या कालावधीत महापालिका कर्मचा-यांकडुन (ट्रायल बेसिस) चाचणी पध्दतीवर काम करून घेतले जावे. जर ते ठेकेदारापेक्षा जास्त वसुली करत असतील तर कुणाचा ठेका स्विकारायचा किंवा फेटाळायचा हे आमच्या आयुक्तांच्या अधिकार क्षेत्रात आहे. त्यांना वाटले तर स्विकृत करू शकतील किंवा फेटाळु हि शकतील. मला वाटते सर्व मुदयांचा खुलासा झाला आहे. सर्व नगरसेवकांच्या प्रभागामध्ये विकास कामे झाली पाहिजेत. जकात वसुलीचे काम महापालिकेने चालविले पाहिजे. जकातीचे जे दर आहेत ते आम्ही व्यापा-यांना विश्वासात घेवून ठरविले आहेत. त्या हिशोबाने कुणीही नाराज होण्याचे कारण नाही.व हे जे अंदाजपत्रक आहे ते अतिशय चांगले अंदाजपत्रक आहे. भाभी ज्योती कालानी यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकामध्ये दोन रेल्वे उड्डाणपुल आहेत. पवई व उल्हासस्टेशन येथिल उड्डाणपुल पुर्ण होतील. त्यांनी काही रस्तेही प्रस्तावित केले आहेत व अशी आणखी काही सवलती येणार आहेत. आमचे आमदार श्री. पप्पु कालानी साहेब रोज महाराष्ट्र शासनाकडे जात असतात. आणखी काही खुपशा सवलती आम्हाला मिळणार आहेत. पाच कोटी रू. चे कर्ज आहे, जे प्रलंबित आहे ते यावर्षी मिळेल व आमचे जे रस्ते बाकी आहेत तेही आयुक्त साहेब यावर्षी चालु करतील. व नगरसेवकांच्या प्रभागात, आज अर्थसंकल्पास मंजुरी दिल्यानंतर उदयापासुनच कामाला सुरूवात होणार आहे. कारण की, ११ फेब्रुवारी रोजी जे लोक निवडुन आले आहेत ते आजपर्यंत लोकांना तोंड देत आहेत. आज जुलै महिना सुरू होत आहे. लोक त्यांच्याकडे जातात म्हणतात की, आपण निवडून आला आहात. चार-पाच महिने झाले काम तर काही करत नाहीत. असे हे जे आम्हा नगरसेवकांना ऐकून घ्यावे लागत आहे. ती गोष्ट लक्षात घेता. आयुक्त साहेब शहराच्या विकास कामांमध्ये लक्ष घालतील. व काल जशा नाल्यांबाबतच्या अडचणी आल्या होत्त्या. जर कुठल्या नाल्यावर अनाधिकृत बांधकाम झालेले असेल ,कुठे नाला तयार करणे आवश्यक असेल किंवा कुठे अनाधिकृत बांधकाम तोडणे आवश्यक असेल तर त्या गोष्टी लक्षात घेवून काल जसा त्रास झाला तसा त्रास पुढे होवू नये. व नाला सफाई कामी जे दहा-दहा हंगामी सफाई कामगारांची भरती केली आहे. या कामगारांना यापुढे मुदतवाढ दिली जावी. ऐवढे बोलुन मी माझे दोन शब्द समाप्त करतो.

--२२--

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>मा. महापौर महोदया, आमचे बंधु श्री. किशोर वनवारी यांनी त्यांच्या भाषणात दोन वेळा माझ्या नावाचा उल्लेख केला. मी त्यांना

सांगु इच्छितो की, व्यापारी महामंडळाच्या सभेमध्ये आम्ही मागणी केली होती की, औषधांच्या जकात दरात आपण जी वाढ करत आहात. तो माफ केला जावा. त्याव्यतिरिक्त पेट्रोलवर जे साडे तीन टक्के वाढ केली होती तेथे त्याबाबत निर्णय झालेला नव्हता. तसेच गॅस वर ४ टक्के जकातीचा निर्णय त्या सभेत झालेला नव्हता. मी सभागृह नेत्त्यांना हे सांगु इच्छितो की, बोलण्याआधी, सांगण्याआधी सर्व माहिती घेवून प्रस्ताव ठेवावयास पाहिजे. त्या शिवाय मी सभागृह नेत्त्यांना सांगु इच्छितो ज्यांनी हा प्रस्ताव ठेवला आहे. मी विचारू इच्छितो की, आपण ह्या ज्या बाबी (ॲटम) ठेवल्या आहेत. त्या बाबीमध्ये वार्षिक उत्पन्न किती आहे? किती जकात आमच्या इथे येते? जसे की आपण बाब क्र. ५ ब ठेवली आहे. ज्या सुध्दा बाबी ठेवल्या आहेत त्यांचे वर्षाचे उत्पन्न किती येते? हे जे आपण लिहिले आहे की, १६ कोटी रू. उत्पन्न मिळेल, आठ कोटी रू. मिळतील हे आपण कशावरून ठरविले आहे. एकेक बाबीच्या वार्षिक उत्पन्नाची आपणांकडे माहिती आहे का?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौर, अर्थसंकल्पात नेहमी असे होते की, जेव्हा कुणीही एखादा सदस्य चर्चा करतो व अधिका-यांना प्रश्न विचारतो तर त्याचे उत्तर दिले जाते. परंतु पहिल्यांदाच असे झाले आहे की, सर्व जण बोलतच आहेत. यावर काही चर्चा होत नाही. मी अनेकदा विचारले होते की, प्रशासनावरील खर्च किती आहे तो अदयाप पर्यंत सांगितला गेला नाही. प्रशासनावरील वार्षिक खर्च किती आहे? तो पुर्ण अर्थसंकल्पाच्या किती टक्के आहे? व आम्हास किती ठेवला पाहिजे यावरील चर्चेसाठी कुणी अधिकारी?एकेक विषयावर आम्ही जर बोलत गेलो , बोलत गेलो तर त्यावर काही निष्कर्ष निघत नाही ना? आम्ही फक्त बोलुन खाली बसु, प्रशासनावर एकुण किती खर्च आहे? व तो अर्थसंकल्पाच्या किती टक्के आहे? यावर चर्चा करण्यासाठी कुणी जबाबदार संबंधित अधिकारी? महापौर महोदया, एकेक विषयावर आम्ही बोलत गेलो, बोलत गेलो तर त्यावर काही निष्कर्ष निघत नाही ना? आम्ही फक्त बोलुन खाली बसु. प्रशासनावर एकुण किती खर्च आहे. व तो अर्थसंकल्पाच्या किती टक्के आहे.

<u>मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-</u>आयुक्त साहेब....

<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>उल्हासनगर महानगरपालिकेचे एकुण उत्पन्न जे स्थायी समिती व्दारा निश्चित केले गेले आहे. ते १६३ कोटी रू. आहे. हे जे उत्पन्न आहे त्यातुन अनुदाने, कर्ज व अनामत रक्कमा वजा केल्या जातात. जेव्हा खर्च आणि प्रशासनावरील खर्च यांची आकडेमोड केली जाते. त्या १६३ कोटी मधुन अनुदाने पावणे चार कोटी, कर्ज पाच कोटी, अनामत रक्कमा व शासकीय वसुली १३ कोटी व कर्ज परतफेड २३ कोटी हे ४५ कोटी वजा केले तर ११७ कोटी रू. चे उत्पन्न महापालिकेचे आहे. यामध्ये प्रशासनावर होणारा खर्च २२ कोटी ५७ लाख. टक्केवारीच्या हिशोबाने पाहिले तर ते १९. ५१ टक्के आहे. म्हणजे जवळ जवळ २० टक्के होतात.

<u>मा. सदस्य श्री. जमनु पुरस्वानी :-</u>मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ९६ मध्ये असे दर्शाविण्यात आले आहे की, आपणांस ज्या काही रक्कमा दयायच्या आहेत त्या अर्थसंकल्पामध्ये दाखविल्या पाहिजेत त्यांचे पुर्ण विस्तृत विवेचन अर्थसंकल्पात दाखविणे आवश्यक आहे. जसे की, पाणी पुरवठा विभागातील



किती रक्कम आम्हाला देणे बाकी आहे. दुसरे किती कर्ज देणे बाकी आहे. त्याचे विस्ताराने वर्णन देणे आवश्यक आहे, असे आहे की नाही?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-होय आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मग यामध्ये दाखविले नाही?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-हो. दाखविले आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-आम्हाला जवळ जवळ ९५ कोटी रू. देणे बाकी आहे. ते तर या अर्थसंकल्पात दाखविले नाही. आम्ही किती रक्कम देणे बाकी आहे ते विस्ताराने यामध्ये दिलेले नाही.

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-भुयारी गटार योजना कर्ज महानगरपालिकेने १९८० मध्ये घेतलेले आहे. त्याची २०१० पर्यंत परतफेड करायची आहे. यावर्षामध्ये १० कोटी रू. आपणांस दयायचे आहेत. ते आम्ही दाखविले आहेत. एम. आयडी.सी ला २७ कोटी रू.,... आमचे जे वार्षिक बिल आहे ते २१ कोटी रूपये.....

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:- एकुण किती रूपये देणे बाकी आहे. त्याचे सविस्तरपणे येथे वर्णन असले पाहिजे ना? आम्हाला किती देणे बाकी आहे आम्ही हा खोटा अर्थसंकल्प तयार करून व आम्ही कर्ज घेत जावे, आज माझा घरचा खर्च १० ,००० रू. आहे. व माझ्यावर पाच लाखाचे कर्ज आहे. या पाच लाखाचे व्याज मी दहा हजार रू. भरत असेल तर? आज आपणास शंभर कोटी रूपये एमआयडी. सीस देणे बाकी आहे. व आम्ही दाखवित आहोत की, २७ कोटी रू. आम्ही देवू व बाहेरून आम्ही कर्ज घेत राहु खोटा अहवाल दाखवून? काय अशी कायदयात तरतुद आहे का? शंभर कोटी रू. एमआयडी.सी देणे बाकी आहेत हे आपण अर्थसंकल्पात दाखविले आहेत का?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-२१ कोटी रू. आपण पाणी खरेदी पोटी दर्शाविले आहेत. पुर्ण वर्षभरात २१ कोटी रू. चे पाणी बिल होते. व जसे की एमआयडी.सी. बरोबर असे ठरले होते की,..........

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-काहीही ठरलेले असो. आपणांस जी पुर्ण रक्कम दयायची आहे. त्याचे विस्ताराने येथे वर्णन करायचे आहे की, नाही.

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-अशाप्रकारची तडजोड मान्य करण्यात आलेली आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-विस्ताराने वर्णन करायचे आहे की नाही एवढे सांगा. कायदयामध्ये अशी तरतुद आहे का? जी रक्कम आपणांस दयायची आहे ती. अर्थसंकल्पात विस्तृतपणे दर्शाविली पाहिजे असे कायदयात आहे की नाही.

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-असे आहे की, जे या वर्षात दयाचे आहे ते अर्थसंकल्पात दाखवायचे आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-आज आम्ही म्हंटले की आम्ही २७ कोटी देवू प्रत्यक्षात आम्हाला त्यांना १०० कोटी रू. दयायचे आहेत. बाकी इतर कर्ज घेत राहणार?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-लायबिलीटी डयुज फॉर दी यिअर. जी ठराविक अशा वर्षात दयायची असते ती दर्शविली जाते. असे तर आम्ही जे भुयारी गटार योजनेसाठी कर्ज घेतले आहे ते, हुडकोचे कर्ज तसेच पाणी पुरवठा योजनेत वरील कर्ज अशाप्रकारचे कर्ज आम्हाला २०१० पर्यंत किंवा २००६ पर्यंत असे पंधरा वीस वर्षामध्ये परतफेड करायची आहे यामध्ये जे देणे आहे ते चालु वर्षामध्ये जे देणे आहे ते दर्शविले जाते. अशा प्रकारची तडजोड मान्य करण्यात आली असुन तसा करार करण्यात आलेला आहे. त्या हिशोबाने आम्ही सहा कोटी रू. ठरविले आहेत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-शिक्षण मंडळाचा ४ कोटी ६३ लाख रू. चा खर्च दाखविला आहे. याबाबत शिक्षण मंडळाचा कुणी अधिकारी स्पष्टीकरण करेल? हा, ४ कोटी ६३ लाख रू.चा खर्च अचानक कसा आला? हा आकडा कुठून आला? एखादी बहु मजली इमारत बांधणार आहात काय? नविन शिक्षण मंडळाची निवडणुक होणार आहे, ४ कोटी ६३ लाख रू. चा खर्च कुठून आला? कशावर खर्च करणार आहात? आज पर्यंत १ कोटीच्या आतच खर्च होत होता ४ कोटी ६३ लाख खर्च कसे करत आहात? इमारत बांधण्यांचा नविन काही प्रस्ताव आपल्याकडे आहे का? विद्यार्थ्यांना काही वाटप करायचे आहे काय? काय देणार आहात? ४ कोटी ६३ लाख कशाचे दाखविले आहेत?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-शिक्षण मंडळाच्या वतीने दरवर्षी जो बजेट तयार केला जातो त्यामध्ये जी मागणी महानगरपालिकेकडे ते करतात तेवढी रक्कम आम्हास त्यांना दयावी लागते. महानगरपालिकेचे पाच वर्ष पुर्ण झाले आहेत. महानगरपालिका यावेळी सहाव्या वर्षात पदार्पण करत आहे. पाच वर्ष पर्यंत महानगरपालिका त्यांना २० टक्के अनुदान देत होती. पाच वर्ष पुर्ण झाल्यानंतर अनुदानाची जी रक्कम ५० टक्के होते व ही जी त्यांची मागणी आहे. पगार, देखभाल दुरूस्तीच्या हिशोबाने त्यांनी आमच्याकडे जी मागणी केली आहे. त्यानुसार आम्ही चार कोटी ६३ लाखाची तरतुद ठेवली आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-यामध्ये पगार व इतर खर्च आहेत. शाळाच्या इमारतीची दुरूस्ती करणे किंवा शाळेची इमारत बांधणे वगैरे?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-ते किती आहे?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-ते शिक्षण मंडळाच्या अधिका-यांना माहित आहे. सविस्तर अर्थसंकल्प त्यांच्याकडे आहे. त्यांनी आमच्याकडुन जी अपेक्षा ठेवली आहे. ४ कोटी ६३ लाख रू.ची ती आम्ही यामध्ये दर्शविलेली आहे. ती दाखविणे जरूरीचे आहे.



मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-मा. महापौर महोदया, एक मिनिट, श्री. इदनानीजी आपण सांगितले की, प्रशासनावरील जो खर्च आहे त्याची आकडेवारी आपण १५७

कोटी रू. वरून काढली आहात, जी की स्थायी समितीची अंदाजित रक्कम आहे. आपले (फॅक्चुअल) वास्तविक/ प्रत्यक्ष उत्पन्न किती आहे?

<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>जे स्थायी समितीने ठरविले आहेत.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>मागील आर्थिक वर्षामधील प्रत्यक्ष उत्पन्नाचा आकडा काय? किती टक्के आस्थापनेवरील खर्च आहे? हे जे १५७ कोटी तुम्ही आता सांगितले हा स्थायी समितीचा अंदाज आहे. हा (फॅक्चुअल) वास्तविक/ प्रत्यक्ष आकडा आहे.

<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>स्थायी समितीने जो अर्थसंकल्प तयार केला....

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>गेल्या वर्षाचे वास्तविक / प्रत्यक्ष उत्पन्न काय?

<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>वास्तविक / प्रत्यक्ष उत्पन्न ८३ कोटी रू.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>त्याच्या किती टक्के आस्थापनेवरील खर्च आहे?

<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>८३ कोटी प्रमाणे २६ टक्के होते.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>किती?

<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>२६. ५० टक्के. म्हणजे २७ टक्के होते.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>वाढले कसे? आपण तर १९ टक्के सांगितले होते. वस्तुस्थिती पेक्षा वेगळे आपण सांगत आहात ना? आस्थापनेवरील जो खर्च आपणांस सांगायचा आहे तो वास्तविक / प्रत्यक्ष उत्पन्नावरील टक्केवारीनुसार दर्शवायचा आहे. आम्ही असे म्हणु की, २०० कोटी रू. उत्पन्न येणार आहे पुढील वर्षामध्ये, जर मी स्थायी समितीचा सभापती असतो आणि २०० कोटी रू. उत्पन्न येईल असे सांगितले असते तर आपण त्या हिशोबाने दर्शविले असते का?

<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>जशी जशी स्थिती बदलत जाईल तस तसे टक्केवारी बदलत जाईल. जर आम्ही ऐवढी वसुली करण्यास सक्षम असू तर नैसर्गिकच आहे की, प्रशासनावरील खर्चाची टक्केवारी खाली येईल.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>आपण सक्षम आहात? प्रशासनाने जो उत्पन्न व खर्चाचा जो अंदाज तयार केला होता तो १०४ कोटीचा का तयार केला होता? आपण सक्षम आहात तर आपण जो उत्पन्न व खर्चाचा जो अंदाज तयार केला होता तो १०४ कोटीचा का केला होता?

*<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>१०४ कोटीच्या अंदाजित उत्पन्न व खर्चाचा अंदाज तयार करण्यात आला होता. त्यास अर्थसंकल्प म्हणता येणार नाही, तो अर्थसंकल्प नाही त्यावर स्थायी समितीच्या सदस्यांनी अर्थसंकल्प तयार करताना आपले हे लक्ष्य ठेवले आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>काय हे नगरपालिका लेखा संहितेमध्ये असे आहे का? की आपणांस मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष उत्पन्नाच्या आकडयांची सरासरी घ्यायची आहे. किंवा मागील वर्षाच्या उत्पन्नाचा जो आकडा आहे, जेवढी वसुली आपण वाढवू शकता तेवढी उत्पन्नाच्या बाजुला दाखवायची आहे. या दोघांमध्ये जो कमी आहे त्याचा आकडा आपणांस दाखवायचा आहे?*

*<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>अशा प्रकारची तरतुद महाराष्ट्र नगरपालिका अधिनियमामध्ये होती. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये अशाप्रकारची तरतुद नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>म्युनिसिपल अकाऊंट कोडमध्ये तर आहे?*

*<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>महाराष्ट्र म्युनिसिपल अकाऊंट कोडमध्ये आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महाराष्ट्र म्युनिसिपल अकाऊंट कोडमध्ये आहे?असे आहे का? मी आपणांस असे म्हणत आहे की, उत्पन्नाचे आकडे ज्या पध्दतीने आपणांस अंदाजित करायचे आहेत. उत्पन्नाचा जो अंदाज तयार करायचा आहे. त्याबाबत असा नियम आहे का की, मागील तीन वर्षाचे प्रत्यक्ष उत्पन्नाच्या आकडयांची सरासरी घ्यायची आहे. किंवा मागील वर्षाच्या उत्पन्नाचा जो आकडा आहे. त्यात जितकी वसुली आपण वाढवु शकतो. त्यामध्ये टक्केवारी वाढवू शकतो. यामध्ये वाढ करून, या दोन्ही मध्ये जो कमी असेल तो आकडा घ्यायचा आहे.*

*<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>सर्व सामान्यपणे असे केले पाहिजे.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>असे केले पाहिजे?*

*<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>परंतु महानगरपालिका अधिनियमामध्ये अशाप्रकारची तरतुद नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>आपल्या अंदाजपत्रकामध्येय आपण असे केले होते?*

*<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>प्रशासनाने तसे केले होते.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>आपण असे सांगत आहात की, १५७ कोटी चा जो आकडा आहे तो प्रत्यक्षातील आहे.*

<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>नाही. हा स्थायी समितीने ठरविलेला आहे, ११७ कोटी.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>आपण सांगितलेत ना की, इतके होवू शकते.

<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>जर होवू शकत असेल तर?

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>होवू शकत असेल तर? याचा अर्थ असा की, जर १५७ कोटी रू. उत्पन्न झाले तर, १६३ कोटी रू. चा खर्च आम्ही करू, जर तर मध्ये आहे. मागील वर्षामध्ये आपले प्रत्यक्ष उत्पन्न ८३ कोटी रू. चे होते. बरोबर आहे? मागील वर्षी उत्पन्नाचा जो अंदाजित आकडा होता तो १७३ कोटीचा होता. त्यामधुन ८३ कोटी रू. चे उत्पन्न आपणांस मिळाले म्हणजे वसुलीची टक्केवारी किती आहे? जवळ जवळ ५० टक्के, म्हणजे प्रशासनाची वसुलीची जी मर्यादा आहे. ती ५० टक्के वसुली पर्यंतची आहे. मागील वर्षी आपलीच सत्ता होती. १७३ कोटी अंदाजित उत्पन्नाचा आकडा निश्चित केला होता. तर आपलेच राज्य होते आपल्याच राज्यात १७३ कोटी अंदाजित उत्पन्नाच्या ठिकाणी ८३ कोटी उत्पन्न प्राप्त झाले होते. म्हणुन यासाठी आपल्या आकडयांवर आमचा भरोसा नाही. आम्ही जे वांरवार सांगतो की, आपले जे अंदाजपत्रक आहे ते अयशस्वि आहे. बोगस आकडयांवर आधारीत आहे. हे वांरवार मी यासाठी सांगतो की, सत्तेमध्ये बदल झालेला नाही. सत्ता तर आपलीच आहे ना?

<u>मा. सदस्य श्री. नरेंदकुमार ठाकुर:-</u>मा. महापौर, हे सत्तेबाबत बोलत आहेत म्हणुन यांना मी सांगु इच्छितो की,....

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>माझे बोलणे अदयाप पुर्ण झालेले नाही. सन्माननिय सदस्यांस मी विनंती करतो की, कृपया मला माझे बोलणे तर पुर्ण करू दया.

<u>मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानी:-</u>श्री. नरेंदकुमार ठाकुर कृपया आपण दोन मिनिटांनंतर बोला.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-</u>या सभागृहामध्ये आम्ही पुन्हा पुन्हा हाच मुददा उपस्थित करत आहोत की, मागील वेळी सत्तेमध्ये आपणच होतात. आपलीच सत्ता होती. स्थायी समितीच्या सभापती पण त्याच आहेत सभागृहनेता पण तेच आहेत. फार थोडे चेहरे बदली झाले आहेत. बाकी सर्व लोक तेच आहेत. जेव्हा मागील वर्षी आपल्या राज्यात १७३ कोटी रू. अंदाजित उत्पन्न आपण दाखविले होते. प्रत्यक्षात फक्त ८३ कोटी रू. उत्पन्न प्राप्त झाले आपण कोणत्त्या आधारावर अशी हमी देता? काय कर्मचारी वर्ग बदली झाला आहे? आपण कोणत्त्या आधारावर १५७ कोटी किंवा १६३ कोटीचे उत्पन्न आणणार आहात? आपणांस आमची हीच विनंती आहे की, खर्चाच्या बाजुला आपण जे आकडे वाढविले आहेत. जर आपला उददेश स्पष्ट असेल, आपण काम करू इच्छित असाल तर गल्लोगल्ली पर्यंत आपणांस विकासाची कामे घेवून जावयास पाहिजे होती. त्यासाठी प्रभाग समित्त्यांसाठीची तरतुद आपण वाढवावयास पाहिजे होती. आपण फक्त सार्वजनिक बांधकाम समितीसाठी ४० कोटीची जी तरतुद केली आहे त्यामध्ये खरोखरच आपणांस जर गल्लोगल्ली पर्यंत विकास कामे करायची असतील तर प्रभाग समित्त्यांसाठीची तरतुद आपण

वाढवावयास पाहिजे होती. जी सार्वजनिक बांधकाम समिती आहे. ती तर कोणती संविधाने समिती नाही. प्रभाग समितीला संविधानात आधार आहे. व सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी या समितीची स्थापना करण्यांत आलेली आहे. त्यासाठी त्या समित्त्यांमध्ये दोन-दोन कोटीची तरतुद का केली नाही. आपला उद्देश स्पष्ट आहे की, आपण ही जी ३२ कोटीची तरतुद केली आहे त्यामध्ये आपणांकडे विकास कामांची काही योजना नाही. आपण फक्त खर्चाचे आकडे वाढविले आहेत. खर्चाचे आकडे वाढविण्यासाठीच आपण जकात करामध्ये वाढ करून लोकांवर जकात कराची जी वाढ करत आहात. ही वाढ केवळ व्यापा-यांवरच नाही. आपण वारंवार येथे सभागृहात सांगितले की, आम्ही व्यापारी महामंडळाशी चर्चा केली आहे. व्यापारी महामंडळाशी चर्चा केली आहे. यांच्याशी चर्चा केली, त्यांच्याशी चर्चा केली. हि वाढ फक्त व्यापा-यांवर आहे का? ही जी वाढ आपण करणार आहात ती सर्व सामान्य जनतेवर नाही का? आपण ज्या काही बाबी दर्शविल्या आहेत ज्यांवर जकात कराचा दर वाढविणार आहात ती प्रत्येक बाब सर्वसामान्य जनतेशी संबंधित आहे. हे जे ओझे आहे ते अंतिमतः त्यांच्यावरच पडणार आहे. तर त्यांचे काही मत घेतले होते का? आपण जनतेमध्ये गेला होतात का? आपण जनतेला विचारले आहे का? त्यांना विचारलेत का की आपणांस जकात कराच्या दरामध्ये वाढ पाहिजे का? आपण चार लोक जमा केले आणि चार लोकांमध्ये निर्णय घेतला यामध्ये असे काही नाही..... शहरातील लोकांना आपण विश्वासात घेतले पाहिजे. आपण सर्वसामान्य जनतेला विश्वासात घेतले आहे का? मालमत्ता कर व पाणी पट्टीकरामध्ये आयुक्तांनी जो प्रस्ताव दिला होता. त्यामध्ये जवळ जवळ ४० कोटी पर्यंत आपण खाली आला आहात १० कोटी मध्ये आपणांस कोणता फरक पडणार आहे? माझी सभागृहास विनंती आहे की, आमचे सन्माननिय सभागृह नेता श्री. किशोर वनवारी यांनी जो प्रस्ताव ठेवला आहे. ज्यामुळे फक्त दहा कोटीची वाढ होणार आहे. आपण ज्याप्रमाणे उत्पन्नामध्ये दहा कोटी वाढ करण्याचा प्रस्ताव दिला आहे. त्यानुसार खर्चामध्ये सुध्दा आपण दहा कोटी रूपयाची कपात करा. व हि जकात वाढ करू नका या जकात वाढीस आमचा विरोध आहे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, मी लहानशा दोन सूचना देवू इच्छितो की, आमच्या शहरामध्ये शिस्तीची कमतरता आहे. त्या शिस्तीला आणण्यासाठी जसे हातगाडीवाले आहेत, दुकानदारही फुटपाथवर आपले सामान ठेवतात. ऑटो रिक्षा वाले त्यांच्या मनाला वाटेल तेथे ऑटो रिक्षा उभी करून ठेवतात. तर माझी अशी सूचना आहे की, रस्त्याच्या बाजुला व स्पीड ब्रेकर वर काहीही खुणा केलेल्या नाहीत त्यामुळे केव्हाही अपघात होण्याची शक्यता आहे. म्हणुन झेब्रा क्रासिंग तसेच पार्कींगसाठी मार्कींग केली पाहिजे. त्यासाठी यामध्ये एक विशेष तरतुद ठेवली जावी. जेव्हा आमच्या समितीकडून अशा प्रकारचा प्रस्ताव येईल त्यासाठी पुरेशी रक्कम मंजुर केली जावी. ही एक गोष्ट आहे. व दुसरे असे की, आमचा जो नगररचना विभाग आहे त्याची कार्यपध्दती एकदम लुप्तप्राय आहे. त्या विभागाचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. व त्याचे योग्य संगणकीकरण झाले पाहिजे त्यासाठीही योग्य ती तरतुद ठेवली जावी. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>मा. महापौरजी, मी सभागृह नेत्त्यांच्या एक गोष्ट लक्षात आणु इच्छितो की, त्यांनी मागच्या महासभेमध्ये, मागच्या बॉडीमधील महासभेत एक ठराव पारीत केला होता. चौकांना व रस्त्त्यांना नावे देण्याबाबतचा. परंतु आजच्या अर्थसंकल्पात अशी काही तरतुद ठेवलेली नाही की ज्या चौकांना नाव दिले आहे त्यावर नावाचा फलक लावला जावा, बोर्ड लावला जावा. तर ही पण तरतुद या अर्थसंकल्पात झाली पाहिजे असे मला वाटते. सभापतीजी दुसरी एक गोष्ट सांगु

इच्छितो की, एक, बोअरवेल दुरूस्तीसाठी आपण अर्थसंकल्पात तरतुद ठेवली आहे परंतु नविन बोअरवेल बसाविण्यासाठी आपण काहीच तरतुद केलेली नाही. ती तरतुद आजच्या अर्थसंकल्पात ठेवली गेली तर खुप चांगले होइल.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>मा. महापौरजी, मी जी काही माहिती मागितली होती. ती दिली जावी. आयुक्तांना, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ बाबत मी विचारणा केली होती त्याचे स्पष्टीकरण केले जावे.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः-</u>मा. महापौरजी,मा. स्थायी समिती अध्यक्षा, मा. आयुक्त साहेब, उल्हासनगर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पाच्या विशेष महासभेत स्थायी समिती तर्फे व मा. आयुक्त साहेबांतर्फे अर्थसंकल्प सादर केला गेला आहे व महासभा या बजेटवर निर्णय घेणार आहे. मा. आयुक्त साहेबांनी जो अर्थसंकल्प या महासभेत सादर केला आहे. त्यांच्या दृष्टीने तो अर्थसंकल्प योग्य असाच आहे. व मा. स्थायी समिती सभापती यांनी जो अर्थसंकल्प सादर केला आहे. स्थायी समितीच्या दृष्टीकोनातुन तो योग्य आहे. मी सभागृहासमोर काही गोष्टी आणु इच्छितो. विशेष करून उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट आहे. मागील वर्षापासुन आम्ही एक गोष्ट पहात आहोत. ही महानगरपालिका पिण्याच्या पाण्याचे बिल सुध्दा वेळेवर देवू शकत नाही. व कित्त्येकदा असे होते की, महानगरपालिकेने पाण्याचे पैसे भरले नाहीत म्हणुन पाण्यापुरवठयामध्ये कपात केली जाते. त्यामुळे शहरातील जनतेकडुन आंदोलने होतात. आजची परिस्थिती अशी आहे की, आपण पिण्याच्या पाण्याचे बिल सुध्दा वेळेवर देवू शकत नाही. व जनतेकडुन १५ ते २० दशलक्ष लिटर वाढीव पाण्याची मागणी होत आहे. आमचे मा. आमदार श्री. सुरेश पप्पु कालानी हे पंधरा ते वीस एम.एल.डी. पाणी वाढवून घेण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहेत. कि पधंरा ते वीस दशलक्ष लिटर पाणी वाढवुन मिळाले पाहिजे. उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये सफाई कामगारांची सुध्दा आवश्यकता आहे. २६७ कामगारांची भरती होणार आहे. असे ऐकण्यात आले होते. येथे सफाई कामगारांची आवश्यकता आहे. कर्मचा-यांची आवश्यकता आहे. येथे पाण्याचे जे कर्ज आहे ते सुध्दा देणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत सत्ताधारी पक्ष जो प्रस्तावित अर्थसंकल्प सादर करत आहे. तो म्हणजे श्रीमती. भाभी ज्योती कालानी यांनी मराठीत म्हंटल्याप्रमाणे तारेवरची कसरतच आहे. आणि याठिकाणी एक प्रमाणिकपणे अर्थसंकल्पाला या सभागृहाने सामोरे गेले पाहिजे. तर्कवितर्क करून बजेटच्या समोर जाणे त्याच्यापेक्षा जी वस्तुस्थिती आहे तीला सामोरे जाणे एकदम महत्त्वाचे आहे. विकासाच्या कामाच्या संदर्भात आमचे मित्र श्री. राज असरोंडकर यांनी सांगितले की, ही जी समिती आहे ती वैधानिक समिती नाही. परंतु महानगरपालिकेमध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग जो आहे तो सार्वजनिक बांधकामासाठी आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत महानगरपालिकेने काम तर करावे परंतु कोणकोणत्त्या विभागाअंतर्गत करावे हे सांगितलेले नाही. याठिकाणी स्थायी समितीने सादर केलेला जो अर्थसंकल्प आहे. तो व्यापा-यांचा दृष्टीकोन डोळयासमोर ठेवून शहरातील जनतेचा पुर्णपणे सहानुभूतीपुर्वक विचार करून स्थायी समितीने हा बजेट सादर केला आहे. माझ्यामते योग्य तो बजेट आहे या बजेटमध्ये थोडयाफार काही सूचना आहेत जसे श्री. प्रमोद टाले यांनी सांगितले की, गलिच्छ वस्ती आणि दुर्बल घटक हे जे विभाग आहेत. त्यांच्या शिर्षामध्ये थोडीशी वाढ झाली पाहिजे. आपण जर १०४ कोटीचे उत्त्पन्न दाखवत आहोत तर १०४ कोटीच्या उत्त्पन्नाप्रमाणे कमीत कमी या दोन्ही शिर्षामध्ये जवळपास पाच कोटी रू. च्या निधीची तरतुद असली पाहिजे. परंतु मग असे म्हंटले जाईल की, प्रत्त्यक्ष उत्त्पन्न काय? माझी एक याठिकाणी सूचना आहे. की गेल्या वर्षी

जशी दिड-दिड कोटीची या दोन्ही शिर्षामध्ये तरतुद होती ती तरतुद या वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये सुध्दा घेण्यात यावी. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>श्री. हरेश इदनानीजी एक छोटीशी शंका आहे. आपण म्हंटले की हे सर्व प्रत्यक्षातील आकडे आहेत. अनुदाने व कर्ज, हुडकोचे कर्ज ४५ कोटी लिहिले आहे. यामध्ये एकुण आहे, हुडको एम.एम.आर.डी.ओ ४५ कोटी आपण आता सांगितले की, १६३ कोटीमध्ये ४५ कोटी अनुदाने व कर्ज आहे. २२.५७ प्रशासनावरील खर्च आहे.

<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>अनुदाने व कर्ज ४५कोटी आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>व २२.५७ प्रशासनावरील खर्च आहे. बरोबर आहे? एम.आय.डी.सी चे बिल किती आहे. २७ कोटी म्हणजे हे जवळपास ९५ कोटी होतात.

<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी):-</u>होय.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>प्रशासनाने जे उत्पन्न दाखविले आहे ते १०४ कोटीचे. व स्थायी समितीने १६३ कोटीचे उत्पन्न दाखविले आहे. १०४ कोटी मधुन आपण ९५ कोटी अनुदाने कर्ज व एम.आय.डी.सी.चे पाण्याचे बिल बाकी फक्त नऊ कोटी रू. उरतात. तर आयुक्त साहेब नऊ कोटी रू. उरतात. सभागृह नेत्त्यांनी सांगितले की, बजेट सादर करणे आमचे काम आहे. नंतर बजेट प्रशासनाकडे दयायचे त्याची अंमल बजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे. हे शक्य आहे का? थोडक्यात सांगितले तर, शेवटी सत्ताधारी म्हणुन जबाबदारी तुमची आहे. आम्ही तुमच्यावर टाकायचे आणि नंतर तुमच्या प्रशासनाची वसुलीची कार्यक्षमता ५०टक्के, ४० टक्के २५ टक्के हे मोजमाप करणे, परंतु या दरम्यान शहराचे जे नुकसान होते त्याला जबाबदार आमच्या अगोदर तुम्ही आहात. तर हे शक्य आहे काय? याचे जरा उत्तर दया.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u> मा. महापौरजी, उपमहापौर....

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>मा. महापौरजी,....

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>एक मिनिट, आपण जेव्हा उभे राहीलात तेव्हा मी ही बोलण्यास उभा राहिलो होतो परंतु आपणांस पाहुन मी खाली बसलो. स्थायी समिती सभापती आमचे मा. आयुक्त साहेब, आता जसे आमचे बंधु श्री. राजेंद्र चौधरी यांनी म्हंटले की, रस्ते व चौकांसाठी काही रक्कम तरतुद करून ठेवली पाहिजे. त्या विषयाशी मी सुध्दा सहमत आहे. दोन लाख रू. तरतुद रस्त्यावरील फलक लावण्यासाठी ठेवली जावी. व पाणी पुरवठा विभागात एअर टेकर मशिन खरेदी करण्यासाठी दहा लाखाची तरतुद केली जावी. कारण की, एकच मशिन आपल्याकडे आहे. पुर्ण उल्हासनगर शहरामधील ड्रेनेजच्या लाईन्स उघडण्याकरिता

तीचा वापर केला जातो. नगरसेवकांच्या अनेक तक्रारी आहेत. म्हणुन दहा लाख रू. याकामी तरतुद ठेवली जावी. व आमच्या नगररचना विभागाच्या सभापतींनी जे



सांगितले की झेब्रा क्रॉसिंग, स्पीड ब्रेकरवर पटटे मारणे, फलक लावणे व संगणक खरेदी करणे इत्त्यादी कामी दोन लाख रू. ची तरतुद याकामी ठेवली जावी. मला असे वाटते की चर्चा बरीच झाली आहे. सर्वजण म्हणत आहेत की, हे आकडे चुकीचे आहेत चुकीचे आहेत. काय वाढवायचे ते कुणीच सांगत नाहीत. तोंड मिळवणी कशी करायची ते कुणीच सांगत नाहीत. फक्त म्हणतात की, चुकीचे आहे, चुकीचे आहे. हे बोलण्याने काहीच सिध्द होत नाही की हे आकडे येवूच शकत नाहीत. आम्ही प्रशासनावर उत्त्पन्नाची कोणतीही रक्कम निश्चित करू शकतो. स्थायी समितीला व महासभेला तसे अधिकार आहेत. त्यांच्यामध्ये तेवढी क्षमता पाहिजे की,आपणांस तेवढी वसुली करायची आहे आमचे लोकांकडे कराचे पैसे (थकबाकी) राहिलेले आहेत. मिळकत कराचे ४० कोटी रू. थकबाकी म्हणुन लोकांकडुन येणे बाकी आहे. व मी हे सांगु इच्छितो की, माझ्या प्रभागातील २०० पेक्षा अधिक अर्ज प्रलंबित आहेत. ज्यांची ॲसेसमेंट केली जात नाही. गायकवाड पाडयामध्ये इंदिरा नगरमध्ये, ओटी सेक्शन मध्ये हजारो अशा इमारती आहेत. ज्यांची ॲसेसमेंट केली जात नाही. कित्येक अशा चाळी आहेत की ज्यांच्याकडे मिळकत कराची पावती पाच हजार ते दहा हजारापर्यंत येत असते. अशा हजारो लोकांच्या तक्रारी महानगरपालिकेमध्ये प्रलंबित आहेत. लोक मिळकत कराची पावती मागतात ती, प्रत्येक वर्षी प्रशासनाने त्यांना देणे आवश्यक आहे. ॲसेसमेंट करायची आहे. नविन इमारत असो, झोपडे असो, चाळ असो त्यांना मिळकत कराची पावती देणे आहे. प्रत्येक नगरसेवकाची ही तक्रार आहे की माझ्या प्रभागातील लोकांनी अर्ज दिलेले आहेत. सहा वर्षापासुन त्यांना अदयाप मिळकत कराची पावती दिली जात नाही. यावर्षी ॲसेसमेंट झाली पाहिजे. व मिळकत कराच्या ज्या नविन पावत्त्या निघतील. इमारतींच्या, चाळींच्या, झोपडयांच्या तर मला असे वाटते की, चाळीस कोटी नाही तर ४३ कोटीच काय. साठ कोटी रू. पर्यंत आमची मिळकत कराची वसुली राहिल. अशी मला अपेक्षा आहे. त्यानंतरही आम्ही पंधरावर्षाचा किंवा पाच वर्षाचा बजेट तयार करत नाहीत तर एक वर्षाचा बजेट तयार करत आहोत. आम्ही आकडे निश्चित करत आहोत, पुढल्या वर्षी बजेट तयार करण्यासाठी आम्हीच बसणार आहोत तर माझ्यामते प्रशासनावर आम्ही वसुलीचे जे आकडे निश्चित करून देतो की, त्यांनी अमुक या आकडयापर्यंतची वसुली करायची आहे. ही त्यांची जबाबदारी आहे. आज आमचे आयुक्त साहेब , जो कुणी कर्मचारी वसुली कमी करतो त्याची वार्षिक वेतनवाढ रोखुन धरतात, कमी करतात. कर्मचा-यांवर कारवाई करतात. त्यांची जबाबदारी आहे कर्मचा-यांकडुन काम करवुन घेणे महापालिकेचे उत्त्पन्न वाढविणे हे त्यांचे कर्तव्य आहे. तर मेहरबानी करून सर्व मुदयांवर चर्चा झालेलीच आहे. एकेक मुदयांवर सहा सहा वेळा चर्चा झाली आहे. आम्ही सर्वांच्या भावना समजलो आहोत. आता मेहरबानी करून बजेट सर्वसंमतीने पारीत केला पाहिजे. यावर एक मिनिट सुध्दा लावता कामा नये. चर्चा बरीच झाली आहे. बजेट पास?

मा. सदस्या श्रीमती. कोमल भठिजा या सभागृहातुन बाहेर पडल्या.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी,

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>आयुक्तांना जो प्रश्न विचारला त्याचे उत्त्तर पाहिजे. श्री. किशोर वनवारी आपण जे सांगितले ते बरोबर आहे. आम्ही जी रक्कम निश्चित करू ती आयुक्तांनी किंवा प्रशासनानी वसुल केली पाहिजे. परंतु मागील वर्षाचा आमचा अनुभव असा आहे की, उत्त्पन्न नसल्यामुळे बजेट नाही. बजेट नसल्यामुळे नगरसेवक निधी दहा लाखाचा असतानाही सहा-सहा लाखाचेच काम झाले. महापौर

निधी पन्नास लाखाचा होता परंतु ३३ लाखाचेच काम झाले. तसे होता कामा नये म्हणुन प्रशासनाकडुन आम्ही स्पष्ट करू इच्छित आहोत. हे वस्तुस्थितीदर्शक आहे की नाही. तर आम्ही फक्त जे आकडे दाखवतो ते सुध्दा बरोबर नाहीत.

--३२--

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>महापौर महोदया, स्थायी समितीच्या सभापती महोदया, सन्माननिय सदस्य आज सन्माननिय स्थायी समितीने महासभेपुढे बजेट सादर केला आहे. खुपश्या सदस्यांनी विचारविमर्श केला, सूचना दिल्या, चर्चा केली. कित्येक सदस्यांनी बरेचसे मुददे उपस्थित केले. त्यांचे स्पष्टीकरण मी करू इच्छितो. तसे तर पध्दत अशी आहे की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये अशी तरतुद आहे की, उत्पन्न व खर्चाचा अंदाज स्थायी समिती समोर आयुक्त ठेवतात. स्थायी समिती त्यावर बरीचशी चर्चा करते. शक्य व अशक्यचा विचार विमर्श केला जातो. व नंतर काही मत तयार केले जाते. हे मत बहुमताने किंवा एकमताने होत असते. व हे मत महासभेसमोर ठेवले जाते. जेव्हा स्थायी समिती महासभेसमोर बजेट सादर करते तेव्हा महासभेत सुध्दा चर्चा होते. बजेट तर स्थायी समितीचा असतो. व महासभेमध्ये ही सदस्य चर्चा करतात. विचार विमर्श करतात. कोणकोणते पर्याय असु शकतात त्याविषयी बरीचशी चर्चा होते. शक्य अशक्याचीही चर्चा होते. व त्यानंतर मत तयार केले जाते. जे की बहुमताने किंवा एकमताने ठरले जाते. सन्माननिय सदस्यांनी मुददा उपस्थित केला की, हे जे कलम ९४ आहे. त्याअनुसार कार्यवाही झाली आहे का? सर्व कार्यवाही आयुक्तांकडुन झाली आहे की नाही? मी असे सांगु इच्छितो जेव्हा आयुक्त स्थायी समिती समोर बजेट सादर करतात. त्याचवेळेस कलम ९४ नुसार उत्पन्न व खर्चाचा अंदाज स्थायी समितीला सादर केला जातो. सहाजिकता कलम ९४ मध्ये जो अहवाल दिला गेला आहे. तो काय असतो? मागील वर्षी किंवा पुढील वर्षी उत्पन्न व खर्च काय झाले. व काय होणार आहे. याविषयी तो अहवाल असतो. साहजिकता तोच तो अहवाल असतो. त्याची तर आम्ही पुर्तता केली आहे. खुपशा सदस्यांनी असा मुददा उपस्थित केला की, ओव्हरटाईम किंवा असे काही जे भत्ते असतात. त्याकामी तरतुद केली आहे. त्याबाबत मी असे सांगु इच्छितो की, हे जे लेखाशिर्ष असतात. खर्चाच्या बाबी असतात. त्यामध्ये काही नाममात्र तरतुद करावी लागते. कारण अचानक कुठे काही परिस्थिती निर्माण होवू शकते. यावेळी काही अडचण येऊ नये म्हणुन असे करावे लागते. सन्माननिय सदस्यांनी हे सुध्दा म्हंटले की, आरोग्य विभागाचा खर्च एकदम डबल झाला आहे. परंतु बजेटची जी प्रक्रीया असते. त्या प्रक्रियेमध्ये दहा किंवा बारा बारा टक्के दरवर्षी वाढ केली जाते. त्यानुसार आकडे निश्चित केले जातात. तसे पाहण्यास गेले तर हे जे आकडे आहेत ते वाजवी असे आकडे आहेत त्यामध्ये जी वाढ केली आहे ती वाजवी आहे असे मला वाटते. उत्पन्न जे असते ते अपेक्षित उत्पन्न असते. खर्च सुध्दा अपेक्षित असतो. व बजेट फिजिबल आहे किंवा नाही ही सुध्दा एक गोष्ट असते आम्ही मागच्यावर्षीच्या बजेटवर नजर टाकली तर असे दिसुन येइल की बजेटमध्ये बरीचशी तुट आलेली आहे. तरी सुध्दा मी असे सांगु इच्छितो की, स्थायी समिती जी बजेट सादर करते त्यामध्ये विचार विमर्श केल्यानंतरच महासभेत मत तयार करते. व प्रशासन मोठया प्रमाणावर प्रयत्न करते की, तो फलदायी होवो ,यशस्वी होवो त्यासाठी पुर्णपणे प्रयत्न केले जातात. यामध्ये जो खर्च दाखविला आहे त्यात प्रशासनावरील खर्चात पाचव्या वेतन आयेगाच्या शिफारशीनुसारच्या पगारातील फरकाची रक्कम देण्याची तरतुद ठेवलेली आहे. व खर्चाच्या बाबीमध्ये मागील वर्षाची देणी जे देणे बाकी आहे. ते सुध्दा दर्शविलेले आहे. समाविष्ट आहे. जकातीच्या बाबत सुध्दा काही सदस्यांनी मुददे उपस्थित केले ती तर असे समजतो की, हा महासभेचा प्रस्ताव आहे. परंतु शासनाचे आदेश काय आहेत हे सुध्दा पहावे लागतील. व शासनाचे जे आदेश असतात ते स्थायी आदेश असतात त्यानुसारच कार्यवाही करावी लागेल. सन्माननिय सदस्यांनी हे पण

सांगितले की, जकात वसुली काही कालावधीपर्यंत किंवा काही महिन्यापर्यंत प्रशासनामार्फत



चालविली जावी. परंतु मी महासभेपुढे ही सुचना ठेवू इच्छितो की, सध्याचा कालावधी हा मंदीचा कालावधी आहे. मंदीच्या कालावधीत त्याप्रमाणे जकात वसुली वाढेल असे आम्हाला वाटत नाही. यासाठी आम्हाला बरीचशी तयारी करावी लागेल. मला तर असे वाटते की, आमचा जो मागील ठेकेदार आहे त्यालाच काही कालावधीपर्यंत मुदत वाढ देणे. वाजवी व संयुक्तिक वाटते. आणखी एक मुद्दा मी आपल्यासमोर ठेवू इच्छितो. महासभेचा जो निर्णय असतो त्याची अंमल बजावणी करणे प्रशासनावर असते. मागील कित्येक वर्षाचा अंदाज घेतला तर असे दिसते की, बरेचसे प्रयत्न केल्यानंतरही जे व्हावयास पाहिजे होते ते झाले नाही. यावर्षी सुध्दा आम्ही प्रयत्न करू. व पुर्ण प्रयत्न करू व या महासभेचा हा जो बजेट आहे त्यास आम्ही प्रत्यक्षात आणण्याचे प्रयत्न करू. असे आश्वासन आम्ही देत आहोत.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले हे सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आयुक्त साहेबांनी केलेल्या निवेदनानंतर मी असे म्हणुन इच्छितो की, मी जकात वसुली बाबत काही म्हंटले ते कलम ६६ (अ) च्या अंतर्गत याबाबतचे अधिकार महासभेला आहेत. अटी शर्ती निश्चित करणे किंवा महापालिकेने जकात वसुली करणे किंवा जकात वसुलीचे काम ठेकेपध्दतीवर देणे या मी ज्या चार अटी सांगितल्या त्यानुसारच सांगितले आहे. निविदा भरणा-या व्यक्तीची भांडवली स्थिती किमान देकार रक्कमेच्या पाच टक्के ऐवढी असावी, मागील तीन वर्षाचे लेखा परिक्षण झालेले लेखा विवरण पत्र तेसच जकात अभिकर्ता म्हणुन निविदा भरणा-या व्यक्तीस आधीच्या किमान एक वर्षाचा जकात वसुली, पथकर वसुली किंवा तत्सम वसुलीचा अनुभव असावा. या हिशोबाने की ज्यानुसार तो ठेका घेत आहे. ठेका देईपर्यंतच्या कालावधीपर्यंच्या कालावधीसाठी जकात वसुलीचे काम प्रशासनामार्फत करण्यात यावे. आमचे कर्मचारी जकात वसुली करणेकामी जर सक्षम ठरत असतील, २० तारखेला व्यापारी महामंडळाच्या सांगण्यानुसार आम्ही सात दिवस सभा स्थगित केली. नाहीतर पंधरा वीस दिवस याकामी उशिर झाला नसता. उल्हासनगरमधील जनतेचे आम्ही प्रतिनिधी आहोत. त्यांच्यावतीनेच आम्ही निवडुन आलो आहोत. त्यांच्या भावना लक्षात घेवून जी सभा आम्ही २७ तारखेपर्यंत स्थगित केली होती. आज बजेट पारीत झाल्यानंतर निविदा मागविल्या जातील. निविदेची कार्यवाही, प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतचा जो पंधरा दिवस किंवा एक महिन्याचा कालावधी जाईल त्या कालावधीत जो पर्यंत निविदेस अंतिम स्वरूप दिले जात नाही तोपर्यंतच्या कालावधीत प्रशासनाने जकात वसुलीचे काम चालविले तर हि एक चाचणी होईल. आमचा कर्मचारी वर्ग ठेकेदारापेक्षा जकात वसुली अधिक सक्षम ठरत असेल तर आम्ही जकातीचा ठेका ठेकेदारास देवून शहरातील लोकांना त्रास देण्याची आवश्यकता नाही. तर मला असे वाटते की, कृपा करून आता सात वाजले आहेत लवकरात लवकर बजेट पारीत केला जावा. कृपा करून बजेट पारीत केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा.महापौरजी,....

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>मा. महापौरजी, आम्ही जो प्रस्ताव दिला, ज्या सूचना केल्या आहेत त्या ठेवल्या जाव्यात. आम्ही जो प्रस्ताव ठेवला आहे की, प्रशासनावरील जो खर्च आहे १.५३ कोटीचा. शहरवासियांवर कुठल्याही प्रकारची जकात न वाढवता खर्चामध्ये कपात करण्याबाबत मी काही सूचना दिल्या होत्त्या त्यामध्ये ड्रेनेज सिस्टममध्ये मागच्यावर्षी दीड लाखापर्यंत खर्च झाला होता. यावर्षी थेट दोन करोड ३० लाखाची तरतुद ठेवली आहे. दिड लाखाच्या ठिकाणी तीस

लाखाची तरतुद ठेवून दोन कोटी रूपयांची तरतुद त्यातुन काढून घेवूया तर दोन कोटी हे अंडर ग्राऊंड ड्रेनेजमध्ये मागच्या वर्षी १००० रू खर्च झाले आहे. यावर्षी ११ लाख १० हजार रू. ची तरतुद ठेवली आहे. यातुन १० लाख काढल्यास दोन कोटी दहा



लाख व पी. डब्लुडी. मध्ये मागच्या वर्षी २० कोटीचा खर्च होता. त्याठिकाणी यावर्षी ३५ कोटीची तरतुद ठेवली आहे. जर त्यातील आम्ही फक्त साडे सात कोटी रू. काढून ३५कोटीच्या ठिकाणी साडे सत्ताविस कोटी केले तर साडे सात अधिक दोन कोटी दहा लाख म्हणजे ९ कोटी ६० लाख हा जो फरक आहे तो प्रशासनाच्या खर्चामधुन १६ कोटी रूपयाच्या जकात कर वाढी पोटी व्यतिरिक्त जे १४७ कोटी उत्पन्न होते म्हणजे सहा कोटीचा जो फरक, या पैशातुन टाऊन हॉल सारखी एखादी योजना तयार करावी असा आमचा प्रस्ताव आहे. कोणत्त्याही प्रकारचा जकात कर किंवा इतर कर न वाढविता प्रशासनाने हा जो १५३ कोटीचा खर्च दाखविला आहे त्यामध्ये टाऊन हॉलसाठी आणखी दोन कोटी रू. खर्च वाढवुन समायोजन करावे. ड्रेनेज विभागाकडुन दोन कोटी तीस लाख कारण की मागच्या वर्षी फक्त दिड लाख रू. खर्च झाला आहे. तर यावर्षी दोन कोटी तीस लाख खर्च ठेवण्याची काही जरूरी नाही. अंडर ग्राऊंड ड्रेनेज साठी ११ लाख १० हजार ठेवले आहे. याकामी मागच्यावर्षी फक्त एक हजार रू. खर्च झाले आहेत व पीडब्लुडी. मध्ये मागच्या वर्षी वीस कोटी रू. खर्च झाला आहे. यावर्षी आपण ३५ कोटी ७१ लाख रूपयांची तरतुद ठेवली आहे. तर ३५ कोटी ऐवजी आपण २७ कोटी ठेवले तरी मागच्या वर्षापेक्षा सात कोटी रूपये जादा तरतुद होते. असे एकुण साडे नऊ कोटी रू. आपण कमी करत आहोत. तर सहा कोटीचा जो फरक आहे तो भरून काढुन. टाऊन हॉलसाठी दिड कोटी रू. ची जादा तरतुद आपण करू शकतो. हा आमचा प्रस्ताव आहे. शहरवासियांवर कुठल्याही प्रकारे कराची ओझे न लादता आपण हा प्रस्ताव पारीत करावा. त्यास आमचे समर्थन राहिल. कर वाढ करत असाल तर त्यास आमचा विरोध आहे.

<u>मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-</u>सभागृह नेता श्री. किशोर वनवारी यांनी जो प्रस्ताव दिला आहे. ५७ कोटी रूचे जकात निविदा जेव्हा निघेल तेव्हा त्यात अतिरिक्त अटी शर्ती राहतील. निविदा भरणा-या व्यक्तीची भांडवली स्थिती किमान देकार रक्कमेच्या ५ टक्के ऐवढी असावी, मागील तीन वर्षाचे लेखा परिक्षण झालेले लेखा विवरण पत्र, जकात अभिकर्ता म्हणुन निविदा भरणा-या व्यक्तीस आधीच्या किमान एक वर्षाचा जकात वसुली, पथकर वसुली किंवा तत्सम वसुलीचा अनुभव असावा. व हा निर्णय इतिवृत्त कायम होण्या अगोदर लागु झाले पाहिजे. दुसरे असे की, २ जुलै २००२च्या रात्री बारा वाजेनंतर जकात वसुलीचे काम आपली महानगरपालिका स्वतः सांभाळेल. या प्रस्तावाच्या बाजुने आपण सर्वजण आम्हास समर्थन दयाल. व स्थायी समितीने तयार केलेले अंदाजपत्रकाबाबत सुचविलेल्या वरील फेरफारासह व काही वस्तुंवर जकात कराच्या सूचविलेल्या वाढीसह अर्थसंकल्प अंतिम स्विकृतीसाठी मी हा प्रस्ताव मतास टाकते. मी अशी ही अपेक्षा व्यक्त करते. सत्तावादी पक्ष व विरोधी पक्ष.....

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, समर्थनाच्या अगोदर आमची बाजु तर ऐकुन घ्या.

<u>मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-</u>श्री. जमनु पुरस्वानीजी कृपया आपण खाली बसुन घ्या. आपण सर्वजण सहकार्य दयाल अशी अपेक्षा व्यक्त करते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मा. महापौरजी, जकात कर वाढीच्या विरोधात आम्ही आमच्या भावना व्यक्त केल्या आहेत. आम्ही विरोधात मतदान करू.

मा. सचिव :-जे प्रस्तावाच्या विरोधात आहेत, त्यांनी आपले हात वर करावेत.

--३५--

प्रस्तावाच्या विरोधात :-

१०. श्रीमती. जावळे संगिता रमेश
११. श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास
१२. श्रीमती. मोकल सिमा चंद्राराम
१३. श्री. उमाप रामदास राघोजी
१४. श्री. पुरस्वानी जमनादास खुपचंद
१५. श्री. रूपचंदानी बच्चाराम बाशोमल
१६. श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग
१७. श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश
१८. श्री. यादव लालबिहारी बुझारत
१० श्री. भुल्लर राजेंद्रसिंग विरसिंग
११ श्री. सोनावणे नथु
१२ श्री. गायकवाड दिलीप
१३ श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन
१४ श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा
१५ श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
१६ श्री. चव्हाण रमेश महादेव
१७ श्री. बोडारे धनंजय बाबुराव
१८ श्री. पाटील विश्वनाथ गौतम
१९ श्रीमती. ससाणे लक्ष्मी रोहिदास
२० श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल

जे प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या बाजुने :-

१०. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
११. श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर
१२. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
१३. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
१४. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
१५. श्रीमती. पाल आधारी राजाराम
१६. श्री. ऐडके गणपत गोविंद
१७. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
१८. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
१० श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
११. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
१२. श्रीमती. गुप्ता आशा प्रभुनाथ
१३ श्री. पवार नाना आनंदा

१४ श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
१५ श्री. रूपाणी चिमन अमरूमल
१६ श्री. निकम शांताराम ओंकार
१७ श्री. ठाकुर विनोद लालसिंग
१८ श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे)
१९. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास

--३६--

२०. श्री. गायकवाड सुरेश नामदेव
२१ श्रीमती. वनवारी मोना अशोक
२२ श्री. वनवारी किशोर नारायणदास
२३. श्री. जेसवानी सतराम पुनमदास
२४ श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
२५. श्रीमती. खिलनानी भावना रवि
२६ श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
२७ श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल
२८ श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
२९ श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
३० श्रीमती. पंजाबी दिपा नारायण
३१ श्री. साधवानी मनोज लालचंद
३२ श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण
३३. श्रीमती. माखिजा किरण लखी
३४. श्री. लबाना होशियारसिंग हरीसिंग
३५. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
३६. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
३७. श्रीमती. नाथानी निना प्रकाश
३८. श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश
३९. श्रीमती. भारती पहलाज छाब्रिया.
४०. श्रीमती. दासानी मिनु राजकुमार
४१. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
४२. श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ
४३. श्री. जाधव सुरेश मधुकर
४४ श्री. साधवानी मोहन
४५ श्रीमती. साधवानी जया
४६ श्री. भालेराव गौतम यशवंत
४७ श्रीमती. वसिटा बेबी
४८ श्री. ठाकुर अशोक भगवानदास
४९ श्री. बेहरानी ठाकुरदास वर्यलदास

<u>मा. सचिवः-</u> प्रस्ताव पारीत? बहुमताने?

<u>मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-</u> सदरचा प्रस्ताव बहुमताने समंत करण्यात येत आहे.

<u>विषय :-</u>सन २००२ व २००३ करिता करांचे दर निश्चित करणे आणि <u>स्थायी समितीच्या अर्थसंकल्पिय अंदाजास अंतिम स्विकृती देणे बाबत.</u>

**<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.१०</u>     <u>दिनांक:-२७.६.२००२.</u>**

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. अशोक ठकुर.

--३७--

हि महासभा स्थायी समितीच्या दि. १४.६.२००२ रोजीच्या ठराव क्र. १७ च्या तरतुदी अन्वये पाणीपट्टी, मालमत्ताकर, वगळता जकात कराधान संबंधीच्या काही वस्तुंवरील दर वाढीचा प्रस्ताव विचारात घेवून त्यात फेरफारासह सोबत जोडलेल्या सुचीतील वस्तु समोर स्तंभ क्र. ६ वर दर्शविलेला दर दि. १.८.२००२ पासून बसविणेस निश्चित करित आहे. आणि स्थायी समितीने २००२-२००३ करिता सादर केलेला अर्थसंकल्पिय अंदाज विचारात घेवून त्यात चर्चेअंती काही आवश्यक त्या फेरफारासह रू. ५,२८,०००/- शिल्लक दर्शविणा-या अर्थसंकल्पीय अंदाजास अंतीमरित्त्या स्विकृती देत आहे.

उक्त अंदाजपत्रक छापून प्रत्येक पालिका सदस्यास त्याची प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानला जाईल.

परंतु..................

१. नगरपालिका करिता शासनाने जकात अभिकर्त्ता नेमण्यासंबंधी ठरविलेल्या अटी व शर्तीवर आणि खालील अतिरिक्त अशा अटी व शर्तीवर पूढील एका वर्षाच्या कालावधी करिता जकात वसुली अभिकर्त्ता नेमणेस आयुक्तांना प्राधिकृत करित आहे.
   अ. जकात अभिकर्ता म्हणुन निविदा भरणा-या व्यक्तीने आधीच्या ३ वर्षाचे लेखापरिक्षण झालेले लेखा विवरण पत्र सादर केलेले असावे.
   ब. जकात अभिकर्त्ता म्हणुन निविदा भरणा-या व्यक्तीस आधीच्या किमान एक वर्षाचा जकात वसुली/ पथकर वसुली किंवा तत्सम वसुलीचा अनुभव असावा.
   क. जकात अभिकर्त्ता म्हणून निविदा भरणा-या व्यक्तीची भांडवली स्थिती किमान देकार रक्कमेच्या ५ टक्के एवढी असावी.
   ड. जकात वसुलीची किमान देकार रक्कम रू. ५७ कोटी एवढी असेल.
२. सद्या कार्यरत असलेल्या जकात अभिकर्त्याचा कालावधी संपल्या पासून आणि पूढील जकात अभिकर्ता नेमणे पर्यंतच्या कालावधीसाठी आयुक्तांनी जकात वसुलीची कर्तव्ये पार पाडण्यासाठी महापालिका अधिका-यांची / कर्मचा-यांची व्यवस्था व इतर अनुषंगिक पुर्तता करावी.

तसेच पूढील सभेकडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता वरील ठरावा अंर्तगतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**बहुमताने मंजुर**

पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

--३८--

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानी यांनी सायंकाळी ७. १० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

**उल्हासनगर महानगरपालिका**

दिनांक:-१९/९/२००२

**इतिवृत्त**

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि१९/९/२००२ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरुवार दि. १९. ९.२००२ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती मालती करोतिया ह्या पिठसीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शाविलेले सन्मानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

**१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.**
**२)मा. उपमहापौर:- श्रीमती. जया साधवानी.**

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३८. | श्रीमती माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३९. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ४०. | श्री. जाधव सुरेश |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४१. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ७. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४२ | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४३ | श्रीमती. कारीरा रेखा |
| ९. | श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास | ४४ | श्री. पमनानी इश्वर सतरामदास |
| १०. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४५ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४६ | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १२. | श्रीमती. पाल अधारी राजाराम | ४७ | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १३. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४८ | श्री. भालेराव गौतम यशवंत |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४९ | श्री. वसीटा बेबी तुलसीदास |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५० | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १६. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५१ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५२ | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५३ | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५४ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २०. | श्रीमती गुप्ता आशा प्रभुनाथ | ५५ | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २१. | श्री. नाना आनंदा पवार | ५६ | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २२. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५७ | श्रीमती. किरण लखी माखिजा |
| २३. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५८ | श्री. होशियारसिंग लबाना |
| २४. | श्री. शांताराम ओंकार निकम | ५९ | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २५. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६० | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २६. | श्री ठाकुर विनोद लालसिंग | ६१ | श्रीमती. डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६२ | श्रीमती. भारती छाबिया |
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६३ | श्रीमती. इंदु भठिजा |
| २९. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६४ | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३०. | श्रीमती. वनवारी मोना | ६५ | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६६ | श्री बेहरानी ठाकुरदास |
| ३२. | श्री. मोहन साधवानी. | ६७ | श्री. इदनानी राजू |
| ३३. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६८ | श्री. पंजाबी लाल |
| ३४. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६९ | श्री. माखिजा हरदास |
| ३५. | श्रीमती. भावना खिलनानी | ७० | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३६. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ७१ | श्री. वदरीया राजेश नानिकराम |
| ३७. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | | |



तर

मा. सदस्य १. श्री. मुलचंदानी महेंद परसराम २ श्रीमती. कालानी ज्योती सुरेश, ३. श्रीमती. बामणकर नंदिनी, ४. श्रीमती. प्रेमा खांडेकर भिमा, ५. श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ, ६ श्रीमती. लक्ष्मी रोहीदास ससाणे, ७. श्री. राजेंद चौधरी, ८. श्री. साधवानी मनोज, ९ श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास, १० श्रीमती मीनू दासानी, हे सभेस अनुपस्थितीत होते.

टिप:-सन्माननिय सदस्या श्रीमती. प्रेमा खांडेकर हया सभागृहा बाहेर हजेरी पत्रकावर स्वाक्षरी करून परस्पर निघुन गेल्याने त्यांच्या नावाची नोंद अनुपस्थित सदस्यांमध्ये घेण्यांत आली आहे.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ४५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :- मा. महापौर एक प्रस्ताव आहे.

मा. सचिवः-कृपया आपणांस जो काही प्रस्ताव आणायचा असेल तो प्रशोत्त्तरानंतर आणावा.

मा.सदस्य श्री.शांताराम निकमः-मी श्रध्दांजलीचा प्रस्त्ताव मांडत आहे. मा.महापौरजी नुकतेच महाराष्ट्राचे नामांकित कवी श्री. वसंत बापट व साहित्त्यीक श्री. शिवाजी सावंत या दोघांचे नुकतेच निधन झाले आहे यासाठी मी सभागृहास विनंती करतो की त्यांना श्रध्दांजली अर्पित केली जावी. प्राध्यापक श्री. वसंत बापट व श्री. शिवाजी सावंत हे दोन्ही जेष्ठ लेखक आहेत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मा. महापौरजी,......

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-या दोन्ही साहित्त्यीकांना श्रध्दांजली दिली जावी. मा.सदस्या श्रीमती. मीनु दासानी यांच्या मातोश्रीचे नुकतेच निधन झाले आहे त्यांना पण श्रध्दांजली अर्पित करण्यात यावी.

इकडे सर्वांनी मौन पाळून श्रध्दांजली अर्पित केली.

शोक प्रस्ताव :-

महाराष्ट्राचे नामांकित कवी श्री. वसंत बापट व थोर साहित्त्यक श्री. शिवाजी सावंत यांचे नुकतेच निधन झाले.

तसेच श्रीमती. मीनु दासानी यांची आई श्रीमती सरस्वती किशन जग्यासी यांचे दिनांक ८.९.२००२ रोजी नुकतेच निधन झाले.

त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्त्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.



सर्वसाधारण महासभा ठराव क्र. २७ अ दिनांकः-१९.९.२००२.

सुचकाचे नाव :- शांताराम निकम.

अनुमोदकाचे नाव :-श्री. देवेंदसिंग खेमाणी.

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. वसंत बापट व श्री. शिवाजी सावंत व श्रीमती. सरस्वती किशन जग्यासी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. १ प्रश्नोत्तरे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, या सभेचे कामकाज सुरू करण्यापुर्वी मी काही बोलु इच्छितो की हिंदु धर्मानुसार गणेश उत्सव साजरा केला जातो. त्यांचा आज शेवटचा दिवस आहे. व उदया गणेश विसर्जनाचा शेवटचा दिवस आहे. तर आमच्या विरोधी पक्षांतर्फे एक प्रस्ताव दिला गेला आहे की या सभेचे कामकाज स्थगित केले जावे व गणेश विसर्जनानंतर सभा केव्हाही ठेवली जावी.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>मा.महापौरजी, माझे सहकारी श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जी सूचना दिली आहे. आम्ही त्यांच्या भावनांचा आदर करतो. व आमची अशी इच्छा आहे की, सभेचे कामकाज जास्त वेळ चालु नये. यासाठी सभागृहास माझी एक सूचना आहे की, प्रश्नोत्तराचा जो एक तासाचा कालावधी आहे त्या कालावधीत प्रश्नोत्तरावर चर्चा न करता इतिवृत्त व सभासूचनेवर जे तीन विषय आहेत त्यांच्यावर चर्चा करू यासाठी विरोधी पक्षामधील माझे जे बंधु आहेत. ते याकामी सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे. इतिवृत्त व सभा सुचनेवरील विषय आता घ्यावे प्रश्नोत्तरे पुढल्या सभेत ठेवावीत.

<u>मा.महापौरः-</u>सभेचे मत आजमावुन प्रश्नोत्तराचा विषय सर्वानुमते वगळण्यांत येत असल्याचे मी घोषित करीत आहे.
<u>मा. सचिवः-</u>सर्वानुमते? ठिक आहे?

विषय क्र. २ ....

या अगोदर एक आवश्यक सूचना आहे की, आयत्त्यावेळचा एक विषय जो आयुक्तांतर्फे आला आहे तो सर्वांना प्रस्तुत केला आहे. विद्युत विभागाचा गोषवारा आहे. निरूपयोगी मालमत्तेची विल्हेवाट करणे बाबत.

<u>मा.महापौरः-</u>सदरचा आयत्त्यावेळचा विषय सर्वानुमते कार्यसूचीवर घेण्यांत येत आहे.

विषय :- मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.
(दि. २०.८.२००२ त्यात दि. २८.८.२००२ व दि. ३१.८.२००२ चे इतिवृत्त)

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>सन्माननिय महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब, मागील वेळेसही प्रश्न क्र. २० च्या उत्तरामध्ये श्री. कारचे साहेबांनी सांगितले होते की, एम.आर.टी.पी. ॲक्ट नुसार कारवाई करण्यासाठी संबंधित बीट इन्स्पेक्टर यांस सांगितले आहे. आज एक महिना पुर्ण झाल्यानंतरही त्यावर काहीही कारवाई झालेली नाही. ना त्यासाठी संबंधितांवर नोटीस बजावण्यांत आली हे काय चालले आहे? बेकायदेशिर बागांना मोकळे रान दिले जात आहे का?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>सन्माननिय महापौर महोदया, उपमहापौर महोदया, आयुक्त साहेब, सचिव साहेब आणि सन्माननिय सभागृह मागील सभेत श्री. कारचे साहेबांनी सागितले होते की, एफ.आय.आर. दाखल केला जाईल परंतु मध्येच श्री. कारचे साहेबांची बदली झाल्यामुळे व ते कार्यमुक्त झाल्यामुळे ही कार्यवाही होवू शकली नाही. आता लवकरच आम्ही त्या प्रकरणी एफ. आय.आर. दाखल करू.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>साहेब, पुढील महासभेपर्यंत होईल की नाही? अजुन एक महिना आहे.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>नाही, नाही, तात्काळ एफ.आय.आर. दाखल करू.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>ठिक आहे.

<u>मा. सचिवः-</u>इतिवृत्तांताबाबत आणखी काही हरकत? ठिक आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>मा. महापौर महोदया, उपमहापौर महोदया, आयुक्त महोदय, मागील सभेत पत्रकार कक्षाचा व जनसंपर्क अधिका-याच्या नेमणुकीचा मुददा मी उपस्थित केला होता. त्याबाबत आम्ही आयुक्तांना धन्यवाद देतो कारण की जनसंपर्क अधिकारी आम्हास देण्यात आला परंतु पत्रकार कक्षासाठी जागा सुचविण्याबाबत सांगण्यांत आले होते. व आम्ही पाच जागा सुचविल्या आहेत उपआयुक्त महादेयांना जे की, जनसंपर्क अधिकारी सुध्दा आहेत. व त्यामधील एक जागा त्यांना सुध्दा योग्य अशी वाटली. तर आम्ही अशी आशा करतो की, या महासभेत अशी घोषणा केली जावी जेणेकरून आम्हा पत्रकारांना पत्रकार कक्ष मिळेल. धन्यवाद.

<u>मा. महापौरः-</u>मागील सभेचे दि. २०.८.२००२ त्यात दि. २८.८.२००२ व दि. ३१.८. २००२ चे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ३

<u>विषयः-</u> सन २००२-२००३ करीता श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता

आयोजन करणे संबंधी क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा दिनांक २७८.२००१ रोजीचा ठराव क्र. २ कायम करणे बाबत.

--५--

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी, श्रीमती. दिपा पंजाबी, श्रीमती. भावना रामचंदानी, श्रीमती. मीना सोंडे, श्री. विनोद ठाकुर, श्रीमती. इंदु भठिजा हे सायंकाळी ४.५० वाजता सभागृहातुन बाहेर पडले.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मा महापौरजी, हा जो विषय आहे त्यास आमचा विरोध नाही परंतु ३लाख ६३ हजाराचा जो खर्च दाखविला आहे त्यामध्ये कमीत कमी ५० ते ६० टक्के दर जास्त लिहिले आहेत. त्यामध्ये पहिला पहिला जो खर्च दाखविला आहे की, दोन व्हीडीओ कॅमेरे जर आम्ही भाडयाने घेतले तर, आज शहरामध्ये ५०० रू. एक कॅमेरा भाडयाने मिळतो ४ तास, ५ तास कुठेही व्हिडीओ शुटींग करून घेवू शकतो. आपण येथे त्याचा दर ३००० रूपये दाखविला आहे. मा. आयुक्त साहेबांनी निवडणुक कालावधीत व्हिडीओ कॅमेरे घेतले होते त्या दराच्या तीन पटीने हे दर आहेत. दुसरे येथे फोटोचा जो दर दर्शाविण्यांत आला आहे तो २६ रू. एका फोटोस प्रत्यक्षात १२ रूपये फोटोचा दर आहे. सर्वात आश्चर्याची गोष्ट ही आहे की, आम्हाला एक छोटीशी बॅग पाठविण्यांत आली आहे. त्यामध्ये एक साधासा पेन आहे. जर आपण पहिलीमध्ये शिकत असलेल्या एखादया लहान मुलास विचारले की हा पेन कितीला मिळेल? तर तो सांगेल की आठ-दहा रूपयाला मिळले. त्या पेनाची किंमत ४० रू. दाखविण्यांत आली आहे. एक सफेद पेपर ज्याची झेरॉक्स महापालिकेत करण्यांत आली आहे. झेरॉक्स कॉपीचे काही कागद आम्हास देण्यांत आले आहेत तिथे त्यांना गणेशउत्त्सव प्रतियोगीतेतील गणेशउत्त्सवांना गुण देण्यासाठी. झेरॉक्स कॉपी महापालिका कार्यालयातुन काढण्यांत आलेली आहे त्याचा दर दाखविला आहे २ रू. अशाप्रकारच्या सर्व बाबी आपण पाहिल्यात तर कार्यक्रमासाठी ज्या ५०० खुर्च्या भाडयाने मागविल्या होत्त्या. त्यांचे भाडे ८ रू. प्रती खुर्ची असे दर्शाविले आहे. येथे २३६ पारितोषिके वितरीत करणार असल्याचे दर्शाविले आहे दोन लाख रूपयांची ही पारितोषिके दर्शाविली आहेत तर अशी कोणती पारितोषिके आहेत. तर अशी कोणती ढाल आहे की जी ६००० रू मिळते. आम्ही ९ ढाली वितरीत करणार आहोत. प्रत्त्येक बाबीमध्ये दुप्पट, तिप्पट, चौपट दर दर्शाविले आहेत. इथे एक दुसरी गोष्ट अशी दर्शाविली आहे की,१०० रू. प्रत्येकाचा एक दिवसाचा जेवणाचा खर्च ३३ व्यक्ती गणेश उत्त्सव पाहण्यासाठी जातील त्यामध्ये माझा सुध्दा समावेश आहे. आज दहा दिवसामध्ये एक दिवस सुध्दा मी गणेश उत्त्सव पाहण्यास गेलेलो नाही. व चार किंवा पाच लोक दररोज गणेश उत्त्सव पाहण्यास जातात. कृपया हा प्रस्ताव पारीत केला जावा परंतु खर्चाच्या बाबीकडे आयुक्तांनी लक्ष दयावे. हा खर्च चौपट आहे. आमचा यास विरोध नाही परंतु महापालिकेचे ४ लाख रूपये या खर्चातुन वाया घालवत आहोत. कृपया याकडे लक्ष दिले जावे.

श्री. दत्त्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-गणेश दर्शन स्पर्धांचा हा जो खर्च दर्शाविण्यांत आलेला आहे. तो अदांजित खर्च आहे. व ज्या काही बाबी आहेत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-नाही, नाही साहेब जे पेन आपण पाठविले आहेत. त्यांच्यावरील खर्च तर आपण केलेला आहे ना? जो खर्च केलेला आहे तो तर बरोबर लिहा ना. १० रू. पेनाची किंमत आपण ४० रू. दाखवत आहात.

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>एक मिनिट, जो काही खर्च दाखविण्यांत आला आहे तो अंदाजित खर्च आहे. त्यासाठी आम्ही मान्यता घेत आहोत. दुसरी गोष्ट ही आहे की, यासर्व ज्या बाबी आहेत त्यांची आम्ही कोटेशन्स घेत आहोत. कमीत कमी किंमत व बाजार भावानुसारची किंमत टॅली करून अंतिम जे बिल दिले जाईल ते त्या हिशोबाने दिले जाईल.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>आपण येथे लिहिले आहे पेन, पेन आपण आम्हास पाठविले आहेत. हे पेन तर आपण परत घेणार नाहीत. आपण आठ रू. वाले पेन पाठविले आहेत. नमुन्यासाठी हा पेन मी आपणांस देत आहे. हा पेन बाजारात*



*कुठे ना कुठे आठ रू. आपणांस मिळेल. या ज्या बाबी आपण दिल्या आहेत त्या तर बरोबर लिहा ना?*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>हा मागच्या वर्षासारखाच प्रस्ताव आपणांसमोर ठेवला आहे. परंतु हा जो अंदाजित खर्च आहे तो मान्यतेसाठी ठेवला आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>आपण मुव्ही बुक केली आहे, ती कोणत्त्या दराने बुक केली आहे? आपण ज्या दराने ती बुक केली आहे तो दर लिहा ना? आपण ज्या दोन मुव्ही वाल्यांना बरोबर घेवून जाता त्यांना रोज किती पैसे दयायचे आहेत? ते तर आपणांस माहित आहेच ना? आपण पेन दिलेत ते आपणांस माहित आहे. आपण कागद दिले आहेत. त्याचे दर आपणांस माहित आहेत. हे जे दर आपणांस माहित आहेत ते बरोबर तेच लिहा ना? आणखी जो काही खर्च येणार आहे तो नंतर लिहा. याचा खुलासा करा. मुव्ही आपण कितीला घेतली आहे? ५०० रू. रोज याप्रमाणे मुव्ही मी आपणांस देतो आपण ३००० रू. रोज याप्रमाणे दर लिहीले आहेत. देवाच्या नावावर असा भ्रष्टाचार चालणार नाही. आपण भलेही दहा लाख रू. खर्च करा. भ्रष्टाचाराच्या पध्दतीने करू नका.*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>त्यासाठी ज्या बाजारभावानुसारच्या किंमती आहेत व कोटेशन्स आहेत. ज्या कोटेशनमध्ये दर कमी लिहिलेले आहेत. व बाजारभावानुसारच्या किंमतीशी जुळल्यानंतरच बिलाची रक्कम अदा केली जाईल.*

*<u>मा. सदस्य श्री.बच्चाराम रूपचंदानीः-</u>श्री. जमनादास पुरस्वानी यांचे म्हणणे काय आहे, पेन आपण पाठविले आहेत. व पेपर्स आपण सायक्लोस्टाईल केले आहेत. यामध्ये काय दर आहेत? आपण ४० रू. पेनाची किंमत लिहीली आहे याची किंमत आठ-दहा रू. पेक्षा जास्त नाही. त्याबाबत आपणांस काय म्हणायचे आहे?आता आपण या पेनांची किंमत ४० रू. लिहिली आहे ती कोणत्त्या हिशोबाने?*

*<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>चौकशी केली जाईल.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>कशी चौकशी करणार? ४० रू. किंमती लिहिली आहे आणि म्हणतात चौकशी करू. यामध्ये सुध्दा भ्रष्टाचार?*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>हे पहा मी या अगोदर सुध्दा म्हंटले आहे की सबंधित माणसाला जी बिलाची रक्कम अदा केली जाणार आहेत ती लेखाधिकारी व लेखापरिक्षक यांची जोपर्यंत मंजुरी मिळत नाही तसेच त्यांचे जे दर*

आहेत ते बाजारभावानुसारचे आहेत की नाही. याची खात्री करून त्यांचे प्रमाणपत्र घेवूनच बिल अदा करू.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-आपण हे जे पेन घेतले आहेत त्याचे पेमेंट आपण केले आहे की, करणार आहात?

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-करणार आहोत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-तीस पेनांचे पेमेंट आपण करणार आहात? तीस पेन आपण उधारीवर आणले आहेत का?

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-स्टेशनरीच्या दुकानातुन कोटेशन मागविले आहे.

--७--

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-पेपरची झेरॉक्स आपण महापालिकेतुन मोफत केली व मुव्ही चे दरही आपण जास्त लावले आहेत. यामध्ये भ्रष्टाचार...

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-अदयाप पर्यंत बिल चुकते झाले नाही तर भ्रष्टाचाराचा प्रश्नच कुठे येतो?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः- चार लाखाच्या खर्चास मान्यता कशी देणार? चार लाखाच्या खर्चास आम्ही मान्यता देणार नाही.

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-प्रशासनास वाटते की आपणांस ४० रू. चा पेन दिला जावा. आपणांस तो मिळाला नसेल तर तो ज्या किंमतीचा मिळाला आहे तीच किंमत त्या दुकानदारास दिली जाईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-आपण जे पेन आणले आहेत. दुकानदाराने आपणांस त्यांची किंमत सांगितली असेलच ना?आपण उधारीने पेन आणले आहेत. त्यांचा दर काय आहे? १०रू, ३० रू, ८रू, ४०रू.? ते आपण सांगा ना? आपण बिल चुकते केले नाही परंतु आपण ते खरेदी केले आहेत ना? त्याचा दर काय?पेनांची किंमत सांगा, मुव्हीची गोष्ट नंतरची आहे. आपण जे उत्तर देता ते ढोबळ उत्तर देता. आम्ही आपणांस काय विचारत आहोत की,जो माल आपणांस पुरविला गेला आहे. आपणांस जे पेन मिळाले आहेत त्यांची किंमत काय?

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-मी तेच सांगितले आहे की, बाजारात जी किमत असेल तीच किंमत संबंधित व्यक्तीस दिली जाईल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः- त्या पेनांची किंमत काय? पेनांची किंमत न विचारता आपण आणलेत काय?४० रू. आपण किंमत लिहीले आहे. कुणी जर याबाबत आवाज उठविला नाही तर....

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-४० रू. जास्तीत जास्त किंमत अंदाजित धरून आम्ही खर्च काढला आहे. सर्व स्पर्धेचा,

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आपण जे पेन आणले आहेत ते ४० रू. किंमतीचे आहेत की, १० रू. किंमतीचे आहेत. दुकानदारास आपण विचारले असेल ना?

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-किती रक्कमेस आणले आहेत? एक एकेक बाबीची ही माहिती मी भांडार विभागाकडुन घेतलेली नाही. अंदाजित खर्चास मंजुरी घ्यायची आहे. हा जो प्रस्ताव आहे तो अंदाजित खर्चाचा आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौरजी,.....

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-एक मिनिट,

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-आपण दोघे दोघे उभे आहात. कधी ते बोलत आहेत तर कधी आपण बोलत आहात, कधी आपण बोलत आहात तर कधी ते बोलत आहेत. बोलायचे आहे तर एकानेच बोलावे.



मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आपणांस काय हरकत आहे? आपण बसा आम्हाला बोलु दया.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-आपण सांगणारे कोण आहात? मी मा. महापौरांची परवानगी घेवून बोलत आहे. महापौरजी आपण मला बोलण्यास परवानगी दिली आहे? दिली आहे ना? तर आपण मला खाली बसण्यास सांगु शकत नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-ठिक आहे. आपण बोला.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-परवानगी श्री. जमनादास पुरस्वानी यांनी घेतली होती मात्र बोलत होते श्री. बच्चाराम रूपचंदानी.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-मी सुध्दा परवानगी घेतली होती.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-कधी हे बोलत होते तर कधी ते बोलत होते. आता मी परवानगी घेतली असल्याने आता मी बोलेन.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-मा. महापौरजी, उत्तर कुणी दिले पाहिजे. प्रशासनाने दिले पाहिजे कि कुणी दिले पाहिजे. उत्तर प्रशासनाने दिले पाहिजे ना?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मी मा. महापौरांची परवानगी घेवून बोलत आहे तर श्री. बच्चाराम रूपचंदानी मला खाली बसण्यास सांगत आहेत. प्रशासनाने उत्तर दिले त्यांचे ऐकुन घेण्यास कुणी तयार नव्हते. म्हणुन मी उत्तर देत आहे.

*<u>मा. महापौरः-</u>परवानगी न घेता कुणी बोलण्यास उभे राहु नये.....*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>श्री. बच्चाराम रूपचंदानी आपण कोण होतात मला खाली बसण्यास सांगणारे. मी मा. महापौरांची परवानगी घेवून बोलण्यास उभा राहिलो आहे. गणेश उत्त्सव स्पर्धाच्या प्रस्तावास क्रिडा समितीने मान्यता दिलेली आहे. त्याविषयाबाबत आमचे मा. उपआयुक्त श्री. भडकवाड साहेबांनी वारंवार ही गोष्ट स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. जे पेन स्थानिक बाजारपेठेतुन खरेदी केले आहेत त्यांची बाजारभावानुसार किंमत दिली जाईल. ही जी मंजुरी घेण्यांत आलेली आहे ती प्रत्त्येक बाबीची अंदाजित रक्कमेची मंजुरी घेतलेली आहे. मागच्या वर्षी गणेश दर्शन प्रतियोगितेसाठी जी मंजुरी घेण्यात आली होती. त्यामध्ये यावर्षी फक्त वीस-पंचवीस हजार रू. जास्त खर्चाची मंजुरी घेतली आहे. बाकी मागील वर्षानुसारच घेतलेली आहे. आता आमच्या मा. उपआयुक्त साहेबांनी म्हंटले आहे की, त्यांनी प्रत्त्येक बाबीसाठी कोटशन मागविले आहे. मा. सदस्यांना मी सांगु इच्छितो की, गणेश उत्त्सवाच्या काळात पहिल्या दिवसापासुन तर अकराव्या दिवसापर्यंत जेवढे काही गणेश उत्त्सव आहेत. तेथे जावे लागते. तेथे आम्हाला मुव्ही काढावी लागते. सदस्यांना पुस्तके, फॉर्मस अगोदर दयावे लागतात. जे पेन आहेत ते अगोदर दयावे लागतात. त्यानंतर बरेचसे सदस्य फोन करतात की आमचा सुध्दा गणपती बघुन जा, आमचा सुध्दा गणपती बघुन जा व या गणेश उत्त्सव समितीमध्ये सर्व पक्षाचे बरेचसे नगरसेवक आहेत. आमचे मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड हेमाझ्याबरोबर पाच-सहा वेळा आले होते. श्री. नाथानी साहेब हे सुध्दा आले होते, कधी आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे, कॉग्रस पक्षाचे रात्री पहाणी करण्यासाठी येतात तर आमच्या श्री. जमनु पुरस्वानी यांनी जी हरकत घेतली आहे. तिच्याशी मी सुध्दा सहमत आहे. तातडीच्या कामासाठी काही वस्तु खरेदी केल्या आहेत. जर त्यांचा भाव बाजारभावापेक्षा जास्त असेल तर त्या व्यापा-याकडुन ज्याकडुन*



*ज्याकाही वस्तु घेतल्या असतील त्यांस बाजारात त्या वस्तुचा जो भाव असेल त्या हिशोबानेच त्यास त्याचे पेमेंट दिले जाईल. ही आपणांस विनंती आहे. जसे आमचे बंधु श्री. जमनादास पुरस्वानी यांनी म्हंटले की, गणेश उत्त्सव समितीमध्ये भ्रष्टाचार होता कामा नये ही समिती ३० सदस्यांची आहे. त्यामध्ये सर्व पक्षाचे नगरसेवक आहेत. व जेव्हा पारितोषिके वाटप केली जातात तेव्हा सर्व पक्षाचे नगरसेवक मंचावर किंवा व्यासपिठावर बसतात. व पारितोषिके सुध्दा देतात. जे तीस सदस्य आहेत या समितीवर त्यांना सुध्दा प्रमाणपत्र दिले जाते की, आपण गणेश उत्त्सवामध्ये रात्रीच्यावेळी गणेश उत्त्सव पाहण्यास गेलात व ज्या ज्या लोकांना उल्हासनगरवासियांना पारितोषिक मिळाले पाहिजे. ज्या लोकांनी चांगले वातावरण, सजावट, गणपतीची मुर्ती ठेवली आहे त्यांना ती पारितोषिके दिली जातात. तर ज्या दोन तीन बाबी जसे व्हीडीओ शुटींग्र, पेन, फॉर्म जे तातडीने लागणार होते. जे आपण घेतले आहेत कृपया त्यांची बाजारात जी किंमत आहे, पेन ,वही ,व्हिडीओ शूटींग किंवा फोटोग्राफी त्यांना बाजारभावानुसारच बिल दिले जावे. धन्यवाद.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u> मा. महापौरजी ,मी उपआयुक्तांना विचारू इच्छितो की, गणेश दर्शन प्रतियोगितेसाठी एकुण किती फॉर्म आलेले आहेत? एकुण किती फॉर्म आले आहेत, मंडळे किती आहेत?*

*<u>श्री. दत्त्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>फॉर्म किती आले आहेत हे मला माहित नाही. म्हणुन मी माहिती दिली नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>* *आम्हाला किती गणेश मंडळांची पहाणी करायची आहे. अकरा दिवसात रोज किती मंडळांची पहाणी करायची आहे.*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>माझ्याकडे ही माहिती नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>* *२३६ मंडळांना आपण पारितोषिके देणार आहोत. पहाणी करणारे १५० आहेत तर २३६ मंडळांना बक्षिसे कशी देणार? गणेश दर्शन प्रतियोगितेमध्ये भाग घेणारे एकुण मंडळे जर १५० आहेत तर २३६ मंडळांना पारितोषिके कशी देणार?*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>असे होवू शकत नाही ना? माझ्याकडे सध्या माहिती नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>* *त्याची तारीख होती २० तारीख. फॉर्म सादर करण्याची तारीख होती १२ की १४ तारीख होती कोणती तारीख होती? ती तारीख होवून गेली आहे. ती आता पुन्हा तर येणार नाही. यानंतर तर कुणी फॉर्म देणार तर नाही व घ्यायचाही नाही. व पहाणी करायची नाही. आज शेवटचा दिवस आहे. तर किती फॉर्म आले आहेत? आपणांकडे माहिती असेल ना?*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>याबाबतची माहिती सध्या माझ्याकडे नाही. नंतर मी आपणांस सांगेन.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>* *तर मग चार लाख रू. खर्चास आम्ही आपणांस मंजुरी कशी देणार? दिड लाख रू. ठेवा.*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>ज्या समितीने आपल्या समोर प्रस्ताव ठेवला आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>* *दर अगोदरच तिप्पट, चौपट आहेत तर खर्च ऐवढा होणार नाही. खर्च ऐवढा होणार नाही म्हणुन दिड लाखासाठीच मान्यता*



*घ्या ना.*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>क्रिडा समितीचा हा जो प्रस्ताव आलेला आहे. त्यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की, अंदाजित खर्चासाठी मान्यता दिली जात आहे. समजा एखादा खर्च वाढत असेल तर मंजुरी नाही म्हणुन त्या बाबीवर खर्च होवू शकणार नाही. म्हणुन आधीपासुन मंजुरी घेतलेली आहे. अंदाजित खर्चास मंजुरी घेत आहोत. जो खर्च कमी होणार आहे तो बिल्कुल कमीच होईल.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>मला हे विचारायचे आहे की, हा जो अंदाजित खर्च आहे.तो कुण्या अधिका-याने तयार केला आहे, कार्यालयाने तयार केला आहे की, दुस-या कुणी तयार केला आहे?*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-</u>कार्यालयाने तयार केला आहे.*

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-तर साधारणपणे विषय पत्रिकेवर जेव्हा विषय येतो तेव्हा गोषवारा दिला जातो कार्यालयाकडुन याचा गोषवारा का नाही?

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-मुळ गोषवारा प्रशासनाकडुन क्रिडा समितीकडे पाठविण्यांत आला होता.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-तो सर्वांना प्रस्तुत केला असता तर ऐवढया गोष्टी झाल्या नसत्त्या.

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-क्रिडा समितीचा जो प्रस्ताव आहे जो त्यांनी तेथे मंजुर केला आहे तोच अंतिम मंजुरीसाठी येथे आला आहे. मुळ गोषवारा जो पाठविण्यांत आला आहे तो प्रशासनाकडुन क्रिडा समितीकडे पाठविण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-कुण्या उपायुक्तांची त्यावर सही असेल.

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-होय. होय.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-यामध्ये असा एक खर्च दाखविला आहे. गणेश दर्शन प्रतियोगिता पाहण्यासाठी जे नगरसेवक जातात त्यांचा जेवणाचा खर्च प्रत्त्येकी रू. १००/- दर्शाविला आहे. गणेश दर्शन प्रतियोगिता पाहण्यासाठी कुणी नगरसेवक जात नाही. इथे असा कुणी नगरसेवक नाही की जो गणपतीच्या नावाने जेवणाचा खर्च करतो. म्हणुन यासाठी कमीत कमी हा ३६ हजाराचा खर्च तरी कमी करा.

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-श्री. पुरस्वानीजी, याबाबत क्रिडा समितीचे जे स्वीय सहाय्यक आहेत श्री. अनुप भागिया यांना याबाबत मी रोज विचारणा करतो की यामध्ये रोज किती लोक जेवण घेतात. त्याबाबत आम्ही सविस्तर चौकशी करणार आहोत.यामध्ये ज्या काही बाबी दर्शाविल्या आहेत त्या अंदाजित आहेत. जो प्रत्त्यक्ष खर्च होईल त्याचेच पेमेंट दिले जाईल. हे मी आपणांस सांगु इच्छितो.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-आपण म्हणता की, जो खर्च होईल तो देवू किती खर्च झाला याची माहिती आपण दयाल का?

श्री. दत्ता भडकवाड (उपआयुक्त मुख्यालय):-देवू.



मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-गणेश दर्शन प्रतियोगितेच्या खर्चातून जे नगरसेवक आपला जेवणाचा खर्च करतील. त्यांची नावेही दया.

मा. सचिवः-मंजुर?

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

विषयः- सन २००२-२००३ करीता श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता आयोजन करणे संबंधी क्रिडा समाज कल्याण व

सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा दिनांक २७.८.२००२
रोजीचा ठराव क्र. २ कायम करणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती तर्फे दरवर्षी गणपती सणाच्या वेळी गणेश दर्शन स्पर्धा आयोजित केली जाते. याही वर्षी २००२-२००३ साली उल्हासनगर शहरातील सार्वजनिक गणेश मंडळाच्या गणेश दर्शन प्रतियोगिता चे आयोजन करण्याचे मा. सभापती क्रिडा समिती यांनी योजिले आहे. प्रतियोगितेमध्ये मंडळास उत्त्कृष्ठ मुर्ती, उत्त्कृष्ठ देखावा, उत्त्कृष्ठ विषय, उत्त्कृष्ठ राष्ट्रीय एकात्मता देखावा, उत्त्कृष्ठ धार्मीक वातावरण, उत्त्कृष्ठ स्वच्छता, उत्त्कृष्ठ शिष्टाचार, चलचित्र देखावा आणि अन्य विशेष प्रदर्शन अशी ९ पारितोषिके १ ते ४ क्रमांकाना देण्याचे आहेत. व इतर कामासाठी होणारा खर्च पुढील प्रमाणे आहे.

<u>१) स्पर्धेची पारीतोषिके</u>

पारितोषिक देण्यासाठी ४ क्रमांक ठेवले आहेत. एकुण ३६ आणि उत्तेजनार्थ २०० पारितोषिके ती पुढीलप्रमाणे.

१. १५ इंच x १५ इंच चषक प्रत्त्येकी रू. ५७५० एकूण नग ९ रू ५१,७५०/-
२. १२ इंच x १२ इंच चषक प्रत्त्येकी रू. ४५००एकूण नग ९ रू४०,५००/-
३. १० इंच x १० इंच चषक प्रत्त्येकी रू४००० एकूण नग ९ रू३६,०००/-
४. ८ इंच x ८ इंच चषक प्रत्त्येकी रू३५०० एकूण नग९ रू. ३१,५००/-
५. ४ इंच x ६ इंच उत्तेजनार्थ चषक प्रत्त्येकी रू२००
एकूण नग २०० रू. ४०,०००/-

(बक्षिसांचा अंदाजित रूपये खर्च १,९९,७५०/- .............................
रू. एक लाख नव्याण्णव हजार सातशे पन्नास) एकुण रू. १,९९,७५०/-

२) व्हीडीओ कॅमेरा शुटिंग २४ कॅसेट व एक मास्टर कॅसेट
संकलन ध्वनी मुद्रण इत्त्यादी साहित्त्य दोन मुव्ही
कॅमेरा ११ दिवस ६०,०००/-

<u>३. फोटोग्राफर खर्च</u>

फोटोग्राफी ८० फोटो प्रत्त्येकी दिवशी प्रत्त्येकी रू.२६/- २३,०००/-

<u>४. छपाई खर्च</u>

अ)प्रमाणपत्र ३ प्रकारची एकूण ३०० नग प्रत्त्येकी रू. १५/- ४,५००/-
ब)निमंत्रण पत्रिका कव्हरसह ३०० नग प्रत्त्येकी रू. १०/- ३,०००/-
क)गुणपत्रिका २५०० नग प्रत्त्येकी रू.२/- ५,०००/-
ड)कापडी बॅनर ३ फुट x ९ फुट ५ नग प्रत्त्येकी ३०० रू. १,५००/-



इ) समितीच्या सदस्यांना एक्झीक्युटीव्ह फाईल २५ नग
२०० प्रत्त्येकी रू. ५०००/-
फ)बॅचेस २५ नग १० रू. रू.२५०/-
पेन २५ नग रू४० प्रमाणे रू. १०००/-

बक्षीस समारंभाचे दिवसाचे खर्च :-

| | |
|---|---|
| १. खूर्च्या ५०० नग प्रत्येकी ८ रू. | ४,०००/- |
| २. टेबल (कव्हर सह) १० नग प्रत्येकी ७० | रू. ७००/- |
| १. तीन्ही बाजुने बंद करण्यासाठी कापड लावणे | |
| ८० फुट x १५ फुट | १,२००/- |
| ४. ध्वनी क्षेपण | १०००/- |
| ५. नारळ ५० नग प्रत्येकी १० रू. | ५००/- |
| ६. हार ५० नग प्रत्येकी ४० रू | २,०००/- |
| ७. शाल ५० नग प्रत्येकी रू.१५०/- | ७,५००/- |
| | ------------------- |
| एकुण :- | १६,९००/- |

८)मुर्ती व सजावट परिक्षणासाठी मुर्तीकार व सजावटकार यांना ११ दिवसाचे मानधन प्रत्येकी रू. २,५००/- ५,०००/-

| | |
|---|---|
| १)३३ व्यक्तीसाठी एक वेळ जेवण स्पेशल राईसप्लेट ११ दिवसांसाठी प्रत्येकी१०० रू. | ३६,३००/- |
| २)३३ व्यक्तीसाठी दोन वेळेस चहा प्रत्यकी रू. ३ प्रमाणे ११ दिवस | २,१७८/- |

उपरोक्त कार्यक्रमाचा अंदाजित खर्च रू. ३,६३,३७८/- सदरचा खर्च महापालिकेने केलेल्या अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष क्र. ४ (IV) इतर सांस्कृतिक कार्यक्रमाखाली केलेल्या तरतुदीमधुन करावयाचा आहे.

तरी उपरोक्त श्री गणेश दर्शन प्रतियोगीता २००२यावरील एकुण अंदाजित खर्च रू. ३,६३,३७८/- असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार दरसूची तथा निविदा व्दारे कारवाई करून संबंधित विभागामार्फत करण्याचे प्रस्तावित असून प्रथम क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती समोर ठेवणेस प्रस्तावित आहे.

क्रिडा,समाज कल्याण व सांस्कृतिक समिती ठराव क्र. २ दि.२७.८.२००२

सुचकाचे नाव :- श्री. लबाना होशियारसिंग

अनुमोदकाचे नाव :- श्री. रिझवानी सुजाता

हि क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती महासभेच्या अधिन राहुन वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता-२००२ आयोजित व कार्यान्वीत करणे कामी अनुषंगिक, पारितोषिके, व्हीडीओ शुटींग, वाहन,प्रमाणपत्रे, जाहिरात, बॅनर, छायाचित्रे इत्त्यादी व्यवस्थेकामी रू. ३,६३,३७८/-च्या अंतर्भूत खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे. व मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या स्वइच्छेनुसार त्या नेमतील त्या सदस्यांच्या समितीस स्विकृती देत आहे.

तसेच मा. महापौर ज्या सदस्यांच्या समितीची रचना करतील ती अंतिम राहिल आणि ती या ठरावाचा भाग मानला जाईल.

या विशेष समितीस आपल्या निर्णयानुसार श्री. गणेश दर्शन प्रतियोगीतेचे आयोजन करून कार्यान्वीत करणे कामी विलंब झाल्यास त्यामुळे अत्यंत गैरसोयीचे होईल असे वाटल्यास सदरचा ठराव महासभेकडुन कायम होण्याची वाट न पाहता श्री. गणेश दर्शन प्रतियोगीतेचे आयोजन करून कार्यान्वीत करता येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

उपसभापति / पिठासीन अधिकारी
क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> २८ <u>दिनांक:-१९.९.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. राजु टेकचंदानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. रूपानी चिमन

ही महासभा क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समितीचा वर नमुद केलेला दि. २७.८.२००२ रोजीचा ठराव क्र. २ अंर्तगतचा निर्णय कायम करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:-</u>विषय क्र. ४

<u>विषय:-</u> महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास वाढीव पाणी

पुरवठा पोटी स्टॅण्डीग चार्जेस भरणे बाबत.



<u>मा. सदस्य श्री.लाल पंजाबी:-</u>कुणी अधिका-यांनी सांगावे स्टॅण्डीग चार्जेस कसे आकारले जातात? त्यांचे मोजमाप काय आहे?दर काय आहेत?

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर व श्री. नारायण पंजाबी हे सायंकाळी ५. १० वाजता सभागृहात आले.

<u>श्री. डेग्मवार (कार्यकारी अभियता पा.पु.वि):-</u>मा. महापौर महोदया, मा. उपमहापौर महोदया, आयुक्त साहेब, व सर्व सन्मानानिय सदस्य हा जो स्टॅण्डिंग चार्जेसचा मुददा महासभेपुढे घेण्यांत आला आहे. याबाबत मी हे सांगु इच्छितो की, आपल्या उल्हासनगर शहरामध्ये जो पाणी पुरवठा होतो. त्यामध्ये एम.आय.डी.सी ने आपणांस ९७. ३८ एम.एल.डी. पाण्याचा कोटा मंजुर केला आहे. व एम.आय.डी.सी म्हणणे असे आहे की, त्यापेक्षा जास्त पाणी आपण घेत आहात. म्हणजे ९७ एम.एल.डी.च्यावर जवळ जवळ १०-१५ एम.एल.डी. पाणी आपण जास्त घेत आहोत. त्यासाठी तो मंजुर कोटा नाही. म्हणुन ते स्टॅण्डिंग चार्जेसची मागणी करत आहेत. याबाबत आम्ही अशी भुमिका घेतली आहे की, एम.आय.डी.सी. ने कॅपीटल कंन्ट्रब्युशन व स्टॅण्डिंग चार्जेस हे भरण्यासाठी आपणांकडे आग्रह धरला जात आहे. त्याबाबत आमचे म्हणणे असे आहे की, सर्वसाधारणपणे असे असते की, ती जी बेनिफिशली बॉडी आहे , एम. आय.डी.सी ला याकामी जर अतिरिक्त खर्च करावा लागत असेल तरच त्यांनी अशा प्रकारच्या चार्जेसची आपल्या महापालिकेकडे मागणी केली पाहिजे.परंतु एम.आय.डी. सी ने असे काहीही केले नाही. व तरीही ते स्टॅण्डिंग चार्जेसची मागणी करीत आहेत. याबाबत आम्ही त्यांच्या वरीष्ठ अधिका-यांनाही कळविले आहे. महाराष्ट्र शासनास सुध्दा कळविले आहे की, हे जे स्टॅण्डिंग चार्जेस आहेत ते आम्हास माफ केले जावेत. परंतु आता एम.आय.डी.सी चे म्हणणे असे आहे की, जोपर्यंत तुम्ही हे स्टॅण्डिंग चार्जेस भरणार नाहीत. तोपर्यंत आम्ही तुमच्या पाणी पुरवठयाची कपात करू. म्हणुन आम्ही नाईलाजाने अंडरप्रोटेस्ट जुन २००२पर्यंत ५६ लाख स्टॅण्डिंग चार्जेस त्यांनी लावले होते. त्यापैकी २८ लाख रू. आम्ही त्यांना भरले आहेत. व ते अंडर प्रोटेस्ट भरले आहेत. व वरीष्ठांनाही कळविले आहे की, हे जे चार्जेस आहेत ते पुढे आमच्या बिलामध्ये समाविष्ट होतील. व आता तीन महिने स्टॅण्डिंग चार्जेस आम्ही भरणारच नाही. याबाबत आयुक्त साहेबांनीही वरीष्ठांना कळविले आहेत. आपल्या महापालिकेने स्टॅण्डिंग चार्जेस बाबत जी भुमिका घेतली आहे ती या प्रकारची आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>स्टॅण्डिंग चार्जेसचा अर्थ आपण जे नियमितपणे पाणी घेतो त्याचे बिल आहे की, दुसरे काही आहे?

<u>श्री. डेग्मवार (कार्यकारी अभियता पा.पु.वि):-</u>हे अतिरिक्त, आपण जे नियमितपणे पेमेंट करतो त्याच्या व्यतिरिक्त आपणांस हे स्टॅण्डिंग चार्जेस प्रति एम.एल.डी. ला १०-१२ लाख रू. भरण्याबाबत एम.आय.डी.सी मागणी करत आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>म्हणजे आजपर्यंत ९७ एम.एल.डी चे प्रत्येक महिन्यास स्टॅण्डिंग चार्जेस भरतो?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी सायंकाळी ५. ३० वाजता सभागृहात आले.

श्री. डेग्मवार (कार्यकारी अभियता पा.पु.वि):-टोकनमनी म्हणुन आपण २८ लाख रू. अंडर प्रोटेस्ट भरले आहेत. व ते पुढे जावून ही रक्कम बिलामध्ये ॲडजेस्ट करावी अशी आम्ही विनंती केली आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-कारण की अंडरप्रोटेस्टचा अर्थ असा आहे की, महापालिका त्याबाबत समाधानी नाही. म्हणुन आपण अंडरप्रोटेस्ट रक्कम भरत आहोत?



श्री. डेग्मवार (कार्यकारी अभियता पा.पु.वि):-स्टॅण्डिंग चार्जेसच्या पेमेंटबाबत आपण समाधानी नाही म्हणुन...

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-याबाबत आयुक्तांनी सभागृहास सविस्तरपणे सांगितले पाहिजे.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-मा. महापौरजी, मला असे वाटते की आमचे जे पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी आहेत त्यांना याबाबत पुर्णपणे माहिती नाही त्यामुळे ते अशा प्रकारचे उत्तर देत आहेत. आयुक्तांना आठवण असेल की, पाणी पुरवठ्याबाबत एम.आय.डी.सीच्या अधिका-यांबरोबर एक बैठक घेण्यांत आली होती. त्यामध्ये या शहराचे आमदार साहेब सुध्दा होते. त्यावेळेला असा निर्णय झाला होता की, जर उल्हासनगर शहरास वाढीव पाणी हवे असेल १० किंवा १५ एम.एल.डी. त्यासाठी प्रारंभिक रक्कम महापालिकेला सांगण्यांत आले होते. महापालिकेची आर्थीक स्थिती बिकट असल्यामुळे व आम्ही ही रक्कम भरू शकणार नाही म्हणुन त्याचा पर्याय काढण्यांत आला होता की, स्टॅणिंग चार्जेस आपण भरा. व तो आयुक्तांनी, आमदारांनी, आम्ही व जेवढे काही अधिकारी तेथे गेले होते. एम.आय.डी.सी. व उल्हासनगर महानगरपालिकेने संयुक्तिकपणे तो निर्णय घेतला होता. तर अंडर प्रोटेस्ट भरण्याचा हा प्रश्न कुठून उपस्थित झाला. मला आश्चर्य वाटते की, आयुक्तांनी २८ लाखाचे पेमेंट केले आहे. व जर अंडरप्रोटेस्ट केले आहे तर दॅट इज बीच ऑफ ट्रस्ट आम्ही राज्य सरकारला जे सांगितले आहे किंवा त्यांना जे आश्वासन दिले आहे. मला वाटते की आयुक्तांनी याचा खुलासा करावा. ती रक्कम अंडरप्रोटेस्ट कशी भरली आहे? व दुसरी गोष्ट जी आहे जे श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, स्टॅण्डिंग चार्जेस काय आहेत? आपण त्याचा खुलासा करत नाहीत. त्यांचे म्हणण्याचा अर्थ असा होता की,९७ एम.एल.डी चे आम्ही जे पैसे देत आहोत. ते पण काय स्टॅण्डिंग चार्जेस आहेत का? ते तसे नाही, ते नियमित बिल आहे. व मला आपण हे सांगा की, २८ लाखाचे चे पेमेंट दिले आहे ते अंडर पोटेस्ट कसे दिले आहे?

मा. सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानी , श्री. नाना पवार व श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे सायंकाळी ५. ३५ वाजता सभागृहात आले.

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-मा. महापौर महोदया व सर्व सदस्य उल्हासनगर महानगरपालिकेला ९८. ४ एम.एल.डी. पाणी पुरवठा मंजुर झाला आहे. व जवळ जवळ मार्च महिन्यापासुन उल्हासनगर शहरात पाण्याची टंचाई चालू होती. व उल्हासनगर शहरात, जसे मी मागील महासभेत सांगितले आमच्या लोकसंख्येच्या हिशोबाने ९८ एम.एल.डी. पाणी पुरवठा आम्हाला पुरेसा आहे. परंतु जलकुंभ नसल्याकारणाने, वितरण व्यवस्था नसल्या कारणाने पाण्याचे प्रमाण जास्त लागते. व यामुळे पाण्याचा पुरवठा जास्त करणे आवश्यक भासते. म्हणुन या कारणाने एम.

आय.डी.सी कडे मी वारंवार जात होतो. जास्त पाणी पुरवठा करण्याबाबत त्यांना विनंती करत होतो. तर ते वांरवार म्हणत होते की, आपणांस ९८.४ एम.एल.डी. पाणी पुरवठा मंजुर आहे त्यापेक्षा जास्त पाणी पुरवठा आम्ही करू शकत नाही. त्याचवेळी, पहिल्यापासुनच, आम्ही मा. मुख्यमंत्री साहेबांबरोबर बसलो होतो. त्यांच्याबरोबर सभा झाली होती. त्याच्या अगोदर पासुन एम.आय.डी.सी. ची आमच्याकडे मागणी आहे की आपण कॅपीटल कॉन्ट्रीब्युशन भरले किंवा स्टॅण्डिंग चार्ज भरला. तर आम्ही आपणांस जादा पाणी पुरवठा करू शकु. कॅपीटल कॉन्ट्रीब्युशनचा अर्थ हा होतो की, त्यांना जी मोठी गुंतवणुक करावी लागते. जसे की एखादा मोठा डॅम तयार करायचा आहे, क्लोरिफिकेशन प्लॅन्ट तयार करायचा आहे, मास्टर बॅलन्स रिझरव्हार बनवायचे आहे, मोठ मोठ्या प्रकल्पासाठी मोठमोठ्या प्रमाणावर खर्च होतो व त्यासाठी भांडवली खर्च घेतात व त्याची मात्रा प्रत्येक एम. एल.डी. मागे ८६ लाख रू. ते घेतात. एम.आय.डी.सी. चे म्हणणे आहे की, जेव्हा



आपण जादा पाणीपुरवठ्याची मागणी करतो. प्रत्येक एम.एल.डी. मागे ८६ लाख रू. आम्हाला भांडवली खर्च दिला तरच आम्ही आपणांस जास्त पाणीपुरवठा करू शकू. परंतु आमची परिस्थिती अशी नाही की, एकाच वेळी आम्ही १०-१५ एम.एल.डी. पाणी घेवू तर त्यासाठी आमच्याकडे ८-१० कोटी रू. नाहीत. यासाठी एम.आय.डी.सी ने दुसरा मार्ग सूचविला की, ठिक आहे आपण भांडवली खर्च देवू शकत नसाल तर स्टॅण्डिंग चार्जेस भरा. स्टॅण्डिंग चार्जेसची रक्कम प्रत्येक एम.एल.डी. मागे १.६ लाख असे आहे. याचा अर्थ हा होतो की, जेव्हा आपण भांडवली खर्च भरत नाही तेव्हा स्टॅण्डिंग चार्जेस म्हणुन ८६ लाखावर जे व्याज येते ती रक्कम ते आपणांकडुन वसुल करतात. जेव्हा मा. मुख्यमंत्री, मा. आमदार,मा. श्री. हरदास माखीजा साहेब व आम्ही लोकांनी मा. मुख्यमंत्री महोदयांबरोबर एका बैठकीस आम्ही उपस्थित होतो. त्याचवेळी हाच मुद्दा एम.आय.डी.सी. ने पुढे केला की, आपण भांडवली खर्च किंवा स्टॅण्डिंग चार्ज भरा. शहरात मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाई असल्यामुळे व आमची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे.... आम्हाला पाणी तर पाहिजे होते. पाण्याची टंचाई तर आम्ही सहन करू शकत नव्हतो. त्याचवेळी आम्ही असे ठरविले होते की, आम्ही स्टॅण्डिंग चार्ज भरू. परंतु ही एक वस्तुस्थिती आहे. माझे म्हणणे मी औदयोगिक सचिव जे एम.आय.डी. चे कार्यकारी अधिकारी आहेत. त्यांना सांगितले की, मुख्यमंत्री महोदयांबरोबरच्या बैठकीत आम्ही हे मान्य केले आहे. परंतु आमची आर्थिक स्थिती अतिशय कमकुवत आहे. जर आमच्यावर प्रति एम.एल.डी. १.६ लाखाचा जरी बोजा आला तरी तो आम्हाला जड जाणार आहे. म्हणुन आम्ही आपणांस विनंती करतो की, भांडवली खर्च किंवा स्ट्रण्डिंग चार्जेस आम्हाला माफ केला जावा. परंतु त्यांचे म्हणणे असे आहे की, आता तर आम्ही माफ करू शकत नाही त्यावर मी त्यांना खुलासा दिला की, भांडवली खर्च कधी घेतात. जेव्हा आपणांस एखादा डॅम किंवा पाणी पुरवठ्याचे साधन किंवा एखादा एम. बी. आर. किंवा क्लोरिफिकेशन प्लॅन्ट नविन तयार करायचा आहे. तेव्हा, परंतु आपली यंत्रणा तर जुनी आहे. त्यामुळे आपणांस असा कायदशिर किंवा नैतिक अधिकार नाही की आपण आमच्या कडुन भांडवली खर्च किंवा स्टॅण्डिंग चार्जस वसुल करावेत. किंवा त्याची मागणी करावी. या मुदयावर सचिवांशी माझी दोन वेळा चर्चा झाली. त्याचवेळी मी त्यांना सांगितले की, ठिक आहे. एम.आय.डी. सी. वारंवार आमच्या पाणी पुरवठ्यात कपात करते त्यामुळे शहरात पाण्याची भिषण टंचाई निर्माण होते. म्हणुन आम्ही स्टॅण्डिंग चार्जेस भरू. परंतु आम्ही तो अंडर प्रोटेस्ट भरू. याचा अर्थ असा नाही की आम्ही भरणार नाही. यामुळे काही अडचण येत नाही. माझी सर्व सभागृहास व सदस्यांना ही विनंती आहे की, एम.आय.डी. सी चा हा जो मुददा आहे त्यास मुळीच काही पुरावा नाही की ज्याअन्वये त्यांनी

आपणांकडुन भांडवली खर्च किंवा स्टॅण्डिंग चार्जची मागणी करावी. अंडर प्रोटेस्ट भरली तर आम्हाला पुढे जावून असे सांगता येईल की, आपण आम्हाला नियमितपणे पाणी पुरवठा करा. आम्ही पाणी बिल भरण्यास तयार आहोत. व नियमित पाणी पुरवठयाचा दर प्रती १०००लीटर पाण्यास ५ रू. ७५ पैसे म्हणजेच १लाख लिटर मागे ५७५ रू. म्हणजे प्रत्येक १००० लिटर मागे यापुढे आम्ही जेव्हा हा मुददा त्यांच्याबरोबर उपस्थित करू. एम.आय.डी.सी ने नाकाही नव्याने गुतवणूक केली आहे. ना त्यांनी काही अतिरिक्त गुंतवणूक केली आहे. व दुसरी गोष्ट ही आहे की हे न करताही ते आमच्याकडुन मागणी करत आहेत की तुम्ही भांडवली खर्च भरा. व दुसरी गोष्ट ही सुध्दा आहे की,त्यांच्याकडे पाण्याचा अतिरिक्त पुरवठा आहे. माझी तर माहिती अशी आहे की, त्याच्यासाठी पाण्याचा ग्राहक सुध्दा उपलब्ध नाही. असे असताना भांडवली खर्च किंवा स्टॅण्डिंग चार्जेस मागणे उचित नाही. व आम्ही जेव्हा अंडरप्रोटेस्ट रक्कम भरत आहोत त्यामध्ये काही चुक आहे असे मला तरी वाटत नाही. व यानंतर आम्हास पुन्हा प्रयत्न करावे लागतील आमची आर्थीक परिस्थिती ठिक नसल्यामुळे फार मोठे आर्थिक ओझे आमच्या महापालिकेवर येईल. म्हणुन मी आपणांस असे अपिल करू इच्छितो, रक्कम अंडरप्रोटेस्ट भरल्यामुळे आम्ही जे वचन दिले आहे त्याचा काही भंग होत नाही. आम्ही तर रक्कम देण्यास तयार आहोत. परंतु नंतर आमच्याकडे मुददा राहील की आम्ही ही रक्कम कमी करू शकु.



<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>मी आपणांस धन्यवाद देतो की, आपण सभागृहास माहिती दिली त्यामुळे सभागृहातील सदस्यांना सविस्तर माहिती मिळाली. आपल्या पाणी पुरवठा विभागाच्या अधिका-यांचे हे म्हणणे की आम्ही अंडरप्रोटेस्ट भरत आहोत याचा अर्थ काही तरी बेकायदेशिर मागणी महाराष्ट्र राज्य सरकारने आमच्याकडे केली आहे. व त्याच्या विरूध्द आम्ही अंडरप्रोटेस्ट ही रक्कम भरत आहोत. तर यागोष्टीचा हा खुलासा होणे जरूरीचे आहे. दुसरा ज्या गोष्टीचा खुलासा श्री. पंजाबी साहेबांना हवा होता की ९७ एम.एल.डी. ९८ एम.एल.डी जे दररोज आम्हास पाणी मिळते काय ते सुध्दा स्टॅण्डिंग चार्जेसनुसार आहे का? तर ती गोष्ट सुध्दा आपण स्पष्ट केली की, ते नियमित बिल आहे. व हे जे स्टॅण्डिंग चार्जेस आहेत ते भांडवली खर्चावर जेवढे व्याज होते ते स्टॅण्डिंग चार्जेस म्हणुन घेतले जाते. तर हे स्पष्ट होणे सभागृहातील सदस्यांसाठी अतिशय जरूरीचे होते. मी आपणांस निवेदन करेन की, आपले जे अधिकारी आहेत त्यांना एखादया मुदयावर स्पष्टीकरण दयायचे झाल्यास त्यांनी योग्य ती तयारी करून आले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>एक गोष्ट आणखी सांगु इच्छितो हे जे स्टॅण्डिंग चार्जेस आहेत. प्रती एम.एल.डी., तर आम्ही किती एम.एल.डी. चे चार्जेस भरणार?

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>मा.महापौर महोदया,आयुक्त साहेब एक सेंकंदात माझ्या प्रश्नाचा खुलासा दया. ९८एम.एल.डी. पाणी पुरवठा आमच्या शहरास मंजुर आहे. १५ एम.एल.डी. पाणी आम्हास जास्त पाहिजे ज्याची मागणी आम्ही महाराष्ट्र सरकारकडे केली आहे. हे बिल्कुल स्पष्ट आहे. पाण्याची कमतरता आमच्याकडे होती म्हणुनच ऐवढया मोठ्या प्रमाणावर आंदोलने झाली. ही गोष्टी बिल्कुल स्पष्ट आहे. याशिवाय मोठ्या दुःखाने म्हणावे लागत आहे की, आमचे शहरास करण्यात येणा-या पाणी पुरवठ्यापैकी काही पाणी कल्याण महानगरपालिका क्षेत्रातील गावांना केला जात आहे. कल्याण मधील कित्त्येक नळ जोडण्या श्रीराम टॉकीज जवळून व कॉलनी जवळून जात आहेत. त्या सूध्दा तोडल्या नाहीत. चार इंच व्यासाची एक नविन लाईन कॅम्प ४ मधुन, कल्याण महापालिका क्षेत्रातील माणेरा गावापर्यंत नेली जात आहे. याच्या विरोधात तेथील लोकांना विरोध केला. मी असेही ऐकले आहे की,

अंबरनाथचे आमदार साहेब आयुक्त साहेबांकडे आले. व त्यांनी याविषयी चर्चा केली. आयुक्त साहेबांनी ती चार इंच व्यासाची जलवाहिनी न देण्याबाबत आपला निर्णय कायम ठेवला त्याबाबत आम्ही सत्ताधारी पक्षाचे सर्व नगरसेवक आयुक्तांना धन्यवाद देतो. हा त्यांचा योग्य निर्णय  होता. आमच्या शहरात पाणी नाही तर आम्ही आमच्या कोटयातील पाणी दुस-या शहरास दयावे. याचा आम्ही विरोध करू. आम्ही सर्व आपल्या बरोबर आहोत. त्याचबरोबर आम्ही अशी मागणी करतो की, आमचे जे पाणी आजपर्यंत कल्याणमध्ये जात आहे ते थांबविले जावे. ९८ एम.एल.डी. जो आमचा मंजुर कोटा आहे तोच आम्हाला पुर्णपणे मिळत नाही. ९८ एम.एल.डी. जे पाणी आहे ते आम्ही मीटर नुसार बरोबर मोजावे की आम्हाला ते ९८ एम.एल. डी. पाणी मिळत आहे किंवा नाही व जे काही मिळत आहे ते पुर्णच्या पुर्ण आमच्या शहरास मिळावे. कारण की त्यानंतर आधिक दराने आम्ही पाणी घेत आहोत. आपल्याला ९८ एम.एल. डी. पाणी पुरत नाही म्हणुन जास्त दराने आम्ही पाणी घेत आहोत. कुठे ७ रू. ७५ पैसे  कुठे ९ रू. २० पैसे इतके दर जास्त देत आहोत तर आमची जी समस्या आहे ती पुर्ण शहराची समस्या आहे. सर्वांचे एकमत झाले पाहिजे. अर्धा इंच लाईन देखिल कल्याणला जाणार नाही. जी उल्हासनगरची असेल धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>सन्माननिय महापौर महोदया, आता आयुक्त साहेबांनी निवेदन करताना स्पष्टपणे सांगितले की उल्हासनगरच्या लोकसंख्येच्या हिशोबाने त्याचा जो मंजुर पाणीपुरवठा आहे तो पुरेसा आहे. आणि जो दुस-या बाजुला त्यांनी हे सुध्दा सांगितले की, शहरामध्ये जलकुंभाचा अभाव आणि सदोष पाणी पुरवठा व्यवस्था यामुळे आपल्याला तो मंजुर पाणीपुरवठा पुरेसा नाही. आपल्या शहरामध्ये  पाणी टंचाईची परिस्थिती आहे आणि त्यामुळे पुन्हा पुन्हा आपल्याला एम.



आय.डी.सी कडे जावुन वाढीव पाणी पुरवठयासाठी मागणी करावी लागते. आणि त्यासाठी आपल्याला वेगळा भुर्दंड भरावा लागतो. याठिकाणी असे म्हंटलेले आहे की, ९७. ७७ एम.एल.डी. ऐवढया पाणीपुरवठयाचे परिमाण मंजुर आहे. परंतु महानगरपालिका सध्या अंदाजे १०८ ते ११३ एम.एल.डी. एवढे पाणी घेत आहे याचा अर्थ असा होतो की, जे सध्या आपल्यासमोर मोजमाप ठेवलेले आहे. ते अंदाजे आहे. त्याच्याबददल त्या मोजमापामध्ये अचुकता नाही की नेमके किती पाणी आपण जास्त घेत आहोत. याबददल कुठल्याही प्रकारची अचुकता नाही. मोजमाप व्यवस्था आपल्याकडे आहे का? आपल्या शहराला नेमका किती पाणी पुरवठा होतो. वेगवेगळया मार्गाने पाच कॅम्पमध्ये जाणारा जो पाणीपुरवठा आहे तो नेमका किती एम.एल.डी. आहे त्याचे काही आपल्याकडे उत्तर आहे का? तर हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे की, नेमके परिमाण आपल्याकडे आहे का? दुसरे असे की, एम.आय.डी. सीला अधिक खर्च करण्यापेक्षा किंवा स्टॅण्डिंग चार्जेसच्या निमित्ताने  आपण जवळ जवळ ८६ लाखाचे ओझे महापालिकेवर पडण्याची शक्यता आहे. महिन्याला आपल्याला जे १,८६,२०० रू. भरण्याची जी पाळी येणार आहे. तर यामध्ये असे होवू शकत नाही का की आपली जी सदोष पाणी पुरवठा व्यवस्था आहे तर हा जो खर्च आपल्याला वाढीव होणार आहे तो पाणी पुरवठा व्यवस्था सुधारणेवर होवू शकेल असा मार्ग याच्यामधुन निघु शकणार नाही का? हा एक प्रश्न दुसरे असे की, आपण असे सांगितले की अंडरप्रोटेस्ट २८ लाखाचा धनादेश महामंडळाला देण्यात आला आहे. त्याचे आपण स्पष्टीकरण केले की, आपल्याला जी एक लाख सहा हजाराची रक्कम दयायची आहे ती सुध्दा यापुढे अंडरप्रोटेस्ट दयायची आहे.  हा सुध्दा एक प्रश्न आहे आणि दुसरे असे की, आपण स्पष्टपणे सदनासमोर सांगितले की, एम.आय.डी.सी.मागणी ही उचित नाही त्यामध्ये तथ्य नाही. तर आपण आयुक्तांनी या सभागृहामध्ये एम.आय.डी.सीच्या मागणीमध्ये मुददाच नाही असे

निवेदन केल्यानंतर या सभागृहाने त्या मागणीला पाठींबा दयायचा का? मान्य करायचे का? असे प्रश्न उपस्थित झाले आहेत म्हणुन जरा खुलासा केला तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाळेः-मा.महापौर, उपमहापौर, आयुक्त, सन्माननिय सदस्य एम.आय.डी.सी या शहराला पाणी पुरवठा करते आणि एम.आय.डी.सी.ची दादागिरी आपण नेहमी सहन करतो. आज आपल्या शहराला ९८ एम.एल.डी. पाणी असुन सुध्दा जसे आता श्री. राज असरोंडकर बोलले. मला वाटते त्यांनी योग्य मुददा मांडला आहे. ९८ एम.एल.डी. पाणी असुन सुध्दा जेवढा पुरेसा पाणी पुरवठा पाहिजे तेवढा असून सुध्दा आणि नंतर मा. आमदारांच्या प्रयत्नामुळे तो पुरवठा वाढवून सुध्दा खरेतर याची गरज होती का? पाणी पुरवठा वाढविण्याची गरज आहे की पाणी पुरवठ्याचे वाटप व्यवस्थित करणे जरूरीचे आहे हा एक पहिला मुददा आहे. दुसरा मुददा असा आहे की स्टॅण्डीग चार्जेस जेव्हा कुठे संस्था मागते. त्याचा नेमका अर्थ माझ्या माहिती प्रमाणे तरी असा आहे. त्यांनी त्यांच्यामध्ये सुधारणा केली पाहिजे. आयुक्त साहेब बोलले की, त्यांनी काही काम न करता स्टॅण्डीग चार्जेस मागितले. मला वाटते गेल्या दहा वर्षापासुन जो पाणीपुरवठा आपल्या शहरात होतो तो पुरवठा करण्यासाठी लागणारी मशिनरी किंवा इतर खर्च त्यावेळी जी परिस्थिती होती तीच आज परिस्थिती आहे. त्यामुळे स्टॅण्डीग चार्जेस मागण्याची तशी काही एम.आय.डी.सी ला आवश्यकता नाही. त्यांनी केवळ दादागिरीमुळे स्टॅण्डीग चार्जेस आपल्याकडे लावले आहेत. माझी विनंती अशी आहे माझ्या माहितीप्रमाणे स्टॅण्डीग चार्जेस एक लाख नसावे दर महिन्याला काहीतरी १७ लाख वगैरे काहीतरी आहेत. आणि त्याची सरासरी काढली तर दरवर्षाला तीन साडेतीन कोटीचा भुर्दंड सहन करावा लागतो. दुसरा मुददा असा आहे की, आज पर्यंत ९८ एम.एल.डी. पाणी आपण घेत होतो परंतु एम.आय.डी.सी बोलत होती म्हणुन आपण ९८ एम.एल.डी.चे पैसे भरत होतो. मला वाटते त्यांचा रेकॉर्ड चुकीचा आहे. आजपर्यंत तुमच्याकडे अशी कोणतीही यंत्रणा नाही की आपल्याकडे नेमके पाणी किती येते? आणि नेमके जेवढे पाणी येते त्यांचे आपण पैसे देत नाही. कदाचित आपण कमी



पाणी घेतो आणि जास्त पैसे देतो. याचे एक मोजमाप कुठेतरी आपल्या महानगरपालिकेमार्फत होणे आवश्यक आहे. हा भुर्दंड...

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-धन्यवाद.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाळेः-धन्यवाद.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौरजी, आज सभागृहात जी पण चर्चा झाली त्याची इतिवृत्तात नोंद आली असेल त्या सर्वांवर अंमलबजावणी झाली पाहिजे. एम.आय.डी.सी. वाल्यांना पण निर्देश दिले आहेत की ४० करोड की काहितरी जे व्याज आहे ते माफ केले जावे. आज पर्यंत एम.आय.डी.सी. हे मान्य करायला तयार नाही की इतिवृत्त तयार झाले असले तरी आम्हाला लेखी आदेश आले नाहीत. स्टॅण्डीग चार्जेस संबंधी जी चर्चा झाली त्याचे पण इतिवृत्त तयार झाले आहे. लिखित स्वरूपात शासनाकडुन एम.आय.डी.सी ला आदेश झाले नाहीत तरी पण ते स्टॅण्डीग चार्जेस भरा म्हणुन मागे लागले आहेत. ते म्हणतात जर तुम्ही स्टॅण्डीग चार्जेस भरले नाही तर १२ व १५ एम.एल.डी. जे पाणी वाढवून दिले आहेत त्यामध्ये कपात करू. जिथे त्यांचा फायदा होत आहे ते काम आपल्याकडुन करून घेत आहेत. जिथे फायदा नाही तिथे ते नाही म्हणतात तर आमच्या आयुक्त साहेबांनी हा मुददा जो महासभेसमोर ठेवला आहे. काल सर्वदलीय बैठक होती. सत्ता पक्षाचे

सर्वजण होते तेव्हा आयुक्तांनी खुलासा करून सांगितले होते की पैसे आपल्याला भरायचे आहे जर पैसे नाही भरले तर एम.आय.डी.सी वारंवार दम देत आहे की आम्ही पाण्यात कपात करू. परंतु जर आपण एक वाक्य अंडरप्रोटेस्ट असे लिहुन जर त्यांना पाठवले तर भविष्यात आपण त्यांना हे विचारू शकतो की तुम्ही तिथे काही नविन व्यवस्था केली नाही आहे. बारवी डॅम सारखा लहान असा डॅम नाही बनविला जसे त्यांच्याकडे पाणी जास्त आहे. कल्याण व डोंबिवली महापालिकेने आपला डॅम बनविल्यानंतर एम.आय.डी.सी चे पाणी बंद केले त्यांच्याकडे जादा पाणी आहे. तर त्यांनी ५ रू. ७५ या दराने पाणी दिले पाहिजे. परंतु ते म्हणत आहेत की तुम्ही मागील विलंब शुल्क नाही भरले म्हणुन स्टॅण्डीग चार्जेस लावुन तुम्हाला पाठवू व तुम्हाला ते दर महिना भरावेच लागेल. तर आमच्या आयुक्त साहेबांनी शासनाला असे लिहिले आहे की त्यांनी काहीही बदल केला नाही. तरी पण ते स्टण्डीग चार्जेस घेत आहेत. आम्ही त्यांना अंडरप्रोटेस्ट देत आहोत शासनाने काय ते ठरवावे. आपल्या बरोबर अन्याय होत आहे. तरी पण जर शासनाने सांगितले पैसे भरा तर आपण तोपर्यंत भरायचे. दुसरे असे की, जे मला काही बोलायचे होते ते आमचे बंधु श्री. दिलीप लालवानी बोलले ते माझे भाषण नेहमी कमी करण्यासाठी मदत करतात. मला जे बोलायचे असते ते बोलुन टाकतात त्याबददल मी त्यांचे धन्यवाद मानतो. सर्वात प्रथम उल्हासनगर क्षेत्रात पाणी जे पोहचत नाही तर शहरातील बाहेरच्या लोकांना महापालिकेचे एक थेंब पण पाणी गेले नाही पाहिजे. ठरावात हे आले पाहिजे. दुसरे असे की, एम.आय.डी.सी चे मी एक छोटेसे उदाहरण देतो. आज जांभुळ येथुन उल्हासनगर ५ मध्ये जे पाणी येते ते नेहमी ३२, ३४ एम.एल.डी. दाखवते. त्यानंतर कार्यकारी अभियंता एस.डी.ओ व सेक्शन अधिकारी मोरे साहेबांनी तिथे एअर वॉल बसविले. त्यांनतर ५ व ४ नंबर मध्ये पाण्याचे प्रमाण वाढले याचा अर्थ असा आहे की, नुसते हवेवर एम.आय.डी.सी चे मीटर पळत होते. पाणी येत नव्हते. असे एअर वॉल जिथे पण एम.आय.डी.सीची लाईन आहे तिथे लागले पाहिजे. तिसरे असे की, ८ ऑगस्ट पासुन एम.आय.डी.सी चे बरेचसे मीटर पुन्हा खराब झाले आहेत. तर महानगरपालिकेमध्ये लवकरात लवकर एक आठवडा किंवा दहा दिवसात आपले मीटर लावून ठरावात पण हे टाका की आपले जे मीटर असेल महापालिकेचे ते जेवढे कंन्झम्शन दाखवेल व त्यानुसारच आम्ही बिल देणार. त्यांच्या मीटर नुसार पेमेंट देणार नाही. मागचा अनुभव मी सांगतो की शांतीनगरमध्ये महापालिकेने आपले एक मीटर लावले थोडया दिवसाने एम.आय.डी.सी. वाले आले आणि त्या मीटरला खराब करून गेले. थोडयाच दिवसात परत दुसरा मीटर लावण्यांत आला, आता तो पण नादुरूस्त आहे. याचा



अर्थ हा आहे की आपल्या महापालिकेतर्फे जे मीटर लावले गेले त्यावर बॉक्स देखिल असले पाहिजे. त्यावर कुलूप लावले पाहिजे जेणेकरून मीटर खराब न होवो. जितके एम.आय.डी.सी. चे आपण पेमेंट करतो तेवढे जर शहराला पाणी मिळाले तर मला नाही वाटत की असे एखादे क्षेत्र राहील ज्यात पाणी नाही. तर आपल्याला जे शुल्क आकारतात ते त्यांच्या मीटर प्रमाणे नाही तर आपल्या मीटरच्या प्रमाणे लावले गेले पाहिजे व ते मीटर त्वरीत लावले जावे. कारण एम.आय.डी.सी वाले म्हणत आहे तुम्ही जर स्टॅण्डीग चार्जेस नाही भरले तर आम्ही १५ एम.एल.डी. पाणी कपात करू. मी महासभेच्या सर्व सदस्यांना विनंती करेन की हा जो ठराव आहे तो सर्व संमतीने मंजुर करावा, एम.आय.डी.सीला पैसे दिले जावे. कारण की जर आपण मंजुर करून त्यांना पेमेंट नाही दिले तर सर्वात जास्त त्रास नगरसेवकाला होतो. जर पाणी नाही आले तर प्रभागातील लोक आधी नगरसेवकांकडे जातात. तर हा ठराव पास केला पाहिजे या अटी सह की, उल्हासनगर शहराबाहेर कुणाला पाणी नाही गेले पाहिजे व आपल्या मीटर मोजणीनुसार त्यांना पेमेंट केले जाईल. व शासनाकडे जो आयुक्त साहेब पत्रव्यवहार करत आहेत. शासनाकडुन जर ते चार्ज न भरण्याविषयी सुचना

आल्या तर ५रू. १५ पैसे या दरानेच १५ एम.एल.डी.चे चार्ज भरा तर आपण अंडरप्रोटेस्ट भरू या म्हणजे ते आपल्याला परत मागण्याच्या दृष्टीने सुलभ होईल धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>आयुक्त साहेब या विषयावर म्हणाले की स्टॅण्डींग चार्ज आपण नाही भरले पाहिजे कारण अशी काही नविन सुधारणा त्यात नाही झाली. परंतु का स्टॅण्डींग चार्जेस भरले गेले पाहिजे कारण की यांनी मुख्यमंत्री महोदयांना वचन दिले आहे म्हणुन अंडरप्रोटेस्ट ही रक्कम ते भरत आहेत. परंतु हा शहरावर होणारा अन्याय होईल. तुम्ही शासनाला वचन दिले म्हणुन भरले पाहिजे. आयुक्त साहेब स्वतः म्हणत आहेत की, हे चार्ज भरले नाही पाहीजेत. परंतु मुख्यमंत्री महोदयांकडे वचन दिले आहे त्यामुळे हे पैसे भरले पाहिजे. तर मी हे म्हणु इच्छितो की, हे पैसे भरले नाही पाहिजे. कारण की एम.आय.डी.सी ने असे काही केले नाही की आपण त्यासाठी स्टॅण्डींग चार्जेस भरावे. व दुसरे असे की, हे जे एम.आय.डी.सी वाले आहेत स्टॅण्डींग चार्जेस फक्त उल्हासनगर महानगरपालिकेकडे मागतात. अंबरनाथ नगरपालिका आहे तिथे जर पाणी जास्त दिले तर तिथे स्टॅण्डींग चार्जेस घेतात का? मी आयुक्तांना विनंती करतो त्यांनी हे सर्व स्पष्ट करावे. त्यांनी ही चौकशी केली आहे का? की समजा अंबरनाथ शहरास पाणी जास्त दिले तर त्यांच्याकडुन स्टॅण्डींग चार्जेस आकारतात का?

<u>मा.सदस्य श्री. यादव लालबिहारीः-</u>मा. महापौरजी, आता ९७ एम.एल.डी. व १०२ एम.एल.डी., ११५ एम.एल.डी ही सर्व चर्चा चालली आहे. परंतु ज्या प्रभागात पाणी येत नाही त्यांचे काय तेथिल जनता अशीच राहणार. ज्यात-हेने एक महिना झाला यास्तव तीन सभा स्थगित केल्या गेल्या होत्त्या. त्यांनतर देखिल त्या प्रभागात पाण्याची समस्या जशी आहे तशीच आहे. इथे जेव्हा अधिकारी समवेत मोर्चा आणला जातो. उपोषण केले जाते तर तिथे पाणी जाते. त्यांनतर उपोषण संपले की, पाणी पण जाते. पुन्हा पंधरा दिवसानंतर तसे करावे लागते असे कुठपर्यंत चालणार? जसे प्रभाग क्र. ६ मध्ये ६ दिवसापासुन पाण्याचा बराच त्रास आहे. तिथे सोमवार, मंगळवार, बुधवार तीन दिवस पाणी येते, शुक्रवार, शनिवार, रविवार तीन दिवस पाणी येत नाही. का बंद असते कारण की, अधिकारी सुट्टीवर गेलेले असतात त्यांच्याशी संपर्क साधता येत नाही म्हणुन पाणी बंद असते तर महापौरांना मी विनंती करतो की, आमच्या प्रभागात देखिल पाण्याच्या सुविधेबाबत प्रयत्न करावेत.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>मा.महापौरजी, मा.आयुक्त साहेब असे माहित पडले आहे की, उल्हासनगरमध्ये १ नंबरमध्ये जे जुने एम.बी.आर आहेत. एम.आय.डी.सी तर्फे तेथुन पाणी कमी केले गेले आहे. त्याचे कारण हे सांगितले जाते की, जुन्या एम.बी.आर. मधुन जे पाणी शांतीनगरकडे येते तेथुन ते उल्हासनगर आणि



कल्याण येथे देखिल जाते व कल्याण वाले एम.आय.डी.सी चे बिल वेळेवर भरत नाही त्यामुळे उल्हासनगर शहरवासियांना सफर करावे लागत आहे. तर याची चौकशी केली जावी. यामुळे १ ते ३ नंबर मध्ये पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. व दुसरी एक गोष्ट अशी की, शहराचे करोडो रू. एम.आय.डी.सी.ला देवून देखिल जे एम.आय.डी.सी चे अधिकारी आहेत ते अशारितीने वागतात जणु काही ते उल्हासनगरला दान म्हणुन पाणी देत आहेत. जरा याकडे लक्ष दिले जावे. जेव्हा पण ते कपात करतात. आमचे अधिकारी किंवा नगरसेवक एम.आय.डी.सीकडे जातात त्यांचे म्हणणे ऐकुन घेतले जात नाही. व भिका-यांसारखे आम्ही परत येतो तर एम.आय.डी.सीची ही जी दादागिरी आहे ते कुठपर्यंत चालणार याचा पण खुलासा झाला पाहिजे. दुसरे असे की, नोटीस न देता एम.आय.डी.सी जी कपात करते ती योग्य

आहे का?याचा पण खुलासा करण्यात यावा. माझा असा विचार आहे की, हे एम. आय.डी.सी वाले कधी सुधारणार नाही. म्हणुन ८१ नगरसेवकांनी डोंबिवलीत एम. आय.डी.सीच्या बाहेर आपण एक मंडप मांडून १० ते ५ रोज धरणे दोन नगरसेवकांनी तिथे धरले पाहिजे म्हणजे त्यांना ही भिती असली पाहिजे की आपल्यावरही कुणाचे तरी लक्ष आहे. सर्वांनी डोंबिवलीला जायचे व त्यांना सरळ करायचे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>मा. महापौर महोदय, आयुक्त साहेब, सचिव मी श्री. दिलीप लालवानी यांना परत एकदा विनंती करतो की, मागच्या वेळेस आयुक्तांनी स्वतः इथे सांगितले होते व सभागृहात देखिल ही चर्चा झाली होती की, जी व्यक्ती इथे उपस्थित नाही ज्यावर टिप्पणी करणे चुकीचे आहे. जो स्वतःचे स्पष्टीकरण देवू शकत नाही अशा लोकांचे नाव इथे घेवून त्यावर टिप्पणी करणे चुकीचे आहे. मा. आमदार श्री. साबीरभाई शेख यांचे नाव घेवून आपण जी टिप्पणी केली की ते आयुक्तांकडे गेले त्यांनी आयुक्तांवर दबाव आणला तेव्हा आयुक्तांनी त्यांना उत्तर दिले की, मी नाही देवू शकत हे तुम्हाला माहित होते का? तुम्हाला हे कसे माहिती पडले तुम्ही त्यांच्या सोबत होता का?
(श्री. दिलीप लालवानी बोलण्यासाठी उभे असताना) एक मिनिट आधी माझे बोलणे पुर्ण होवू दया. आमदार लोकांचे प्रतिनिधीत्त्व करतो त्यांच्या मतदान संघात जे पण लोक येतात त्यांच्या अडचणीचे प्रतिनिधीत्त्व ते करतात. त्यांच्या समस्या नेणे त्यावर मार्ग शोधणे हे त्यांचे कर्तव्य आहे मला नाही वाटत ते चुकीचे आहे. आमदार उल्हासनगरच्या आयुक्तांकडे आले काय किंवा अंबरनाथच्या मुख्य अधिकारीकडे गेले काय त्यांना तर तिथे जायचे आहे कारण त्यांचे तर ते कर्तव्य आहे. त्यांची मागणी काय होती? त्यांच्यासोबत मी पण होतो. एखादा आमदार येतो तर त्याांना मान देणे हे आमचे कर्तव्य आहे. त्यांनी आयुक्तांना हे सांगितले होते की जेव्हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उल्हासनगरमध्ये कार्यरत होते. तेव्हा या गावांना एम.जे.पी. तर्फे पाणी पुरवठा केला जात होता. त्यांना वेगळा असा मार्ग नाही म्हणुन आपणांस विनंती करतो की, आपल्या येथुन पाणी दया. त्यांचे बिल ते भरतील. आमचे आधीचे आयुक्त श्री. आर.डी. शिंदे साहेब होते. त्यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली होती. त्यावर त्यांनी आमदार निधी मंजुर करून जी योजना आहे त्याला मंजुरी दिली होती. त्यानुसार त्यांनी परत श्री. पोखरकर साहेबांकडे येवून विनंती केली त्यांनी जे मान्य केले त्याचे काय हे विचारल्यानंतर ते काही चुकीचे नाही. देणे अगर न देणे हे उपलब्धतेवर अवलंबून आहे. आपल्याकडे किती क्षमता आहे. त्या हिशोबाने आयुक्त पोखरकर साहेब निर्णय घेतील. दुसरे असे की, इथे पोखरकर साहेब जे म्हणाले स्टॅण्डींग चार्जेस विषयी त्याविषयी श्री. राज असरोंडकर सदस्य आहेत त्यांनी काही प्रश्न उपस्थित केले की ९७ किंवा ९८ एम.एल.डी. पाणी मिळाल्यानंतर जो त्रास होता तो त्रास १०८ व ११३ एम.एल.डी. पाणी मिळाल्यानंतरही आम्हास होत आहे. त्याचे उदाहरण मागील महासभेत दिले होते. आयुक्त साहेब, ११० एम.एल.डी. व ११३ एम.एल.डी किती महिन्यापासुन पाणी आपल्याला मिळते.
<u>मा.आयुक्त (श्री. बा.र. पोखरकर):-</u>सहा महिने.



<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>त्यानंतरही सत्ताधारी पक्षाने मागील दोन महासभेत पाण्याच्या समस्येचा मुददा उचलुन सभा स्थगित केल्या होत्त्या. म्हणजे ९७ ते ९८ एम.एल.डी. पाणी असून देखिल जेवढा त्रास नव्हता तेवढा त्रास १०८ -११३ एम. एल.डी. मिळाल्यानंतर आम्हाला होत आहे. असे सत्ताधारी पक्षाचे म्हणणे होते म्हणजे ११३ व १०८ एम.एल.डी. पाणी मिळून सुध्दा शहराची समस्या कमी होत नाही.

याचा अर्थ श्री. राज असरोंडकरांनी जो मुददा उपस्थित केला होता की पाण्याची वितरण व्यवस्था बरोबर नाही ती बरोबर झाली पाहिजे. जो खर्च आम्ही एम.आय.डी.सी ला देवू स्टण्डीग चार्जेस जसे श्री. प्रमोद टाले यांनी १३ कोटी कॅलक्युलेशन करून सांगितले की एम.आय.डी.सी. ला देत आहोत ते डिनाय करून ब्लॅकमेलिंग जी एम.आय.डी.सी. आपल्या बरोबर करत आहे. तो न करता जो खर्च त्यांना दयायचा आहे तो वितरण व्यवस्थेवर केला जावा व आमचा स्टॅण्डीग चार्जेस भरण्याविषयी विरोध आहे. उल्हासनगरमध्ये कुणी तरी कमिटमेंट दिले आहे ते कमिटमेंट योग्य आहे अयोग्य आहे ते न पाहता ते पुर्ण करणे जसे श्री. किशोर वनवारी म्हणाले की एम.आय.डी.सी आपले म्हणणे पुर्ण करत नाही. तर आपल्यालाही हे बंधनकारक नाही की आपले कमिटमेंट पुर्ण केले जावे. जर एम.आय.डी.सी. ने आपले स्वतःचे कमिटमेंट पुर्ण केले जे मा. मुख्यमंत्री महोदयांनी त्यांना चार्जेस कमी करायला सांगितले होते ते जर त्यांनी मान्य केले तर यावर आम्ही विचार करू अशी मी सर्व महासभेला विनंती करते.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>मा. महापौर महोदया, जसे आमचे सन्माननिय सदस्य व मित्र श्री. धनंजय बोडारे म्हणाले की, जो पण व्यक्ती या सभागृहात उपस्थित नाही त्याचे नाव घेतले जावू नये. मी अंबरनाथचे आमदार मा. साबीरभाई शेख यांचा उल्लेख जरूर केला आहे, कोणत्त्याही असभ्य भाषेचा वापर नाही केला व जेव्हा एखादा मुददा निर्माण होतो तर त्यात काही ना काही उल्लेख केला जातो व तो उल्लेख खरा आहे की ते आपल्या कार्यालयात आले होते व चार इंचाची जी लाईन उल्हासनगरच्या कोटयातुन कल्याणकडे जात आहे ते सत्त्य आहे. ते जनप्रतिनिधी आहेत आपल्या क्षेत्रासाठी भांडत आहेत. त्यांच्या भावनेची आम्ही कदर करतो परंतु आम्ही आपल्या क्षेत्रासाठी भांडलो हे आमचे कर्तव्या आहे ते आम्ही करू. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>मा. महापौरजी, मी आधी एक प्रश्न आयुक्तांना विचारला होता की किती एम.एल.डी. पाण्याचे स्टॅण्डीग चार्जेस आपल्याला भरायचे आहेत. कारण की आपण बिल पाहिले तर तीन महिन्याचे जे बिल आहे ते आपण सांगितले की ५८ लाख आहे तर आपल्याला किती स्टॅण्डीग चार्जेस भरायचे आहेत. ५८ लाख जर तीन महिन्याचे आहे. तर वर्षाचे स्टॅण्डीग चार्जेस तुमचा जो गोषवारा आहे त्यानुसार भरले तर वर्षाला २ करोड पेक्षा जास्त रक्कम होते. २ करोड ब्लॅकमेल म्हणुन आपण भरत आहोत. कारण की एम.आय.डी.सी आपल्याला ब्लॅकमेल करत आहे. आपल्यावर दबाव टाकत आहे. त्यापुढे आपण वाकुन ते भरायचे ते एकदम चुकीचे आहे. याउलट आपण पुर्ण राजकीय नेत्त्यांनी याची मनाई केली पाहिजे. की आम्ही पैसे भरणार नाही पाहिजे तर मा. मुख्यमंत्री वा इतर कुणी अधिकारी असेल त्यांच्याशी आपण भांडले पाहिजे की आम्ही हे अनावश्यक ओझे मग ते भले अंडरप्रोटेस्ट रूपात असो वा इतर कोणत्त्या रूपात ते आपण दिले नाही पाहिजे. अशी माझी सर्वांना विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>आयुक्त साहेब मला एक शंका आहे. इथे बाजुच्या गांवाविषयी जी चर्चा चालली आहे. मगाशी मी एम.जे.पी चा मुददा उपस्थित केला होता. एम.जे.पी. कडुन महानगरपालिकेकडे हस्तांतर करताना ज्या गावांना व ज्या ग्रामपंचायतीना आम्ही वितरण करतो पाणी देतो. त्यांचे पाणी कपात करावे की त्यांना चालु ठेवावे असे अॅग्रीमेंट मध्ये आहे का? मला वाटते की तेव्हा एम.जे.पी. चे महानगरपालिकेचे किंवा महानगरपालिकेचे हस्तांतर करताना त्या गावांना

त्यांची गैरसोय होवू नये म्हणुन त्यांचा पाणी पुरवठा कायम करावा असे ॲग्रीमेंट मला वाटते महानगरपालिकेने किंवा नगरपालिकेने लिहुन दिले आहे तेव्हा ते ॲग्रीमेंट असणार आहे. असे आहे का? जर नसेल तर करायला काहीच हरकत नाही. पण असेल तर त्यांच्यावर अन्याय सुध्दा होता कामा नये कारण पाणी ही जीवनावश्यक बाब आहे.

<u>श्री. डेग्मंवार (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-</u>उल्हासनगर पाणी पुरवठा योजना ज्यावेळेला नगरपालिकेने ताब्यात घेतली त्यावेळेला असे धोरण ठरले होते की, उल्हासनगर मधुन ज्या गावांना पाणी पुरवठा होत आहे त्यांना पर्यायी व्यवस्था जोपर्यंत उपलब्ध करून मिळत नाही तोपर्यंत उल्हासनगरच्या कोटयातुनच पाणीपुरवठा चालु ठेवावा असे नमुद आहे. परंतु आता आशाळे, माणेराचा जो सध्या मुददा चालु आहे त्यामध्ये पुर्वीचे आयुक्त साहेबांनी त्यांना असे कळविले होते की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जी चार इंचाची लाईन दिली आहे. त्याच्यामध्ये जो होणारा पाणी पुरवठा आहे तो यापुढेही तुम्ही कंन्टीन्यु करू शकता, त्याला व्हॉल बसवा. वितरण व्यवस्थेनुसार नविन नळ जोडणी जोडुन घ्या. ज्या पध्दतीने बसविता येईल त्याला आमची काही हरकत नाही. फक्त आमची हरकत यावर आहे की ,सद्या घटकेला जी नविन नळजोडणी ती मागत आहे. त्यासाठी माजी आयुक्तांनी देखील परवानगी दिलेली नाही. त्यांनी सांगितले की, जुन्या नळजोडणीतून जो पाणी पुरवठा चालु आहे त्याच्यामध्ये फेरफार बदल करायचा असेल तर त्याला काही हरकत नाही. अशाप्रकारे आहे.

मा. सदस्या श्रीमती. नीना नाथानी , श्री. सुरेश जाधव व श्री. राजु इदनानी हे सायंकाळी ५.४५ वाजता सभागृहातून बाहेर पडले.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः</u>- डेग्मंवार साहेब म्हणजेच जोपर्यंत त्यांची पर्यायी व्यवस्था होत नाही, आम्ही त्याचे पाणी कनेक्शन कट करु शकत नाही.

<u>श्री. डेग्मंवार (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):</u>-हों

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :-</u> जोपर्यंत पर्यायी व्यवस्था होण्यासाठी त्यांच्यावर जर काही दबाव टाकला तर ते काही करतील. नाहीतर त्यांना पाणी मिळत राहिले तर ते कशाला पर्वा करतील. कोटा उल्हासनगरचा बिल न भरता ते लोक पाणी घेत आहे, जोपर्यंत आपण बोलणार नाही, प्रशासन त्यांच्यावर दबाव टाकणार नाही, ते पर्यायी व्यवस्था कशाला करतील? यासाठी महापालिकेने काहीतरी ठोस पाऊल उचलतात अशी ही आम्ही आशा करतो ,धन्यवाद.

<u>श्री. डेग्मंवार (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-</u> आणि याबाबतीत आम्हांला आणखीन पुन्हा सांगाव लागत की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे ज्यावेळी हे बिल त्यांच्याकडे होते. दोन कोटीचे वरती थकबाकी त्यांच्याकडे आहे, त्यामुळे आम्ही त्यांना असा आग्रह करुन आलो की, त्यांनी जे सुचविले की आपण जे पुन्हा त्यांना पैसे देण्यासाठी, कनेक्शन देण्यासाठी त्यांना आपण काही प्रेशराईज करायला पाहिजे ,आपणही ही मागणी त्यांना करुन आलो आहे की आमचे एरिअस असतांना तुम्ही आमच्याकडुन पाण्याची सोय मागता, त्याचा भुदंड महानगरपालिकेने भरायचा?कनेक्शन त्यांना दयायचे आणि आपण त्याचा भुदंड भरायचा?, एम.आय. डी.सी.कडुन डी.पी.डी.सी. चार्जेस आपण भरायचे?तर ही भुमिका काही योग्य नाही आहे. त्याच्यामुळे चार्जेस त्यांनी भरायचे आणि नंतरच त्यांना नविन त्यांची जी प्रस्तावित लाईन आहे, जुन्या नळजोडणीला जोडण्याची परवानगी देऊ. अशी भुमिका आयुक्त साहेबांनी व आम्ही घेतलेली आहे.

मा. सदस्या श्रीमती. किरण माखिजा हया सायंकाळी ५.४६ वाजता सभागृहातून बाहेर पडल्या.

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u> आभारी आहे, यांनी ही जी गोष्ट स्पष्ट केली, खुप चांगली गोष्ट आहे. ही गोष्ट स्पष्ट झाली पाहिजे, खूप दिवसांपासून नगरसेवक बनण्याच्या आधीपासून आम्ही धनुष्यधारी पेपरच्या माध्यमातून छापतो की, हे जे पाणी कल्याणमध्ये जात आहे, त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला जावा.*

--२४--

*जर एम.आय.डी.सी. शहराचा पाणी बंद करु शकते तर आपण पण असे करु शकतो.*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> महापौरजी, हा संवाद नाही आहे. किंवा हे वर्तमानपत्र नाही आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> मा. महापौरजी ह्या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे. पूर्ण गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत. आता मी दिलीप लालवानी यांना मी प्रार्थना विनंती करतो की, यापूढे आपण कोणत्त्याही विषयी एकाच वेळी बोलावे. आणि मी बोडारे यांना सुध्दा सांगतो की, ते पण आज दोन-तीन वेळा बोलले ह्या विषयावर..... त्यांना पण विनंती करतो की कोणत्त्याही सदस्याला एक विषयाच्यावर आपले मत मांडायचे असेल तर एकाच वेळी मांडावे. जर केव्हापण आठवण येईल आणि तो सांगण्यास उभा राहिल तर कुठलाही सदस्य तो रुलिंगचा असो, विरोधी पक्षाचा असो, बोडारेजींनी जे सांगितले की, शबीरभाई शेख बददल जे दुःख झाले मी आता मा. महापौरजींना विनंती करतो की, जसे आयुक्त साहेबांनी विनंती केली होती, सदनाला की, जर एखादा आपत्तीजनक शब्द आहे, त्याला काढुन टाकले जावे, तर आमचे मा. शबीरभाई शेख आमदार साहेब बददल असा काही शब्द दिलीपभाईंनी पण बोलला असेल तर, तर तो पण इतिवृत्तातून काढुन टाकला जावा.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :-</u> असा काही शब्द बोलला गेला नाही आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> का नाही बोलला? असा काही शब्द का नाही बोलला गेला आहे जसे श्री. दिलीप लालवानी ने म्हटले की, दिलीप लालवानीने स्पष्ट केले की, यांनी कोणताही चुकीचा शब्द वापरलेला नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u> जर ते बोलले नसतील तर नाही काढले जाणार यात काय मोठी गोष्ट आहे?*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> दुसरे असे की, आता जे आमचे कार्यकारी अभियंता यांनी स्पष्ट केले की, जो त्यांच्याबरोबर करार झाला आहे की, जोपर्यंत त्यांना दुसरा पर्याय मिळत नाही तोपर्यंत ही लाईन चालु राहिल. परंतु त्यांच्याकडे आपले जे करोडो रुपये शिल्लक आहे त्याचा काही मुददा आहे का? किती दिवसांपासून कल्याण-डोंबिवली महानगरपालिका जर नाही भरत तर ते पण कट करतील? जसे एम.आय.डी.सी. ला आम्ही पेमेंट करत नाही, तर लवकरात लवकर लाईन कट करतात. तर त्याचा पण मुददा आला पाहिजे. एक आठवडा, पंधरा दिवस. पाणी कल्याण महानगरपालिकेतील लोक पितील व उल्हासनगरतील महानगरपालिका पैसे भरेल हे चूकीचे आहे. त्याचा पण टाईम लिमिट या सदनात फिक्स झाला पाहिजे. कल्याण डोंबिवली महानगरपालिका जर एक अठवडा-पंधरा दिवस पेमेंट देत नाही तर त्यांचे पाणी कट केले जावे. व त्यानंतर मी म्हणेन की या विषयावर भरपुर चर्चा झाली आहे तर हा विषय मंजुर केला जावा. व आता आमच्या विरोधी पक्षाच्या सर्व सदस्यांना लवकर जायचे आहे. गणपती उत्त्सव कार्यक्रम आहे म्हणुन आम्ही प्रश्नोत्त्तरे रदद केली खुप उशिर झाला आहे. म्हणुन लवकर पास केले जावे. धन्यवाद.*

__मा.सदस्या श्रीमती. कमला शर्मा:-__हे जे स्वच्छता अभियान सुरू केले आहे आम्हाला त्याबाबतीत काही माहिती मिळाली नाही व दुसरी गोष्ट आमचे क्षेत्र वगळले गेले आहे. सिरू चौक ते खेमाणी पर्यंत मेन रोड नाही का? खेमाणी ते डंम्पींग ग्राऊंड पर्यंत मोठमोठे ट्रक कचरा करून जातात तो काय मेन रोड नाही का? व भाजी मार्केट बाजुला किती  कच-यांचे ढिग पडले आहेत सर्व आजार तिथुनच पसरतात. धनुषधारी मध्ये मी वाचले आहे तिथुन आम्हाला माहिती मिळाली आहे. महापालिकेतर्फे आम्हाला काहीही माहिती मिळाली नाही. आता मी तुम्हाला



सांगते की आमच्याकडे पण मेन रोड आहे आजार तिथुन पसरतात आणि आपण लक्ष देत नाही.

__मा. महापौरः-__आपल्याला याविषयी पाणपट्टे साहेब पुर्ण माहिती देतील.

__मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-__मा. महापौर साहेब, आम्हाला सचिव साहेबांकडुन माहिती पाहिजे की आम्हाला एकदाच बोलण्याचा अधिकार आहे का? वारंवार तुम्ही बोलता असे हे लोक बोलतात, असा काही नियम आहे की, एकदाच बोलायचे, याविषयी मी पुढच्या महासभेत प्रश्न टाकतो त्यात उत्तर दया.

__मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-__आयुक्त साहेबांनी दोन-चार जे प्रश्न आहेत त्यावर उत्तर दयावे.

मा. सदस्य श्री. श्यामसुंदर रोहडा, श्री. नाना पवार, श्रीम. निता आहुजा हे सायंकाळी ७. ७० वाजता सभागृहातून बाहेर पडले.

__मा.सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-__मा. महापौरजी, उपमहापौरजी व आयुक्त साहेब, आता चर्चा चालु आहे पाण्याविषयी शहाड येथे जो मोठा वॉटर पंप लावला आहे त्याच्याबाजुला एक नाला आहे त्या नाल्याच्या बाजुला आमचे किर्ती पथ आहे व किर्तीपथ मध्ये जे लोक राहतात त्यांना एक थेंब पाणी येत नाही.

__मा. सचिवः-__कृपया माईकमध्ये बोलावे. आवाज कमी येत आहे.

__मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-__काल मी तिथे गेले होते मला मोठया दुःखाने म्हणावे लागते की, तिथे नळाला एक थेंब पाणी नाही फक्त भांडी लावून ठेवली होती.  हे पहा ज्या जागेतुन पाणी पुर्ण उल्हासनगर शहरास जाते व तिकडे शेजारच्या लोकांना अजिबात पाणी नाही. गणपती उत्त्सवात त्या लोकांचे काय हाल झाले असतील तर महापौरजी आपण एकदा तिथे जावून आलात तर खुप चांगले होईल.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी, श्रीम. भावना खिलनानी, श्रीमती कोमल भठिजा हे सायंकाळी ७. ७१ वाजता सभागृहातून बाहेर पडले.

__मा. महापौरः-__कल्याणवाल्यांनी जर पंधरा दिवसात पैसे नाही भरले तर त्यांचे कनेक्शन कापले जातील, व नवीन कनेक्शन पण त्यांना दिले जाणार नाही.

__मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-__आयुक्त साहेबांनी दोन-चार गोष्टीचा खुलासा करावा.

__मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-__मा.महापौर महोदया, हा जो प्रस्ताव सन्माननिय सभागृहासमोर ठेवला आहे त्याविषयी सन्माननिय सदस्य श्री. राज असरोंडकर, श्री. प्रमोद टाले, श्री. बच्चाराम रूपचंदानी, सभागृह नेता श्री. किशोर वनवारी, श्री. अशोक ठाकुर, श्री. लाल पंजाबी, श्री. धनंजय बोडारे व श्री. दिलीप लालवानी या सदस्यांनी काही मुददे उपस्थित केले त्याचा एकत्रित खुलासा मी करू इच्छितो एक

मुददा असा होता की, उल्हासनगर शहराला सध्या स्थितीत जो पाणी पुरवठा आहे तो पुरेसा आहे काय? मी सभागृहात वारंवार सांगितले आहे की ९८ एम.एल.डी पुरेसे आहे परंतु जलकुंभ वितरण व्यवस्था बरोबर नसल्याने आपली टोकोग्राफी किंवा क्षेत्र उंचसखल असल्याकारणाने खुप नुकसान होते. पाण्याचे नुकसान होते यामुळेच आपल्याला जास्त पाणी पुरवठयाची गरज आहे जे आपण स्टॅण्डींग चार्ज भरून घेवू इच्छितो. दुसरा एक मुददा होता की, पाणी पुरवठयाचे मोजमाप बरोबर होते किंवा नाही. एम.आय.डी.सी. जितके पण टॅपींग पॉइंटस आहेत तिथे एम.आय.डी. सीचे. मीटर होते परंतु ते मीटर कधी कधी बंद असायचे व एम.आय.डी.सी चे मीटर असल्याकारणाने ते जे रिडींग देतील त्यावर विश्वास ठेवावा लागायचा म्हणुन उल्हासनगर महानगरपालिकेने एक दोन महिन्यापुर्वी आपण एम.आय.डी.सी वर अवलंबून राहू नये आपल्याला जे पाणी पुरवठा दिला जातो त्यावर विश्वास नाही ठेवला पाहिजे त्यास्तव आम्ही स्वतःचे मीटर खरेदी केले



आहे. व मला असे वाटते की, सात दिवसाच्या आत सर्व टॅपिंग पॉइंटवर आपले मीटर बसविले जातील ही मोठी उपलब्धी असेल की जेथुन आपण निश्चित स्वरूपात भाष्य करू शकु की आम्हाला इतके एम.एल.डी. पाणी येते परंतु मीटर बसविण्याचा ठेका ज्यांना दिला गेला त्या ठेकेदाराने अट ठेवली की त्यांचे आधीचे जे प्रलंबित बिल आहे ते दिले जावे. प्रत्त्येक ठेकेदार असे करतो, नविन ठेका घेताना तो आधीच्या बिलाची मागणी करतो. व त्यावर अवलंबून असतो. काही होवो सात दिवसात ते मीटर फिक्स केले जातील त्यानंतरच आपण दाव्यासहित सांगु शकतो की आपल्याला किती पाणी मिळते. दुसरा मुददा असा होता की, अंडरप्रोटेस्ट भरणे योग्य आहे की नाही. मला वाटते यात काही चुक नाही आपण तर आपले बिल भरत आहोत मग ते अंडरप्रोटेस्ट असो वा नसो. तो मुददा इनमटेरियल आहे. तो मुददा नाही. एम.आय.डी.सी. ला बिल मिळणे हा मुददा आहे अंडरप्रोटेस्ट भरण्यास काही अडचण नाही. दुसरा मुददा असा होता की, उल्हासनगरच्या आजुबाजुच्या क्षेत्रात जेवढी गावे आहेत त्यांना पाणी पुरवठयाबाबतीत प्रश्न होता. याबाबतीत मी पुर्व पिटीका किंवा इतिहास सांगु इच्छितो. १९९४मध्ये पाण्याची वितरण व्यवस्था एम.जे.पी कडे होती. त्याचवेळी आमच्या उल्हासनगरच्या बाजुच्या गावांना एम.जे. पी. पाणी पुरवठा करत असेल त्याचवेळी असे ठरले होते की, पाणी पुरवठा तिथुनच व्हावा. आधी पासुन तिथुन पाणी पुरवठा होत आहे, आपण पण त्यांना पाणी पुरवठा करत आहोत. आपण तर पाणी कमी नाही करू इच्छित, बाधा आणु इचिछत नाही. आयुक्तांनी पण तसे पत्र दिले आहे, पाणी पुरवठा आधीपासुन होत आहे ते थांबवणे योग्य नाही. जितका पाणी पुरवठा केला जातो.तेवढाच केला जाणार त्यापेक्षा जास्त पाणी पुरवठा नाही कारण की आपल्याकडे पण समस्या आहे आमची भुमिका ही आहे की, तो पाणी पुरवठा थांबवणे किंवा कमी करणे योग्य ठरणार नाही. आधीच्या आयुक्तांनी तसे कमिटमेंन्ट दिले आहे. त्यावर आपण काही कपात करणे योग्य ठरणार नाही. परंतु त्यांनी त्यांच्याकडे जी थकबाकी आहे ती घेण्याचा आपण पुर्ण प्रयत्न करू. व ते आवश्यक आहे. दुसरी गोष्ट अशी की सन्माननिय सदस्यांनी पाण्याचा त्रास दुर करायला सांगितले आहे. मी आपणांला सांगु इच्छितो व वचन देवू इच्छितो. आम्ही तर पुर्ण प्रयत्न करत आहोत. परंतु काही अडचणी आहेत आम्हाला थोडेसे यश मिळाले आहे. पुर्ण यश मिळाले नाही परंतु या समस्येचे कारण आपल्या समोर आहे व वारंवार ते सांगणे देखिल उचित नाही. तरी आम्ही प्रयत्न करू आम्ही वचनबध्द आहोत. चांगल्या त-हेने पाणी पुरवठा झाला पाहिजे . आम्ही वारंवार एम.आय.डी.सी. ला विनंती केली आहे की त्यांना जेव्हा पण पाणी कपात करायची असेल त्यांनी आम्हाला आधीच सांगावे परंतु खरे तर ते विना नोटीसच ते कित्त्येकदा पाणी कमी करतात आम्हाला त्यामुळे अडचण येते त्यासाठी पण आम्ही एम.आय.डी.सी.शी सतत संपर्क साधतो. आता श्री. लाल पंजाबी साहेब म्हणाले की

किती एम.एल.डी. पाणीचे ५८ लाख त्यांनी फिगर सांगितली ती तर ॲक्युमलेटेड फिगर आहे. समजा आपल्याला १३ ते १५ एम. एल.डी. जास्त पाणी पुरवठा होतो जसे मी म्हंटले की, प्रत्येक एम.एल.डी. चे प्रत्सेक महिन्याला एक लाख सहा हजार बिल होते तर १५ एम.एल.डी.चे जवळ जवळ १६ लाख असे काही बिल असते. ५८ लाख ही तीन-चार महिन्याची ॲक्युमलेटेड फिगर आहे.मला असे वाटते की, अंडरप्रोटेस्ट दिल्याने आपल्याला काही अडचण येणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> आमचा विरोध आहे.

<u>मा. महापौर :-</u> सदरचा प्रस्ताव मतदानासाठी टाकत आहे.

<u>मा. सचिव :-</u> जे या प्रस्तावाच्या बाजूने आहेत त्यांनी हात वर करावेत. ३४.....

१९. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२०. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
२१. श्रीमती. पाल आधारी राजाराम



२२. श्री. ऐडके गणपत गोविंद
२३. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
२४. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
७ श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
८ श्रीमती. गुप्ता आशा प्रभुनाथ
९ श्री. निकम शांताराम ओंकार
१० श्री. ठाकुर विनोद लालसिंग
११ श्री. विनोद तलरेजा
१२. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
१३. श्रीमती. वनवारी मोना अशोक
१४ श्री. वनवारी किशोर नारायणदास
१५. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
१६. श्री. खेमाणी दर्शनासिंग देवेंदसिंग
१७ श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल
१८ श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
१९ श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
२०. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
२१. श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश
२२. श्रीमती. भारती पहलाज छाब्रिया.
२३. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
२४.श्री. टाले प्रमोद नामदेवराव
२५ श्री. साधवानी मोहन
२६ श्रीमती. साधवानी जया
२७ श्री. भालेराव गौतम यशवंत
२८ श्रीमती. वसिटा बेबी
२९ श्री. ठाकुर अशोक भगवानदास
३० श्री. बेहरानी मोहन वर्यलदास
३१ श्रीमती. करोतिया मालती राधाचरण
३२ श्री. बेहरानी ठाकुरदास वर्यलदास
३३ श्री. रुपानी चिमन

३४ श्री. होशियारसिंग लबाना

<u>मा. सचिव:-</u> जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वर करावेत. १७........

१९. श्रीमती. जावळे संगिता रमेश
२०. श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास
२१. श्रीमती. मोकल सिमा चंद्राराम
२२. श्री. उमाप रामदास राघोजी
२३. श्री. पुरस्वानी जमनादास खुपचंद
२४. श्री. रूपचंदानी बच्चाराम बाशोमल
२५. श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग
२६. श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश
२७. श्री. यादव लालबिहारी बुझारत
१० श्री. भुल्लर राजेंद्रसिंग विरसिंग
११ श्री. सोनावणे नथु
१२ श्री. गायकवाड दिलीप
१३ श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
१४ श्री. चव्हाण रमेश महादेव
१५ श्री. बोडारे धनंजय बाबुराव
१६ श्री. पाटील विश्वनाथ गौतम
१७ श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल

--२८--

<u>मा. महापौर :-</u> सदरचा प्रस्ताव बहूमताने पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय:-</u> महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास वाढीव पाणी पुरवठा पोटी स्टॅण्डीग चार्जेस भरणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर महानगरपालिका, म. औ. वि. महामंडळाकडून पाणी विकत घेवून उल्हासनगर शहरास पाणीपुरवठा करते, उल्हासनगर पाणी पुरवठा योजना दि. १९. १२.१९९४ पासून उल्हासनगर पालिकेने, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाकडून ताब्यात घेतलेली असून तेव्हापासुन ९९. ७७ एम.एल.डी. एवढया पाणी पुरवठयाचे परिमाण मंजुर आहे, परंतु महानगरपालिका सध्या अंदाजे १०८ ते ११३ एम.एल.डी. एवढे पाणी घेत आहे. म्हणजेच मंजूर परिमाणापेक्षा जास्त पाणी घेत आहे, म्हणुन म.औ.वि महामंडळाने मार्च २००२ या महिन्यापासून स्टॅडिंग चार्जेस भरणेबददल त्यांचे इंग्रजीपत्र क्र.प्री. ए.-४/१४२८ दि. २३.५.२००२ नुसार कळविले आहे. व त्यासाठी रू. १,०६,२२०/- प्रति एम.एल.डी. प्रति माह स्टर्णडीग चार्जेसच्या देयकाची मागणी केलेली आहे. जर उल्हासनगर महानगरपालिका सदर चार्जेस भरण्यांस तयार नसेल तर उल्हासनगर महानगरपालिकेस मंजूर परिमाणा प्रमाणेच(९७. ७७ एम.एल.डी.) पाणी देण्यात येईल, असे कळविले आहे.

दि. ८.७.२००२ व दि. ९.७. २००२ रोजी म.औ.वि. महामंडळाच्या अधिका-यांबरोबर, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) उमपा यांची चर्चा झाली त्यानुसार म.औ.वि महामंडळाने पाणी देयक व स्टॅडिंग चार्जेस देयकासाठी वेगवेगळे धनादेश देण्याची मागणी केलेली आहे.

म.औ.वि. मंडळाने मार्च २००२ ते जुन २००२ पर्यंत एकूण रू. ५८,७३,७५३ स्टॅण्डिंग चार्जेस ची देयके सादर केलेली आहेत. उल्हासनगर महानगरपालिकेने १

ऑगस्ट २००१ पर्यंत सदर चार्जेस देयके अदा न केल्यामुळे म. औ.वि. महामंडळाने २ ऑगस्ट २००१ पासून पाणी कपात केली म्हणुन स्टॅण्डींग चार्जेसची रक्कम मुळ देयकात समायोजित करण्याचे हक्क कायम ठेवून नाईलाजास्तव (न्दकमत चतवजमेज) रू. २८ लाखाचा धनादेश म.औ.वि. महामंडळास देण्यात आला.

तरी पाणी कपात टाळणेसाठी स्टॅण्डींग चार्जेस देयक रू. १,०६,२२०/-प्रति एम.एल.डी. प्रति माह वेगळया धनादेशाने म. औ. वि. महामंडळास अदा करणे बददलचा प्रस्ताव महासभेच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. २९</u> <u>दिनांक:-१९.९.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. भालेराव गौतम

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास वाढीव पाणी पुरवठ्यापोटी स्टॅण्डींग चार्जेस देयक रू. १,०६,२२०/- प्रति एम.एल.डी. प्रतीमहा देणेस मान्यता देत आहे.

परंतु---

१. वरील प्रस्तावात काहीही अंतर्भूत असले तरी, स्टॅण्डींग चार्जेस परतावयाची मागणी व मूळ पाणीपट्टी देयकात समायोजित करण्याचे हक्क प्रस्थापित करता येईल.



२. शहराबाहेर आयुक्त कोणत्त्याही स्थानिक प्राधिकरणास किंवा व्यक्तीस महानगरपालिका जलव्यवस्था यंत्रणेतुन पाणी पुरवणार नाही.

३. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास पाणी पुरविणेसंबंधी देय असलेली रक्कम महानगरपालिकेच्या मीटर मोजणी प्रमाणे देता येईल.

४. सध्या शहराबाहेर किंवा कल्याण क्षेत्रात कोणत्त्याही स्थानिक प्राधिकरणास किंवा व्यक्तीस महापालिका जलव्यवस्था यंत्रणेतुन पाणी पुरविणे बददल देय असलेल्या रक्कमेसंबंधी मागणीची नोटीस योग्य रितीने बजावण्यात आल्यानंतर एक महिन्याच्या आत देण्यात कसूर करण्यात आली तर पाणी बंद करणेचा अधिकार आयुक्तांस राहील.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>बहुमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :-</u> विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

<u>काही सदस्यः-</u> पास-पास......

<u>मा. महापौर :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

- <u>विषयः-</u> श्री. पंचम विश्वकर्मा, विदयुत लिपिक, यांचे खाते निहाय चौकशी प्रलंबित निलंबन आदेश कायम करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

श्री. पंचम विश्वकर्मा विद्युत लिपीक हे श्रीमती. सोनादेवी हायस्कुल ॲन्ड ज्युनियर कॉलेज ॲन्ड डिग्री कॉलेजचे ट्रस्टी उपाध्यक्ष असल्याने सदर संस्थेस शासनाची मंजुरी नसल्यामुळे विद्यार्थ्यांकडून प्रवेश फी, विद्यार्थी फंड व इतर फी चे स्वरूपात पैसे घेवून विद्यार्थ्यांना सन २००१ या शैक्षणिक वर्षात परिक्षा पासून वंचित ठेवून त्यांची फसवणुक केल्यामुळे त्यांचेवर गुन्हा रजि. नं. ३०/२००२ भा.दं.वि. कलम ४६५,४६८,४२०,४७१,३४ प्रमाणे दि. २६.२.२००२ रोजी १३. ५० वा. दाखल झाला असता सदर गुन्हयात त्यांना दि. ४.३.२००२ रोजी १३. ०५ वा. अटक करण्यात आली होती व दि. ८.३.२००२ रोजी पोलिस रिमांड घेण्यात आली होती.

--३०--

सबब म.ना. सेवा (शिस्त व आपिल) प्रकरण २ नियम ४ पोट नियम २ अ नुसार ४८ तासापेक्षा जास्त कालावधीसाठी पोलिस कोठडीत असल्यामुळे श्री. पंचम विश्वकर्मा, विद्युत लिपिक यांना कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टै-५/१६/०२ दि. १० मे, २००२ अन्वये सेवेतुन तात्त्काळ निलंबित करणेत आलेले ओह.

मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१)(ब) नुसार सदर प्रकरण महासभेपुढे ठेवून निलंबन कायम करणेसाठी प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ३० <u>दिनांकः-१९.९.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. अंकुश म्हस्के

अनुमोदकाचे नाव :- श्री. होशियारसिंग लबाना

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. पंचम विश्वकर्मा विद्युत लिपिक यांना आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे निलंबनाधिन ठेवणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिवः-</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

<u>काही सदस्यः-</u> पास-पास......

<u>मा. महापौर :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>आयत्त्यावेळचा विषयः-</u>

<u>विषयः-</u>निरूपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्याकरीता मागविलेल्या निविदेस मंजुरी मिळणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

सादर करण्यात येत आहे की विद्युत विभागा मार्फत निरूपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यासाठी ३ वर्तमान पत्र म्हणजे फी प्रेस (इंग्रजी), नवशक्ती (मराठी), नवभारत (हिंदी)यात निविदा सुचना देवून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या.



त्यांच्या प्रतिसादास १. श्री. राम नारायण पांडे, २ मे. एस.आर.ट्रेडेर्स, ३. श्री. रफिउल्हा खान, ४. श्री. नसीबदार बहादुर शेख, ५. मे. हसमुदिन इन्टरप्राईजेस, ६. श्री. शेख शालेह, ७. मे. शाहा इंन्टरप्राईजेस, ८. श्री. जहांगीर खांन, ९. श्री. अलंमगिर खान, १०. श्री. आशिक अल्ली जी शाहा, ११. मे. फैजी सक्रॅप, १२. मे. अमर टेड्रिंग कंपनी, १३. श्री. पवन कुमार पांडे, १४. में. ऐशिया स्टिल, १५. मे. रिशीब मेटल कॉपारेशन. १६. मे. जे.के. लोखंडवाला, १७. श्री. तहावर हुसेन, १८. मे. ओ. एस. स्टीलस, १९. मे. तवाब हुसेन ट्रेडर्स, २०. मे. एस.एम. भट्टीवाला, २१. मे. आदव असोसियटस् २२. मे. महाराष्ट्र टायर सर्व्हीस, २३. युनिक ट्रेडर्स, २४. मे. सुखमाणी ॲटोमबाईल्स २५. श्री. नशीबउली हजी मेहमुद व २६. मे. साबा ट्रेडर्स यांनी कोरे निविदा चे प्रपत्र खरेदी केले आहे.

सदर निविदा इशारा रक्कमे सह सादर करण्याची मुदत २९.८.२००२ रोजी दुपारी ३ वाजे पर्यंत होती ती वाढून दिनांक ३०.८.२००२ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत आली होती तिथपर्यंत ३ निविदा धारकांनी इशारा रक्कमे सह सिलबंद निविदा सादर केल्या व ते दिनांक ३.८.२००२ रोजी. १६. ०५ वाजता उघडण्यात आल्या त्याच्या तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निरूपयोगी साहित्त्यांची माहिती | अंदाजित परिमाण | ठरविलेली किंमत रू. | श्री. आर. एन.पांडे किंमत रू. | श्री. तहावर हुसेन किंमत रू. | श्री. शेख शालेह किंमत रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २५० चौक (कॉपर) | ६००० नग | ९०. २५ | ७०/- (टॅक्स सहित) | ६१. ०० | ९०. ३० (टॅक्स सहित) |
| २. | केबल आणि वॉयर (ॲल्युमिनीयम) | २००० किलो | ३. ०० | २५/- (टॅक्स सहित) | १८. २५ | १५. ६० (टॅक्स सहित) |
| ३. | जी.एस.एम. एस.जी. आय भंगार | २००० किलो | ८. ५० | ६/- (टॅक्स सहित) | ६. २५ | ६. ८० (टॅक्स सहित) |
| ४. | अल्यूमिनियम भंगार | ४०० किलो | ८५. ७६ | ६५/- (टॅक्स सहित) | ६६. २५ | ८० . २५ (टॅक्स सहित) |

सदर तुलनात्मक तक्यानुसार ॲटम क्रमांक २ मध्ये श्री. आर.एन. पांडे यांनी दिलेले दर सर्वात जास्त व वाजवी आहे. परंतु ॲटम क्रमांक१ , ३ , व ४ मध्ये श्री. शेख शालेह यांनी दिलेले दर सर्वांत जास्त असुन ठरविलेली किंमती पेक्षा कमी असल्याने श्री. शेख शालेह यांना पत्र क्र. २२० दिनांक ३.९.२००२ अन्वये दिनांक ४.९.२००२ रोजी उप आयुक्त मुख्यालय यांच्या दालनात बोलवण्यात आले व उप आयुक्त (मुख्यालय) मुख्य लेखा परिक्षक व कार्यकारी अभियंता (विद्युत) यांच्या समक्ष वाटाघाटी करण्यात आली. वाटाघाटी नंतर त्यांनी खालील प्रमाणे लिहुन दिले.

आज दिनांक ४.९.२००२ रोजी विद्युत विभागातील निरूपयोगी समानाची विल्हेवाट लावण्याच्या निविदेतील बाब क्र.१ ,३ व ४ मधील मि दिलेले दरामध्ये वाटाघाटी करून दर वाढविण्यासाठी उप आयुक्त (मुख्यालय)यांच्या दालनात उप आयुक्त मुख्यालय, मुख्य लेखा अधिकारी , मुख्य लेखा परिक्षक कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे समक्ष मी हजर होतो तथापि मी संबंधित निविदेच्या संबधात दिलेले दर योग्य असून त्यामध्ये वाढ करून ईच्छुक नाही.



श्री. शेख शालेह यांनी कुठल्याही ॲटम मध्ये वाढ देण्यास नाकारल्यामुळे शासनाच्या पध्दती नुसार सर्व निविदा धारकांना ॲटम क्रमांक १ ,३ ,व ४ यासाठी परत सिलबंद लखोट्यात पुनः विचार करून दर मागविणेस आदेश देवून सिलबंद लखोटे स्विकार करण्यासाठी उप आयुक्त (मुख्यालय)यांना प्राधिकृत करण्यात आले.

तिन्ही निविदा धारकांना पत्र क्रमांक उमपा/विद्युत/२३३ दिनांक ६.९.२००२ अन्वये पुर्नः विचार करून सुधारित दर देण्यासाठी विनंती करण्यात आली. सदर पत्राच्या प्रतिसादास तिन्ही ऐजेन्सीने दिनांक १७.९.२००२ रोजी ठीक १५. ३० वाजता सिलबंद लखोटयात सुधारित दर सादर केले. त्याच्या तुलनात्त्मक तक्ता पुढील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | निरूपयोगी साहित्त्यांची माहिती | अंदाजित परिमाण | ठरविलेली किंमत रू. | श्री. आर.एन. पांडे किंमत रू. | श्री. तहावर हुसेन किंमत रू. | श्री. शेख शालेह किंमत रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २५० चौक (कॉपर) | ६००० नग नेट रेट | ९०. २५ | ९१. ०० (टॅक्ससह) ७८. ९२ | ७२.९३ (टॅक्ससह) ६३. २५ | ९१. ४० (टॅक्ससह) ७९. २७ |
| २. | जी.एस. एम.एस. जी. आय. भंगार | २००० किलो नेट रेट | ८. ५० | ...... | ६ . ८५ (टॅक्ससह) ६. ५० | ६ . ८० (टॅक्ससह) ६. ४५ |
| ३. | ॲल्युमिनियम भंगार | ४०० किलो नेट रेट | ८५. ७६ | ..... | ..... | ८०. २५ (टॅक्ससह) ७६. १३ |

सदर तुलनात्त्मक तक्त्यानुसार श्री. शेख शालेह यांचे सुधारीत दर ॲटम क्रमांक १ ते ४ मध्ये सर्वात जास्त व ठरलेली किंमतीपेक्षा कमी आहे. श्री. तहावर हुसेन यांचे सुधारीत दर ॲटम क्रमांक ३ मध्ये सर्वात जास्त व ठरलेली किंमती पेक्षा कमी आहे. ॲटम क्र.२ मध्ये निविदेत पुर्वीच रू. २५/- प्रति किलो (टॅक्स सह) ठरलेल्या रक्कम रूपये ३/- पेक्षा जास्त आहे.

ॲटम क्र. १ ,३ व ४ यांचे सुधारीत दर ठरलेल्या रक्कमे पेक्षा कमी असून ते मंजूर करण्यास शिफारस आहे कारण १. पावसाळी कालावधीमध्ये भंगार सामानास गंज चढून त्यांचे पुन्हा वजन कमी होवून अंतिम मूल्य कमी होण्याची शक्यता आहे. २ महापालिका मुख्यालयाच्या आजूबाजूला लोकवस्ती असून मालमत्तेचे चोरीची शक्यता नाकारता येत नाही व दुस-या प्रकारे पण नुकसान झाल्याच्या घटना घडलेल्या आहे. ३. दर जास्त मिळणेस एकूण तीन वेळा प्रयत्त्न करणेस आलेला आहे. ४. हे भंगार सामान आहे व मौल्यवान जागा व्यापून बसलेले आहे. ५. शासनाने परिपत्रक क्रमांक सीडीआर१००२/प्र.क्र.१०/०२/अकरा दिनांक २२.८.२००२ अन्वये निमशासकीय कार्यालयामध्ये दिनांक १.९.२००२ ते दिनांक ३१.१०.२००२ या कालावधीत स्वच्छता अभियान राबविण्याचे आदेश निर्गमीत केले आहे. ६. सध्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमान (प्रगती) अभियान स्पर्धा चालु आहे. त्या दरम्यान हे भंगार समान विल्हेवाट करून घेणे योग्य राहील.

सदर सर्व बाबी लक्षात घेता खालील प्रमाणे सर्वात जास्त दराला मंजुरी देवून ज्या ॲटम मध्ये ज्या निविदा धारकांचे दर सर्वात जास्त आहे, त्याच्या निविदेस मान्यता देण्याची शिफारस आहे.

| अ.क्र. | निरूपयोगी साहित्त्यांची माहिती | अंदाजित परिमाण | ठरविलेली किंमत (नेट)रू. | सर्वात जास्त निविदा दर रू. | सर्वात जास्त दराचे निविदा धारकांचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | २५० चौक (कॉपर) | ६००० नग | ९०.२५ | ९१. ४० (टॅक्स सह) | श्री. शेख शालेह |
| २. | केबल आणि वॉयर (ॲल्युमीनीयम) | २००० किलो | ३.०० | २५/- (टॅक्स सहित) | श्री. आर. एन. पांडे |
| ३. | जी. एस.एम. एस.जी. आय. भंगार | २००० किलो | ८.५० | ६. ५० (नेट) | श्री. तहावर हुसेन |
| ४. | अल्युमीनीयम भंगार | ४०० किलो | ८५.७६ | ८०. २५ (टॅक्स सह) | श्री. शेख शालेह |

दिनांक १९.९.२००२ च्या महासभेत आयत्त्या वेळीचा विषय म्हणुन घेण्यास व महासभेने जर प्रस्ताव मान्य केला तर इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता त्वरीत अंमलात आणणे योग्य राहील कारण शासनाने परिपत्रक क्रमांक सीडीआर. १००२/प्र.क्र.१०/०२/अकरा दिनांक २२.८.२००२ अन्वये निमशासकीय कार्यालयामध्ये दिनांक १.९.२००२ ते दिनांक ३१.१०.०२ या कालावधीत स्वच्छता अभियान राबविण्याचे आदेश निर्गमीत केले आहे तसेच दोन ऑक्टोबर पुर्वी राजीव गांधी प्रशासकीय गतिमान (प्रगती) अभियान स्पर्धा अंतर्गत त्या जागेची साफसफाई होईल. मा. महासभेच्या मान्यतेसाठी सादर.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३१</u>                    <u>दिनांकः-१९.९.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. राजु टेकचंदानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महानगरपालिकेचे विद्युत विभागातील निरूपयोगी जंगम मालमत्तेची विल्हेवाट करण्यास मान्यता देत आहे.

वरील निर्णय अंतर्भूत असणारा ठराव कार्यवृत कायम होण्याची वाट बघितल्या शिवाय, त्वरीत अंमलात आणण्यासाठी तो कायम झाल्याचे समजण्यात येईल व पुढील सभेत कार्यवृत्त कायम होण्यापूर्वी तो अंमलात आणता येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>आयुक्त साहेबांना मी विनंती केली होती पत्रकार कक्षासंबंधी.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>अजुन तर उपायुक्तांनी मला काही माहिती दिली नाही मी त्यांच्याकडुन घेतो.

<u>मा. सचिवः-</u>कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर सायंकाळी ६. २० वाजता सभा संपल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-१९/१०/२००२

इतिवृत्त

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१९/१०/२००२ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दि. १९.१०.२००२ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शाविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.

२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ४१. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ४२. | श्री. जाधव सुरेश |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ४३. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४४. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ७. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४५. | श्रीमती. कारीरा रेखा |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४६ | श्री. पमनानी इश्वर सतरामदास |
| ९. | श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास | ४७ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १०. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४८ | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४९ | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ५०. | श्री. भालेराव गौतम यशवंत |
| १३. | श्रीमती. कालानी ज्योती | ५१ | श्री. वसीटा बेबी तुलसीदास |
| १४. | श्रीमती. पाल अधारी राजाराम | ५२ | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १५. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ५३ | श्रीमती. लक्ष्मी रोहीदास ससाणे |
| १६. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १७. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५५ | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १८. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५६ | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १९. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५७ | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २०. | श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन | ५८ | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २१. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २२. | श्री. नाना आनंदा पवार | ६० | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २३. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ६१ | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २४. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ६२ | श्रीमती. किरण लखी माखिजा |
| २५. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६३ | श्री. होशियारसिंग लबाना |
| २६. | श्री. शांताराम ओंकार निकम | ६४ | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २७. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६५ | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| २८ | श्री.ठाकुर विनोद लालसिंग | ६६ | श्रीमती. डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २९. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६७ | श्रीमती. भारती छाबरीया |
| ३०. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६८ | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३१. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६९ | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| ३२. | श्रीमती. वनवारी मोना | ७० | श्रीमती. मीनू राजकुमार दासानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७१ | श्री.बेहरानी ठाकुरदास वरीयलदास |
| ३४. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ७२ | श्री. इदनानी राजू चंदभान |
| ३५. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७३ | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३६. | श्रीमती. भावना खिलनानी | ७४ | श्री. माखिजा हरदास सन्मुखदास |
| ३७. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ७५ | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३८. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | ७६ | श्री. वदरीया राजेश नानिकराम |
| ३९. | श्रीमती.माने किरण बाळकृष्ण | | |
| ४०. | श्री. रमेश महादेव चव्हाण | | |



तर

मा. सदस्य १. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती, २ श्रीमती.गुप्ता आशा प्रभुनाथ, ३. श्री. मोहन साधवानी. ४.श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास ,५. श्रीमती. इंदु रामचंद्र भठिजा हे सभेस अनुपस्थितीत होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ३५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>मा. महापौरजी, आमच्या टेबलावर निमंत्रण पत्र ठेवण्यांत आले आहे. माझे हे म्हणणे आहे की, निमंत्रण पत्रिका दिल्याबद्दल आपणांस धन्यवाद.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी या सभागृहाबाहेर पडल्या.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>सभेचे कामकाज सुरू करण्यापुर्वी मी आपणांस अशी विनंती करतो की, आमचे मित्र श्री. दयाल वाधवा हे स्वर्गवासी झाले आहेत त्यांना श्रध्दांजली वाहीली जावी.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी:-</u>मा. महापौरजी, आजची सभा सुरू करण्यापुर्वी, गांधीधाम मध्ये अक्षरधाम मंदीरावर जो हल्ला झाला त्याचा निषेध करण्यासाठी निषेध सभा घेतली जावी. किंवा राजधानी एक्सप्रेसला गया शेजारी जो अपघात झाला त्यामध्ये जे लोक मृत्युमुखी पडले त्यांना श्रध्दांजली वाहिली जावी.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :-</u>मा. महापौरजी, अक्षरधाम मंदीरावर जो हल्ला झाला व देशामध्ये जे आंतकवादी हल्ले होत आहेत. तर त्यांचा निषेध तर केलाच पाहिजे. आता अशी वेळ आली आहे की, पुर्ण देशामध्ये ज्या अतिरेकी कारवाया चालु आहेत. त्यांचा सुध्दा निषेध केला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-</u> मा. महापौरजी, हरीयाणामध्ये दलितांवर जे अत्याचार झाले आहेत त्याचा मी निषेध करतो.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>उल्हासनगरमध्ये सुध्दा आत्मघाती पथक तयार झाले पाहिजे.

*<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम</u> :-तसेच सोलापुरमध्ये जी दंगल झाली त्यामध्ये जे लोक मारले गेले त्यांना श्रध्दांजली वाहण्याचा मी प्रस्ताव ठेवत आहे. तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. विलासरावजी देशमुख यांचे वडील श्री. दगडुजीराव व्यंकटराव देशमुख यांचे सुध्दा नुकतेच निधन झाले आहे, तसेच मराठीचे जेष्ठ साहित्यीक वसंत सबनीस, ना. स. इनामदार, अभिनेत्री प्रिया तेंडुलकर, अभिनेत्री दिना पाठक यांचे सुध्दा नुकतेच निधन झाले आहे. तसेच हिंदीचे मान्यवर साहित्यीक श्री. लक्ष्मीकांत वर्मा यांचे सुध्दा नुकतेच निधन झाले आहे म्हणुन मी सभागृहास अशी विनंती करतो की, या सर्वांना श्रध्दांजली अर्पित केली जावी.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः</u>-आमचे मा. सदस्य व बंधु यांनी श्रध्दांजली वाहण्याबाबत जे काही प्रस्ताव दिले त्यांचे मी अनुमोदन करतो. व त्याचबरोबर जे लोक मृत्यु पावले आहेत परंतु ज्यांची आम्हाला माहिती नाही त्यांना पण श्रध्दांजली दिली जावी. धन्यवाद.*

--३--

*<u>मा. सचिवः</u>-कृपया श्रध्दांजलीसाठी उभे राहावे.*

*<u>शोक प्रस्ताव :-</u>*

*महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार श्री. विलासरावजी देशमुख यांचे वडील श्री. दगडुजीराव व्यंकटराव देशमुख याचे नुकतेच निधन झाले. त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.*

*<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ३१अ <u>दिनांकः-१९.१०.२००२.</u>*

*सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.*

*अनुमोदकाचे नाव :- श्री. ठाकुरदास बेहरानी.*

*हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. दगडुजीराव व्यंकटराव देशमुख, यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.*

*<u>एकमताने</u>*

*महापौर पिठासिन अधिकारी*
*सर्वसाधारण महासभा*
*उल्हासनगर महानगरपालिका*

*<u>शोक प्रस्ताव :-</u>*

*श्री. दयाल वाधवा, मराठीचे जेष्ठ साहित्यीक श्री. वसंत सबनीस, श्री. ना. स. इनामदार, अभिनेत्री दिना पाठक , अभिनेत्री प्रिया तेंडुलकर तसेच हिंदी भाषेचे*

मान्यवर साहित्त्यीक श्री. लक्ष्मीकांत वर्मा यांचे नुकतेच निधन झाले. तसेच राजधानी एक्सपेंसला गया शहराजवळ झालेल्या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या लोकांच्या कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ३१ब <u>दिनांकः-१९.१०.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. शांताराम निकम

अनुमोदकाचे नाव :- श्री. दिलीप लालवानी

--४--

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. दयाल वाधवा, श्री. वसंत सबनीस, श्री. ना.स. इनामदार, दिना पाठक, प्रिया तेंडुलकर श्री. लक्ष्मीकांत वर्मा तसेच राजधानी एक्सप्रेसला गया शहराजवळ झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या लोकांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>निषेध प्रस्ताव :-</u>

गुजरात, गांधीधाम येथील अक्षरधाम मंदिरावर अतिरेक्यांनी केलेल्या हल्याचा तसेच देशामध्ये जे आतंकवादी हल्ले होत आहेत त्याचा व हरीयाणामध्ये दलितांवर जे अत्त्याचार होत आहेत त्याचा तसेच सोलापूर मधील जातीय दंगलीचा निषेध करण्यासाठी प्रस्तावित.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.३१ क</u> <u>दिनांकः-१९.१०.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. शांताराम निकम

अनुमोदकाचे नाव :- श्री. दर्शनसिंग खेमाणी

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार अक्षरधाम मंदिरावरील अतिरेक्यांनी केलेल्या हल्याचा तसेच देशात होत असलेल्या अतिरेकी कारवायांचा व हरीयाणामध्ये दलितांवर होत असलेल्या अत्त्याचाराचा तसेच सोलापुरमधील जातीय दंगलीचा निषेध करीत आहे.

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>मा. महापौरजी, सभेस सुरूवात करण्यापुर्वी मी आपणांसमोर एक प्रस्ताव ठेवू इच्छितो की, आमचे जे सन्माननिय सदस्य श्री. राज असरोंडकर व श्री. प्रमोद टाले हे अनुशेषाच्या मुददयाबाबत बाहेर उपोषणास बसले आहेत. तर मा. महापौर, व आयुक्तांनी त्यांच्याशी चर्चा करून यावी व नंतर या सभेचे कामकाज चालवावे. चर्चा करण्यासाठी अर्ध्या तास किंवा एक तासासाठी सभा स्थगित केली जावी. असा मी प्रस्ताव ठेवत आहे.



<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा.महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, आमचे सदस्य श्री. शांताराम निकम यांनी जो मुददा उपस्थित केला त्याचे मी समर्थन करतो. व त्याचबरोबर भारतीय जनता युवा मोर्चाचे सरचिटणीस उल्हासनगर शहरातील पाण्याच्या समस्येबाबत, पाणी वितरण व्यवस्थेबाबत आमच्या उपमहापौर व माझ्या भगिनी श्रीमती. जया साधवानी यांनी एक महिन्यापुर्वी तीव्र आंदोलन छेडले होते. त्यांनी एवढी मेहनत केल्यानंतरही त्यांना सहकार्य मिळाले नाही. व आज सुध्दा पाण्याची तीच स्थिती आहे. पाण्याच्या एक-एक हंडयासाठी गोलमैदान परीसरामधील महिला त्रस्त झाल्या आहेत. व महापालिकेत येवून त्या दिवसभर उभ्या राहतात. त्यांना पाणी मिळत नाही व आमचे मित्र भारतीय जनता युवा मोर्चाचे कित्त्येक लोक पाण्याची वितरण व्यवस्था बरोबर नसल्यामुळे ध्यान आकर्षण प्रस्ताव ठेवून एक दिवसीय उपोषण करत आहेत. तर कृपया या सभेचे कामकाज स्थगित करावे व आपण स्वतः येवून त्यांचे उपोषण सोडवावे. व मागासवर्गीय अनुशेष भरावा या मागणी साठी उपोषणास बसलेले आमचे मित्र श्री. राज असरोंडकर, श्री. प्रमोद टाले , व जे कर्मचारी बसले आहेत त्यांचे उपोषण सोडवून त्यांना महासभेत घेवून यावे. व या सभेचे कामकाज नंतर चालविले जावे.

<u>मा. महापौरः-</u>श्री. शांताराम निकम यांनी म्हंटले की, श्री. प्रमोद टाले व श्री. राज असरोंडकर हे मागासवर्गीयांचा अनुशेष भरून काढण्याच्या मागणीसाठी उपोषणास बसले आहेत. त्याबाबत मी असे सांगु इच्छिते की, सभा संपल्यानंतर त्यांचे उपोषण सोडविले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>मा. महापौरजी, श्री. प्रमोद टाले व श्री. राज असरोंडकर हे लोकप्रिय सदस्य आहेत ते सभेत अभ्यासपुर्ण चर्चा करतात. असे

सदस्य जर सभागृहाबाहेर राहिले तर आम्हाला नाही वाटत की सभेमध्ये काही अभ्यासपुर्ण चर्चा होईल? अभ्यासपुर्ण सदस्यांना बाहेर ठेवून सभेचे कामकाज चालविणे हा सर्व सदस्यांवर अन्याय आहे. म्हणुन मी आपणांस विनंती करतो की, आपण प्रथम त्यांची भेट घ्यावी व नंतर सभेचे कामकाज चालवावे.

<u>मा. सचिवः-</u>मा. महापौरांनी निर्णय घेतलेला आहे. यामध्ये काही वाद होवू शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>यानंतरही जर मा. महापौर सभा चालवत असतील तर मी या सभेचा निषेध करतो. आणि जे काही मागासवर्गीय आहेत त्यांना विनंती करतो आपणांस जर बसायचे असेल तर, हा अतिशय महत्त्वाचा मुददा आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेचा पायमल्ली करणारा हा विषय आहे. या विषयावर जर आपणांस सभा चालवायची असेल तर चालवु शकता. ९६ पासुन आतापर्यंत जवळ जवळ ८५० पदे भरली आहेत. परंतु मागासवर्गीयांचा विचार केला नाही. या सभेचा मी निषेध करतो. व मागासवर्गीयांना आवाहन करतो, इतर पक्षांना आवाहन करतो त्यांना सभा त्याग करायचा असेल तर ते करू शकतात. अन्यथा मी बाहेर जात आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम हे सायंकाळी ४.४० वाजता सभागृहा बाहेर पडले.

<u>मा. सदस्य श्री. प्रशांत जाधवः-</u>मा. शांताराम निकम यांना माझे जाहिर समर्थन आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, यापुर्वी देखिल तीन वेळा पाण्याच्या विषयाबाबत सभा तहकुब झाली होती. आज महापालिकेमध्ये तीन्ही उच्चतम पदावर महिला असतानाही महिलांना घर सोडुन पाण्यासाठी भटकत राहावे



लागणे ही खुपच शरमेची गोष्ट आहे. या उपोषण कर्त्यांना उठवुन जर पाणी वितरण व्यवस्था एक आठवडयाच्या आत सुधारली नाही तर शहरात सर्वत्र आंदोलने केली जातील. रास्तारोको आंदोलन केले जाईल.

<u>मा. सचिवः-</u>आणखी एक सुचना आली आहे. सुचना दिली आहे श्री. रमेश चव्हाण,श्री. धनंजय बोडारे, श्री. विश्वनाथ गौतम पाटील, श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे, सौ लक्ष्मीबाई ससाणे, श्री. दिलीप गायकवाड, सौ. नंदीनी बाम्हणकर, सौ. किरण माने, श्री. राजेंद चौधरी, श्री. राजेंदसिंग भुल्लर, श्री. नथुराम सोनावणे, श्री. लाल पंजाबी, श्री. बच्चाराम रूपचंदानी, श्री. पुरस्वानी जमनादास, श्री. रामदास उमाप, सौ. सीमा मोकल, सौ. संगिता जावळे आणि श्री. यादव लालबिहारी यांचाही एक प्रस्ताव आहे की, सभा तहकुब करून बाहेर उपोषणास जे श्री. राज असरोंडकर व श्री. प्रमोद टाले बसले आहेत. त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी सभा तहकुब केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>मा. महापौरजी कमीत कमी नगरसेवकांचा तरी सन्मान ठेवला पाहिजे. सत्ताधारी पक्षाचा एक व आमचा एक नगरसेवक असे दोन्ही सन्माननिय नगरसेवक उपोषणास बसले आहेत कमीत कमी महापौर व उपमहापोरांनी त्यांचा सन्मान ठेवला पाहिजे.

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आज येथे तीन-चार मुददे उपस्थित केले आहेत. प्रत्त्येक महिन्यात कोणता ना कोणता मुददा उपस्थित होत असतोच, वेळ आहे. कोणताही सदस्य कोणता ना कोणता मुददा उपस्थित करत असतोच. मागच्या वेळी विरोधी पक्षीयांनी म्हंटले होते की, गणपती विसर्जनाची वेळ आहे. त्यामुळे ही सभा स्थगित केली जावी. आमच्या माजी महापौरांनी याबाबत माझ्याशी चर्चा केली होती. मी त्यांना सांगितले होते की, प्रश्नोत्तराचा कालावधी रदद करून थेट सभा सूचनेवरील कामकाज चालवू. आज आमचे बंधु श्री. जमनादास पुरस्वानी यांनी म्हंटले की, पाणी प्रश्नावर आजची सभा स्थगित केली जावी. आमचे बंधु श्री. शांताराम निकम यांनी मागासवर्गीयांबाबत सांगितले. इतर मागासवर्गीयांबाबत, मी स्वतः इतर मागासवर्गीय संवर्गात मोडतो. आमचे प्रयत्न असे असले पाहिजेत की, कुणाचीही सेवा जेष्ठता संपुष्टात येता कामा नये. भले ही तो कोणत्त्याही जातीचा असो किंवा पक्षाचा असो. भलेही तो इतर मागासवर्गीय असो, अनुसूचित जातीचा असो, भलेही सिंधी असो, गुजराती असो किंवा मराठी असो. जे सेवा जेष्ठतेत येतात त्यांनाच पदोन्नती दिली पाहिजे. बाकी कुणावर अन्याय करून कुणावर न्याय करणे हे पुर्णपणे चुकीचे आहे. हे प्रशासनाचे काम आहे. जेवढी काही पदे रिक्त आहेत. ती सेवाजेष्ठतेनुसार त्वरीत भरली पाहिजेत. आज मा. महापौरांनी पहिल्यांदाच निर्णय दिला आहे. त्यानंतर आमचे बंधु श्री. शांताराम निकम यांनी बोलावयास नको होते. त्यांनी सांगितले की आम्ही उपोषणास बसलेल्या नगरसेवकांकडे जावू परंतु ते केव्हा तर महासभा संपल्यानंतर. आज महासभेत अशी तरतुद नाही की, कुणीही नगरसेवक एका सभेत अनुपस्थित राहिला तर तो अपात्र ठरेल. तीन सभा सलगपणे गैरहजर राहिले तर अपात्र होवू शकतात. तर कुणाही सदस्यास काही काम असेल तर तो महासभा हजेरीपटावर स्वाक्षरी करून जावू शकतो. तर माझी सभागृहास विनंती आहे की, जसे आमचे बंधु यांनी विनंती केली की आजची सभा स्थगित केली जावी. भलेही प्रश्नोत्तरे न चालविता सभा सूचनेवरील कामकाज अर्ध्या पाऊण तासामध्ये पुर्ण करता येईल. नाहीतर कधी काय कारण राहिल कधी काय कारण राहिल. व प्रत्त्येक महिन्यात एकदाच महासभा होत असते. मागील बॉडीमधील सदस्य श्री. प्रकाश महाडिक नेहमी मुददा उपस्थित करायचे की, या महिन्यामध्ये महासभा झाली नाही या महिन्यामध्ये सभा का झाली नाही? तर प्रत्त्येक महिन्यात महासभा होणे अतिशय आवश्यक आहे. समारंभ, कार्यक्रम हे होतच राहतील. त्या बाबतही आमचे कर्तव्य आहे, जबाबदारी आहे ती आम्ही पार पाडु महापौरांनी सांगितले की, त्यांचे उपोषण सोडविण्यासाठी आपण निवडुन*



*आलेले सर्व नगरसेवक जावू. व श्री. जमनादास पुरस्वानी यांनी म्हंटले की, एका आठवडयाच्या आत पाण्याची समस्या सुटली पाहिजे. हे प्रशासनाचे काम आहे. मी सुध्दा प्रशासनास विनंती करेन की जेथे जेथे श्री. जमनादास पुरस्वानी सांगतील तेथील सर्वे करून दोन तीन दिवसामध्ये पाण्याची सुविधा करून दिली पाहिजे. कारण की शहरामध्ये सर्वांना पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे. तर ही गोष्ट लक्षात घेवून महापौरांना जर वाटत असेल तर सभा सूचनेवरील कामकाज झटपट पुरकता येईल व मेहरबानी करून कोणत्त्याही पक्षाच्या सदस्यांनी या विषयांवर अधिक चर्चा करू नये. फक्त सर्व पक्षीयांनी मंजुर मंजुर असे म्हणावे. त्यातुन एकजुट दिसुन येईल. धन्यवाद.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:-</u>महासभा कशासाठी बोलावली जाते? जनतेचे जे काही प्रश्न असतील त्यासाठी महासभा बोलावली जाते. जनतेचा मुख्य प्रश्न पाण्याचा आहे. पाणी देवू शकत नसाल तर महासभा चालविण्यात अर्थ काय? पाण्याची समस्या सोडवा नंतर महासभेचे कामकाज चालु करा. पाण्याचा प्रश्न न सोडवता आपण*

महासभेचे कामकाज चालवत आहात. येथे बिसलरी वॉटर पिण्यास दिले जाते व बाहेर पाण्यासाठी लोकांना भटकत रहावे लागते. ही महासभा येथेच थांबविली जावी.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, श्री. किशोर वनवारी यांनी म्हंटले की, श्री. जमनु पुरस्वानी सांगतील तेथे पाणी पुरवठा केला जावा, पाण्याच्या प्रश्नासाठी आमच्या उपमहापौर महोदयांनी उपोषण केले तरीही अधिका-यांनी त्याकडे लक्ष दिले नाही. व तीनवेळा महासभा स्थगित केल्यानंतरही पाणी प्रश्नाबाबत काही मार्ग निघाला नाही जर त्यांचे ऐकले नाही तर आमचे काय ऐकणार आहेत हे लोक? अशी महासभा आम्ही चालु देणार नाही. जोपर्यंत उपोषणास बसलेल्या आमच्या त्या दोन नगरसेवकांना सभागृहात आणले जाणार नाही. तसेच पाणी समस्येबाबत चर्चा होणार नाही. तोपर्यंत आम्ही महासभेचे कामकाज चालु देणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u> मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त, मागच्या महासभेत मी स्पष्टपणे सांगितले होते की, कोणत्त्या प्रकारे एम.आय.डी.सी वाले नागरीकांना सतावत आहेत. त्याबाबत एक उदाहरण मी देत आहे. शुक्रवारी पाले येथील दोन्ही वॉलवर वेल्डींग केले. त्यानंतर शनिवार, रविवार दोन दिवस महापालिका बंद होती. त्यानुसार जाणीवपूर्वक आम्हाला त्रास दिला गेला. आता पाण्याची जी समस्या उभी ठाकली आहे. ज्याबाबत मी यापुर्वी सुध्दा म्हंटले की, जाणुन बूजून नदीतून डॅममध्ये पाणी सोडत नाहीत. व त्यामुळे फील्टरेशन, पंपिंग कमी होते. त्यामुळे कॅम्प नं. १ ,२ ,३ मध्ये कृत्रिमरित्त्या पाण्याची जाणीवपुर्वक टंचाई निर्माण केली जाते. अधिकारी लोकांना जर एम.आय.डी.सी ने पाणी दिले तरच ते वितरीत करतील ना? तर काय करतील? तर मुख्य जी एम.आय.डी.सी ची समस्या आहे ती सुटली पाहिजे. एक महिना झाला मी नगरसेवक बंधु, भगिनींना विनंती केली होती की, डोंबिवली मध्ये जावून आम्ही धरणे धरू. व त्यांना ठिक करू. परंतु त्यावेळी माझ्या बोलण्याकडे कुणी लक्ष दिले नाही त्यामुळे आज ही समस्या उभी ठाकली आहे. आता पुढे आपण पहा, वेल्डींग करण्याचे कारण काय होते? पाणी पुरवठा विभागाचे जे अधिकारी आहेत त्यांना विचारा.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, जसे आमच्या सभागृह नेत्त्यांनी सांगितले की, महापौरांनी आधीच निर्णय दिलेला आहे की, सभा संपल्यांनतर उपोषणास बसलेल्या नगरसेवकांची भेट घेवू. ठिक आहे. दुसरी गोष्ट अशी की, प्रश्नोत्तरे जी आहेत अ.क्र. २३ पासुनचे प्रश्न चालु करायचे आहेत. जो प्रश्न मे महिन्यामध्ये विचारलेला आहे. त्यावर ऑक्टोबर पर्यंत चर्चा होत नसेल तर रदद करा ना. पाच-पाच, सहा-सहा महिन्यानंतर जर प्रश्नावर चर्चा



होत असेल तर त्या प्रश्नाचे महत्त्वच निघुन जाते. माझ्यामते प्रश्नोत्तरे चालु केली जावीत. व महापौरांनी जे निर्णय दिले त्यानुसार कार्यवाही व्हावी.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>मा. महापौरजी, हा जो पाण्याचा प्रश्न आहे. तो अतिशय गंभीर प्रश्न आहे.
<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>प्रश्नोत्तराचा विषयही गंभीर आहे.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>प्रथम पाणी दया नंतर प्रश्नोत्तरे चालवा.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>कुठलीही पुर्वसूचना न देता एम.आय.डी.सी वाल्यांनी पाणी बंद केले आहे.

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>श्री. अशोक ठाकुर यांच्या प्रभागातील लोक येथे आले आहेत. त्यांच्याकडे पाणी येत नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>प्रथम पाणी दया. पाणी ही एक जीवनावश्यक गोष्ट आहे.*

*यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहेत ते समजुन येत नव्हते.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-</u>पाणी दया. पाणी दया.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>आमच्या प्रभागात पाणी नाही ब-याचशा ठिकाणी पाणी नाही. प्रथम पाणी दया.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>शहरात पाण्याची समस्या आहे त्याबाबत आम्ही इंन्कार करत नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>महापौर महोदया, प्रथम पाण्याचा प्रश्न सोडवा नंतर प्रश्नोत्त्तरे चालवा.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>पाणी पुरवठा विभागाचे सभापती महोदय, पाणी दया, पाणी दया.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>आम्ही सर्व बरोबरच आहोत. परंतु आम्ही काय बोलत आहोत ते कमीत कमी ऐकुन तर घ्या. शहरामध्ये पाण्याची समस्या आहे. व पाण्याच्या मुदयाबाबत सलगपणे आम्ही धरणे धरत आलो आहोत.*

*यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहेत ते समजुन येत नव्हते.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>दिलीप लालवानी यांना प्रभाग नाही त्यामुळे प्रभागातील पाण्याची समस्या त्यांना माहित नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>मागील महासभेत पाणी प्रश्नाबाबत बरीच चर्चा झाली आहे.*

*मा. पिठासिन अधिका-यांच्या आसना समोरील मोकळया जागेत श्री. जमनु विरोधी पक्षीय सदस्य पाणी दया, पाणी दया अशा जोरदार घोषणा देत होते.*

*<u>मा. सचिवः-</u>कृपया लक्ष दया. एक जरूरी सूचना आहे. ही सभा साडे पाच वाजेपर्यंत स्थगित केली जात आहे.*

*सायंकाळी ४.५२ वाजता सभा ५.३० वाजेपर्यंत स्थगित करण्यांत आली.*

--९--

*स्थगित झालेली सभा सायंकाळी ५.५० वाजता पुन्हा सुरू करण्यांत आली.*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-</u>सचिव साहेब,मा. महापौर , उप-महापौर हे दोन्ही सभेत सद्या उपस्थित नाहीत, सभेचे कामकाज तर चालले पाहिजेत,आपण सभा कशी चालविणार?*

*<u>मा. सचिवः-</u>मा. महापौर, उपमहापौर हे सध्या सभागृहात उपस्थित नसल्याने सभेचे कामकाज चालविण्यासाठी आपणांमधील एका सदस्याची पिठासिन अधिकारी म्हणुन आपण निवड करावी.*

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-श्री. विनोद तलेरजा यांची पिठासिन अधिकारी म्हणुन निवड करावी.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-जर श्री. विनोद तलरेजा पिठासिन अधिकारी म्हणुन बसु इच्छित नसतील तर श्री. नारायण पंजाबी यांना पिठासिन अधिकारी म्हणुन बसविले जावे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही. पिठासिन अधिकारी म्हणुन बसण्यात काय फायदा?

मा. सचिव :-आपणांकडुन, विरोधी पक्षीयांकडुन,कुणाचे नाव सुचवत आहात काय?

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-श्री. विनोद तलरेजा यांच्या नावाची आम्ही शिफारस करीत आहोत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-श्री. विनोद तलरेजा आपण पिठासिन अधिकारी म्हणुन आसनस्थ व्हावे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा यांची पिठासिन अधिकारी म्हणुन सर्वानुमते निवड केल्यानंतर ते पिठासिन अधिका-यांच्या आसनावर आसनस्थ झाले.

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः- श्री. विनोद तलरेजा यांचे एक स्वप्न होते ते आज साकार होत आहे. त्यासाठी मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करत आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-आम्ही आपणांसमोर सुचना ठेवली आहे की, प्रथम शहरवासियांना पाणी दया.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-तोपर्यंत सभा स्थगित केली जावी.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-पाणी दिल्यानंतर सभेचे कामकाज चालविण्याची आपण घोषणा करा.

मा. पिठासिन अधिकारी श्री. विनोद तलरेजाः-सभा स्थगित करण्याबाबत आपण जे बोलत आहात परंतु सर्व सदस्यांना बसु दया. सभा चालवायची की नाही याबाबत आम्ही सर्वांचे मत आजमावुन निर्णय घेवूया. कुणाला वाटते सभेचे कामकाज चालावे. कुणाला वाटते सभेचे कामकाज चालवु नये. त्यानुसार सभेचे कामकाज चालवु.



यावेळी श्री. रमेश चव्हाण, श्री. बच्चाराम रूपचंदानी, श्री. राजेंद भुल्लर, श्री. राजेंद चौधरी, श्रीमती. सीमा मोकल, श्रीमती. जयश्री सुर्वे, श्रीमती. किरण माने, श्रीमती. नंदीनी बामणकर व अन्य काही सन्माननिय सदस्य पाणी दया, पाणी दया असे एकाच वेळी जोरजोरात घोषणा देत होते.

मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-मा. महापौरजी, शहरवासी पाण्यासाठी त्रस्त झाले आहेत पाण्याची सोय करून दया.

यावेळी विरोधी पक्षीय सन्माननिय सदस्य पाणी दया, पाणी दया असे एकाच वेळी जोरजोरात घोषणा देत होते.

मा. पिठासिन अधिकारी श्री. विनोद तलरेजाः-सभा स्थगित करण्याची काही आवश्यकता नाही. हे पहा पाण्याची जी समस्या आहे .....

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-पाणी प्रश्नाशिवाय महासभेचे कामकाज चालणार नाही.

श्री. एस. जी. पाटणकर उपायुक्त हे आयुक्तांच्या अनुपस्थितीत महासभेतील आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ झाले.

मा. पिठासिन अधिकारी श्री. विनोद तलरेजाः-सभा तहकुब करायची की नाही याबाबत मतदान घेवू. तहकुब करण्याच्या बाजुने अधिक मते पडली तर तहकुब करू नाही तर सभेचे कामकाज चालवु.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-प्रस्ताव मतदानास टाकल्यास पाणी पुरवठा वाढणार आहे का?

मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-रोज सकाळी लोक आम्हाला पाण्याबाबत जाब विचारतात.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-पाण्याचा मुददा अगोदर घ्या. पाण्याशिवाय दुसरा महत्त्वाचा प्रश्न नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-उपमहापौरांनी सुध्दा पाण्यासाठी आंदोलन केले होते.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-हाय, हाय.

मा. पिठासिन अधिकारी श्री. विनोद तलरेजाः-मी प्रस्ताव मतदानास टाकु इच्छितो जे लोक प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी....

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-नही, नहीं चलेगी दादागिरी नही चलेगी.

मा. उपमहापौर श्रीमती. जया साधवानी हया सायंकाळी ५. ५५ वाजता पुन्हा सभागृहात आल्या. मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा हे पुन्हा आपल्या आसनावर आसनस्थ झाले. व मा. उपमहापौर श्रीमती. जया साधवानी हया पिठासिन अधिका-यांच्या आसनावर आसनस्थ झाल्या.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-पहिले पाणी, पहिले पाणी नंतर उत्तर.

यावेळी विरोधी पक्षीय सन्माननिय सदस्य पाणी दया, पाणी दया असे एकाच वेळी जोरजोरात घोषणा देत होते.

मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-पाणी समस्येबाबत आपण प्रस्ताव दिला आहे. सभा स्थगित करण्याबाबत.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणे :-पाण्याबाबत काय प्रस्ताव दयायचा? पुर्ण शहरात पाण्याची समस्या आहे प्रस्ताव कोण कोण देणार?

मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-आपण दोन मिनिटे प्रथम ऐकुन घ्या.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणे :-चार सभा आपण स्थगित केल्यात...

मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-आपण मला बोलु देणार नसाल तर कसे चालेल? नाही तर आपण ओरडत रहा मी बसते.

यावेळी विरोधी पक्षीय सन्माननिय सदस्य पाणी दया, पाणी दया असे एकाच वेळी जोरजोरात घोषणा देत होते.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-पिठासिन अधिका-यांना बोलु दिले जावे.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटीलः-पाणी पाहिजे पाणी.

मा. सचिवः-कृपया ऐकुन घ्या. सूचना ऐकुन घ्या. आता काही वेळापूर्वी आपण कायदेशिर प्रश्न उपस्थित केला होता की, मा. महापौरजी, मा. उपमहापौरजी उपस्थित नाहीत. सभेचे कामकाज चालले पाहिजे. त्यास माझे कायदेशिर उत्तर असे होते की, ते जर उपस्थित नाही तर आपल्या पैकी कुणीही पुढे येवून पिठासिन अधिकारी होवू शकतो. त्याचप्रमाणे आता आपला प्रस्ताव असा आहे की, महासभा स्थगित केली पाहिजे. त्यासाठी पण नियम आहेत. जर आपणांस सभा स्थगित करण्याचा प्रस्ताव दयायचा असेल तर तो मतदानास टाकावयाचा आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-चटई कुठे गेली?

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-नागरिकांची पहिली समस्या आहे पाण्याची.

यावेळी विरोधी पक्षीय सन्माननिय सदस्य पाणी दया, पाणी दया असे एकाच वेळी जोरजोरात घोषणा देत होते.

मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-कृपया आपापल्या जागेवर बसुन घ्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी हे सांयकाळी ५. ५८ वाजता सभागृहात उपस्थित झाले.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मा. महापौरजी, असे वाटते की, यांना पाणी नको आहे. सभा स्थगित करण्यासाठी बहाणा पाहिजे.

मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-आम्ही उल्हासनगरसाठी पाणी मागत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>चटई कुठे गेली? पाणी आले का चटईमध्ये.

<u>मा. पिठासिन अधिकारी श्रीमती. जया साधवानीः-</u>कृपया आपापल्या जागेवर बसुन घ्या. पाण्यासाठी निर्देश दिले जातील.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, असे वाटते की, यांचा उददेश पाणी नसुन फक्त ओरडणे हाच आहे.

यावेळी विरोधी पक्षीय सन्माननिय सदस्य पाणी दया, पाणी दया असे एकाच वेळी जोरजोरात घोषणा देत होते.

मा.महापौर श्रीमती. मालती करोतिया या सायंकाळी ६.०४ वाजता सभागृहात उपस्थित झाल्या.

पिठासिन अधिका-यांच्या स्थानावर आसनस्थ असलेल्या उपमहापौर श्रीमती. जया साधवानी या उपमहापौरांच्या आसनावर आसनस्थ झाल्या. मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया या आपल्या आसनावर आसनस्थ झाल्या.

यावेळी विरोधी पक्षीय सन्माननिय सदस्य पाणी दया, पाणी दया असे एकाच वेळी जोरजोरात घोषणा देत होते.

<u>मा. महापौरः-</u>कृपया आपण घोषणा बंद करा व आपापल्या जागेवर बसुन घ्या. आजची सभा स्थगित करायची किंवा नाही याविषयावर निर्णय घेण्यासाठी मतास टाकणे आवश्यक आहे. बहुसंख्य मत ज्याबाजुने असेल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करता येईल.

सभागृहात उपस्थित असलेले शिवसेना भाजपाचे सदस्य पाणी दया, पाणी दया अशा जोरजोरात घोषणा देत होते व मा. महापौरांच्या निवेदनाकडे लक्ष न देता ते त्यांच्या घोषणांमध्ये गुंग होते.

तर सत्ताधारी पक्षाचे सदस्य प्रस्ताव मतास टाका अशी सूचना देत होते.

<u>मा. महापौरः-</u> ही सभा स्थगित करायची किंवा नाही हा निर्णय घेण्यासाठी मी मतास टाकते.

शिवसेना भाजपा या विरोधी पक्षांचे सदस्य मा.महापौरांचे काहीही न ऐकता पाणी दया, पाणी दया अशा घोषणा देतच होते.

यावेळी सत्ताधारी पक्षाचे खालील सदस्य उपस्थित होते.

विरोधी पक्षाचे खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) श्री. राजु टेकचंदानी | १) श्रीमती जावळे संगिता |
| २) श्रीमती भावना रामचंदानी | २) श्री. नाथानी कन्हैयालाल |
| ३) श्री. लिंगे सुर्यकांत | ३) श्रीमती मोकल सिमा |
| ४) श्री. मुलचंदानी महेंद्र | ४) श्री. उमाप रामदास |
| ५) श्रीमती पाल आधारी | ५) श्री. पुरस्वानी जमनादास |
| ६) श्री. ऐडके गणपत | ६) श्री. रुपचंदानी बच्चाराम |
| ७) श्रीमती कमला शर्मा | ७) श्रीमती कृष्णानी रेखा |
| ८) श्री. पुथ्वी वलेचा | ८) श्री. यादव लालबिहारी |
| ९) श्री. चिमन रुपानी | ९) श्री. भुल्लर राजेंद्रसिंग |
| १०) श्री. विनोद ठाकुर | १०) श्री. सोनावणे नथु |
| ११) श्रीमती मिना सोनेजी (सोंडे) | ११) श्री. गायकवाड दिलीप |
| १२) श्रीमती माया मसंद | १२) श्रीमती बामणकर नंदिनी |
| १३) श्री. सुरेश गायकवाड | १३) श्रीमती खांडेकर प्रेमा |
| १४) श्रीमती मोना वनवारी | १४) श्रीमती माने किरण |
| १५) श्री. किशोर वनवारी | १५) श्री. चव्हाण रमेश |
| १६) श्री. सतरामदास जेसवानी | १६) श्री. बोडारे धनंजय |
| १७) श्री. लुंड गोविंदराम | १७) श्री. पाटिल विश्वनाथ |
| १८) श्रीमती खिलनानी भावना | १८) श्रीमती ससाणे लक्ष्मी |
| १९) श्री. खेमाणी देवेंद्रसिंग | १९) श्री. चौधरी राजेंद्र |
| २०) श्रीमती कारीरा रेखा | २०) श्रीमती सुर्वे जयश्री |
| २१) श्री. पमनानी ईश्वर | २१) श्री. लाल पंजाबी |
| २२) श्री. पंजाबी नारायण | |
| २३) श्रीमती पंजाबी दिपा | |
| २४) श्रीमती भठिजा कोमल | |
| २५) श्री. रामरख्यानी मोहनदास | |
| २६) श्रीमती किरण माखिजा | |
| २७) श्री. होशियारसिंग लबाना | |
| २८) श्री. विनोद तलरेजा | |
| २९) श्रीमती रिजवानी सुजाता | |
| ३०) श्रीमती मिनु दासानी | |
| ३१) श्रीमती साधवानी जया | |
| ३२) श्री. जाधव प्रशांत | |
| ३३) श्री. ठाकुरदास बेहरानी | |
| ०३४) श्री. म्हस्के अंकुश | |
| ३५) श्रीमती मालती करोतिया | |
| ३६)श्री. हरदास माखिजा | |
| ३७) श्री. दिलीप लालवानी. | |

विरोधी पक्षीय सदस्य घोषणा देत असताना सत्ताधारी पक्षाचे काही सदस्य सभा तहकुब करण्याच्या प्रस्तावाच्या विरोधात निर्णय घेण्यांत यावा अशी मा. महापौरांना सुचना करत होते.

मा. महापौरः-सभा स्थगित करण्याचा प्रस्ताव मतास टाकण्याबाबतचा माझा निर्णय अमंलात आणण्यासाठी आणि विरोधी पक्षीय सदस्यांचे असहकार्य पाहता मी सत्ताधारी पक्षाचे सदस्यांची वरील बहुसंख्या पाहुन व विरोधी पक्षीयांची वरील अल्पसंख्या पाहुन सभा तहकुब करण्याबददलचा ठराव पुढील प्रमाणे निष्फळ झाल्याचे मी घोषीत करीत आहे. आणि कार्यसूचीवरील कामकाज तसेच चालु राहील असा निर्णय देत आहे.

--१४--

सर्वसाधारण महासभा ठराव क्रः- ३१८ दिनांकः-१९.१०.२००२

सूचकाचे नावः-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नावः-श्री. राजु टेकचंदानी

हि महासभा आजची महासभा तहकुब करण्याबददलच्या प्रस्तावास मान्यता देत नाही. व कार्यसूचीवरील कामकाज चालु करण्यास संमती देत आहे.

सूचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

बहुमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. महापौरः-सचिव साहेब विषय क्र. १ वाचून दाखवा.

मा. सचिवः-कृपया लक्ष दया. विषय . १ प्रश्नोत्तरे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम हे सायंकाळी ६. १० वाजता पुन्हा सभागृहात उपस्थित झाले.

विरोधी पक्षीय सदस्य पाणी दया, पाणी दया अशा जोरजोरात घोषणा देत होते तर सत्ताधारी पक्षाचे काही सदस्य प्रश्नोत्तराचा विषय वगळा अशी सूचना करत होते.

मा. सचिवः- कृपया लक्ष दया. विषय क्र. १ प्रश्नोत्तरे.

प्रश्न क्र. २३ हा मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी यांचा आहे.

विरोधी पक्षीय सदस्य घोषणा देत असताना मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी हे प्रश्न विचारण्यासाठी पुढे येत नव्हते.
मा. महापौरः-सचिव साहेब, पुढील प्रश्न घ्या, प्रश्न क्र. २४ घ्या.

मा. सचिवः-प्रश्न क्र. २४ हा श्री. चिमन रूपाणी यांचा आहे.
मा. सदस्य श्री. चिमन रूपाणीः-मला आनंद वाटतो की, प्रशासनाने यंदाच्या पावसाळयात जी कार्यवाही केली. व उल्हासनदीची साफसफाई केली त्यामुळे पावसाळयात पुराचे पाणी सहजपणे निघुन गेले.....

मा. सदस्य श्री. नथु सोनावणे :-पाण्याच्या मुदयावर बोला.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-लालवानीजी पाणी प्रश्नाबाबत आपण आंदोलन कसे केले होते? आपण तीन वेळा सभा कशा स्थगित केल्या होत्त्या?

--१७--

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मा. महापौर सभेची अमुल्य वेळ फुकट जात आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-कृपया आपण सभेचा वेळ वाया घालवु नये. सन्माननिय महापौरजी, विरोधी पक्षीयांकडुन सभेचा वेळ वाया जात आहे. कृपया आपण सभा चालु करावी. मा. महापौरजी पाण्याची समस्या संपुर्ण उल्हासनगरमध्ये आहे.
मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-पाणी दया. पाणी दया.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-पाण्याची समस्या पहिले नंतर प्रश्नोत्त्तरे? शहरात पाणी नाही. तुमच्या प्रश्नोत्त्तराशी शहरवासियांना काही घेणे नाही. प्रश्नोत्त्तरे कशाला पाहिजेत. जनतेला पाणी पाहिजे तुमची प्रश्नोत्त्तरे नकोत. प्रश्नोत्त्तरे आठ महिन्यापासुन ऐकत आले आहेत. प्रत्त्येक महिन्यात प्रश्नोत्त्तरे होतात. लोकांना पाणी पाहिजे. प्रश्नोत्त्तरे नकोत. जनतेला पाणी पाहिजे पाणी. पाण्याचे सुरळीत वितरण केल्याशिवाय सभा चालु दयायची नाही. जनतेला पाणी नाही आपण बिसलरी पाणी पिता. थंड हवा खाता.

मा. सदस्य श्री. चिमण रूपाणी :-उल्हासनगर रेल्वे स्टेशन समोरचा नाला /नदी दरवर्षी पावसाळयात तुडूंब भरून वाहते त्यामुळे पुर्ण अशोक नगरपासून शांतीनगर पर्यंत पुराचे पाणी साठते. व जिवीत व वित्त हानी असे लाखो रूपयांचे नुकसानी होते. त्यावर काय कार्यवाही केली आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-टॅकरचे बिल दोन कोटी रू. आले आहे तर पाणी कुठे गेले?

मा. सदस्य श्री. चिमण रूपाणी :-या पावसाळयात नाल्याची साफसफाई केली त्यामुळे पाणी सहजपणे निघुन गेले. त्याबददल अधिका-यांना धन्यवाद देतो.

यावेळी विरोधी पक्षीय सदस्य पाणी दया, पाणी दया असे एकाच वेळी जोरजोरात घोषणा देत होते.

सत्ताधारी पक्षाचे सदस्य हात वर करून प्रश्नोत्तराचा विषय वगळा अशी सूचना करत होते.

<u>मा. महापौरः-</u>सत्ताधारी पक्षाच्या उपस्थित सदस्यांचे बहुसंख्य मत आजमावून प्रश्नोत्तराचा विषय वगळण्यांत येत असल्याचे मी घोषित करीत आहे.

तसेच सौ. जयश्री सुर्वे व श्री. राज असरोंडकर यांनी दिलेल्या पुढील लक्षवेधी सूचनेस स्विकृती नाकारण्यांत आहे.

लक्षवेधी सूचना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या विकास आराखडय़ामध्ये उल्हासनगर स्टेशन नं. ४ क्र. १५५ -०४७ हेक्टर जागा आहे. येथे मार्केट बनविण्यासाठी राखीव भुखंड असून त्याठिकाणी अनाधिकृत बांधकामे प्रचंड झालेली असून रेल्वेने ये-जा करणा-या लोकांना त्यामुळे प्रचंड त्रास होत असून शहराचा विकास स्टेशन सभोवतालच्या परिसरावरून दिसून येते परंतु सदर अनाधिकृतपणे असलेली बांधकामांमुळे त्याठिकाणी रहदारीचा त्रास, तसेच दुर्गंधी येत असून सदर महापालिकेची जागा ताब्यात घेवून लोकांना सदर त्रासापासुन दूर करणे. अत्यावश्यक व तातडीचे असल्याने सभागृहाचे लक्ष वेधीत आहोत.

--१६--

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. २ वाचून दाखवितात.

मागील सभेचे दि. १९.९.२००२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

सत्ताधारी पक्षाचे काही सदस्य हात वर करून इतिवृत्त कायम कायम अशी सूचना देत होते.

<u>मा.महापौरः-</u> सत्ताधारी पक्षाच्या उपस्थित सदस्यांचे बहुसंख्य मत आजमावून दि. १९.९.२००२ रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे बहुमताने कायम झाल्याचे घोषित करीत आहे.

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> महापालिकेचे बोटक्लब,उद्यान बांधा, वापरा व हस्तांतरीत <u>पध्दतीने देणे बाबत.</u>

सत्ताधारी पक्षाचे सदस्य हात वर करून हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा अशी सूचना देत होते.

<u>मा.महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव पुढे ढकलण्याविषयी उपस्थित सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांची बहुसंख्या लक्षात घेता सदरचा प्रस्ताव बहुमताने पुढे ढकलण्यांत येत आहे.

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव बहुमताने पुढे ढकलण्यांत येत आहे.

विषय :- महापालिकेचे बोटक्लब ,उद्यान बांधा, वापरा व हस्तांतरीत पध्दतीने देणे बाबत.

मा. सचिवः-विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

विषय :-उल्हासनगर-३ येथील कल्याण अंबरनाथ रस्त्त्यावर शांतीनगर येथील प्रवेशव्दारा वरील कोनशिलेवर शहीद दुनिचंद कालानी प्रवेशव्दारा ऐवजी शहीद दुनिचंद कालानी रस्ता अशी दुरूस्ती करणेस मंजुरी देणे बाबत.

सत्ताधारी पक्षाचे सदस्य हात वर करून पास पास असे म्हणत होते.

मा. महापौरः- सभेत उपस्थित असलेल्या सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांची बहुसंख्या लक्षात घेता सदरचा प्रस्ताव बहुमताने पारीत झाल्याचे घोषीत करते.

विषयः- उल्हासनगर-३ येथील कल्याण अंबरनाथ रस्त्त्यावर शांतीनगर येथील प्रवेशव्दारा वरील कोनशिलेवर शहीद दुनिचंद कालानी प्रवेशव्दारा ऐवजी शहीद दुनिचंद कालानी रस्ता अशी दुरूस्ती करणेस मंजुरी देणे बाबत.



प्रस्तावनाः-

उपरोक्त विषयानुसार शांतीनगर Enterence Gate कानशिलेवर "SHAHEED DUNICHAND T. KALANI ENTERANCE GATE " असे नांव कोरलेले आहे. या कोनशिलेचे उदघाटन मा. पालकमंत्री श्री. मदन बाफना यांच्या हस्ते दि. १७ मार्च, १९९१ रोजी करण्यात आले होते. परंतु उल्हासनगर नगरपालिका सर्वसाधारण ठराव क्र. ३८७ दिनांक १७४.१९८९ नुसार जूना कल्याण -अंबरनाथ रोड, शांतीनगर जकात नाका ते साईबाबा मंदिर या रोडला शहिद दुनिचंद टी कालानी नांव दिलेले आहे. या अनुषंगाने "SHAHEED DUNICHAND T. KALANI ENTERANCE GATE " असे कोरलेल्या शिलान्यासावर पूवी झालेली चुक दुरूस्ती करण्यासाठी "SHAHEED DUNICHAND T. KALANI ROAD " हे नांव कोरण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३२ दिनांकः-१९.१०.२००२.

सुचकाचे नाव :-श्री. दर्शनसिंग खेमाणी

अनुमोदकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-३ कल्याण अंबरनाथ रस्त्यावर शांतीनगर येथील प्रवेशव्दारावरील कोनशिलेवर ''शहीद दुनिचंद टी. कालानी'' प्रवेशव्दार ऐवजी ''शहीद दुनिचंद टी. कालानी रोड'' अशी दुरूस्ती करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>बहुमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ५ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u><u>कु. राणी भाटिया महानगरपालिका लिपिक यांचे निलंबन आदेश कायम करणे बाबत.</u>

<u>मा.सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>हे काय चालले आहे? आपण ५ व्या विषयावर आला आहात तर १ ते ४ विषयांचे काय झाले?

<u>मा. सचिवः-</u>आपण महापौरांना विचारा.



<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>मतदान घ्या.
<u>मा.सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>पहिल्या विषयाच्या बाजुने किती मते आहेत? आपण पाचव्या विषयापर्यंत आला आहात.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>मतदान कोणी घेतले?
<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मतदान घेण्याबाबत सांगण्यात आले होते. आपण मत घेवू दिले नाही.

<u>मा. महापौरः-</u>आपण आपापल्या जागेवर बसून घ्या.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>सचिवांचे मत घेतले पाहिजे.

<u>मा. सचिवः-</u>आपण आपापल्या आसनावर आरामाने बसुन घ्या. मी आपल्या शंकाचे निरसन करतो. सध्या सभेत सत्ताधारी पालीका सदस्यांची उपस्थिती ३५ आहे. तर विरोधी पक्षीय सदस्यांची २० आहे आणि त्यामुळे मा. महापौर/ पिठासिन अधिकारी यांनी वरील ४ विषयांवर निर्णय दिलेला आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर व श्री. प्रमोद टाले हं सायंकाळी ६.१५ वाजता सभागृहात उपस्थित झाले.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-पाणी येत नाही आम्ही आरामशिर कसे बसणार?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :-कोणत्त्या पध्दतीने सभेचे कामकाज चालविले पाहिजे, सचिवांचे काम काय आहे ते आपण पहा. त्यानंतरच सभेचे कामकाज चालु करा.

मा. महापौरः-सर्व सदस्य असे ओरडू लागले तर काय समजून येईल.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-मा. महापौरजी, मी आमचे बंधु श्री. बोडारे साहेबांना सांगेन की, जरा डोके शांत ठेवून बोलावे. ते या सभागृहात शहराचे उपमहापौर म्हणुन होते. व पुर्ण शहरामध्ये त्यांचा सन्मान आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-समस्या पाहायच्या आहेत सन्मान पाहायचा नाही.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी प्रती उत्तरादाखल जोरजोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहेत. हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-आपण सर्व जण असे बोलु लागलात तर ते बरोबर नाही.

मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-आम्ही काय येथे बिसलरी वॉटर पिण्यासाठी येत नाही. नाही तर सभागृहात बिसलरी वॉटरच्या बाटल्या येवू देणार नाही. आम्हाला बिसलरी वॉटर नको आहे. आम्हाला लोकांच्या समस्या सोडवायच्या आहेत. गरीब जनता लुटली जात आहे. नळाला पाण्याचा थेंब नाही व ५०-५० हजाराची बिले येत आहेत. ५० हजार, ६० हजार. नळाला एक थेंब सुध्दा पाणी येत नाही. सर्वात प्रथम महिलांना पाण्याबाबत त्रास होत आहे.

मा. महापौरः-एकाच सदस्यांने बोलावे, इतरांनी खाली बसुन घ्यावे.



मा. सदस्य श्री. नरेंदकुमार ठाकुर, श्री. राजु इदनानी, श्री. राजेश वदरीया , श्री. शांताराम निकम, श्री. नाना पवार हे सायंकाळी ६.२० वाजता सभागृहात उपस्थित झाले.

मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-मा. महापौरजी आपल्या प्रभागात पाण्याची समस्या नाही का?

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-सन्मानिनिय तोडगा काढायचा आहे.

मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-आम्ही जेव्हा घरातून बाहेर पडतो तेव्हा लोकांची पाण्याची रिकामी भांडी पहावी लागतात.

मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-प्रभागात फिरणे मुश्किलीचे होत आहे.

यावेळी काही विरोधी पक्षीय सदस्य पाणी दया, पाणी दया असे एकाच वेळी जोरजोरात घोषणा देत होते.

<u>मा. सचिवः-</u>सर्व सदस्यांनी आपापल्या आसनावर बसुन घ्यावे. आपल्या प्रश्नाचे मी उत्तर देत आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>सचिव साहेब मी आपणांवर जे आरोप केले आहेत की, आपण सत्ताधारी पक्षाची बांधील आहात म्हणुन अशा प्रकारे कामकाज चालवत आहे. मला याचे उत्तर हवे आहे की, आपण ७व्या विषयापर्यंत कसे आलात?

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>लोकांना प्रश्नोत्तरे नको आहेत पाणी पाहिजे आहे. आपण पाचव्या काय आठव्या प्रश्नापर्यंत जा काय फरक पडेल?

<u>मा. सचिवः-</u>मला विचारले तर मी उत्तर देईन.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>आता उत्तर नको आहे.

<u>मा. सचिवः-</u>चुकीचे आहे की बरोबर आहे याचा मी खुलासा करत आहे आपण आपल्या आसनावर बसून ऐकुन घेतले तरच मी खुलासा करू शकेल ना? मा. महापौरांनी सभा तहकुब करण्याबाबतचा प्रस्ताव जेव्हा मतास टाकला तेव्हा आपले सर्व सदस्य पाणी दया, पाणी दया नंतर सभा चालवा अशा घोषणा देत असताना आपण याकडे लक्ष दिले नाही. मा. महापौरांनी आपले निर्णय अंमलात आणण्यासाठी सत्ताधारी पक्षाचे सभेत उपस्थित बहुसंख्य सदस्यांचे मत आजमावून आपल्या घोषणा चालु असताना प्रत्येक विषय वाचल्यानंतर व त्यासंबंधी सत्ताधारी पक्षाचे बहुसंख्य सदस्यांचे मत आजमावून विषय क्र. १ ते ४ बाबतचा निर्णय घेतलेला आहे या दरम्यान आपण सतत घोषणा देत असताना सभेच्या कामकाजावर लक्ष दिले नाही.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>ते ऐकुन काय फायदा आहे?

<u>मा. सचिवः-</u>आपण आरोप कराल त्यात तथ्य नाही. नियमानुसार काय उत्तर आहे ते आपण ऐकुन घ्या. नियमानुसार प्रत्येक विषयावर बहुसंख्येच्या आधारे निर्णय घेणे आवश्यक आहे. आणि बहुसंख्या सत्ताधारी पक्षाकडे आहे. महापौर सभेच्या कामकाजाचे नियंत्रण करण्यासाठी पिठासिन अधिकारी म्हणुन आहेत व हे सर्व निर्णय त्यांच्या कार्यक्षेत्रात असून त्यांच्या निर्देशानुसार सभेचे कामकाज चालु ठेवण्यातं आले आहे.



<u>मा. महापौरः-</u>आपण सर्व सदस्य असे ओरडू लागलात तर काय सांगणार.

यावेळी विरोधी पक्षीय सदस्य पाणी, पाणी असे एकाच वेळी जोरजोरात घोषणा देत होते.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>शहरात पाण्याची समस्याच समस्या आहे.पाण्यापेक्षा मोठी समस्याच नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकल :-</u>जागतिक महीला वर्षात उल्हासनगरच्या महिला पाण्याची भिक मागत आहेत.

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:-</u>पाण्यापेक्षा कोणतीच मोठी समस्या नाही. पाणीच पहिला प्रश्न आहे. पाण्याची समस्या सोडवू शकत नसाल तर आपण शहराच्या काहीच समस्या सोडवू शकत नाहीत.*

*शिवसेना भाजपा व त्याचे समर्थकासह चे २२ उपस्थित सदस्य पाणी दया, पाणी दया या घोषणा देत सभेचा बहीष्कार करून सायंकाळी ६. २५ वाजता सभागृहातुन बाहेर पडले.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आज सर्वांची महासभेमध्ये जी स्थिती पाहण्यात आली त्याचा मी खुलासा करू इच्छितो की, आमच्या विरोधी पक्षीयांच्या सदस्यांनी पहिल्यांदा मागणी केली होती की, श्री. मनोहर जोशी यांचा अंबरनाथ येथे कार्यक्रम आहे. म्हणुन आपण सभा स्थगित करा. आम्ही त्यांच्याशी सहमत झालो होतो. व आम्ही म्हंटले होते की, मा. मनोहर जोशीजी भारताचे मंत्री आहेत. आमच्या मनात सुध्दा त्यांच्याबददल आदर आहे. आपण ४. १० वाजता सभेचे कामकाज चालु करा. प्रश्नोत्तराचा कालावधी न चालविता सभा सूचनेवरील पुर्ण विषय घेतले जावेत. व पुर्ण करू. परंतु त्यांनी ऐकले नाही. प्रत्येक महिन्यात कोणता ना कोणता मुददा जाणीवपुर्वक आणला जातो. मागील महिन्यात सांगितले की, गणपती विसर्जन आहे सभा स्थगित करा. आमचे माजी महापौर देवता स्वरूप व्यक्ती आमचे श्री. हरदास माखिजा त्यांच्या बोलण्यात येतात. त्यावेळी त्यांनी सांगितले की, प्रश्नोत्तरे न चालविता थेट सभा सूचनेवरील विषय घ्या. आम्ही सभा सूचनेवरील विषय घेतले. आज महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी व श्री. राधाचरण करोतिया यांनी मला ॲन्टी चेंम्बरमध्ये बोलविले होते. मी पुन्हा त्याच्याशी सहमत झालो होतो. ४. १० वाजता सभा चालू करून प्रश्नोत्तरे न चालविता थेट सभा सूचनेवरील विषय चर्चेला घेवून ते पुर्ण करून आम्ही अंबरनाथ येथील कार्यक्रमास आपल्या बरोबर येवू. परंतु त्यांनी पाण्याचा एक मुददा जाणीवपुर्वक उपस्थित केला. त्याचा मला खेद आहे. जेव्हा सत्ताधारी पक्षाचे सदस्य पाणी मुदयाबाबत जमिनीवर बसले होते. त्यावेळी विरोधी पक्षाचे सदस्य आम्हाला साथ देत नव्हते. यासाठी आम्ही त्यांना सांगितले की, आपण एका सभेत हजर राहिला नाहीत तर काही बिघडणार नाही. कुणी सदस्य अपात्र होणार नाही. सलग तीन सभांना गैरहजर राहू शकतात. मी बोलत होतो आमची भगिनी शिवसेनेची नगरसेविका श्रीमती. किरण माने यांनी म्हंटले की, आपण नाचत बोलता. मी बोलतो, थोडेफार हालतो तर त्यावर पण निर्बंध आहे का? त्या म्हणतात की आपण महिलांसमोर नाचत बोलता. माझी वहिनी पण येथे बसली आहे श्रीमती. मोना वनवारी, सर्व आमच्यासाठी माय, भगिनी आहेत. तर त्यासाठी त्यांनी जो आरोप लावला तो चुकीचा आहे. विरोधी पक्ष्यातील महिला सुध्दा आमच्या माय, भगिनी आहेत. महासभेमध्ये आयुष्यभर मी शिस्तीचे पालन केले आहे. सर्व सदस्यांना हात जोडुन सांगतो की, मेहरबानी करून आपण शिस्तीचे पालन करा. आज महापौरांना बरेच अधिकार आहेत. विधानसभेमध्ये आमदार जेव्हा तोडफोड करतात तेव्हा त्यांना निलंबित केले जाते. सहा महिन्यासाठी बारा महिन्यासाठी त्यांना सभागृहाबाहेर ठेवले जाते. अशा अधिकाराचा आम्ही दुरूपयोग न करता त्यांच्या विरोधात न जाता त्यांच्या*



*भावनांचा आदर ठेवून त्यांचे ऐकुन घेतो. परंतु ते प्रश्नोत्तरे चालु देत नव्हते. म्हणुन मा. महापौरांनी दोन तीन प्रश्नोत्तरानंतर म्हंटले की, ठीक आहे थेट सभा सुचनेवरील विषयांचे कामकाज चालवा. आज आमचे सचिव उल्हासनगर महानगरपालिकेत १९९७ पासुन कुठलाही पक्षपात न करता काम करतात. असे सचिव पुर्ण भारतवर्षात कुठेही मिळणार नाही. अशा आमच्या देवतास्वरूप सचिवांवर आरोप लावणे चुकीचे आहे. आमचे आयुक्त साहेब, उपायुक्त, आमचे कर्मचारी*

सर्वजण आपापल्या कामामध्ये सक्षम आहेत. केवळ उल्हासनगरमध्येच पाण्याची समस्या नाही तर पुर्ण भारतात पाण्याच्या समस्या आहेत. परंतु नगरसेवकांचे काम आहे प्रयत्न करणे म्हणुन मी आमच्या अधिका-यांना विनंती करेन की जेथे जेथे पाण्याची समस्या आहे ती त्वरीत दूर केली जावी. जाणीव पुर्वक याबाबतचा मुददा उपस्थित करण्याची संधी विरोधकांना देता कामा नये. ऐवढे बोलुन मी महापौरांना विनंती करतो की, सभेचे कामकाज पुढे चालविले जावे व आजचे जे कामकाज आहे ते पुर्ण केले जावे व सर्व ठरावांमध्ये अशी नोंद घ्यावी की इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाताच ठरावाची अंमलबजावणी केली जावी.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले सायंकाळी ६.३० वाजता सभागृहातून बाहेर पडले व मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी सभागृहात उपस्थित झाले.

मा. महापौर :-सभा सूचनेवरील कामकाज चालु केले जात आहे. कृपया आता मध्ये कुणी बोलु नये. सर्वांनी आपापल्या जागेवर बसावे.

मा. उपमहापौरः-महापौरांच्या आदेशाचे पालन व्हावे.

मा. सचिवः-विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

विषय :- कु. राणी भाटिया महानगरपालिका लिपिक यांचे निलंबन
आदेश कायम करणे बाबत.

पास?

मा. सदस्य श्रीमती. आहुजा नीता, श्रीमती. बेबी वसीटा हया सायंकाळी ६.३२ वाजता सभागृहात उपस्थित झाल्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मला असे वाटते की, हा जो मुददा आहे तो निवड सामितीपुढे ठेवला जावा.

मा. सचिवः-नाही, हा विषय कुमारी राणी भाटीया हिच्या बाबतचा आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-तर मग कायम केला जावा.

मा. महापौरः-सदरचा विषय सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

विषयः- कु. राणी भाटिया महानगरपालिका लिपिक यांचे
निलंबन आदेश कायम करणे बाबत.

प्रस्तावनाः-

ज्याअर्थी कु. राणी उब्रीओमल भाटीया, लिपिक १.४.१९८२ पासुन उल्हासनगर महानगरपालिका सेवेत कार्यरत असुन सध्या कर विभागात कार्यरत असताना त्यांनी तक्रारदार श्री. अशोक नथु बारी, राहणार वीर तानाजी नगर, सेक्शन-३९ शिक्षक चाळ, उल्हासनगर-५ येथील झोपडी वजा रूम तक्रारदार यांच्या भावने खरेदी केल्यानंतर उल्हासनगर महानगरपालिकेकडुन होणा-या



कराची आकारणी त्यांच्या भावाच्या नावाने करण्यासाठी २०० रूपये रक्कमेची लाच मागणी केली होती, सदर रक्कम स्विकारताना दिनांक १५.३.२००२ रोजी कु. राणी

भाटीया यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांचेकडुन पकडण्यात आले होते व त्यांचे विरूध्द मध्यवर्ती पोलिस स्टेशन, उल्हासनगर-३ येथे दि. १५.३.२००२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

त्याअर्थी कार्यालयीन आदेश क्र. उमपा/ साप्रवि/आस्था/ टे.१/१३, दि. १२ जुन, २००२ अन्वये कु. राणी भाटीया यांना महापालिकेच्या सेवेतुन निलंबित करण्यात आलेले आहे.

सबब कु. राणी भाटीया (निलंबित) लिपिक कर विभाग यांच्या निलंबनास मुंबई प्रांतिक माहनगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५६ (१)(ब) नुसार महासभेपुढे ठेवून निलंबन कायम करणे प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ३३ <u>दिनांक:-१९.१०.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्रीम. सोनेजी मिना (सोंडे)

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार कु. राणी भाटीया महापालिका सेवेतील लिपिक यांना आयुक्तांच्या आदेशाप्रमाणे निलंबनाधिन ठेवणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सदस्या श्रीमती. नीना नाथानी, श्री. श्यामसुंदर रोहडा, श्री. सुरेश जाधव, श्रीमती. भारती छाब्रिया, श्री. मनोज साधवानी हे सायंकाळी ६.४५ वाजता सभागृहात उपस्थित झाले.

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ६ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u>श्रीमती. माया लासी महानगरपालिका लिपिक यांची महापालिका सेवेतील अनियमित नियुक्ती रददबादल करणे <u>बाबत.</u>

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मला असे वाटते की, हा जो मुददा आहे तो निवड समितीपुढे ठेवला जावा. निवड समितीने निर्णय घेतल्यानंतर महासभेसमोर आला पाहिजे व आयुक्त साहेबांनी कुणावर खातेनिहाय चौकशी चालु ठेवली असेल भलेही ती चालु ठेवावी. परंतु या ज्या कर्मचा-यांची नेमणुक केली आहे. ती पहिल्यापासुन, कदाचित कोर्टाचा आदेश आहे की, निवड समितीने निर्णय घ्यावा. निवड समितीच्या नंतर हा मुददा महासभेत घेतला जावा.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>महापौरजी, या ठराविक मुदयावर मला एक सुचना दयायची आहे. सभागृह नेत्त्यांबरोबर सुध्दा माझी चर्चा झाली होती. व सभागृह नेत्त्यांनी याबाबत जी चर्चा केली त्या चर्चेशी मी पुर्णपणे सहमत आहे. परंतु एक सूचना करू इच्छितो की, त्यावेळचे जे उपायुक्त होते, मुख्यालयाचे व

त्यांनी हा मुददा स्थायी समितीपुढे न आणता. त्यांनी कर्मचा-यांची नियुक्ती केली आहे. व त्याबाबत कोर्टाचा आदेश आला आहे की, हे प्रकरण निवड समितीपुढे जावयास पाहिजे होते. महासभेपुढे जावयास पाहिजे होते. त्यानंतर त्यांची नेमणुक व्हावयास पाहिजे होती. यामुददयाबाबत मी सभागृहास हे सांगु इच्छितो की, पुर्व उपायुक्त श्री. ढाकरे जे १९९५ पासुन कालपर्यंत आपल्या बरोबर होते. आमचे जितके पण अधिकारी येथुन गेले आहेत त्यांनी ज्या काही चुका केल्या आहेत त्यां चुका आम्ही झाकण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. त्यांचे अधिकार सुरक्षित करण्याचे प्रयत्न केले आहेत त्यांच्या विरूध्द जी काही चौकशी आयुक्त साहेबांनी चालु केली असेल त्याबाबत आमची काही हरकत नाही. आणि आम्ही त्या गोष्टीमध्ये जावू इच्छित नाही. तो आयुक्त साहेबांचा अधिकार आहे. परंतु सभागृहास माझे निवेदन आहे खास करून सभागृह नेता व आमचे जेवढे काही सदस्य येथे बसले आहेत. बंधु आणि भगिनी, त्यांनी हा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये न आणता त्यांची नियुक्ती केली आहे. त्यास ही महासभा त्या तारखेपासुन मंजुरी देत असेल तर वैयक्तिकपणे त्या अधिका-यावर जर ही जबाबदारी येत असेल तर कमीत कमी तो अधिकारी वाचला जाईल. ऐवढे मी सांगेन की, यामध्ये सभागृहातर्फे काही सुधारणा केली तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. नाना पवार, श्रीमती. दिपा पंजाबी, श्रीमती. भावना रामचंदानी, श्रीमती. किरण माखिजा हे सायंकाळी ७. ५० वाजता सभागृहातून बाहेर पडले.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>सन्माननिय महापौरजी, उपमहापौरजी, सचिव साहेब, आयुक्त साहेब व मा. सर्व सदस्य, या विषयाबाबत औदयागिक न्यायालय ठाणे यांचा आदेश आहे. श्रीमती. लासी ज्या न्यायालयात गेल्या होत्त्यपा. त्यामध्ये न्यायालयाचे आदेश आहेत की यांना नोकरीवरून कमी करू नका. परंतु निवड समितीची योग्य ती कार्यपध्दती अवलंबून जर त्या त्यात बसत असतील त्यांना कायम करा. व औदयोगिक न्यायालयाने हे जे आदेश दिले आहेत त्यास दुजोरा उच्च न्यायालयाने सुध्दा दिलेला आहे. म्हणुन आम्ही असे केले तर न्यायालयाचा अवमान होईल. म्हणुन श्री. ढाकरे साहेबांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ नुसार महासभेची परवानगी घेतली पाहिजे होती. परंतु त्यांनी ती घेतली नाही. दुसरीगोष्ट अशी की, निवड समितीची जी योग्य कार्यपध्दती आहे, न्यायालयाने जो आदेश दिला आहे त्याची अंमलबजावणी केली नाही. तसेच नेमणुकीचे आयुक्तांचे जे अधिकार आहेत ते प्रभारी आयुक्तांनी वापरले आहेत. अशा दोन-तीन चुका झाल्या आहेत म्हणुन ही नेमणुक कायम केली तर चुकीचे होईल. म्हणुन जशी ती होती. त्याच स्थितीत तीला ठेवली तर ते योग्य होईल. कारण की, यामध्ये असे आहे की, तिच्या आधी ५४ लोक तिच्यापेक्षा सेवाजेष्ठ आहेत. तिला कायम केले तर त्या ५४ लोकांवर अन्याय होतो. म्हणुन या प्रकरणात कुठेही योग्य ती कार्यपध्दती अवलंबिली गेली नाही. महासभा जर असा निर्णय घेत असेल तर तिला कामावरून काढु नये. तर तिला जे कायम करण्यांत आले आहे. तिच्या कायम सेवेचा आदेश रदद करून जशी होती तशी ५४ कर्मचा-यांबरोबर ती ही राहिल. व जेव्हा निवड समितीपुढे चौकशी पुर्ण होईल. त्यावेळी ती सुध्दा कार्य पध्दतीनुसार निवडली जात असेल तर तीची निवड केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>मी पुन्हा एकदा आपले लक्ष वेधु इच्छितो की, कोर्टाचा जो आदेश आहे. त्याच्या आड आम्ही येवू इच्छित नाही. ना त्यामध्ये आम्ही काही हस्तक्षेप करू इच्छित. कोर्टाच्या आदेशात हस्तक्षेप न करता. जो औदयोगिक न्यायालयाचा आणि उच्च न्यायालयाचा आदेश आहे. त्यामध्ये कोणताही हस्तक्षेप

आम्ही करू इच्छित नाही. तो आदेश कायम ठेवून, ज्या अधिका-यांनी त्यांना कायम केले आहे. व त्यास या महासभेने त्या तारखेपासुन मंजुरी दिली तर त्यांच्या त्या नेमणुकीस आम्ही कायम केले तर त्यांच्यावर वैयक्तिकपणे काही कार्यवाही होणार नाही. म्हणुन मी बोलत आहे. आयुक्त



साहेबांनी चौकशी करावी. त्यामध्ये आम्हाला काही हरकत नाही. यामध्ये काही आपली हरकत असेल तर ती आपण सांगा.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय)</u>:-नाही. त्यामध्ये हरकत ही आहे की, कोर्टानेच आदेश दिले आहेत की, जर योग्य ती कार्यपध्दती अवलंबुन निवड समितीच्या माध्यमातुन जर नेमणुक होत आहे. कोर्टाची काही हरकत नाही. असे महापालिकेचे म्हणणे आहे. म्हणुन जर आम्ही कोर्टाचे आदेश असतानाही निवड समितीची योग्य ती कार्यपध्दती न अवलंबिता केले तर चुकीचे होईल. व न्यायालयाचा अवमान होईल. दुसरी गोष्ट अशी की, ५४ कर्मचा-यांवर थेट अन्याय होईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः</u>-मी सुध्दा या प्रकरणाशी सहमत आहे की, कोर्टाचे जे आदेश आहेत, त्या कर्मचा-यास आम्ही कामावरून कमी करत नाही. जसे ५४ कर्मचारी आहेत. तशी ही ५५वी कर्मचारी आहे. तसेच मी म्हंटले की, पदोन्नती सेवाजेष्ठतेनुसार झाली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :</u>-हिच्या व्यतिरिक्त आणखी काही बेकायदेशिर नेमणुका झाल्या नाहीत ना? आणखीही असतील तर त्या सुध्दा काढल्या जाव्यात.

<u>मा. सचिवः</u>-नाही. यांनी आपणांस पुर्ण खुलासा दिलेला नाही. मी आपणांस पुर्ण खुलासा देवू इच्छितो. श्रीमती. माया लासी हिस १९९७ साली तात्पुरत्त्या स्वरूपी सहा महिन्यासाठी नेमणुक दिली होती. सहा महिने पुर्ण होण्याअगोदरच ती औदयोगिक न्यायालयात गेली होती. त्यांनी आधीपासुनच स्टे आणला होता की मला कामावरून काढले जाईल. म्हणुन माझी तक्रार ऐकुन घेतल्यानंतरच कोर्टाने निर्णय घ्यावा. तोपर्यंत कोर्टाने त्यांना स्टेटसको दिला होता. त्या आदेशाच्या विरोधात आम्ही उच्च न्यायालयात गेलो होतो. उच्च न्यायालयात गेल्यानंतरही हा निर्णय आला की, हा जो स्टेटसको आहे तो मेंन्टेन केला जावा. परंतु त्यामध्ये काही अटी घातल्या होत्त्या जर ती निवड समितीपुढे पात्र ठरत असेल व योग्यता प्राप्त आहे, अर्हताप्राप्त आहे व महानगरपालिका जर तिस कायम करू इच्छित असेल तर तीला कायम करू शकते. तोपर्यंत स्टेटसको ठेवला पाहिजे. किंवा औदयोगिक न्यायालयात जी केस आहे त्या केसचा अंतिम निर्णय लागे पर्यंत स्टेटसको मेंन्टेन केला पाहिजे. असा आदेश होता. दि. १४.५.२००१ रोजी तात्त्कालिन उपायुक्त श्री. जे.एम. ढाकरे हे श्री. बक्षी साहेबांच्या जागी प्रभारी आयुक्त होते. त्यावेळी त्यांनी एक पत्र काढून तिला सेवेत कायम केल्याचा आदेश दिला विधी विभागाला माहिती न देता त्यानंतर कोर्टात अर्जही सादर केला की आम्ही तिला पात्र असल्याचे मानले आहे. अहर्ता प्राप्त आहे व तिला कायम केले आहे. त्याचबरोबर त्या कोर्टाचा निर्णय येण्याच्या अगोदरच केस विथड्रा झाली आहे. केस विथड्रॉ झाल्यानंतर, आम्हाला वाटत होते की ती अर्हताप्राप्त नाही किवा योग्य नाही तर आम्ही तिला कामावरून कमी करू शकत होतो. श्री. ढाकरे साहेबांचा आदेश असल्याकारणाने तिला नोकरीत कायम झाल्याचे पत्र मिळाले होते. दुसरी गोष्ट अशी की, कोर्टातून केस काढण्या अगोदर स्थायी समितीची मंजुरी असणे आवश्यक आहे. परंतु श्री. ढाकरे साहेबांनी कोणतीही मंजुरी

न घेता तिला कायम केले. यासर्व कायदेशिर अडचणी आहेत. त्यानंतर आताचे आमचे जे मा. आयुक्त साहेब आहेत त्यांनी या प्रकरणाची माहिती घेवून त्यांच्यावर चौकशी करण्याचे शासनाकडे प्रस्तावित केले आहे. आता प्रश्न असा उदभवतो की, कोर्टासमोर आमची अशी बाजु होती की, तिला आम्ही फक्त तात्पुरत्त्या स्वरूपी कामावर ठेवली आहे. व आमच्याकडे कोणतेही पद रिक्त नाही की जेथे तिला समाविष्ट करून घेतले जाईल. अशा परिस्थितीत श्री. ढाकरे साहेबांनी तिच्या बाजुने कोर्टामध्ये अर्ज सादर केला तो कोर्टाच्या आदेशाच्या विरूध्द होता. आता परिस्थिती अशी आहे की, जेव्हा श्री. ढाकरे साहेबांनी आदेश



काढला तो रदद करण्यासाठी त्यांच्यापेक्षा वरीष्ठ प्राधिकारी असला पाहिजे. त्यांनी जेव्हा आदेश काढला तेव्हा ते स्वतः प्रभारी आयुक्त होते. प्रभारी आयुक्तांवर महासभाच नियंत्रण ठेवू शकते. व तसे ही नेमणुक करण्याचे जे अधिकार आहेत ते महासभेला आहेत. जर त्या आदेशास आपल्याला कायम करायचे असेल तर, जर आपणांस वाटत असेल की ती नोकरीत कायम व्हावी. तर निवड समितीपुढे हा प्रस्ताव जावू शकत नाही. कारण की आपण श्री. जे. एम. ढाकरे यांचा आदेश जसा आहे तसा कबुल केला आहे असे होईल. दुसरी गोष्ट अशी आहे की, श्री. ढाकरे साहेबांचा आदेशास आपणांस मान्यता दयावी लागणार नाही. व हे जे प्रकरण आहे ते पुन्हा निवड समितीपुढे आणले जावे. व त्यांचा अहवाल जेव्हा महासभेपुढे येईल तेव्हा योग्य निर्णय घेतला जाईल. तिला कायम केल्याबाबतचा आदेश रदद होईल.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मा. महापौरजी, श्री. ढाकरे साहेबांच्या आदेशास योग्य ठरविणे हे चुकीचे होईल. श्री. ढाकरे साहेबांनी १९९५ पासुन या महापालिकेचे रक्त शोषले आहे. अशा अधिका-याने बरीच चुकीची कामे केली आहेत. अशा अधिका-याच्या चुकीच्या कामास बरोबर म्हणणे म्हणजे त्याच्या चुकीच्या कामात सहभागी झाल्यासारखे होईल. श्री. ढाकरे साहेबांचे जर चालत असते तर त्यांनी या महापालिकेलाच विकुन टाकले असते. परंतु चांगले झाले त्या अगोदरच त्यांची येथुन बदली झाली. श्री. ढाकरे यांनी जी कामे केली त्यांची मी निंदा करतो. त्यांनी आपल्या पदाचा दुरूपयोग केला आहे. महासभेत ठराव पारीत करून त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. व जसे की हे प्रकरण आपणांस निवड समितीकडे पाठवायचे असेल तर जसे महासभा ठरवेल त्याप्रमाणे करावे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, जसे की, आमचे बंधु श्री. मोहन बेहरानी यांनी सांगितले की, ढाकरे साहेबांनी गोर्धन गिदवानी यांना नाल्यावर स्लॅप बांधण्यास सुध्दा परवानगी दिली होती. चुकीची कामे केली आहेत म्हणुन हे योग्य नाही की, त्यांनी केलेल्या चुकीच्या कामास बरोबर म्हणा त्यांनी केलेल्या चुकीच्या कामाबाबत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

<u>मा. सचिवः-</u>याबाबत काय केले जावे? श्री. ढाकरे साहेबांनी दिलेला आदेश रदद करून हे प्रकरण पुन्हा निवड समितीकडे जाईल. त्यांचा अहवाल आल्यानंतर ही महासभा योग्य तो निर्णय घेईल. तोपर्यंत तिची नेमणुक तात्पुरत्त्या स्वरूपाची समजली जाईल. बरोबर? त्यांच्या बरोबरच तिची नेमणुक केली जाईल. सेवाजेष्ठता त्याप्रमाणे धरली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>कोणत्त्याही आयुक्तांना असे अधिकार देता येतात का की अमुक याला कायम केले जावे. सहा महिन्यानंतर...

<u>मा. सचिवः-</u>तो महासभेचा अधिकार आहे.

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>*आणखी अशी दुसरी कुणाची कुणी बेकायदेशिर नेमणुक केली आहे का?

*<u>मा. सचिव:-</u>*आमच्या समोर तर अदयाप काही नाही.

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>*ते जेथे गेले आहेत तेथे सुध्दा हा प्रस्ताव पाठविला जावा की पुन्हा त्यांनी अशी चुक करू नये.

*<u>मा. सचिव:-</u>*ठिक आहे. ठराव या प्रकारे पास?
*<u>मा. महापौर:-</u>*या प्रस्तावाबाबत खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

--२६--

<u>विषय:-</u> श्रीमती. माया लासी महानगरपालिका लिपिक यांची महापालिका सेवेतील अनियमित नियुक्ती रददबादल करणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

_ तत्त्कालीन प्रभारी आयुक्त श्री. जे. एम. ढाकरे यांनी श्रीमती. माया लासी लिपीक लेखा विभाग यांचे प्रकरणी मा. औद्योगीक न्यायालय ठाणे यांचेकडे संयुक्तीक पुरसीस दाखल केलेले होते. त्यामध्ये संबंधीत कर्मचारी यांना नोकरीत कायम स्वरूपी सामावून घेण्याचे मान्य केले आहे. त्या अनुषंगाने आदेश क्र. उमपा/ साप्रवि/ आका/३१ दिनांक १४.५.२००१नुसार तत्त्कालीन प्रभारी आयुक्त पदाच्या अधिकारात श्रीमती. माया लासी यांना लिपिक पदावर कायम करण्याचे आदेश काढलेले आहेत.

मा. औद्योगिक न्यायालय ठाणे येथे पुरसीस दाखल करणे पुर्वी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ (ह)अन्वये तत्त्कालीन प्रभारी आयुक्त यांनी महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेणे आवश्यक होते, तसे केल्याचे कागदोपत्री दिसत नाही. तसेच मा. औद्योगिक न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे निवड समितीपुढे संबंधीत कर्मचारी यांना कायम करण्याचे प्रकरण ठेवून निर्णय घेणे उचित होते. सदर प्रकरणात निवड समिती व महापालिका यांना विचारात न घेता प्रभारी आयुक्त यांनी परस्पर संबंधित कर्मचारी यांना महापालिका सेवेत कायम करण्यांची कृती ही बेकायदेशिर ठरते.

सबब सदर प्रकरणातील कर्मचारी श्रीमती. माया लासी यांना प्रभारी आयुक्त यांनी आदेश क्रमांक उमपा/आका/३१/ दिनांक १४.५.२००१ अन्वये महापालिकेत सामावून घेण्याचे काढलेले आदेशांचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये नियुक्ती प्राधिकारी या नात्त्याने पुनर्विलोकन करून रदद बादल ठरवणेसाठी महासभेसमोर प्रस्तावित केले आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ३४ <u>दिनांक:-१९.१०.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :-श्रीमती सोनेजी मिना (सोंडे)

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार तत्त्कालीन प्रभारी आयुक्त श्री. जे. एम. ढाकरे यांनी श्रीमती. माया लासी यांना लिपिक पदावर कायम करण्याचे

दि. १४.५.२००१ चे आदेशास मान्यता देत नाही.तसेच याप्रकरणी महापालिकेच्या निवड
समितीला निर्देश देत आहे की, त्या अहर्ता प्राप्त आणि योग्य आहे किंवा रितसर पध्दतीने त्यांची नेमणुक करणेस पात्र आहे की नाही याबाबतीत छाननी अंती शिफारसीसह आपला अहवाल सादर करतील.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

--१७--

<u>विषय :- उल्हासनगर शहरातील अवैध नळजोडण्या नियमित करणे बाबत.</u>

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, हा जो विषय आहे आज पासुन एक-दोन वर्षापुर्वी अनाधिकृत नळजोडण्या नियमित करण्याचा एक ठराव आम्ही पारीत केला आहे. १०४०/-रू. घेवून ब-याचशा अनाधिकृत नळजोडण्या नियमित केल्या होत्त्या मी माझ्या प्रभागातील लोकांना सांगितले होते की, ज्या कुणाची अनाधिकृत नळ जोडणी असेल तर त्यांनी ती नियमित करून घ्यावी. कित्त्येक लोकांनी त्यावेळी १०४०/- रू. भरून नळजोडणी नियमित करून घेतली होती. आता जो अनाधिकृत नळ जोडणी नियमित करण्याचा प्रस्ताव आला आहे. तर ही नळ जोडणी नियमित करण्यासाठी ना खड्डा खोदण्याची आवश्यकता आहे ना बोरींग करण्याची आवश्यकता आहे. त्यांची नळ जोडणी त्यांच्या घरापर्यंत, इमारतीपर्यंत घेतलेली आहे. त्यांना इतर दुसरा काहीही खर्च नाही. दोन वर्षापुर्वी जसे पैसे घेत होते त्याप्रमाणे घेतले जावे. व हा प्रस्ताव वगळला जावा. पुर्वीचा ठराव लागु केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>अवैध नळजोडण्या बाबत या प्रस्तावामध्ये अशी नोंद आली आहे की, एक महिन्याच्या आत केले जावे. तर हा कालावधी वाढविला जावा. कमीत कमी सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>अनाधिकृत नळ जोडणी नियमित करण्याचा कालावधी फक्त एक महिन्याचा दिला आहे.

<u>मा. सचिवः-</u>जर विषयच वगळत आहात तर त्यामध्ये आपण काय सुधारणा करणार?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>पहिला ठराव लागु करावा.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-याबाबत मी दोन शब्दामध्ये विचार मांडु इच्छितो. जसे की इथे आम्ही म्हणतो की, अनाधिकृत नळ जोडण्या व अधिकृत नळ जोडण्या, यांचा प्रश्न आता येथे उपस्थित झाला आहे तर मी हे सांगु इच्छितो की, मागच्या वेळी जी महासभा चालु होती त्यामध्ये मी असा मुददा उपस्थित केला होता की कल्याण मध्ये जे पाणी जाते त्या पाण्याचे एक तर बिल घेतले जावे किंवा त्या नळजोडण्या तोडल्या जाव्यात. जेव्हा आमच्या शहरातील लोक पाण्याची बिले भरत नाहीत तेव्हा त्यांच्या नळ जोडण्या तोडल्या जातात किंवा अवैध नळजोडण्या असतील तर नळजोडण्या तोडल्या जातात. परंतु कल्याण मध्ये आमच्या शहरातील जे पाणी जात आहे. त्या नळजोडण्या तोडल्या जात नाहीत. व पैसे सुध्दा घेतले जात नाहीत. मागील महासभेमध्ये देखिल असे म्हंटले होते की, एक महिन्यामध्ये नोटीस देऊन २ कोटी रू. ची वसुली आम्ही त्यांच्याकडुन करू पंधरा दिवसात परंतु एक महिना झाला तरी सुध्दा काही झाले नाही. अत्त्यंत खेदाने असे म्हंटले जाते की मला एक मुददा पुन्हा पुन्हा उपस्थित करावा लागतो. असे कित्त्येक मुददे आहेत जे मी आज लिहुन आणले आहेत. मागील महासभेत त्यांच्यावर निर्णय झालेला आहे. आपण आश्वासन दिलेले आहे. परंतु त्या आश्वासनावर काहीही कारवाई झालेली नाही. मी आयुक्तांकडुन हे जाणुन घेवू इच्छितो की, पंधरा दिवसामध्ये २ कोटी रू. जे कल्याण महापालिकेकडुन वसुल झाले नाहीत. त्याबददल काय झाले? आमच्या महानगरपालिकेच्या हददीतील कुणाचे १०-१५ हजार रूपयांचा हाऊस टॅक्स बाकी असेल तर त्यांची जप्ती काढली जाते. त्यांच्या नळ जोडण्या तोडल्या जातात. काय आम्ही आमच्या शहरवासियांवर सावत्रपणाचा व्यवहार करत नाहीत?



मा. महापौर:-आपण बसून घ्याल तर आयुक्त साहेब आपणांस खुलासा करतील.

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सदस्य मी समजतो की ही जी महासभा आहे. येत्त्या दिवाळीच्या अगोदरची शेवटची महासभा असेल दीवाळीच्या नंतर दुसरी महासभा होईल या वेळेचा फायदा घेवू इच्छितो व येत्त्या दिवाळीच्या शुभेच्छा महापौर व उपमहापोर व सर्व सदस्यांना देवू इच्छितो. व अशी सदिच्छा प्रकट करतो की, येणारा सण हा महाराष्ट' किंवा भारतातील सर्वात मोठा सण आहे. तो सण व येणारे वर्ष सर्वांना सुखसमृध्दीचे व भरभराटीचे जावो अशी सदिच्छा प्रकट करून आजचा जो अनाधिकृत नळजोडण्यांचा विषय जो मा. महासभेसमोर ठेवला आहे त्याबाबत सांगु इच्छितो मा.सभागृह नेता श्री. किशोर वनवारी यांनी मुददा उपस्थित केला की यापुर्वी अनाधिकृत नळजोडण्यांचे नियमितीकरण केले आहेत. त्यावेळी १०४०/-रू. अनाधिकृत नळजोडण्या धारकांकडुन वसुल केले आहे. अनाधिकृत नळ जोडण्यांची मोहीम उघडल्यानंतर तिचा कालावधी संपल्यानतर आपल्या समोर हा नविन प्रस्ताव ठेवला आहे. मी निवेदन करू इच्छितो की हा जो अनाधिकृत नळजोडण्या नियमित करण्याचा प्रस्ताव आपल्या समोर आहे त्याच पध्दतीने नागपुर महानगरपालिका, मीरा-भाईंदर महानगरपालिका, ठाणे महानगरपालिकेने प्रस्ताव ठेवला आहे. व तो मंजुर सुध्दा झाला आहे. माझी आपणांस विनंती आहे की जे कुणी अनाधिकृत नळजोडण्या घेतात. ते तर बेकायदेशिररित्त्या घेतात. व बेकायदेशिर असल्यामुळे ते नळजोडण्याव्दारे पाणी तर घेतातच परंतु जेव्हा आम्ही त्या नळजोडण्या तोडण्यास जातो तेव्हा बरेचसे प्रश्न उपस्थित होतात. जसे की काही लोक किंवा लोकप्रतिनिधी समोर येतात व ते थांबविण्याचा प्रयत्त्न करतात. एक प्रकारे या नळजोडण्या नियमित केल्या तर महानगरपालिकेस महसुल येवू शकेल. आमची महापालिका अतिशय आर्थीक संकटात आहे. व तिला महसुलाची

अतिशय आवश्यकता आहे. व जे अनाधिकृत नळजोडण्या करतात त्यांनी न जाणे कधी खड्डा खोदला असेल त्याचवेळी आमच्या महानगरपालिकेच्या मिळकतीचे व मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. व आता त्याची जी खड्डा फी आहे किंवा पुर्नजोडणी शुल्क आहे त्यामध्ये चुकीचे काहीच नाही. कारण की नुकसान तर अगोदर पासुनच झाले आहे. व दुसरी गोष्ट मी आपल्या लक्षात आणु इच्छितो की जे अनाधिकृत नळ जोडण्या घेतात त्याच लोकांना अशी जाणीव झाली पाहिजे की अनाधिकृत रित्त्या काहीतरी आर्थीक शिक्षा किंवा काहीतरी आर्थिक बोजा सहन करणे जरूरीचे होते. असे केले नाही तर टॅक्स वसुल होणार नाही. व मला असे वाटते की, नळ जोडण्या नियमित करण्याकामी कमी पैसे वसुल केले तर लोकांमध्ये चुकीचा संदेश जाईल की हजार रू. भरा व कोणतीही नळ जोडणी घ्या. लोकांमध्ये चुकीचा संदेश जाईल व आम्हाला महसुलही कमी मिळेल म्हणुन मी आपणांस निवेदन करू इच्छितो विनंती करतो. नागपुर, ठाणे, मीरा-भाईंदर या महापालिकांनी ज्याप्रमाणे प्रस्ताव तयार केला होता त्या प्रमाणेच रक्कम निश्चित केली आहे. तेवढीच रक्कम आम्ही वसुल करत आहोत. माझी आपणांस विनंती आहे की, आपण तेवढीच रक्कम त्यात जास्त काही कमी न करता केले तर बरे होईल, योग्य राहील.

मा. सदस्य श्री. मोहनदास रामरख्यानी, श्री. श्यामसुंदर रोहडा, श्रीमती. नीना नाथानी, श्रीमती. कोमल भठिजा, श्रीमती. भारती छाब्रीया हे सायंकाळी ७.५५ वाजता सभागृहातून बाहेर पडले.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः</u>-आयुक्त साहेब, कल्याण महापालिकेकडुन येणा-या पैशाचे काय झाले? त्याचा खुलासा करण्याबाबत सांगितले होते.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः</u>-मी जो प्रश्न विचारला होता मागील महासभेत त्या प्रश्नाबाबत आपण म्हंटले होते की, पंधरा दिवसात आम्ही वसुली करू. दोन कोटी रू. वसुल करण्याचे श्री.डेग्मवार साहेबांनी सांगितले होते. ती जी वसुली झाली नाही. आमच्या शहर वासियांवर आपण जप्ती वॉरंट काढत आहात.



<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर)</u>:-सन्माननिय महापौर महोदया, आता हा प्रश्न नियमित स्वरूपाने समोर आलेला नाही. परंतु सन्माननिय सदस्य व महापौरांची इच्छा असेल तर मी उत्तर देवू इच्छितो हा जो पाणी पुरवठा बाजुच्या गावांना होत आहे. पहिल्यापासुन चालु आहे. व पहिल्यापासुन चालु असल्यामुळे जेव्हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडुन ही योजना हस्तांतरीत करून घेतली तेव्हापासुन चालु आहे. व या रक्कमेची मागणी कल्याण महानगरपालिकेकडे आमची चालु आहे. आम्ही त्याचा पाठपुरावा करत आहोत. वारंवार त्यांच्याकडे आम्ही मागणी करत आहोत. व त्यांची पण काहीतरी अडचण आहे असे त्यांच्याकडुन आम्हास सांगण्यात आले. व ही रक्कम वसुल करण्याची कार्यवाही चालु आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः</u>-मा. महापौर महोदया, मी आयुक्त साहेबांकडुन हे आश्वासन घेवू इच्छितो, उल्हासनगरमध्ये अगोदरच पाण्याची स्थिती एवढी खराब आहे. त्यांनतरही आमच्या शहराच्या आजुबाजूची जी गावे आहेत ती तेथुन नळजोडण्या घेण्यासाठी वारंवार प्रयत्न करत आहेत. मंत्रालयातून व अन्य ठिकाणावरून मागणी होत आहे. आयुक्तांना आदेश दया की तेथुन नळ जोडण्या देवू नयेत. आधीच येथे पाण्याची ही अवस्था आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः</u>-जसे की आयुक्त साहेबांनी म्हंटले की, हे माझ्या लक्षात आले नाही. मागील महासभेच्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १३ते २८ वर जी नोंद

आली आहे. त्याबाबत आपण जो खुलासा केला होता व आश्वासन दिले होते. पृष्ठ क्र. २७ वर सुध्दा नोंद आलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. चिमण रूपाणीः-</u>मा. महापौर या विषयाबाबत मी एक प्रश्न विचारू इच्छितो या ज्या अनाधिकृत नळजोडण्या आहेत ज्या दहा हजार येथे दर्शविण्यांत आल्या आहेत. मला असे वाटते की ज्या पध्दतीने शहरामध्ये अनाधिकृत नळजोडण्या होत आहेत यापेक्षा कित्येक पटीने जास्त आहेत. ज्यांचा शोध घेणे अतिशय मुश्किलीचे आहे. मी प्रशासनाकडुन हे जाणुन घेवू इच्छितो की, याची माहिती कशी मिळेल? त्यांच्याकडुन दंड कसा वसुल होईल? आज महापालिकेला पैशाची अतिशय जरूरी आहे. व पाण्याचा हाहाकार माजला आहे. एकीकडे पैसे न भरता लोक पाणी वापरत आहेत. ज्यांचा पैसा महापालिका भरत आहे.

<u>मा. महापौरः-</u>मी श्री. चिमण रूपाणी साहेबांना सांगु इच्छिते की कृपया आपण बसुन घ्यावे. कारण की ही प्रश्नोत्तराची वेळ नाही. सभा सूचनेवरील विषयांवर चर्चा चालु आहे.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>मा. महापौरजी,....

<u>मा. महापौरः-</u>मी सांगितले ना की सभा सुचनेवरील विषयांवर चर्चा चालु आहे. मध्ये कुणी बोलु नये.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>सभा सूचनेवरील विषयावरच बोलायचे आहे. सत्ताधारी पक्षाचा सदस्य असून बोलु दिले जात नाही तर इथे बसुन काय फायदा आहे?

<u>मा. महापौरः-</u>आता प्रश्नोत्तरे तर चालु नाहीत ना?

मा. सदस्य श्री. शांताराम निकम हे सायंकाळी ७. ०० वाजता सभागृहातून बाहेर पडले.

--३०--

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>मा. महापौरजी, मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, दिवाळीचा सण जो सर्वांचा सण आहे तो जवळ येत आहे. तर आज पाण्याविषयी जी चर्चा चालु आहे...

<u>मा. महापौरः-</u>श्री. अशोक ठाकुरजी कृपया आपण बसुन घ्या ना?

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>फक्त एक सेकंद मी बोलतो.

<u>मा. महापौरः-</u>श्री. शांताराम निकम सभागृहातुन बाहेर पडले आहेत. कृपया आपण बसुन घ्या ना.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>आता जो सण आहे त्याविषयी मी बोलत आहे. शहरात सर्वांच्या घरामध्ये साफसफाईचे काम चालु आहे. व पाण्याची जास्त जरूरी आहे. परंतु शहरात अगोदरच पाण्याची समस्या आहे. पुन्हा एम.आय.डी.सी वाले जाणीवपुर्वक समस्या निर्माण करत आहेत. त्यांच्यावर काहीतरी नियंत्रण असले

पाहिजे. एमआयडीसी वाल्यांनी आपली मनमानी करू नये. म्हणुन त्यावर लक्ष दीले जावे.

मा. सचिवः- या प्रस्तावाचे काय करायचे मंजुर करायचे?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-तो जो निर्णय जी मोहीम पुर्वी चालु होती. मध्यंतरी बंद झाली होती. ती चालु केली जावी. आधीच शहरात पाणी नाही.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-सचिव साहेब, हा विषय वगळला पाहिजे. प्रत्येक अनाधिकृत नळ जोडणीमागे ३०००/- रू. या शहरामध्ये कुणीही भरण्यास तयार होणार नाही.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-१०४०/-रू.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-प्रस्ताव ३०००/- रू. चा आहे.

मा. उपमहापौरः-१०४०/-रू.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-तो जुना प्रस्ताव आहे.

मा. उपमहापौरः-तोच पुढे चालु ठेवत आहोत.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-हा नविन प्रस्ताव वगळला पाहिजे.

मा. सचिवः-हा प्रस्ताव वगळला जावा? ठिक आहे.

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर शहरातील अवैध नळजोडण्या नियमित करणे बाबत.

मा. सचिवः-विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

विषय :-संत गाडगे बाबा नागरी स्वच्छता अभियानात महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक प्रशासकीय प्रभागातील सर्वात स्वच्छ प्रभागास बक्षिसे देणे बाबत.



मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-अतिशय चांगली गोष्ट आहे. मी दोन शब्द बोलु इच्छितो, जे चांगले काम करतात त्यांना पुरस्कार मिळाला पाहिजे परंतु जे प्रभाग गलिच्छ आहेत त्यांच्याशी संबंधित अधिका-यांवर काय कार्यवाही केली जाईल. हे सुध्दा स्पष्ट झाले पाहिजे.

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-मा. महापौरजी, खुपच चांगला प्रस्ताव आहे. परंतु हे काम करण्यासाठी स्वच्छता करण्यासाठी जी मनुष्य शक्ती आहे किंवा कामासाठी आणण्यांत येणारी जी काही साधनसामुग्री आहे तीच दिली नाही तर काम कसे होईल? आमच्या प्रभागांमध्ये आठ-दहा कामगार आहेत. आठ महिला व दोन पुरूष कामगार काम करत आहेत. ऐवढया मोठ्या प्रभागांमध्ये या कामग्ारांनी स्वच्छता कशी होणार? आताच स्वच्छता होत नाही तर यापुढे अधिक स्वच्छता होईल. मला असे वाटते की हा अतिशय चांगला प्रस्ताव आहे यावरोबर ज्या ज्या प्रभागांमध्ये

कामगारांची कमी आहे ती पण दुर केली जावी. व तेथील जे सॅनिटरी इन्स्पेक्टर असतील त्यांना प्रत्येक सोयी सुविधा सामुग्री दिली जाणार नाही तोपर्यंत कामे कशी होतील? त्यांना सामुग्री दिल्यानंतर मनुष्यबळ दिल्यानंतरही जर ते अपयशी ठरले तर त्यांच्यावरही योग्य ती कारवाई केली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. चिमन रूपाणीः-</u>मा. महापौरजी, याविषयावर मी काही बोलु इच्छितो की जे सफाई कामगार खुप चांगले काम करतात. त्यांना पण जर पुरस्कृत केले तर त्यातुन दुस-यांनाही प्रोत्साहन मिळेल. माझ्या प्रभागात एक महिला सफाई कामगार आहे. मा. महापौरजी, आपल्याच समाजाची महिला आहे. तिने अतिशय चांगले काम केले आहे. मी माझ्या लेटरहेडवर त्याबाबतचे पत्र ०५
प्रशासनाला दिले आहे. अशा प्रकारे त्यांना पुरस्कृत केले पाहिजे. श्रीमती. कमलेश करोतिया नावाची महिला आहे. तिच्यापासुन दुस-यांना प्रोत्साहन मिळेल व प्रत्येक प्रभागात सफाईचे काम चांगल्या प्रकारे होईल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u> मा. महापौरजी, आमच्या सदस्यांनी आता जे म्हंटले, व आता जो मुददा उपस्थित झाला की ज्याच्या प्रभागात अतिशय चांगल्या प्रकारे स्वच्छता साफसफाई होईल त्यास ३ लाख, २ लाख, १ लाख नं.१ ,२ ,३ , पारितोषिक दिले जाईल. शासनातर्फे देखिल ५ लाख रू. पर्यंतचे जे पारितोषिक आहे ते जे मिळणार आहे. कोर्टाच्या आदेशानुसार जर सफाई कामगारांची नियुक्ती झाली, व ज्या-ज्या पॅनेलमध्ये सफाई कामगार कमी आहेत, ते जर दिले गेले आमचे जे आरोग्य निरिक्षक आहेत ते काम करण्यास सक्षम आहेत, परंतु कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने खुपश्या प्रभागात सफाई होत नाही, काही काही सदस्यांनी सांगितले की , साहित्य अपुरे आहेत. झाडु, डी.डी.टी. पावडर, घमेली त्यापण वस्तु उपलब्ध करून दयाव्यात. सर्वात ज्वलंत समस्या आहे, एक आठवडा झाला,अंडरग्राउंड ड्नेजचे काम बंद झाले आहे. आमची एअरटेकची जी गाडी चालली होती,चेंबर्स उघडण्यासाठी परंतु ठेकेदारांना पेमेंट दिले नाही म्हणून त्यांनी ते काम बंद केले. कृपया करून त्या ठेकेदाराकडे बसून सेटिंग करून त्यांना पेमेंट देण्याचे आश्वासन देऊन काम चालु करावे. किंवा दुस-या ठेकेदाराला आदेश देऊन ते काम सुरू करण्यात यावे. आमचे नगरसेवक बंधु श्री. सतरामदास जेसवानी जेव्हा पासून महासभा सुरू झाली आहे, सारखे माझ्या कानात सांगत आहे की, मेहरबानी करून चेंबर्सचे कव्हर तुटले आहे, व एक आठवडा झाला चेंबर्स बंद आहेत. स्थायी समितीमध्ये चर्चा झाली त्यानुसार एअरटेकची दुसरीपण गाडी घ्यायची आहे. एक नंबर पासून ते पाच नंबर पर्यंत एकच ट्रक जाते चेंबर मोकळे करण्यासाठी, दुसरी पण गाडी मागविली जावी. म्हणजे एक-दोन-तीन कॅम्प मध्ये एक गाडी व चार-पाच कॅम्प मध्ये दुसरी गाडी जाईल. म्हणजे मोठे-मोठे चेंबर्स तर मोकळे होतील. तर कृपया करून आमचे सदस्य संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान नुसारचे बक्षीस घ्यायला तयार आहेत, परंतु सुविधा करून देऊ आपले कर्तव्य आहे. इतके करून दया आम्ही सक्षम आहोत बक्षीस घ्यायला, त्या बक्षीसाचा



उपयोग देखील प्रभागासाठी केला जाईल. ही खूप चांगली योजना आहे, परंतु याच बरोबर आमची समस्या आयुक्त लक्षात घेऊन सोडवतील व दोन शब्द जे बोलणार आहेत, त्यात या गोष्टीचा खुलासा करतील.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u> महापौर महोदया, संत गाडगे बाबा, नागरी स्वच्छता अभियान, ही योजना शासन पुरस्कृत आहे. आणि शासनातर्फे सर्व महाराष्ट्रात ही राबविण्यात येणार आहे. नागरी स्वच्छतेकडुन आरोग्याकडे पर्यायाने विकास आणि समृध्दी कडे वाटचाल असा यांचा उददेश आहे. आणि या

अभियानामध्ये पाच फे-या होणार आहेत. शासनाची मुख्य कल्पना अशी आहे की, शहरात किंवा गावात स्वच्छता झाली पाहिजे. त्याच्यातून आरोग्य वृध्दिंगत होते, विकास होतो, समृध्दीकडे वाटचाल होते, तर यासाठी लोकांचा सहभाग हा एक शासनाचा उददेश आहे. शासनाचा उददेश आहे, लोकप्रतिनिधी आणि लोकांचा सहभाग असला पाहिजे. शासनाने याबाबतीत जेव्हा एक वर्कशॉप दिला होता, जेथे महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री , नगरविकास मंत्री, सर्व महापौर, सर्व आयुक्त उपस्थित होते, त्यावेळी असे सांगितले गेले आहे की, हा जो अभियान आहे, तो लोकांचा अभियान आहे. हा अभियान आहे तो प्रशासन आणि शासनाचा अभियान आहे. आणि यात दोघांचा सहयोग असला पाहिजे. त्याचवेळी मा. मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, आम्ही जेव्हा हे संत गाडगेबाबा महाराज अभियान जेव्हा ग्रामीण भागात सुरु केले, त्याचवेळी शासनाने ५ करोड रुपये खर्च केले, आणि पाचशे करोड रुपयांचे काम करुन घेतले. म्हणजे लोकांच्या सहभागातून पाचशे कोटीचे काम करुन घेतले. यामध्ये देखील उपलब्ध साधन सामग्री जी आहे, त्यातून आपण काम करावयाचे आहे, जास्त खर्च करण्यास शासनाचे आदेश नाहीत. उपलब्ध साधन सामुग्रीतूनच काम करावयाचे आहे. लोकांना बिनसरकारी संघटना(एनजीओ) व सन्माननिय प्रतिनिधी यांनी सकिय सहभाग घ्यायचा आहे, स्वावलंबन करावयाचे आहे, असे पण त्यात सांगितले आहे. मी तुम्हाला विनंती करु इच्छितो, निवेदन करु इच्छितो, या अभियनामध्ये आपण सर्व सक्रिय सहभाग घ्याल. आपल्याला ज्या पाच फे-या पूर्ण करावयाच्या आहेत, त्यात पाच बक्षिसे दयायची आहेत. पहिल्या व दुस-या फेरीचे बक्षीस महापालिकेतर्फे येईल व तिसरे जे बक्षीस आहे, ते प्रत्येक नगरपालिकेला पाच लाख शासनातर्फे मिळणार आहे. त्यात समितीदेखील आहे. प्रारुप स्वरुपाचा असे माहितीपत्र सर्व सदस्यांना दयावे लागेल. तुम्ही सर्वांनी यात भाग घ्यावा. उल्हासनगर शहराची आजपर्यंत अशी प्रतिमा बनली की हे एक अस्वच्छ शहर आहे. कमीत कमी शहर ही स्वच्छ होईल, तसेच या अभियानाबरोबर शासनाने १० मुददे दिले आहेत, प्रत्येक दहा मुददयात दहा-बारा मुददे दुसरे आहेत, ज्या आधारे बक्षीस दिले जाईल तिस-या फेरीचा जो मुददा आहे. तो मी तुम्हाला वाचून दाखवितो, ज्यात आदर्श महानगरपालिकेच्या रुप समोर मांडले गेले आहे. यात दहा मुददयांवर मार्किंग केली जाईल व गुणवत्तेचा विचार केला जाईल. तिसरी फेरी ही दूस-या महानगरपालिकेची उल्हासनगर शहरात येईल. दहा मुददे मी वाचुन दाखवितो.

१) पिण्याचे पाणी पुरवठा व व्यवस्थापन
२) शौचालय व्यवस्था व व्यवस्थापन
३) घनकचरा व्यवस्थापन
४) सांडपाणी व्यवस्थापन
५) सार्वजनिक आरोग्य व वैयक्तिक स्वच्छता
६) कुटूंब कल्याण कार्यक्रम
७) नागरी सुविधांची उपलब्धता व स्थर
८) शहर रचना, व्यवस्था व सुशोभिकरण
९) नागरी संस्थेतील मनुष्यबळ व्यवस्थापन
१०)नागरी संस्थेचे आर्थिक व्यवस्थापन

--३३--

१० व्या मुददयाप्रमाणे महापालिका आपले कर्ज चांगल्या त-हेने परतफेड करत आहे की नाही? ते पण बघणार खूप सविस्तर पणे सांगायला आता वेळ नाही. म्हणून मी लिखित स्वरुपात तुम्हाला ही माहिती देईल. व मी तुम्हाला निवेदन करु इच्छितो कमीत कमी तिस-या फेरीत येण्यासाठी पन्नास गुण प्राप्त करावयाचे आहे.

जर पन्नास गुण प्राप्त नाही झाले तर अपात्र ठरु. मी वारंवार तुम्हांला निवेदन करु इच्छितो की, सर्व सदस्यांनी आम्हांला सक्रिय स्वरुपात मदत करावी. जेणेकरुन आपले उल्हासनगर शहर स्वच्छ व सुंदर शहर होईल.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा</u>:-साहेब , हे सर्व होण्यासाठी किती वेळ लागेल?

<u>मा. आयुक्त (श्री.बी.आर. पोखरकर)</u>:-त्यांनी कालमर्यादा दिली आहे. त्यांची कालमर्यादा अशी आहे, प्रथम फेरीची वेळ मर्यादा निश्चित केलेली आहे. पहिल्या फेरीची तपासणी कालावधी १४ नोव्हेंबर ते ७ जानेवारी पर्यंत ती चालेल. दुसरी फेरीचा कालावधी १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी पर्यंत, आणि तिसरी फेरी आहे, २५ फेब्रुवारी ते २५ मार्च. लिखित स्वरुपात तुम्हांला माहितीपत्र दिले जाईल.

<u>मा. सचिव</u>:-प्रस्ताव मंजुर........?

<u>मा. सदस्य</u>:-मंजूर.....

<u>मा.महापौर</u>:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषयः-</u> संत गाडगे बाबा नागरी स्वच्छता अभियानात
<u>महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक प्रशासकीय प्रभागातील</u>
<u>सर्वात स्वच्छ प्रभागास बक्षिसे देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावनाः-</u>

शहरांची स्वच्छता व्हावी व शहरी भागातील सर्वसामान्य जनतेचे आरोग्यमान व पर्यायाने जीवनमान उंचावे व पर्यावरणात सुधार व्हावा या उददेशाने नागरी स्वच्छता कार्यक्रमांतर्गत जे कार्यक्रम आखण्यात येतात त्या कार्यक्रमांची परिणाम कारक अंमलबजावणी करून नागरी भागातील स्वच्छतेची परिस्थिती सुधारण्यासाठी नागरिकांचा उस्फुर्त सहभाग व सहकार्य अपेक्षित आहे.

संत गाडगेबाबा यांचे नावाने दिनांक १४.११.२००२ पासुन नागरी भागातसुध्दा हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात ज्या महानगरपालिका हिरीरीने सहभागी होती त्यांच्यातून उत्त्कृष्ट कार्य करणा-या महानगरपालिकांना पारितोषिके देण्यात येतील. या अभियानात महापालिका गटांसाठी एकुण ५ फे-या शासकीय आदेशान्वये आयोजित केल्या जाणार आहेत. त्यापैकी गट क्रमांक १ मधील १ ली फेरी व २ री फेरीमधील बक्षिसे महापालिका निधीतुन पायोजित करून द्यावयाची आहेत. तिस-या, चौथ्या व पाचव्या फेरीतील बक्षिसे राज्य शासनाकडुन देण्यात येणार आहेत. सबब, उल्हासनगर महापालिकेतुन या अभियांनातर्गत द्यावयाची बक्षिसे पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

अ) पहिली फेरी :- पहिल्या फेरीत महापालिकेतील प्रशासकीय वार्डातील / प्रभाग समिती वार्डातील सर्व प्रभांगाची स्पर्धा घेवून त्यातुन गुणानुक्रमे प्रथम, व्दितीय क्रमांकाच्या प्रभागाची निवड करावयाची आहे. यासाठी महापालिकेतील स्वतंत्र

घटक गृहीत धरून प्रत्येक प्रशासनिक वार्ड / प्रभाग समितीतील वार्ड स्तरावर स्पर्धा घेवुन पुढीलप्रमाणे बक्षिसे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१ ले बक्षिस - रू. २ लाख - ४ प्रभाग समिती वार्डाना २ लाख प्रमाणे ८ लाख रूपये
२ रे बक्षिस - रू. १ लाख - ४ प्रभाग समिती वार्डांना १ लाख प्रमाणे ४ लाख रूपये अशाप्रकारे पहिल्या फेरीसाठी एकुण १२ लाख रूपये खर्च अपेक्षित आहे.

ब) दुसरी फेरी :- पहिल्या फेरीत प्रत्येक प्रशासकीय वार्डातुन / प्रभाग समिती वार्डातुन प्रथम आलेल्या वार्डामधुन संबंधित महापालिकेतील गुणानुक्रमे सर्वात स्वच्द कमला ३ वार्डांची निवड करणेत येईल. या फेरीतील बक्षिसांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

१ ले बक्षिस - रू. ३ लाख
२ रे बक्षिस - रू. २ लाख
३ रे बक्षिस - रू. १ लाख

उपरोक्त रक्कम संबधित प्रभाग समिती वार्डातील नागरी सुविधांवर खर्च करण्यात यावी. तसेच ज्या प्रभाग समिती वार्डात बक्षिसे मिळतील त्या वार्डातील सर्व नगरसेवक, स्वच्छता निरीक्षक यांना देखिल प्रमाणपत्रे, प्रतिकात्मक बक्षिसे देण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी सदरच्या प्रस्तावास महासभेची मान्यता मिळणेसाठी विषय महासभेत सादर करण्यात यावा असे वाटते, मान्य असल्यास सोबत जोडलेल्या गोषवा-यावर स्वाक्षरी होणेस विनंती आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३५</u> <u>दिनांकः-१९ १० २००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती सोनेजी मिना (सोंडे)

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार संत गाडगे बाबा नागरी स्वच्छता अभियानात महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक प्रशासकीय प्रभागातील सर्वात स्वच्छ प्रभागास उक्त बक्षीसे देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी

--३५--

<u>मा. सचिवः</u>-विषय क्र. ९ वाचून दाखवितात.

<u>विषयः-</u> उल्हासनगर-३ येथील सेंट्रल हॉस्पीटल समोरील चौकास <u>''मर्हषी वाल्मिकी चौक'' असे नाव देणे बाबत.</u>

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः</u>-खुप चांगला प्रस्ताव आहे.

(इकडे प्रेषक वर्गातुन महापौर आगे बढो ,हम तुम्हारे साथ है, महापौर जिंदाबाद अशा घोषणा देण्यात आल्या.)

<u>मा. महापौरः</u>-मी मा. आयुक्त, मा. उपमहापौर, मा. सचिव, व सर्व सन्मानिय सदस्यांना हा प्रस्ताव मंजुर केल्याबददल हार्दिक धन्यवाद देत आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः</u>-सदरचा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता त्वरीत अंमलात आणण्यात यावा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवाणीः-</u> जसे सभागृह नेत्यांनी सांगितले त्याप्रमाणे ठराव पारित करा. तसेच हे पण चौकशी करा की, तिथे दुसरे तर नाव नाही दिले? जसे दुनिचंद कालानी प्रवेशद्वाराचे झाल?

<u>मा.महापौरः</u>-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषयः-</u> उल्हासनगर-३ येथील सेंट्रल हॉस्पीटल समोरील <u>चौकास ''मर्हषी वाल्मिकी चौक'' असे नाव देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावनाः-</u>

उल्हासनगर-३ येथील सेंट्रल हॉस्पिटल समोरील चौकास ''महर्षि वाल्मिकी चौक'' असे नामकरण करणे करिता प्रस्ताव आलेला आहे.

उक्त चौकाचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त चौकाच्या जागेवर कोणताही चौकाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. त्यामुळे प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर चौकांचे '' महर्षि वाल्मिकी चौक'' असे नामकरण करण्याकरिता महासभेची मंजुरी मिळणेकरिता प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ३६ <u>दिनांकः-१९.१०.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्रीम. मोना वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्रीम. कमला शर्मा

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-३ येथील सेंट्रल हॉस्पीटल समोरील चौकास ''महर्षि वाल्मिकी चौक'' असे नाव देणेस मान्यता देत आहे.

--३६--

वरील निर्णय अंतर्भूत असणारा ठराव कार्यवृत कायम होण्याची वाट बघितल्या शिवाय, त्वरीत अंमलात आणण्यासाठी तो कायम झाल्याचे समजण्यात येईल व पुढील सभेत कार्यवृत्त कायम होण्यापूर्वी तो अंमलात आणता येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी<br>सर्वसाधारण महासभा<br>उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :</u>-विषय क्र. १० वाचून दाखवितात.

<u>विषयः-</u> भोगवटा प्रमाणपत्र देण्यापुर्वी बाल्कनी बंदिस्त केल्यास दंडात्मक कारवाई करून कायम स्वरूपी करणे कामी <u>अधिमुल्य बसविणे बाबत.</u>

<u>काही सदस्य :-</u> पास-पास.........

<u>मा. सचिवः</u>-शासनाच्या आदेशाच्या अधिन राहून.......

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः</u>-शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून त्वरीत प्रस्ताव पाठवावा.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणीः</u>-कालमर्यादा दिनांक काही ठेवला आहे का?

<u>मा. सचिव :-</u> गोषवारा तुमच्या समोर आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेश वधारियाः</u>-यात एम.एम.आर.डी.ए.च्या पत्राचा संदर्भ दिला आहे. त्या संदर्भात ३७/१ हे दिले पाहिजे. इकडे आपण कलम ४५ नगररचना अधिनियम १९६६ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे २५३ अन्वये केले आहे. यात फरक काय? याचा जरा खुलासा करा. यात जे दर दिले आहेत ते जास्त आहेत.

ते दर जरा कमी केले जावे. माझा सुझाव आहे ,दर हे ३०० रुपये प्रती चौरस मिटर परवानगी घेण्यासाठी आणि परवानगी घेतली नसल्यास बंदिस्त केल्यास ५०० रुपये प्रति चौरस मिटर दर असले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणीः-</u> माझ्या विचारण्याचा उद्देश हा आहे की, नाहीतर लोक बाल्कनी बंदीस्त करतील, नंतर दंड भरतील व नंतर ती प्रथा होऊन जाईल. असे तर नाही की आपण लोकांना तसे वळण लावू की, केव्हाही दंड भरा बाल्कनी आधी बंदिस्त करा. काही तरी त्याला मुदत असली पाहिजे ना?
<u>मा. सचिवः</u>- अधिमुल्य दरामध्ये सुधारणा केली जावी? पाचशे आणि तीनशे ना?

<u>काही सदस्यः</u>-पास.पास......

--३७--

<u>मा. महापौरः</u>-सदरचा प्रस्ताव वरील सुचविलेल्या सुधारणेसह पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

<u>विषयः-</u> भोगवटा प्रमाणपत्र देण्यापुर्वी बाल्कनी बंदिस्त केल्यास दंडात्त्मक कारवाई करून कायम स्वरूपी करणे कामी <u>अधिमुल्य बसविणे बाबत.</u>

<u>प्रस्तावनाः-</u>

शहर विकास-विकास प्रस्ताव विभागामध्ये सध्या विकास प्रस्तावासाठी विकास नियंत्रण नियमावली व नगर रचना अधिनियम १९६६ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार बांधकाम परवानगी देण्यात येते. मंजुर नकाशानसुार इमारतीमध्ये प्रस्तावित केलेल्या बाल्कनी सर्व साधारणपणे बंदीस्त केल्या जातात. बांधकाम पुर्ण झाल्यानंतर अर्जदार महापालिकेकडे अर्ज करून भोगवटा प्रमाणपत्राची मागणी करतात. भोगवटा प्रमाणपत्र देयापुर्वी, बाल्कनी लुअर्स ग्लेजड शटर्स, ग्रील बसवून बंदिस्त केला असल्यास त्यासंबंधी दंडात्त्मक कार्यवाही करण्यासंबंधीचे आदेश नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र. टीपीएस/१२००/५२७/सीआर-७९/०१/युडी-१२, दि. ५ जुलै २००२ अन्वये यापूर्वी देण्यात आलेले आहेत. उल्हासनगर महानगरपालिका आपल्या हद्दीतील बांधकामाबाबतची वरील आदेशान्वये बाल्कनी बंदिस्ती बाबत दंडात्त्मक कार्यवाही करण्याचे प्रस्तावना सादर करीत आहोत.

सदर बाल्कनी बंदिस्तबाबत शासनाच्या मंजुरीच्या आधिन राहुन पुढील अधिमुल्य दर निश्चित करण्यास प्रस्तावित.

१. रू. ३००/- प्रति चौ. मी. प्रस्तावित नकाशा मंजुर करतेवेळेस रहिवाशी वापरासाठी.
२. रू. ५००/- प्रति चौ. मी. अनाधिकृतपणे बाल्कनी बंदिस्त केल्यास रहिवासी वापरासाठी.

सदर विषय महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

__सर्वसाधारण महासभा ठराव क्र.__ ३७ __दिनांकः-१९.१०.२००२.__

सुचकाचे नाव :-श्री. देवेंदसिंग खेमाणी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद ठकुर.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहून भोगवटा प्रमाणपत्र देण्यापुर्वी बाल्कनी बंदिस्त केल्यास त्याकरिता वरील सुचविलेले अधिमुल्य लावून कायम स्वरूपी करणेस मान्यता देत आहे.

--३८--

वरील निर्णय अंतर्भूत असणारा ठराव कार्यवृत कायम होण्याची वाट बघितल्या शिवाय, त्वरीत अंमलात आणण्यासाठी तो कायम झाल्याचे समजण्यात येईल व पुढील सभेत कार्यवृत्त कायम होण्यापूर्वी तो अंमलात आणता येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

__एकमताने__

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

__मा. सचिवः__-विषय क्र.११ वाचून दाखवितात.

__विषयः-__ बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यापुर्वी जिना अधिमुल्य ठरवून कायम स्वरूपी करणे बाबत.

__मा. सदस्य श्री. राजेश वदरियाः__-यामध्ये जे दर दिले आहे ते जास्त आहे. मी प्रस्ताव देत आहे की, यात २५०/- रुपये प्रति चौरस मिटर रहिवाशी क्षेत्रासाठी व उद्योग वापरासाठी ४००/- रुपये प्रति चौरस मिटर असले पाहिजे.

__काही सदस्य :-__ पास...पास......

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव वरील सूचविलेल्या सुधारणेसह सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

विषयः- बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यापुर्वी जिना अधिमुल्य ठरवून कायम स्वरूपी करणे बाबत.

प्रस्तावनाः-

शहर विकास-विकास प्रस्ताव विभागामध्ये सध्या विकास प्रस्तावासाठी विकास नियंत्रण नियमावली व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २५३ अन्वये बांधकाम परवानगी देण्यात येते. मंजुर नकाशानसुार इमारतीमध्ये प्रस्तावित केलेले जिने ठरविलेल्या दराप्रमाणे पुढीलप्रमाणे कार्यवाही करून बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यापुर्वी वसूल करण्याचे प्रस्ताव सादर करीत आहोत.

सदर जिना शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहुन पुढील अधिमुल्य दर निश्चित करण्यास प्रस्तावित.

१. रू. २५०/- प्रति चौ. मी. रहिवासी बांधकामा करिता.
२. रू. ४००/- प्रति चौ. मी. व्यावसायिक व औद्योगिक वापरासाठी.

सदर विषय महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

--३९--

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३८ दिनांकः-१९ १० २००२.

सुचकाचे नाव :-श्री. देवेंदसिंग खेमाणी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद ठाकुर.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यापुर्वी नकाशानुसार इमारतीमध्ये प्रस्तावित केलेल्या जिनापोटी वरील सुचविलेल्या अधिमुल्यास मान्यता देत आहे.

वरील निर्णय अंतर्भूत असणारा ठराव कार्यवृत कायम होण्याची वाट बघितल्या शिवाय, त्वरीत अंमलात आणण्यासाठी तो कायम झाल्याचे समजण्यात येईल व पुढील सभेत कार्यवृत्त कायम होण्यापूर्वी तो अंमलात आणता येईल.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी

सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :</u>-विषय क्र. १२ वाचून दाखवितात.

<u>विषयः-</u> जनहित किंवा आरक्षणाखाली असलेल्या जमिनीच्या मालकास जमिनीच्या विकासाचा हस्तांतरणीय <u>विकास हक्क उपलब्ध करून देणे बाबत.</u>

<u>काही सदस्यः-</u> पास-पास.....

<u>मा. महापौरः</u>-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषयः-</u> जनहित किंवा आरक्षणाखाली असलेल्या जमिनीच्या मालकास जमिनीच्या विकासाचा हस्तांतरणीय <u>विकास हक्क उपलब्ध करून देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावनाः-</u>



शहर विकास-विकास प्रस्ताव विभागामध्ये सध्या विकास प्रस्तावासाठी मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई यांची तरतुदीनुसार रस्ता रूंदीकरणामध्ये बाधित झालेल्या मालमत्ता धारकास (टी.डी.आर) चा हक्क उपलब्ध करून देण्याची आवश्यकता भासते. अशा हक्कांमुळे आरक्षणाखाली असलेल्या जमिनीच्या मालकास जमिनीच्या विकासाच्या क्षमतेचा हक्क काढून घेतल्याबददल मोबदल्या ऐवजी विकास हक्क घेण्याचा पर्याय उपलब्ध होतो. त्यामुळे भुसंपादन कायद्याप्रमाणे कार्यवाही करून मोबदला मिळण्यासाठी लागणारा विलंब वाचू शकेल. या व्यतिरिक्त रस्त्याखालील जमिनीचे क्षेत्र लिफ्ट, जिने, पोचमार्ग इत्त्यादी क्षेत्र एफएसआय साठी न धरणे (त्यामुळे रूंद रस्ते, रूंद जिने वगैरेंची तरतुद करता येईल) या विकासास पोषक अशा संकल्पना अंतर्भूत केल्या आहेत. जमिन मालकाने यासाठी जमिनी स्वखुशीने द्यावी या अनुषंगाने सुधारित मुंबई प्रादेशिक योजनेमध्ये प्रोत्त्याहनात्त्मक योजना अंतर्भूत केली आहे. यासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये संघटीत विकास (ऑर्गनाईज डेव्हलेपमेंट) ही नाविन्यपुर्ण संकल्पना समाविष्ट केली आहे. जमिनीच्या क्षेत्रानुसार श्रेणीबध्द एफएसआय, तसेच जमिन मालकांनी सार्वजनिक सुविधांसाठी सोडवायचे क्षेत्र यासाठी नियमामध्येय तरतुद केली आहे. जसजसे जमिनीचे क्षेत्र वाढत जाते तसतसे जमिन मालकाने सुविधांसाठी जास्ती जागा सोडण्यास उदयुक्त व्हावे व त्यासाठी त्याला जास्त एफएसआय मिळेल अशी योजना करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमध्ये एखाद्या प्लॉटवरील जास्तीत जास्त एफएसआय २ इतका (साधारण टीडीआर आणि झोपडपट्टी योजनेमधील टीडीआर धरून) निर्बंधीत केला आहे. म्हणजेच आवश्यक ती उजेड आणि वायुविजन मिळण्यासाठी कोणतेही तडजोड न करता एफएसआय-२ मध्ये इमारत बांधणे शक्य आहे. हे मान्य करण्यात आले असले तरी सद्या टीडी.आर चा वापर करणेसाठी प्लॉटच्या बाजुने सोडावयाच्या मोकळया जागा संबंधीचे नियम थोडेसे शिथील करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

सदर विषय महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ३९</u> <u>दिनांकः-१९.१०.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. देंवेंद्रसिंग खेमाणी.
अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद ठाकुर.

ही महासभा शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून वरील सुचविलेल्या प्रमाणे हस्तांतरणीय विकास हक्क (टि.डी.आर) ही संकल्पना उल्हासनगर शहरासाठी उपलब्ध करून देणेस मान्यता देत आहे.

वरील निर्णय अंतर्भूत असणारा ठराव कार्यवृत कायम होण्याची वाट बघितल्या शिवाय, त्वरीत अंमलात आणण्यासाठी तो कायम झाल्याचे समजण्यात येईल व पुढील सभेत कार्यवृत्त कायम होण्यापूर्वी तो अंमलात आणता येईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौरं पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका



मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी, श्रीमती. माया मसंद, श्री. मोहन बेहरानी, श्री. जीवन इदनानी हे सभागृहातून बाहेर पडले.

<u>मा. सचिव :-</u> विषय क्र. १३ वाचून दाखवितात.

<u>विषयः-</u> शहरातील विद्यमान अनाधिकृत बांधकामे नियमित करणे <u>बाबीचा प्रस्ताव शासनास शिफारस करणे बाबत.</u>

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा</u>:-मा. महापौरजी, आमचे जे नगररचनाकार आहेत त्यांनी याबाबतीत आधी सदनाला माहिती दयावी. नंतर आम्ही यावर चर्चा करु व त्यानंतरच पारित करु.

<u>मा. नगररचनाकार(श्री. शिंदे)</u>:-आपल्या शहराची जी कॅटेगीरी आहे,व शहराची जी रचना आहे, सनद दिलेल्या जागेवर जे काही बांधकाम आहे.,,

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी</u>:-आम्हांला हिंदीत सांगा.*

*<u>मा. नगररचनाकार(श्री. शिंदे)</u>:-ज्या मिळकतीला सनद दिली आहे ती मिळकत अधिकृत आहे की अनधिकृत आहे, व त्यामध्ये जो अधिकृत भाग आहे, किंवा अनाधिकृत आहे, परंतु त्यांना सनद दिली गेली आहे. त्यासाठी काही दर निश्चत केले आहे. दुसरे असे की, आरक्षित जागेवर झालेले बांधकाम नियमित करणे योग्य नाही. शासनाच्या जमिनीवर म्हणजे एक जिकडे सनद आहे, दुसरे शासनाच्या भुखंडावर अतिक्रमण केले आहे, तिसरे असे की, यु नंबर वर जे बांधकाम आहे, असे तीन वेगवेगळे भाग आहे, असे बांधकाम आपल्या शहरात भरपुर प्रमाणात आहेत. मी शासन बैठकीत भाग घेतला होता,तेव्हा असे म्हटले होते की, गुंठेवारी पध्दतीत कंसिडर करुन प्रस्ताव शासनाकडे पाठवावा. गुठेवारी म्हणजे जिथे प्लॉट काढले गेले नाहीत, सबअर्गन विभागात गुंठेवारी पध्दत लागु करता येत नाही. म्हणून आम्ही काय केले गुंठेवारी पध्दती ऐवजी यु नंबरवर शासनाचे भुखंड , सनद यावरील बांधकामवर दर फिक्स केले. इन्स्टीड ऑफ गुंठेवारीच्या ऐवजी शासनाने जर हे मंजुर केले तर महाराष्ट्रात एक वेगळीच पध्दत होईल , इथे गुंठेवारी ॲक्ट लागु होत नाही. तो ॲक्ट लागु होत नाही म्हणून या पध्दतीने महाराष्ट्र शासनाकडे शिफारशीसाठी प्रस्ताव पाठवत आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा</u>:-मा.महापौर व सदनातील सन्माननिय सर्व सदस्य , महानगरपालिकेची उप-महापौर माझी बहिण, आयुक्त साहेब, सर्व अधिकारी वर्ग , व सर्व कर्मचारी वर्ग हा जो मुदद‍ा आहे, शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमित करणे बाबत, त्यासाठी मी सर्वात आधी आमचे महापालिकेचे जे आयुक्त आहेत श्री. पोखरकर त्यांना धन्यवाद देतो. हा मुदद‍ा आणून त्यांनी हे सिध्द केले आहे की, शहराच्या या ज्वलंत समस्येविषयी त्यांना जाण आहे, व ती ज्वलंत समस्या नागरीक सहन करत आहेत,त्यातुन ते त्यांची सुटका करु इच्छितात. त्यांनी हा जो मुदद‍ा सदनात आणला आहे. ते साहसिक पाऊल आहे. चांगलाभला अधिकारी , आयुक्त, कोणत्त्याही महापालिकेचा असा मुदद‍ा आणण्यापूर्वी दहा वेळा विचार करतो, व आयुक्त साहेबांनी जे हे धैर्यशिल पाऊल उचलले आहे, ते पण यागोष्टीचे प्रमाण आहे की, आय.ए.एस. दर्जाचे जे अधिकारी आहेत, त्यात चंद्रशेखर साहेबांचा जसे काम आहे, तसे हे आयुक्त देखील याबाबतीत कामात कमी नाहीत. उल्हासनगरतील अनाधिकृत बांधकामाचा जो इतिहास खुप लांबलचक आहे. हा मुदद‍ा आणल्यानंतर खोलवर विचार करणे गरजेचे आहे. मला वाटते की, नगररचनाकार शिंदे साहेबांनी जो प्रस्ताव आणला आहे, त्यांनी मर्यादीत स्वरुपात ठेवले आहे. या शहरात अनाधिकृत बांधकामाचे जे*



*स्वरुप आहेत ते वेगवेगळे प्रकारचे आहे. त्याला समजणे व या शहरातील सातलाख जे रहिवासी आहेत जे शहरातील वेगवेगळया भागात राहत आहेत. कित्येक वर्षापासुन राहत आहेत. काही बंधु-भगिनी झोपडपट्टीत तीस-तीस चाळीस-चाळीस वर्षापासून राहत आहेत. त्यांना आजपर्यंत मालकी हक्क मिळाला नाही. कित्येक वर्षापासून पूर्व नगरपालिका महानगरपालिकेने असे सुझाव पारित केले आहे, प्रस्ताव पारीत केले आहे की, त्यांना त्यांचा मालकी हक्क मिळाला पाहिजे. शहराचे आमदार -खासदार यांनी राज्य सरकारापर्यंत धाव घेतली आहे, की त्यांना त्यांचा मालकी हक्क मिळाला पाहिजे. परंतु आजपर्यंत त्यावर काही कार्यवाही झाली नाही. केंद्र सरकारने असे काही पाऊल उचलले नाही. तर हा जो मुदद‍ा आज आला आहे, तर या मुददयावर सदनातील जितके सर्व सन्माननिय सदस्य आहेत, त्यांना यावर योग्य तो निर्णय घ्यावा लागेल, या शहरात मागील पन्नास वर्षापासुन अनाधिकृत*

बांधकामे चालु आहेत, शहराचा मी इतिहास मागच्याच सभेत सांगितला होता. नाहीतर आमचे सभागृह नेता म्हणतील की, ४६ वर्षापासुनचा इतिहास तुम्ही सांगत बसाल, म्हणून यात जास्त काही खोलवर शिरत नाही. परंतु अनाधिकृत बांधकामाच्या कृतीमागे कारण काय आहे. ते पाहणे जरूरी आहे. शहरातील नगरवासियांनी अनाधिकृत बांधकामाचा का वापर केला असे पाऊल त्यांना का उचलले? ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. जर आपण हे नाही पाहिले तर राज्य सरकार त्यास मान्यता देणार नाही. त्याचा जो भुतकाळ आहे तो राज्य सरकार समोर मांडणे अत्यंत गरजेचे आहे त्यासाठी आयुक्त साहेबांना त्याविषयी माहिती देऊ इच्छितो की त्यांना देखिल या शहराचा मागचा इतिहास राज्य शासनासमोर मांडावा लागेल. तुमच्या सोबत शहराचे मा. आमदार, मा. महापौर, उपमहापौर काही निवडलेले प्रतिनिधी तुमच्या सोबत असतील, पुर्ण सहकार्य तुम्हाला दिले जाईल. परंतु यासाठी आपल्याला प्राधान्य घ्यावे लागेल. शहरातील लोक मागील ५० वर्षापासुन जे भोगत आहेत ते त्यांनी पुन्हा भोगु नयेत. या शहरात अनाधिकृत बांधकाम वेगवेगळया प्रकारे आहे. जसे शिंदे साहेबांनी सांगितले की, काही लोकांनी शासनाच्या भुखंडावर अतिक्रमण केले आहे. काही जागी शासनाने लोकांना मालकी हक्क दिला त्या बांधकामावर अजुन बांधकाम बांधुन अतिक्रमण केले आहे. काही आरक्षित भुखंड महानगरपालिकेचे जे सार्वजनिक हेतुसाठी होते. त्यावर पण अतिक्रमण केले आहे. काही तर असे अतिक्रमण झाले आहे की ज्या व्यक्तीला एक हजार वॉलचा मालकी हक्क दिला आहे. समजा त्यांना १०,००० एफ.एस. आय महापालिकेतर्फे देण्याचे ठरले असेल त्यांनी एक लाख एफ.एस.आय वाढविला आहे. त्याचा अर्थ त्यांनी १० पट एफ.एस. आय वाढविला आहे. तर याप्रकारे जे अतिक्रमण शहरामध्ये जे झाले आहे. त्याचा या प्रस्तावात खुलासा झाला पाहिजे. व नियमित बांधकाम करण्यासाठी जे दर लागु केले आहेत. जे नगररचनाकार शिंदे यांनी सुचविले आहेत. त्यात आमचे दुमत नाही. त्या दराचा आम्ही स्विकार करतो. परंतु आम्हाला असे वाटते की, बांधकामांचे वर्गीकरण करून प्रस्तावात टाकले जावे. तो बदल प्रस्तावात आला पाहिजे. समजा एखादया व्यक्तीला स्वतःच्या जमिनीवर १०० वॉल किंवा १००० वॉलची सनद असेल पण त्यांनी एक लाखापर्यंत एफ.एस. आय वाढविला असेल तर ते बांधकाम नियमित करण्यासाठी दर काय असतील? त्याला काय दंड दयावा लागेल. हे सर्व प्रस्तावात टाकले पाहिजे. आरक्षित जमिनीवर ज्या झोपडपट्टया आहेत. किंवा लोकांनी खाजगी हक्क तिथे स्थापित केला आहे ते काम नियमित करण्यासाठी कोणत्त्या पध्दतीचा वापर करावा. व शासनाचा भुखंड जर कोणी हडप केला आहे. त्याला कोणत्त्या त-हेने नियमित करता येईल यासर्व गोष्टींचा उल्लेख झाला पाहिजे व एक कालबाहय दिनांकाचा प्रस्त्तावात जरूर उल्लेख केला पाहिजे. कारण की मागच्या वेळेस देखिल जेव्हा हा प्रश्न ६५ साली उदभवला होता. तेव्हा राज्य सरकार व केंद्र सरकारने त्यावेळी ही उल्हासनगरची जमिन केंद्रसरकारच्या अखत्यारीत होती. इट वॉज अ कुल प्रापर्टी फॉर अंडर डिसप्लेस पर्सन ॲक्ट लागु होता. नंतर ही कुल प्रापर्टी ट्रान्सफर करून महाराष्ट्र राज्य सरकार कडे दिली.आता या



जमिनीवर महाराष्ट्र लॅन्ड रिव्हेन्यु कोड लागु आहे. अशा परिस्थितीत आधी राज्य सरकारने व केंद्रसरकारने घेतलेला निर्णय ११.५.६५ असा त्यांनी दिनांक ठरविला होता की यापुर्वी जे पण बांधकाम शहरात झाले आहे. यु नंबर असो, ई नंबर असो राज्य सरकार त्या बांधकामांना नियमित करेल. या शर्तीवर ते बांधकाम शहराच्या एखादया योजनेवर किंवा आरक्षित भुखंडावर अतिक्रमण करत नसेल तर अशा प्रकारे एक डेट लाईन आपल्याला फिक्स करावी लागेल. आम्हाला हे सांगावे लागेल की, महानगरपालिकेने निट विचार विमर्श या समस्येवर केला आहे. व ही

महापालिकेला असे वाटते की, ३१ मार्च सन २००२ पर्यंत या शहरामध्ये जी पण अनाधिकृत बांधकामे झाली आहेत त्या बांधकामांना भुर्दंड लावुन नियमित केले जावेत. अशी उदाहरणे वेगवेगळया ठिकाणी पण पाहायला मिळतात आता नागपुरमध्ये चंद्रशेखर साहेबांनी जे नागपुरमध्ये, ठाण्यामध्ये, कल्याण-डोंबिवली मध्ये आयुक्त होते उल्हासनगरमहानगरपालिकेत देखिल काही दिवसासाठी त्यांना चार्ज होतो. त्यांनी जवळ जवळ अडीच हजार अनाधिकृत कॉलनींना नियमित केले. व नियमित केल्यानंतर त्यामधुन महापालिकेला जे उत्पन्न मिळाले आहे. त्यातुन पुर्ण शहराचा विकास झाला असा एक प्रस्ताव जो आयुक्तांना राज्य शासनापुढे मांडावा लागेल. असे दिल्ली सरकारने देखिल कित्त्येक अनाधिकृत बांधकाम नियमित केले आहेत. हे एक धोरणच झाले आहे. बॅंगलोर मध्ये देखिल असे झाले आहे. शहरातील कित्त्येक मेट्रोपोलीटीयन सिटीमध्ये वेगवेगळया राज्य सरकारने ही पॉलीसी ॲडप्ट केली आहे. हे जे अनाधिकृत बांधकाम आहे ते कुणीही स्वखुशीने करत नाहीत. उल्हासनगर शहराचे क्षेत्रफळ १३ चौ.की.मी. पर्यंत मर्यादीत होते. ६० हजार लोंकांसाठी ते क्षेत्रफळ होते परंतु आता उल्हासनगर शहरात ७ लाख लोकसंख्या झाली आहे. लोाकांना एक्सपॉन्शन (विकास)साठी संधी मिळत नाही. लोकांना लाचारीने अवैध बांधकाम करावे लागते. त्यांची कुटूंब संख्या वाढत आहे. त्यांना कुठे राहण्यासाठी जागा मिळत नाही आहे. म्हणुन त्यांनी वर्टीकल वे मध्ये अनाधकित बांधकाम केले आहे. ही समस्या प्रात्त्यक्षिक स्वरूपात आहे. कोणतेही शासन हे साधारण जनतेसाठी असते भले ते ग्रामपंचायत असो नगरपालिका असो महानगरपालिका असो राज्य सरकार असो, किंवा केंद्रसरकार असो, लोकांच्या हिताचा जर विचार नाही केला तर ते निवडुन आलेल्या प्रतिनिधींचा धिक्कार करून बाहेर करतील म्हणुन आज या सदनात सर्व गोष्टी विचारात घेवून एक असा प्रस्ताव मी सचिवांना सांगेन की त्याला कायदेशिर रूप देण्यासाठी त्यांनी यात सहभाग घ्यावा. आम्हाला कायदयाची इतकी माहिती नाही. आम्ही तुमच्या समोर मुददे मांडु. वरील सर्व गोष्टींचा त्या प्रस्तावामध्ये उल्लेख झाला पाहिजे आणि सुधारणा प्रस्ताव करून नगररचनाकारांनी सुचविलेले दर त्याच्या सोबत बसुन असा एक प्रस्ताव पारीत करा त्यात कालमर्यादा दिनांक ३१ मार्च २००२ असु दे त्यांनतर जर कोणतेही अनाधिकृत बांधकाम शहरात झाले तर महानगरपालिका असो राज्य सरकार असो त्यावर काहीही कार्यवाही केली जाईल. जेव्हा चंद्रशेखर साहेब आले होते तेव्हा ते पण म्हणाले होते की, मी कालपर्यंतच्या बांधकामांना काही करणार नाही परंतु आज पासुन अवैध बांधकामे बंद झाली पाहिजेत. चंदशेखर साहेबांनी महापौर व आयुक्त यांच्या झालेल्या बैठकीत मा. मुख्यमंत्रीच्या समोर सांगितले होते की, ठाण्यासारख्या शहरात ७५ टक्के बांधकाम अनाधिकृत आहे. मी लाचार आहे कारण की मी त्यांना दुस-याठिकाणी हलवु शकत नाही. म्हणुन मला ते बांधकाम नियमित करावे लागणार. वर्क प्रॅक्टीकल अप्रोच जे आहे ते आपल्याला या शहराशी लागू करावे लागेल तसेच मी आयुक्तांना सांगेन की सचिवांचा कायदेशिर सल्ला घेवून या प्रस्तावास योग्य त-हेने अमेंन्ड करून पारीत केले तरच या शहराचे भले होईल. व शहरवासियांचे सुध्दा भले होईल धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>मा. महापौरजी, जसे आता आमचे मा. सदस्य श्री. हरदास माखिजा यांनी पुर्ण प्रस्तावावर प्रकाश टाकला व आपले विचार मांडले. इथे हा सुझाव आम्ही खास देवू इच्छितो की जो कालबाहय



दिनांक सांगितला गेला आहे त्यासाठी काही कालमर्यादा निश्चित केली पाहिजे की तिथपर्यंत ते अवैध निर्माण रेग्युलाईज केले जावेत. परंतु प्रत्येक वेळी जर दिनांकाची मर्यादा वाढत गेली तर या अवैध निर्माणांचा सिलसिला कधीच संपणार नाही. त्यानंतर प्रशासनाने कडक पाऊल उचलले पाहिजे. एकही अवैध निर्माण या

जमिनिवर निर्माण नाही झाले पाहिजे. असा एक संकल्प केला पाहिजे. असे कडक आदेश जारी केले पाहिजे. धन्यवाद.

<u>मा. सदस्या श्रीमती. रेखा कारीराः-</u>मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब मी एक प्रश्न विचारला होता लक्षवेधीबाबतचा. सरकारी जागेवर सी. सी. पॅसेज तोडुन महाराष्ट्र कलाउद्योग मंदीर चंद्रकांत बगाडे यांनी आर.सी.सी बांधकाम केले आहे. व बॅरेक नं. १४०१च्या बाजुला ३ नंबर रूमच्या पुढे शौचालय बांधुन तेथील प्रवेश बंद केला आहे.

<u>मा. सचिवः-</u>सन्मानानिय सदस्यांना निवेदन आहे की, तुम्ही हे जे विचारत आहात ते प्रश्नाबाबत आहे. जेव्हा प्रश्न येईल तेव्हा तुम्ही विचारू शकता.

<u>मा. सदस्या श्रीमती. रेखा कारीराः-</u>ही पण लक्षवेधी आहे ना?

<u>मा. सचिवः-</u>लक्षवेधी ही वेगळी बाब आहे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, आमची बहिण जी रेखा कारीराजी सांगत आहे. त्यात असे आहे की, एका व्यक्तीने पुर्ण चुकीचे काम केले आहे. परंतु तो चुकीचे आरोप लावत आहेत. कधी पोलिसात तर कधी कुठे असा त्यांना त्रास देत आहेत. त्या विशिष्ठ जागेसाठी शहर अभियंता व नगररचनाकार यांनी लिहुन दिले आहे की, त्यानंतर देखिल तिकडे लक्ष दिले जात नाही. व त्वरीत कार्यवाही केली जावी.

<u>मा. महापौरः-</u>आपण किती तारखेला लक्षवेधी दिली होती?
<u>मा. सदस्या श्रीमती. रेखा कारीराः-</u>२० तारखेला दिली होती ७ व्या महिन्यात. जुलैमध्ये.
<u>मा. महापौरः-</u>आम्ही आता चौकशी करून अहवाल देतो.
<u>मा. सदस्या श्रीमती. रेखा कारीराः-</u>कित्त्येक सभांमध्ये प्रश्नोत्तरे होत नाहीत म्हणुन आज मला असे सांगावे लागते.

<u>मा. महापौरः-</u>तुम्ही लक्षवेधी दिली नाही. प्रश्न आता विचारला आहे याविषयी आम्ही चौकशी करू आपल्या कामाबाबत.

<u>मा. सदस्या श्रीमती. रेखा कारीराः-</u>असे कित्त्येकदा म्हंटले आहे चौकशी करू परंतु आजपर्यंत चौकशी झाली नाही. दोन महिने झाले अजुन काही झाले नाही.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>सचिवजी, दुस-या विषयाला जाण्यापुर्वी मला एक माहिती पाहिजे. या प्रस्तावाबाबत संशोधन करायचे. मी जे सर्व सांगितले ते यामध्ये प्रस्तावात आले पाहिजे.

<u>मा. सचिवः-</u>तुम्ही संशोधनासाठी कित्त्येक सुझाव दिले आहे. तुम्ही फक्त रूपरेखा दिली आहे. निश्चित स्वरूपाची अशी सुधारणा नाही सुचविली. तुम्ही आमच्या समोर फक्त सुचना मांडल्या आहेत. त्यावर अभ्यास केला जाईल, विचार केले जाईल त्यानंतरच ठरविले जाईल. त्यानुसार हा ठराव आज पारीत नाही होवू शकणार. आपणांस वाटत असेल तर पुढच्यावेळेस परिपुर्ण प्रस्ताव तयार झाल्यावर तुम्ही पास करू शकता.

<u>मा. सदस्य श्री. राजेश वदरीया:-</u>मा. महापौरजी, हा जो प्रस्ताव दिला आहे. त्यामध्ये क्रमांक १ वर जे दिले आहे. सेक्शन ५३ एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ अन्वेये जी नोटीस दिली गेली आहे आणि त्यावेळी कोणत्त्याही कारणास्तव त्यांनी नोटीसचे उत्त्तर दिले नाही. तर त्याची आता सुनावणी होणार नाही. ज्यावेळी शासन सर्वक्षम स्कीम आणते तेव्हा त्यावेळी पुन्हा एकदा सुनावणीची संधी मिळाली पाहिजे. कालमर्यादा परत वाढवावी जेणेकरून ते तुम्हाला नोटीसचे उत्त्तर देवू शकतील.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>सचिवजी, तुमच्या माहितीसाठी मी एक गोष्ट बोलु इच्छितो, तीन चार गोष्टी मी बोललो होतो. एक डेट लाईन ३१ मार्च २००२ ती असली पाहिजे. दुसरे ज्या ज्या त-हेचे अनाधिकृत बांधकामांना तुम्ही संरक्षण देवू इच्छिता त्याचा मी उल्लेख केला. तिसरे असे की मी हे पण म्हंटले की नगररचना विभागाकडुन जे दर सुचविले आहेत ते आम्हाला मान्य आहेत. चौथे मी असे म्हंटले की, जेव्हा या अनाधिकृत बांधकामांना संरक्षण दिले जाईल. तेव्हा शहरातील इतर योजनांवर काही प्रभाव नाही पडला पाहिजे. जर एखादे बांधकामांवर प्रभाव नसेल तर ते नियमित करावे. अशा चार-पाच गोष्टी मी बोललो होतो. याआधारे तुम्ही ठराव तयार करा.

<u>मा.सचिव:-</u>तुमचे सुझाव मान्य केले जावू शकतात. तुमची इच्छा आहे की अनाधिकृत बांधकामांचे वर्गीकरण झाले पाहिजे. सरकारी भुखंड कशात-हेने हाताळणार जिथे एक हजारचा एफ.एस.आय दिला आहे तिथे लाख एफ.एस.आय. वाढवला आहे. यासाठी आपल्याला डाटा पाहिजे. कित्त्येक इमारती अशा आहेत की ज्या सरकारी जमिनीवर आहेत. आम्ही जे सांगितले की या सुधारणांचा आम्ही समावेश करू. होवू शकते महासभेला पुन्हा ते मान्य नसेल. तुमच्या माहितीशिवाय आम्ही सुधारणा करू शकत नाही. जेव्हा आपल्या समोर असेल, तुमचे समाधान होईल तेव्हाच तुम्ही निर्णय घ्याल. आम्ही जर तो निर्णय घेतला तर याचा अर्थ आम्ही तुमच्या हक्काचा वापर केला. दर निश्चितीबाबत तुमची काही हरकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>बरोबर आम्हाला दराविषयी हरकत नाही. कालबाहय दिनांक ३१ मार्च २००२ देत आहोत. कोणकोणत्त्या बांधकामांना संरक्षण दिले पाहिजे ते ही सांगत आहोत.

<u>मा. सचिव:-</u>त्यासाठी एक योजना बनवावी लागेल. ती योजना परीपुर्ण पाहिजे. त्यासाठी मी तुम्हाला एक माहिती देत आहे की भिवंडी नगरपालिकेत सुध्दा यात-हेने ठराव पारीत केला होता. व हायकोर्टाने त्याला विखंडीत केले होते. म्हणुन आम्ही जर आता काही सुझाव दिले किंवा तुम्ही ज्या सुधारणा करत आहोत त्याचा जर डायरेक्ट समावेश केला तर होवू शकते शासन ते मान्य करणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>आजच्या तारखेला जो प्रस्ताव आला आहे तो कोणत्त्या स्टेटसला आहेत.

<u>मा. सचिव:-</u>ते नगररचनाकार साहेब तुम्हाला सांगतील.

<u>श्री. शिंदे (नगररचनाकार):-</u>मी आधीच सांगितले की गुठेवारी पध्दतीविषयी थ्रु आऊट महाराष्ट्रमध्ये शासनाने जे सुझाव मागितले होते त्या सुझावामध्ये उल्हासनगरचे क्षेत्रफळ बसु शकत नाही म्हणुन ''गुठेवारी पध्दतीऐवजी'' हे अनियमित बांधकाम कशात-हेने नियमित करता येईल यासाठी अधिमुल्य ठरवून शासनाकडे

शिफारसीसाठी पाठविणे जरूरीचे आहे. त्यामध्ये शासनाचे नियम आणि नियमावलीचा वापर करू शकतो.

--४६--

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>दराविषयी आमचे काही दुमत नाही तुम्ही जे ठरविले ते योग्य आहे. बाकीच्या कंडीशन त्यात जोडायच्या आहेत. मला असे म्हणायचे आहे की जसे सचिव आता म्हणाले की, आता जे सुझाव दिले त्याने प्रस्ताव पारीत होवू शकत नाही. तसे नाही झाले पाहिजे. प्रस्तावाच्या आत जर या तीन चार सुधारणा होवू शकत असेल तर आजच प्रस्त्ताव मंजुर केला गेला पाहिजे.

मा. सदस्य श्रीमती. बेबी वसीटा, श्री. सुरेश जाधव, श्री. प्रशांत जाधव, श्री. साधवानी मनोज हे सभागृहातून बाहेर पडले.

<u>मा. सचिव:-</u>जर तुम्हाला वाटत असेल आजच ठराव पारीत व्हावा तर निश्चित स्वरूपाचे आपणच सुझाव दया. तुम्ही जे म्हणाल त्याचा समावेश केला जाईल व त्यानुसार ठराव पारीत केला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>मी तर सांगितले ना आधीच?

<u>मा. सचिव:-</u>तुम्ही म्हणाला होतात की, सरकारी जमिनीवर जर बांधकाम असेल तर त्यासाठी तुम्हीच उत्त्तर दया तुम्ही जे सुचवाल तो ठरावाचा भाग समजला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेश वदरीया:-</u>यात कालमर्यादा दिनांक दिला आहे १.४.२००२.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>एक डेट लाईन ३१ मार्च २००२ ती असली पाहिजे. दुसरे ज्या ज्या त-हेचे अनाधिकृत बांधकामांना तुम्ही संरक्षण देवू इच्छिता त्याचा मी उल्लेख केला. तिसरे असे की मी हे पण म्हंटले की नगररचना विभागाकडुन जे दर सुचविले आहेत ते आम्हाला मान्य आहेत. आयुक्तांनी २०० अनाधिकृत बांधकामांवर नोटीस काढली आहे. त्यांचे प्रती चौरस फुट तुम्ही जे आमच्या समोर जे दर मांडले आहेत. त्यानुसारच बांधकाम नियमित झाले पाहिजे.

<u>श्री. शिंदे (नगररचनाकार):-</u>माझे असे म्हणणे आहे की, कालबाहय दिनांक महापालिका अस्तित्त्वात येईपर्यंत पासुन असले तर ठिक आहे असे माझे मत आहे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>नाही नाही महापालिका तर ९६ साली अस्तित्त्वात आली. आयुक्तांनी आज प्रस्ताव आमच्या समोर आणला आहे. आम्ही २००२ मार्च पर्यंत तारीख ठेवू इच्छितो तुम्ही पण प्रस्तावात तसे दिले आहे. मी ३१ मार्च म्हणतो तुम्ही १ एप्रिल म्हणत आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आज हा जो प्रस्ताव आहे त्या बाबतीत माजी महापौरांनी आयुक्तांची याविषयावर खुप चांगल्या त-हेने प्रशंसा केली त्यांनी खुप चांगला प्रस्ताव आणला आहे तर हा चांगला प्रस्ताव आजच पास झाला पाहिजे. यात आमचे मा. सदस्य श्री. राजेश जे म्हणाले की कालमर्यादा दिनांक निश्चित केला जावा. दुस-या क्रमांकावरील गुन्हा क्षमापन शुल्काचे परिमाण दोन अ, ब, क रदद केले जावे. व तीन आहे नोटीस दिल्यानंतर काम चालू ठेवले तर जोपर्यंत ते चालू आहे. तोपर्यंत प्रतिदिनी रक्कम रू. २०००/- या प्रमाणे दंड आकरण्यांत यावा. त्यांनी स्वत: लिहीले लागु नाही ते पण रदद करावे. चार मध्ये पण त्यांनी स्वत: लिहीले आहे लागु नाही ते पण रदद करावे. शेवटी प्रशासनाने दर निश्चित ठेवण्यासाठी आमच्यापुढे ठेवले आहे ते दर भलेही सनदेच्या जागेसाठी असो, झोपडपटटीच्या जागेसाठी असो आम्ही हा प्रस्ताव अशात-हेने नाही पास करणार की सनदवाल्यांना कमी दर यु. नंबरवाल्यांना जास्त दर असे न करता जे प्रशासनाने

आमच्या समोर दर ठेवले आहेत ते पास करून प्रस्ताव शासनाकडे पाठविला पाहिजे. खुप चांगले होईल. आमचे माजी. महापौरांनी दर स्वतः स्विकार केले आहेत. व वरच्या ज्या पण



अटी शर्ती आहेत त्यातील अर्ध्यांवर स्वतःच लिहिले आहे लागु नाही. बाकीच्या शर्ती न लिहिता त्यांनी जे दराविषयी लिहीले आहे ते मंजुर केले पाहिजे. व हा प्रस्ताव शासनाकडे गेला पाहिजे. शेवटी टिप लिहिली आहे त्यात आले आहे की,२०००/- रू. दंड घेतला जावा असे लिहिले आहे. त्या २०००/- ऐवजी २००/- रू. केले तर खुप चांगले होईल. आयुक्त साहेबांनी महापालिकेची आर्थीक परिस्थिती लक्षात घेवून हो जो प्रस्ताव आमच्या समोर ठेवला आहे तो लवकरात लवकर शासनाकडे पाठवून व तिकडुन मंजुर करून घेवून व शहरामध्ये लागु करावा म्हणजे लोक सुटकेचा श्वास सोडतील. व महापालिकेचे उत्पन्न पण वाढेल. काही जिनाअधिमुल्य ठरविले आहे त्यामुळे पण उत्पन्न वाढेल. काही बाल्कनी बंदीस्त केल्याबददलजे दर लागु केले त्याचे पण उत्पन्न मिळेल. काही दहा टक्के अधिकार आयुक्तांना आहेत. त्यांनी बिल्डर असोसिएशनला आश्वासन दिले आहे की,कुणाचेही नुकसान करण्यापेक्षा आमची जी इलेक्टेड बॉडी आहे त्याचे व आयुक्तांचा हा उददेश आहे की,कुणाचेही नुकसान केल्यास राष्ट्रीय नुकसान होते. वीट , चुना, वाळु, सिमेंट हे सर्व जे पडेल ते कुणाच्या फायदयाचे नसेल म्हणुन त्यांच्यावर दंड आकारून त्यांना नियमित करून दिले तर महापालिकेचे पण उत्पन्न वाढेल व शहरवासी सुटकेचा श्वास सोडतील. व आयुक्तांना परत बोलवणार नाहीत व म्हणतील अशा आयुक्तांना कोटी कोटी प्रणाम.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा. महापौर, मला असे वाटते की, जमिनीचे वर्गीकरण नगररचनाकारांनी केले आहे. सनद दिलेल्या जागा, आरक्षणाच्या जागा, युनंबरच्या जागा परंतु बांधकामाचा प्रकाराचा समावेश केला नाही. त्यामध्ये पऱ्याचे बांधकाम विटेचे बांधकाम, टीअर गर्डर मला असे म्हणायचे आहे की, जे आर.सी.सी कंन्स्ट्रक्शन आहे त्यावर कशात-हेने दर लागु करणार.

<u>मा. सचिवः-</u>तुमच्या समोर जो गोषवारा दिला आहे तो कमी लोकांनी वाचला आहे. या गोषवा-यात प्रस्ताव याप्रकारे आहे की ज्यांच्याकडे जमिनीची सनद आहे त्यांनी अनाधिकृत बांधकाम केले आहे, प्लान मंजुर केला नाही अशा परिस्थितीत प्रिमियम घेवून रेग्युलाईज केले जाईल. जो रेग्युलाईज करण्यास पात्र असेल. तुम्ही जे म्हणत आहात कोणत्याही प्रकारचे बांधकाम नियमित करण्यासाठी हा प्रस्ताव नाही.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>म्हणुनच मी महासभेआधी शिंदे साहेबांना बोलावून विचारत होतो कारण मी या प्रस्तावाबाबत साशंक होतो. कारण हा ठराव बरोबर नव्हता.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, आता आमचे सचिव साहेब जे म्हणाले पण आम्ही तर असा ठराव करत आहोत की जितके पण अनाधिकृत बांधकाम आहेत. जे फक्त रोडमध्ये किंवा आरक्षणात येतात. ते सोडुन बाकी सर्व बांधकाम नियमित केले जावेत.

<u>मा. सचिवः-</u>हा ठराव योग्य दिशेने जात नाही आहे. तुम्हाला यावर अभ्यास करावा लागेल. हवी असल्यास तुम्ही समिती गठन करून त्यावर विचार विमर्श करा नंतर

आणलात तर चांगले होईल. नाही तर तुम्ही ज्यात-हेने म्हणत आहात त्या त-हेने तो होणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेश वदरीया:-</u>एम.आर.टी.पी ॲक्ट सेक्शन ५२ मध्ये पहिल्यापासुन प्रावधान आहे की, आपल्याकडे जर सनद आहे, तुम्ही जर नकाशा मंजुर करून नसेल घेतला व डेव्हलपमेंट कंन्ट्रोल रूल्सच्या अखत्त्यारित ती बाब बसत असेल तर जेव्हा तुम्ही ५३ कलमान्वये नोटीस देता तेव्हा तो तुम्हाला प्लान सबमिट करतो. जर महापालिकेला वाटले की ती जागा डेव्हलपमेंट कंन्ट्रोल



रूल्सच्या अखत्त्यारीत येत आहे व तसे बांधकाम केले गेले आहे. तर ते मंजुर केले जावे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>मला असे वाटते की, आयुक्तांनी सदस्यांच्या भावना चांगल्या त-हेने ऐकल्या आहेत त्यांचा काय हेतु आहे ते शहराला काय देवू इच्छितात. ते कशात-हेने अनियमित बांधकामांना नियमित करू इच्छितात मला वाटते त्यांना यावर खुलासा केला तर बरे होईल.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>सन्माननिय महापौरजी, सन्माननिय सदस्य हे जे प्रस्ताव सभागृहासमोर ठेवले गेले आहेत. तात्त्वीक रूपाने शासनाने मान्य केले तर यावर अंमलबजावणी होईल. तर हा जो प्रस्ताव आहे तो तात्त्वीक स्वरूपात तुमच्यासमोर आहे. व यावर जेव्हा शासन विचार करेल. त्याचे जे मायनॉर डिटेल्स आहेत. गर्व्हनमेंट वील गीव ड्यु कंन्सीडरेशन ऑल दी पॉसिबलीटीज. आता जो प्रस्ताव आहे तो तात्त्वीकदृष्टया तुमच्या समोर आहे. सदन पाहिजे तर त्यात साधारण सुधारणा करू शकतात. परंतु कायदयान्वये जसे की एम.आर.टी.पी. ॲक्ट व बी.पी.एम.सी ॲक्ट जो आहे त्यानुसार नियमित बांधकाम होवू शकते तसे प्रस्त्ताव तुमच्यासमोर ठेवले आहे. ज्यावेळी मा. मुख्यमंत्री व सचिव साहेबांबरोबर यासंबंधी बैठक झाली होती त्याचवेळी मा. मुख्यमंत्री महोदयांना सांगितले गेले होते की, जे अनाधिकृत बांधकाम उल्हासनगरमध्ये आहे ते कसे नियमित केले जाईल. त्याचवेळी त्यांना माहिती दिली होती की, महाराष्ट्रात इतर शहरात गुठेवारी पध्दतीचा अवलंब केला आहे. व जे अनाधिकृत बांधकाम एम.आर.टी.पी. ॲक्टच्या बाहेर किंवा महाराष्ट्र रीजनल टाऊन प्लानिंग ॲथोरीटीच्या बाहेर आहे तिथे गुंठेवारी पध्दत आहे. परंतु जेथे एम.आर.टी.पी. ऐरीया आहे तिथे गुंठेवारी पध्दतीसारखा कोणताही कायदा लागु केला नाही. म्हणुन शासनाला देखिल निर्णय घेतेवेळी काही प्रस्ताव काही मार्गदर्शक सुचना किंवा सत्त्य काय आहे ते कळणे आवश्यक आहे हे सर्व लक्षात ठेवून विस्तृतपणे हा प्रस्ताव तुमच्यासमोर मांडला आहे. व मला असे वाटते की, तात्त्वीक स्वरूपात जर शासनाने त्यास मान्य केले तर किंवा पारीत केले तर जसे तुम्ही आता सांगितले की, मोठया प्रमाणात चटई क्षेत्राचे उल्लंघन झाले आहे. आरक्षित भुखंडावर इमारती तयार झाल्या आहेत. शासनाच्या जागेवर देखिल इमारती बांधल्या गेल्या आहेत. खाजगी जागेवर देखिल अनाधिकृत बांधकाम झाले आहे. मला असे वाटते की, तात्त्वीक स्वरूपात शासन जेव्हा याचा विचार करेल त्याचवेळी ही जी शक्यता आहे किंवा पर्याय आहे, किंवा विविधता आहे याबाबत शासन जरूर विचार करेल. परंतु या विविधतेबाबत या सभागृहाला काही सूचना दयायच्या असतील विस्तृतपणे तर ते त्या देवू शकतात असे मला वाटते.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा:-</u>तुम्हाला जर इंग्रजीमध्ये एक नमुना तयार करून दिला तर तुम्ही मराठीमध्ये प्रस्ताव तयार करून सदनासमोर मांडू शकता. किंवा मी बोलतो तुम्ही लिहित जा तरी चालेल.

मा. सचिवः-यासाठी कायदयाचा दृष्टीकोन बघावा लागेल.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-हा जो ठराव असणार तो नुसता शिफारस असणार त्यावर अंतिम निर्णय शासनाला घ्यायचा जोपर्यंत शासन आपला ठराव मंजुर करत नाही तोपर्यंत तो लागु होणार नाही. बरोबर आहे ना? त्यानुसार मी तुम्हाला एक नमुना सांगतो. मी सर्व साधारण ठराव देतो. जेव्हा राज्य शासन कंदील दाखवेल तेव्हा त्यावर अंमलबजावणी होईल. मी सभेसमोर बोलणे जरूरी आहे का मी तुम्हाला लिहून दिले तरीही चालेल.



मा. सचिवः-सर्व सन्माननिय सदस्यांनी जर श्री. हरदास माखिजा यांना प्राधिकृत केले तर ते नगररचनाकारांबरोबर बसून जो प्रस्ताव आणतील तो मान्य असेल तुमची काही त्याला हरकत नसेल. समजा त्यांनी तुम्हाला दिले ते तुम्हाला मान्य असेल आताच्या आता.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-ठिक आहे.

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-मा. महापौर महोदया, हा जो प्रस्ताव सदनासमोर आहे जसे की, सन्माननिय सदस्य श्री. माखीजा साहेब म्हणाले की हे रिकमनडेरी यावर अंमलबजावणी जेव्हा शासन मान्यता देईल तेव्हा होईल त्याच्या आधी नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-होय. शासन मान्यतेच्या अधिन राहुन मंजुरी देत आहे.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-इव्हन अदरवाईज प्रेझेंन्ट फॉर्ममध्ये जो ठराव आहे जोपर्यंत शासन मान्यता देत नाही तोपर्यंत आपण त्यावर अंमलबजावणी करू शकत नाही.

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-जोपर्यंत शासन या ठरावाला मंजुरी देत नाही तोपर्यंत सध्या लागु असलेला नियम आणि कायदा लागु राहील.

मा. सचिवः-सब्जेक्ट टू दी ॲप्रुव्हल ऑफ गर्व्हनमेंट जसा आहे तसा. ठिक आहे. हा विषय पास. यांनी जे दिले ते मंजुर?

काही सदस्य :-मंजुर.

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव वरील सुचविलेल्या सुधारणेसह सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

--५७--

मा. सचिवः-विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

विषय :- महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभागाशी संबंधित सर्व योजना/ कार्यक्रम अंदाजपत्रक सन २००२- २००३ पुस्तीकेची प्रत अवलोकनार्थ बाबत.

मा. सचिवः-मंजुर?

काही सदस्य :-मंजुर. मंजुर.

मा. महापौरः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

विषयः- महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभागाशी संबंधित सर्व योजना/ कार्यक्रम अंदाजपत्रक सन २००२- २००३ पुस्तीकेची प्रत अवलोकनार्थ बाबत.

प्रस्तावनाः-

महाराष्ट्र शासनाने सन २००२-२००३ या आर्थिक वर्षाचे नगर विकास विभागाचे कार्यक्रम अंदाजपत्रक पुस्तिका तयार केली असून सदर पुस्तिकेमध्ये नगर विकास विभागाशी संबंधीत सर्व योजना / कार्यक्रम इत्यादी माहिती दिली आहे. सदर माहिती उल्हासनगर महानगरपालिकेच्या सर्व नवनिर्वाचित सदस्यांना करून देण्यासाठी त्यांचे पत्र क्रमांक काअंप -१०२००१/९८६ / प्र. क्र. १२२/२००१ नवि -४ दिनांक १६ ऑगस्ट २००२ अन्वये कळविण्यांत आले आहे. सदर कार्यक्रम पुस्तिकेच्या आवश्यक त्या छायांकित प्रती तयार करण्यांत आल्या असून तयार करण्यांत आलेल्या पुस्तिका सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे बाबत महाराष्ट्र शासनाने आदेश दिले आहे सदर आदेशान्वये ही पुस्तिका महासभेपुढे नवनिर्वाचित सदस्यांना माहिती होणेचे दृष्टीने ठेवणेस प्रस्तावीत करीत आहे.



<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ४१</u> <u>दिनांक:-१९.१०.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेश वदारिया

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाशी संबंधित सर्व योजना/ कार्यक्रम अंदाजपत्रक सन २००२-२००३ पुस्तिकेची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:-</u>विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.

विषयः- उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणेसाठी आणि धंदे व व्यवसाय करणे करिता परवानासंबंधी प्रारूप उपविधी आणि प्रारूप नियमावलीला मान्यता देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, हा विषय आपल्या महासभेसमोर आधी पण आला होता. या विषयास आम्ही त्यावेळी पण डिफर केले होते. कारण हे होते की, याची पुर्ण माहिती सदनासमोर नव्हती. कोणकोणत्त्या धंदेवाल्यांना किती ट्रेड लायसन्स लागेल, कोणत्त्या उद्योगधंदयांचा समावेश असेल आज पण अर्धवट माहिती आहे. किंवा यासाठी एक समिती नेमुया महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सर्व गटनेता आमचे उपायुक्त अशी एक समिती गठीत करून सहा महिन्याच्या आत महासभेसमोर याची माहिती ठेवावी की कसे ते ट्रेड लायसन ठेवणार तशी तरतुद आहे का? ट्रेड लायसनचे किती चार्ज आकारणार? तसा अहवाल समितीने सहा महिन्यांच्या आत महासभेसमोर मांडावा. जेणेकरून सर्व सदस्यांना याबाबत माहिती मिळेल. व मंजुर करण्याआधी आम्हाला कळेल की आम्ही काय मंजुर करत आहोत.

<u>मा. सचिवः-</u>समितीत कोण कोण सदस्य असतील याबाबत काही सूचना.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा.</u>महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सर्व गटनेता व उपायुक्त , व्यापारी महामंडळाचे अध्यक्ष, हरेश इदनानी पण असतील.
<u>मा. सचिवः-</u>ठिक आहे.
<u>काही सदस्य :-</u>मंजुर.

--५९--

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे समंत करण्यात येत आहे.

<u>विषयः-</u> उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणेसाठी आणि धंदे व व्यवसाय करणे करिता परवानासंबंधी प्रारूप उपविधी आणि प्रारूप नियमावलीला मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील अनेक प्रकारचे व्यवसाय करण्यात येतात तसेच व्यवसाय चालविण्याकरिता व इतर प्रयोजना करिता विवक्षीत गोष्टी / वस्तुंची साठवणूक करण्यात येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ नुसार (१)आयुक्तांना दिलेल्या अटी व शर्ती या अन्वये आणि त्यास अनुसरून असेल त्या व्यतिरिक्त कोणत्त्याही व्यक्तीस (अ)नियमात विनिर्दिष्ट केलेली कोणतेही वस्तु कोणत्त्याही जागेत किंवा जागेवर

१ अशा वस्तूंचे जे कमाल परिमाण त्या जागेत किंव जागेवर एका वेळी ठेवता येईल म्हणून नियमात विनिर्दिष्ट केले असेल अशा कोणत्त्याही

परिमाणात किंवा त्या परिमाणापेक्षा अधिक परिमाणात लायसन्स शिवाय ठेवता येणार नाहीत आणि

२ अन्य कोणत्त्याही प्रयोजनासाठी किंवा विक्रिसाठी किंवा नियमात प्रत्त्येक वस्तूच्या बाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा घरगुती वापरा व्यतिरिक्त अन्य वापरासाठी ठेवता येणार नाही.

ब)राहण्याची जागा म्हणुन योजलेल्या किंवा वापरण्यात येणा-या कोणत्त्याही इमारतीत किंवा जागांवर किंवा अशा इमारतीपासून पंधरा फुटाच्या आत, चार हंड्रेड वेटपेक्षा अधिक कापूस दाबलेल्या गासंडयाच्या स्वरूपात, किंवा बारदाणांत किंवा सुटा ठेवता येणार नाही.

क) कोणत्त्याही जागेत किंवा जागेवर घोडे, गुरेढोरे किंवा अन्य चतुष्पाद प्राणी

१ विक्रीसाठी

२) भाडयाने देण्यासाठी,

३ ज्या प्रयोजनासाठी कोणताही आकार घेण्यात येत असेल किंवा कोणतेही परिश्रमिक करण्यात येत असेल अशा कोणत्त्याही प्रयोजनासाठी, किंवा

४) त्यापासुन मिळणा-या कोणत्त्याही मालाच्या विक्रीसाठी ठेवता येणार नाही किंवा ठेवण्याची परवानगी देता येणार नाही.

ड) कोणत्त्याही जागेत किंवा जागेवर

१ नियमात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्त्याही व्यवसायशी संबंधित असलेल्या व्यवसायापैकी किंवा कामांपैकी कोणताही व्यवसाय किंवा काम

२ आयुक्तांच्या मते जो कोणताही व्यवसाय किंवा काम जिवितास किंवा आरोग्यास किंवा मालमत्तेस घातक असेल किंवा त्याच्या स्वरूपामुळे किंवा ज्या परिस्थितीत तो चालवण्यात येत असेल किंवा चालविण्याचे योजले असेल त्या रितीमुळे किंवा परिस्थितीमुळे उपद्रव होण्याचा संभव असेल तर असा कोणताही व्यवसाय किंवा काम चालवता येणार नाही किंवा चालवण्याची परवानगी देता येणार नाही.

तसेच अधिनियमाच्या कलम ३८६ अन्वये आयुक्त महानगरपालिकेच्या मंजुरीने वेळोवेळी ठरविल अशा दराने सदर व्यवसाय किंवा साठवणूकीकरीता फी आकारता येईल.

--६०--

तत्त्कालीन नगरपालिकेने अंदाजे १५ ते २० वर्षा अगोदर सदर व्यवसाय व वस्तु साठवणूक करण्याकरिता उपविधी केले होते. त्या अनुशंगाने काही व्यवसाय व वस्तु करिता अल्पशा प्रमाणात परवाना फी आकारण्यात येत आहे.

१५ ते २० वर्षाच्या कालावधीत शहरातील मोठया प्रमाणावर नविन उद्योग सुरू झाल्याचे दिसत असून त्या व्यवसाय व वस्तु साठवणूकी करिता उपविधी करणे आवश्यक वाटते तसेच महानगरपालिकेची ढासळलेली आर्थिक परिस्थिती लक्षात घेता सदर व्यवसाय व वस्तु साठवणुकीसाठी परवाना फी आकारणीत वाढ करणे व नविन व्यवसाय व वस्तु साठवणूकी करता परवाना दर नव्याने निश्चित करणे उचित वाटते.

आसपासच्या इतर महानगरपालिकेचे सदर विषयां संबंधी उपविधी पडताळुन अधिनियमाचे कलम ४५८ (२०) ४५५ प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नव्याने नियम व उपविधी तयार करण्यात आलेले असून सदर विषयी व्यापार व वस्तु

साठवणूक संबंधी संपुर्ण माहिती तसेच जागा वापरासंबधी अटी व शर्ती दर्शविणारा तक्ता सोबत जोडलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५९ नुसार अधिनयमाच्या कोणत्त्याही प्रयोजनासाठी पुरस्मरणार्थ कोणत्त्याही उपविधीचा मसुदा महानगरपालिकेपुढे तिच्या विचारार्थ ठेवणे आवश्यक आहे तसेच कलम ४६० नुसार कोणत्त्याही उपविधी संबंधी अंतिमरित्त्या निर्णय घेण्याकरिता निदान सहा आठवडयापूर्वी शासकीय राजपत्रात व स्थानीक वृत्त पत्रामध्ये नोटीस देणे आवश्यक आहे. तसेच विचाराधीन उपविधी संबंधी अक्षेप महानगरपालिकेने विचारात घेवून अधिनियमाचे कलम ४६१ प्रमाणे राज्य शासनाकडून उपविधी व नियम कायम करून घेणे व कलम ४५५ (२) व ४६२ नुसार राजपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

उल्हासनगर महानगरपालिके संबंधी वरिल विषयावर तयार करण्यात आलेल्या उपविधी व नियम वरिल प्रमाणे मंजूरी घेणे करिता महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ४२</u> <u>दिनांकः-१९.१०.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी
अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेश वदारिया

ही महासभा उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणेसाठी आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवाना संबंधी प्रारूप उपविधी आणि प्रारूप नियमावलीला मान्यता देण्यापुर्वी मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली सोबत जोडलेल्या यादीतील सदस्यांची समितीत नेमणुक करीत आहे आणि ही समिती सहा महिन्याच्या कालावधीच्या आत या सर्व उपविधी व नियमांच्या अभ्यासाअंती शिफारसीसह आपला अहवाल सादर करतील.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

--६१--

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. १६ वाचुन दाखवितात.

विषयः- <u>''प्रस्तावाची सूचना''</u>
सन्माननिय सदस्य श्री. हरदास माखिजा व श्री. मोहन वेहरानी यांचे टाटा इन्फोटेक्टची संविदा रद्दबादल करणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>मा.महापौरजी, सर्व सन्माननिय सदस्य व सहयोगी तसे तर लोकशाहीमध्ये असे होते की, लोकांचा आवाज व विशेषतः निवडुन आलेले प्रतिनिधी यांचा आवाज याला कायदा समजला जावा, कायदयाचे रूप त्याला मिळाले पाहिजे व विशेषतः अशी लोकशाही जी भारत देशात असुन पुर्ण

विश्वामध्ये प्रसिध्द आहे परंतु मला अत्त्यंत खेदाने बोलावे लागते की या सभागृहामधील सन्माननिय सदस्यांनी मागची महासभा असो किंवा आताची निवडुन आलेली महासभा असो. सदस्यांनी जर कोणत्त्या विषयाबाबत आवाज उठविला, सदस्यांच्या आवाजाला मान देवून पिठासिन अधिका-यांनी रूलिंग दिले. एकदा दिले, दोनदा दिले, तिनदा, चारदा दिले परंतु आयुक्त साहेब जे याआधीचे होते व आताचे आयुक्त साहेब यांनी त्त्याकडे लक्ष दिले नाही. निवडुन आलेल्या प्रतिनिधींचा आवाज ऐकला गेला नाही. त्त्यांच्या आवाजाला दाबले गेले. हे लोकशाहीचे पतन आहे. लोकशाहीचा खुन आहे असे मी मानतो खासकरून पिठासिन अधिकारी आयुक्तांना कोणते निर्देश देतात तेव्हा आयुक्तांचे हे कर्तव्य असते की, त्त्यांनी निर्देशाचे पालन करावे. व जेव्हा ते महासभेमध्ये निर्देश दिले गेले आहे. परंतु टाटा इन्फोटेक्टच्या बाबतीत पुर्व महानगरपालिका व आताची महानगरपालिका यांनी वारंवार जो आवाज याविरूध्द उठविला आहे. त्या आवाजाकडे प्रशासनाचे लक्ष काही गेले नाही. यासाठी आज लाचारीने मला व माझ्या सहयोगींना, कॉंगेसचे अध्यक्ष श्री. मोहन बेहरानी यांना हा प्रस्ताव सभा सुचनेच्या कार्यसूचीवर आणावा लागला. आम्ही सदनाचे लक्ष वेधु इच्छितों व हा प्रस्ताव आणायचा आमचा एक उददेश असा आहे की, हा प्रस्ताव आणल्यानंतर हा एक नियमित विषय कार्यसुचीवर येतो व त्त्यानंतर जो प्रस्ताव पारीत होईल त्त्यावर पुर्णपणे अंमलबजावणी केली जाईल. याच महापालिकेने सन २००१मध्ये टाटा इन्फोटेक्ट कंपनीला, शहराच्या मालमत्तेला मोजमाप करण्यासाठी व या मालमत्तांच्या मोजणीमध्ये नगरपालिका व महानगरपालिकेच्या कर्मचा-यांनी जो गोंधळ केला आहे. कुणा भाडेकरूला त्त्यांनी मालक दाखविले आहे, कुणा मालकाला भाडेकरू दाखविले आहे. कच्च्या बांधकामांला पक्के दाखवले आहे. पक्क्याबांधकामास कच्चे दाखवले आहे. यात-हेचा गोंधळ पैसे घेवून मागील कित्त्येक वर्षापासुन करत आहेत. त्त्या रेकॉर्डला बरोबर करण्यासाठी,सुधारण्यासाठी अशा नावाजलेल्या कंपनीला जेव्हा महानगरपालिकेचे तत्त्कालिन आयुक्त श्री. शिंदे साहेब यांनी आणले होते तेव्हा पुर्व महानगरपालिकेने स्थायी समिती सदस्यांनी व महासभेमधील सर्व सदस्यांनी या कंपनीला विना निविदा मागवता ८६ लाख रू. चा ठेका दिला होता. परंतु मला अत्त्यंत खेदाने म्हणावे लागते की, ज्या विश्वासाने महानगरपालिकेचे आयुक्त व महानगरपालिकेच्या सदस्यांनी या कंपनीला ठेका दिला ती कंपनी त्त्या विश्वासाला पात्र ठरली नाही. सन २००१मे मध्ये ठेको दिला होता चार महिन्यासाठी. ३० सप्टेंबर, २००१ पर्यंत टाटा इन्फोटेक कंपनी मोजमापाचे काम पुर्ण सर्व्हे करून शहरातील प्रत्त्येक मालमत्तेला तपासुन, दारोदार जावून त्त्यांच्याकर्मचा-यांतर्फे मोजमाप करेल व सत्त्य परिस्थिती महानगरपालिकेसमोर ठेवेल इतकेच नव्हे तर प्रत्त्येक मालमत्तेचा नकाशा त्या रजिस्टरमध्ये दिला जाईल त्त्यामध्ये दाखविले जाईल की बाथरूम कुठे आहे? बेडरूम कुठे, शोचालय कुठे, स्वयपाकघर कुठे? अशा त-हेचे काम या कंपनीला करायचे होते. परंतु कंपनीने ते काम चार महिन्याच्या कालावधीत निर्धारीत वेळेत केले नाहीच त्त्यानंतर दोनदा मुदतवाढ मिळून देखिल ते काम त्त्या कंपनीने नीट त-हेने पुर्ण केले नाही. व त्त्याबाबतीत वारंवार तक्रारी नगरसेवक, नगरसेविकांनी व शहरातील जनतेने केले आहे.



इतकेच नव्हे जे काम त्त्यांना मालमत्तांच्या नोटीसा बनवुन, ॲसेसमेंट करून दयायचे होते, बिल पाठवायचे होते ते त्त्यांनी पुर्ण केले नाही. व त्त्याबरोबर त्त्यामध्ये बरेच घोटाळे केले नगरपालिकेच्या कर्मचा-यांनी ते घोटाळे केले म्हणुन कंपनीला हा ठेका देण्यात आला होता. तेच घोटाळे त्त्यांनी त्त्यांच्या कालावधीत केले. आम्हाला असे वाटत होते की, यांना ठेका दिल्याने महानगरपालिकेचे उत्त्पन्न वर्षाला दोन-तीन करोड रू. ची भर पडेल. परंतु फक्त १७ लाख रू. भर त्त्यात पडली आहे. ८४

लाख रू. चा ठेका दिला आहे. व त्यापासुन महापालिकेला फक्त १७ लाख रू. चा फायदा झाला आहे. अशात-हेच्या तक्रारी आम्ही वारंवार सदनामध्धुन सांगितल्या आहेत व महापौर, उपमहापौर, सदनातील सर्व सदस्यांनी या विरूध्द आवाज उठविला आहे. व तत्कालिन आयुक्तांना देखिल असे आदेश दिले होते की, त्यांचा ठेका रदद केला जावा. आजचे आमचे महापालिकेचे आयुक्त आहेत त्यांना देखिल महापौरजी आपण आदेश दिले होते की, ठेका रदद केला जावा. परंतु अजुन ठेका रदद झाला नाही. आजच्या तारखेत टॅक्सचा रेकॉर्ड अर्धवट आहे. कॉम्प्युटर ॲन्ड कंपनी कडुन बिल काढुन घेतले आहे. व त्यानुसार जशा आहेत तशा नोटीसी पाठविल्या आहेत. व या कंपनीने प्रत्यक्ष असे काही काम केले नाही. म्हणुन मला असे वाटते की, या कंपनीने जो उल्हासनगर महानगरपालिकेशी जो विश्वासघात केला आहे व जो फार मोठा धोका दिला आहे महापालिकेला ते सर्व लक्षात घेवून कंपनीचा ठेका रदद करण्याचा प्रस्ताव आजच्या आज पारीत झाला पाहिजे त्यासाठी मी विशेष करून आपणांस सांगु इच्छितो ही जी यादी आम्ही सर्व सदस्यांना दिली आहे. त्यात कमीत कमी आम्ही दिडशे मालमत्तांचा उल्लेख केला आहे. ही यादी साईट ॲडजेस्ट होत नाही तरी रेकॉर्डमध्ये दाखविले आहे. अशा चुका जर कंपनी सुधारेल म्हणुनच ठेका दिला होता. मागच्या वेळेस आयुक्तांना डबल बिलिंगचे उदा. दिले होते. एका जागी जुनी बॅरेक होती. तिथे आता मल्टीस्टोरेड इमारत बांधली आहे. त्या जुन्या जागेचा जो मालक आहे त्याच्या नावाने देखिल टॅक्स पावती येते व नविन इमारत झाली त्याची पण मोजमापणी झाली त्याची पण बिले येतात. दोनदा मोजमापणी या शहरात एका संपत्तीची होते. यात-हेच्या चुका आहेत त्या सुधारणेचे काम टाटा इन्फोटेक्टचे कंपनीचे होते. ते त्यांनी अजिबात केले नाही व ज्या उददेशाने त्यांना ठेका दिला त्या दिशेने त्यांनी एक टक्का सुध्दा काम केले नाही. आजच्या तारखेत कमीत कमी पाच, दहा हजार असे वादग्रस्त प्रकरण आहे. जेव्हा एखादा नागरिक नगरसेवक किंवा नगरसेविकेकडे ते प्रकरण घेवून येतो तेव्हा नगरसेवक काही करू शकत नाही. नंतर जेव्हा तो आयुक्तांकडे जातो तेव्हा आयुक्त म्हणतात मी काही करू शकत नाही. मी स्वतः आयुक्तांशी डबल बिलिंग विषयी बोललो आहे. पाण्याच्या डबल बिलाविषयी देखिल बोललो आहे. त्यांचे पण असे म्हणणे होते की मी विवश आहे मला काही अधिकार नाहीत. मी यावर काही उपाय करू शकत नाही म्हणुन मी आज सदनाला विनंती करतो की, हा जो कंपनीचा ठेका त्वरीत रदद करावा व हे काम महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना दिले जावे. ते तरी पण बरे कारण ही कंपनी नाकामयाब झाली आहे.

<u>काही सदस्य :-</u>पास. पास.

<u>मा. महापौरः-</u>सदरचा ठेका सर्वानुमते रदद करण्यांत येऊन पुढील प्रमाणे ठराव समंत करण्यात येत आहे.

सुचकाचे नाव :-श्री. हरदास माखिजा.
अनुमोदकाचे नाव :-श्री. मोहन वेहरानी.

<u>प्रस्तावनाः-</u>

महानगरपालिकेने नियमाप्रमाणे दर ४ वर्षातून निदान एकदा तरी नविन मालमत्ता कर आकारणी पुस्तक तयार केले पाहिजे त्यानुसार या महापालिकेने मेसर्स टाटा इन्फोटेक या प्रतिष्ठित कंपनीसी निविदा शिवाय थेट



सांविदा केली आहे. त्या संविदेतील अटी व शर्तीवर टाटा इन्फोटेकला सन २०००-२००१ साठी नविन कर आकारणी पुस्तक दि. ३०.९.२००१ पर्यंत तयार करावयाचे होते आणि त्यासाठी त्या कंपनीला रुपये ८४,००,०००/-देयक अदा

करण्याचे ठरले होते. मेसर्स टाटा इन्फोटेकला सदरची संविदा देण्याचे मुळ कारण हे होते की, कमीत कमी वेळेत कर आकारणी पुस्तक योग्य प्रकारे तयार होईल व भ्रष्टाचार होणार नाही परंतु तसे झाले नाही. उक्त कंपनीला कर आकारणी पुस्तक तयार करण्यासाठी पुढील काम सोपविले होते.

अ) शहरातील सर्व इमारतींची व जमिनीची यादीः तीत आयुक्तास योग्य वाटेल अशा रीतीने एकतर नावावरुन किंवा क्रमांकावरुन प्रत्त्येक इमारत किंवा जमीन ही वेगवेगळी दाखवली पाहिजे आणि तीत प्रत्त्येकीचे स्थान किंवा स्वरुप यासंबंधी जो
तपशील तिची ओळख पटविण्यासाठी त्याच्या मते पुरेसा होईल, असा तपशिल असला पाहिजे.

ब) या तरतुदीनुसार ठरवलेले अशा प्रत्त्येक इमारतीचे व जमीनीचे कर योग्य मुल्य निर्धारण करणे.

क) अशा प्रत्त्येक इमारतीवर किंवा जमिनीवर बसवण्यायोग्य असलेले मालमत्ता कर असल्यास ते मालमत्ता कर देण्यास प्रथमतः जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नाव.

ड) अशी कोणतीही इमारत किंवा जमिन सामान्य कराच्या आकारणीस जबाबदार नसेल तर ती अशी जबाबदार नसल्या बद्दलची कारणे.

ई) मालकाकडुन किंवा भोगवटादाराकडुन माहिती घ्यायची होती व आकारणी योग्य इमारतीच्या किंवाजमिनीच्या मालकाचे किंवा भोगवटयादाराचे नाव व राहण्याचे ठिकाण किंवा असा मालक व भोगवटादार या दोघांची नावे व राहण्याची ठिकाणे याची माहिती नोंद करावयाची होती. अशा इमारतीचे, जमीनीचे किंवा तीच्या कोणत्त्याही भागाचे क्षेत्रफळ आणि अशा इमारतीसाठी किंवा जमीनीसाठी किंवा तिच्या कोणत्त्याही भागासाठी मिळणारे भाडे असल्यास ते भाडे. इमारतीचे, जमीनीचे किंवा तिच्या कोणत्त्याही भागाचे क्षेत्रफळासह जागेवर नकाशा तयार करणे, आकारणी पुस्तक तयार करणे व पाहण्यासाठी खुले ठेवणे,

फ) मुल्यनिर्धारणाविरुध्द तक्रारीची छाननी आणि निवारण करणे संबंधी प्रक्रिया.

ग) सर्व तक्रारी निकालात काढल्यानंतर प्रभाग अधिकृत आकारणी पुस्तके तयार करणे.

ज) कराबद्दल बिले सादर करणे.

कॉम्प्युटर सॉफ्टवेअर सॉल्युशन तयार करुन देणे ही सर्व कर्तव्ये मेसर्स टाटा इन्फोटेक कंपनीस मे. २००१ पासून ते ३०.९.२००१ पर्यंत करुन घ्यायची होती पण या कंपनीने विहित मुदतीत काम केले नसल्याने संबंधित आयुक्तांनी सदरच्या कंत्राटदारास वेळोवेळी मुदत वाढ देवून बरीच संधी दिली आहे. तरीही त्यांनी २ वर्षाच्या कालावधीत नविन आकारणी पुस्तक तयार करून दिले नाही. दरम्यान या कंत्राटदाराने सद्या महानगरपालिकेकडे उपलब्ध कंत्राटदार कॉम्प्युटर ॲड्स् यांचेकडुन त्यांची फ्लॉपी घेवून त्यांच्या आधार सामुग्रीवरून विशेष नोटीस



व कर आकारणी पुस्तक तयार केल्याचे दिसते. कॉम्प्युटर अड्स् हे कंत्राटदार मागील काही वर्षापासुन सर्व्हेक्षण शिवाय इतर सर्व काम जसे की विशेष नोटीस काढणे, आकारणी पुस्तक तयार करणे, आकारणी पुस्तकात सुधारणा करणे

कराबद्दल बिले तयार करणे व मागणी नोटीस काढणे इत्त्यादीचे काम कॉम्प्युटरवर उपलब्ध आहेआणि त्त्यांच्या कॉम्प्युटरच्या फ्लॉपीच्या आधार सामुग्रीवरून मे. टाटा इन्फोटेक यांनी प्रत्त्यक्ष घरोघरी जावून सर्व्हेक्षण न करता थेट मागील काही वर्षाचे कर आकारणी पुस्तक समान सामुग्री प्रस्तुत केली आहे. मे. टाटा इन्फोटेक या ठेकेदारांने महानगरपालिकेची फसवणूक केलेली आहे आणि त्त्यांच्या समर्थनार्थ पुढील खातेदारांच्या चौकशी अंती सर्वांना कळेल की, खालील मालकांचे नावाने त्त्यांनी ज्या नोटीसा किंवा आकारणी पुस्तकात नोंदी केल्या आहेत त्त्या कुठेही उपलब्ध होवू शकणार नाहीत किंवा ज्या प्रकारच्या मालमत्ताची नोंद आहे त्त्या जागेवर कुठेही मिळणार नाहीत.

| अ.क्र. | प्रभाग क्र/ खाता क्र. | मिळकतदाराचे नाव व पत्ता |
|---|---|---|
| १. | २८/ ९१४ | गुल अछरा.<br>ब्लॉक सी ४ जवळ ,उल्हासनगर-३ |
| २. | २२ / ५१ | सुंदरदास आर. राजवानी.<br>बॅरेक नं. ४७४ , ४७५ शेजारी, गजानन मार्केट शेजारी, उल्हासनगर-२ |
| ३. | २२/ ७३ | रामप्यारी तेजुमल<br>गजानन मार्केट शेजारी, बॅरेक नं. ४७५ उल्हासनगर-२ |
| ४. | २२/ ७१ | सुंदरदास राजवानी<br>बॅरेक नं४७५ शेजारी, गजानन मार्केट शेजारी, उल्हासनगर-२ |
| ५. | २२/ ७२ | शामदास बाशोमल<br>ब्लॉक नं. ४७५ शेजारी, गजानन मार्केट जवळ, उल्हासनगर-२ |
| ६. | २२/ ७४ | झुमरोमल बाशोमल<br>ब्लॉक नं. ४७५ शेजारी, गजानन मार्केट जवळ, उल्हासनगर-२ |
| ७. | ३१ / ६२ | बलहालदास मांगोमल<br>बॅरेक नं. ८०६ , उल्हासनगर-३ |
| ८. | ३१ / ६३ | पुनम हरेशलाल तखतानी<br>बॅरेक नं. ८०६ उल्हासनगर-३ |
| ९. | ३१/६४ | साजोमल गुलाबराय<br>बॅरेक नं. ८०६ उल्हासनगर-३ |
| १०. | ३१/६५ | भगवान सेवकराम तकतानी<br>बॅरेक नं. ८०६ , उल्हासनगर-३ |
| ११. | ३१/६७ | भगवानदास धरमल<br>बॅरेक नं. ८०६ , उल्हासनगर-३ |

| | | |
|---|---|---|
| १२. | २९/८८४ | मनोहर एच/ नरेश सी. पंजवानी<br>स्टेट बॅंके शेजारी, कल्याण अंबरनाथ रोड, उल्हासनगर. |
| १३. | २९/८९० | राजेंदकुमार / रामलाल सी. पंजाबी<br>महापालिके शेलारी, महात्मा फुले नगर, उल्हासनगर |
| १४. | २९/९६३ | राधेश्याम सी वर्मा.<br>बॅरेक नं. ७८७ शेजारी, महापालिके समोर, उल्हासनगर-३ |
| १५. | २९/१०३५ | हेमनदास टी.<br>महापालिके समोर, बॅरेक नं. सी. २० उल्हासनगर-३ |
| १६ | ३१/५५ | मनोज महल<br>बॅरेक नं. ८०६ , उल्हासनगर-३ |
| १७. | ३१/६२ | बॅरेक नं. ८०६ , उल्हासनगर-३ |
| १८. | ३१/६३ | बॅरेक नं. ८०६ , उल्हासनगर-३ |
| १९. | ३१/६४ | बॅरेक नं. ८०६ , उल्हासनगर-३ |
| २०. | ३१/६५ | बॅरेक नं. ८०६ , उल्हासनगर-३ |
| २१. | ३१/६७ | बॅरेक नं. ८०६ , उल्हासनगर-३ |
| २२. | २९/८८४ | मंदार एच. पंजवानी |
| २३. | २९/८९० | राजेंदकुमार पंजाबी<br>महादेव कॉम्प्लेक्स |
| २४. | २९/९५३ | मेथीव्हकूमार पी. चंदी<br>एम.पी. टावर, |
| २५. | २९/१०३५ | हेमनदास टी.<br>साईराम अपार्टमेंट |
| २६. | ३७/६०६<br>६२२/६२८ | हशोराम हरूमल<br>बॅरेक नं.११०१/८ समोर, ओटी. सेक्शन |
| २७. | ३७/७०२<br>७२५/६५१ | परचाराम तलरेजा<br>दिपा अपार्टमेंट, बॅरेक नं. १०९६ रूम नं. ७ ,८ ,९ ,१० ,११उल्हासनगर-३ |
| २८. | ३७/७१८<br>७४१/६६६ | किशीनचंद तलरेजा<br>बॅरेक नं. १०९६/ १ ,२समोर, ओटी सेक्शन, |
| २९. | ३७/६९५ ,६९६ ,६९७ ,६९८ | रामरखीयोमल<br>हरेकृष्णा अपार्टमेंट |
| ३०. | ३७/१३२१ ,१३२२ ,१३२३ , १३२४ ,१३२५ ,१३२६ | एकता भगवान राजन<br>बॅरेक नं. १०८५/रूम नं. |

| | | |
|---|---|---|
| | | ३० ,३१ ,३२ ,३३ ,३४ ,३५ उल्हासनगर-३ साई कुटीर अपार्टमेंट |
| ३१ . | ३७/१४०३ | कृष्णा गुनोमल<br>नवजीवन टॉवर, बॅरेक नं. १०९७/१७, |



| | | |
|---|---|---|
| ३२ . | ३७/१०८८ | हरगुनदास हरचंदानी<br>बॅरेक नं. १०६५ समोर ओ.टी. सेक्शन, प्रकाश आहुजा बंगला |
| ३३ . | ३२७/१०८९ | रेनु मधुसूदन<br>बॅरेक नं. १०६५ समोर ओ.टी. सेक्शन. प्रकाश दिप अपार्टमेंट |
| ३४ . | ३७/१०९० | रेनु मधुसूदन वासवानी<br>बॅरेक नं. १०६५ समोर ओ.टी. सेक्शन. प्रकाश दिप अपार्टमेंट |
| ३५ . | ३७/२०४० | हरेश आर. बजाज<br>बॅरेक नं. १०६४ समोर, रेल्वे स्टेशन शेजारी, उल्हासनगर-३ |
| ३६ . | ३७/७३६ | आशा यु. केलवानी<br>बॅरेक नं. १०९७/१८ |
| ३७ . | ३७/७३७ | किशीन दलवानी<br>बॅरेक नं. १०९७/१९ |
| ३८ . | ३७/७३८ | पारपती उधाराम<br>बॅरेक नं. १०९७ /२० |
| ३९ . | २८/१०५६ | ....... |
| ४० . | २८/ १०५५ | गुल अछरा |
| ४१ . | ३७/७३३ | चेटूमल परसुमल<br>बॅरेक नं. १०९७ /रु १५ |
| ४२ . | ३७/७३५ | प्रभोमल लघोमल<br>बॅरेक नं. १०९७/१६ |
| ४३ . | २८/१०५६ | गुल अछरा<br>ब्लॉक सी ४ शेजारी, |
| ४४ . | २८/१०५५ | गुल अछरा<br>ब्लॉक सी ४ |
| ४५ . | ३७/७५४ | मोहम्मद एम. उस्मान खान<br>स्मीता निवास, श्यामसुंदर सोसायटी समोर ,उल्हासनगर-३ |
| ४६ . | ३७/७३३ | चेटुमल परशुमल<br>बॅरेक नं. १०९७ उल्हासनगर३ |
| ४७ . | ३७/७३५ | प्रीभोमल लागोमल<br>बॅरेक नं. १०९७ उल्हासनगर-३ |
| ४८ . | ३७/७३६ | आशा यु. केलवानी<br>बॅरेक १०९७, उल्हासनगर-३ |

| | | |
|---|---|---|
| ४९. | ३७/७३७ | किशन दलवानी<br>बॅरेक १०९७, उल्हासनगर-३ |
| ५०. | ३७/७१६ | जमनाबाई वाधवानी<br>राधेश्याम को.ऑ. सोसायटी, फ्लॅट नं. १६ उल्हासनगर-३ |



त्याअर्थी नविन आकारणी पुस्तकात पुढील ज्या काही गोष्टी असल्या पाहिजेत त्या नाहीत.

अ) ज्या कोणत्त्याही व्यक्तीचे नाव ज्या रीतीने दाखल करणे आवश्यक असेल त्या व्यक्तीचे नाव त्यात दाखल करून किंवा पुर्वी वगळण्यात आलेल्या कोणत्त्याही जागा त्यात दाखल करून.
ब) मालमत्ता कर देण्यास जबाबदार नसलेल्या कोणत्त्याही व्यक्तीचे नाव काढुन टाकून.
क) कोणत्त्याही कर योग्य मुल्यांची आणि त्यावर आधारलेल्या आकारणीचीच रक्कम वाढवून किंवा कमी करून
ड) ज्या कोणत्त्याही जमिनीचे किंवा इमारतीचे मुल्य चुकीचे ठरविण्यात आले असेल किंवा जिची आकारणी लबाडीने अभावितपणे किंवा चुकीने करण्यात आली असेल त्या जमिनीवरील किंवा इमारतीवरील आकारणीत फेरफार करून.

मे. टाटा इन्फोटेक हया कंपनीने नविन कर आकारणी पुस्तकात काहीही नविन गोष्टी समाविष्ट केल्या नाहीत व मागील वर्षाच्या कर आकरणी पुस्तकात असलेले सर्व दोष जसे आहेत तसे कॉम्प्युटर ॲडसच्या फ्लॉपीवरून आधार सामुग्री प्रस्तुत केली आहे महानगरपालिकेने त्या सामुग्रीसाठी किंवा त्या कर्तव्यासाठी किंवा त्या फसवणूकीसाठी ८४ लाखाची रक्कम दयावी हे योग्य आहे का? यासाठी जबाबदार कोण? हया महासभेचे मत आजमावून तत्त्कालीन मा. महापौरांनी त्यांचा ठेका रदद करण्याबाबत दिलेला निर्देश टाळून टाटा इन्फोटेक यांना प्रत्त्येक वेळी दिलेली मुदत वाढीची संधी महापालिकेला काय उपयोगात आली? करिता त्यांचे परिणाम महापालिकेच्या आर्थिक स्थितीवर झालेले आहेत. टाटा इन्फोटेक कंपनीने सन २०००-२००१ करिता नविन कर आकारणी पुस्तक तयार केले नसून २००१-२००२ चे कर आकारणी पुस्तक सुध्दा तयार केलेले नाही त्यामुळे या दोन्ही वर्षाचे नविन कर आकारणी पुस्तकापोटी अपेक्षित वाढीव उत्त्पन्न दाव्यात ठेवून महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. ज्याअर्थी या कंपनीला महासभेच्या मताविरूध्द प्रशासनातर्फे पॅरेलल रनच्या दृष्टीने नविन कर आकारणी पुस्तक त्याच्याकडुन तयार करण्याचे योजिले त्याचा परिणाम आश्चर्यजनक आहे. कारण कंपनीने सरकारी वर्षात मागील वर्षाच्या कराबददल उत्त्पन्नात केवल १७ लाखाची वाढ विनिर्देशित केलेली आहे. आणि कंपनीला देय असलेले बिल ८४ लाख रूपयांचे असून त्या कंपनीला पुढची पाऊले उचलण्यास काहीच अर्थ नाही. मागील सन १९९६ -९७ साली कराबददल नविन कर आकरणी पुस्तक तयार करण्यांत आले होते त्यानंतर सन २०००-२००१ मध्ये नविन कर आकारणी पुस्तक तयार करण्यांत

विलंब झाल्याने व टाटा इन्फोटेक कंपनीला दिलेल्या कर आकारणी पुस्तका प्रमाणे दर वर्षी १७ लाख पेक्षा जास्त उत्पन्न आढळत नाही. सन १९९६-९७ पासून प्रत्येक वर्षाचे जर नगररचना विभागातील माहिती अनुसार सरासरी २०० इमारतींचा बांधकाम विकास आराखडा मंजुर होतात आणि त्याच हिशोबाने सन १९९६-९७ नंतर कमीत कमी १८०० इमारतींचे बांधकाम नकाशे मंजुर झाल्याने जर त्यांचा नविन कर आकारणी पुस्तकात समावेश केल्यास तर त्यापोटी कमीत कमी नविन इमारतीच्या कर योग्य मूल्य निर्धारणामुळे एक कोटी पेक्षा जास्त उत्पन्न वाढविण्याची शक्यता नाकारता येणार नाही. या कंपनीने कॉम्प्युटर अडसच्या फ्लॉपी आधारे जसे आहे तसे कर आकारणी पुस्तकात सामुग्री प्रस्तुत केल्याने संविदेच्या अटी शर्ती व अभिवचनाचे उल्लंघन केले आहे आणि त्या कंपनीसाठी महासभेचे मत, नियम, संविदेतील अटी व शर्ती आणि महापालिकेचे आर्थिक उत्पन्न दाव्यात बसवून विशेष मेहर करण्याची आवश्यकता भासत नाही म्हणून सदरच्या कंपनीचा ठेका पुर्व सूचनेच्या अधिन राहून रदद बादल करणेस प्रस्तावित.

--६८--

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ४३ <u>दिनांकः-१९.१०.२००२.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार मालमत्ता करांबददल नविन कर आकारणी पुस्तक तयार करण्यासंबंधी टाटा इन्फोटेक कंपनीला दिलेल्या ठेक्याची संविदा रदद करण्याबददलच्या प्रस्तावास आवश्यक त्या पुर्व सूचनांच्या अधिन राहून मान्यता देत आहे.

**कारण :-**

१. कारण या कंपनीने कराराच्या दिनांकापासुन विहित ४ महिन्याच्या कालावधीत कर्तव्य पार पाडले नाही.
२. कॉम्प्युटर ॲडसच्या फ्लॉपी आधार सामुग्री नविन कर आकारणी पुस्तकात जसे आहे तसे प्रस्तुत करणे.
३. प्रत्येक इमारतीच्या किंवा जमिनीच्या कर योग्य मुल्य निर्धारणासाठी त्यांचे क्षेत्रफळ नकाशासह प्रस्तुत न केल्याने.
४. नविन कर आकारणी पुस्तकात इमारती व जमिनी संबंधी आवश्यक गोष्टीचा समावेश नसल्याने किंवा कमतरता असल्याने
५. संविदेतील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याने
६. चुकीची माहिती देणे, आणि प्रामाणिकपणा न दर्शाविणे.
७. इतर.

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>एक आयत्त्यावेळचा विषय आहे. गोलमैदानला फटाका विक्रीसाठी जे गाळे भाडयाने देवू इच्छितात मागदेण्यात येतात. किरकोळ फटाका विक्रेत्यांना सदर जागेवर भूईभाडे रूपये ३७५/- प्रतिदिन घेतले जायचे. तेव्हा फटाका विक्रेत्यांचे प्रतिनधित्त्व घेवून व्यापारी आले होते ते म्हणाले की ऐवढे रू. घेणे हे अन्यायकारक आहे. प्रशासनातर्फे आयत्त्यावेळचा विषय आला आहे की, १०''x १५'' चा जो गाळा आहे. त्याचे प्रतिदीन रू. ३७५/- ऐवजी १७५/- रू. घ्यावेत. व दर पुढील वर्षी १५ टक्के त्यात वाढ करण्यात येईल. अशी सूचना आयुक्त साहेबांकडे आली आहे

आपणां सर्वांना मान्य असेल तर तो विषय आयत्त्यावेळचा विषय म्हणुन घेण्यात येईल.

<u>मा. महापौरः-</u>सदरचा विषय सर्वानुमते आयत्त्यावेळचा विषय म्हणुन कार्यसूचीवर दाखल करण्यात येत आहे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>हा प्रशासनातर्फे प्रस्ताव आला आहे. मी आयुक्तांना आठवण करून देऊ इच्छितो की या विषयाबाबतीत मी त्यांना भेटलो होतो. फायर वर्करसची संस्था आली होती. तुम्ही स्वतः हे मान्य केले होते की, ३५ रू. वाढवुन ६० रू. करू. मला वाटते १७५रू. म्हणजे आश्चर्यच आहे. ६० रू. पास. आयुक्तांनी स्वतः मंजुर केले होते.
<u>काही सदस्यः-</u>पास. पास.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मला अजुन एक बोलायचे आहे की, आता जो विषय झाला त्यामध्ये माखिजा साहेबांना प्राधिकृत केले ते सुधारणा करून ठराव आणतील. त्यात आमचे टी.पी.डी. चेअरमन विनोद ठाकुर व्यापारी मंडळाचे अध्यक्ष यांना अनऑफीशीअली विश्वासात घेवून त्या समितीला विश्वासात घेवून जर ठरावात सुधारणा आणले तर बरे होईल.

--६९--

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>मला एक निवेदन करायचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>कृपया हे पण स्पष्ट करा की, बिल्डींग व बॅरेक अशी दोन बिले येत आहेत तर लोकांना त्यापासुन कशी सुटका मिळेल.

<u>मा. सचिवः-</u>तो विषय संपला आहे आता आयत्त्यावेळचा विषय आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>ठेका रद्द झाला आहे आता तुम्ही त्यांना मार्ग काय सुचविणार?

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>मा.महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. हरदास माखिजा यांचे म्हणणे आहे की, येणा-या दिवाळीत फटाक्यांचे जे दुकान व परवाना दिला गेला आहे त्याबाबत लायसन फी व प्रती दिन भाडे विषयी मी अशी संमती दिली होती की ३० रू. चे ६० रू. केले जावे. परंतु ज्यावेळी आपणांबरोबर माझी चर्चा झाली त्याचवेळी मी असे बोललो होतो परंतु नंतर मी जेव्हा प्रस्ताव पाहिला जो महासभा २००२मध्ये मान्य केला आहे. जेव्हा आपली माझी जी चर्चा झाली ती विसंगत आहे ठरावाशी सुसंगत नाही. परंतु नंतर मी विचार केला तुमची पण तीच इच्छा होती फटाके विकणारे जे विक्रेते आहेत त्यांना ऐवढे भाडे देणे कठिण होईल. त्यांचे प्रतिनिधी मंडळ येवून मला भेटले व मी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. महापालिकेच्या ठरावाविरूध्द मी काही करू शकत नाही कारण मला त्यावर अंमलबजावणी करायची आहे. परंतु काहीतरी दरामध्ये कमी करण्यासाठी मी महासभेमध्ये तसा आयत्त्यावेळी विषय सादर करू शकेन. मे २००२मध्ये भाडे ३७५ रू. ठरले होते. जेव्हा मी सांगितले की ठरावात बदल करण्याचा अधिकार मला नाही व आपणांस असे वाटत असेल तर मी तुमच्यासाठी व माखिजा साहेबांचे विचार समोर ठेवून महासभेसमोर मांडेन.महासभा जे मान्य करेल ते भाडे मी देईन. ते तुम्हाला सोपे होईल. त्यांनी ते मान्य केले आहे. मला असे वाटते की, आपली

महापालिका वाईट आर्थिक परिस्थितीतून सफर करत आहे. त्यांची संमती आहे त्या दरात मान्यता दिली तर बरे होईल.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>ते दुस-यांदा तुमच्याकडे डेलिगेशन घेवून आले का?

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>हो.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u> बिल्डींग व बॅरेक अशी दोन बिले येत आहेत तर लोकांना त्यापासुन कशी सुटका मिळेल. बिल्डिंग व बॅरेकची दोन बिले गेली आहेत तर भरण्याची गरज नाही ना?

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>तुम्ही कोणत्त्या बिलाविषयी बोलत आहात ते समजत नाही. जर टाटा इन्फोटेक्टचे बिल हे समान बिल असेल तर भरण्याचे गरज नाही.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>हे एक बिल मी तुम्हाला दिले आहे महापौरजी, हे पॅरलल रन चे बिल आहे जे टाटा इन्फोंटेक्टवाल्यांनी दिले आहे. व यात कॉलम नं. ४ वर थकबाकी बिलात प्रिव्हियस ऐरीयस त्यांनी दाखवले आहे ६३३१/-रू. व यावेळी त्यांची मागणी आहे १७२०/-रू. तर टाटा इन्फोटेक्टवाल्यांकडे प्रिव्हीयस बिलांचा ठेका नव्हता. त्यांना डाटा दिला आहे त्यात-हेने त्यांनी बिले जनरेट केली आहेत. त्यांनी स्वतःचा असा काही सर्व्हे केला नाही.



<u>मा. सचिवः-</u>ठिक आहे. मंजुर?

<u>काही सदस्यः-</u>पास. पास

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>आयत्त्यावेळचा विषयः-</u>

<u>प्रस्तावनाः-</u>

उल्हासनगर महानगरपालिका ठराव क्र. ८ दिनांक २४.५.२००२ अन्वये मनपा मालकीचे मैदान व उदयाने यांचे भुई भाडे खालीलप्रमाणे मंजूर केलेले आहेत.

१. मैदाने/ उद्याने नोंदणीकृत ट्रस्ट व नोंदणीकृत संस्था व इतरांना सार्वजनिक पुजा अर्चा किंवा सार्वजनिक धर्मदाय प्रयोजनासाठी किंवा राजकीय पक्षाच्या सभेसाठी किंवा खेळांच्या स्पर्धेसाठी ज्याचा फायदा मिळवण्याचा उददेश नाही. अशा वापरासाठी स्तंभ क्र. ६ मध्ये निर्दीष्ठ केलेल्या रक्कमेऐवजी केवळ ५०० रूपये भुईभाडे आकारण्यात येईल.
२. मैदाने/ उद्याने लग्न समारंभ किंवा व्यावसायिक कामासाठी किंवा इतर कुठल्याही कार्यक्रमाच्या वापरासाठी स्तंभ क्र. ६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रक्कमेऐवजी त्याच्या ५ पट रक्कम भुईभाडे म्हणून आकारण्यात येईल.
३. मैदाने /उद्याने, मुंज किंवा वाढदिवसाच्या प्रयोजनासाठी स्तंभ क्र६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या ____________ रक्कमेच्या आकाराप्रमाणे वापरण्यास देण्यात येतील.

उपरोक्त अ. क्र. २ अन्वये मैदाने व उद्याने व्यावसायिक कामासाठी भुई भाडयाने दिल्यास स्तंभ क्र. ६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रक्कमेऐवजी त्या रक्कमेच्या ५ पट रक्कम भुईभाडे म्हणुन आकारण्याचे मंजुर केले आहे. परंतु किरकोळ फटाका विक्रेत्यांना सदर जागेवर भूईभाडे रूपये ३७५/- प्रतिदिन, प्रतिगाळा, (१० ग १५ फुटासाठी ) आकारणी होते. सदरचे भुईभाडे हे जास्त होत आहे. अशा फटाका विक्रत्यांच्या तक्रारी आहेत. तसेच मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्या आदेश असल्यामुळे किरकोळ फटाका विक्रेते इतरत्र ही किरकोळ फटाक्यांची विक्री करू शकत नाही.

महानगरपालिकेतर्फे मा. मुंबई उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. ९७ /२००१ मध्ये किरकोळ फटाका विक्रीसाठी गोलमैदान, व्हीटी.सी मैदान व दसरा मैदान येथे किरकोळ फटाका विक्रेत्यांना खुली जागा उपलब्ध करून देण्याचे नमुद केले आहे. याबाबत अपघात घडून शहरातील जिवित हानी, वित्तहानी, टाळण्यासाठी तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सदरच्या जागी तात्पुरत्त्या स्वरूपात किरकोळ फटाका विक्रेत्यांना उपलब्ध करून देण्यात येतील असे मा. मुंबई उच्च न्यायालय यांचेकडे उल्हासनगर महानगरपालिकेने प्रतिज्ञापन सादर केलेले आहे.

त्यामुळे सर्व-साधारण महासभा ठराव क्र. ८ दिनांक २४ ५.२००२ मध्ये फेरबदल करणे आवश्यक वाटते फक्त शहरातील किरकोळ फटाका विक्रेत्यांना शहराच्या व नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मनपा मालकींच्या मैदाने, उद्यानाचे भुईभाडे यामध्ये सवलत देणे योग्य वाटते. त्यानुसार रूपये १७५/- (रू. एकशे पंच्यात्तर) प्रति दिन, प्रतिगाळा आगाऊ वसुल करून (१०ग १५ त्र १५० चौ.मी.) देण्याचे प्रस्तावित आहे. सदरचे सवलत फक्त सन २००२-२००३ या वर्षाकरिता



लागु राहिल व पुढील प्रत्येक वर्षी सदर दरामध्ये १५ टक्के वाढ करण्याचे प्रस्तावित करणेत येत आहे.

सबब, मनपा महासभा ठराव क्र. ८ दिनांक २४ ५.२००२ यामध्ये अंशत: फेरबदल करून मंजुरात द्यावी.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ४४ <u>दिनांक:-१९ १० २००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. सुरेश जाधव

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार पुर्वीच्या दि. २४ ५.२००२ ठराव क्र. ८ यात अंशत: बदल करून फक्त शहरातील किरकोळ फटाके विक्रत्यांना १० x १५ = १५० चौ.मी. ची जागा मैदानास देणे कामी रू. १७५/- प्रति दिन, प्रति गाळा भाडे निश्चित करीत आहे आणि पुढील प्रत्येक वर्षी सदर दरामध्ये १५ टक्के वाढ करणेस मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर रात्री ८.३० वाजता सभा संपल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-१६/११/२००२

इतिवृत्त

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१६/११/२००२ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दि. १६.११.२००२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती.मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.
२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३७. | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३८. | श्री. प्रशांत जाधव |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३९. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४०. | श्री. पमनानी इश्वर सतरामदास |
| ७. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४१. | श्री. बोडारे धनंजय |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४२. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| ९. | श्री. नाथानी कन्हैयालाल | ४३. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १०. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४४. | श्री. भालेराव गौतम |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४५. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १२. | श्रीमती. कालानी ज्योती | ४६ | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १३. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४७ | श्रीमती. लक्ष्मी रोहीदास ससाणे |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४८ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४९ | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १६. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५०. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५१ | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५२ | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती, | ५३. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २०. | श्रीमती.गुप्ता आशा प्रभुनाथ | ५४. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २१. | श्री. नाना आनंदा पवार | ५५. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २२. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५६. | श्रीमती. किरण लखी माखिजा |
| २३. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ५७. | श्री. होशियारसिंग लबाना |
| २४. | श्रीमती. खांडेकर प्रेमा | ५८. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २५. | श्री. शांताराम ओंकार निकम | ५९. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |

| | | | |
|---|---|---|---|
| २६. | श्री.ठाकुर विनोद लालसिंग | ६०. | श्रीमती. डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना सोंडे | ६१. | श्रीमती. भारती छाबरीया |
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६२. | श्रीमती. इंदु रामचंद्र भठिजा |
| २९. | श्री. सुरेश गायकवाड | ६३. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३०. | श्रीमती. वनवारी मोना | ६४. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६५. | श्रीमती. मीनु राजकुमार दासानी |
| ३२. | श्री. मोहन साधवानी | ६६. | श्री. बेहरानी ठाकुरदास वर्यलदास |
| ३३. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ६७. | श्री. इदनानी राजू चंद्रभान |
| ३४. | श्री. बच्चाराम रूपचंदानी | ६८. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३५. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | ६९. | श्री. माखिजा हरदास सन्मुखदास |
| ३६. | श्रीमती.माने किरण बाळकृष्ण | ७०. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| | | ७१. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |



तर

मा. सदस्य १श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, २श्रीमती. पाल अधारी राजाराम,३. श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन, ४. श्री. टाले प्रमोद नामदेवराव,५. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल, ६श्रीमती. भावना खिलनानी, ७. श्री. जाधव सुरेश, ८. श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे, ९. श्रीमती. कारीरा रेखा, १०. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास हे सभेस अनुपस्थितीत होते.

<u>मा. सचिव:-</u>यावेळी मा. पिठासिन अधिकारी हजर नसल्यामुळे आपणांपैकी कुणाला तरी मा. पिठासिन अधिकारी यांचे आसन ग्रहण करावे लागेल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>आम्ही आमच्या वतीने श्री. जमनादास पुरस्वानी यांचे नाव सुचित करत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>आम्ही श्री. मोहन साधवानी यांचे नाव सुचित करत आहोत.

इकडे श्री. जमनादास पुरस्वानी त्यावेळी सभेत विपक्ष सदस्यांचा बहुसंख्य उपस्थिती असल्याने हे पिठासिन अधिकारी म्हणुन मंचावर आसनस्थ झाले.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ५० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>आजच्या सभेचे कामकाज सुरू होण्यापुर्वी काही मृतात्त्म्यांना श्रध्दांजली वाहायची आहे. आमचे माजी नगरसेवक श्री. पांडुरंग लांडे यांचे वडील श्री. मारूती लांडे यांचे काल रात्री साडे आठ वाजता निधन झाले. त्यांना आजची सभा सुरू करण्यापुर्वी श्रध्दांजली अर्पित केली जावी.

मा. सचिवः-मा. सदस्य श्री. नाना पवार यांच्याकडुन देखिल एक प्रस्ताव आला आहे. श्री. नरेश गायकवाड यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी. कृपया सर्वांनी मौन धारण करून श्रध्दांजली अर्पित करावी.

इकडे सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पित केली.

शोक प्रस्ताव :-

उल्हासनगर महानगरपालिकेचे माजी. महापौर श्री.हरदास माखिजा यांच्या मातोश्री श्रीमती. कृष्णाबाई सन्मुखदास माखिजा यांचे दिनांक २३.१०.२००२ रोजी अकस्मित निधन झाले. तसेच अंबरनाथचे माजी नगरसेवक व ठाणे जिल्हा आर.पी. आयचे अध्यक्ष (ग्रामीण विभाग)श्री. नरेश गायकवाड यांचे दि. ८.११.२००२ रोजी अचानक खुनी हल्ला होवून अकस्मित निधन झाले. तसेच माजी नगरसेवक श्री. पांडुरंग लांडे यांचे वडील श्री.मारूती लांडे यांचे अकस्मित निधन झाले त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.



सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ५४ अ दिनांकः-१९.१०.२००२.

सुचकाचे नाव :- श्री. नाना पवार.

श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.

श्री. विनोद तलरेजा

हि महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्रीमती. कृष्णाबाई सन्मुखदास माखिजा, श्री. नरेश गायकवाड,श्री. मारूती लांडे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी

सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

इकडे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया या मंचावर आसनस्थ झाल्या. श्री. जमनादास पुरस्वानी यांनी पुन्हा स्वतःचे आसन ग्रहन केले.

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. १ प्रश्नोत्तरे. प्रश्न क्र. २३ श्री. बच्चाराम रूपचंदानी यांचा आहे. यावेळी ४.४० वाजले आहेत.

<u>प्रश्न क्र. २३</u>:-अ) हाउ मेनी सेन्सनड पोस्ट आर देअर ऑफ एक्जेक्युटिव्ह इंजिनिअर डेप्यु. इंजिनिअर्स ज्युनिअर इंजिनिअर इन पीडब्ल्यूडी?

ब) ऑफ द सॅक्शन्ड पोस्टस् हाऊ मेनी हॅव बीन फाईल्ड इन ॲन्ड हाऊ मेनी नॉट बीन फाइल्ड इन?
सी) ऑफ दी सेंक्शनड पोस्टस्, हाऊ मेनी हॅव बीन फाईल्ड इन ॲन्ड हाऊ मेनी नॉट बीन फाईल्ड इन? वॉट आर दी रिझन्स फॉर नॉट फाईलींग धीस पोस्टस्.
ड) वेन दीस अनफाइल्ड पोस्टस् वील बी फाईल्ड इन?
इ) वॉट इज द पीरेड ऑफ डेप्युटेशन ऑफ एक्सक्लूझीव्ह इंजिनिअर इन पी.डब्लु.डी.

<u>उत्तरः</u>-अ) नगरपालिका अस्तित्त्वात असतांनाची मंजुर पदे खालील प्रमाणे आहेत.

१) कार्यकारी अभियंता --१ (पाणी पुरवठा विभागासाठी प्रतिनियुक्तीवर)
२) उप-अभियंता --५ (पाणी पुरवठा विभाग प्रतिनियुक्तीवर)
३) कनिष्ठ अभियंता --१४ (नगरपालिका असतांनाची मंजुर पदे) --१२
--१२(महानगरपालिका स्थपनेनंतर मंजुरी मिळालेली पदे) एकुण पदे-- २६ पदे

--४--

नगरपालिका अस्तित्त्वात असतांना सहा. नगरपालिका अभियंता हे १ पद व नगरपालिका अभियंतार हे १ पद मंजुर होते. महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर प्रस्तावित आस्थापना सुचीमध्ये सदरची पदे रदद करण्यात आलेली आहेत.

ब) मंजुर पदांपैकी सद्यस्थितीत भरलेली / कार्यरत पदे खालीलप्रमाणे ---

१) कार्यकारी अभियंता --३ (सार्वजनिक बांधकाम विभागात प्रतिनियुक्तीवर-१) (पाणी
पुरवठा विभागात प्रतिनियुक्तीवर-१) (विद्युत विभागात-१)

२) उप-अभियंता --५ (पाणी पुरवठा विभाग प्रतिनियुक्तीवर)

३) कनिष्ठ अभियंता --१८

कनिष्ठ अभियंता या पदनामाची मंजुर व रिक्त असलेली पदे भरण्याची प्रशासकिय स्तरावर कार्यवाही चालु आहे.

क) कनिष्ठ अभियंताची रिक्त पदे भरण्याची प्रशासकिय स्तरावरील कार्यवाही पूर्ण होताच सदरची रिक्त पदे भरण्यात येतील.

ड) सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत कार्यकारी अभियंता यांची शासनाकडील आदेश क्र. पीओजी-१९९९) सीआर-२३५/(९)/सेवा-१, मंत्रालय-३२ दिनांक २० नोव्हेंबर, १९९९ अन्वये प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर आदेशात प्रतिनियुक्तीचा कालावधी दिलेला नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>प्रश्नोत्तरे घ्याल पण आयुक्त साहेब कुठे आहेत?

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>महापौर महोदया, हा जो २३ क्रमांकाच्या प्रश्नाचे जे उत्तर आहे ते श्री. ढाकरे साहेबांनी उत्तर दिले होते. परंतु आता उपायुक्त मुख्यालय श्री. भडकवाड साहेब आहेत. मला त्यांना जरा या प्रश्नाविषयी स्पष्टीकरण विचारायचे आहे. सांगा. माझा प्रश्न १६.५.२००२ मध्ये दिला होता आणि आता नोव्हेंबर १६ म्हणजे ५ महिन्याच्या नंतर माझा प्रश्न आला आहे. मी उपायुक्तांना विचारू इच्छितो की सहा महिन्याच्या आत माझ्या प्रश्नावर काय कार्यवाही केली आहे? त्यांनी दिलेले उत्तर १६.५.२००२चे आहे व आज १६ नोव्हेंबरला सभा आहे. सहा महिन्यात त्यांनी काय केले आहे का? त्यानंतर मी पुढचे बोलेन.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>सन्माननिय महापौरजी, सचिव साहेब व सन्माननिय सदस्य. सन्माननिय सदस्य श्री. रूपचंदानी साहेबांनी जो प्रश्न विचारला आहे तो मे महिन्यातील आहे त्यांनी वरील प्रमाणे प्रश्न विचारला असुन मे महिन्यामध्ये जे उत्तर दिले होते त्यात थोडा आता बदल आहे. उल्हासनगर महानगरपालिकेत पाणी पुरवठा विभागात कार्यकारी अभियंताची प्रतिनियुक्तीसाठी एक पद मंजुर आहे. पाणी पुरवठा विभागात पाच उप अभियंता आहेत. आणि महापालिकेत एकुण २६ कनिष्ठ अभियंताची पदे मंजुर आहेत. १३ जुन २००२ ला काही पदे शासनाकडुन मंजुर होवून आली आहेत. कार्यकारी अभियंता सा.बा.वि. येथे एक पद मंजुर होवून आले आहे. कार्यकारी अभियंता विद्युत विभाग एक पद, उप अभियंता सा.बा. वि येथे पाच पदे व उप अभियंता विद्युत विभाग येथे १ पद मंजुर होवून आली आहे आणि शहर अभियंताचे एक पद मंजुर होवून आले आहे. त्याशिवाय त्याआधी सहाय्यक नगर अभियंताची एक पद होते , एक नगरअभियंता म्हणुन पद होते ती पदे मंजुरीसाठी आम्ही प्रस्ताव पाठविला होता व त्यानुसार नविन पदे मंजुर होवून आली आहेत. त्यातुन तुम्ही जो प्रश्न विचारला होता. आता किती लोक कार्यरत आहेत. आता तीन कार्यकारी अभियंता कार्यरत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग व पाणी पुरवठा विभागात डेप्युटेशनवर कार्यकारी अभियंता आहेत व विद्युत विभागात महापालिकेचे



अधिकारी आहेत. तसेच वॉटर सप्लायमध्ये पाच प्रतिनियुक्तीवर उप-अभियंता आहेत व एकुण १८ कनिष्ठ अभियंता आहेत. पाणी पुरवठा विभागात १२ शाखा अभियंता आहेत. व एक सहाय्यक अभियंता असे प्रतिनियुक्तीवर आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>आताच आपण म्हंटले की, पाणी पुरवठा विभागासाठी कार्यकारी अभियंताचे पद मंजुर होवून आले आहे.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>नाही. नाही पाणी पुरवठा विभागासाठी पद मंजुर नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि विद्युत विभाग.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-कार्यकारी अभियंता महापालिकेत आहे का आता.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-कोणत्त्या विभागात?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-सार्वजनिक बांधकाम विभागाविषयी बोलत आहे. तुम्ही पद भरले का?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-नाही. नाही भरले.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-त्याचे कारण काय? सहा महिने झाले पद नाही भरले.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-आमचे प्रयत्न चालु आहेत. तुमच्या माहितीसाठी म्हणुन सांगतो. शहर अभियंता नंतर महापालिकेचा जो अधिकारी आहे तो थेट कनिष्ठ अभियंता संवर्गाचा आहे. कोणत्त्याही कनिष्ठ अभियंत्त्याला थेट कार्यकारी अभियंता बनवु नाही शकत. त्यासाठी जे आवश्यक शैक्षणिक पात्रता आहे. प्रमोशनच्या कॅटेरीया फिक्स केले आहेत. रिकरूकमेंट रूल्समध्ये तसे दिले आहे. त्यानुसार आधी कनिष्ठ अभियंताला उप अभियंताचे पद दयावे लागेल. त्यानंतर कार्यकारी अभियंताचे पद दयावे लागेल. आता आपल्याकडे श्री. भिवापुरकर हे प्रतिनियुक्तीवर कार्यकारी अभियंता म्हणुन कार्यरत आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-कनिष्ठ अभियंताना उप अभियंता तुम्ही कधी करणार? सहा महिने अगोदर ही पदे मंजुर होवून आली आहेत. तरी तुम्ही ती भरली नाहीत. उप अभियंता नंतर त्यांना कार्यकारी अभियंता करायचे आहे अजुन किती कालावधी जाईल?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-कनिष्ठ अभियंता यांना उप अभियंता पद देण्याची कार्यवाही पुर्ण झाली आहे. पुढच्या महासभेत तो विषय तुमच्या समोर येईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-किती उप अभियंता आहेत? पाच.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-मी आता सांगितले की, कनिष्ठ अभियंता ते उप अभियंताची प्रशासकीय कार्यवाही पुर्ण झालेली आहे. आरक्षण वगैरे सर्व छाननी करून निवड समितीकडे प्रस्ताव पाठविला होता. निवड समितीच्या शिफारसी नंतर आयुक्तांकडुन मान्यता घेतली आहे व हे सर्व मागील आठवडयात झाले आहे. म्हणुन पुढील सभेत आणले जाईल.



मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-ठीक आहे. कार्यकारी अभियंताचे काय? तो प्रस्ताव कधी येणार?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-मी आधीच उतर दिले की आपल्याकडे कनिष्ठ अभियंता पातळीचे अभियंता आहेत. या दरम्यात उप अभियंता, कार्यकारी

*अभियंता संवर्गाची पदे आहेत. थेट कनिष्ठ अभियंता मधुन कार्यकारी अभियंता पद देता येत नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>भडकवाड साहेब मी हेच विचारू इच्छितो उप अभियंता पद भरल्यानंतर तुम्ही कुणाला तरी कार्यकारी अभियंता करणार ना त्यातुन का बाहेरचे कार्यकारी अधिकारी आणणार. आपल्या महापालिकेतील अभियंता कार्यकारी अभियंता होणार ना. समजा तुम्ही उप अभियंता केले त्यांना किती महिन्यात कार्यकारी अभियंता करणार सहा महिने, बारा महिने किती महिने?*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>असे आहे की, महासभेने जे भरती नियम तयार केले आहेत. त्यामध्ये कार्यकारी अभियंता या पदासाठी उप अभियंता पदाचा काही वर्षाचा अनुभव पाहिजे.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>याचा अर्थ किती वर्षाचा?*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>हे पहा आपल्याकडे उपअभियंता नाही आहेत. एक तर आपण थेट कार्यकारी अभियंता भरती करू शकतो. नाही तर जर पदोन्नती मार्गे जर करायचा असेल तर त्यांना अनुभव असणे गरजेचे आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>तेच मला विचारायचे आहे. उप अभियंता व कार्यकारी अभियंता या दरम्यान किती वर्षाचा अनुभव पाहिजे. समजा मी बी. ई सीव्हील आहे. तर किती वर्षानंतर प्रमोशन मिळेल?*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>आता माझ्याकडे रीकुटमेंट रूल्स नाही आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>सहा महिने झाले तुमच्याकडे ही माहिती नाही. माझा प्रश्न मे महिन्याचा आहे. आज नोंव्हेंबर आहे. तरी तुम्हाला रीक्रुटमेंट रूल्स माहित नाहीतका?*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>तुमच्या प्रश्नाचे मी उत्त्तर दिले आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>तुम्हाला सहा महिन्यापासुन माहित आहे की कार्यकारी अभियंता पद मंजुर होवून आले आहे. तर तुम्ही पुस्तीका सोबत आणायला पाहिजे होती. महासभेत सांगायला पाहिजे होते. एक तर सहा महिन्याने आमचा प्रश्न महासभेत येतो. तुम्ही म्हणता भरती नियम मला माहित नाही. आम्ही काय करायचे? एक जर सहा , सहा महिन्यानंतर आमचे प्रश्न येतात. मे महिन्याचा प्रश्न नोव्हेंबरमध्ये आला आहे. सहा महिन्यानंतर म्हणाल माहित नाही. कधी माहिती मिळणार?*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>महापालिकेत सव्वा दोनशे प्रकारचे कॅडर आहेत. प्रत्येक कॅडरचे नियम उपायुक्तांना लक्षात असतील.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>तुम्ही नियम सोबत आणायला पाहिजे होते ना. मी कुठे म्हणतो की तुमच्या लक्षात असले पाहिजे. तुमचे हे कर्तव्य आहे नियमावली*

घेवून यायला पाहिजे कारण महासभेत तुम्हाला प्रश्न विचारला आहे. तुम्हाला उत्तर दयायचे आहे आणि सहा महिन्यानंतर तुम्ही उत्तर देत आहात. सहा महिने तुम्हाला या दरम्यान मिळाले आहे. तुम्ही तयारी करून यायला पाहिजे होते.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-तुम्ही विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-सहा महिन्याचा कालावधी तुम्हाला मिळाला आहे. तुम्ही अशी कशी अपेक्षा ठेवता की आम्ही विचारणार नाही.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-तुमच्या मनात काय प्रश्न आहे हे मी कसे ओळखणार? की मी तयारी करून यावे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-तुम्ही उपायुक्त आहात तुम्हाला सर्व माहिती आहे तुम्ही सोबत माहिती घेवून यावयास पाहिजे होते.

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-माझ्याकडे आता रिक्रुटमेंटची माहिती नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-आता जे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभागात आहेत. त्यांचा कालावधी किती आहे? किती वर्षासाठी आहे?

श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):- या आधीपण मला विचारले होते की, एक वर्ष जास्त झाले त्यांची नियुक्ती अजून का आहे? त्यावेळी मी तुम्हाला स्पष्टीकरण दिले होते की, अजुन शासनाने त्यांना परत बोलावले देखिल नाही. म्हणुन ते काम करत आहेत व आपल्याला पण गरज आहे. दुसरे असे की जर त्यांना पदोन्नती देवून कार्यकारी अभियंता म्हणुन इथे पाठविले आहे तर त्यांची प्रतिनियुक्ती जर रदद होत असेल तर आजही त्यांच्या विभागाकडुन त्यांची इन्क्रीमेंट येत आहे. म्हणुन त्यांना आम्ही कार्यकारी अभियंता म्हणुन वागणुक देत आहोत. तरी पण तुम्ही एकदा विचारले होते की याचे स्पष्टीकरण त्यांच्या विभागाकडुन मागवून घ्या. आम्ही १२.८.२००२रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तसे पत्र दिले. त्याचे उत्तर दिले आहे ८ ऑक्टोबरला. त्यात त्यांनी लिहिले आहे की त्यांची मुदत ५ डिसेंबर २००२ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौरजी, आता आमचे मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी यांचा जो प्रश्न होता. जी व्यक्ती प्रतिनियुक्तीवर इथे येते. त्याला सहा महिन्याच्या आत आयुक्तांनी महासभेची परवानगी घ्यायची आहे. आज भिवापुरकर यांना नागपुरहून येथे येवून एक वर्षासाठी कार्यकारी अभियंता म्हणुन इथे पाठविले. आम्ही पण त्याच अटी व शर्तीवर एका वर्षासाठी इथे ठेवले. माझ्यामते कुणीही प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिका-यांना इथे ठेवायचे किंवा परत पाठवायचा अधिकार महासभेला आहे. तुम्ही जे सांगता त्याच्याशी मी सहमत नाही. आम्हाला मा. सचिव विधी अधिकारी यांच्याकडुन हा खुलासा पाहिजे की, ज्यांची मुदत संपली आहे प्रतिनियुक्तीवर मुदत वाढीचा प्रस्ताव महासभेत आणला पाहिजे की नाही? शासन त्यांना कोणतेही पत्र पाठवू आम्हाला त्याच्याशी काही एक मतलब नाही. त्यांना एका वर्षासाठी ठेवले होते अजुन तीन वर्षासाठी आदेश आले आमचा त्याच्याशी संबंध नाही. महासभेने त्यांना एका वर्षासाठी कायम केले होते. त्यांनतर उपायुक्त व आयुक्तांचे काय कर्तव्य होते? महासभेत मुदतवाढ साठी परत प्रस्ताव आणणे?

की नाही आणणे. महासभेचे हे अधिकार आहेत की नाही आहेत. याचा जरा खुलासा करा. मी आमचे मा. सचिव व विधी अधिकारी यांना विनंती करेन की याचा जरा खुलासा करा.



<u>मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कायदयातील नियमाप्रमाणे सहा महिन्यासाठी आलेले अधिकारींना ठेवणे हे मा. आयुक्तांच्या अधिकारात येते. जर सहा महिन्यापेक्षा जास्त त्यांना ठेवायचे असेल तर त्यास महासभेची मंजुरी लागते. श्री. भिवापुरकर साहेबांविषयीचा प्रस्ताव आधीपण आला होता व तुम्ही त्याला मंजुरी दिली होती. त्यात तुम्ही काहीतरी कालावधी निश्चित केला होता मला आता आठवत नाही. दुस-यांदा त्यांनी मंजुरी घ्यायला पाहिजे होती.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>याचा अर्थ असा आहे की, उपायुक्त मुख्यालय आमची दिशाभुल करत आहेत. आता उपायुक्त उत्तर देणार नाही विधी अधिकारींनी खुलासा केला आहे. उपायुक्त महासभेचे अधिकार कमी करत आहेत. मी कोणा एका व्यक्तीसाठी बोलत नव्हतो. माझे असे म्हणणे होते की, कुणीही अधिकारी प्रतिनियुक्तीवर येतो. ज्याला आम्ही एक वर्ष मुदत दिली आहे. त्यांना जर मुदत वाढ हवी असेल जसे आमचे श्री. जोगळेकर साहेब होते. त्यांना आम्ही शेवटचे एक वर्ष मुदत वाढ दिली होती. आमचे श्री. काळे साहेब होते त्यांच्यासाठी दोन वर्षाचे तीन वर्ष केले होते. तर अशात-हेने कुणाचाही कालावधी संपला तर महासभेसमोर आणुन मुदतवाढ घेवून आदेश कायम करणे जरूरी आहे. हा अधिकार महासभेचा आहे. कुणाचाही विषय असो. तर यासाठी मेहरबानी करून जितके अधिकारी विना आदेश येथे काम करत आहेत. खुपसे असे लोक आहेत जे इथे काम करू इच्छित नाही. जसे आमचे श्री. लांजेवार साहेब होते. ते सारखे सारखे आयुक्तांना म्हणायचे मला इथुन रिलिव्ह करा. कित्येक अधिकारी असे आहेत की जे जावू इच्छित आहे तर माझी मा. महापौरांना अशी विनंती आहे की येणा-या महासभेत ज्या अधिका-यांचा कालावधी संपला आहे, कायदयाने महासभेला त्यांना कायम करायचे आहे तो प्रस्ताव महासभेसमोर आणला जावा. श्री. बच्चाराम रूपचंदानी यांनी जो प्रश्न विचारला तो खुप चांगला होता. महासभेचाच हा अधिकार आहे.

इकडे श्री. दत्ता भडकवाड उपायुक्त मुख्यालय बोलायला उभे असताना....

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-</u>भडकवाड साहेब मला बोलु दया.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>एक मिनिट, मला जरा स्पष्टीकरण देवू दया.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:-</u>याविषयावर वारंवार कॉन्ट्रावरसी तयार होते. अधिकारी आणि लोकप्रतिनिधी दोन्ही शहराची कामे करतात. शहराचा विकास कसा व्हावा त्यादृष्टीने दोघेही आपापल्या परीने प्रयत्न करत असतात. याठिकाणी श्री. बच्चाराम रूपचंदानी व श्री. किशोर वनवारी यांनी जो मुददा उपस्थित केला. एका कार्यकारी अभियंता विषयी मुददा उपस्थित केला आहे. व तोच मुददा सर्व अधिका-यांना लागु होत आहे. आमच्या सचिवांनी, विधी अधिकारी यांनी सांगितल्या प्रमाणे की सहा महिन्यानंतर पुन्हा महासभेला अधिकार आहेत. वास्तविक तेवढेच अधिकार सुध्दा मला वाटते प्रशासनाला देखिल आहे. कारण प्रशासन चालवणा-या अधिका-याला कोणता अधिकारी हवा आहे हे त्यांनी ठरवायचे असते. अशाप्रकारचा

प्रस्ताव मागच्यावेळेस जे उपायुक्त याठिकाणी आले होते. महासभेने पारीत केल्यानंतर सुध्दा त्या उपायुक्तांना सोडले नव्हते कारण त्या प्रशासनाला ते आवश्यक होते. अजुनही सोडलेले नाही. म्हणजे ही बाब प्रशासनाची आहे आणि विधी अधिकारी सांगत आहेत की महासभेची आहे. तर प्रशासनाचा जो भाग आहे तो प्रशासनाने सांभाळावा. मागच्या वेळेसही असे झाले होते. जास्तकरून हा प्रशासनाचा अधिकार आहे की कोणते अधिकारी हवेत. प्रशासन वा शासन. शासनाने लिहुन दिले आहे की २००३ पर्यंत यांना ठेवायचे आहे. व महासभेने समजा पारीत केले यांना नाही ठेवायचे. तर अशावेळी काय करायचे? याचा पण विचार केला पाहिजे. आता प्रशासनाने शासनास पत्र दिले व शासनाने त्यांची मुद निश्चित केली की यांची डिसेंबर २००३ पर्यंत मुदत आहे. व आता जो मुददा उपस्थित झाला आहे की, जर महासभेने ठराव पारीत केला



की श्री. भिवापुरकर यांची मुदत संपली आहे. यांना रिलिव्ह केले जावे. अशावेळी त्यांनी काय करावे.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>मी एक खुलासा करू इच्छितो की, मा. सभागृह नेता जे म्हणाले की मी सदनाची दिशाभुल करत आहे. मी फक्त श्री. बच्चाराम रूपचंदानी यांनी श्री. भिवापुरकर यांच्याविषयी जे प्रश्न विचारले होते त्याबाबतीत जे उत्तर आले आहे. ते मी सदनासमोर सांगितले. मी सदनाची दिशाभुल केली नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>माझा मुददा असा आहे की प्रशासन जे काम करणार ते शासनाच्या निर्णयानुसार की महासभेच्या निर्णयानुसार? शासनाचा निर्णय आहे की २००३पर्यंत व महासभेत जो मुददा उपस्थित झाला तो वेगळा आहे. अशावेळी प्रशासनाची जबाबदारी काय आहे?

<u>मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>श्री. भिवापुरकर साहेबांविषयी जेव्हा शासनाकडुन खुलासा मागवला गेला तेव्हा त्यांनी स्वअधिकाराने एक पत्र दिले. आम्ही मागणी नाही केली की त्यांची मुदतवाढ झाली पाहिजे. प्रशासनाने मुदतवाढ नाही मागितली. ते जे पत्र आले आहे शासनाकडुन स्वतःहुन मुदतवाढ मिळाली आहे आम्ही मुदतवाढ केली नाही.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>'असे म्हंणण्यास काही हरकत नाही श्री. भिवापुरकर यांनी तिथे अरेंजमेंट करून तसे पत्र येथे पाठविले आहे. मा. महापौर, मा. आयुक्त साहेब मला एक विचारायचे आहे की श्री. भिवापुरकर यांचे सहा महिने संपल्यावर एका वर्षासाठी मुदतवाढ घेतली गेली होती. मला हे विचारायचे आहे की, एक वर्ष जी मुदतवाढ घेतली गेली होती ती मुदतवाढ केव्हा संपली व त्यानंतर मा. आयुक्तांनी काय पाऊल उचलले त्यांना परत पाठविण्यासाठी ?मा. आयुक्तांनी हे सांगावे अशी मी त्यांना विनंती करतो.
<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>महापौर महोदया, उल्हासनगर महापालिकेच्या सदनात श्री. भिवापुरकर कार्यकारी अभियंता यांचेविषयी चर्चा चालु आहे. कोणत्याही अधिकारास प्रतिनियुक्तीवर किती कालावधी ठेवायचा मी सदनाला सांगु इच्छितो सर्वसामान्य स्थितीत कोणताही प्रस्ताव प्रशासनाकडुन महासभेमध्ये येतो. त्यानंतर महासभा ठराव पारीत करते किंवा नामंजुर करते. त्यानंतरही जेव्हा तो ठराव पारीत होतो त्यानंतर त्यावर कार्यवाही करणे वा न करणे हे आयुक्तांचे अधिकार असतात. कायदयात तशी तरतुद आहे. व आता जी चर्चा चालु आहे. जेव्हा महापालिका

आयुक्तांना कार्यकारी अधिकर निहित असताना त्यावर अंमलबजावणी जेव्हा करायची असते तर कोणत्त्या अधिका-याला किती वेळेपर्यंत ठेवायचे ते प्रशासकीय दृष्टीने त्याला म्हणतात प्रशासकीय दृष्टीने महापालिकेत आयुक्तांचे काय अधिकार असतात. कोणत्त्याही अधिका-याला समजा प्रशासकीय बाबीसाठी किती दिवस ठेवायचे आहे. किती कालावधी ठेवायचा आहे. ते महापालिकेच्या आयुक्तांचे अधिकार आहेत. खुपशा महापालिकेत तिच प्रथा आहे व त्याच पंरपरेने आम्ही वागतो कारण की, कार्यवाही करण्यासाठी एक्झीक्युटीव्ह पावर त्यांच्यावर असतात व ते अधिकार महापालिका आयुक्तांचे असतात.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>मा. आयुक्त साहेब, श्री. बच्चाराम रूपचंदानी व श्री. किशोर वनवारी यांनी असे विचारले की, महासभेला काय अधिकार आहे? मुदतवाढ देण्याचे अधिकार आहेत की नाही त्याचा खुलासा करा. महासभेला काय अधिकार आहेत अशा परिस्थितीत?

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>मी पण तेच उत्त्तर दिले. तीच कायद्यात तरतुद आहे आणि महासभेची मान्यता घ्यावी लागेल.

--१०--

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>हेच मी म्हणतो तुम्ही आणा ना प्रस्ताव.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>एक वर्ष मुदतवाढ सभागृहाने दिलेली आहे. त्यानंतर त्यामध्ये परत त्यांना तिथे कामावर ठेवणे. महासभेचा हा अपमान आहे असे मला वाटते. आपण खुलासा दया त्यांना का कंन्टीन्यु केले. त्यांना परत मुदतवाढ कशी दिली. नविन मुदतवाढीसाठी महासभेसमोर पुन्हा ठेवले पाहिजे होते. नाही ठेवले ही कोणाची चुक आहे. कुणामुळे असे घडले.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>आधी जे प्रशासकीय कामासाठी त्यांना ठेवले होते. आता कायदयात तरतुद आहे त्यानुसार महासभेसमोर आणले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>सचिव साहेब, मा. महापौरजी, मी सचिव साहेबांना एक विनंती करतो की, चर्चा चालली होती त्याचा पण खुलासा केला. उपअभियंता पदावरून कार्यकारी अभियंता या पदी एका वर्षासाठी त्यांची नियुक्ती झाली होती. त्यांना उल्हासनगर महानगरपालिकेत ठेवायचे की नाही हा अधिकार महासभेला आहे ना. जसे आयुक्तांनी आता मान्य केले की, ज्यांची पण मुदतवाढ संपली आहे त्यांचे प्रस्ताव महासभेसमोर आणले जातील. मी मा. महापौरांना विनंती करेन की, कोणत्त्याही विभागाचा अधिकारी असो आरोग्य विभागाचा असो, सार्वजनिक बांधकाम विभागाचा असो, नगररचना विभागाचा असो. कोणत्त्याही विभागाचा असो त्यांचा प्रस्ताव पुढील महासभेसमोर आणला जावा. विना आदेश ते इथे कार्यरत आहेत. त्या सर्वांचे प्रस्ताव पुढील महासभेसमोर आणले जावेत.

<u>मा. महापौर: '-</u>मी सभागृहास सांगते की, असे प्रस्ताव महासभेसमोर आणले जावेत.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>पुढील महासभेत आणले जातील हे तुमचे आदेश आहेत.

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>महासभेने जो ठराव केला तो आयुक्तांना बंधनकारक आहे का?*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>या गोष्टीचा पण खुलासा करा की तो ठराव आयुक्तांना बंधनकारक आहे की नाही?*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>याची माहिती तर दिली पाहिजे ना?*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>ठराव बंधनकारक आहे की नाही ही माहिती असली पाहिजे.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>यापुर्वी पण असे झाले आहे. बंधनकारक आहे ते सांगा ना? विधी अधिकारींनी सांगावे.*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>मी उत्तर देवू का? सभागृहा समोर म्हणावे लागते हो सभागृहाबाहेर म्हणावे लागते नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. सचिवजी जेव्हा एखादा सदस्य सभागृहासमोर किंवा सदनाच्या बाहेरचा व्यक्ती मृत्यु पावल्यास येथे श्रध्दांजली अर्पित केली जाते. कुणी एक सदस्य आहे त्याला कुणी धमकी देत आहे जीवे मारणेची त्यासाठी आपणांकडे काही तरतुद आहे का सचिव साहेब? आपण याचे उत्तर दया. सदनामध्ये काही तरतुद आहे का?*



*<u>मा. महापौरः-</u>तुम्ही जो प्रश्न विचारत आहात तो प्रश्नोत्तराशी संबंधित नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>मी उत्तर नाही मागत निवेदन करतो आहे. मी माझे निवेदन वाचू इच्छितो परवानगी देत असाल तर ठिक नाही तर नाही.*

*<u>मा. महापौरः-</u>नाही. तुम्ही खाली बसा.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>सचिव साहेब, विधी अधिकारी उत्तर देतील.*

*<u>मा. महापौरः-</u>सचिवांकडे तुम्ही विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>एक सदस्य प्रश्नोत्तरे शहरासाठी नाही विचारत तोडपाणीसाठी विचारत आहे. जोपर्यंत विधी अधिकारी बोलत नाही तोपर्यंत मी खाली बसणार नाही. मेल्यानंतर दोन मिनिटे श्रध्दांजली वाहतात, जिवंत माणसाला धमकी देतात त्यासाठी तुम्ही काय करणार?*

*<u>मा. महापौरः-</u>आता हा प्रश्न विचारण्यात काही अर्थ नाही ना?*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>तुम्ही वर्तमानपत्रात वाचत आहात आमच्या सदस्यांनी आम्हांला जीवे मारण्याची धमकी दिली आहे.*

*<u>काही सदस्यः-</u>कुणी दिली धमकी?*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>महाराज भुल्लर यांनी. मला निवेदन पुर्ण वाचायचे आहे.*

*<u>मा. महापौरः-</u>तुम्ही खाली बसा.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाल्याशिवाय मी खाली बसणार नाही.*

*<u>मा. विधी अधिकारी (प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया ऐका.*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>महाराज खुप सज्जन माणुस आहेत ते असे काम करणार नाहीत.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>विधी अधिकारींनी मला उत्तर दयावे.*

*<u>मा. विधी अधिकारी (प्रकाश कुकरेजा):-</u>मा. महापौरांच्या अनुमतीने मी तुम्हाला उत्तर देत आहे. आपण म्हणता की कुणी तुम्हाला धमकी दिली तर तो एक गुन्हा आहे. गुन्हयाचा तपास पोलिस ठेवतात. इकडे सांगुन त्याचा काहीही फायदा नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>ठिक आहे. धन्यवाद.*

*<u>मा. सचिवः-</u>प्रश्न क्र. २४ हा श्री. चिमन रूपाणी यांचा आहे.*



*<u>प्रश्न क्र.२४</u>:-उल्हासनगर रेल्वे स्टेशनसमोर चा नाला/नदी दरवर्षी पावसाळयात तुडुंब भरून जवळच्या परिसर अशोक नगर, आयोध्या नगर, चांदीबाई कॉलेज कंपाऊंड व सलंग शांतीनगर पर्यंतच्या झोपडपट्टी परिसर पुरमय होऊन झोपडपट्टी वस्त्यांचे मोठे वित्तहानी व जीवहानी होते. यांची उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनास माहिती आहे काय?*

*<u>उत्तरः</u>-होय.....*

*<u>मा. सदस्य श्री. चिमन रूपानीः-</u>मी वरीलप्रमाणे प्रश्न विचारला होता. उल्हासस्टेशनचा जो नाला आहे. ज्यास आपण नदी म्हणतो तेथे दरवर्षी पावसाळयात ऐवढे पाणी भरते की, आजुबाजुच्या गावांमध्ये अशोक नगरपासुन शांतीनगर पर्यंत पुर येतो. व गाववाल्यांची जिवित व वित्त हानी होते. त्याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली आहे? मला असे उत्तर देण्यांत आले आहे की या नाल्याची सफाई करून घेण्यात आली आहे. व प्रोकलेन मशिनने गाळ काढण्यांत आला आहे. व गाववाल्यांना*

आजुबाजूच्या धर्मशाळांमध्ये आश्रय दिला गेला. ही कार्यवाही त्यावेळी आमचे आरोग्य खात्त्याचे उपायुक्त श्री. कारचे साहेब यांनी केली होती. ती अतिशय चांगली अशी कार्यवाही त्यांनी केली होती. त्यामुळे नाल्यातील पाणी तावडतोब ओसरले या कार्यवाहीबददल मी त्यांना धन्यवाद देतो. आता श्री. पानपटटे साहेब आरोग्य खात्त्याचे उपायुक्त आहेत ते पण अतिशय चांगल्या प्रकारे काम करत आहेत. माझा हा जो प्रश्न आहे त्याचे हे कायम स्वरूपी उत्तर नाही आहे. ही जी कार्यवाही केली आहे ती तात्पुरत्त्या स्वरूपाची आहे सहा महिन्यानंतर पुन्हा पावसाळा येणार आहे. तर प्रत्त्येक वर्षी या नाल्यामुळे आजुबाजूच्या लोकांचे लाखो रूपयाचे नुकसान होते. तर प्रशासनाने त्यासाठी काय केली आहे? माझे असे म्हणणे होते की, या नाल्याला गावाच्या बाजुने एक भिंत बांधुन पाण्यास थांबविले जावे जेणेकरून या गावात पाणी येणार नाही. त्यासाठी प्रशासनाने काय कार्यवाही केली. मी १४ ऑक्टोबरला एक प्रस्तावही दिलेला आहे की कशा पध्दतीने महापालिकेने कार्यवाही केली पाहिजे. एका बाजुने रेल्वने भिंत बांधण्यास सुरूवात केली आहे. गावाच्या बाजुने महापालिकेने जर भिंत बांधली तर गावामध्ये पाणी शिरणार नाही. व लोकांचे नुकसान होणार नाही. व अशी व्यवस्था केली जावी जो नाला आहे ज्यास नदी म्हंटले जाते. तो नेहमी साफ राहील.

<u>श्री. पानपटटे (उपायुक्त आरोग्य):-</u>सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन सर्व्हेक्षण करून कार्यवाही केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. चिमण रूपाणी:-</u>कायम स्वरूपी कार्यवाही बाबत मी म्हंटले आहे.

<u>मा. सचिव:-</u>त्याबाबत सर्व्हे केला जाईल त्यानंतर कार्यवाही केली जाईल.
प्रश्न क्र. २५ श्री. चिमण रूपानी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र.२५:</u>-असल्यास त्या नाला नदीचे पुर थांबविण्यास तसेच झोपडपटटीवास्यांचे वित्तहानी व जीवहानी थांबविण्यास प्रशासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे किंवा करणार आहेत या बददलची कृपया सविस्तर माहिती मिळावी ही विनंती.

<u>उत्तर:</u>-प्रोक्लेन मशीन लावून नाला सफाई करण्यात आलेली आहे. या भागामध्ये नदीचे पात्र मोठे करण्यात आले आहे. त्यामुळे पाणी न साचता त्याचा पूर्वीपेक्षा जास्त लवकर निचरा होत आहे. दिनांक २६/६/२००२ रोजी मोठा पाऊस पडलेला असतांना देखील पाणी जास्त काळ न साचता पाण्याचा निचरा झालेला आहे. वेळीच कार्यवाही केल्यामुळे वित्तहानी व प्राणहानी झालेली नाही. अचानक परिस्थीती उदभवल्यास



तेथिल रहिवाश्यांची धरम दरबार, जसलोक हायस्कूल, शांतीग्राम विद्यामंदिर , महानगरपालिका शाळा क्र. ८ ,९ ,१७ येथे पर्यायी सोय करण्यात आलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. चिमण रूपाणी:-</u>याबाबतच आहे.

<u>मा. सचिव:-</u>प्रश्न क्र. २६ श्री. जमनादास पुरस्वानी यांचा आहे.

__प्रश्न क्र.२६__:-मेरे प्रभाग क्र. २१ में ऐसे कितने शौचालय है जो टुटे हुऐ तथा बंद पडे है, जिनका उपयोग कोई नही करता तथा वह कहॉ कहॉ पर है ।

__उत्तर__:-प्रभाग क्र. २१ (जुना प्रभाग क्र. ६३ मध्ये) प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली असता, प्रभागात जुनी मोडकळीस आलेली तसेच वापरात नसलेली एकूण ७ सार्वजनिक शौचालये आढळून आली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणेः-

१) पारवानी भवन जवळ --२ सीटचे
२) बॅरेक नं. ६६ ,६९ --६ सीटचे
३) बॅरेक नं. ६६ --६ सीटचे
४) बॅरेक नं. ६३ --४ सीटचे
५) बॅरेक नं. ६४ --४ सीटचे
६) बॅरेक नं. ६४/६६ --४ सीटचे
७) बॅरक नं. ५२ ,तोमार नर्सिंग होम जवळ --४ सीटचे
८) बॅरेक नं. १०४ ,बिहारी तबेलावाला जवळ --१० सिटचे

__मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-__साहेब, माझ्या प्रश्नाचे जे उत्तर आहे त्यात स्पष्ट लिहिले आहे की सात सार्वजनिक शौचालय व खाली क्र. लिहिले आहेत ते आठ आहेत तर वरती आठ अशी दुरूस्ती केली जावी. व मा. आयुक्त साहेबांनी स्वतः माझ्या प्रभागात पहाणी केली त्याबददल मी त्यांना धन्यवाद देतो. व त्याच बरोबर त्या जागेचे सी.सी पॅसेजचे प्राकलन मंजुर झालेले आहे. बाकी शौचालये तोडण्याचे काम बाकी आहे. ती जबाबदारी कुणावर सोपविली जाईल. सार्वजनिक बांधकाम विभाग ही शौचालये तोडेल की अतिक्रमण विभाग? आयुक्त साहेब याबाबत जरा खुलासा करा. जी सार्वजनिक शौचालये आपण पाहिली होती त्यांचे प्राकलन सुध्दा तयार झालेले आहे. ती तोडण्याचे आपण आदेश सुध्दा दिलेले आहेत. तर ती शौचालये कोण तोडेल? सार्वजनिक बांधकाम विभाग की अतिक्रमण विभाग?

__मा.आयुक्त (बा. र. पोखरकर):-__महापौर महोदया, श्री. जमनादास पुरस्वानी प्रभाग क्र. २१ चे नगरसेवक यांनी सार्वजनिक शौचालयासंबंधी प्रश्न उपस्थित केला आहे. याठिकाणी जे शौचालय आहे वास्तविक या शौचालयांच्या ठिकाणी सी.सी पॅसेज किंवा उद्यान तयार करण्याचा प्रस्ताव ठेवला गेला. मी अशा मताचा आहे की हा प्रस्ताव करताना जे जुन बांधकाम, जुन्या भिंती आहेत त्या तोडाव्या लागतील. ते काम यामध्ये समाविष्ट करायला पाहिजे परंतु ते काही समाविष्ट केलेले नाही. परंतु यापुढे मी या सार्वजनिक बांधकाम विभागाला असे आदेश देईन की, जेव्हा अशा प्रकारचा प्रस्ताव पुढे येतो. तेव्हा प्राकलनात हा मुददा किंवा खर्च समाविष्ट करणे संयुक्तीक होणार आहे. परंतु याठिकाणी ते समाविष्ट केला गेला नाही. त्यामुळे अतिक्रमण विभाग ती काढुन घेईल. आणि त्यानंतर ही कार्यवाही केली जाईल.
__मा. सचिवः-__प्रश्न क्र. २७ श्री. जमनादास पुरस्वानी यांचा आहे.

__प्रश्न क्र.२७__:-१) उल्हासनगर महानगरपालिका मे अग्निशमन विभाग में जो हाइड्रोलिक प्लेटफार्म गाडी ली गयी थी वह कब ली गयी थी?

२) हायड्रोलिक प्लेटफार्म गाडी जो फायर ब्रगेड मे है उसकी किंमत क्या है?

३) हायड्रोलिक प्लेटफार्म का उपयोग फायर ब्रेगड में आज तक कितनी बार किया गया है?

<u>उत्तरः</u>-१) हायड्रोलिक प्लेटफार्म गाडी अग्निशमन विभागामध्ये १९९० सालात घेतली होती.

२) सन १९९० सालात गाडी खरेदी केली त्यावेळी सदर गाडीची किंमत रक्कम -- २२,०१,१२८० =०० होती.

३) हायड्रोलिक प्लेटफार्म गाडीला आर.टी.ओ. कल्याण यांचेकडुन नोंदणी क्रमांक मिळालेला नाही. या कार्यालयाचे पत्र क्रमांक उमपा/गॅरेज/३०२, दिनांक १२/७/९१ अन्वये सदर गाडीला नोंदणी क्रमांक मिळण्यासाठी कळविले आहे. परंतु त्यांनी गाडीची ब्ल्यू प्रिंट मागीतल्याने सदर गाडीची कंपनी मेसर्स कोवरजी देवसी ॲन्ड कंपनीकडे ब्ल्यु प्रिंटसाठी पत्रव्यवहार केलेला आहे. परंतु त्यांचेकडुन ब्ल्युप्रिंट प्राप्त न झाल्याने गाडीचा नोंदणी क्रमांक मिळालेला नाही.

४) गाडीचे पासिंग मंजुरी झालेल नसल्यामुळे गाडीचा वापर करता आला नाही.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः</u>-हा जो माझा प्रश्न आहे तो हायड्रॉलिक गाडी संबंधीचा आहे. त्याचे उत्तर दिले गेले आहे की, हायड्रॉलिक गाडी १९९० मध्ये घेतली होती. त्यावर नगरपालिकेचे २२ लाख रूपये खर्च झाले होते. २२ लाखाची गाडी आल्यानंतर ती आर. टी.ओ. मध्ये गेली नाही. व एकदा सुध्दा कामासाठी तीचा उपयोग करण्यांत आलेला नाही. त्याचे उत्तर दिले गेले आहे की, त्या गाडीची ब्लु प्रिंन्ट कंपनीकडुन मेसर्स कुवरसिंह देवसी आणि कंपनीस ब्लु प्रिंन्टसाठी पत्र लिहिले होते परंतु कंपनीने ब्लु प्रिंन्ट पाठविलीच नाही. आणि त्यामुळे आर.टी.ओ कडुन यागाडीची पासिंग झालेली नाही. तर हे जे २२ लाखाचे नुकसान झाले आहे. नगरपालिकेचा २२ लाख रू. याकामी जे खर्च झाले आहेत. व एक कंपनी जिला पैसे देवून आम्ही गाडी खरेदी केली आहे. ती कंपनी ब्लु पिंन्ट देत नाही. ही जबाबदारी कुणाची आहे. कंपनीवर कोर्टामध्ये केस टाकली जावी. ही जबाबदारी कुणाची आहे नगरपालिकेची आहे की कुणाची आहे. २२ लाख रू. इथे अडुन राहीले आहेत. त्याचे जे नुकसान आहे त्याची भरपाई कोण करेल? मा. आयुक्त साहेब, एक हायड्रॉलिक गाडी आहे. आज उल्हासनगरची अशी स्थिती आहे की दोन ठिकाणी जर आग लागली तर ती विझविली जाणार नाही. आम्हाला कल्याण किंवा अंबरनाथची मदत घ्यावी लागेल. १९९० मध्ये २२ लाख रू. खर्च करून एक गाडी मागविली आहे व ती गाडी आज तशीच पडुन आहे. तिची आर.टी.ओ. मधुन पासिंग सुध्दा झालेली नाही. त्याबाबत उत्तर दिले जाते की, कंपनीने ब्लु प्रिंट दिली नाही म्हणुन पासिंग झाली नाही. जर मी एखादी स्कुटर किंवा गाडी खरेदी करतो तर मला असे होते की कधी एकदा मी तिची पासिंग करतो. परंतु महानगरपालिका व नगरपालिकेमध्ये असे कर्मचारी आहेत की ज्यांना २२ लाखाच्या गाडीची पासिंग करण्यास वेळ मिळत नाही. व कंपनीकडुन जर गाडी खरेदी करतात तर कंपनी ब्लु प्रिंट कशी पाठविणार नाही? तर कंपनीवर आपण कारवाई करा. त्याबाबत कोर्टात कार्यवाही करा की आम्ही २२ लाख रू दिले आहेत व १२ वर्षामध्ये कंपनीने आम्हाला ब्लु प्रिंट दिली नाही. आमचे २२ लाख व १२ वर्षाचे व्याज २२ लाख असे ४४ लाखाचे नुकसान झाले आहे त्याच्या भरपाईसाठी कंपनीवर कारवाई करावी.

*कोणती वस्तु आम्ही खरेदी करतो तर त्याचे बिल नंतर अदा केले जाते, गाडी आल्यायनंतर तिचे पुर्ण कागदपत्र आम्ही तपासुन पाहिले नाहीत. तिची पासिंग केली नाही. परंतु ठेकेदारांचे पेमेंट एकेक वर्ष मिळत नाही. गाडयांचे पेमेंट लगेच केले जाते काय?*



*<u>श्री. तुकाराम तारदाळकर (वाहन विभाग प्रमुख):-</u>कुवरसि देवसी कंपनीकडे ब्लु पिंन्टसाठी आम्ही पत्रव्यवहार केला आहे. आणि ते थोडया दिवसातच त्याचे उत्तर देतील.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>कृपया हिंदीमध्ये सांगा. मराठी मी समजु शकत नाही.*

*<u>श्री. तुकाराम तारदाळकर (वाहन विभाग प्रमुख):-</u>ब्लु प्रिंन्टसाठी कंपनीशी आम्ही पत्रव्यवहार केला आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>काय उत्तर दिले आहे?*

*<u>श्री. तुकाराम तारदाळकर (वाहन विभाग प्रमुख):-</u>पत्रव्यवहार केला आहे की, ब्लु प्रिंन्ट आम्हाला पाठवा.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>१२ वर्षामध्ये काय उत्तर दिले आहे?*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>किती वेळा पत्रव्यवहार केला आहे. कोणकोणत्त्या तारखेस पत्रव्यवहार केला आहे? त्याची यादी दया.*

*<u>श्री. तुकाराम तारदाळकर (वाहन विभाग प्रमुख):-</u>तीन-चार वेळा आम्ही पत्रव्यवहार केला आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:'-</u>१२ वर्षामध्ये फक्त ३-४ वेळाच का केला? १२ वर्षामध्ये १२ वेळा म्हणजे वर्षातुन कमीत कमी एक वेळा तरी पत्रव्यवहार करावयास पाहिजे होता ना?तसे तर प्रत्त्येक महिन्यास पत्रव्यवहार करावयास पाहिजे होता. परंतु १२ वर्षात फक्त तीन चार वेळाच पत्रव्यवहार का केला? बाकी १२ वर्ष आपण काय करत होतात?*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>कंपनीने जर ब्लु प्रिंन्ट पाठविली नसेल म्हणजे कंपनीची चुक आहे. तर कंपनीवर महापालिका काय कारवाई करेल?*

*<u>श्री. तुकाराम तारदाळकर (वाहन विभाग प्रमुख):-</u>त्या हिशोबाने आम्ही पत्र पाठविले आहे की आपण जर ब्लु प्रिंन्ट पाठविली नाही तर आम्ही कायदेशिर कारवाई करू.*

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-वर्षानुवर्ष कारवाईचा करण्याचा मुददा चालु आहे. आमची नगरपालिका महानगरपालिका अशा प्रकारची कोणती वस्तु खरेदी करते. व तिचा पाठपुरावा होत नाही तर किती वर्षात आपण त्यांच्यावर केस दाखल करू शकतो असा काही नियम आहे?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-तीन वर्षात? सचिव साहेब म्हणतात तीन वर्षात तर १२ वर्षात आपण काहीच केले नाही.

मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-सचिव साहेबांनी कुठे सांगितले आहे? त्यांना सांगु तर दया. त्यांना बोलु दया किती वर्षामध्ये कारवाई केली जावू शकते?

श्री. तुकाराम तारदाळकर (वाहन विभाग प्रमुख):-तीन वर्षामध्ये,



मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-गाडीचा इन्श्युरन्स आहे काय?

श्री. तुकाराम तारदाळकर (वाहन विभाग प्रमुख):-होय गाडीचा इन्शुरन्स आहे.

मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-ब्लु प्रिंन्ट शिवाय इन्शुरन्स कसा काढला? कसा मिळाला? जर कंपनीला माहितच नाही की यामध्ये काय काय वस्तु आहेत. तर त्यांनी इन्शुरन्स कोणत्त्या गोष्टीचा केला आहे. यामध्ये पुर्णपणे भ्रष्टाचार झाला आहे.

श्री. तुकाराम तारदाळकर (वाहन विभाग प्रमुख):-एक वर्षासाठी आम्ही इन्शुरन्स केला होता त्यानंतर इन्शुरन्स केलेला नाही.

मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-आपल्याकडे कागदपत्र नाहीत. ब्लु प्रिंन्ट नाही तर कोणत्त्या वस्तुचा इन्शुरन्स त्यांनी काढला आहे.

श्री. तुकाराम तारदाळकर (वाहन विभाग प्रमुख):-इन्शुरन्स करावा लागतो...

मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-मी ट्रान्सपोर्टवाला आहे मला याबाबत माहिती आहे. सर्व पेपर्स त्यांना दाखवावे लागतात, बिले दयावी लागतात. त्यानंतर इन्शुरन्स केला जातो. यागाडीचा इन्शुरन्स कसा केलात?यामध्ये पुर्ण भ्रष्टाचार झाला आहे.

श्री. तुकाराम तारदाळकर (वाहन विभाग प्रमुख):-कंपनीकडुन गाडी काढण्या अगोदर आपणांस इन्शुरन्स करावा लागतो.

मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-आपण म्हणता की, आम्ही पत्र दिले आहे. कंपनी अशा गोष्टी मानत नाहीत ती आपली चुक आहे. आणि जर कंपनी काही करत असेल ती गाडी रस्त्त्यावरून धावण्या लायक आहे का?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-आयुक्तांना आमची विनंती आहे की, कमीत कमी ऐवढया मोठया कालावधीत पासिंग प्रलंबित आहे म्हणुन श्री. तुकाराम यांचेवर चौकशी बसविली जावी. त्यांनी भ्रष्टाचाराची दुसरी कामे केली आहेत. यांच्याविरूध्द चौकशी केली पाहिजे व त्यांनी केलेला भ्रष्टाचार उघड केला पाहिजे. २२ लाखाची ती जी गाडी आहे त्यामध्ये यांचे किती कमिशन होते? हे सर्व त्यामध्ये उघड होईलच

*__मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-__ साहेब यांना निलंबित करा. अशा माणसास तोपर्यंत निलंबित केले जावे त्यांनी याप्रकरणात लक्ष घातले नाही. चौकशी होईपर्यंत अशा माणसास निलंबित ठेवले पाहिजे. आजच्या तारखेला ती गाडी ११ रू सुध्दा नाही. ११ लाखाची गाडी भंगारात विकावी लागेल. अशी त्या गाडीची स्थिती आहे.*
*__मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-__तुकाराम मागील पंधरा-वीस वर्षापासुन वाहन विभाग सांभाळतात. वाहन विभागासाठी फक्त एकच माणुस आमच्या महापालिकेत आहे काय? अशा बेजबाबदार माणसावर ज्याने ११ लाखाचे महापालिकेचे नुकसान केले त्यास वाहन विभागाचे काम न देता त्याच्या जागी दुस-या कुणाची नेमणुक करून श्री. तुकाराम यांची चौकशी केली जावी.*

*__मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-__सन्माननिय आयुक्त साहेब, अशी चुकीची कामे करणा-यांवर काय कार्यवाही होवू शकते. ज्यांनी पेपर न घेता कंपनीस पैसे अदा केले अशा अधिका-यावर काय कारवाई झाली पाहिजे? कागदपत्र न घेता पैसे अदा करावयास नको होते. इतर प्रकरणांमध्ये ७० स्वाक्ष-या झाल्यानंतर बिलाची रक्कम अदा केली जाते. या प्रकरणात ११ लाखाचा चेक कसा दिला गेला? यामध्ये किती भ्रष्टाचार झाला आहे? आज श्री. तुकाराम जबाबदारी घेण्यास तयार आहे का की कंपनीकडुन सर्व कागदपत्र घेईन म्हणुन? त्यांनी जबाबदारी घ्यावी ना? कंपनी काहीच करणार नाही. फक्त पत्रव्यवहार होत राहिल.*



*__मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-__मा. महापौरजी, हा जो मुददा आहे तो १२ वर्षापुर्वीचा आहे. आता जे सन्माननिय सदस्य बोलत आहेत. ते प्रथमतःच निवडुन आलेले नाहीत. तर त्यावेळी हा मुददा उपस्थित का नाही केला गेला? व आता सर्व आरोप श्री. तुकाराम साहेबांवर लादले जात आहेत. तर त्यांच्यावर सुध्दा कुणी अधिकारी असेल ना? आम्ही लिपिकास का जबाबदार धरत आहोत? त्यांच्यावर जे प्रशासनीक अधिकारी आहेत.*

*__मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-__मा. महापौरजी, त्यावेळेला जी नगरपालिका होती त्यावेळी नगराध्यक्ष कोण होते? मुख्याधिकारी कोण होते? सभापती कोण होते ती गाडी विकत घेण्यामध्ये? वाहन विभागाचा सभापती सुध्दा असेल त्यावेळेस ते सर्व पाहीले जावे. आपणांस माहित आहे तर नावे सांगा ना?*

*__मा. सदस्य श्री. शांताराम निकम :-__लिपिकाची चौकशी करण्यात काही अर्थ नाही.*

*__मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-__मा. महापौरजी, चौकशी करण्याबाबत आपण आदेश दया.*

*__मा. सदस्य श्री. चिमण रूपाणी :-__मा. महापौरजी, याबाबत मी काही बोलु इच्छितो, कोणतीही कंपनी ती जर गाडी विकत असेल तर त्याचे पुर्ण कागदपत्र देणे कंपनीस बंधनकारक आहे. जेवढी मला माहिती आहे त्यानुसार जे अग्निशमण अधिकारी होते त्यांनी ही गाडी खरेदी करून आणली होती त्यांनी त्यांच्याकडुन सर्व कागदपत्रे आणावयास पाहिजे होती. कारण की ब्लु प्रिंन्ट शिवाय आर.टी.ओ. कुठल्याही गाडीची पासिंग करत नाही. भुल्लर साहेबांनी जसे म्हंटले ते बरोबर आहे. तर यामध्ये तुकाराम साहेबांची सुध्दा काही चुक दिसुन येत नाही. कारण की त्यांनी जो*

पत्रव्यवहार केला आहे. याबाबत कंपनीवर कारवाई केली पाहिजे कारण की त्यांनी अपुरे कागदपत्र कसे दिले?

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-मा. महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री. बेहरानी साहेब यांनी आता जो मुददा उपस्थित केला की तुकाराम साहेब हे १२ वर्षापासुन एकाच जागी काम करत आहेत. परंतु माझा प्रश्न असा आहे की, महानगरपालिकेत असे किती लोक आहेत? फक्त तुकाराम साहेबच आहेत की १२ वर्षापासुन एकाच ठिकाणी आहेत? असे बरेचसे लोक आहेत, बरेचसे अधिकारी आहेत ज्यांच्यावर चौकशी नेमली जावी. ते त्याच जागेवर का आहेत?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-सन्माननिय महापौरजी जो विषय समोर आला आहे त्याच विषयावर चर्चा झाली पाहिजे. अगोदर चौकशी झाली पाहिजे. ब्लु प्रिंन्ट शिवाय २२ लाखाचा चेक कसा दिला गेला?

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-त्यावेळी गाडी किती लाखाची होती?२२ लाखाची होती की...

मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-त्यावेळी गाडी किती लाखाची होती? हा सुध्दा चौकशीचा विषय आहे. यामध्ये घोटाळा आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-सन्माननिय सदस्य, श्री. भुल्लर महाराज यांनी जो मुददा उपस्थित केला आहे. धनादेश जे गेले आहे, त्याच्यावर कुणाची सही आहे? ज्यांनी ज्यांनी सही केली त्यांचीपण नावे आली आहे.



मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- पूर्णच्या पूर्ण टिमवर कार्यवाही झाली पाहिजे. चौकशी केली गेली पाहिजे. इन्चार्ज तुम्ही होता, तुम्ही म्हणता ब्ल्यू प्रिंट नाही मिळाली आयुक्त साहेबांनी यावर उत्तर दयावे.

मा. आयुक्तः- महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. जमनु पुरस्वानी, त्यांनी हेड्रोलिक प्लॅटफॉर्म गाडी जी १९९० साली खरेदी केली त्याविषयी प्रश्न उपस्थित केला आहे. मागील वर्षी मी इथला कार्यभार सांभाळला, तेव्हा मला सांगितले की या गाडीची किंमत २२ लाख रुपये आहे, त्या गाडीला अजून आरटीओ कडुन अजून परवानगी मिळाली नाही आहे. जेव्हा मी याबाबत चौकशी केली तर आरटीओ, गाडीचा नकाशा मागत होते, या त-हेचा पत्र व्यवहार आधीपण झाला होता. त्यांना मी पण स्मरणपत्रे पाठविली त्यांनी उत्तर दिले की, त्या गाडीची ब्ल्यू प्रिंट अत्यावश्यक आहे. कंपनीकडे आम्ही ब्ल्यू प्रिंटची मागणी केली, परंतु अदयाप ब्ल्यू प्रिंट गाडीची,आम्हाला प्राप्त झाली नाही. तरीही आम्ही परत एकदा त्यांच्याकडे ब्ल्यू प्रिंट नकाशाची मागणी करु. त्याबाबतीत मी चौकशी करण्याचे आदेश देतो.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः- मा. आयुक्त साहेब, तुम्ही म्हणता की, ब्ल्यू प्रिंटसाठी आम्ही कंपनीला लिहू. जर ब्ल्यू प्रिंट कंपनीने दिली तर गाडी दुरुस्त आहे का? गाडी ती चालते का? चालण्याच्या लायकीची आहे का?गाडी स्टार्ट होईल का? असे काही होणार नाही, गाडी एकदम नादुरुस्त आहे. ब्ल्यू प्रिंट घेण्यापेक्षा याबाबतीत चौकशी बसवावी.

**काही सदस्यः-** आदेश दिले आहेत ना?

**मा. सचिवः-** प्रश्न क्र. २८ ते ३२ श्री. होशियारसिंग लबाना यांचे आहे.

**प्रश्न क्र.२८:**-उल्हासनगर नं. २, प्रभाग क्र. २२, यु.नं. ९९/१०० शीट नं. ४७ के विषय में महानगरपालिका द्वारा २.१०.२००१ पर नोटिस दिया गया उसपर क्या कार्यवाही हुई?

**उत्तर :**-यु. नं. ९९/१०० शिट क्रमांक ४७ उल्हासनगर कॅम्प नं. २ येथिल कोणत्त्याही बांधकामास दिनांक २/१०/२००१ रोजी नोटिस दिलेली नसल्यामुळे प्रश्नांकित मिळकतीचा नेमका बोध होत नाही.

**प्रश्न क्र.२९:**- उपायुक्त ने बिना सर्व्हे रिपोर्ट तथा नियमानुसार रिपोर्ट वगैरे नाले पर स्लॅब डालने की परमिशन कैसे दी क्या यह जनता के हित में है क्या बिल्डर के हित में है?

**उत्तर :**-तत्त्कालीन प्रभारी आयुक्तांनी नाल्यावर स्लॅब टाकण्यासाठी परवानगी दिलेली आहे. उप-आयुक्त यांनी परवानगी दिलेली नाही. परवानगी देतांना नगररचना विभागाचा अभिप्राय घेतलेला नव्हता. आता सदरची परवानगी रद्द करण्यात आली आहे.

**प्रश्न क्र.३०:**-नगररचनाकार द्वारा (टी.पी.डी.)रिपोर्ट के बावजुद वहॉ ८३८.६९ चौ.मी. का अनधिकृत बांधकाम हुआ है, क्या यह काम १ दिन में हुआ है, इसमें और कोई बात है, इसका खुलासा करे, और इस वायरेशन पर क्या कार्यवाही हुई इसका खुलासा करे?

**उत्तर :**-विकासधारकाने वाढीव बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्याबद्दल महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ ते ५६ नुसार अनाधिकृत बांधकाम तोडण्याबाबत नोटिस दिली आहे. सद्या सिव्हील सुट क्र. ६८/२००२ नुसार सदरच्या बांधकामास स्थगन आदेश असल्यामुळे कार्यवाही करता येत नाही. स्थगन आदेश उठताच त्वरीत कार्यवाही करण्यात येईल.

--१९--

**प्रश्न क्र.३१:**-बांधकाम की स्वीकृती के समय सारे कागजात की पुर्ण जानकारी लें और उसकी जॉच इत्त्यादी कर बांधकामकी स्विकृती दी जाती है परंतु कागजात व्दारा ऐसा नही लगता क्यों?

**उत्तरः-**बांधकाम नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.६.१ ते ५.५ मध्येनमुद केल्यानुसार आणि अपेंन्डीक्स "अ" मध्ये नमुद केल्यानुसार कागदपत्राची पडताळणी करूनच बांधकाम परवानगीचा प्रस्ताव स्विकारले जातात.

**प्रश्न क्र.३२:**-आगामी बरसातजो इस वर्ष जुन मेंहोने की संभावना है उससे वार्ड वासियों और नाले के आसपास की जनता को होनेवाला नुकसान का जबाबदार कौन रहेगा उप-आयुक्त या आयुक्त?

उत्तरः-जुनमध्ये होणा-या पावसामुळे पुराचे पाणी नाल्या मधुन योग्य रित्त्या निचरा होण्यासाठी महापालिकेकडुन नाला सफाई चे काम केले आहे. तसेच नैसर्गिक आपत्ती पासुन निवारण करण्यासाठी नैसर्गिक आपत्ती कक्ष उभारण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री. होशीयारसिंग लबानाः- माझ्या पहिल्या प्रश्नाचे जे उत्तर आहे, त्यात मी चुकून नोटिसची तारीख चुकीची टाकली आहे. कारण दिनांक ३.११.२००१ दिली आणि दिनांक ३.१२.२००१ ला त्याची मुदत संपली. त्यानंतरही तिथे काही कार्यवाही झाली नाही. ३०.४.२००२ ला स्टे आला. आणि तुम्ही सांगितले की, प्रकरण कोर्टात आहे, तर हे जे चार महिने आहे, नोटिस दिल्यानंतर तुम्ही काय केले? इतका मोठा तिथे नाल्यावर स्लॅब टाकला गेला, इतके मोठे अनाधिकृत बांधकाम करण्यात आले. नोटिस दिल्यानंतर देखील आपण का कार्यवाही नाही केली? ४ मार्च, १९९६ ला शासनाचे परिपत्रक आले आहे की, अनाधिकृत बांधकामाचा नोटिस कालावधी संपल्यानंतर त्वरीत कार्यवाही केली जाते. जो अधिकारी ती कार्यवाही करत नाही, त्याला निलंबित केले जाते. त्यानंतरही ४ महिने का नाही कार्यवाही करण्यात आली?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-महापौर महोदया, मी आपणाला विनंती करील की, सर्वात आधी आपण पानपट्टे साहेबांना इथे उत्तर देण्यासाठी बोलवावे. कारण की याचे उत्तर त्यांनी दिले आहे. प्रश्न क्र. २८ ,उल्हासनगर-२ प्रभाग क्र. २२ यु. नं. ९९/ १००, शीट नं. ४७ च्या विषयात महानगरपालिकेद्वारे २००२ रोजी जी नोटिस दिली गेली त्यावर काय कार्यवाही केली गेली. उत्तर हे दिले गेले की, नोटिस दिली गेली नाही. त्यामुळे मालमत्ता कोणती आहे,ते माहितच पडत नाही. किती हास्यास्पद उत्तर आहे, जर शिट नंबर वगैरे सर्व दिले आहे, त्यांनी फक्त तारीख पाहून, पाहिले की, नोटिस दिली गेली नाही. अधिकारीचे एवढेच काम हे नाही की त्यांनी आजूबाजूला पाहावे. होऊ शकते, सदस्याकडुन तारखेत चूक झाली असेल. इतके मोठे अवैद्य निर्माण तयार होत आहे. इतके वर्तमानपत्रात येत होते. फक्त उत्तर देऊन जबाबदारी संपली असे समजतात. पानपट्टे साहेब , होशियारसिंगचे सर्व प्रश्न त्या संदर्भात आहे. तुम्ही उत्तर दया. तर बरे होईल. मा. महापौर, पानपट्टे साहेबांना प्रश्नाचे उत्तर दयायला वरती बोलावले तर बरे होईल. त्यावेळी उपायुक्त, श्री. पानपट्टे साहेब होते, त्यांनी उत्तर दयावे.

मा. महापौरः-श्री. पानपट्टे साहेब, उत्तराचा खुलासा करा.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-शिट वगैरे पाहून, तुम्हांला मालमत्तेचा अर्थबोध झाला नाही का? तुम्ही तिकडे जाऊन पाहण्याचा प्रयत्न केला? नोटिस निघाली नाही, परंतु काम होत आहे की नाही हे तरी पाहायचे? सदस्यांना बोलावून विचारले की या तारखेला नोटीस निघाली नाही. फक्त प्रश्न विचारला त्या प्रश्नाचे सहा महिन्यात कोणतेही उत्तर देवून स्वतःची जबाबदारी पुर्ण केली.



श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-त्यावेळी पोलिस उपलब्ध नव्हते म्हणुन कारवाई झाली नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-तुम्ही उत्तर काय दिले आहे? आपण उत्तर दिले की तुम्हाला मालमत्ता कुठे हेच माहित पडत नाही. आता बोलत आहात पोलिस उपलब्ध नाही. तुम्ही आता खरे बोलत आहात की ते खरे बोलला होतात.

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-त्यावेळी त्याजागी नोटीस नव्हती.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-तुम्हाला शीट नं. देवून सुध्दा जागेची माहिती नाही मिळाली. प्लॉट नं. दिलेला आहे.

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-जसा प्रश्न होता तसे मी उत्तर दिले आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-तुम्हाला फक्त उत्तर दयायचे आहे.

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-नाही. नाही कारवाई करायची असते ना.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-काय कारवाई केली.

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-एफ.आय.आर. दाखल केला आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-काय कारवाई केली. कोर्टात जावून स्थगति आदेश आणले त्याने.

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-पोलिस उपलब्ध नसल्याने मी त्वरीत कारवाई केली आहे. एफ.आय.आर दाखल केला आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-एका बिल्डरला कोर्टात जाण्याची संधी दिली. आपण तीन प्रश्नानंतर उत्तर दिले की कोर्टातून स्थगती आदेश असल्याने आम्ही कारवाई करू शकत नाही.

मा. सदस्य श्री. होशीयारसिंग लबाना:-नोटीस अवधी संपल्यानंतर एका प्रॉपर्टीला तोडायला चार महिने लागतात का?

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-त्यावर स्थगती आदेश आले ना नंतर.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-चार महिन्यानंतर स्टे आला आहे. चार महिने महापालिका काय करत होती?

मा. सदस्य श्री. होशीयारसिंग लबाना:-३०४२००१ला स्टे आला आहे. नोटीसचा अवधी एका महिन्यातच संपतो. जरा विस्तारपुर्वक खुलासा करा. मेहरबानी करा.

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-यावेळी माझ्याकडे सविस्तर माहिती नाही. दोन-चार महिन्यापासुन मी अतिक्रमण विभागात नाही.

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणी:-खुप चांगले उत्तर आहे. उपायुक्त म्हणतात मला माहिती नाही. नवे उपायुक्त म्हणतील मी त्यावेळी तिथे नव्हतो. व मला पण माहिती नाही मग माहिती कोण ठेवणार? असेच जर अधिकारी अबोध झाले. त्यांना कोणत्त्याही गोष्टीचा बोध होत नाही. अशा अधिका-यांना इथे ठेवण्यात अर्थ काय?

चार-चार महिन्यात काम होत नाही. आणि उत्तर देतात की नोटीसचा बोध होत नाही. इतकी मोठी जागा बनत आहे त्यांना ती दिसत नाही. आता म्हणतात की, दोन चार महिन्यापासुन मी आरोग्य विभागात आहे मला माहित नाही. आता नवे उपायुक्त म्हणतील त्यावेळी तर मी नव्हतो. तर या गोष्टींना जबाबदार कोण याचा खुलासा करा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>१९९० मध्ये श्री. पोखरकर साहेब नव्हते. आता एक महिन्यापुर्वी मी सांगितले की गाडी मागे सडत आहे. त्यांनी कमीत कमी माहिती तरी गोळा केली की काय आहे. त्यांनी इथे उत्तर तर दिले. आणि आता तुम्ही उत्तर देवून सुध्दा तुमच्या लक्षात नाही. म्हणता मी दोन महिन्यापासुन आरोग्य विभागात आहेत. हि कोणत्त्या प्रकारे दिशाभुल करत आहात. जनप्रतिनिधींचा अधिकार तुम्ही हनन का करत आहात?

<u>श्री. पानपटटे (उपायुक्त आरोग्य विभाग):-</u>दिशाभुलचा काही प्रश्न नाही.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>दिशाभुल नाही तर हे काय आहे? जनप्रतिनधींला तुम्ही जोकर समजता का?

<u>श्री. पानपटटे (उपायुक्त आरोग्य विभाग):-</u>नाही. नाही असा काही अर्थ नाही याचा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>तुमच्या प्रश्नाचे उत्तर हेच दर्शवते की आम्ही सर्व जोकर आहोत. तुम्ही उत्तर दया मेहरबानी करून असे काय केले?

<u>मा. सदस्य श्री. जेसवानी सतरामदास:-</u>उल्हासनगर महापालिकेत अतिक्रमण विभाग अवैध बांधकाम थांबविण्यासाठी आहे का अवैध बांधकाम वाढविण्यासाठी आहे. बीट मुकादम काय करत आहेत? रोडची जागा बिल्डर घेत आहेत. गल्लीबोळातील जागा बिल्डर घेत आहेत.एका माळयाच्या ऐवजी दहा दहा माळे बांधत आहेत. नाले हडप करत आहेत. जिथे त्यांना मनास वाटते तिथे ते अतिक्रमण करतात. आमचे उपायुक्त साहेब काय करतात? बिट मुकादम काय करतात? आम्ही नगरसेवक आयुक्तांकडे दहा दहा पत्र पाठवतो त्यावर काही कारवाई होत नाही. मग आम्ही नगरसेवक आहोत तरी कशाला? बिट मुकादम काय करतात? उपायुक्त काय करतात? इतका पगार आपण त्यांच्यावर का घालवत आहोत. इतका वेळ आपण का घालवत आहोत. जसे श्री. दिलीप बंधु म्हणाले की महापालिकेने आम्हाला जोकर समजले आहे ते खरे वाटते.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>प्रश्न क्र. २८ ते ३२ सर्व याच संदर्भात आहेत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>आम्हाला याविषयावर भरपुर बोलायचे आहे एकेका प्रश्नावर बोला.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:-</u>अतिक्रमण विभाग कर्तव्य पालन करत नाही. त्यांच्यासाठी मी एक बक्षिस आणले आहे त्याला तुम्ही दंडित करण्यापेक्षा १०० रू. पुरस्कार दया. तुम्ही त्यांना दंड नाही देवू शकत त्यांना हे बक्षिस दया १०० रू. मी आयुक्तांना पत्र लिहिले आहे की त्या गुन्हेगारांना तुम्ही जर निलंबित नाही करू शकत,ते आपल्या कर्तव्याचे पालन नाही करू शकत तर तुम्ही त्यांना बक्षिस दया. जर आम्ही चुकीचे बोलत आहोत तर आमचे सदस्यत्त्व रदद करा. आम्ही तयार आहोत. पण आम्हाला अवैध बांधकाम मंजुर नाही. मी हा १०० रू. चा डीडी. आणला आहे. मला हे म्हणायचे आहे की शिपायांनी येवून आयुक्त साहेबांना दयावे. त्यांनी अवैध बांधकामाला प्रोत्साहन देणा-या कामगाराला हे दयावे. मी स्वतःला डिसक्वालीफाईड करायला तयार आहे.

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>जेसवानी साहेबांच्या प्रस्तावाचे मी समर्थन करतो की हे जे बिल्डर आहेत त्यांना पण बक्षिस दिले पाहिजे की त्यांनी ऐवढी मोठी दादागिरी केली आहे की पहिले नाल्यावर स्लॅब टाकला आहे. ४३८ चौ.फुटाचे*



*वायोलेशन केले आहे. आमचे अधिकारी,बिट इन्स्पेक्टर, नगररचनाकार. काय नगररचनाकारांचे काम नाही की नकाशा मंजुर केला की त्यांचे काम संपते. आता मी जे म्हणत होतो की बिल्डर आणि अधिकारींना बक्षिस दिले पाहिजे. पहिला जो मुद्दा होता त्यात तर त्यांनी दादागिरी दाखवून दिली ज्यांनी पण चार मुद्दे दिले. कोर्टाच्या आदेशानंतरही त्याने स्लॅब वाढविला आहे. त्यांच्यावर कार्यवाही केली पाहिजे. हे जे जुने प्रकरण कोर्टात आहे ते कोर्टामार्फत होवू दया.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, आता आमचे सदस्य श्री. दर्शनसिंग विषयावर आले आहेत. कोर्टात केस आहे. तो कोर्टामार्फत होवू दया. आम्ही त्यासाठी काही करू शकत नाही. त्यासाठी चर्चा देखिल करीत नाही. आता कालपासुन दुसरा स्लॅब टाकणे चालु आहे. त्यासाठी तर कोर्टाचे आदेश नाही. दुसरे असे की आयुक्त साहेब जरा लक्ष दया. कालपासुन दुसरा स्लॅब देखिल टाकणे चालु आहे. कोर्टात जोपर्यंत प्रकरण प्रलंबित आहे त्याचा निकाल लागत नाही. ते जावू दया. काल मी पण श्री. पाटणकर साहेबांना फोन केला की त्याच नाल्यावर दुसरा स्लॅब पण टाकण्यांत येत आहे ते जे काम चालु आहे कमीत कमी ते तर तोडा. याचा जरा खुलासा करा.*

*<u>श्री. पाटणकर (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-</u>आता जे नाल्याचे काम वर्क इन प्रोग्रेसमध्ये आहे ते थांबविण्याचे काम चालु आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>ते काम तोडले गेले पाहिजे थांबविले गेले नाही पाहिजे.*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>त्वरीत तोडले पाहिजे.*

*<u>श्री. पाटणकर (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-</u>तुम्ही जरा माझे बोलणे तर पुर्ण होवू दया. तुम्ही बोलुच देत नाही.*

*<u>काही सदस्यः-</u>काम थांबवू नका, तोडुन टाका.*

*<u>श्री. पाटणकर (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-</u>आपला कर्मचारी वर्ग तिथे सेंटरिंगच्या वरचे काम काढुन टाकत आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>काम त्वरीत तोडले जाण्याचे आदेश दयावे. महापौर महोदया तुम्ही आदेश दया.*

*<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>मा. महापौरजी, त्या बिल्डरवर एफ.आय.आर. दाखल करा.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मी त्याची कार्यप्रणाली सांगु इच्छितो. आधी पण त्यांनी सळया टाकल्या. चार दिवसाची सुट्टी आली त्यांनी पुर्ण स्लॅब टाकून दिला.*

आता पण त्यांनी असेच केले आहे. सळया टाकून ठेवल्या आहेत. सुट्टी आली की स्लॅब टाकेल. मेहरबानी करून सर्व सळया तिथुन काढल्या जाव्यात सेंटरींग पुर्ण काढली जावी. जर तुम्ही हे करू शकता तर तुमच्या पदावर रहा नाही तर मेहरबानी करून तुम्ही पण मोकळे व्हा आम्हाला पण मोकळे करा.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>तुम्ही आदेश दया ना त्यांना त्वरीत कार्यवाही केली जावी.
<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>मा. महापौरजी, फक्त काम थांबवून काही होणार नाही अशा बिल्डरवर एफआयआर दाखल केला जावा. यापुढे तो काम नाही करू शकत.

--२३--

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>महासभेचा मान ठेवून आताच्या आता जेसीबी पाठविली जावी.

<u>श्री. पाटणकर (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-</u>पुर्ण त-हेने ते काम काढले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>उदया रविवार आहे. आजच्या आज त्याच्यावर एफ. आय.आर. दाखल करा.

<u>श्री. पाटणकर (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-</u>आम्ही पुढचे काम होवू देणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>एक गोष्ट ऐका परवा आमचा कर्मचारी वर्ग तिथे बांधकाम तोडायला गेला होता. त्यांनी जाणुन बूजून स्लॅबवर एक गाडी उभी केली आहे. कुणालाही आत प्रवेश करू देत नाहीत. आपले जितके कर्मचारी डिमॉलिश करायला गेले होते त्यांना शिव्या देवून पळविले गेले. काही न करता ते परत आले. दुसरे असे की हा स्लॅब मोहनदास व आमच्या पॅनलमध्ये पावसाळयात या स्लॅबमुळे समस्या निर्माण होते. यामुळे पुर आला होता त्यामुळे तुम्ही आदेश दया की उदयाच्या उदया. उदया नको रविवार आहे तो स्लॅब टाकण्याच्या तयारीत आहे. आताच्या आता माणसे पाठवून ते बांधकाम तोडुन घ्या.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>सचिव साहेब, स्टे चा अर्थ काय? फक्त महापालिकेवर स्थगती आदेश आहेत का? स्टे दोन्ही कडुन असेल ना? म्हणजे महापालिकेने काही कारवाई करायची नाही. बिल्डरने बांधकाम करत राहायचे. स्टेचा अर्थ जसे आहे तसे.

<u>मा. सचिवः-</u>स्टे वन साईड आहे. त्यातील आदेश असे आहेत की इमारत तोडायची नाही. नाल्यावरचा स्लॅब तोडायचा नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>असे तर आदेशात नाही की त्यांने अवैध बांधकाम करायचे असे तर नसेल ना?

<u>मा. सचिवः-</u>नविन बांधकाम तो करू शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>सचिव साहेब, स्टे वॅकेट करण्यासाठी आपल्याकडुन काही कार्यवाही चालु आहे की नाही? खुपसे स्टे वॅकेट होत नाहीत.

__मा. सचिवः-__जितके झाले आहेत त्याची पण संख्या पहा.  कारवाई होत नाही वेगळी गोष्ट आहे पण स्टे वॅकेट झाले आहेत. याआधी २६. ४ ला स्टे दिला होता तो दोन्ही कडुन तो स्टे होता. स्टेटसको मेंन्टेन करायचा होता. त्यांनतर या केसमध्ये अंतिम सुनावणी झाली होती. आणि कोर्टाने आदेश दिला आहे की नाल्यावर जो स्लॅब आहे. तो तोडला जावू नये व इमारत देखील तोडली जावू नये जोपर्यंत दाव्याचा अंतिम निकाल लागत नाही तोपर्यंत. परंतु कोर्टाचा हा जो आदेश आहे. या विवादात उच्च न्यायालयात आम्ही अपील दाखल केले आहे. सोमवारी कोर्ट उघडणार आहे. त्यांनतर त्यावर निर्णय दिला जाईल. परंतु त्यांनी जे कारण दिले आहे नाल्यावरील स्लॅब न तोडण्याचे व इमारत न तोडण्याचे मुख्य कारण दिले आहे. एक तर ज्यावेळी श्री. ढाकरे साहेब होते त्यांनी त्यांना स्लॅब टाकण्याचे पत्र दिले होते. त्यांनी ते प्रभारी आयुक्त या सहीने दिले होते. व आमचे आताचे मा. आयुक्त साहेब यांनी श्री. ढाकरे साहेबांचे जे पत्र होते ते हिअरींग नंतर रद्द केले.  कायदयाची अडचण अशी आहे की, कोर्टाने सांगितले की, आदेश देणारे पण आयुक्त व रद्द करणारे पण आयुक्त साहेब आहेत तर ते काय रद्द करू शकतात काय? कायदयाने ते बघावे लागेल. व इमारत सध्या न तोडण्याचे जे आदेश आहेत त्याचे कारण हे आहे की, त्यांनी शेजारी



पाच प्लॉट विकत घेतले आहेत. त्यांनी वायोलेशन भरपुर केले आहे. व आम्ही कोर्टात जे तर्क दिले आहेत की वायोलेशन तोडले गेले पाहिजेत. व नाल्यावर जो स्लॅब टाकला आहे तो सार्वजनिक हितासाठी योग्य नाही. कालच आम्ही या मुदयावर कोर्टात अपील टाकले  आहेत. सोमवारी कोर्ट उघडल्यानंतर एका आठवडयात निर्णय होईल.

__मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः__-महापालिकेने याबाबतीत गंभीरतेने लक्ष दिले नाही असे वाटते. तो बिल्डर एवढे कोर्ट मेटर झाले आहे तरी जो भाग जसा आहे तसा ठेवण्याऐवजी वाढवत आहे, त्याला काहीच वाटत नाही, महापालिकेला तो सहजतेने घेत आहे.

__मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमानीः__-म्हणून आम्ही सजेशन दिले आहे की, बिल्डरला बक्षीस दिले जावे. तो इतकी हिंमत दाखवत आहे.

__मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-__ अजून त्याचे अवैद्य बांधकाम करणे चालु आहे, ते तरी तुम्ही तोडले पाहिजे.  त्यासाठी तरी तुम्ही आदेश दया. रविवारी तोडु शकता तुम्हांला अधिकार आहे.

__मा. आयुक्तः-__ महापौर महोदया, हे जे काम सुरु आहे, मी मोजक्या शब्दात तुम्हांला सांगु इच्छितो, अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याचे सर्व कामकाज उपायुक्त पहातात. जेव्हा एखादी असाधारण गोष्ट असते किंवा तक्रार असते कुणी सदस्य व नागरीक आयुक्तांच्या नजरेत बांधकाम आणून देतो. त्याविषयी आयुक्त सर्वसाधारण सुचना संबंधित उपायुक्तांना देतो. हे काम जेव्हा माझ्या नजरेत आले तेव्हा मी संबंधित उपायुक्तांना सुचना दिली होती.  नोटिस पण काढली होती. माझ्या मते त्याच्यावर एमआरटीपी ॲक्ट नुसार केस दाखल आहे. परंतु नंतर त्यांनी स्थगती आदेश आणल्याने तिथेच तो विषय थांबला. स्टे ऑर्डर जेव्हा संपुष्टात येतील तेव्हा कार्यवाही केली जाईल. आज सकाळीच मी उपायुक्त पाटणकरांना बोलावले होते, व कोर्टाच्या आदेशाला कोणत्त्याही प्रकारे बाधा न येता, त्यांना

बांधकाम तोडण्याचे आदेश दिले होतेमाझ्या मते तीन नंतर ते तिकडे गेले होते. मला वाटते अजुनही ते काम तोडण्याचे काम चालु आहे. ते सर्व बांधकाम तोडले जाईल. नाल्यावरील बांधकाम तोडण्याचे काम आता पण सुरू आहे. नविन स्लॅब काढला जाईल त्याचे मोजमाप घेण्यासाठी व्हीडीओ ग्राफी काढण्यासाठी सुध्दा मी आदेश दिले आहेत. मला असे वाटते श्री. पाटणकर हे काम पुर्ण करतील.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>आता आम्हाला माहित पडले आहे की, जेसीबी आणि कर्मचारी वर्ग आले आहेत आता श्री. पाटणकर साहेबांना पाठवून ते बांधकाम तोडण्याचे काम पुर्ण करा. कारण उदया रविवार आहे तो स्लॅब टाकेल.

<u>मा. सदस्य श्री. लाल बिहारी यादवः-</u>मा. महापौरजी, नाल्यावरजे बांधकाम करण्यांत आले आहे. ते काय कालच्या काल सुरू नाही झाले. ते काम सुरू होवून दोन दिवस झाले आहेत. तरी पण दोन दिवस पाटणकर साहेब डोळे बंद करून बसले होते का? दोन दिवसा पासुन काम चालु आहे. एक दिवसाचे काम नाही. जर दोन फुटाचे बांधकाम असेल ते बांधकाम आपल्या नजरेत येते. इतका मोठा स्लॅब तुमच्या नजरेस नाही पडला.

<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-</u>२८ प्रश्नाबाबत विचारायचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मा. महापौर साहेब, आयुक्त साहेब, या पुर्ण प्रश्नावर एक जी महत्त्वाची बाब आहे ती तर राहुनच गेली. एक महिना नोटीस दिल्यानंतर चार महिने जास्तीचे बिल्डरला दिले गेले. स्टे ऑर्डर आणण्यासाठी त्याला हि मुदत दिली गेली. शासनाचे असे आदेश आहेत की नोटीस पुर्ण झाल्यानंतर दुस-या



दिवशी जर कार्यवाही करण्यात नाही आली तर संबंधित अधिका-यांवर कार्यवाही झाली पाहिजे असे शासनाचे १९९६ सालचे परिपत्रक आहे. चार महिने मुदत जी त्यांना या दरम्यान दिली गेली आहे. याविषयी आपण लक्ष्य दया हे चार महिने त्यांना का देण्यात आले. आमची विनंती आहे की, नोटीसची मुदत संपल्यावर त्वरीत कार्यवाही केली जावी असे डिओ लेटर तुम्ही उपायुक्त अतिक्रमण यांना दया. तर बरे होईल.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>महापौर साहेब तुम्ही आता आदेश दया की बांधकाम तोडण्याचे काम चालुच राहु दया.

<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, यांनी जे उत्तर दिले आहे प्रॉपर्टी कोणती हे समजत नाही हे असे कसे उत्तर आहे? यु नंबर व शिट नंबर दिला आहे. ते तर त्यांनी सांगावे. ते तर त्यांनी सांगितलेच नाही.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>तुम्ही आता बांधकाम तोडण्याचे आदेश दया आम्ही चर्चा चालुच ठेवू. आता तरी तुम्हाला माहित पडले असेल कोणती जागा आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-</u>तुम्ही म्हणता काही ना काही तरी पुरावा दया आता यापेक्षा जास्त पुरावा काय पाहिजे. यु. नंबर व शीट नंबर असून देखिल सरळ सरळ उत्तर देत आहेत की, प्रॉपर्टी कोणती हे समजत नाही. ऐवढे असुन प्रॉपर्टी कोणती समजत नाही का? हा प्रश्न पुढच्या महासभेत घ्यावा.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-चर्चा चालुच राहु दया. आयुक्त साहेब तुम्ही पाटणकर साहेबांना आदेश दया ते बांधकाम तोडुन यावे. कृपया लवकरात लवकर असे आदेश दया.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-पुढील सभेत २८ क्रमांकाचा प्रश्न सर्वसंमतीने पुढील सभेत घ्या. पाटणकर साहेबांना पाठवा. या प्रश्नावर भरपुर चर्चा करायची आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-हा प्रश्न पुढील सभेपर्यंत कंन्टीन्यु ठेवा.

मा. सचिवः-प्रश्नोत्त्तराचा कालावधी संपला.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-पुढील महासभेत २८ नंबर प्रश्न ठेवावा.

मा. सचिवः-तुमचा ३३ नंबरचा प्रश्न आहे ना?तो याच्याशी संबंधित आहे ना.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-त्यात हा विषय नाही. हे जे उत्तर दिले आहे त्यांनी प्रॉपर्टी कोणती?

मा. सचिवः-त्या प्रश्नात हे विचारून घ्या.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-२८ क्रमांकाचा प्रश्न पुढील महासभेत घ्या.

मा. महापौरः-ठिक आहे सर्वांचे मत आहे तर पुढील महासभेत या प्रश्नाचा खुलासा करावा.

मा. सदस्य श्री होशियारसिंग लबानाः-त्यांनी जो स्लॅब टाकला आहे. त्याचे मोजमाप घेतले नाही गेले. त्याचे मोजमाप घ्यायला सांगा.



श्री. पाटणकर (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-पहिला जो स्लॅब टाकला आहे त्याचे मोजमाप करण्यात आले आहे. सेंटरीग जे लावले आहे त्याचे पण मोजमाप घेण्यात आले आहे.

मा. सदस्य श्री होशियारसिंग लबानाः-जुन्याचे मोजमाप घेतले आहे का?

श्री. पाटणकर (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-आता माझ्याकडे नाही आहे.

मा. सदस्य श्री होशियारसिंग लबानाः-पण तुम्ही नमुद केले आहे ना?

श्री. पाटणकर (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-हा मी तपासले आहे. माझ्याकडे आहे.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानीः- तुम्ही आता बांधकाम तोडायला जात आहात की नाही?

काही सदस्य :-महापौर महोदया, तुम्ही आता त्यांना बांधकाम तोडण्याचे आदेश दया.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-महापौर महोदया, दुस-या महासभेत त्यांनी तसा अहवाल सादर करावा.

मा. महापौरः-पुढील सभेत याचा खुलासा करावा.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-आताच्या आता तुम्ही त्यांना बांधकाम तोडण्याचे आदेश दया. आता पाटणकर साहेब जावून तोडायचे आदेश देतील.

श्री. पाटणकर (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-सेंटरीगचे जे काम चालु होते त्यात त्यांनी लिखित आदेश दिले आहेत की पुढील बांधकाम करणार नाही.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-नाही. लिखित नाही.

श्री. पाटणकर (उपायुक्त अतिक्रमण विभाग):-तिथले बांधकाम आता काढत आहेत. व पुढील बांधकाम आम्ही होवू देणार नाही.

मा. सदस्य श्री. विनोद तलेरजाः-हे पहा उदया रविवार आहे उदया तो स्लॅब भरून टाकेल. म्हणुन तुम्ही आताच जावून सगळया सळया काढायला लावा. व दुस-या सुरू होणा-या महासभेत तसा अहवाल द्या.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-महासभेचे एकमत आहे त्यानुसार त्वरीत कार्यवाही केली जावी.

मा. सदस्य श्री.विनोद तलरेजाः- आयुक्त साहेब, पाटणकर साहेबांबरोबर पाणपटटे साहेबांनापण पाठवा म्हणजे दोघांच्या मार्गदर्शनाखाली काम बरोबर होईल.

मा. आयुक्तः- महापौर महोदया,तिकडे कर्मचारी वर्ग गेले होते, त्यांचे म्हणणे असे आहे की तिथे जेसीपी जाऊ शकत नाही. परंतु मजुराकडुन जेवढे काही काढता येणे शक्य होते तेवढे काढले आहे. आता पोलिस बंदोबस्त केलेला आहे. परंतु उदया पोलिस बंदोबस्त घेऊन जे बांधकाम अनाधिकृतपणे नविन झाले आहे, ते काढण्याचे मी आदेश दिलेले आहे. पाटणकर उदया अनाधिकृत झालेले बांधकाम काढुन टाकतील.

मा. सचिवः- एक लक्षवेधी होती, त्याचे सुचक आहेत श्री. राजेंदसिंह भुल्लर व श्री. राजेंद चौधरी , ती परत घेण्यात आली आहे. आणि तीन आयत्त्यावेळचे विषय आहे.



एक आहे दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत विकास कामे मंजुरी आणि श्री. अनिल जयसिंगानी यांची रजा मंजुर करण्यासाठी एक प्रस्ताव आहे. व एक विषय आहे, यात्री निवास उदयान याची बंद व उघडी राहण्याची वेळ निश्चित करावयाची आहे. यासाठी प्रस्ताव आहे. (विषय क्रमांक १ वाचून दाखवितात.)

विषय :-मागील सभेचे दिनांक १९.१०.२००२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:- मागील वेळी एक लक्षवेधी आली होती, ती दाखल करण्यात आली होती का?

मा. सचिव:- ती स्विकारली नव्हती, रिजेक्ट केली होती, तसे इतिवृत्तात लिहिले आहे.

मा सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:- आम्ही जे ऐकले नाही , ते लिहिले आहे, म्हणून विचारले.

मा. सचिव:- त्यावेळी घोषणा सुरु होत्त्या म्हणून ऐकू नसेल आले.

मा. सदस्य राजेंद्र चौधरी:- कॅसेट ऐकुन समजेल ना?

मा. सचिव :-तुम्ही काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:- मी जे बोललो ते लिहिले आहे बरोबर.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-इतिवृत्त कायम करतेवेळी मी आयुक्तांना निवेदन करतो की, मागील सभेत आम्ही जी चर्चा केली होती, त्यात पान नंबर २९ वर आपण आश्वासन दिले होते की, कल्याणमध्ये जे पाणी दिले होते, त्याची बिले वसूल केली जातील. त्यापूर्वी देखील महासभेत पान नं. १३ ते २८ , पान नंबर २५ आपण असेच आश्वासन दिले आहे. परंतु या पूर्ण महिन्यात काय कार्यवाही झाली. ते मेहरबानी करुन सभागृहात सांगितले तर बरे होईल. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मा. महापौर साहेब, मा. आयुक्त, इतिवृत्त कायम होण्याचा जो विषय आहे, इतिवृत्त आम्हाला कालच मिळाले,अजून आम्ही त्याचा अभ्यास केला नाही. कृपया ते पुढील महासभेत ते पारीत केले तर ते योग्य होईल. कारण की, मराठीत इतिवृत्त असल्याने आम्हाला वाचायला त्रास होतो. कालच इतिवृत्त मिळाले जर काही चुक असेल तर आम्हांला माहित पडणार नाही. पुढील महासभेत हा विषय ठेवला तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मा. महापौरजी, आता आमचे मा. सदस्य श्री. जमनु पुरस्वानी म्हणाले की, इतिवृत्त मराठीत आहे, हे तर आम्ही ९७ सालापासून ओरडत आहे. हिंदीत इतिवृत्त दिले जावे, परंतु आता नियम असे झाले आहेत की, सर्व पत्रव्यवहार मराठीत झाला पाहिजे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-माझे म्हणणे असे आहे की, इतिवृत्त मराठीत असू दे, परंतु दोन-तीन दिवस वाचायला आधी तर मिळू दे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-जर इतिवृत्त दर वेळी मराठीतच मिळणार आहे तर आम्हांला मराठी शिकण्याचा प्रयत्न करावाच लागेल. जर वैयक्तीकपणे जमनादास पुरस्वानींची जर काही हरकत असेल तर पुढच्या महिन्यात देखील ते नमुद केले

जाईल. आणि त्यांनी इतिवृत्त वाचले नाही म्हणून कायम न करणे हे काय ठिक नाही. जर जमनादास पुरस्वानींना जर काही हरकत वाटली तर ते नमुद केले जाईल. आम्ही इतिवृत्त वाचले आहे....

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-सचिव साहेब सांगा, जर काही हरकत असेल तर ती पुढच्या महिन्यात नमुद केली जाईल का? असा नियम आहे का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मी, श्री. जमनादास पुरस्वानी यांना सांगु इच्छितो की, मी बोलत असतांना दोनदा ते मध्ये बोलले. तिस-यांदा बोलु नये माझे बोलणे पुर्ण करु दयावे. मागे सचिव साहेब एकदा म्हणाले होते की, इतर नगरपालिका महानगरपालिकेत इतिवृत्त सहा-सहा महिने, १२ महिन्यापर्यंत मिळतात. तरीपण आमचे सचिव व त्यांचा कर्मचारी वर्ग सक्षम आहेत, त्यामुळे वेळेवर आपल्याला इतिवृत्त मिळते. याबाबत सचिवांची तारीफ केली पाहिजे. मी मा. महापौरांना निवेदन करेल की, इतिवृत्त कायम केले जावे. श्री. जमनादास पुरस्वानी जे आधी दोनदा माझ्यामध्ये बोलले आता तिस-यांदा बोलले त्यांची जर काही हरकत असेल तर पुढच्या महिन्यात त्याची नोंद करावी.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:- मा. सचिव साहेब, कृपया सांगा, एकदा इतिवृत्त कायम झाल्यावर जर नंतर हरकत घेऊ शकतो तर आम्ही कधीही हरकत घेऊ शकतो. जर असा नियम आहे तर इतिवृत्त कायम करण्यासाठी आणूच नये. आम्ही अशीच हरकत घेऊ. (इकडे श्री. दिलीप लालवानी बोलायला उभे असतांना कृपया आपण बसा किशोर वनवारी वारंवार मला बसवत होते, मला आधी सचिवांकडुन उत्तर घेऊ दया, मग तुम्ही बोला. कृपया माझे उत्तर त्यांना देऊ दया. )

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-माझी हरकत दुस-या मुददयावर आहे,कल्याणमध्ये दिल्या जाणा-या पाण्याविषयी महापालिकेने काय कार्यवाही केली?दरवेळी मी पत्रकार कक्षाविषयी बोललो आहे, त्याचे काय झाले? कल्याणचे रिकव्हरी विषयी काय झाले याला खुलासा करावा.

मा. सचिव:-काय करायचे?

काही सदस्य:-पास-पास......

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-इतिवृत्त कायम करा पण नियम काय ते तर सांगा.मी दरवेळी हरकत आणली तर तुम्ही ती नमुद कराल का? याचा नियम सांगा.

मा. सचिव:-तुमच्या माहितीसाठी मी सांगतो, इतिवृत्त कायम होणे हे शर्तीवर नाही पाहिजे. परंतु इतिवृत्त कशाला म्हणतात हे आधी लक्षात घ्या. यात जे ठराव आहे, त्याला इतिवृत्त म्हणतात चर्चेला इतिवृत्त म्हणत नाही. जर चर्चा करतांना एक दोन वाक्य इकडे तिकडे झाले असतील तर तुम्ही त्याचवेळी दुरुस्ती करु शकतात. इतिवृत्त तुम्ही ठरावाच्या दृष्टीकोनातून पहा. कार्यवृत्त म्हणतात, त्यात विशेष असे काही नाही, जर काही महत्त्वाची अडचण असेल, त्यात चूक झाली तर दुरुस्ती

करु शकतो. ते तुम्ही मला सांगा, इथे होणार नाही. महापौरांच्या अनुमतीने जर ते योग्य असेल तर ते करु शकतो. फक्त चुक.........

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u>:-दुरुस्ती नाही करु शकत तर पुढील महासभेपर्यंत .......



<u>मा. सचिव</u>:-पुढील महासभेपर्यंत प्रलंबित ठेवता येणार नाही. आजचे आज कायम केले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी</u>:-उल्हासनगर महानगरपालिका वसूलीसाठी खुप प्रयत्न करत आहे, माझा प्रश्न पण वसूलीशी संबंधित आहे. दोन करोडचा प्रश्न आहे,कल्याण महापालिकेकडे आपले दोन करोड निघत आहे. पत्रकार कक्षाची आम्ही मागणी केले होती, त्याचे काय झाले? मेहरबानी करुन आयुक्तांनी या गोष्टीचा खुलासा करावा.

<u>मा. आयुक्त</u>:-महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. दिलीप लालवानी यांनी कल्याण महानगरपालिकेतर्फे आशाळे -मानेरे गावाला पाणी पुरवठा आधीपासून केला जातो, त्याविषयी प्रश्न विचारला आहे, आताची सद्याची स्थिती मी सांगु इच्छितो, या विषयी मा. पालकमंत्री यांच्या आदेशान्वये जिल्हाधिकारींनी या महिन्यात एक बैठक ठाण्यात बोलावली होती. आणि त्याच वेळी जी बैठक झाली होती, त्याचे इतिवृत्त आंम्हाला आता मिळाले आहे. त्यांनी त्या इतिवृत्तात असे आदेश दिले आहेत की, जे आशेरे -मानेरे गाव आहे,यांना पाणी पुरवठा ज्या पाईप लाईनच्या आकाराने किंवा ज्या
त-हेने पाणी पुरवठा केला जात होता, त्याच आकाराने पाणी पुरवठा केला जावा. त्यांनी लिहिले होते की, त्यासोबत एक नकाशा पाठवला आहे, परंतु तो काही त्यासोबत नव्हता. त्यामुळे जिल्हाधिकारी साहेबांना विनंती केली की, नकाशा न आल्याने आपण जे आदेश दिले आहेत, त्याची पुर्तता आम्ही करु शकत नाही. नकाशा मागविला आहे. जेव्हा मंत्री महोदयाच्या आदेशावरुन जिल्हाधिकारी पाणी पुरवठयासंबंधी आदेश देतात तर त्याचे पालन करणे हे प्रशासनाचे कर्तव्य असते. मी मागील सभेतच सर्व सदस्यांना माहिती दिली आहे की, आशेरे-मानेरे गावाला पाणी पुरवठा आधीपासून केला जातो. आणि भुतपूर्व आयुक्त श्री. आर.डी. शिंदे साहेबांनी, त्यांना एक पत्र दिले होते, त्यात लिहिले होते, ज्या आकाराच्या पाईप मधुन पाणी पुरवठा दिला जात होता त्याच आकाराच्या पाईपमधुन पाणी पुरवठा करण्यास महापालिका तयार आहे. मा. शिंदे साहेबांनी लिखित मान्य केल्याने आणि मा. पालकमंत्र्यांच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी यांनी दिलेले ओदश प्रमाणे त्याच आकाराच्या लाईन मधुन पाणी पुरवठा महापालिका किंवा प्रशासनाला करावा लागेल. याशिवाय दुसरा मुददा त्यांनी पाणीपुरवठयाच्या थकबाकी संबंधित आहे, त्यासंबंधात मुददा जेव्हा जिल्हाधिकारी यांच्याकडे उपस्थित केला गेला, त्याचे इतिवृत्त आमच्याकडे प्राप्त झालेले आहे. त्या इतिवृत्तात असे दिलेले आहे की, आशेळे-मानेरे गावच्या रहिवाश्यांची एक समिती तयार करावी. आणि त्या समितीने जे बिल आहे,ते बिल उल्हासनगर महापालिकेला दया तथापि याचा पुर्वीपासूनच आम्ही कल्याण महापालिकेकडे पाण्याचे जे बिल आहे त्याची मागणी करीत अहोत, आणि त्या मागणीचा पाठपुरवठा अदयापही चालु आहे.

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:</u>-पत्रकारकक्षाविषयी पण बोला साहेब.*

*<u>मा. आयुक्त (श्री. बा.र. पोखरकर):-</u> पत्रकार कक्षाविषयी पण मी श्री. भडकवाड यांना मागील महासभेत आदेश दिले होते. त्यांनी योग्य अशी जागा शोधावी. आता मी त्यांना परत आदेश देत आहे की, त्यांनी लवकरात लवकर जागा शोधावी. आणि तसा प्रस्ताव माझ्याकडे दिला जावा.*

*<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u> पान नंबर ६ वर आमचे सभागृह नेता म्हणाले होते, त्यात असे लिहिले आहे की, कुणाही सदस्यास जर काही काम असेल तर तर तो हजेरी पटावर स्वाक्षरी करुन जाऊ शकतो. असे चालते का? सही करुन आपण जाऊ शकतो का?*



*<u>मा. सचिव:</u>-फक्त स्वाक्षरी करणे पुरेसे नाही. सभागृहात प्रवेश करुन त्यांना काही वेळ बसायचे पण आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:</u>-मा. महापौरजी २० सप्टेंबरच्या महासभेत ठराव पास केला गेला आहे, ठराव क्र. २९, त्यात आशेळे-मानेरे गावाला पाणी दयायचे नाही असे क्लीअरकट लिहिलेले आहे, व शासनाकडे तो ठराव पाठविलेला आहे. त्याशिवाय कल्याण महापालिकेकडुन आपले देणे वसूल करायचे आहे. त्यानंतर २९ ऑक्टोंबरला जिल्हाधिकारींकडे जी सभा झाली की, त्यात गावाला पाणी दयायचे आहे, आयुक्तांना आदेश दिले आहेत. तिथे त्यांनी ही चर्चा करायला पाहिजे होते की, महापालिकेने ठराव पास केला आहे, त्यांना पाणी दयायचे नाही. इथे बसलेले ८१ नगरसेवकांपैकी ७० नगरसेवकांच्या प्रभागात पाणीच येत नाही. जर आमच्या क्षेत्रात पाणी नाही तर आम्ही आशेळे-मानेरे गावाला कसे पाणी दयायचे? मी दोन दिवसापूर्वी आयुक्तांना पत्र दिले की, व्हीटीसी ग्राऊंड, पेन्सील फॅक्टरी तेथिल नगरसेवकांना विचारुन बघा आताच, तिथे टॅकरद्वारा पाणी पुरवठा केला जातो, अशा परिस्थितीतआमच्याकडे पाणी नसतांना त्यांना कसे पाणी देणार? हे जिल्हाधिकारींना सांगणे कोणाचे काम आहे. आम्ही पास केलेला ठराव आधी शासनाकडुन विखंडित करुन आणा नंतर त्यांनी पाणी मागावे. त्यावर आम्हांला स्टॅंडिंग चार्जेस देखील लावतात. आम्ही ते चार्जेस भरु शकत नाही तर ते पाण्यामध्ये कपात करतात. मेहरबानी करुन आयुक्तांना आदेश दया तेथिल पाणी सुरु नाही केले पाहिजे.*

*<u>मा. आयुक्त:</u>-महापौर महोदया, सन्माननिय सदस्य पंजाबी साहेबांचा जो प्रश्न आहे, आपण त्यांना जास्त पाणी देत नाही आहोत, जो आधीपासून पाणी पुरवठा होत होता, आठ-दहा वर्षापासुन तेवढयाच प्रमाणात पाणी पुरवठा करणार आहे. ते देणे माझ्या मते योग्य राहिल. जास्त पाणी तर आपण त्यांना देत नाही आहोत.*

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:</u>-ठिक आहे, पूर्वी जेवढे पाणी दिले जात होते तेवढेच दिले जावे. आमच्या प्रभागात तेवढे सुध्दा पाणी येत नाही, आम्हांला तर आधी पाणी दया. आम्ही इथले रहिवासी आहोत. माझ्या प्रभागात नव्वद टक्के पाणी येत नाही. २४ नंबर पॅनल मध्ये ९० टक्के पाणी नाही आहे. एक एक टॅंकर कुणाला मिळतो तर पेपर मध्ये चर्चा केली जाते. आमची अशी हालत आहे. कुणाला*

टॅंकर मिळत नाही , फोनवर शिव्या शाप दिल्या जातात, आधी आम्हांला तर पाणी पुरेसे दया.

__मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणीः__-माझ्या प्रभागात कृष्णा नगर, गणेश नगर, या माझ्या प्रभागात देखील पाणी येत नाही. आशेळा व मानेरा गावात रोज रात्री नविन कनेक्शन घेतले जाते. तुम्ही आठ-दहा वर्षापासुन त्यांना जे पाणी देत आहात, तेवढे देत रहा, आमची त्याला हरकत नाही. पण कमीत कमी तिथे नविन लाईन देवून पाणी देणे योग्य नाही. त्यावर काहीतरी अंकुश लावला गेला पाहिजे.

__मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः__-तेवढेच पाणी दयायचे आहे तर मा. जिल्हाधिकारींना नकाशा देणे काय गरजेचे आहे. नवा नकाशा देण्यात अर्थ काय नविन लाईन टाकायची आहे तिथे?

__मा. सदस्य श्री. यादव लालबिहारीः__-पाण्याचा त्रास तर माझ्या प्रभागात देखील पाण्याचा त्रास सुरु आहे, सहा-सात हजार लोकांपैकी अर्ध्याच लोकांना पाणी मिळते, आजपण पाणी नाही आले, काल काही अधिकारी तिकडे गेले होते, परंतु अर्ध्या भागातच पहाणी करुन निघून आले. ते जेव्हा परत आले पंजाबी चौक पर्यंत पाणी बंद झाले. हे काय आहे.

__मा. सदस्या श्रीम. रिझवानी सुझाता :__-मा. महापौरजी ,आमच्या प्रभागात देखील पाणी येत नाही. थोडे बहुत यायचे ते पण येत नाही.



__मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः__-माझ्यामते जिल्हाधिकारी साहेबांना, सुझाव दिला जावा. त्यांना पाणी पाहिजे असेल तर टॅंकरने पाणी देऊन त्यांनी टॅंकर्सचे चार्जेस महापालिकेला दयावे.

__मा. सदस्य श्री. यादव लालबिहारीः__-टॅंकरमधील अर्धेपाणी तर झिरपते.

__मा. सचिवः__-ठिक आहे, इतिवृत्त कायम?

__मा. महापौर :__-सदरचे इतिवृत्त सर्वानुमते जसे आहे तसे कायम करण्यांत येत आहे.

विषय :- मागील सभेचे दि. १९.१०.२००२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे

बाबत.

__मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः__-आता कार्यसूचीवरचे जे विषय सुरु होणार आहेत, आधी जेव्हा महासभा सुरु झाली तेव्हा तुम्ही आणी आम्ही जरा उशिरा आलो त्यावेळी आमचे श्री. नरेश गायकवाड यांचे जे निधन झाले, त्यांना श्रध्दांजली आर्पिल केली गेली, परंतु आमचे माजी महापौर श्री. हरदास माखिजा साहेबांच्या मातोश्रींचे निधन झाले , त्यांना पण दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पित करण्यांत यावी. तसेच पत्रकार श्री. दयाल वाधवा यांचे देखील निधन झाले आहे.

__मा. सचिवः__-श्रध्दांजली प्रस्तावात सर्वांचा समावेश केला जाईल.
विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

विषय :-श्री. उध्दव लुल्ला ,महापालिका सेवेतील लिपिक, यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित निलंबन आदेश कायम करणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी</u>:-मा. महापौरजी, हा जो विषय आहे, याच त-हेचे महापालिकेचे तीन कर्मचारी आहेत. त्या तिघांना एकाच दिवशी निलंबित केले गेले होते, ती तारीख होती, ९ मे... जेव्हा आयुक्त कुणाही कर्मचा-याला निलंबित करतात, तर त्याचे निलंबन आदेश सहा महिन्यात महासभेने कायम केले पाहिजे. त्यांनी तसा प्रस्ताव महासभेसमोर आणला पाहिजे. आज तारीख आहे १६ नोव्हेंबर, त्यांचे सहा महिने ९ नोव्हेंबरला संपले. तर आपोआपच निलंबन आदेश जे कायम करायचे होते ते रदद झाले. त्यांना सहा महिन्याच्या आत महासभेची परवानगी घ्यायची आहे. आज तारीख आहे . त्यामुळे या कर्मचा-याचे निलंबन आपोआपच कायम नाही झाले पाहिजे त्यांना आपोआपच कामावर घेतले गेले पाहिजे व त्यांच्याविरुध्द जी विभागीय चौकशी चालु आहे ,जर त्यात ते दोषी आढळले त्यावर प्रशासन जी कार्यवाही करते त्यास महासभेने स्थायी समितीने मान्यता दिली आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी</u>:-सन्माननिय महापौरजी, या विषयाप्रमाणेच इतर बाकीचे जे चार विषय आहे असे मला वाटते. तरी पाच विषयावर एकत्रपणे चर्चा केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी</u>:-तुम्हांला पाचही जणांचे करायचे आहे का?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी</u>:-हो.
<u>काही सदस्य</u>:-चालेल चालेल.

<u>मा. सचिव</u>:-काय करायचे? निलंबन आदेश रदद करायचे काय?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी</u>:-पाचही जणांना कामावर घ्यायचे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी</u>:-विभागीय चौकशी करायची.



<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी</u>:-विभागीय चौकशी चालु ठेवायची जर त्यात दोषी आढळले तर प्रशासन जर काही कार्यवाही करेल तर त्यात महासभा व स्थायी समिती बांधिल असेल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लर</u>:-त्यांना त्यांच्या विभागात परत ठेवु नये. ज्या विभागामधुन ते निलंबित झाले आहे, त्यांना त्या विभागामध्ये परत ठेवण्यात येवू नये.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी</u>:-मी याच्याशी सहमत आहे. त्यांना त्या विभागात पुन्हा ठेवण्यात येऊ नये.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर</u>:-महापौर महोदया, हा जो निलंबनाचा विषय आहे, यावर निर्णय झाला आहे, परंतु याबरोबर हेच स्पष्ट झाले पाहिजे की, ज्या अनाधिकृत बांधकामासाठी त्यांना निलंबित केले आहे, त्या बांधकामावर कार्यवाही झाली आहे का? जितके पण अनाधिकृत बांधकाम आहे, त्यावर कार्यवाही झाली पाहिजे, या गोष्टीपण सभागृहात स्पष्ट झाल्या पाहिजेत. संबंधित बिल्डरवर काय कार्यवाही झाली आहे. आर्किटेक्ट वर काय कार्यवाही झाली आहे. या सर्व गोष्टी

जरी सदनासमोर नाही आणल्या तर कार्यवाही करण्यात काय अर्थ आहे. कोण देणार उत्तर?

<u>श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त, मुख्यालय):</u>-पाटणकर साहेब आता सदनात नाही आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरेंडकर :</u>-मग तुम्ही उत्तर दया.

<u>श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त, मुख्यालय):</u>-मी या विषयावर सदनाला थोडे स्पष्टीकरण देऊ इच्छितो की, प्रशासनाने निलंबनाचा विषय सहा महिन्यात सभागृहासमोर मांडला पाहिजे. भविष्यातपण पुन्हा असे होऊ शकते म्हणून थोडे स्पष्टीकरण देतो. महासभेत होणा-या पत्रव्यवहारात सचिव साहेब जबाबदार आहेत. कोणताही विषय सहा महिन्यात महासभेसमोर आणायचा असेल, तर सचिवांकडे सहा महिन्याचा आत जो विषय येतो, तर तो महासभेला मिळाला, असे अनुमान काढले जाते, तर या विषयी मला काही बोलायचे नाही आहे. प्रशासनातर्फे सहा महिन्याचा आत सर्व विषय आणले गेले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोडकर:</u>-मग महासभेसमोर का नाही आणले?

<u>मा. सदस्य श्री.किशोर वनवारी:</u>-मा.महापौरजी........

<u>मा. सदस्य श्री.राज असरोंडकरः-</u> आता मी बोलत आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> ते तुमच्या मध्ये बोलले त्याचे मी त्यांना उत्तर देतो. ते म्हणाले की, भविष्यात महासभेसमोर असे होऊ नये,तसे मी त्यांना उत्तर देतो. तुम्हांला जेव्हा हवे तेव्हा तुम्ही कुणालाही निलंबित करता. हवे तेव्हा चौकशी करता, उदा. कर विभागातील श्री. दामोदर शर्मा, त्यांना निलंबित केले. सहा महिन्याच्या आता चौकशी पूर्ण होऊन त्याला निर्दोष सिध्द करुन आपल्या अधिकाराने त्याला कामावर घेतले. जेव्हा आमच्या आयुक्त साहेबांनी स्वतःच्या अधिकारात इकडे दोन चौकशी अधिकारी ठेवले आहेत, तर तुम्ही जेव्हा कुणाला निलंबित करता तेव्हा फटाफट का नाही चौकशी करतात, लवकर का नाही चौकशी संपवत, जशी दामोदर शर्माची संपवली. त्याला तुम्ही कसे तुमच्या अधिकारात महासभेत न आणता कामावर घेतले. त्याचप्रमाणे इतरही कर्मचा-यांची जलद चौकशी करा. व त्यांची चौकशी संपल्यानंतर महासभेसमोर सहा महिन्याच्या आत निर्णयात चौकशीत आण, त्यानंतर तुम्ही लेखा विभगाात लिहून पाठविले की, दामोदर शर्माला सहा महिन्याचा पगार देखील देऊन टाकला. मग आमच्या मुख्य लेखा अधिकारींनी क्युरी लिहून



पाठविली की, निलंबित कालावधीचा शंभर टक्के पगार आम्ही देऊ शकत नाही. त्यांना पंच्च्याहत्तर टक्के एवढाच पगार देऊ शकतो. तुमचे जे अंतर्गत काम चालु असते, त्याप्रमाणे या पाचही कर्मचा-यांना दामोदर शर्मासारखी वागणूक दयायला पाहिजे होती. जर तो दोषी आढळला असता तर शिक्षेसाठी प्रस्ताव आणला असता, आम्ही त्यांना शिक्षा दयायला सुध्दा तयार आहोत.

<u>श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त, मुख्यालय):</u>-त्याला खुलासा मी करु इच्छितो, श्री. दामोदर शर्मा व पाच लोक त्यात काही फरक नाही. श्री. दामोदर शर्मा यांचे प्रकरण आहे ते चौकशी अधिकारीकडे पाठविले होते. त्याच तत्परतेने या चारही पाचही लोकांचे पाठविले आहे. चौकशी अधिका-यांचा त्या कर्मचा-यावरील अहवाल

अजुन आला नसल्याने सहा महिन्याच्या आत त्यांना कारवाई करता आली नाही. दामोदर शर्मा यांची चौकशी मी नाही केली. चौकशी अधिकारींनी तत्परतेने ते काम केले आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर माझ्याकडे प्रलंबित ठेवण्यात काही अर्थ नाही म्हणुन योगायोगाने दामोदर शर्मा जर कामावर हजर झाले तर त्याचा अर्थ असा नाही की, दामोदर शर्माचे काम तत्परतेने केले आहे व या पाच जणांचे नाही केले.

<u>मा. सदस्य श्री.किशोर वनवारीः-</u>तीन कर्मचारी निलंबित झाले ती तारीख कोणती होती? मी सांगतो ९ मे. सहा महिने कधी संपतात. याचा जरा खुलासा करा. तुम्ही मोजा सहा महिने माझ्याकडुन चुकी झाली असेल. ९ मे ला निलंबित झाले सहा महिने त्यांचे कधी संपले.

<u>श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त, मुख्यालय)</u>:-८/११/२००२.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आज किती तारीख आहे.

<u>श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त, मुख्यालय)</u>:-१६ तारीख.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>सहा महिने सात दिवस झाले ना?

<u>श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त, मुख्यालय)</u>:-मी तेच स्पष्टीकरण देत होतो की महापालिकेतर्फे जे प्राधिकृत अधिकारी आहेत. ते सचिव साहेब आहेत. व सचिवांकडे जर कोणताही प्रस्ताव गेला तर तो महासभेसमोर मर्यादित कालावधीत आला आहे याचा अर्थ हा आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आम्ही तर आज ठराव करणार ना? महासभा १६ तारखेला आहे. ठराव आज होणार ना? निलंबन कायम आज होणार ना? म्हणजे सहा महिने सात दिवस झाले. तुम्ही पाचव्या महिन्यात पण प्रस्ताव देवू शकत होतात, चवथ्या महिन्यात पण प्रस्ताव आणु शकत होता.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः'-</u>आज तरी चौकशी पुर्ण झाली आहे.

<u>श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त, मुख्यालय)</u>:-नाही. नाही झाली.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>चौकशी तर चालुच राहील.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>तुमच्या स्पष्टीकरणाला काही अर्थ नाही.

<u>श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त, मुख्यालय)</u>:-निलंबनाचा जो प्रस्ताव आहे तो कायम करण्यासाठी म्हणुन तुमच्या समोर आहे.



<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>सहा महिने सात दिवस झाले. त्यानंतर आपण त्यांना ७५ टक्के पगार देण्यापेक्षा कामावर घेवून १०० टक्के म्हणजे पुर्ण पगार दया. जर त्यांना चौकशी अंती ते दोषी आढळले तर त्यांना टर्मिनेट केले जावे.

__श्री. दत्ता भडकवाड(उपायुक्त, मुख्यालय)__:-तो तर महासभेचा अधिकार आहे. त्यात मी हस्तक्षेप नाही करू इच्छित. मला हे स्पष्ट करायचे आहे की सहा महिन्याच्या आत आम्ही प्रस्ताव दिला आहे. सचिवांकडे प्रस्ताव गेला म्हणजे महासभेकडे गेला. यात जर काही चुक असेल तर सचिव साहेब तुम्ही सांगावे.

__मा. सदस्य श्री. राज असरोंडकर__:-महापौर महोदया,सभागृहासमोर हे स्पष्ट झाले पाहिजे की, जसे उपायुक्त मुख्यालय म्हणाले की जर सचिव साहेबांकडे जर एखादा प्रस्ताव पोहोचला तर तो महासभेसमोर पोहोचला असे मानले जाते. यावर जरा स्पष्टीकरण करा की त्यांच्याकडे असे प्रस्ताव आले होते का? त्यांनी मर्यादित वेळेत महासभेसमोर का नाही ठेवले. त्यानंतर मी इमारतीबाबत विचारतो.

__मा. सचिव__:-आधी तर आमचे मा. उपायुक्त श्री.भडकवाडसाहेब यांनी जे स्पष्टीकरण दिले आहे. मी त्यांच्याशी अजिबात सहमत नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की मला हा प्रस्ताव आठ तारखेला दिला गेला व मी त्याचवेळी कार्यसूचीवर विषय आणला.

__मा. सदस्य श्री.राज असरोंडकर__:- ही खुप गंभीर गोष्ट आहे. सदस्यांच्या भावनांशी ते खेळत आहे. उपायुक्त म्हणता की सचिवांची जबाबदारी आहे. सचिव साहेब म्हणता की मी त्यांच्याशी सहमत नाही. आम्हाला त्याच्याशी काय देणे घेणे आहे. ही गोष्ट स्पष्ट झाली पाहिजे. मुददा निलंबनाचा आहे. तसेच शहरातील अनाधिकृत बांधकामाचा विषय आहे. यास ऐवढे सहजतेने घ्यायचे नाही. जे कर्मचारी निलंबित झाले आहेत. ऐकेका इमारतीसाठी त्यांना जबाबदार नाही ठरविले. उध्दव लुल्ला च्या प्रस्तावनेत म्हंटले आहे की, ३५ ठिकाणी अनाधिकृत बांधकाम केले गेले आहे. दुसरे कॅम्प नं.४ मध्ये म्हंटले आहे की, तीस इमारतीमध्ये अनाधिकृत बांधकाम झाले आहे. कॅम्प नं. ५ मध्ये सांगितले आहे की, ३४ जागांवर अनाधिकृत बांधकाम झाले आहे. याचा अर्थ असा की ही गोष्ट जेवढी सरळ दिसते तेवढी नाही. हे तर त्यावेळची आकडेवारी आहे यात अजुन वृध्दी झाली असेल.म्हणजे ही एकंदर १०० इमारतींची संख्या आहे. तर यांच्यावर काय कारवाई झाली? इमारतींचे डेमोलेशन झाले का? याचे आधि स्पष्टीकरण करा. जर या इमारती डेमोलीश झाल्या नसतील. व भविष्यात देखिल या इमारती डेमोलीश झाल्या नाहीत तर खोटेपणा आहे त्याशिवाय काही नाही. याआधी देखिल खुपसे कर्मचारी अनाधिकृत बांधकाम प्रकरणात निलंबित झालेले आहेत. चौकशी झाल्यावर महासभेने त्यांना परत कामावर घेतले आहे. परंतु ज्या इमारतीसाठी त्यांना निलंबित केले गेले होते. ती इमारत तोडली आहे का? ही गोष्ट प्रथम सभागृहासमोर स्पष्ट झाली पाहिजे.

__मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी__:-मा. महापौरजी, जसे आमचे सदस्य श्री. राज असरोंडकरांनी सांगितले की १०० इमारती जवळ जवळ अनाधिकृत आहेत. तर माझे म्हणणे हे आहे की त्यावेळी उपायुक्त आणि नगररचनाकार आणि संबंधित अधिकारी काय करत होते. इतके मोठे अवैध बांधकाम होत होते. यांच्या दृष्टीस नाही पडले.यास जबाबदार कोण आहे? लहान माश्यांना तुम्ही फसवा भले परंतु हे जे मोठे लोक आहेत. त्यांची मोठी जबाबदारी आहे. मी गंभीरतेने सांगु इच्छितो की, जे मोठे अधिकारी आहेत त्यांची मोठी जबाबदारी आहे. तर त्यांनी १०० अवैध बांधकामांना जसे मी म्हंटले आणि ते लोक नगररचनाकारांचे काम काय ऐवढेच आहे फक्त पेपर पाहुन प्लान मंजुर करून देणे. त्याची पुढची जबाबदारी नाही. उपायुक्तांचे काम हे आहे की, जेव्हा अवैध निर्माण होत आहे. किंवा जर चटईक्षेत्राचे उल्लंघन होत आहे. ठिक आहे त्यांच्या नजरेत थोडे उशिरा आले. ५० किंवा १०० चौरस फुट बांधकाम झाले तेव्हातरी त्यांना माहित पडले होते. जर त्यावेळी माहीत पडत नव्हते. त्यानंतर ४३८ चौ.मी. काम होते त्यानंतर देखिल ते चार महिने लावतात. हा गंभीर

विषय आहे. बीट इन्स्पेक्टरवर तुम्ही कार्यवाही करता ठिक आहे. जे संबंधित अधिकारी आहेत



त्यांच्यावर पण उचित कार्यवाही केली पाहिजे. कारण की जितकी बीट इन्स्पेक्टरांची जबाबदारी आहे. तितकीच नगररचनाकार व संबंधीत उपायुक्त देखिल जबाबदार आहेत. त्यांच्यावर देखिल कडक कारवाई केली पाहिजे.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः-आयुक्त साहेब श्री. दर्शनसिंगजी जे बोलत आहेत. कृपया आपण लक्ष दयावे. आयुक्त साहेब त्यावर उत्तर दया.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-यात ४ नंबर आहे. यात श्री. कुमार जग्यासी यांना निलंबित केले आहे.

मा. सदस्य श्री. दर्वेदसिंग खेमाणीः-जमनुजी, एक मिनिट आमच्या प्रश्नाचे उत्तर देवू दया.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः-कृपया याचा खुलासा दया.

मा. सदस्य श्री.जमनादास पुरस्वानीः-कुमार जग्यासी यांना निलंबित केले आहे. कुठे बिट मुकादमांना सस्पेंन्ट करतात तर कधी बिट इन्स्पेक्टरला. कशात कनिष्ठ अभियंताना निलंबित करतात. असे का? झुलेलाल मंदिरच्या विषयात कनिष्ठ अभियंता निलंबित आणि शिवलीला मार्केटमध्ये कुमार जग्यासी यांना व शिवलीलाला परत रिवाईज प्लान दिला आहे. जी इमारत अनाधिकृत आहे. त्यात आमचा कोणी अधिकारी निलंबीत होतो महापालिकेवर डाग लागतो. त्याला रिवाईज प्लान दिला जातो. त्याला रिवाईज प्लान कसा मिळाला. जे अनाधिकृत आहे ज्यात निलंबनाचे आदेश मिळाले आहे.त्याला हा प्लान कसा मिळाला ही तर शरमेची गोष्ट आहे. महानगरपालिकेमध्ये. कधी बीट इन्स्पेक्टरना तर कधी कनिष्ठ अभियंता यांना निलंबीत करतात आश्चर्य आहे.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः-कृपया आयुक्त साहेबांनी खुलासा करावा हा खुप गंभीर विषय आहे. नाही तर आयुष्यभर असेच अवैध निर्माण होत राहतील.व आम्ही पहातच राहु.

श्री. शिंदे (नगररचनाकार):-तुमच्याकडे जर रिवाईज प्लानची कॉपी असेल तर दया.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः'-तुम्ही त्यांना बांधकाम पुर्णत्त्वाचा दाखला दिला आहे ना.

श्री. शिंदे (नगररचनाकार):-मी तर दिले नाही. तुमच्याकडे त्याची प्रत असेल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-तुम्ही दिले आहे का? दिले असेल तर हो बोला नाही तर नाही बोला. विषय संपेल.

श्री. शिंदे (नगररचनाकार):-मी तर दिले नाही. पण कधी कधी असे पण होवू शकते की माझी सही करून कोणी तुम्हाला दाखवले असेल. तुमची दिशाभुल केली असेल मी तर दिले नाही.

मा. सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी:-तुम्ही त्यांना बांधकाम पुर्णत्त्वाचा दाखला दिला आहे की नाही.

श्री. शिंदे (नगररचनाकार):-नाही दिले.

मा. सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी:-तुम्ही आयुक्तांना लिहुन दिले का की श्री. कुमार जग्यासी यांचा त्यात काही दोष नाही. तसे आपण लिहिले आहे. मग त्यांना निलंबित का केले गेले? तुम्ही तसे लिहुन दिले की नाही. कुमार जग्यासी यांना



निलंबित केले त्यात त्यांचा काही दोष नाही यात बीट इन्स्पेक्टर कोण होता? कशात बिट इन्स्पेक्टरला निलंबीत करतात तर कुठे ज्युनियर अभियंताना निलंबीत करतात. झुलेलाल मंदीरच्या इकडे ज्युनिअर इंजिनिअर नव्हता का? दोघांना निलंबीत करायचे होते ना? बीट इन्स्पेक्टर बरोबर ज्युनिअर इंजिनिअरना पण करायचे होते. जे वरीष्ठ अधिकारी आहेत त्यांना पण निलंबित करायचे होते. असे का? कोणीतरी निलंबित होते. मला याचा खुलासा पाहिजे. कारण की तुम्ही शिवलीलाला कंम्प्लीशन दिले की नाही? आणि कनिष्ठ अभियंताना तुम्ही लिहुन दिले आहे त्याचा काही दोष नाही तरी पण त्याला निलंबित केले गेले व तेथील बिट इन्स्पेक्टर का नाही निलंबीत झाला.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-मा. महापौरजी, दुसरी गोष्ट अशी आहे की, नगररचनाकार म्हणा किंवा उपायुक्त म्हणा जो पण संबंधीत कर्मचारी वर्ग असेल त्यांना कोणत्त्या कामासाठी ठेवले आहे. त्यांना याकरिता कामावर ठेवले आहे की शहरात अवैध निर्माण झाले नाही पाहिजे. वायोलेशन झाले नाही पाहिजे. ते लोक जर स्वतःची जबाबदारी पुर्ण करू शकत नाही. मग आमच्या मा. सदस्यांना लाचार होवून तुम्हाला माहिती दयावी लागते. जसे शिवलीला नेताजी वर मोठे बांधकाम आहे त्यासाठी आमचे मा. सदस्य त्याबाबत माहिती देतात ते बिल्डर्स आमच्याच मागे लागतात हे काय आहे. संबंधित अधिकारी स्वतःची जबाबदारी पुर्ण करत नाही ते झोपुन असतात. मा. आयुक्त साहेब, मला हे म्हणायचे आहे की, जे पण अधिकारी आहेत ज्यांना नगररचनाकार म्हणुन किंवा उपायुक्त म्हणुन काम दिले ते जर त्यात सक्षम असतील तर त्यांना त्यांच्या कर्तव्याचे पुर्ण ज्ञान असले पाहिजे. त्यांची जबाबदारी कशी पुर्ण करायची हे त्यांना समजले पाहिजे. ते पुर्ण करत नाही म्हणुन सदस्यांना समस्या निर्माण होते शहराचे नाव बदनाम होते अवैध निर्माण, अवैध निर्माण तर मेहरबानी करून याबाबतीत माझे हेच म्हणणे आहे की जे अधिकारी आपले काम बरोबर करू शकत नाही त्यांनी पद सोडुन गेले पाहिजे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:-महापौर महोदया, श्री. चंदर साधवानी यांना शिवलीला मार्केटचे नाल्यावर जे अवैध बांधकाम झाले आहे त्यासाठी निलंबित केले मग उध्दव लुल्ला यांना कॅम्प नं. १ मधील दुकानांच्या अनाधिकृत बांधकामासाठी निलंबित केले गेले. या दोन्ही जागी आज बांधकाम पुर्ण झाले आहे. शिवलीला येथील नाल्यावरील बांधकाम पुर्ण झाले आहे. व कॅम्प नं. १ मध्ये दुकानाचे बांधकाम आहे ते पण पुर्ण झाले आहे व त्याबाबतीत आम्हाला असे माहित पडले आहे की कॅम्प नं. १ मध्ये जे बांधकाम तोडले होते त्याचे पुर्ननिर्माण झाले त्यामुळे उध्दव लुल्ला यांना निलंबित केले त्यानंतर एका आठवडयाने त्या कामावर स्थगती आदेश आले. हा एक आठवडयामध्ये जो कालावधी होता त्या कालावधीत त्या दुकानांना बांधले गेले. यासर्व गोष्टीचे इथे स्पष्टीकरण झाले पाहिजे. निलंबित कर्मचा-या संबंधित अवैध बांधकाम आहे. गोषवा-यात दिले आहे की अमुक ठिकाणी ३४ अनाधिकृत बांधकामे आहेत. येथे २३ आहेत, येथे ३५ आहेत. आता आता माझ्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरात असे

म्हंटले आहे की, ३०९ बांधकामांसाठी महापालिकेने नकाशास मंजुरी दिलेली आहे. त्यामधील ११० इमारतीमध्ये अवैध बांधकाम झालेले आहे. असे पहाणीत आढळून आले आहे. त्यास जबाबदार कोण? जर यावर कारवाई होत नसेल तर ऐवढे सारे निलंबन व ऐवढी सारी चर्चा यास अर्थ काय?

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>महापौर महोदया, जी काही अनाधिकृत बांधकामे होतात. त्याबाबत जे क्षेत्रिय निरिक्षक असतात त्यांची जबाबदारी थेट असते. त्यांच्या वरचे जे अधिकारी असतात त्यांची जबाबदारी अप्रत्यक्षपणे असते. ते पर्यवेक्षकीय स्वरूपाची कामे करतात. ज्याला आपण सुपरविझन म्हणतो ती जबाबदारी त्यांची असते. जेव्हा अनाधिकृत बांधकामाचा मुददा समोर येतो. ज्याची जबाबदारी थेट असते त्याच्यावर प्रथम कारवाई केली जाते. जे त्या क्षेत्राशी संबंधित असतात त्यांनी त्याबाबत कार्यवाही करायला हवी होती. ती गोष्ट त्यांनी त्यांचे जे पर्यवेक्षकीय अधिकारी आहेत त्यांच्या लक्षात आणुन दयावयास पाहिजे होती. त्याबाबत जी काही कायदेशिर कारवाई केली पाहिजे. बांधकाम निष्काषित करायचे असेल तर ते केले पाहिजे. आता जो शिवलीलाचा मुददा आहे ज्याबाबत आपण प्रश्न विचारला आहे की



बीट इन्स्पेक्टरवरही कारवाई केली व त्याचबरोबर ज्युनिअर इंजिनिअरवर देखिल कारवाई केली जे नगररचना विभागाचे आहेत. याअगोदरतर असे नव्हते फक्त बीट इन्स्पेक्टरला जबाबदार धरण्याबाबतचे परिपत्रक काढले होते. जेव्हा ही गोष्ट माझ्या लक्षात आली तेव्हा मी नगररचनाकार विभागाचे जे ज्युनिअर इंजिनिअर आहेत त्यांना सुध्दा जबाबदार धरले जाईल असे परिपत्रक काढले. तसे तर नगररचना विभागाची ती जबाबदारी आहे याबाबत ब-याचशा सन्माननिय नगरसेवकांनी आपले विचार मांडले आहेत. मी समजतो की ते त्यांचे मुळ काम आहे. मुलभूत जबाबदारी आहे. कोणत्त्याही इमारतीला जेव्हा आम्ही बांधकाम आरंभ प्रमाणपत्र देतो. इमारत बांधकाम परवानगी देतो. त्यामध्ये जर का कोणतेही चटई क्षेत्राचे उल्लंघन कोणत्त्याही वेळी होत असेल तर ती नगररचना विभागाची जबाबदारी असते. व हा मुददा मी नगररचना विभागाशी स्पष्ट केला आहे. आता मुददा शिल्लक राहिला तो झुलेलाल मंदीर येथील अनाधिकृत बांधकामाचा जेव्हा हे बांधकाम माझ्या लक्षात आले त्याचवेळी पहिल्यांदा तो बीट इन्स्पेक्टरच जबाबदार धरला होता कारण ते जे बांधकाम आहे ते परवानगी न घेता चालु होते. त्या बीट इन्स्पेक्टरच्या विरूध्द कारवाई केली. दुसरा मुददा हा की जे पर्यवेक्षकीय अधिकारी आहेत. त्यांच्यावर काय कारवाई केली जावी असा सन्माननिय सदस्यांचा प्रश्न आहे. याबाबत जरूर त्यांची जी जबाबदारी आहे ज्यास अप्रत्यक्ष पर्यवेक्षकीय काम म्हंटले जाते. ते पर्यवेक्षकीय काम करण्यास कमी पडले म्हणुन त्यांच्यावर काय कारवाई करता येईल याबाबत मी जरूर विचार करेन.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. आयुक्त साहेब, झुलेलाल मंदिराबाबत श्री. उध्दव लुल्ला यास निलंबित केले त्यानंतर तेथील जे अनाधिकृत बांधकाम होते ते निष्काषित केले नाही.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>हे जे झुलेलाल मंदिर व शिवलीला आरकेड आहे त्याबाबत त्यांनी कोर्टात जावून स्थगिती आदेश आणला होता.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>अजुन तेथे स्थगिती आदेश की स्थगिती आदेश उठविला आहे?

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-आता चौकशी करावी लागेल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-जरा विचारून सांगा. मला तर अशी माहिती मिळाली आहे की दोन महिन्यापुर्वीच स्थगिती आदेश उठविला आहे.

मा. सचिव:-झुलेलाल मंदीराच्या बाजुला जे बांधकाम आहे. त्यावरील स्थगिती आदेश उठविला आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-त्यानंतर कारवाई का नाही झाली?

मा. सचिव:-ती संबंधित विभाग करतील.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-आज शहराची अशी परिस्थिती आहे की जेथे अनाधिकृत बांधकाम होते तेथे त्वरीत स्थगिती आदेश येतो. व त्यानंतर खरे म्हणजे असा नियम आहे की ते बांधकाम त्याच स्थिती थांबविले जाते त्याचे फोटो घेतले जातात. पंचनामा केला जातो. त्याची स्थिती काय आहे? किती स्लॅब पडले आहेत किती बांधकाम झाले आहे? यासाठी त्या बांधकामाचे फोटो घेतले जातात. व ते घेतले पाहिजेत कारण की, स्थगिती आदेश मिळाल्यानंतर एकतर्फी स्थगिती आदेश असल्याने बांधकाम पुर्ण होते. व स्थगिती आदेश मिळाल्यानंतर त्याच्यावर कारवाई होत नाही. याचे उदाहरण आहे झुलेलाल मंदीरशेजारील बांधकामा बाबतच्या स्थगिती आदेश उठुन दोन महिने झाले आहेत. तरीही त्याबाबत काही कारवाई झालेली नाही. व जो संबंधित अधिकारी आहे तो याबाबतची शिक्षा भोगत आहे. तो अजुनही निलंबित आहे.



मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-मा. महापौर साहेब, या अगोदर आमचे जे आयुक्त होते श्री. आरडी. शिंदे साहेब त्यांच्या काळातही पर्यवेक्षकीय कामे करणारे जसे आमच्या आरोग्य विभागात श्री. कांबळे साहेब होते. जे बरोबर काम करत नव्हते म्हणुन त्यांना तेथुन थेट कार्यमुक्त केले होते. व पाणी पुरवठा विभागात श्री. कोसे नावाचे एक कार्यकारी अभियंता होते. ज्यांचेही काम बरोबर नसल्याने श्री. आरडी. शिंदे साहेबांनी त्यांना थेट कार्यमुक्त केले होते. यापुर्वी जे श्री. दशोरे व श्री. जैन साहेब होते त्यांना त्वरीत कार्यमुक्त केले गेले तर आपण यांच्याबाबत काय विचार करत आहात कारवाई करण्याबाबत?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-जेवढया काही बांधकामांबाबतचे स्थगिती आदेश उठले आहेत. त्याबाबतची महासभेस माहिती दिली जावी. सर्व नगरसेवकांना सांगितले जावे की, किती लोकांनी स्थगिती आदेश घेवून आपली बांधकामे पुर्ण केली? स्थगिती आदेश उठल्यानंतर कारवाई काय झाली?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-स्थगिती आदेश उठुन दोन महिने झाले तरी कारवाई का झाली नाही असे का?

मा. सचिव:-स्थगिती आदेश उठुन एक महिना वीस दिवस झाले आहेत. ते जे इंन्जेक्शन ॲप्लीकेशन होते त्याबाबत कोर्टाने आमच्या बाजुने निर्णय दिलेला आहे. आम्ही ती केस जिंकली परंतु त्यानंतर कोर्टाने एक महिन्याचा अपील साठी वेळ दिली होती. अपीलाची वेळ संपलेली आहे. त्यांनी काही अपील केले नाही. व त्यानंतर वीस दिवस झाले आहे. अपिल कालावधी संपल्यानंतर.

मा. लाल पंजाबीः-तर आपण कारवाई करू शकतो ना?

मा. सचिवः-व शिवलीलाचे जे बांधकाम आहे त्याबाबत २० तारखेला अंतिम सुनावणी आहे. मा. जिल्हान्यायाधिश यांचेकडे,

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-सन्माननिय महापौर महोदया, जेव्हा कोणताही स्थगिती आदेश येतो तेव्हा त्या क्षेत्रात काम करणारे क्षेत्रीय निरिक्षक किंवा जे उपायुक्त आहेत त्यांचे तर हे कर्तव्य ठरते की जेव्हा स्थगिती आदेश येतो तेव्हा त्या बांधकामाबाबत पंचनामा करून त्या बांधकामाची सद्यस्थिती काय आहे? त्याचे फोटो घेणे माझ्यामते हे लोक आपली जबाबदारी पार पाडत नाही. जबाबदारी पार पाडणे ही त्यांची मुलभुत जबाबदारी आहे. व ते जबाबदारी पार पाडत नसतील तर पुन्हा एकदा परीपत्रक काढुन त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली जाईल. व जेथे जेथे हे लोक आपले कर्तव्य पार पाडत नाहीत. असे आढळून आल्यास आम्ही त्यांच्या विरूध्द विभागीय चौकशीची कार्यवाही जरूर करू. व झुलेलाल मंदिरा शेजारील बांधकामाचा जो स्थगिती आदेश उठला आहे. त्याबाबत संबंधित विभाग त्वरीत कारवाई करेल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-जेव्हा श्री. उध्दव लुल्ला यांनी आपली जबाबदारी पार पाडली नाही म्हणुन त्यास निलंबित केले गेले. आजचा जो क्षेत्रिय निरिक्षक ज्याने वीस दिवसात आपली जबाबदारी पार पाडली नाही. त्यास निलंबित केले पाहिजे किंवा नाही? त्यास सुध्दा निलंबित केले पाहिजे. व आज महासभेपुढे हे जे निलंबन आदेश कायम करण्यांसाठी आले आहेत. ते कायम केले जावेत व दुसरे जे बेजबाबदारपणा करतात त्यांना सुध्दा निलंबित केले जावे. या प्रकरणात बेजबाबदारी झाली आहे किंवा नाही? झाली असेल तर संबंधितांस निलंबीत करा. सभेमध्ये आजच निर्णय घ्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-व बाकीचे जे स्थगिती आदेश उठले आहेत. ती सर्व अनाधिकृत बाधंकामे निष्काशित केली जावीत. एक महिना, दोन महिने, सहा



महिने, दहा महीने पहिले आपल्या कालावधीत जेवढे काही स्थगिती आदेश उठले असतील त्यांची यादी तयार केली जावी. व त्यांच्यावर कारवाई केली जावी.

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-महापौर महोदया, मी आताच विधी विभागास आदेश देतो की ज्या बांधकामांवरील स्थगिती आदेश उठले आहेत. त्यांची एक यादी कदाचित त्यांनी ती अतिक्रमण विभागास दिली असेलच. दिली नसेल तर विधी विभाग पुन्हा एकदा त्वरीत ती यादी देईल. व जेथे जेथे स्थगिती आदेश उठले असतील त्याबाबत आमचे अतिक्रमण विभाग कारवाई करेल.

मा. सदस्य श्री. लालबिहारी यादव-मा. महापौर महोदया, मी असे विचारू इच्छितो की 1 नं. पासुन 5 नंबर पर्यंतच्या 100 इमारतींबाबत पाच लोकांना निलंबित केले. व आता जे अनाधिकृत बांधकाम होत आहे. त्यासाठी केव्हा निंलबित केले जाईल? याची माहिती मिळाली पाहिजे. कारण की अतिक्रमण विभागास कुण्या इमारतीबाबत विचारले जाते तेव्हा अतिक्रमण विभाग सांगतात की, हे जे बांधकाम आहे ते रस्तारूंदीकरणामध्ये आधी तुटले होते. त्याठीकाणी हे बांधकाम होत आहे की नगररचना विभागातर्फे मला एक पत्र दिले आहे त्याची प्रत मी आपल्यासमोर ठेवत आहे की या इमारतीचा नगररचना विभागातर्फे कोणताही नकाशा मंजुर झालेला

नाही. तरीही ती इमारत जशीच्या तशी आहे व आमचे येथे बसलेले शिवसेनेचे नगरसेवक ज्यांनी हा प्रश्न महासभेत विचारला आहे तर या इमारतीच्या अनाधिकृत बांधकामाबाबत कधी कुणाला निलंबित केले जाईल व बीट मुकादम यांनाच का निलंबित केले जाते? त्याच्याशी संबंधित जे अधिकारी आहेत त्यांना सुध्दा निलंबित केले पाहिजे. कारण की बीट मुकादमच दोषी नसतात तर त्या विभागात बसलेले सर्व अधिकारी दोषी असतात. जसे की पेट्रोल पंपच्या बाजुला एक अनाधिकृत बांधकाम जोरात सुरू असून ते पुर्ण होत आले आहे. त्याबाबत मला खुलासा पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब आता आपण जो मुददा उपस्थित केला की, स्थगिती आदेश असलेल्या अनाधिकृत बांधकामांचे फोटो घेवून ते आपल्याकडे ठेवले जावेत. एका अनाधिकृत बांधकामाचे फोटो व त्याची निगेटीव्ह घेवून न्यायालयात सादर केले होते परंतु आपणांस ऐकुन आश्चर्य वाटेल की, कोर्टामध्ये ते फोटो व निगेटीव्ह उंदीर खात आहेत. तर माझे असे निवेदन आहे की यापुढे फोटोग्राफ व निगेटीव्हची एकेकच प्रत आपल्या महापालिकेत सुरक्षित ठेवली जावी. बाकी एकेक प्रत न्यायालयात दिली जावी. कारण की न्यायालयात उंदीर फार झाले आहेत.

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ३ ते ७ पर्यंतचे निलंबन आदेश कायम करायचे आहेत की रदद करायचे आहेत?

रदद? परंतु आपल्यातील कुण्या सदस्याची सूचना होती की, त्यांना त्याच विभागात न ठेवता दुस-या कोणत्त्याही विभागात ठेवले पाहिजे. बदलीचे जे काम आहे ते प्रशासनाच्या हातात आहे प्रशासनास जेथे आवश्यक वाटेल तेथे त्यांना ठेवू शकते.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>त्यांना त्या विभागात ठेवले जावू नये अशी या महासभेची मागणी आहे.

<u>मा. सचिवः-</u>नाही आपली मागणी बरोबर आहे. परंतु आपण अशी मागणी केली की त्यांना त्या विभागात ठेवले जावू नये अशा प्रकारची मागणी ठरावामध्ये....

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>चौकशी पुर्ण होईपर्यंत त्यांना त्या विभागात ठेवले जावू नये.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>आम्हाला हे माहित नाही की ते कोणत्त्या विभागात होते. परंतु ज्या पण विभागात ते होते त्यांना चौकशीच्या कालावधीत त्या विभागात ठेवू नये. कारण की ते दबाव आणु शकतील. म्हणुन त्यांना त्या विभागात ठेवले जावू



नये अशी महासभेची मागणी आहे. महासभेच्या मागणी व्यतिरिक्त जर आपण काही करत असाल तर ती आपली जबाबदारी आहे.

<u>मा. सचिवः-</u>नाही मी आपणांस एक सूचना व माहिती देवू इच्छितो. की जर आपण हे समाविष्ट करू इच्छित असाल की त्यांना दुस-या विभागात नेमले जावे तर हा अधिकार प्रशासनाचा आहे की त्यांना कोणत्त्या विभागात ठेवायचे. कृपया माझे पुर्णपणे ऐकुन घ्या. जर आपण ठरावामध्ये असे समाविष्ट करत असाल की त्यांना पुर्वीच्या विभागात न ठेवता दुस-या विभागात नेमावे तर कायदयानुसार त्यांना एक

शिक्षा दिल्यासारखी होईल त्याबाबत ते कोर्टाकडुन फायदा घेवू शकतो यासाठी आपण प्रशासनावरी सोपवा आपणांस जे पाहिजे तेच होईल.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>आपल्या म्हणण्यानुसार आम्ही ते ठरावामध्ये आणणार नाही. परंतु जसे आम्हास आश्वासन दिले त्या आश्वासनावर आपण कायम रहा.

<u>मा. सचिवः-</u>मी आपणांस काही आश्वासन देत नाही. प्रशासनच आश्वासन देवू शकेल.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>ते तर आपोआपच होईल ना?

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>हा विषय अजुन आधांतरीत आहे. मा. उपायुक्तांनी असे सांगितले की मी तो प्रस्ताव सचिवांकडे सहा महिन्यापुर्वी सादर केलेला आहे. व सचिव म्हणतात की माझ्याकडे सहा महिन्याच्या आत सादर केलेला नाही. तर त्यांनी तो सहा महिन्याच्या आत सादर केलेला आहे किंवा नाही?

<u>मा. सचिवः-</u>मा. उपायुक्त साहेब, ही गोष्ट नाकारत नाहीत की त्यांनी आठ तारखेला माझ्याकडे गोषवारा दिला, त्यांनी आठ तारखेलाच गोषवारा दिला आहे ना?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>मी अगोदर स्पष्टीकरण करू इच्छितो की सचिवांकडे उशिरा पोहोचले की आमच्याकडुनच उशिरा गेले आहे. असे मला म्हणायचे नव्हते. मला ऐवढेच म्हणायचे आहे की, महासभेच्या वतीने प्राधिकृत अधिकारी सचिव आहेत. सहा महिन्याचा जो कालावधी आहे. सचिव म्हणतात आठ तारखेला गोषवारा दिला आहे. मी म्हणतो २७ तारखेला दिला आहे. हा वादग्रस्त मुददा आहे. क्लेरीकल मिस्टेक मुळे तो उशिरा पोहोचला वगैरे हा वेगळा मुददा आहे. जर आठ तारखेच्या अगोदर सचिव साहेबांकडे तो पोहोचला आहे. तर तो महासभेसमोर सहा महिन्याच्या आत आला आहे. ऐवढेच बोलायचे होते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, आता मी या विषयावर दोन शब्द बोलु इच्छितो मा. विरोधी पक्षनेत्त्याने जे म्हंटले की सहा महिन्याच्या आत गोषवारा आला होता की सहा महिन्यानंतर आला होता? परंतु आता आमचे सदस्य श्री. राजेंद्र चौधरी म्हणाले की तीनच्या ऐवजी पाच लोकांना घ्यायचे आहे. बाकीचे जे दोन आहेत त्यातील एकास पाच महिने झाले आहेत. एकास दोन महिने झाले आहेत. परंतु आम्ही आपल्याशी सहमत होवून पाचही जणांना कामावर घेत आहोत. तर याविषयाबाबत आताच आमच्या श्री. भडकवाड साहेबांनी सांगितले की, तो गोषवारा एका विभागाकडुन दुस-याविभागाकडे केव्हा पोहोचला? परंतु माझे म्हणणे हे आहे की, आपण त्यांना गोषवारा आठ तारखेला दिला व त्यांनी आठ तारखेलाच सभा सुचना काढली. या महिन्यात तर चार दिवस अगोदरच महासभा होत आहे. तसे तर दर महिन्यात वीस तारखेला महासभा होते या महिन्यात १६ तारखेला आहे. परंतु त्यांनी आठ तारखेला गोषवारा दिला. महासभा तर १६ तारखेला होत आहे. म्हणजे प्रस्ताव सहा महिने आठ दिवसांनी महासभेपुढे आला आहे. आमच्याकडुन त्यांचे निलंबन आदेश सहा महिन्याच्या आत कायम करून घ्यायचे आहे. परंतु आमच्याकडे तो प्रस्तावच सहा महिने आठ दिवसांनी आला आहे.



<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटीलः-</u>मा. महापौरजी, हे उल्हासनगर महापालिकेचे महासभेचे सभागृह आहे. या सभागृहात असे निर्दशनास येत आहे की, येथील अधिकारी वर्ग लोकप्रतिनिधीना चुकीची माहिती देत आहे. एक म्हणतो की दिलेले

आहे एक म्हणत आहे की नाही दिले. तर हे जर असेच या सभागृहात चालत असेल तर येथे लोकप्रतिनिधी कशासाठी बसलेले आहेत?प्रत्येक अधिकारी लोकप्रतिनिधींना उलट सुलट उत्तर देण्याचा प्रयत्न करत आहेत तर असे जे उलट सुलट उत्तरे देतात त्यांच्यावर काय कारवाई हे सभागृह किंवा प्रशासन करू शकते का? किंवा ही जी चुकीची उत्तरे देत आहेत. आता दोन तीन वेळा इथे सभागृहात असे झाले की एक म्हणत आहे की दिले आहे एक म्हणत होत की दिले नव्हते. तर हे काय नाटक लावले आहे. सभागृहामध्ये हा काय तमाशा आहे का? इथे उल्हासनगर महानगरपालिकेचे लोकप्रतिनिधी बसलेले आहेत. त्यांच्या समोर हा तमाशा चाललेला आहे. आणि सभागृहाचा व लोकप्रतिनिधींचा वेळ फुकट घालविला जात आहे अशी चुकीची उत्तरे देवून. किंवा चुकीची माहिती देवून. तर कृपया अशा अधिका-यांनी अभ्यास करून उत्तरे दयावीत असे आयुक्तांनी त्यांना सांगावे.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>मा. महापौरजी, ज्या प्रकारे चर्चा चालु आहे. त्यात आमचे उपायुक्त श्री. भडकवाड साहेब यांनी सांगितले की सहा महिन्याच्या आत हा प्रस्ताव आणलेला आहे. व आमचे सभागृह नेता म्हणत आहेत की, आठ दिवस उशिरा प्रस्ताव आलेला आहे. सचिव साहेबांनी सांगावे की हा गोषवारा वेळेत आला आहे की नाही?

<u>मा. सचिवः-</u>मी आधी पण सांगितले होते की, कायदयाची जी स्थिती आमच्या उपायुक्त साहेबांनी सांगितले तिच्याशी मी सहमत नाही. कायदा एकदम स्पष्ट आहे. त्यात लिहिले आहे की सहा महिन्याच्या आत महासभेने निर्णय घ्यायचा आहे निलंबन कायम करण्याचा. जर त्यांना असे वाटत असेल की मी सचिव साहेबांना प्रस्ताव दिला म्हणजे महासभेला दिला व महासभेने निर्णय घेतला समजायचे तर ते असे नाही. कित्येकवेळा आपण सर्वांनी मला विचारले आहे की महासभा तहकुब करायची आहे तर ऐकटे मा.महापौर सभा तहकुब करू शकतात काय? तेव्हा मी आपणांस सांगितले आहे की सर्वांनी मिळुन निर्णय घ्यायचा आहे. जेव्हा जवळच्या कालावधीची सभा असेल तेव्हा मला तो विषय सभा सुचनेवर ठेवायचा आहे. तर त्यांना घाई होती तर त्यांनी त्याबरोबर एक पत्र दयावयास पाहिजे होते की या विषयाकामी सभा लवकर ठेवावी. मी हे सांगु इच्छित नव्हतो परंतु कायदयाची व्याख्या करताना मतभिन्नता झाली म्हणुन मी हे सांगत आहे. म्हणुन मी हा खुलासा केला.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, आमचे सचिव साहेब व श्री. भडकवाड साहेब हे जे दोन्ही अधिकारी आहेत त्यांचे अभिनंदन केले पाहिजे कारण की त्यांच्यामध्ये गटस् व डेरींग आहे. ते एकदुस-याशी सहमती, असहमती दर्शवू शकतात. व आपल्या म्हणण्यास ते दुजोराही देवू शकतात. असे अधिकारी आमचे दुसरेही असले पाहिजेत की जे आपले म्हणणे स्पष्ट करू शकतील. असे अधिकारी असले पाहिजेत जे आपले विचार स्पष्टपणे मांडु शकतात. असे नाही की एकाने काही बोलावे व दुस-यांने खाली मान घालुन मुक्या सारखे बसुन रहावे. म्हणुन मी या दोन्ही अधिका-यांचे अभिनंदन करतो व दुसरेही अधिकारी असे करतील तर बरे होईल. धन्यवाद.

<u>मा. सचिवः-</u>ठिक आहे? निलंबन आदेश रदद?

<u>मा.महापौरः-</u>विषय क्र. ३ ते ७ बाबत सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

<u>विषयः-</u> श्री. उध्दव लुल्ला,महापालिका सेवेतील लिपिक, यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित निलंबन आदेश कायम करणे

बाबत.

--४२--

<u>प्रस्तावनाः-</u>

श्री. उध्दव लुल्ला, लिपीक हे अतिक्रमण विभागात कॅम्प क्र. १ येथे क्षेत्रिय निरिक्षक म्हणुन कार्यरत होते. अनाधिकृत बांधकामाचा शोध घेणे व अनाधिकृत बांधकामाचे अहवाल वरिष्ठ अधिका-यांकडे सादर करून ते निष्कासीत करण्याचे काम त्यांच्याकडे दिलेले होते. तथापि ते कार्यरत असलेल्या कालावधीत त्यांचा कार्यक्षेत्रात खालील अनाधिकृत बांधकामे झाल्याचे निर्दशनास आले आहे.

झुलेलाल मंदीराचा मागे पुर्णतः अनाधिकृत अशा तीन दुकानाचे बांधकाम नोव्हेंबर, २००१ मध्ये करण्यात आले सदरचे बांधकाम अनाधिकृत असल्याने दिनांक २०.११.२००१ रोजी निष्कासीत करण्यात आले होते. परंतु मे २००२ मध्ये सदरचे बांधकाम पुन्हा करण्यात आले सदरचे बांधकाम अनाधिकृत असल्याने तसा अहवाल वरिष्ठांकडे दऊन ते त्वरीत निष्कासीत करणे आवश्यक होते. परंतु संबंधीत क्षेत्रिय निरिक्षक श्री. उध्दव लुल्ला यांने त्यांचेकडे दुर्लक्ष केल्याने अनाधिकृत बांधकाम करणा-या व्यक्तीस प्रोत्साहन मिळाले तसेच श्री. उध्दव लुल्ला हे कॅम्प नं. १ मधुन क्षेत्रिय निरिक्षक म्हणुन कार्यरत असतांना प्रारंभ प्रमाणपत्र व बांधकाम परवानगी मिळालेल्या ३५ ठिकाणावरील इमारती मध्ये मोठया प्रमाणात अनाधिकृत बांधकाम झालेले आहेत. एवढया मोठया प्रमाणात अनाधिकृत बांधकामास जबाबदार धरून श्री. उध्दव लुल्ला यांनी त्यांच्या कामात दुर्लक्ष व कर्तव्यास कसुर केलेली असल्याने त्यांना कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे. ४/९दिनांक ९ मे, २००२ अन्वये महानगरपालिकेच्या सेवेतुन तात्त्काळ निलंबित करण्यात आलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१)(ब)नुसार सदर प्रकरण महासभेपुढे ठेवून निलंबन कायम करणे साठी प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ४५ <u>दिनांकः-१६.११.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. रमेश चव्हाण.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. उध्दव लुल्ला, महापालिका सेवेतील लिपिक, यांचे कर्तव्यातील निष्काळजीपणामुळे आयुक्तांनी त्यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित केलेले निलंबन कायम करित नाही. कारण दिनांक ९.५.२००२ या निलंबनाच्या तारखेपासुन ६ महिन्यांच्या मुदतीत असे निलंबन प्रशासनाने महासभेकडुन कायम करून घेतले नाही तर ते निलंबन संपुष्टात येते परंतु सदर कर्मचा-यांच्या विरूध्द खातेनिहाय चौकशी चालु राहील.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी

सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>विषयः-</u> श्री. कुमार जग्याशी, महापालिका सेवेतील कनिष्ठ अभियंता, यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित निलंबन आदेश कायम करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

--४३--

श्री. कुमार जग्यासी, कनिष्ठ अभियंता हे नगर रचना विभागात कार्यरत असतांना उल्हासनगर महानगरपालिका कॅम्प नं. ४ या क्षेत्रातील बांधकाम परवानगी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र, जोता प्रमाणपत्रानुसार बांधकामाच्या ठिकाणी मंजुर नकाशानुसार बांधकाम होते किंवा नाही इत्त्यादींची तपासणी करून अहवाल वरिष्ठांकडे सादर करणेची अंगभूत जबाबदारी त्यांचेवर सोपविण्यात आली असतांना कॅम्प नं. ४ येथे प्रारंभ प्रमाणपत्र व बांधकाम परवानगी मिळालेल्या एकुण २३ इमारतीमध्ये मोठ्या प्रभागात अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत. परिणामी त्यांना नेमुन दिलेल्या कार्यक्षेत्रामध्ये चटईक्षेत्र निर्देशांकचे उल्लंघन झालेले आहेत.

सबब महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपिल नियम १९७९ च्या नियम ४ (१)अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून मा. आयुक्त सो. उल्हासनगर महानगरपालिका यांनी श्री. कुमार जग्यासी, कनिष्ठ अभियंता यांना कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे४/१० दिनांक ९ मे, २००२ अन्वये महानगरपालिकेच्या सेवेतुन तात्त्काळ निलंबित करणेत आलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१)(ब)नुसार सदर प्रकरण महासभेपुढे ठेवून निलंबन कायम करणे साठी प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ४६ <u>दिनांकः-१६.११.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. रमेश चव्हाण

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. कुमार जग्यासी, महापालिका सेवेतील कनिष्ठ अभियंता, यांचे कर्तव्यातील निष्काळजीपणामुळे आयुक्तांनी त्यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित केलेले निलंबन कायम करित नाही. कारण दिनांक ९.५.२००२ या निलंबनाच्या तारखेपासुन ६ महिन्यांच्या मुदतीत असे निलंबन प्रशासनाने महासभेकडुन कायम करून घेतले नाही तर ते निलंबन संपुष्टात येते परंतु सदर कर्मचा-यांच्या विरूध्द खातेनिहाय चौकशी चालु राहील.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>विषयः-</u> श्री. चंदर साधवानी, महापालिका सेवेतील लिपिक, यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित निलंबन आदेश कायम करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

--४४--

श्री. चंदर साधवाणी, लिपिक हे अतिक्रमण विभागात कॅम्प नं. ४ येथे क्षेत्रिय निरिक्षक म्हणुन कार्यरत होते. त्यांच्याकडे अनाधिकृत बांधकामाचा शोध घेणे व अनाधिकृत बांधकामाचे अहवाल वरीष्ठ अधिका-यांकडे सादर करून ते निष्कासीत करणेचे काम दिलेले होते. तथापि ते कार्यरत असलेल्या कालावधीत त्यांच्या कार्यक्षेत्रात श्री. सुरेश वाधवा नावाच्या विकासकाने कॅम्प नं. ४ येथे शिवलीला आर्केड नावाच्या इमारतीचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र व बांधकाम परवानगी क्रमांक उमपा/नरवि/बांप/१५०/९९/१३८६ दि. ३१.३.२००० अन्वये सुरू केले होते. सदरचे बांधकाम मंजुर परवानगी प्रमाणे न करता बरेच अनाधिकृत बांधकाम केले तसेच सदर ठिकाणातुन जात असलेल्या नाल्यावर स्लॅब टाकून त्यावर बांधकाम केले होते. संबंधीत विभागाचे क्षेत्रिय निरिक्षक श्री. चंदर साधवानी यांनी सदर नाल्यावर स्लॅब टाकुन अनाधिकृत बांधकामास सुरूवात केल्यावर ते लागलीच निष्कासीत करणे आवश्यक होते, परंतु त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने जिवित हानीचा धोका निर्माण झाला होता तसेच श्री. चंदर साधवानी हे कॅम्प नं. ४ मध्ये क्षेत्रिय निरिक्षक म्हणुन कार्यरत असताना प्रारंभ प्रमाणपत्र व बांधकाम परवानगी मिळालेल्या एकूण २३ ठिकाणी असलेल्या इमारतीमध्ये मोठया प्रमाणात अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत एवढया मोठया प्रमाणात अनाधिकृत बांधकामे झाल्याने जबाबदार धरून श्री. चंदर साधवाणी यांनी त्यांच्या कामात दुर्लक्ष व कर्तव्यात कसुर केलेली असल्याने त्यांना कार्यालयीन आदेश प्र. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे. ४/१० दि. ९ मे, २००२ अन्वये महानगरपालिकेच्या सेवेतुन तात्काळ निलंबीत करणेत आले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१)(ब)नुसार सदर प्रकरण महासभेपुढे ठेवून निलंबन कायम करणे साठी प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ४७ <u>दिनांकः-१६.११.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री.चंदर साधवाणी, महापालिका सेवेतील लिपिक, यांचे कर्तव्यातील निष्काळजीपणामुळे आयुक्तांनी त्यांचे खातेनिहाय

चौकशी प्रलंबित केलेले निलंबन कायम करित नाही. कारण दिनांक ९.७.२००२ या निलंबनाच्या तारखेपासुन ६ महिन्यांच्या मुदतीत असे निलंबन प्रशासनाने महासभेकडुन कायम करून घेतले नाही तर ते निलंबन संपुष्टात येते परंतु सदर कर्मचा-यांच्या विरूध्द खातेनिहाय चौकशी चालु राहील.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

--४७--

विषयः- श्री. भिमासिंग गणपत पाटील, महापालिका सेवेतील मिस्त्री, यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित निलंबन आदेश कायम करणे बाबत.

प्रस्तावनाः-

श्री. भिमासिंग गणपत पाटील, मिस्त्री यांनी महानगरपालिकेतर्फे, श्री. लाल गुलाबराय करनानी, रा. ब्लॉ.नं. ओ. ७१, शंकर शिवमंडळ, १ला माला, उल्हासनगर-१ यांचे विरूध्द नगररचना कायदा १९६६ चे कलम ७२ अन्वये गुन्हा र. जि. नं. २८७/८९ दाखल करण्यात आला असताना सदर प्रकरणामध्ये मा. दिवाणी न्यायालयात महानगरपालिकेची बाजू मांडताना कर्तव्यात कसुर केल्याचे मा. सह. न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग -१, उल्हासनगर यांनी नियमित फौजदारी दावा क्र. २२२७/१९८९ मधील निकालाव्दारे तसेच त्यांचेकडील पत्र क्र. म.जा.क्र. १०१०/२००२ दिनांक ६.८.२००२ अन्वये निदर्शनास आणून दिल्याने श्री. भिमसिंग गणपत पाटील, मिस्त्री यांना कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे.१/४८ दिनांक ९ ऑगस्ट, २००२ अन्वये महानगरपालिका सेवेतुन तात्काळ निलंबीत करणेत आलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७६ (१)(ब)नुसार सदर प्रकरण महासभेपुढे ठेवून निलंबन कायम करणे साठी प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ४८ दिनांकः-१६.११.२००२.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. भिमासिंग गणपत पाटील, महापालिका सेवेतील मिस्त्री, यांचे कर्तव्यातील निष्काळजीपणामुळे आयुक्तांनी त्यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित केलेले निलंबन कायम करित नाही.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

--४६--

<u>विषयः-</u> श्री. प्रकाश म्हात्रे, महापालिका सेवेतील लिपिक, यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित निलंबन आदेश कायम करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

-

श्री. प्रकाश म्हात्रे, लिपिक हे अतिक्रमण विभागात कॅम्प नं. ३ येथे क्षत्रिय अधिकारी निरिक्षक म्हणुन कार्यरत होते. त्यांच्याकडे अनाधिकृत बांधकामाचा शोध घेणे व अनाधिकृत बांधकामाचे अहवाल वरिष्ठ अधिका-यांकडे सादर करून ते निष्कासित करणेचे काम दिलेले होते, तथापि ते कार्यरत असलेल्या कालावधीत त्यांच्या कार्यक्षेत्रात कॅम्प नं. ३ हिराघाट येथे श्री. कांबळे नावाच्या व्यक्तीने अनाधिकृतरित्त्या तळमजला अधिक दोन मजले असे अनाधिकृत बांधकाम मे-जून-२००२ रोजी केलेले होते. वास्तविक पाहता सदरचे बांधकाम हे पुर्णत : अनाधिकृत असल्याने ते प्राथमिक अवस्थेत असताना म्हणजेच पायाचे तळमजल्याचे काम चालु असताना निष्कासित करणे आवश्यक होते. परंतु सदर बांधकामाकडे दुर्लक्ष केल्याने सदर ठिकाणी तळमजला अधिक दोन मजले अशा प्रकारचे बांधकाम पुर्ण झाले या संबंधीत ठिकाणी निष्कासनाची कार्यवाही दि. ६.६.२००२ रोजी करताना दुस-या मजल्यावर एका मजुरास निष्कासन करताना विजेचा झटका बसुन अपघाती मरण आले, यामुळे सदरच्या अनाधिकृत बांधकामासाठी क्षेत्रिय निरिक्षक जवाबदार आहेत. तसेच श्री. प्रकाश म्हात्रे हे कॅम्प नं. ३ मध्ये क्षेत्रिय निरिक्षक

म्हणुन कार्यरत असतांना प्रारंभ प्रमाणपत्र व बांधकाम परवानगी मिळालेल्या एकूण ३४ ठिकाणी असलेल्या इमारतीमध्ये मोठया प्रमाणात अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत एवढया मोठया प्रमाणात झालेल्या अनाधिकृत बांधकामास लिपिक जबाबदार आहेत त्यांनी त्यांच्या कामात दुर्लक्ष व कर्तव्यात कसुर केलेली असल्याने त्यांना कार्यालयीन आदेश प.क्र.उमपा/साप्रवि/टे ४/१२, दि. १४ जुन, २००२ अन्वये महानगरपालिकेच्या सेवेतुन तात्काळ निलंबीत करणेत आलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१)(ब)नुसार सदर प्रकरण महासभेपुढे ठेवून निलंबन कायम करणे साठी प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ४९ <u>दिनांकः-१६.११.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद चौधरी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री,प्रकाश म्हात्रे, महापालिका सेवेतील लिपिक, यांचे कर्तव्यातील निष्काळजीपणामुळे आयुक्तांनी त्यांचे खातेनिहाय चौकशी प्रलंबित केलेले निलंबन कायम करित नाही.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

--४७--

<u>मा. सचिवः-</u>विषयक्र. ८ वाचून दाखवितात.

विषय :-एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र. १ मधील शांतीनगर
येथील राजीव गांधी चौक ते पंचवटी स्टील पर्यंतचा रस्ता एम. एम.आर. डी. ए. कर्जातून प्रस्तावित असलेल्या कामातून वगळण्यास मान्यता देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>मा. महापौरजी, विषय क्र. ८ कडे मी आपले लक्ष वेधु इच्छितो. पहिल्या टप्यातील सर्व कामे पुर्ण झालेली नाहीत. ही जी कामे अर्धवट सोडलेली आहेत किंवा राहिली आहेत. त्यामध्ये कुणाचे व्यक्तीगत हितसंबंध आहेत काय? असे असेल तर याठिकाणी आम्हाला खुलासा करून देण्यात यावा. त्याचबरोबर शांतीनगर ते साईबाबा मंदीर, डॉल्फीन क्लब मधुन शहाड फाटक यास

जोडला जाणारा रस्ता डॉल्फीन क्लबच्या भिंती पर्यंत गोरगरीबांच्या झोपडया तोडुन त्यांचे संसार उघडयावर पाडुन बेदरकारपणे रस्ता तयार केला. परंतु डॉल्फीन क्लबच्या भिंतीजवळ येवून तो रस्ता का थांबला? त्यासाठी कुठला ठराव पारीत केला आहे का? केला नसेल तर त्वरीत तो रस्ता डॉल्फीनचा रस्ता पुर्ण करण्यांत यावा कारण की, या मार्गामुळे शांतीनगर ते शहाड फाटक हे अंतर फारच कमी होणार आहे. त्यामुळे पेट्रोल डिझेलची बचत तर होणारच आहे. व त्याचबरोबर चोपडा कोर्ट समोरील रस्त्त्याची रहदारी, वर्दळ कमी होण्यास मदत होणार आहे. तरी पण हा निर्णय झाल्याशिवाय हा ठराव पास करू नये असे मी माझे मत ठामपणे व्यक्त करीत आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>डिफर तर केला जावा परंतु हा प्रस्ताव कोणी तयार केला. गोषवारा कोणी तयार केला. गोषवारा तयार करणा-यांनी आयुक्तांना चुकीची माहिती दिली. आयुक्त साहेबांनी अशीच सही केली काय? या गोषवा-यामध्ये नावे लिहिली आहेत. श्री. भालेराव यांच्या पंचशिल स्टीलचे नाव लिहिलेले आहे. तर भालेरावांची ती इमारत कायदेशिर आहे का? पाहिजे तर हा विषय पुढे ढकलला जावा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>हा विषय पुढे ढकलला जावा. व सविस्तर चौकशी करून सविस्तर माहिती पुढे आली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>गोषवारा तयार करणा-यास समोर आणले जावे त्यास भालेराव कडुन काही मिळाले आहे का? गरीबांच्या झोपडयांचा उल्लेख नाही. हा विषय पुढे ढकलला जावा परंतु याचा गोषवारा कुणी तयार केला? हे चुकीचे आहे. एक इमारत आपण वाचवत आहात व हजारो झोपडया तोडल्या जात आहेत त्याकडे आपले लक्ष नाही.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>मा. महापौरजी, गरीबांच्या झोपडया तोडुन रस्ता रूंदीकरणाचे काम करण्यांत आलेले आहे. डॉल्फीन हॉटेल आल्यानंतर रस्त्त्याचे काम बंद का करण्यांत आले. याच्यापाठीमागे कुणा अधिका-यांचे हात आहेत का? याचा खुलासा करण्यांत यावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>गोषवा-यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे. भालेराव यांची तळ मजला अधिक तीन माळे आर.सी.सी. इमारत आहे ती कायदेशिर आहे का जिचा यांनी गोषवा-यामध्ये उल्लेख केला आहे? नकाशा मंजुर करून इमारत बांधली आहे. ती तोडणार नाही. काही तरी दयावे लागेल असे काही आहे का? माजी महापौरांनी आपले पुर्ण दुकान रस्ता रूंदीकरणाच्या कामात तोडुन दिले ते शहराच्या विकासासाठी, गोषवारा कुणी तयार केला आहे त्यास समोर आणले पाहिजे. त्यांच्याकडुन काही दिले घेतले आहे का?



<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आपल्या भावनांची कदर केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>आमच्या भावनांची कदर करू नका. आमच्या भावनांची कदर करण्याची गरज नाही. गरीबांच्या झोपडयांचा विचार करण्यांत यावा. मा. महापौरजी मी आपणांस विनंती करतो. जसे श्री सभागृह नेत्त्यांनी म्हंटले की आपल्या भावनांचा आदर केला जाईल. मी म्हणतो की आमच्या भावनांचा विचार न

करता गोरगरीबांच्या ज्या झोपडया तुटल्या त्याचा विचार करा. गरीबांच्या झोपडया तोडुन त्या ठिकाणी रस्ता रूंदीकरण करण्यांत आलेले आहे. व डॉल्फीन हॉटेल आल्यानंतर रस्ता रूंदीकरणाचे काम का थांबविण्यात आले आहे. याचा याठिकाणी खुलासा करण्यांत यावा.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मा. महापौरजी, मा. सदस्य म्हणत आहेत की, श्री. भालेराव यांची इमारत वाचविण्यासाठी तिचा गोषवा-यात उल्लेख करण्यांत आलेला आहे. परंतु असे काही नाही. फक्त इमारतीच्या ठिकाणाचा उल्लेख करण्यांत आलेला आहे. जसे की राजीव गांधी चौक, राजीव गांधी चौक याचा अर्थ असा नाही की राजीव गांधी चौकास वाचवायचे आहे. किंवा भालेरावची इमारत वाचवायची आहे. कारण की तो रस्ता तेथुन जातो म्हणुन ते नाव दिले गेले.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>हे स्पष्टपणे दिसून येते की, भालेराव यांची इमारत वाचविण्यासाठी गोषवा-यामध्ये हे नाव लिहिले आहे. क्रांतीनगर, गोपाळनगर, प्रबोधनगर, करोतिया नगर, या झोपडपटटयांमधील हजारो झोपडया रस्ता रूंदीकरणामध्ये जात आहेत त्यांचा उल्लेख करत नाहीत. या इमारतीसाठी २५ फुट रूंदीचा रस्ता रदद करत आहात. स्पष्टपणे सांगा इमारत वाचवायची आहे म्हणुन. बेकायदेशिर इमारत वाचविण्यासाठी हे करत आहात. गोषवारा कुणी तयार केला आहे?

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>महापौरजी, याठिकाणी एम.एम.आर.डी.ए.कडुन कर्ज घेवून रस्त्त्याचे जे रूंदीकरणाचे काम आहे ते या रस्त्त्याचे काम झाले नाही. तर याठिकाणी शिवसेना, भाजप रस्त्त्यावर उतरून आंदोलन करतील असा मी इशारा देवू इच्छितो.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>मा. महापौरजी, आमचे सन्माननिय सदस्य श्री. मोहन बेहरानी यांनी सांगितले की जसे आम्ही भाटीया चौक म्हणतो किंवा नेहरू चौक म्हणतो तसेच श्री. भालेराव यांच्या इमारतीचे नाव दिले आहे. परंतु गोषवा-यामध्ये असे लिहिले आहे की भालेराव यांची तळमजला अधिक तीन मजले आर.सी.सी बांधकामाचे इमारत अंदाजे २५ इतकी बाधीत होते. याचा अर्थ काय?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>हा याचा अर्थ काय? म्हणुनच मी म्हणतो ना की गोषवारा कुणी तयार केला. त्या माणसास पुढे आणले जावे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापौर महोदया, या विषयाचा हा जो गोषवारा आहे. हा गोषवारा कुणाच्या इशा-यावरून कुणाच्या फायदयासाठी तयार केला आहे. हे सभागृहास कळले पाहिजे.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज यांनी जो मुददा उपस्थित केला आहे की, पंचवटी स्टील फर्निचरचे दुकान असेलेले श्री. भालेराव, हे नाव तर असे येता कामा नये, व नाव आले तरी त्यानी काही फरक पडत नाही. व आपल्याला जे म्हणायचे आहे की त्यांची इमारत वाचविण्यासाठी हे केले जात आहे हे काही बरोबर नाही. परिस्थिती अशी आहे की, आज रोजी जो रस्ता डॉल्फीन क्लब कडुन येतो आणि त्याच्या समोर लगेच तेथे चौक वगैरे काही नाही. त्यामुळे आणि हया ठिकाणी जो रस्ता समाविष्ट केलेला आहे रस्ता रूंदीकरणासाठी तर त्याच्याजवळ सुमारे ५०० ते ६०० फुटावर लिंक रोड उपलब्ध

आहे. आणि त्याच्यामुळे या रस्त्याचे काम महापालिकेवर मोठ्या प्रमाणावर जे कर्ज आहे हे कर्ज घेवून कुठलाही उददेश साध्य होणार नाही. ही वस्तुस्थिती आहे. त्यामध्ये भालेराव यांची इमारत वाचविण्याचा कुठलाही उददेश नाही. हे नाव जे आलेले आहे ते चुकीचे आहे. त्या ठिकाणाचा बोध होण्यासाठी ते नाव लिहिलेले आहे. जसे श्री. बेहरानी साहेबांनी सांगितले तसा कुठलाही त्यामध्ये उददेश नाही. त्यामध्ये दिलेली वस्तुस्थिती आपल्या समोर ठेवलेली आहे आपण त्यावर निर्णय घ्यायचा आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंदसिंह भुल्लरः-</u>सन्माननिय आयुक्त साहेब, क्रांतीनगर, गौतम नगर, प्रबुध्द नगर, करोतिया नगर येथील हजारो झोपडे गेले आहेत. ज्यास लिंक रोड म्हंटले जाते. तर तेथील का नाही रदद होत? तेथे झोपडपट्टीवाले आहेत ते काही देणार नाहीत. यासाठी तेथील रोड रदद होत नाहीत. तयार केलेल्या रस्त्यास तो रस्ता लिंक आहे. रदद करावयाचा झाल्यास पुर्ण रदद करा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>श्री. भुल्लर महाराजजी आपल्या ज्या भावना होत्त्या व जे श्री. गायकवाड यांनी म्हंटले. ही गोष्ट लक्षात घेवून तसेच काही कालावधी पुर्वी आपणांसमोर कब्रस्थानचाही एक मुददा आला होता. त्यावेळी एका पक्षाचे नाव लिहिले होते. म्हणुन खडाजंगी चर्चा झाली होती. त्याच पध्दतीने श्री. भालेराव यांचे नाव लिहीलेले आहेव श्री. गायकवाड साहेबांनी सांगितले की पुढे झोपडपट्टी आहे. ही गोष्ट लक्षात घेवून, मी म्हंटले की मी सुध्दा अभ्यास केलेला नाही. व आपल्या ज्या भावना आहेत. हे लक्षात घेवून मी म्हंटले की त्या गोष्टींचा समावेश करण्यासाठी दुस-या वेळेस हा मुददा आणला जावा. महाराजजी मलाही समजले नाही म्हणुन मी म्हंटले की हा विषय पुढे ढकलला जावा. भालेराव यांचे नाव कमी करून श्री. भुल्लर महाराज व गायकवाड यांनी व्यक्त केलेल्या भावनांचा विचार करून नव्याने गोषवारा तयार करून सभेपुढे आणला जावा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>झोपडे तोडुन रस्त्याचे रूंदीकरण केले गेले. डॉल्फीन हॉटेल आल्यानंतर ते काम का बंद केले, डॉल्फीन हॉटेलच्या पुढे रस्ता का नेला नाही? जर तो रस्ता रदद होत असेल तर ते तोडलेले झोपडे पुन्हा बांधले पाहिजेत. ज्यांच्या झोपडया तोडल्या, डॉल्फीन हॉटेल आल्यानंतर जे काम थांबविले ते काम चालु करून शहाड फाटक पर्यंत नेले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>मा. महापौरजी, आताच आयुक्त साहेबांनी जे स्पष्टीकरण केले ते स्पष्टीकरण बेहरानी यांच्याशी मिळते जुळते आहे. आयुक्त साहेबांनी जे स्पष्टीकरण केले त्यांनी सांगितले की ते फक्त संदर्भ दाखविण्यासाठी नाव लिहिलेले आहे. परंतु याठिकाणी म्हंटले आहे की २५ फुट इमारत बाधीत होत आहे. त्याचे काय? नगरपालिकेसमोर म्हंटले असते तर आपण समजु शकलो असतो. भालेराव यांच्या इमारतीसमोर म्हंटले असते तर आपण समजु शकलो असतो. पण ती इमारत बाधीत होते. याचा अर्थ असा होत नाही. त्यामुळे हा गोषवारा बनवतानाच चुकीचे झाले आहे. चुक अधिका-यांनी कबुल करावी.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापौर महोदया, प्रश्न हा ही उपस्थित होतो की, आय.आर.डी.पी. चा जो प्रोजेक्ट आहे तो १९९९ चा आहे. आज २००२मध्ये या गोष्टीला तीन वर्ष पुर्ण झाली आहेत. जेव्हा आय.आर.डी.पी.चा प्रोजेक्ट तयार केला त्यावेळी यामध्ये किती घरे निष्कासित होतील त्यांचे पुर्नवसन या सर्व गोष्टींकडे लक्ष दिले होते. आज तीन वर्षानंतर अचानक साठ घरांचे पुर्नवसन करण्यास जागा नाही.

असे कारण देवून एखादया रस्त्याचे काम थांबविणे स्थगित करणे व असा रस्ता की जो बी.एम.आर.डी.ओे.च्या प्रोजेक्टमध्ये आहे. आपण आपल्या आर्थीक हिंमतीवर एखादा नविन प्रोजेक्ट सुरू करण्याच्या स्थितीत नाहीत. व अशास्थितीत बी.एम.आर. डी.ए.च्या प्रोजेक्ट मधील कर्जातील प्रोजेक्ट आपणाकडे आहे. व फक्त साठ घरांच्या पुर्नवसनासाठी जागा नाही हे कुठपर्यंत योग्य आहे हे कारण पुढे करून काय आपण



शहरामध्ये यापुढे कोणताही प्रोजेक्ट घेणार नाही आहोत काय? तर यासर्व गोष्टींचा खुलासा आयूक्त साहेबांनी केला पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे.

<u>मा. सदस्य श्री.किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, विषय पुढे ढकलण्यास ऐवढा वेळ लागत आहे तर पारीत करण्यास किती वेळ लागेल? जर आम्ही स्वतः म्हणत आहोत की हा विषय पुढे ढकला मग उशिर का होत आहे. आपल्या ज्या भावना आहेत त्या विचारात घेवून पुढच्या वेळी गोषवारा येईल ना?

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजून येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर / श्री. दिलीप गायकवाडः-</u>हा प्रस्ताव अदयाप पुढे ढकलला नाही. सभागृह नेत्त्यांचा यामध्ये काहीतरी स्वार्थ आहे. हे हा विषय का पुढे ढकलायच्या मागे लागले आहेत हे आम्हाला समजत नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>जर माझा व्यक्तीगत स्वार्थ असता तर मी हा विषय पारीत केला असता पुढे ढकलला नसता.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>रोड तयार होवू दया. गरीबांच्या झोपडया तुटल्या आहेत. हॉटेल डॉलफिन पर्यंत येवूनच त्याठिकाणी रस्त्त्याचे काम का थांबले? त्याच्या पुढे रस्ता का नाही जात? डॉल्फीनच्या पुढे रस्ता जावू दया. डॉल्फीनच्या पुढे प्रस्ताव तयार करण्यास तुम्ही परवानगी दया.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजून येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>सभागृह नेत्त्यांवर असे आरोप लावणे योग्य नाही.
<u>मा. महापौरः-</u>चार-चार, पाच-पाच सदस्य एकाच वेळी असे बोलु लागले तर कोण काय बोलत आहे हे कसे कळणार?

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड/ श्री. राज असरोंडकरः-</u>आमची एकच विनंती आहे की तेथे रस्ता तयार झाला पाहिजे.

<u>मा.महापौरः-</u>एकेक सदस्य बोलेल तर बरे होईल.

<u>मा. महापौरः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढे ढकलण्यांत येत आहे.

विषय :-एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र. १ मधील शांतीनगर
येथील राजीव गांधी चौक ते पंचवटी स्टील पर्यंतचा रस्ता एम. एम.आर. डी. ए. कर्जातून प्रस्तावित असलेल्या कामातून

वगळण्यास मान्यता देणे बाबत.

<u>मा. सचिव:-</u>मा. आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये तीन प्रस्ताव चर्चेस आणले आहेत. आपल्या सर्वांची संमती असेल तर ते प्रस्ताव चर्चेस घेता येतील. त्यातील पहिला प्रस्ताव आहे.

<u>विषय:-</u> दलीत वस्ती सुधारणा योजना वर्ष २००२-२००३ करिता सार्वजनिक बांधकाम खात्त्यामध्ये तयार करण्यात आलेल्या कामांना शासनाकडे पाठविणेपूर्वी महासभेची मान्यता मिळणेबाबत.

--५१--

<u>मा. सदस्य श्री.बच्चाराम रूपचंदानी:-</u>हा प्रस्ताव पारीत करण्यास आमची काही हरकत नाही. परंतु एक गोष्ट मी सांगु इच्छितो की चार ते तीन महिन्यापुर्वी याच प्रकारचा एक प्रस्ताव दलीत वस्ती बाबतचा मागील वर्षाचा प्रस्ताव पारीत केला आहे. त्याचा काही पाठपुरावा केलेला नाही. मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की त्यांनी सांगावे की तीन महिन्यापुर्वी आम्ही ज्या कामास मंजुरी दिली त्यांची स्थिती काय आहे?

<u>मा.आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>महापौर महोदया, तीन महिन्यापुर्वी दलित वस्ती बाबतचा जो प्रस्ताव मा. महासभेने पारीत केला आहे तो अदयाप पर्यंत मा. जिल्हाधिकारी साहेबांकडे प्रलंबित आहे. जेव्हा मी दोन वेळा जिल्हाधिकारी साहेबांकडे सभेसाठी गेलो होतो त्याचवेळी जिल्हाधिकारी साहेबांना मी त्याचे स्मरण करून दिले होते. पुढील आठवडयात आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयातील निवासी जिल्हाधिकारी यांचेकडे जावू व या प्रस्तावाचा पाठपुरावा करू.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>मा.महापौरजी, दलित वस्तीमधील हा जो दीड कोटी खर्चाचा हा जो प्रस्ताव आपण शासनाकडे पाठवित आहोत. परंतु शासनाकडून जर अपुरा निधी प्राप्त झाला तर या प्रस्तावासोबत कामांची जी यादी जोडलेली आहे. त्या यादीनुसार सर्वांच्या प्रभागातील कामे कमी जास्त करून सर्वांच्या प्रभागात कामे झाली पाहिजेत.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u>मा. महापौरजी, हा प्रस्ताव पारीत होत आहे परंतु त्या अगोदर मी आपणांस एका गोष्टीची माहिती देवू इच्छितो की, या प्रकरणी नगररचनाकार यांचा अभिप्राय घेण्यांत आलेला आहे. त्यात त्यांनी असे लिहिले आहे जमिनीचे सपाटीकरण, नालीचे काम करण्यास हरकत नाही. इमारतीचे बांधकाम करण्यास अनुज्ञेय नाही. म्हणजेच इमारतीचे बांधकाम आपण करू शकत नाही. परंतु तो जो प्रस्ताव आहे तो १० बैठकीच्या सार्वजनिक शौचालयाचा आहे. तर शौचालय इमारत नसते का? याचे नगररचनाकार साहेबांनी उत्त्तर दयावे की शौचालय इमारत होत नाही का?

<u>श्री. सुर्यकांत शिंदे(नगररचनाकार):-</u>नेमके ते कोणते आरक्षण आहे. त्या आरक्षणावर अवलंबुन आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-ही जागा विकास आराखडयानुसार रहिवासी विभाग व प्रारूप विकास आराखडयानुसार आरक्षण क्र. ३७ वैद्यकीय सेवे मध्ये आहे.

श्री. सुर्यकांत शिंदे(नगररचनाकार):-वैद्यकीय सेवेमध्ये इमारत बांधणे अनुज्ञेय राहिल.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-तेथे १० सिटचे शौचालय तयार करायचे आहे. चालेल का बनवले तर?

श्री. सुर्यकांत शिंदे(नगररचनाकार):-वैद्यकीय सेवेसाठी सार्वजनिक शौचालयाची आवश्यकता आहे. सार्वजनिक शौचालय बांधल्यानंतर वैद्यकीय सेवा देता येतील. म्हणुन तेथे दवाखाना बांधणे आवश्यक आहे त्यानंतर शौचालये बांधणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-ज्याठिकाणी अगोदरच शौचालये बांधण्यांत आलेली आहेत त्याठिकाणी पुन्हा शौचालय बांधु शकतो का?

श्री. सुर्यकांत शिंदे(नगररचनाकार):-त्याठिकाणी जनतेसाठी सार्वजनिक शौचालये बांधणे आता अनुज्ञेय नाही.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-त्याठिकाणी शौचालय बांधता येईल काय?



श्री. सुर्यकांत शिंदे(नगररचनाकार):-नाही. शौचालय बांधता येणार नाही.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-तुम्ही सर्व्हे करून हे लिहिले आहे काय? की कार्यालयात बसुन लिहीले आहे.

श्री. सुर्यकांत शिंदे(नगररचनाकार):-स्वतः सर्व्हे केलेला आहे. म्हणुन बघुनच लिहिलेले असेल.
मा. सचिवः-मंजुर?

मा. महापौरः-आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेल्या तीन प्रस्तावापैकी पहिला प्रस्ताव आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असुन तो सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

आयत्त्यावेळचा विषयः-

विषयः- दलीत वस्ती सुधारणा योजना वर्ष २००२-२००३ करिता सार्वजनिक बांधकाम खात्त्यामध्ये तयार करण्यात आलेल्या कामांना शासनाकडे पाठविणेपूर्वी महासभेची मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावनाः-

दलीत वस्ती सुधारणा योजना वर्ष २००२-२००३ करिता उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे सार्वजनिक बांधकाम खात्त्यामध्ये कामांचे प्रस्ताव तयार आलेले आहेत. शासन निर्णय क्र. विद्ययो/१०९७/१६७३/प्रक्र४४/९७ नवि. ४ दिनांक ५.२. १९९८ व त्यानंतर आलेल्या सुधारित शासन निर्णय क्र. विद्ययो/१०२०००/१५९२ प्र. क्र१८९/नवि-४/दिनांक ५.३.२००२ मधील मार्गदर्शक तत्त्वानुसार ज्या वत्त्यांमध्ये दलितांची अनुसूचित जाती व नव बौध्द दलितांची लोकसंख्या ५० टक्के पेक्षा अधिक

आहे. तसेच महानगरपालिकेमध्ये जे प्रभाग अनुसूचित जातीच्या उमेदवारांकरिता राखीव आहेत. त्या प्रभागामध्ये सदर योजनेमधुन कामे हाती घेण्याकरिता सूचना आहेत. दिनांक ५.३.२००२ च्या शासननिर्णयानुसार महानगरपालिकेच्या नगररचनाकार यांच्याकडून प्रस्तावित कामांच्या नकाशांना मान्यता मिळाल्यानंतर महासभेची मान्यता घेऊन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे मंजुरी व निधी उपलब्ध करणेकरिता सादर करणे आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम खात्त्याने १९९८ मध्ये तयार करण्यात आलेल्या दलीत १७ वस्त्त्यांच्या यादीमधील वस्त्त्यांकरिता व अनुसूचित जातीचे प्रभाग क्र. १,५,६,८,९,१४,१५,१८,१९ साठी संबंधित नगरसेवकांनी सुचविलेली कामे एक समान धोरणाने प्रत्त्येक प्रभागाकरिता कमीत कमी १० लक्ष खर्चापर्यंत होतील. अशा पध्दतीने एकंदर ३१ कामांचे रू. १,५१,११,३८२/- खर्चाचे प्रस्ताव तयार केलेली आहेत. त्यानंतर प्रभाग क्र. १३ नगरसेवक श्री. बच्चो रूपचंदानी व श्री. गोविंदराम लुंड यांनी त्त्यांच्या प्रभागातील पटेल नगर, महात्त्मा फुलेनगर, ज्योतीबा फुलेनगर या वस्त्त्यांमध्ये अनूसूचित जातीची लोकसंख्या आहे असे महानगरपालिकेस कळविल्यानंतर उप-आयुक्त (ग.व.सु)व नगररचनाकार यांनी याबाबत शिफारस केल्यानंतर या वस्त्त्यांमध्ये नगरसेवकांनी सुचविलेल्या ६ कामांचे रू. ८,७७,०००/- प्रस्ताव तयार करण्यात आलेले आहेत. अशा प्रकारे ३१ + ६ त्र ३७ कामांचे एकंदर रू.१५१११३८२/- + ८,७७,००० त्र १५९८८३८२/- खर्चाचे प्रस्ताव शासनाकडे मंजुरीकरिता व निधी उपलब्धते करिता पाठविणे करिता तयार केलेले आहेत. या प्रस्तावांच्या नकाशांना शासन निर्णय क्र. विद्ययो/ १०२०००/१५९२ /प्र.क्र. १/८९/नवि-४/ दिनांक ५.३.२००२ मधील मार्गदर्शक तत्त्वानुसार मा. नगररचनाकार यांनी मंजुरी दिलेली आहे व कामे हाती घेण्यात हरकत नाही. असे कळविले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वर्ष २०००-२००१ च्या दरसूचीवर आधारित त्यापमाणे प्रत्त्येक कामाचे स्वतंत्र सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्यास तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. या



कामाची यादी तयार करण्यांत आली असून शासन निर्णयामधील मार्गदर्शक तत्त्वानुसार या योजनेतील प्रस्तावित एकूण ३७ कामांचे एकूण रू.१,५९,८८,३८२/- एवढया रक्कमेचे प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे मंजुरी करिता व निधी उपलब्ध होणेकरिता पाठविणेपुर्वी महासभेची मान्यता मिळणेकरिता प्रस्तावित आहे.

<u>सर्वसाधारण महासभा ठराव क्र.</u> ५० <u>दिनांक:-१६.११.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंदसिंह भुल्लर.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार सन २००२ -२००३ करिता दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सोबत जोडलेल्या परीशिष्टात विनिर्दिष्ट केलेल्या ३७ कामांची एकंदर रक्कम रू. १ ,५९ ,८८ ,३८२/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे. आणि त्या प्रयोजनार्थ निधी उपलब्ध होणे करिता मा. जिल्हाधिकारी ठाणे / शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेस समंती देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

--५४--

<u>मा. सचिवः-</u>मा. आयुक्तांनी आयत्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेला दुसरा प्रस्ताव आहे.

विषय :-सन्मानानिय सदस्य श्री. अनिल जयसिंघानी यांना गैरहजर राहण्यास परवानगी दयायची आहे.

<u>मा.सचिवः-</u>सन्मानानिय सदस्य श्री. अनिल जयसिंघानी यांनी पाच महिन्यापर्यंत महासभेत गैरहजर राहण्याबाबत परवानगी मागीतली आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>कारण काय दाखविले आहे?

<u>मा. सचिवः-</u>कारण आहे आजारामुळे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>कोणते डॉक्टर आहेत?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>वर्तमानपत्रामध्ये असे छापुन येते की, ते फरार आहेत. पोलिसांनी त्यास फरार असल्याचे घोषित केले आहे. वर्तमानपत्राचे कात्रण आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-ते आजारी आहेत म्हणुन त्यांची रजा मंजुर झाली पाहिजे. या अगोदर एक-दोन सदस्यांची रजा मंजुर केलेली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-दुसरे काही कारण असेल व आपण रजा मंजुर करत असू तर आपण सुध्दा अडचणीत येवू शकू.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-कुणी आजारी आहे. महासभेत येवू शकत नाही. म्हणुन अशा सदस्याबाबत चांगली भावना ठेवून रजा मंजुर केली पाहिजे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-आजारी आहे का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आजारी असल्याबाबतचा दाखला सोबत जोडलेला आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-हे पहा वर्तमानपत्रामध्ये हे छापुन आलेले आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-वर्तमानपत्राचे संदर्भ महासभेत आणु नका.

४मा. सदस्य श्री. शांताराम निकमः- मा. महापौरजी, अनिल जयसिंगानी यांच्या बाबत जो मुददा येथे आलेला आहे, त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, १३.३.२००० ला सुचना दिली आहे. १३.३.२००० हे लिहिलेले चुकीचे आहे का? १३.३.२००० आहे की, १३.९.२००० आहे?

मा. सचिव :- कोणत्त्या पानावर आहे?

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः- विषय क्र. १० चा जो गोषवारा दिला आहे.

मा. सचिवः- चुक आहे, चुक आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः- तर दुरुस्ती करा.

मा. सचिवः- डॉ. आर.ए.सिंग यांचा वैद्यकिय दाखला जोडला आहे. ठिक आहे, मंजुर?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः- सचिव साहेब, उल्हासनगर पोलिस स्टेशनमध्ये काही दिवसापूर्वी एक सी.आर. दाखल झाला होता. ज्यामध्ये तीन या चार आरोपींची नावे होती. त्यामध्ये श्री. अनिल जयसिंघानी यांचे सुध्दा नाव होते. ब-याचशा वर्तमानपत्रामध्ये बातम्या छापुन आल्या होत्या. तर काय तो अनिल जयसिंघानी दुसरा आहे की आमचे जे नगरसेवक आहेत तेच आहेत का?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-काय याचा संबंध आहे काय?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-आपण सन्मानिय सदस्यांच्यावर चिखलफेक करत आहात.

यावेळी काही सन्मानिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजून येत नव्हते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-महापौरजी, जेव्हा मी बोलत आहे तर माझे बोलणे चालु असताना मध्येच दुस-या सदस्यांनी बोलु नये. माझे बोलणे पुर्ण झाल्यानंतर त्यांनी बोलावे. ज्या डॉक्टरांने हे प्रमाणपत्र दिले आहे. डॉक्टरची डिग्री काय आहे? येथे लिहिले आहे ऑबिस्टेशियन गायनोलॉजिस्ट हा जो डॉक्टर आहे तो महिलांचा डॉक्टर आहे, महिलांची प्रसुती वगैरे करतो. तो डॉक्टर हायपर टेंन्शन व इतर अनेक आजार असल्याचे प्रमाणपत्र श्री. अनिल जयसिंघानी यांना त्यांनी दिले आहे. उल्हासनगरमध्ये बरेचसे एम.डी.डॉक्टर आहेत.

सत्ताधारी पक्षाचे काही सदस्य :- पास. पास म्हणुन घोषणा देत होते.



मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः'-हे पहा महासभेत जेव्हा विषय येतो तेव्हा त्यावर चर्चा झाली पाहिजे.

मा. सदस्य श्री.विनोद तलरेजाः'-काहीही जरूरत नाही. सन्मानिय सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी व इतर सदस्य महासभेचा वेळ वाया घालवत आहेत.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजून येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः'-</u>हे पहा महीलांचा स्पेशालिस्ट डॉक्टर हायपर टेंन्शन व एंजिना सारख्या आजारांचे प्रमाणपत्र देतो.जो पेशंट नगरसेवक आहे तो हायपर टेंन्शनने त्रस्त आहे. व यामुळे तो महासभेत येवू शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>सभागृहाबाहेरील गोष्टी आपण करू लागलात तर आपल्या बाबत सुध्दा कुणीतरी बोलेल. आपणांस जी काही चौकशी करायची असेल ती आपण डॉक्टरकडे करा. पोलिसांकडे चौकशी करा.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजून येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापौर महोदया विरोधी पक्षांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. आपण आवाज चढवुन विरोधी पक्षांचा आवाज दाबुन ठेवण्याचा प्रयत्न करत आहात.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजून येत नव्हते. तर सत्ताधारी पक्षाचे काही सदस्य पास पास म्हणुन सूचना देत होते.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>आपणांस जी काही चौकशी करायची असेल ती आपण डॉक्टरांकडे व पोलिसांकडे करा आपणांस कोणी मनाई करत नाही.

<u>मा. सचिवः-</u>या प्रस्तावाबाबत मतदान घेण्या बाबत आपण काय म्हणत आहात.

<u>मा. सदस्य श्री.रमेश चव्हाणः-</u>विरोधी पक्षीय सदस्यांच्या भावना ऐकुन घ्या.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>एका अपराधीचा प्रमाणपत्राच्याआधारे बचाव करणे चुकीचे आहे. कृपया मतदान जरी होत असेल तरी सर्वांनी आपल्या सदसदविवेक बुध्दीला स्मरून मतदान करावे. एका अपराध्याचे वैद्यकीय दाखल्याच्या आधारावर बचाव करणे हे चुकीचे आहे.सर्वांसाठी चुकीचे आहे. ही सर्वांसाठी शरमेची गोष्ट आहे. नगरसेवक असो की कुणीही असो.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>एका नगरसेवकावर असे शिंतोडे उडविणे ही सुध्दा शरमेची गोष्ट आहे व ते ही त्याच्या अनुपस्थितीत.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>तो मुख्यमंत्री असो की नगरसेवक गुन्हेगार तो गुन्हेगार असतो.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजून येत नव्हते.

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-जो पर्यंत त्यांच्यावर गुन्हा सिध्द होत नाही तोपर्यंत त्यांना गुन्हेगार म्हणु शकत नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-हा माणुस पोलिसांपासुन लपत फिरत आहे हे सर्वांना माहित आहे. त्यांना प्रमाणपत्र दिले जात आहे. मला वाटते त्या डॉक्टरवर पहिले चौकशी बसाविली पाहिजे. महासभेमध्ये......

मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-करा ना चौकशी आपण कोर्टात जा, कचेरीत जा, पोलिसांकडे जा, डॉक्टरकडे जा जी पाहिजे ती चौकशी करा आपणास मनाई थोडीच आहे. आपण येथे वेळ का वाया घालवत आहात. श्री. जमनु पुरस्वानीजी आपण टाऊन हॉलच्या ठेक्यामध्ये भागीदार आहात. किती इमारतीमध्ये, किती कॅटरींगचे कामात आहात?या गोष्टी बोलण्याचा येथे काय उपयोग. जी व्यक्ती येथे उपस्थित नाही कृपा करून तीच्या विरूध्द बोलु नये.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात नेमके कोण काय बोलत आहे हे समजून येत नव्हते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-आम्ही नाही बोलत, इंडीयन एक्सप्रेस, नवभारत या वर्तमानपत्राचे कात्रण आहेत. प्रेसला जर आपण मानत असाल तर या वर्तमानपत्रांची कात्रणे बोलत आहेत. आम्ही नाही बोलत.

मा. उपमहापौरः-महापौरजी आपणांस काय बोलत आहेत? दोन मिनिटे आपण ऐकुन घेवू शकत नाहीत?

मा. सदस्या श्रीमती. नीना नाथानीः-मा. महापौरजी, एक मिनिट, मला त्यांच्या बाबत काही बोलायचे आहे. ते जे बोलतआहेत की डॉक्टरचे प्रमाणपत्र चुकीचे आहे. त्यांचे हे बोलणे चुकीचे आहे. खरेतर डॉक्टरच्या प्रमाणपत्रासाठी एम.बी.बी.एस.ची डीग्रीसुध्दा पुरशी असते. ते जे डॉक्टर गायनॉलॉजिस्ट ज्यांनी त्यांना हे प्रमाणपत्र दिले आहे. त्याशिवायही त्यांच्यावर जे आरोप लावले जात आहेत. ते आमच्या वैद्यकीय व्यवसायावर आरोप आहेत. व हे पुर्णपणे चुकीचे आहे. आपण बाहेर चौकशी करा त्यानंतर येथे बोला.

मा. सचिवः-पास? मतदान घ्यायचे?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-यापुढे आपल्या कुणा सदस्याचे असे प्रकरण मंजुरीस आले तर आम्ही त्यावेळी आपणांस सहकार्य करणार नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-जर आपण दम देत असाल की आम्ही आपले प्रस्ताव पास करणार नाहीत. आपण असे करत असाल तर आम्ही त्याचा विरोध करतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आज श्री. बच्चाराम रूपचंदानी उपस्थित आहेत. आज आमची भाभी श्रीमती. भगवंती रूपचंदानी किडनीच्या आजाराने आजारी होती. तर भावनापुर्वक सर्वांनी त्यांच्या रजेचा प्रस्ताव पारीत केला. आज देव न करो कुणी सदस्य आजारी पडु नये. म्हणुन कृपा करून सभागृहास माझी विनंती आहे की सर्व संमतीने हा प्रस्ताव पारीत केला जावा.

मा. सचिवः-मंजुर समजायचा, सर्व संमतीने?

मा. सदस्य श्री. लालबिहारी यादवः-महापौरजी, ते जर आजारी असतील तर आम्ही सर्वांनी जावून त्यांची भेट घेवून आले पाहिजे.

- '-५७--

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-भेटून या आपणच?

मा. महापौरः-आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेल्या दुसरा प्रस्ताव आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असुन तो सर्वांनुमते समंत करण्यांत येत आहे.

आयत्त्यावेळचा विषयः-

श्री. अनिल भगवानदास जयसिंघानी सन्माननिय महापालिका सदस्य हे माहे, सप्टेंबर व ऑक्टोबर २००२ च्या सभेमध्ये लागोपाठ २ महिन्याच्या अवधीत स्वतः गैरहजर राहिले. त्यांनी आपले पत्र व त्यासोबत जोडलेल्या वैद्यकीय दाखल्याव्दारे मा. महापौर मा. आयुक्त, यांना नोव्हेंबर, २००२ च्या महासभेत आपण तात्त्पुरत्त्या आजारामुळे गैरहजर राहणार असल्याची त्यांनी दि.१३.३.२००२ रोजी सूचना दिलेली आहे आणि पूढील ३ महिन्यापर्यंत गैरहजर राहण्याची शक्यता दर्शाविली आहे.

सदर सन्माननिय सदस्याचे गैरहजेरीचा प्रस्ताव महासभेच्या कार्यसूचीवर नसुन तो सभेच्या मतानुसार आयत्त्यावेळीचा विषय म्हणुन समाविष्ट करणे आवश्यक आहे. नाही तर त्यांच्याविरूध्द मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ११ अन्वये अर्नहतेच्या कार्यवाहीचे अवलंबन करण्यांत येईल.

करिता सन्माननिय सदस्यास माहे नोव्हेंबर २००२ चे सभेस गैरहजर राहण्यास व पूढील काही सभांना गैरहजर राहण्यास मान्यता मिळावी असे प्रस्तावित आहे.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ५१ दिनांकः-१६.११.२००२.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महापालिका सदस्य श्री. अनिल जयसिंघानी यांना तात्त्पुरत्त्या आजारामुळे सप्टेंबर २००२ ते जानेवारी २००३ पर्यंत सलग सभांना गैरहजर राहण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने

महापौर पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः- मा. सचिवः-मा. आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेला तिसरा प्रस्ताव आहे.

विषयः-महापालिका यात्री निवास, उल्हासनगर. २ हया उद्यानाची वेळ ठरविणे बाबत.

खेमाणी येथे जे उद्यान आहे ते चालु कधी ठेवावे व बंद कधी ठेवावे याबाबतची वेळ ठरविण्याबाबतचा प्रस्ताव आहे. मंजुर?

--५८--

मा. महापौरः-आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेला तिसरा प्रस्ताव आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असुन तो सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

आयत्त्यावेळचा विषय :-

विषयः-महापालिका यात्री निवास, उल्हासनगर. २ हया उद्यानाची वेळ ठरविणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकाचे यात्री निवास, उल्हासनगर-२ येथे लहानसे उद्यान आहे. सदर उद्यानाची उघडण्याची व बंद करण्याची वेळ निश्चित केलेली नाही.

यात्री निवास येथील उद्यानात फिरावयास येणा-या नागरिकांना वेळ ठरविणे, उद्यानात जेष्ठ नागरिक, लहान मुले व महिला यांना प्रवेश राहील, उद्यानाची वेळ सकाळी ७ ते ९ व सायंकाळी ५ ते १० वाजेपर्यंत राहील, सदरच्या उद्यानात लहानमुलांना, महिलांना तसेच जेष्ठ नागरिकांना प्रवेश राहील असा फलक लावणे आवश्यक आहे. जेणे करून परिसरातील नागरीकांना उद्यानाची उघडण्याची व बंद करण्याची वेळ माहित होईल. उद्यानाच्या उघडण्या, बंद करण्याच्या तसेच प्रवेशा बाबतच्या वेळास व फलक लावण्यास मंजूरीसाठी माननीय महासभे समोर सादर.

सर्वसाधारण महासभा ठराव क्र. ५२ दिनांकः-१६.११.२००२.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :-श्री. नारायण पंजाबी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका निहित ''यात्री निवास'' उल्हासनगर-२ या उद्यानात फिरावयास येणा-या नागरिकांसाठी प्रवेशाची वेळ सकाळी ७ ते ९ व संध्याकाळी ५ ते १० वाजेपर्यंत निश्चित करीत आहे. आणि त्या प्रयोजनार्थ प्रशासनास फलक लावणेस निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ७. २५ वाजता या सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर श्रीमती. मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-२०/१२/२००२

इतिवृत्त

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/१२/२००२ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दि. २०. १२.२००२ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर, श्रीमती.मालती करोतिया हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. व खालील दर्शाविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्त्या.

१) मा.महापौर :- श्रीमती. मालती करोतिया.

२)मा. उपमहापौरः- श्रीमती. जया साधवानी.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ४२. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ४३ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ४४. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४५. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ७. | श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर | ४६. | श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४७. | श्री. दर्शनसिंह खेमाणी |
| ९. | श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास | ४८. | श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्रीमती. सीमा चंदाराम मोकल | ४९. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ५०. | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ५१. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १३. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ५२ | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १४. | श्रीमती. पाल अधारी राजाराम | ५३. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १५. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ५४. | श्रीमती. वसीटा बेबी तुलसीदास |
| १६. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १७. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १८. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५७. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १९. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५८. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २०. | श्रीमती. ब्रामणकर नंदिनी गजानन | ५९. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २१. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ६०. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २२. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ६१. | श्री.साधवानी मनोज लालचंद |
| २३. | श्रीमती.गुप्ता आशा प्रभुनाथ | ६२. | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| २४. | श्री. नाना आनंदा पवार | ६३. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २५. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ६४. | श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण |
| २६. | श्री. रूपानी चिमन अमरूमल | ६५. | श्रीमती. किरण लखी माखीजा |

| | | | |
|---|---|---|---|
| २७. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६६. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २८. | श्री. शांताराम ओंकार निकम | ६७. | श्री. नरेंद्रकुमार केवलराम ठाकुर |
| २९. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६८. | श्री. विनोद चंदीराम तलरेजा |
| ३०. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६९. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३१. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ७०. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ३२. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ७१. | श्रीमती. इंदु भठिजा |
| ३३. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ७२ | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३४. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ७३. | श्री. बहरानी मोहन वर्यलदास |
| ३५. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७४. | श्रीमती. मीनू राजकुमार दासानी |
| ३६. | श्री. मोहन साधवानी | ७५ | श्री. बेहरानी ठाकुरदास वरीयलदास |
| ३७. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास | ७६. | श्री. इदनानी राजू चंद्रभान |
| ३८. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७७. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३९. | श्रीमती. भावना रवी खिलनानी | ७८. | श्री. माखिजा हरदास सन्मुखदास |
| ४०. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ७९. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ४१. | श्री.राजेश उर्फ राज असरोंडकर | ८०. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |

तर
मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी हे अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४.४५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सदस्या श्रीमती. इंदु भठिजा हया सभागृहातुन बाहेर पडल्या.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u>मा. महापौर, एक अभिनंदन प्रस्ताव आणायचा आहे. आताच शिक्षण मंडळातील सदस्यांना मान्यता मिळाली आहे. व तिथे समिती स्थापन केली आहे. श्री. मुरली रोहडा यांना तेथिल सभापती व आर.पी.आयचे नेता शहर प्रमुख श्री. महादेव सोनावणे यांना उपाध्यक्ष केले आहे. त्या समितीवर असणारे सर्व सदस्य चांगले काम करणारे आहेत. त्यांना अभिनंदन करण्यासाठी म्हणुन हा प्रस्ताव आणत आहे.

<u>अभिनंदन प्रस्ताव :-</u>

सन २००२ मधील सार्वत्रिक निवडणुकीनंतर शिक्षण मंडळावर निवडून आलेल्या व शासन नियुक्त सदस्यांपैकी मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील नियम १२ मधील तरतुदीप्रमाणे सभापती व उपसभापती पदी नेमणुक करण्यासाठी दि. ३०.११.२००२ रोजी मतदान घेण्यात आले त्यात श्री. मुरली रोहडा यांना तेथील सभापती व आर. पी. आयचे नेता शहर प्रमुख श्री. महादेव सोनावणे यांची सभापती म्हणुन आणि इतर सदस्यांची शिक्षण मंडळावर नेमणुक झाल्याने त्यांचे अभिनंदन करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र.</u> ५४ ब <u>दिनांक:-२०.१२.२००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. शांताराम निकम

अनुमोदकाचे नाव :- श्री. नाना पवार

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शिक्षण मंडळावर निवडुन आलेले मा. सभापती श्री. मुरली रेहडा व मा. उपसभापती श्री. महादेव सोनावणे आणि इतर सदस्य यांचे अभिनंदन करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आमचे मा. नगरसेवक श्री. पृथ्वी वलेचा यांचे बंधु श्री. परसराम वलेचा यांचे नुकतेच निधन झाले आहे. त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी म्हणुन मी शोक प्रस्ताव मांडत आहे.



<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>कृपया सर्वांनी श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी उभे रहावे.

<u>शोक प्रस्ताव :-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेचे नगरसेवक श्री. पृथ्वी वलेचा यांचे बंधु श्री. परसराम वलेचा यांचे नुकतेच निधन झाले आहे. त्यांचे कुटूंबियांचे दुःखात हे सभागृह सहभागी होत असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ५४ क</u> <u>दिनांक:-२० १२ २००२.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. परसराम वलेचा यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>एकमताने</u>

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>विषय क्र. १ प्रश्नोत्तरे. प्रश्न क्र. ३३ श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>मा. महापौरजी, मागच्या वेळी प्रश्नोत्तरे ही २८ क्रमांकावर थांबली होती. श्री. होशियारसिंग यांचा प्रश्न होता. ३३ नंबर पासुन कशी सुरूवात करता? त्याआधी मी एक स्थगन प्रस्ताव आणला आहे. आधी त्यावर चर्चा व्हावी अशी मी परवानगी मागतो.

मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-प्रश्नोत्त्तरानंतर प्रस्ताव आणला जावा. प्रश्न क्र. ३३ श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-मागच्या वेळेस २८ ते ३३ प्रश्नांवर म्हंटले होते की पुढील सभेत चर्चा केली जाईल. माझा प्रश्न हा होता की जी नोटीस पाठविली होती. मला उत्त्तर दिले होते की त्या तारखेला कोणती नोटीस पाठवली नव्हती. ३.११.२००१ला नोटीस पाठवली होती आणि ३.१२.२००१ ला त्याची मुदत संपली होती. व त्या अनाधिकृत बांधकामावर स्टे आला आहे ३०.४.२००२ला तर हे चार महिने महापालिकेने काय केले? अधिका-यांनी काय केले? कारवाई का झाली नाही याचा खुलासा करा?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:- यावर कोण उत्त्तर देणार? सांगा जरा. २८ नंबर प्रश्नावर यांनी उत्त्तर दिले आहे की भुखंड कोणता आहे हेच माहित पडत नाही. भुखंड माहित पडला की नाही ते तर सांगा. अधिकारी महापालिकेत बसतात यु नंबर दिला आहे, शिट नंबर दिला आहे, प्लॉट नं. दिला आहे. ऐरिया



दिला आहे. त्यानंतर देखिल म्हणतात की आम्हाला भुखंड माहित नाही. कोणता भुखंड आहे. कोण उत्त्तर देणार याचे.

मा. सदस्य दिलीप लालवानी:-आता तरी माहित पडले आहे की नाही भुखंड कोणता आहे? आयुक्त साहेब तुम्ही उत्त्तर देणार?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-आधी हे माहिती करा की कोण उत्त्तर देणार? आधी अधिकारीची माहिती काढा मग भुखंडाची माहिती काढा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-ज्यांनी सही केली तेच उत्त्तर देणार ना? पाटणकर साहेबांना भुखंडाची माहिती नाही, पानपट्टे साहेबच उत्त्तर देणार ना? पाटणकर साहेबांना माहिती आहे का याबाबतीत त्यांना माहित असेल तर त्यांनी उत्त्तर दयावे. तुम्ही जर सांगु शकत असाल की भुखंड कोणता आहे आणि तेथे चुकीचे उत्त्तर का दिले गेले. तुम्ही बिल्डरला संरक्षण देवू इच्छित होतात की काय करणार होतात? याचे उत्त्तर पानपट्टे साहेबांनी दिले आहे जर पाटणकर साहेब उत्त्तर देवू शकत असतील त्यांनी उत्त्तर दयावे.

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, यापुर्वीच मी उत्त्तर दिले आहे याविषयी. मागच्या सभेतच मी उत्त्तर दिले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-सन्मानानिय सदस्य हे विचारायचे विसरले होते की, २९ ,३० ,३१ वर चर्चा झाली २८ वर चर्चा झाली नव्हती. म्हणुन आम्ही सांगितले की २८ नंबर वर चर्चा करा. तुम्ही उत्त्तर दिले आहे की सदर भुखंड कोणता आहे हे माहितच पडत नाही. यु नंबर दिला आहे, शिट नंबर दिला आहे. त्यांनतर सुध्दा तुम्ही बोलता भुखंड कोणता माहित पडत नाही. आम्हाला त्या भुखंडाची माहिती हवी.

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-२ तारखेला कोणती नोटीस दिली नाही असे उत्त्तर दिले होते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-तुम्ही वाचा २८ नंबर प्रश्नाचे उत्तर काय दिले आहे.

इकडे श्री. पानपट्टे उपायुक्त यांनी उत्तर वाचुन दाखविले.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-मिळकतीचा बोध होत नाही आता तरी कळले का मिळकत कोणती ते? नोटीस तुम्ही दिली नाही २ तारखेला बरोबर आहे.

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-हे खुप मोठे स्ट्रक्चर आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-मिळकतीचा यु. नंबर शिट नंबर प्लॉट नं. दिल्यानंतर देखिल मिळकतीचा बोध होत नाही हे काय उत्तर दिले आहे तुम्ही? तुम्ही जबाबदार अधिकारी आहात.

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-शिट नं. ४७ खुप मोठे स्ट्रक्चर आहे. मा. सदस्यांनी प्रश्न विचारला होता २००१ मध्ये.

--५--

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-साहेब तुम्ही ऐका त्यांनी यु नंबर देखिल दिला आहे. शिट नं. ४७ मध्ये ५० बांधकाम होतील. परंतु यु नंबर एकच येणार यु. ९९ हा एकच येणार. येथे आम्ही लिहिले आहे यु नंबर ९९. तुम्ही वाचा संबंधित सदस्यांनी स्पष्ट लिहिले आहे.

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-जो प्रश्न विचारला होता त्याचे लिखित उत्तर दिले होते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-तुम्ही काय लिहिले आहे मिळकत कोणती याचा बोध होत नाही. हे समजत नाही. सन्माननिय महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब पहा.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-मा. महापौरजी, हा खुप गंभीर विषय आहे. एका जबाबदार अधिकारीला मिळकतीचा बोध होत नाही. बांधकाम होते ते समजत नाही. नाल्यावर स्लॅप टाकला जातो ते समजत नाही. नोटीस आल्यानंतर ९ महिने कार्यवाही होत नाही. एकदा स्लॅब टाकुन झाल्यावर परत दुसरा स्लॅब टाकण्याची पण तयारी पण होते ते पण तुम्हाला समजत नाही. महासभेतील सदस्य तुम्हाला दाखवुन देतात. महासभेच्या आदेशान्वये महापौरांच्या आदेशानुसार मा. आयुक्तांच्या निर्देशानुसार इकडुन टिम जाते बांधकाम तोडण्यासाठी तिथुन सळया काढतात. शनिवार, रविवार या दरम्यान पुन्हा स्लॅब टाकला जातो. तरी पण त्यांना माहित पडत नाही. दुसरा स्लॅब पण टाकला जातो पुर्ण महासभेचा हा अपमान आहे. महापौरांचा अनादर आहे. मा. आयुक्त यांचा अनादर होतो. त्यानंतर देखिल जे जबाबदार अधिकारी आहेत. त्यांना स्वतःच्या जबाबदारीची जाणीव होत नाही. सव्वाफुट जाडीचा स्लॅब तिथे टाकला जातो. त्यांना त्याचा पण बोध होत नाही. त्यांनतर त्यांना हे पण माहित पडत की सव्वाफुट जाडीचा स्लॅब कसा टाकतात हे त्यांना समजत नाही. आधि पोलिस मागतात पोलिस नाही मिळत, कधी मशिन मागतात मशिन नाही मिळत, कधी कामगार मिळत नाही. हे काय आहे?

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>तुम्ही जे उत्तर दिले आता तुम्ही मला हे सांगा की, आता तरी तुम्हाला मिळकतीचा बोध झाला का? आधी १८ नंबर प्रश्न हा आहे की तुम्हाला मिळकतीचा बोध झाला की नाही?*

*<u>श्री. पाटणकर (उपायुक्त अ.बा.विभाग):-</u>प्लॉट संबंधी उत्तर दयायचे आहे की नाल्या संबंधी?*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>तुम्हाला यासंबंधी माहिती नाही तुम्ही कसे उत्तर देणार?*

*<u>श्री. पाटणकर (उपायुक्त अ.बा.विभाग):-</u>तुम्ही आधी हे ठरवा की तूम्हाला कसले उत्तर हवे आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>तुम्हाला मिळकतीचा बोध झाला आहे का?*

*<u>श्री. पाटणकर (उपायुक्त अ.बा.विभाग):-</u>मी नाल्याविषयी उत्तर दयायला उभा आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>तो नाल्याविषयीचा प्लॉट कोणता आहे?*



*<u>श्री. पाटणकर (उपायुक्त अ.बा.विभाग):-</u>मी सदनाला विनंती करतो की तुम्ही हे निश्चित करा.*

*<u>मा.सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:'-</u>आता आम्हाला काही ठरवायचे नाही. आता आम्हाला हे निश्चित करायचे आहे की, जे अधिकारी कार्यवाही करत नाही त्यांना इथे ठेवले जावू नये. हे आम्हाला ठरवायचे आहे. आम्हाला मिळकत कोणती हे ठरवायचे नाही अवैध बांधकाम कोणते हे ठरवायचे नाही. जो अधिकारी महासभेचे आदेश झाल्यानंतर देखिल तिथे काही कारवाई करू शकत नाही अशा अधिका-यांना ठेवायचे की नाही हे ठरवायचे  आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>भुखंड माहित पडला की नाही आधी याचे उत्तर दया.*

*<u>श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-</u>स्लॅब विषयी तुम्ही बोलत आहात कोर्टामध्ये....*

*<u>मा.सदस्य श्री. देंवेंद्रसिंग खेमाणी:-</u>अवैध बांधकामांवर तुम्ही कारवाई करू शकत नाही. आणि महासभेला तुम्ही सांगता की तुम्ही ठरवा. हे काय उत्तर आहे? खुप खेदाची गोष्ट आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:-</u>मा.महापौर अधिकारी मंचावर येतात आणि न विचारता खाली जातात. ते महापौरंच्या आदेशाशिवाय खाली जाऊ शकतात काय? पानपट्टे साहेब कसे गेले?*

*इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.*

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-पानपट्टे साहेब महापौरांना न विचारता खाली निघुन गेले आम्ही काय इथे वेडे बसलो आहोत काय?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मी पण तेच म्हणत आहे की जोपर्यंत समाधानकारक उत्तर मिळत नाही. तोपर्यंत पानपट्टे साहेब तुम्ही वर रहा. तुमचे बोलणे संपल्यावर नाल्यावरील स्लॅबचा जो विषय आहे त्याचे उत्तर पाटणकर साहेब देतील. महाराज यांचा जो प्रश्न आहे तो पानपट्टे साहेबांच्या कालावधीचा आहे. त्यानंतर पाटणकर साहेबांनी उत्तर दयावे.

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-यांना नोटीस दिली नव्हती.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-आम्ही नोटीस विषयी विचारतच नाही आहे. तुम्ही म्हंटले आहे मिळकतीचा बोध होत नाही. आम्ही हे मांडले की शिट नं. ४६ मध्ये ७० बांधकामे आहेत. परंतु यु. नं. जे दिले आहेत. त्या यु. नंबरवर तर एकच स्ट्रक्चर असणार ना?

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-मिळकतीचा बोध झाला आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-कोणती मिळकत आहे ती?

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-तीच गोवर्धन गिडवानीची.



मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-म्हणजे कोणती?मला कसे माहित पडणार कोणती?

श्री. पानपट्टे (उपायुक्त आरोग्य विभाग):-गोवर्धन गिडवानीचे आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-कोण आहे ते?

मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-आयुक्त साहेब तुम्ही आता एक युक्ती काढली आहे की लोकांच्या घरी कर वसुलीसाठी ढोल ताशा वाजवायचा. तर मला वाटते अधिकारी म्हणुन ते काम केले तर खुप चांगले आहे. त्यांच्यापुढे ते वाजवले पाहिजे.

मा.सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः- सभागृहाची दिशाभुल करणारे उत्तर तुम्ही दयायला नको होते. मिळकतीचा बोध होत नाही. चुकीचे आहे. यु नंबर वगैरे दिल्यावर देखिल उत्तर चुकीचे पुढे देखिल असे प्रश्न आहेत. ज्याची उत्तरे नगररचनाकांरानी दयायला पाहिजे होती पण तुम्ही दिली आहे. असे पुढे खुप प्रश्न आहेत जे येतीलच. त्याचे उत्तर कोण देणार महापौर साहेबांनी आताच ठरवावे. त्याचे उत्तर पानपट्टे साहेब देणार की श्री. पाटणकर साहेब देणार? प्रश्न विचारतो कुणाला आणि उत्तर कोण देते.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-आम्हाला प्रश्नाचे उत्तर नंतर हवे आहे. परंतु जे अधिकारी सभागृहाची दिशाभुल करतात. बरोबर उत्तर देत नाही. बरोबर माहिती ठेवत नाही. अशा महानगरपालिकेच्या अधिका-यांना निलंबित केले गेले पाहिजे असे तुम्ही आदेश दया.

*<u>मा. महापौरः-</u>याबाबतीत आयुक्त साहेब उत्तर देतील.*

*<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>सन्माननिय महापौर महोदया, मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना यांनी १८ नंबरचा प्रश्न विचारला आहे. व ...*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>साहेब कृपया हिंदीमध्ये बोला.*

*<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>हा जो प्रश्न आहे (मा. आयुक्तांनी १८ क्रमांकाचे प्रश्न व उत्तर वाचुन दाखविला) यात काहीतरी गोंधळ झाला आहे. याचे खरे कारण हे आहे की १.१०.२००१ची नोटीस आहे. नोटीस त्या तारखेची नसेल म्हणुन हा गोंधळ झाला आहे. तांत्रिकदृष्टया पाहिले गेले तर जो प्रश्न आहे त्याचे शब्द पाहुन विचार केला तर ते उत्तर बरोबर आहे परंतु त्यात थोडी चुक अधिकारींनी ही केली की त्यांचे जे वर्णन दिले गेले आहे त्याचा संदर्भ घेवून त्यांनी उत्तर दयायला पाहिजे होते परंतु नंतर देखिल जे प्रश्न विचारले गेले त्याबाबत महापालिकेने कारवाई करण्याचे प्रयत्न केले आहे. परंतु उल्हासनगर हे असे शहर आहे की जेथे अनाधिकृत बांधकाम रदद झाले आहे आणि रदद झाल्यामुळे लोकांची प्रवृत्ती पण अशी झाली आहे की प्रयत्न केल्यानंतरही काही लोक कोर्टात जातात व त्याआधारे बांधकाम चालु ठेवण्याचा प्रयत्न करतात. तर मला असे वाटते की या अनाधिकृत बांधकाम जे नाल्यावर झाले होते त्याविषयी आम्ही पुर्ण प्रयत्न केला आहे परंतु सुट्टीचा फायदा घेवून न्यायालयाचे स्थगिती आदेश आणुन त्यांनी बांधले आहे तरी आम्ही पुर्ण प्रयत्न करू. त्यामध्ये काही अडचणी जरूर येतील जसे पोलिसांचा बंदोबस्त मिळावा म्हणुन वारंवार आम्हाला पोलिसांशी संपर्क साधावा लागतो. पोलिसांचा संपर्क तसेच बांधकाम तोडण्यासाठी जी मशिनरी लागते. जेसीबी तिथे नेली होती ती पण तुटली. व*



*तुटल्यानंतर दुसरा कॉम्प्रेसर पाहिजे होता तर ती देण्यात देखिल काही अडचणी आल्या. या सर्वांचा समन्वय साधण्यासाठी वेळ लागेल. परंतु प्रशासन पुर्ण प्रयत्न करते की, तरी पण ते बिल्डर अनाधिकृत बांधकाम कोर्टात जावून पुर्ण करण्याचा प्रयत्न करतात. ते बांधकाम निष्कासित करण्याचे आमचे पुर्ण प्रयत्न राहतील.*

*<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना :-</u>मागच्या महासभेमध्ये १६ तारखेला श्री. पाटणकर साहेबांनी कारवाई करून पुर्ण नाल्यावरील अतिरिक्त बांधकाम निष्कासित केले होते. चांगली कारवाई केली होती. आणि दोन दिवसानी बिल्डरनी सुट्टीचा फायदा घेवून स्लॅब टाकला. त्याला आज एक महिना झाला आहे. व तांत्रिक अडचण काहीही असो. आपण काही करू शकत नाही. या एक महिन्याने अजुन काय माहिती किती दिवस लागतील त्या दरम्यान बिल्डर कोर्टात जावून अजुन एक स्टे आणेल.*

*<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः-</u>आयुक्त साहेब तुम्ही सांगत आहात की सुट्टीचा लोक फायदा घेतात तसे काही नाही. अधिकारींच्या आळशीपणाचा ते फायदा घेतात. अधिकारींचे खिसे भरण्याचा ते फायदा घेतात. मध्य रस्त्यावर, मेन रोडवर ही इमारत आहे, रस्त्याचे तो अतिक्रमण करतो, ती जमिन घेतल्यानंतरही बीट इस्पेक्टरला माहित नाही पडत. उपायुक्त जे २५ हजार ते ५० हजार पर्यंत महापालिकेकडुन पगार घेतात. आमच्या गाडया वापरतात. जनतेचे पैसे वापरतात. जनता मेहनतीने पैसा कमवते. इतके पगार घेतल्यानंतरही ते काहीच करत नाही. त्यांनी फक्त एकच घोषणा करून ठेवली आहे की हा जो अतिक्रमण विभाग आहे तो मुका, बहिरा, आंधळा विभाग आहे. मी हा आरोप खुल्या शब्दांत करतो. त्या भवन निर्मात्यानी २० फुटाचा एक ओटा बनवुन ठेवला आहे. प्लॅटफॉर्म बनवुन ठेवला आहे. त्यावर काही कार्यवाही नाही. हे जे त्यांनी म्हंटले की अतिक्रमण विभाग बिल्कुल*

डफर आहे. हा आमचा पुर्णपणे त्यांच्यावर आरोप आहे. आपण जे सांगत आहात ते पुर्ण चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-</u>२००१ साली ३९५ प्लान मंजुर झाले आहेत हा तुमचा रिपोर्ट आहे. ११० बांधकामावर वायोलेशन झाले आहे. हा पण तुमचा रिपोर्ट आहे. २००१ ते २००२ पण पुर्ण व्हायला आले आहे. या दोन वर्षात तुम्ही ११० जे काही आहे, अनाधिकृत बांधकामांवर काय कारवाई केली आहे. आयुक्त साहेबांना सहा सहा उपायुक्त आहेत ते काय करत आहेत?

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>कोणी तरी उत्तर दया सन्माननिय सदस्य प्रश्न विचारत आहेत. हा अपमान आहे सदस्यांचा व महासभेचा.

<u>मा. उपमहापौर (श्रीमती. जया साधवानी):-</u>मा. महापौरांच्या परवानगीने मी एक गोष्ट मा. आयुक्त साहेबांसमोर मांडु इच्छिते की आताच आमचे मा. आयुक्त साहेब म्हणाले की पोलिसांचा बंदोबस्त नसतो कधी काही मशिनरी नसते, कधी काही असते तर असे काहीच नाही. आयुक्त साहेबांना माहित असेल किंवा त्यांच्याकडे पत्र आले असेल आमच्याकडे ही माहिती आहे की, मागच्या वर्षी पोलिस बंदोबस्तावर २ करोड १६ लाख रू. चे बिल ठाणे पोलिस आयुक्त यांनी पाठविले आहे. आपण सांगु शकता का ते बिल कधी आले ते? ऐवढे आपल्या महापालिकेवर बिल प्रलंबित आहे पोलिसांचे तर त्या पोलिसांचा वापर कुठे करण्यात आला. इतके नगरसेवक ओरडत आहेत, ऐवढे अनाधिकृत बांधकाम आहे तर आपण पोलिसांचा वापर कुठे केला याविषयावर जरूर खुलासा करावा.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:-</u>आताच एक नविन माहिती मिळाली आहे की, अवैध निर्माण करणा-यांना, ज्या लोकांनी अवैध बांधकाम केले आहे त्यांना



संरक्षण देण्यासाठी जे फॉर्म काढले आहेत की आपण जी एफ.एस.आय.ची चोरी केली आहे ते बांधकाम तोडले जावू नये म्हणुन त्यासाठी तुम्ही फॉर्म भरून दया. महासभेमध्ये जो ठराव पारीत केला होता त्यावेळच्या बांधकामाला मंजुर करायचे का? जे आता पण एफ.एस.आय.ची चोरी करत आहेत त्यांना मंजुर करायचे. अधिकारी वर्गांनी केलेली चोरी लपविण्यासाठी आताच्या बांधकामांना पास करणार का? कृपया आता जे एफ.एस.आय. चे उल्लंघन होत आहे ते थांबवा.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>मा. सचिव साहेब, मा. महापौर, उपमहापौर. सचिव साहेब आपली वेळ ठरली होती एका प्रश्नाला किती वेळ बोलायचे. फक्त विरोधी पक्षीयांना दाबायचे का? कालमर्यादा निश्चित केली होती की एका प्रश्नाबाबत किती वेळ बोलायचे ते?

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणी:-</u>बरोबर उत्तरच मिळत नाही तर प्रश्न पुर्ण कसा होणार?

<u>मा. उपमहापौर (श्रीमती. जया साधवानी):-</u>मामला गंभीर आहे.

<u>काही विपक्ष सदस्य :-</u>गंभीर करत आहात.

__श्री. पाटणकर (उपायुक्त अनधिकृत बांधकाम विभाग):-__ जे वायोलेशन तिकडे केले आहे ते काढले जाईल. कॅम्प वाईज............

__मा.सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-__चार महिने झाले तुम्ही काही कार्यवाही केली नाही आता काय करणार? आम्ही कसा विश्वास ठेवायचा की तुम्ही त्यावर कार्यवाही करणार. काय खात्री आहे. तोपर्यंत बिल्डरला संधी मिळते स्टे आणण्याची मग तुम्ही म्हणाल कोर्टात स्टे आहे. आम्ही काही करू शकत नाही. जसे होईल तसे आम्ही काढू.

__मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-__मा. महापौर, इथे महापालिकेमध्ये बीट मुकादम ठेवले आहेत. लाखो रूप्ये त्यांच्यावर महिन्याचा खर्च आहे. आता उपायुक्त सांगत आहेत की काही जागांवर वायोलेशन आहे. तुम्हाला इतक्या उशीरा माहित पडले वायोलेशन आहे. तुम्ही ते काढले. परंतु वायोलेशन काढल्यानंतर परत तुम्हाला माहित पडले वायोलेशन आहे. बीट मुकादमांना माहित असेल हे तर नक्की ना? त्याच्यावर नुसती जबाबदारी आहे ते नुसता हप्ता वसुल करतात. काही काम करत नाही. जेथे पण अनाधिकृत बांधकाम होते तिथे जावून उभे राहतात पैसे घेण्यासाठी त्यांचे काम पैसे घेणे नाही. त्यांचे काम आहे महापालिकेमध्ये अहवाल देणे. तुम्ही वायोलेशन काढल्यानंतर तिथे वायोलेशन झाले हे ज्या ज्या बीट इन्स्पेक्टरनी सांगितले नाही त्यांच्यावर तुम्ही त्वरीत कार्यवाही करा. व पुढच्या सभेत सांगा की किती बिट मुकादमांवर तुम्ही कार्यवाही केली आहे. पुढच्या महासभेत तसा रिपोर्ट ठेवा. आयुक्त साहेब मी तुम्हाला विनंती करतो की आपण तसे आदेश काढा. हा गोरख धंदा चालुच राहील वर्षापासुन चालला आहे. हे कधी तरी थांबलेच पाहिजे. हे थांबणे खुप जरूरीचे आहे. आम्ही महापालिकेत महासभेमध्ये नुसती बडबड करायला नाही आलोत. आम्हाला काहीतरी ठोस निर्णय पाहिजे. बीट मुकादमांवर काहीतरी अंकुश लावला पाहिजे. व व्यवस्थित अंकुश लावला पाहिजे. एक जरी बीट मुकादम त्यात दोषी आढळला तर त्याला त्या विभागातुन काढले गेले पाहिजे. इतक्या वर्षापासुन बीट मुकादम त्याठिकाणी आहे त्यांना काढा असे नाही झाले पाहिजे. तेच बीट मुकादम आहेत तरी परत वायोलेशन झाले. असे का? ही एक गंभीर समस्या आहे. जे पण याच्याशी

--१०--

संबंधित आहे, त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. इव्हन उपायुक्त ज्यांनी चार महिन्यापासुन नोटीस नाही दिली त्यांना पण मेमो देवून त्यांचे पण स्पष्टीकरण देणे जरूरीचे आहे. महापौरजी आपण तसा आदेश काढा. याबाबत कडक कारवाई केली जावी.

__मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-__हे जे बोलले त्याच्याशी आम्ही सहमत आहोत. परंतु अजुन एक गोष्ट बोलु इच्छितो जे पण असे अनाधिकृत बांधकाम करतात एम.आर.टी.पी. ॲक्ट नुसार त्यांच्यावर प्रॉसिक्युशन झाले पाहिजे, ते प्रॉसिक्युशन देखिल फाईल होत नाही.

__मा. उपमहापौर (श्रीमती. जया साधवानी):-__मला अजुन एक वाक्य येथे जोडायचे आहे. परवा रस्त्यावरील डांबरीकरण हटवुन बांधकाम केले आहे. नगरसेवकांनी तक्रार केली तरी हटविले नाही त्याचे काय?

__मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-__कुणाला भितीच नाही ना आयुक्तांची ना प्रशासनाची.

मा. उपमहापौर (श्रीमती. जया साधवानी):-भिंत तोडली आहे, पुन्हा ती उभारण्यात आली. तर हे बीट मुकादम काय करत आहे? कसे तोडुन आले आहे. आमचे रोड पुर्ण खराब झाले आहेत महापालिकेचे.

मा. महापौरः-ठिक आहे. या विषयावर ब-याच सदस्यांनी चर्चा केली, मी आयुक्तांना आदेश देते की त्यांनी याबाबत चर्चा करावी.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-मा महापौरजी, काही महिन्यापुर्वी बीट निरिक्षकांना एक डायरी ठेवायला दिली होती. व जेव्हापासुन त्यांनी नवीन बीट निरिक्षक ठेवले आहेत त्यांना मला वाटते लिहिता सुध्दा येत नाही. असे वाटते की त्यांच्याकडे कमीत कमी डायरी तरी पाहिजे ते कुठे जातात काय करतात.कुठे कुठे विझिट करतात.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-हे पहा महासभेत महापौर हे पिठासिन अधिकारी असतात. जेव्हा महापौर एखादे रूलिंग देते त्यावर अंमलबजावणी झाली पाहिजे. परंतु इकडे तसे होत नाही. या गोष्टीचे दुःख आहे. मागील महासभेत महापौरांनी रूलिंग दिले होते की बिल्डर दादागिरी करून परिस्थितीचा फायदा घेवून स्लॅब टाकेल. त्याची अंमलबजावणी न होता त्याने स्लॅब टाकला ही दुःखाची गोष्ट आहे. अंमलबजावणी महापौरांच्या बोलण्यावर देखिल ऐकली जात नाही केली जात नाही हा सदनाचा अपमान आहे.

मा. आयुक्त(श्री. बा. र.पोखरकर):-महापौर महोदया ,सन्मानानिय सदस्यांनी खुप सारे मुददे विचारले आहेत. मला असे वाटते की जेव्हा महापालिकेत प्रश्नोत्तराचा तास सुरू होतो. तेव्हा त्याचे उत्तर लिखित स्वरूपात दिले जाते. त्यानुसार अनुशागिक जे मुददे असतात. त्याचे पण उत्तर प्रशासन देण्याचा प्रयत्न करतात. परंतु प्रश्नाशी संबंधित प्रश्न नसताना त्याचे उत्तर देणे याबाबतीत जे नियम आहेत त्यात स्पष्टपणे उत्तर दिले आहे की, एकदा लिखित स्वरूपात उत्तर दिले तर त्यावर कोणतीही चर्चा पुन्हा होता कामा नये. इनस्पाईट ऑफ दॅट दी ॲडमिनिस्ट्रेशन इज ट्राइंग टू रिप्लाय दी क्युरीजरेज बाय दी हॉनरेबल कॉन्सीलर्स फॉम टाईम टू टाईम. मला असे वाटते की ,जे नवे मुददे आहेत त्यांचे उत्तर तुम्ही पुन्हा नव्याने प्रश्न विचारून घेवू शकता.तशी नियमात देखिल तरतुद आहे.आता ज्या सन्मानानिय सदस्यांनी काही मुददे उपस्थित केले आहेत. त्याबाबत



काही सांगु इच्छितो कारण की, प्रत्येक मुदयांचे उत्तर महासभेत त्वरीत देणे शक्य नाही. तरी देखिल जे पण प्रश्न विचारले गेले माहिती विचारली गेली त्याचे त्याचे उत्तर अधिकारींनी स्वतःचे माहितीनुसार स्वतःच्या बुध्दीवर विश्वास ठेवून दिले आहे. काही वेळेस असे पण झाले असते की कदाचित तुम्हाला बरोबर उत्तर नसेल मिळाले मी तुम्हाला विनंती करतो की, जर काही नविन मुददा असेल, नविन माहिती हवी असेल त्याची माहिती घेणे तुमचा अधिकार आहे. नविन प्रश्न देवून त्या हक्काचा जरूर वापर करा. तर सन्मानानिय सदस्यांनी असे म्हंटले की खुपसे बीट मुकादम वर्षापासुन तिकडे कार्यरत आहेत परंतु मी आपणांस सांगु इच्छितो, जेव्हा मी उल्हासनगर महानगरपालिकेचा कार्यभार स्विकारला त्यावेळी २४ बीट इन्स्पेक्टर असे होते की जे वीस वर्षापासुन सतत त्या विभागात कार्यरत होते. जेव्हा हे माझ्या नजरेत आले तेव्हा मी बीट मुकादम इन्स्पेक्टर यांची तिथुन बदली केली. त्यानंतर खुपशा मुकादमांनी न जाणो कुठून कुठून दबाव आणण्याचा प्रयत्न केला होता त्या विभागात येण्यासाठी तरीही एकही बीट मुकादमास मी त्या विभागात पुन्हा ठेवले

नाही. मी आशा करतो की जे नविन बीट इन्स्पेक्टर बीट मुकादम आहेत तेथे कार्यरत आहेत त्यावर आमचे उपायुक्त नीट लक्ष देतील व त्यांच्याविषयी जर काही तक्रार असेल तर तसा रिपोर्ट देतील. माझे नेहमी हेच म्हणणे असते की, जे आमचे विभाग प्रमुख आहेत त्यांनी आम्हाला तसा रिपोर्ट करावा. बरेच वेळा असे होते की, आयुक्तांना स्वतःहुन तशी कारवाई करावी लागते. ते चुकीचे आहे मी विभाग प्रमुखांना आदेश देतो की जे पण कर्मचारी आपले कर्तव्यात कसुर करत असतील त्यांच्यावर डिसीप्लेनरी ॲक्शन घेण्यासाठी म्हणुन जो काही त्यांच्यावर आरोप असेल तो त्यांनी माझ्याकडे पाठविला तर मी जरूर त्या विरूध्द कार्यवाही करेल. दुसरी एक गोष्ट मी सांगु इच्छितो की येथे या महापालिकेत मला असे वाटते की येथे २७०० कर्मचारी आहेत. त्यामधील केवळ २०-२५ अधिकारी बाहेरचे आहेत. येथे जे सर्व कर्मचारी आहेत ते सर्व कर्मचारी मला असे वाटते की कुणाचे भाऊ आहेत,कुणाच्या बहिणी आहेत, मुलगा आहे, मुलगी आहे, आई आहे, वडील आहे सर्व कर्मचारी स्थानिक आहे. यामध्ये जर एकच भावना असेल, तर ते प्रेरीत होवून आपले कर्तव्याचे पालन करतात. चांगल्या त-हेने ते पालन करतात. ते या शहरात राहतात. त्यांना या शहराविषयी प्रेम असले पाहिजे. पुर्ण त-हेने ज्याला डिवोशन म्हणतात ते जर त्यांनी केले तर प्रामाणिकतेने काम केले तर भले तो सफाई कामगार असो तो आपल्या कर्तव्याचे व्यवस्थित पालन करेल. या शहरातील नागरीकांच्या रक्तगटाशी तो संबंधित आहे. तो चांगल्यात-हेने आपले काम करेल. तर मला वाटते की इतर शहराप्रमाणे हे शहर देखिल ठिक होईल. शहरातले आजार निघुन जातील. अतिक्रमणाविषयी मी सांगु इच्छितो की ११० बांधकामाावर जे वायोलेशन झाले आहे त्याबाबत मला वाटते मागच्या वेळेस महासभेला ही माहिती दिली गेली नाही. १८१ वायोलेशनवर नोटीस काढली गेली आहे. त्यावर कार्यवाही सुरू आहे. उल्हासनगर शहरात जवळ जवळ १ लाख ३९ हजार बांधकामे आहेत. नंदलाल समितीचा जो अहवाल आहे त्यात असे लिहिले आहे की जवळ जवळ ९१ टक्के इमारती अनाधिकृत आहेत. मला असे वाटते की, ९५ टक्यापर्यंत अनाधिकृत बांधकाम आहे असे बोलले जाते. परंतु आम्ही तर पुर्ण प्रयत्न करत आहोत की ही जी वृत्ती आहे इथल्या लोकांची कोर्टात जाणे स्टे आणणे. दोन-दोनदा तोडल्यावर देखिल लोक कोर्टात जातात स्टे आणुन पुन्हा बांधकाम करतात ही वृत्ती नष्ट करण्यासाठी इथल्या लोकांची मानसिकता बदलली पाहिजे. व मानसिकता बदलण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची गरज आहे. व मला असे वाटते की इथले सर्व कर्मचारी ९९ टक्के इथलेच रहिवासी आहेत. त्यांना आपण प्रेरीत करू शकलो तर नक्कीच हे शहर देखिल दुस-या शहरासारखे बनेल. या शहराचा विकास देखिल होईल.

इकडे विपक्ष सदस्यांनी टाळया वाजवल्या.

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबानाः-</u>या स्लॅबवर कारवाई किती दिवसात होईल.



<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, आता जसे आयुक्त साहेब म्हणाले त्यांनी खुप चांगले प्रवचन दिले आहे, खुप चांगले भाषण केले. परंतु आम्हाला या प्रवचनाची भाषणाची गरज नाही. तुम्ही या शहराचे मालक आहात, आयुक्त आहात पुर्ण शहराने तुमचा हुकूम मानला पाहिजे. आपण हुकूम सोडा, आपण इकडे काम करून दाखवा आम्हाला हे प्रवचन नको आहे. इथला जो कर्मचारी वर्ग आहे, दहा वर्षापुर्वी पण हाच कर्मचारी वर्ग होता जेव्हा आमचे आमदार श्री. पप्पु कालानी यांच्या देखरेखीखाली यांनी काम केले आहे. हा तोच कर्मचारी वर्ग आहे. तेव्हा शहरात अशी चर्चा होती की शहर सिंगापुर सारखे होणार आहे. परंतु आता मागील काही वर्षापासुन मा. आमदार इथे नव्हते तेव्हापासुन हाच कर्मचारी वर्ग निष्क्रीय का झाला आहे? कारण की त्यांच्यावर जो अधिकारी वर्ग आहे. तो निष्क्रीय झाला आहे. त्यांचा कर्मचारी वर्गावर कंन्ट्रोल नाही हेच कारण आहे या

शहराची बरबादी होत आहे. तर मेहरबानी करून मा. आयुक्त महोदय आपणांस निवेदन करतो की आपण पुर्ण कर्मचारी वर्गावर, अधिका-यांवर कडक अनुशाषन करून या शहराचे भले करावे अशी आपणांस विनंती करत आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>मा.महापौर महोदय, आता आयुक्तांनी चांगले प्रवचन दिले भाषण केले. आम्ही मुदयावर येवू इच्छितो. आयुक्त म्हणाले की नियमाप्रमाणे आम्हाला लिखित स्वरूपात उत्तर मिळेल. काय उत्तर मिळाले? मिळकतीचा बोध होत नाही आणि आम्ही गप्प बसायचे? महापालिकेला येवून किती महिने झाले अजुन फक्त १८ प्रश्न क्र. चालु आहे. त्याचे पण समाधानकारक उत्तर नाही. काय उत्तर देत आहात आपण. आपल्याला साईट माहित नाही असे उत्तर देता आणि त्यावर तुम्ही १५ ते २० मिनिटे भाषण दिले. तुम्ही हे सांगा काय करणार आहात. आज पर्यंत आपणांस मिळकतीचा बोध झाला की नाही झाला? कोणत्त्या साईटवर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे याची माहिती तुम्हाला माहित आहे की नाही आम्हाला मुददेसुद उत्तर दया. ऐवढे मोठे प्रवचन ऐकवु नका.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>बांधकाम तर तोडले गेले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>आमचे मित्र होशियारसिंग यांचे जे काही चार पाच प्रश्न आहेत ते एकाच मिळकतीशी संबंधित आहे ज्यावर बरेच अनाधिकृत काम केले आहे. पुर्ण महासभा मा. आयुक्त, मा. महापौर सर्वांचा निरादर केला आहे. व वारंवार तोच प्रश्न येत आहे. इतर सर्व गोष्टी सोडुन या प्रश्नावर पाणी सोडले पाहिजे. आपण मेहरबानी करून उत्तर दया की या नाल्यावर व त्या आठ हजार चौ. फुटाच्या बांधकामावर काय कारवाइ करणार आहात. आपण याचे आम्हाला बरोबर उत्तर दया. किती दिवस पाहिजेत आपल्याला, किती पोलिस पाहिजे, कोणती मशिनरी पाहिजे, कोणते ट्राफीकवाले किती पाहिजेत सर्व इथे सांगा पुर्ण महासभा तुमच्या सोबत आहे. तुम्ही फक्त काम करून दाखवा त्यांचे पाचही प्रश्न तुम्ही स्वाहा करा. तुम्ही उत्तर देवून प्रश्न संपवा.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>महापौरजी, आपण महापालिका सचिवांना आदेश दया की त्यांनी याची कायदेशिर स्थिती काय आहे ती सांगा. पुढे याचे काय होइल. त्यावर त्यांनी जरा प्रकाश टाकावा.

<u>मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा)-</u> या मिळकतीवर ३०४.२००१ला स्टे आणला होता. कल्याण कोर्टानी तो कायम केला त्याविरूध्द आम्ही मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केली आहे. व मागील सोमवारी उच्च न्यायालयात तारीख होती. उच्च न्यायालय स्टे



काढणार होते. परंतु विपक्षातील वकील हजर नव्हते म्हणुन ते मॅटर कीप ॲट केले. व त्यानंतर त्यास दुसरी तारीख दिली गेली जानेवारीमध्ये.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>पुर्ण बांधकामावर स्टे आहे का काही भागावर ते सर्व सांगा.

<u>मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा)-</u>आधीचा जो स्टे होता तो इमारत व आधीचा नाला होता त्यासाठी होता. त्यानंतर त्यांनी पुन्हा एका नाल्यावर अतिरिक्त स्लॅब टाकला आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>त्यावर तर स्थगती आदेश नाहीत ना. जे अतिरिक्त बांधकाम केले त्यावर तर स्टे नाही ना.

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा)-स्टे पण नाही आणि आम्ही कंन्टेम्प्ट पण दाखल केली आहे. त्यांनतर जे बांधकाम केले आहे ते महापालिका तोडु शकते.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-अतिरिक्त बांधकाम महापालिका तोडु शकते.

मा. विधी अधिकारी (श्री. प्रकाश कुकरेजा)-हो त्यांनी तोडण्याची कारवाई केली होती पण अर्ध्यातच सोडले.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-ते पुर्ण कधी करणार?

मा. उपमहापौर (श्रीमती. जया साधवानी):-त्यांनी कारवाई अर्ध्यातच का सोडली?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-मा. महापौर तिथे उपायुक्त अतिक्रमण विभागाचे उभे आहेत त्यांना जरा विचारा की कारवाई अर्धवट का सोडली?

श्री. पाटणकर (उपायुक्त अ.बा.वि):-अर्ध्यातच कारवाई थांबवली कारण की, जेव्हा आम्ही....

काही सदस्य :-जेसीबी मोडली गेली.

मा. उपमहापौर (श्रीमती. जया साधवानी):-मोडली गेली का मोडण्यात आली?

श्री. पाटणकर (उपायुक्त अ.बा.वि):-मोडण्यात नाही आली ती मोडली गेली. त्याचा रॅम्प देखिल खराब झाला होता. कालच जेसीबी तयार झाली आहे.

मा.सदस्य श्री. मोहन बेहरानीः-जेसीबी तर आपण भाड्याने घेवू शकलो असतो ना?
श्री. पाटणकर (उपायुक्त अ.बा.वि):-आम्ही प्रोकलेनची मागणी केली परंतु प्रोकलेन दिले नाही गेले. श्री. पनवेलकर यांना पत्र देखिल दिले होते.

मा.उपमहापौर (श्रीमती. जया साधवानी):-तुम्ही पनवेलकरांकडुन कशाला मागता महापालिकेकडुन मागा ना. भाड्याने घ्या ना.

श्री. पाटणकर (उपायुक्त अ.बा.वि):-महापालिकेकडुन जर जेसीबी मिळाली तर आम्ही पण बांधकाम काढायला तयार आहोत.



मा.महापौरः-पनवेलकर कशाला देतील तुम्ही महापालिकेकडुन मागायला पाहिजे होती ना?

श्री. पाटणकर (उपायुक्त अ.बा.वि):-त्याचसाठी आम्ही पत्र लिहिले होते.

मा.उपमहापौर (श्रीमती. जया साधवानी):-एका पनवेलकरांकडेच फक्त जेसीबी आहे का पुर्ण शहरात? तुम्ही लिखीत मागीतले होते का?

*<u>श्री. पाटणकर (उपायुक्त अ.बा.वि):-</u>आम्ही लिखीत मागणी केली होती व सार्वजनिक बांधकाम विभागाला पण विनंती केली होती की तुमच्या जवळचे ओळखीचे जे ठेकेदार असतील त्यांच्याशी आमची भेट करून दया.*

*<u>मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>ठेकेदार कशाला तुम्ही कल्याणहुन भाड्याने मागायला पाहिजे होती ना? ठाणे , मुंबई येथुन मागवायची होती?*

*<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>महापालिकेकडे पैसे नव्हते.*

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>यापुर्वी जी कार्यवाही केली गेली होती. नंदलाल चौकशीच्यावेळी कल्याणहुन जेसीबी वगैरे सर्व मागवले होते. तेथील उपायुक्त लाड साहेब यांना बोलावले होते. तिकडुन मदत घ्यायला पाहिजे होती ना?*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:'-</u>आमचा असा आरोप आहे की तुम्ही जाणुन बूजुन त्या बांधकामाना संरक्षण देण्यासाठी बहाणे शोधत आहात.*

*<u>श्री. पाटणकर (उपायुक्त अ.बा.वि):-</u>आम्ही काही जाणुन बूजुन संरक्षण देत नाही की बहाणा शोधत नाही. आम्हाला पोलिस बंदोबस्त मिळेल. यंत्रसामुग्री मिळाल्यावर आम्ही ते तोडु.*

*<u>मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>तुम्हाला यंत्र सामुग्री कोण आणुन देणार?आम्ही आणुन देवू? मुंबईहुन मी मागवून देवू?*

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>आपल्या महापालिकेची आर्थीक परिस्थिती आधीच खराब आहे. बहाना तर आहे त्यांना सांगायला.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>मा. महापौर मी यावर एक बोलु इच्छितो की, तीन चार दिवसापुर्वी आमचे मा. श्री. पाटणकर साहेबांनी सांगितले की पनवेलकरांनी मशिन देण्याची मनाई केली आहे. त्यांनी मागणी नामंजुर केली आहे. मी श्री. भडकवाड साहेबांच्या दालनात होतो तेव्हा श्री. पाटणकर, श्री. पानपट्टे साहेब तिथे बसले होते. त्यांच्या समोर मी दहा मिनिटात एअर कॉम्प्रेसर मशिनचा बंदोबस्त करून दिला. ब्रेकर मशिनचा ऑपरेटरचा दहा मिनिटात व्यवस्था करून दिली. दुस-या दिवशी त्याप्रमाणे मशिन पोचली मी एक वाजेपर्यंत संपर्क साधण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांनी सांगितले की महापालिकेचा कोणीही अधिकारी तेथे उपलब्ध नाही हे खरे की खोटे ते सांगा.*



*<u>मा. उपमहापौर (श्रीमती. जया साधवानी):-</u>ही शरमेची गोष्ट आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>तुम्ही आयुक्तांना सांगितले का की मशिन मिळत नाही. तुम्ही लिखित दिले का काही.*

*<u>श्री. पाटणकर (उपायुक्त अ.बा.वि):-</u>आम्ही आयुक्तांना सांगितले जेसीबीची व्यवस्था केली गेली. त्यादिवशी लिखित आम्ही पोलिस बंदोबस्त देण्यासाठी सांगितले तो काही मिळाला नाही म्हणुन आम्ही तोडु नाही शकलो.*

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>काही विपक्ष सदस्यः-</u>ऐकेक जण बोला.

<u>मा.सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>आम्ही बोलणार सभागृहाची दिशाभुल करत आहेत.

<u>मा. उपमहापौर (श्रीमती. जया साधवानी):-</u>त्यांना मशिनरी दिली गेली तरी...

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>आयुक्तांना तुम्ही हे सर्व सांगितले का? त्यांचे मार्गदर्शन घेतले का की मशिन मिळत नाही आम्ही काय करायचे?

<u>मा. महापौरः-</u>सर्व काम आयुक्तांनी केले पाहिजे असे नाही तुम्ही पण केले पाहिजे. तुम्हाला आदेश दिले त्या आदेशाचे तुम्ही पालन का नाही करत? प्रत्येक गोष्टीला आयुक्तांना जबाबदार नाही धरले पाहिजे. तुम्ही त्यांच्या आदेशाचे पालन केले पाहिजे. गंभीरतेने ती बाब पाहिली पाहिजे. आयुक्तांना ऐवढे जबाबदार धरले जाते. शब्दांचा भडीमार होतो ते झाले नाही पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः- '</u>महापौरजी तुम्ही आदेश दया की एका आठवडयात हे झाले पाहिजे. तीन दिवसात होईल का?

<u>श्री. पाटणकर (उपायुक्त अ.बा.वि):-</u>आम्हाला मशिनरी मिळाल्यावर आम्ही कार्यवाही करू. तसेच आम्हाला पोलिस बंदोबस्त मिळाला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मी या विषयावर पाच मिनिटे बोलु इच्छितो. सर्वच स्पष्टीकरण देतो. आमचे विरोधी पक्षनेता श्री. रमेश चव्हाण यांचा पहिले मी मुददा घेतो त्यांनी म्हंटले की एका प्रश्नावर एका सदस्यांनी किती वेळ बोलले पाहिजे. त्याचा निर्णय झाला पाहिजे. आम्ही जोपर्यंत बोलु त्याच्या आधीच महाराज भुल्लरयांनी सांगितले की, हा प्रश्न भले तीन महासभेपर्यंत का न चालो. जोपर्यंत समाधानकार उत्तरे मिळत नाही तोपर्यंत प्रश्न चालुच राहील. तर एक धोरण ठरवू या. (इकडे विपक्ष सदस्य काही बोलत असताना ) आता मला बोलु दया मी तुमच्यामध्ये बोललो नव्हतो. दुसरे असे की मी आयुक्तांना विचारू इच्छितो त्यांनी खुप कायदे कानुन आम्हाला समजावले आजपर्यंत दिडशे ते दोनशे प्रश्न नगरसेवकांनी विचारले आहेत. प्रश्न क्र. १८ आताशी चालु आहे. आज नगरसेवकांनी प्रश्न विचारले अधिकारींनी फक्त उत्तर दयाचे आहे की कार्यवाही देखिल करायची आहे याचा जरा खुलासा करा. जर काही समस्या नसेल सन्माननिय सदस्य जर प्रश्न विचारतात त्याचा नंबर आठ दहा महिन्यानंतर सभेत येतो तोपर्यंत त्या समस्येचे समाधान झाले पाहिजे की नाही? का फक्त



नगरसेवकांनी प्रश्न विचारले अधिकारींनी फक्त उत्तर दिले. तोपर्यंत अधिका-याची देखिल बदली होते असे नाही झाले पाहिजे. आम्हाला तुम्ही कायदे नियम शिकवता ते तुम्ही तुमच्या उपायुक्तांना देखिल शिकवा. जर कुणी सदस्य प्रश्न विचारतो तर प्रत्यक्ष प्रात्यक्षिकरित्त्या त्यांनी काम केले पाहिजे. त्याचे काम झाले पाहिजे. तो कोणत्त्याही विभागाशी संबंधित असो. त्यांचे समाधान झाले पाहिजे. तिसरे असे की, फक्त प्यादेच का मारले जातात? हत्ती, घोडे, वजीर, राजा ते नाही मारणार का?

याला उपायुक्त जबाबदार नाही का? फक्त शिपायांनाच का मारले जाते. धिस इज वेरी बॅड. सर्वांवर कार्यवाही झाली पाहिजे. आज सत्ता पक्ष असुन देखिल आम्ही स्थगन प्रस्ताव आणला आहे. प्रशासन जर चुकीचे वागले तर आम्ही त्यांची चुक दाखवुन देणार आम्ही चमचागिरी नाही करणार. आम्ही टाळया नाही वाजवणार. आम्हाला प्रात्याक्षिक स्वरूपात काम पाहिजे. आज शहरात जनतेला किती त्रास आहे. इकडचे अधिकारी लक्ष देत नाहीत. आम्हाला नगरसेवकांना तोंड दयावे लागते. जर शहरात विकास होत नाही तर त्याला आयुक्त व पुर्ण उपायुक्त जबाबदार आहेत. कुणी अधिकारी जर कल्याण मुंबईहून येत असेल, इथे आम्हाला लोकांचे ऐकुन घ्यावे लागते आम्ही कुठे जाणार, कुणी सदस्य प्रश्न विचारतो तर तुम्ही समाधानकारक उत्तर देत नाही, आज उल्हासनगरची जेसीबी डंपर, जयबाबा धाम येथे होती. ती नाला तोडण्यासाठी गेली नव्हती. हे बहाणा करत आहेत.

<u>मा.सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:-</u>आम्ही महात्मा गांधीजींनी दाखवून दिलेल्या मार्गाने चालतो आहे आम्हाला भगतसिंग यांच्या मार्गाने जाण्यास प्रेरीत करू नका.

<u>मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-</u>जेसीबी असताना नाला तोडण्याची कार्यवाही झाली नाही. नाला तोडण्याचे प्रयत्न केले की......

<u>श्री. पाटणकर (उपायुक्त अ.बा. वि):-</u>मी काही बहाणा वगैरे करत नाही.

<u>मा.सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>मागच्या सभेत महापौरांनी रूलिंग दिले होते की हे काम झाले पाहिजे.

<u>मा. उपमहापौर (श्री. जया साधवानी):-</u>तीन दिवसात झाले पाहिजे असे म्हणाल्या होत्त्या.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लर:-</u>सन्माननिय महापौरजी, उपमहापौरजी तिकडे अजुन एक समस्या आहे. त्यांना हे माहित आहे का? ते तिकडे जाणार तर ही समस्या येणारच आहे. हे ते सभागृहाला सांगत आहे का? तिकडे ट्रक उभी आहे नाल्यावर.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लर:-</u>यांनी जर तिकडे प्रोकलेन मशिन नेली तर हे सांगतील की नाल्यावर ट्रक आहे.



<u>मा.महापौर:-</u>तीन दिवसात हे बांधकाम झाले पाहिजे. अशी प्रत्येक महासभेत इतक्या वेळ चर्चा झाली तर कसे होणार?

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>महापौरांचे रूलिंग आहे तुम्हाला ते काम करायचेच आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लर :-</u>तीन तीन, चार-चार ट्रक उभे केले आहेत नाल्यावर.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मागच्या वेळेस पण रूलिंग दिले होते.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः-</u>यांना जे जे साहित्त्य हवे आहे बांधकाम तोडण्यासाठी ते फक्त प्रोकलेन मागत आहेत क्रेन नाही मागत. आम्ही प्रोकलेन देवू. ते जातील इथे ट्रक उभे आहेत. तेव्हा म्हणतील ट्रक उभे आहेत क्रेन शिवाय निघणार नाही. पुढील महासभेत चर्चा होणार आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>प्रोकलेन पण घेवून देवू या, क्रेन पण घेवून दया.*

*<u>मा. महापौरः-</u>शनिवार, रविवार सुट्टी आहे. सोमवारी तो नाला तुटला पाहिजे असे मी श्री. पाटणकर साहेबांना आदेश करते.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः-</u>सन्माननिय महापौरजी, त्यांना क्रेन पण दिली पाहिजे.*

*<u>मा. महापौरः-</u>नाला तुटला पाहिजे आणि तसा रिपोर्ट २६ तारखेला आला पाहिजे महासभेत.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः- </u>'महापौरांना माझे निवेदन आहे की, जोपर्यंत स्लॅब तुटत नाही तोपर्यंत हा प्रश्न चालुच राहिला पाहिजे.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंग भुल्लरः-</u>सन्माननिय महापौरजी, त्यांना क्रेन आणि प्रोकलेन दोन्ही उपलब्ध करून दया.*

*<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>मा. महापौर महोदया, या प्रश्नावर सन्माननिय सभागृह नेता श्री. किशोर वनवारी, सन्माननिय सदस्य श्री. मोहन बेहरानी, श्री. भुल्लर महाराज, सन्माननिय श्री. होशियारसिंग लवाना यांनी विचार प्रकट केले. या प्रश्नाचे मी शेवटचे उत्तर देवू इच्छितो. सभागृह नेता सन्माननिय किशोर वनवारी यांनी मुददा उपस्थित केला की, आम्हाला उत्तर नको कार्यवाही पाहिजे. मी तर माझ्या अधिका-यांकडुन अशीच अपेक्षा ठेवतो. आम्हाला तर उत्तर पण दयायचे आहे आणि कार्यवाही पण करायची आहे. आमचे असे पुर्ण प्रयत्न असतील.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>प्रात्यक्षिक झाले पाहिजे.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>आता टाळया वाजवा ना?*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>तुम्ही तर निगेटीव्ह असेल तरी टाळया वाजवता.*

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-मा. महापौर, आता आता श्री. किशोर वनवारी आपल्या भाषणात म्हणाले की आम्ही टाळया नाही वाजवणार आणि मागुन टाळया वाजवत होते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-नाही नाही आम्ही तर निगेटीव्ह असले तर टाळया वाजवणार नाही. असे म्हणालो होतो. पॉझिटीव्ह असले तर वाजवु.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-ते तुम्ही ठरवणार का निगेटीव्ह, पॉझिटीव्ह?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आयुक्तांनी चांगले उत्तर दिले म्हणुन आम्ही टाळया वाजवल्या. ते म्हणाले की मी पण अशी अधिका-यांकडुन अपेक्षा ठेवतो की अधिका-यांनी प्रश्नाचे फक्त उत्तर न देता प्रात्यक्षिक कार्यवाही केली पाहिजे. त्यांच्याशी आम्ही सहमत आहोत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-सभागृह नेत्ताजी तुमचे भाषण झाले आहे. आता आयुक्त साहेब स्पष्टीकरण देत आहेत तुम्ही गुपचूप ऐका ना. तुम्ही बोलत आहात आम्ही नियम बनवत आहोत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आता जमनु मध्ये बोलले म्हणुन मी मध्ये बोलत आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-सभागृह नेता आपल्या भाषणात लोकांना चमचा वगैरे काही पण बोलतात. आता आयुक्त काय म्हणतात ते पण ऐका.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आता जमनु मध्ये बोलले म्हणुन मी मध्ये बोलत आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-आम्हाला जे काही चांगले वाटेल त्यावर आम्ही टाळया वाजवणार?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आम्हाला रिझल्ट पाहिजे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-आयुक्तांचे म्हणणे आम्हाला आवडले म्हणुन आम्ही टाळया वाजवल्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-शॅल वुई कम टू बिझनेस.

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-मला असे वाटते तुमची अंतर्गत इच्छा आता पुर्ण झाली आहे. मी पुढे बोलु इच्छितो व आमचे पुर्ण प्रयत्न असतील की आम्ही सन्माननिय सदस्यांचे समाधान करावे परंतु समाधान अशी गोष्ट आहे की ती रिलेटीव्ह टर्म (मानण्यावर)असते. कुणाचे कशाने समाधान होईल हे सांगता येत नाही. तरी आम्ही पॉझिटीव्ह समाधान करण्याचा प्रयत्न करू. जबाबदारी देखिल कायम करू. ही जी चर्चा चालु आहे, खुप थोडया शब्दात मी त्याचा सारांश मांडु इच्छितो. हे बांधकाम झाले आहे. आम्ही १६ नोव्हेंबरला तोडले होते नंतर २८ नोंव्हेंबरला देखिल निष्कासित केले. परंतु जसे मी याआधी सांगितले की हे जे बांधकाम करणारे आहेत ते कोर्टाचा आश्रय घेतात. म्हणुन आम्ही हा कार्यक्रम

डिसेंबरमध्ये ठेवला होता. परंतु काही अडचणी आल्या पोलिस बंदोबस्त नाही मिळाला. जेसीबीचा देखिल प्रश्न होता. मी स्वतः चौकशी करत होतो त्याचे काय झाले? जेव्हा मला उपायुक्तांनी माहिती दिली. त्यांना जेसीबी मिळत नव्हती.



कॉम्प्रेसर मशिन मिळत नव्हते म्हणुन मी सार्वजनिक बांधकाम विभागातील ब-याचशा ठेकेदारांना त्यांना संपर्क साधायला सांगितला व नंतर कॉम्प्रेसर मिळाला परंतु पोलिस बंदोबस्त नाही मिळाला. म्हणुन १७ डिसेंबरला आम्ही तिथे कारवाई नाही करू शकलो. सन्माननिय महापौर महोदयांनी आदेश दिले आहेत की, हे बांधकाम तीन दिवसात तोडले गेले पाहिजे. परंतु मी त्यांना विनंती करू इच्छितो की हे बांधकाम तर आम्हाला तोडायचेच आहे, आम्ही तोडुच परंतु आम्ही दहा दिवसाची अनुमती मागु इच्छित आहे. दहा दिवसात आम्ही ते बांधकाम तोडु शकु. पोलिस बंदोबस्त मिळत नाही. पोलिसांकडे जातो, कायदा आणि सुव्यवस्थाची समस्या निर्माण होते म्हणुन ते वेळेवर उपलब्ध होत नाही. दहा दिवसात मी त्यांना विनंती करतो परंतु आमचे ध्येय हेच असेल तर लवकरात लवकर दहा दिवसात करण्याचा प्रयत्न करू.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>या दरम्यान स्टे आणला तर?

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>जर स्टे आणला तर...

<u>मा. महापौरः-</u>दहा दिवसाचा नाही फक्त सोमवार पर्यंत वेळ देत आहोत.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>आम्ही लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न करू.

<u>मा. महापौरः-</u>नाही. नाही साहेब तुम्ही सोमवार पर्यंत आदेश दया. जेसीबी जर चार, पाच नंबर मध्ये जात असेल तर ती आता इथे पाठवा.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>प्रश्न क्र. ३३...

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>आमची विनंती आहे की २८ नंबरचा प्रश्न कंन्टीन्यु ठेवावा. जोपर्यत याचा काही निर्णय लागत नाही तोपर्यंत महापौरजी तुम्ही तसे रूलिंग दया.

<u>मा. महापौरः-</u>ठिक आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>महापौरजी, पर्टीक्युलर केसमध्ये जसे वादविवाद होतात. मिलीभगत आहे हे आहे ते आहे त्यासाठी मी असे म्हणेन की आमचे अतिरिक्त आयुक्त श्री. सोनवणे साहेंबांवर हे सोपवा की ते चौकशी करतील व तिथे स्वतः बंदोबस्त करून त्यांच्या अध्यक्षतेखाली ते तोडले जावे. श्री. पाटणकर साहेबांना सपोट साठी म्हणुन अतिरिक्त आयुक्तांची मदत घेवून ते बांधकाम त्यांनी तोडावे. कारण श्री. पाटणकर साहेब थोडे बहुत विसरतात.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>श्री. किशोर वनवारी बरोबर बोलत आहेत. मा. महापौरजी, अतिरिक्त आयुक्तांवर तुम्ही जबाबदारी सोपवा.



<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>नाही, कोणी विसरत नाही. चार दिवसापुर्वीची गोष्ट आहे मी आयुक्तांकडे डेमोलेशनचे प्रकरण घेवून गेले. एन.सी.पीचे निवेदन घेवून गेले. तर आयुक्त साहेबांनी अशी मजबुरी दाखविली की मी काही करू शकत नाही. की मला भरपुर कामे आहेत. प्रत्येक उपायुक्तांना वेगळी
कामे दिली आहेत ती त्यांची जबाबदारी आहे. ते नाही करत तर मी काय करू? याबाबत तुमचे काय म्हणणे आहे. आयुक्त साहेब चार दिवसापुर्वीच आम्ही तुमच्याकडे आलो होतो. त्यावेळी आपण असे उत्तर दिले होते की उपायुक्त आपले कर्तव्य करत नाहीत. आम्ही तुम्हाला विचारले होते की अशी किती बांधकामे आहेत ज्यांचे स्टे वेकेट झाले आहेत. अशी किती बांधकामे आहेत ज्यांच्यावर कोर्टाचे ओदश आहेत ते अदयाप झालेले नाहीत तारखेनुसार ते सांगा. आता आपण जवळपास कोणते डिमॉलेशन केले आहे व लांबणीवर कोणते टाकले आहे. तुम्ही त्यावेळी तुमची मजबुरी सांगितली होती. उपायुक्त सक्षम नाही आहेत तर मी काय करू? मी काय काय करू एकटा. आम्ही मग यापुढे आपणांवर काय विश्वास ठेवावा. आमचे निवदेन येते तुम्ही अशी उत्तरे देतात.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>श्री. किशोर वनवारी बरोबर बोलत आहेत. मा. महापौरजी, अतिरिक्त आयुक्तांवर तुम्ही जबाबदारी सोपवा. ते या कामाची देखभाल करतील. दहा दिवसाच्या आत कोणत्याही परिस्थितीत आयुक्तांनी ही जबाबदारी श्री. सोनवणे साहेबांवर सोपविली.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>आम्ही म्हणतो फक्त हीच का पुर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात यावी.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>महापौरजी, तुम्ही आदेश दया.

<u>मा. महापौरः-</u>मी आयुक्तांना तसे आदेश देते.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा) :-</u>प्रश्नोत्तराचा कालावधी संपला आहे. आणि २८ नंबरचा जो प्रश्न आहे. मागील सभेपासुन हा प्रश्न येत आहे. कायदयान्वये अशी चर्चा केली जात नाही. दोन तीन सभेत यावर चर्चा चालु होती. आज पण प्रश्नोत्तराचा कालावधी पण असाच संपला. एकाच प्रश्नावर चर्चा चालु होती.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>हे तर असे झाले की ''खाया पीया कुछ नही ग्लास तोडा बाराना''..

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-असे नाही तुमचे म्हणणे असे आहे की प्रश्न क्र. २८ पुढील सभेपर्यंत प्रलंबित ठेवावा. तर ३३ व ३४ नंबर प्रश्न नाल्याविषयी आहे. त्याबरोबर ही चर्चा केली तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-आता महापौरांनी रूलिंग दिले तर काय होवू शकते.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-मा.महापौरांनीच तशी सूचना दयायला सांगितली होती.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-३३ व ३४ नंबर तेच प्रश्न आहेत का? त्याच्याशी संबंधित आहेत का?

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-हो नाल्याशी संबंधित प्रश्न आहे.

--२१--

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-ठिक आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-दुस-या विषयाकडे जाण्याअगोदर इकडे तीन लक्षवेधी सूचना आल्या आहेत व एक स्थगन प्रस्ताव प्राप्त झाला आहे. व येथे एक आयत्त्यावेळीचा विषय देखिल आला आहे. जो आपणां सर्वांना देण्यात आला आहे. पहिली लक्षवेधी सूचना आहे श्री. राजेंद्र चौधरी व श्री. राज असरेंडकर यांची आहे. यांचा विषय असा आहे की, इकडे जे ३३ रोडचे काम झाले. रस्त्याचे रूंदीकरण झाले, परंतु रस्त्यावर मोठ मोठया गाडया उभ्या राहतात. व गॅरेजवाले रस्त्यावर उभे राहुन कामकाज करत असतात. त्यामुळे रस्त्यावर रहदारीस खोळंबा होतो. रस्ता रूंदीकरण होवून फायदा होत नाही म्हणुन शहराच्या हितासाठी त्यांनी लक्ष वेधले आहे. तर ही एक लक्षवेधी आहे. आणि दुसरी लक्षवेधी आहे. त्याचे सुचक आहे श्री. शांताराम निकम व अनुमोदक आहेत श्री. प्रशांत जाधव यांचे म्हणणे आहे की दुर्बल घटक वसाहती आणि गलिच्छ वस्तीत काहीही विकासाचे काम होत नाही. दोन करोडचा खर्च अपेक्षित आहे तरी पण काही काम होत नाही. व तिसरी लक्षवेधी आहे सुचक आहेत श्रीमती. जयश्री सुनिल सुर्वे व अनुमोदक आहे श्री. शांताराम निकम यांची आहे. त्यांचे म्हणणे आहे की सपना गार्डनमध्ये जो जकात नाका आहे तो मुख्य जकात नाका आहे. त्याचे स्थलांतरण करण्यासाठी महापालिकेच्या मागे वेगळे स्थान बनवले आहे अजुन ते का हलवण्यात आले नाही? या तीन लक्षवेधी पैकी दोन लक्षवेधी स्विकारल्या जातील. त्यासाठी मा. महापौर निर्णय घेतील. सपना गार्डनची लक्षवेधी अमान्य केली जाते बाकी लक्षवेधी स्विकारल्या आहेत. आणि एक स्थगन प्रस्ताव आहे. व कार्यसूचीवरील इतर विषय आहेत. त्यापुर्वी स्थगन प्रस्ताव देण्यात यावा असा प्रस्ताव आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शहरात विस्कळीत पाणीपुरवठा साफ-सफाईचा अभाव, तसेच करापोटी उत्त्पन्नात कमतरता, याबाबत चर्चा करणेसाठी तो प्रस्ताव देखिल आपल्या सर्वानुमते महापौरांनी स्विकारला आहे. तर पुढच्या विषयाकडे जाण्याअगोदर दोन लक्षेवधी आणि स्थगन प्रस्तावावर चर्चा होईल. आधी स्थगन प्रस्ताव नंतर लक्षवेधी.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-मा. महापौरजी, सभा सूरू होण्यापुर्वी, गुजरातमध्ये भाजपा सत्त्ता निवडून आल्याने अभिनंदन प्रस्ताव दयावा. प्रचंड मताने मुख्यमंत्री पदावर श्री. नरेंद्र मोदी निवडुन आले आहेत. मा. नरेंद्र मोदी व संपूर्ण भारतीय जनता पार्टी आणि हिंदु समाज जे प्रचंड मताने आणि मा. बाळासाहेब ठाकरे

या सर्वांचे हार्दिक अभिनंदन करू इच्छितो व सभेत शिवसेना भाजपातर्फे काही पेढे आणले आहेत ते वाटण्याची परवानगी मागतो.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):-</u>स्थगन प्रस्ताव श्री. दिलीप लालवानी आणि श्री. देवेंदसिंग खेमाणी यांचा आहे. आणि आयत्त्यावेळेचा जो विषय आहे, आपल्यामध्ये आज अतिरिक्त आयुक्त श्री. आर. के. सोनवणे यांना इथे कार्यरत ठेवण्यासाठी मंजुरी दयायची आहे त्याबाबत आहे. त्या विषयाला मा. महापौरांनी स्विकृती दिल्याने आपल्यापुढे कार्यसूचीवर घेण्यासाठी सादर आहे. आता स्थनग प्रस्तावावर चर्चा होईल.

<u>स्थगन प्रस्ताव</u>

महोदय / महोदया,

आज दिनांक २०.१२.२००२ च्या सभेच्या कामकाजाच्या क्रमातील कामाची इतर कोणतीही बाब विचारार्थ घेण्यापूर्वी शहरात खालील निकडीच्या सार्वजनिक



महत्त्वाच्या गोष्टीवर चर्चा घडवून आणण्याच्या प्रयोजनार्थ आपल्या संमतीने महासभेचे कामकाज स्थगित करणेसाठीचा प्रस्ताव मांडत आहे.

१. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शहरात विस्कळीत पाणीपुरवठा साफ-सफाईचा अभाव, तसेच करापोटी उत्पन्नात कमतरता, याबाबत चर्चा करणेसाठी.

सुचक :- श्री. दिलीप लालवानी
अनुमोदक :- श्री. देवेंदसिंग खेमाणी.

<u>पहिली लक्षवेधी सूचना:-</u>

आपले लक्ष वेधु (केंद्रीत) इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने एकात्मिक रस्ते विकास योजने अंतर्गत ज्या ३३ रस्त्यांच्या रूंदीकरणाचा कार्यूम ज्या उददेशाने हाती घेण्यात आलेला होता तो प्रयत्न असफल ठरला आहे. कारण त्या रस्त्यांच्या दोन्ही बाजुला जड वाहने उभी करून पार्कींग केली जात असून तर काही रस्त्यांच्या बाजुला वाहने उभी करून रस्ता अडविला जाऊन त्या ठिकाणी वाहने दुरूस्तीची कामे बिनधास्तपणे महापालिकेच्या परवानगी शिवाय केली जात आहे. रस्ता अडवून रहदारीला बाधा होत आहे. त्यामुळे अपघात होण्याचा धोकाही निर्माण झालेला आहे. तरी या लक्षवेधीवर येत्त्या महासभेत चर्चा करावी ही विनंती.

सूचक :-श्री. राजेंद चौधरी.
अनुमोदक :-श्री. राज असरोंडकर.

<u>दुसरी लक्षवेधी सूचना</u>

महोदय,

शहरातील दूर्बल घटक वसाहतीमध्ये नागरिक विकास कामे करणे करिता महानगरपालिकेच्या उत्पन्नातुन ५ टक्के निधी वापरणे हे महानगरपालिकेला वित्तिय वर्ष २००२-२००३ अंदाजपत्रकामध्ये दूर्बलघटक वसाहतीच्या विकासासाठी व गलिच्छ

वस्ती विकास निमुलनाकरिता २ कोटी खर्च करणे करीता तरतुद आहे. परंतु चालु आर्थिक वर्षाचा कार्यकाल पुर्ण होणेस अवघे दोन महिनेच्या अवधी बाकी आहे. अद्याप सदरील तरतुदीतुन एकही काम मंजुर झालेले नाही हा एक प्रकारचा महानगरपालिकेतील प्रशासनाचा कर्तव्यात कसुन असा प्रकार दिसतो, शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे व शासनाचे ध्येय धोरणाप्रमाणे नागरिक विकास कामे होणे गरजेचे असल्यामुळे सदरील लक्षवेधी सूचनेव्दारे महासभेमध्ये विषय उपस्थित करून महासभेचे लक्ष वेधणेसाठी सदरील लक्ष वेधी सूचना दिनांक २०.१२.२००२ रोजीच्या महासभेमध्ये ठेवण्यात यावी ही विनंती.

सूचक :- श्री. शांताराम निकम

अनुमोदकः- श्री. प्रशांत जाधव

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>मा. महापौर आज हा स्थगन प्रस्ताव जड अंतःकरणाने या महासभेत आणला आहे. जड अंतःकरणाने यासाठी म्हणतो कारण आम्ही सत्ताधारी पक्षाचे आहोत. महानगरपालिकेचे बहुतेक विभाग संतोषजनक काम करत नाही. प्रामुख्याने शहराचा विकास होत नाही आणि सांगितले जाते की कर वसुली बरोबर होत नाही आहे. शहरात स्वच्छता नाही आहे. कचरा, दुर्गंधी,



कुजके पदार्थ, वाढणारे डास, डेंगूचा ताप, याचा त्रास शहराला होत आहे फक्त ऐवढेच नाही तर पाण्याच्या समस्येसाठी आम्ही वारंवार या महासभेत आवाज उठविला परंतु आमची पाण्याची समस्या अजुनही सुटली नाही. एकच मुददा आम्ही वारंवार इथे आणतो. आयूक्तांनी इथे लक्ष दयावे. साहेब पेढा खाल्ला असेल तर लक्ष दयावे आम्ही काय इथे जोकर म्हणुन येत नाही, कलेचे प्रदर्शन करायला येत नाही. मी मागील महासभेत देखिल म्हंटले होते की जनप्रतिनिधीना जोकर समजु नये. शहरात कचरा आहे. पाण्याची समस्या आहे, विकास कार्य होत नाहीत, कोणत्त्याही कामासाठी आयुक्त महोदयांकडे जातो तर सांगतात की निधी नाही, वसुली होत नाही. व प्रशासनाचे हे काम की कर वसुली करणे, स्वच्छता करणे, पाण्याचे बरोबर वाटप करणे, २५ एम.एल.डी. पाणी आम्हाला जरूरीपेक्षा जास्त मिळते तरी पण पाणी टंचाईने आम्ही ग्रस्त आहोत. पाणी बरोबर मिळत नाही परंतु ऐवढे सर्व होवून देखिल आम्ही महापालिका आयुक्तांवर आरोप लावतो की तुम्ही असक्षम आयुक्त सिध्द झाला आहात. व तुम्ही वर्तमानपत्रात अशा त-हेच्या बातम्या दिल्या आहेत की नगरसेवकांचे सहकार्य तुम्हाला मिळत नाही. तुम्हाला कोणत्त्या पक्षाकडुन सहकार्य मिळाले नाही. प्रत्येक जण तुम्हाला सहकार्य देत आहे. कशात-हेने तुम्ही आमच्यावर, महाराष्ट्र शासनावर आरोप केले आहेत. आम्ही याबाबत आपणांस विचारले तर तुम्ही तोंडी उल्लेख केला की आम्ही हे असे काही वर्तमानपत्रात दिले नाही. तुम्ही त्यांना नोटीस पाठवली का? लिखित खंडन पाठवले का? हे आपण आपल्या अधिकाराच्या सीमेच्या बाहेर जावून अतिक्रमण केले आहे. जनप्रतिनिधीवर आरोप लावेले आहेत. आपल्या असक्षमतेची ओळख देवून तुम्हाला याचे उत्तर दयावे लागेल. शहराच्या स्वच्छतेसाठी पाणी टंचाईसाठी, कर वसुली साठी तुम्ही काय केले? शहरात सफाई कामासाठी जी सामुग्री पाहीजे ती खरेदी करण्यासाठी तुम्ही काय केले? यासर्व प्रश्नाचे उत्तर तुम्हाला दयायचे आहे. व आपण जनप्रतिनिधी आमचे आमदार व महाराष्ट्र शासनावर श्री. विलासराव देशमुख यांच्यावर आपण वर्तमानपत्राव्दारे जे आरोप केले आहेत. त्याची कात्रणे आमच्याकडे आहेत. त्यासाठी आपणांस खेद प्रकट करावा लागेल व महारष्ट्र शासनाकडे माफी मागावी लागेल अशी मागणी आम्ही स्थगन प्रस्तावाव्दारे तुमच्याकडे करत आहोत.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>यामुददयाला धरून मी तुम्हाला अजुन थोडे पुढे नेते. अशी पण सूचना प्राप्त झाली आहे. आमच्या महापालिकेत विरूध्द व

नगरसेवकांविरूध्द आमच्या आयुक्त साहेबांनी महाराष्ट्र शासनाकडे आमच्या उल्हासनगर महानगरपालिकेला बरखास्त करण्याचा प्रस्ताव लिखित पाठविला आहे. आम्हाला आयुक्तांकडुन उत्तर हवे आहे. (इकडे सत्ताधारी शेम शेम म्हणुन ओरडत होते.) त्यासाठी आम्ही एक समिती नेमू इच्छितो. त्यात तुम्ही जितका पण पत्रव्यवहार महाराष्ट्र शासनाकडे केला आहे. त्याचा खुलासा या महासभेत करावा नाहीतर आम्हाला कमिटी नेमावी लागेल. तुम्ही महापालिका बरखास्त करा म्हणुन तुम्ही शासनाला लिहून पाठविले का? जर पाठवले आहे तर त्याची कारणे सांगा आम्ही त्याची उत्तरे देवू.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, जसे आमचे बंधु श्री. दिलीप लालवानी व भाभी यांनी सांगितले की, साफसफाई पाण्याची समस्या आहे, कर वसुलीची समस्या आहे. कर वसुलीमध्ये असा गोंधळ चालु आहे की आधी तुम्ही, आधी तुम्ही असे चालु आहे. महापालिका जनतेला म्हणते की तुम्ही आधी कर भरा. आम्ही तुम्हाला नंतर सुविधा देवू. जनता म्हणते आम्हाला काहीच सुविधा नाही. नाल्या तुडूंब भरल्या आहेत. डास, उंदीर सर्व असे फिरत आहेत की त्यांच्यावर काही कंट्रोल नाही. डुक्कर सुध्दा., हे सांगण्याचे तात्पर्य हे आहे की, महापालिका नागरिकांना मुलभूत सेवा देण्यामध्ये अयशस्वी झाली आहे. आमचे नागरिक बोलतात की आधी आम्हाला मुलभूत सेवा दया आम्ही नंतर कर भरू.



हा जो गोंधळ आहे तो कधी संपेल ते कळत नाही. असे म्हंटले जाते की नगरसेवकांमुळेच महापालिकेला कर्जाचे ओझे सहन करावे लागते. शहराच्या विकासासाठी महाराष्ट्र प्रदेशाच्या विकासासाठी सरकारव्दारा शासनाकडुन कितीतरी योजना आखल्या गेल्या आहेत. अशा योजना आहेत की शहराच्या विकासासाठी सरकार अनुदान देते. अशा किती योजनांचा फायदा महापालिकेने घेतला आहे याचे उत्तर कोणी देवू शकेल. कोणत्त्या योजनेचे , कोणत्त्या अनुदानाची मागणी केली आहे. कोणत्त्या योजनेचा, कोणत्त्या अनुदानाचा वापर केला आहे? काय याचे उत्तर महापालिकेकडे आहे? करोडो रूपये महाराष्ट्र शासनाने गलिच्छ वस्ती, दलित वस्ती सुधारणेसाठी व अनेक विकास कामासाठी अनुदान वगैरेचे आयोजन केले आहे त्याचा काही फायदा घेतला जात नाही. फक्त लक्ष्य हे आहे की, शहरवासियांना लुटायचे आहे. त्या पैशातुन देखिल शहराचा विकास करायचा आहे. ही खुप चुकीची गोष्ट आहे आणि याचे उत्तर या महासभेत दयावे लागेल. शहरातील साफसफाईची समस्या कशी सोडवणार?पाणी समस्या कशी सोडवणार? कर वसुलीचा हा जो कार्यक्रम आहे त्याला कसे कार्यक्षम केले जावे. यावर चर्चा करणे व समाधान करणे आवश्यक आहे. मी आयुक्तांना विचारू इच्छितो की, आयुक्तांना कोणते सहकार्य नगरसेवकांकडुन मिळाले नाही.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>महापौरजी, आमचे आयुक्त म्हणतात की, शहराची वसुली एकदम कमी आहे. आणि आम्ही त्यांना सहयोग देत नाही. महानगरपालिका ना शहराला सफाई देत ना पाणी देत आहे व ना मुलभूत सुविधा देत आहे. शहरातील कुत्रे, डुक्कर व डासांचा देखिल नायनाट आपली महापालिका करू शकत नाही अशापरिस्थितीत आम्ही शहरवासियांना कसे सांगणार की तुम्ही टॅक्स भरा. मेगाासिटीचा प्रोजेक्ट तयार करून पाठविला आहे त्याबाबत अजुन काही पत्रव्यवहार होत नाही. जर पत्रव्यवहार करत आहात तर आम्हाला अहवाल देत नाहीत. अजुन देखिल कित्त्येक महाराष्ट्र शासनाकडुन ज्या सुविधा मिळाल्या पाहिजेत आमच्या महापालिकेने त्याकडे लक्ष दिले नाही. त्याशिवाय आमचे मा. आमदार साहेबांच्या

गैरहजेरीत डी.पी. प्लान बनवला होता. साहेबांनी त्यावर स्टे आणुन नविन डी.पी प्लान बनविण्याचा आदेश दिला होता. मा. आयुक्त त्यांचे अध्यक्ष आहेत त्यासाठी आयुक्तांनी काय केले. अजुन खुप तक्रारी समस्या आहेत जी महापालिका सोडवत नाही.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>आता मी सांगितले की शासनाकडुन शहराच्या विकासासाठी अनुदानाची काही मागणी केली आहे का? ती तर चर्चा होईलच. माझा एक सुझाव आहे २००३-२००४साठी आतापासुन पुर्व नियोजित योजना आखुन अनुदान मागवण्याची कार्यवाही सुरू केली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः-</u>आयुक्त साहेब जितके पण सन्माननिय सदस्य निवडुन आले आहेत यांना लोकांनी निवडुन दिले आहे हे असेच निवडुन आले नाहीत त्यांनी कित्येक वर्षापासुन प्रभागात काम करून जनतेची सेवा केली आहे त्यानंतर जनतेने त्यांना निवडुन दिले आहे. कोणत्याही पक्षाचा सदस्य आहे, नगरसेवक आहे त्यांनी खुप मेहनत केली आहे त्यांचे मन शहरासाठी झटत आहे. ते नेहमी शहरासाठी भांडतात. इथे सर्व तुमच्या समोर बसले आहेत. सर्व विभाग प्रमुख ते तर काही कालावधीसाठी इथे येतात. आम्ही तर जन्मापासुन ते मरणापर्यंत तिथे आहोत तुम्ही विचार करून सांगा तुम्ही नऊ महिन्यात आम्हाला दिले काय आहे. फक्त दोन लाखाचे प्रभागासाठी काम. आमचे जितके पण प्रभाग आहेत, जितके पण कामगार दिले आहेत. सुरवातीपासुन आजपर्यंत जी व्यक्ती मरते तुम्ही किती दिवसांनी त्यांच्या जागी भरती करता. कामगार सुट्टीवर



जातात खाडाबदली सुट्टीसाठी किती माणसे तुम्ही भरती केली. वारंवार ओरडुन नगरसेवक थकतात परंतु तुम्ही कुणाचे ऐकत नाही. व आपण जे लिहुन पाठवले आहे. आता जे सांगितले जात आहे की महापालिका बरखास्त करण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे. नगरसेवकांना जनतेने निवडले आहे , जर जनता म्हणाली की आम्ही चुकीचे आहोत आम्ही राजीनामा दयायला तयार आहोत. जर जनता काही म्हणत नाही तर बाहेरून येणारे आमचे सन्माननिय आयुक्त त्यांनी चंद्रशेखर साहेबांसारखे काहीतरी करून दाखविले पाहिजे. जोपर्यंत ते काही करून नाही दाखवत जनतेला खुश करत नाही तोपर्यंत आम्हाला उपदेश करण्याचा आम्हाला काही अधिकार नाही. तुम्ही शहरासाठी काहीतरी करून दाखवा मग तुम्ही आम्हाला बोला आम्ही तुमच्या सोबत आहोत. तुम्ही चुकीचे बोलत आहात की आम्ही तुम्हाला सहकार्य देत नाही. आम्ही शहराच्या हितासाठी आपल्या व प्रशासनाबरोबर आहोत. प्रशासनाने व अधिकारींनी चुक केली तर त्यांना आम्ही कधी माफ नाही करणार?धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. चिमण रूपाणीः-</u>मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब मला अत्यंत दुःखाने असे म्हणावे लागत आहे की,आता जे काही आम्ही ऐकले. हे शहर आपल्या सर्वांचे घर आहे. तुम्ही या शहराचे मुख्य अंग आहात. तुम्ही आपल्या मुलांच्या विरूध्द शासनाकडे लिहुन पाठवले आहे की मला साथ मिळत नाही. घरातील कोणताही मोठा व्यक्ती आपल्या मुलांना बेइज्जत करत नाही. किंवा त्यांच्याबददल वाईट बोलत नाही. आमच्याकडुन जर काही चुकत असेल तर आपण त्याबाबत सभा बोलावण्यास पाहिजे होती. जे नगरसेवक आपल्याला साथ देत नाही त्यांच्या समवेत बसुन चर्चा केली पाहिजे होती. परंतु आपण परस्पर शासनास जे लिहुन पाठविले की मला नगरसेवक साथ देत नाहीत. मला असे वाटते की या महानगरपालिकेचे सर्व नगरसेवक सत्ताधारी पक्षाचे असो वा विरोधी पक्षाचे असो सर्व शहराच्या हितासाठी

येथे आवाज उठवितात व काम करतात. आणि आता प्रश्न राहिला महापालिकेच्या महसुलाचा. मी मागे सुध्दा दोन सभांमध्ये म्हंटलो होतो की महापालिकेची जी कर वसुली होत नाही त्यास जबाबदार महापालिकेचा कर्मचारी वर्ग आहे. जे ऐवढे भ्रष्टाचारी झाले आहेत, चुकीची ॲसेसमेंट करत आहेत त्यामुळे करोडो रूपये महापालिकेचे अडकुन पडले आहेत. मागील महासभेमध्ये तुम्ही आश्वासन दिले होते की या कर्मचा-यांवर कारवाई करण्यांत येईल. परंतु अदयाप पर्यंत काही कारवाई झाली नाही. ज्यांना पाण्याचे कनेक्शन नाही त्यांच्या करामध्ये पाण्याचे बिल लावले आहे त्यामुळे लोक टॅक्स भरत नाही. टॅक्स मुळे रिव्हेन्यु थांबवला आहे त्यांच्या विरूध्द कार्यवाही झाली पाहिजे. साफसफाईचा जेथे प्रश्न आहे. खुपसे सफाई कामगार गैरहजर असतात परंतु त्यांच्यावर काही कार्यवाही होत नाही. विशेष करून मी पाहिले आहे साफसफाई विभागाचे श्री. जनार्दन लिपिक आहेत, आज मी स्पष्टपणे सांगतो की त्यांनी पुर्ण डी.एम.सींना हलवून सोडले आहे. सर्वांच्या फाईली, सर्वांची कागदपत्रे ऐवढे लपूवन ठेवतात की माझी स्वतःची फाईल त्यांनी चार महिने गायब केली होती. अशा कर्मचा-यावर कारवाई झाली पाहिजे. प्रशासन जर कडक नसेल तर कडक कारवाई होणार नाही. याची पुर्ण जबाबदारी आयुक्त या नात्त्याने तुमच्यावर आलेली आहे. आताच आपण पाहिले की स्लॅब तुटल्यामुळे हे जाहीर झाले की अधिकारी वर्गाचे सहकार्य मिळाल्यामुळेच हा स्लॅब तुटलेला नाही. जर तीन तीन महासभा होवून देखिल हा स्लॅब तुटला नाही तर या शहरात बाकीची अनाधिकृत बांधकामे कशी थांबणार. म्हणुन आपणांस निवेदन आहे की दुस-यांची तक्रार करण्याआधी स्वतःच्या घरात काय चालले आहे, त्यावर काहीतरी मार्ग काढला पाहिजे. आता अतिरिक्त आयुक्त श्री. सोनवणे साहेब आले आहेत. जर तुमच्याकडे काम जास्त असेल त्यांच्यावर काही जबाबदारी टाका. त्यांच्याकडुन काम करवनू घ्या. आम्हाला सर्वांना असे वाटते की या शहराचा विकास झाला पाहिजे. आम्हाला असे वाटते की तुम्ही देखिल श्री. चंद्रशेखर साहेबांसारखे नाव कमवावे. आम्ही



सर्वजण आपणांस सहाकार्य करण्यास तयार आहोत. नगरसवेकांना विश्वासात घ्या, आम्हाला सहकार्य करा व शहराचा विकास करा. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब आज इथे जो स्थगन प्रस्ताव आला आहे. तो आम्हाला आणण्याची गरज का भासली. आज सत्त्ताधारी पक्षात असताना देखिल आम्हाला स्थगन प्रस्ताव आणण्याची गरज का भासली? मला माझे मित्र श्री. महाडिक साहेबांची एक गोष्ट नेहमी आठवते, ९७-९८ साली जेव्हा भाजपाचे राज्य होते तेव्हा भाजप शिवसेनानी सेनिटेशन वॉटरसप्लाय व अनाधिकृत बांधकामाबाबत सभा बोलावली होती. जेव्हा आम्ही विपक्षात होतो तेव्हा त्यांना विचारले होते की तुम्ही रूलिंगमध्ये असून सभा का बोलवता. तेव्हा श्री. महाडिक म्हणाले होते की आमचे हिंदु हृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरेंचा असा आदेश आहे की अन्याया विरूध्द लढणे. जर आज आमचे आमदार श्री. सुरेश (पप्पु) कालानी जे आमचे अध्यक्ष आहेत त्यांचेही असेच म्हणणे आहे की अन्यायाविरूध्द लढणे मग भले ते सत्त्ताधारी पक्षामध्ये असो वा विपक्षमध्ये असो. महानगरपालिका बरखास्त करण्याबाबत किंवा आम्ही सदस्यांना निलंबित करण्याबाबत आपण जे राज्यशासनास पत्र लिहिले आहे त्याचा या महासभेत आपण खुलासा केला पाहिजे. याबाबत सर्व गटनेत्त्यांना मी विनंती करेन की आयुक्तांनी राज्य शासनास पाठविलेल्या गोपनिय पत्राबाबत आयुक्तांनी खुलासा करावा. अन्यथा आम्ही एक चौकशी समिती नेमु त्यामध्ये महापौर, स्थायी समिती सभापती व एकेक गटनेता यांची एक समिती नेमावी लागेल. तसेच यावर्षी आम्ही सर्व पक्षांनी मिळुन जकात करापोटी ११ कोटी रू. वाढवून दिले आहेत. नगरसेवक निधी १० लाखावरून चार

लाख केली आहे. काल आपण म्हणत होतात की नगरसेवक निधीतुन चार लाखाचे सुध्दा काम होणार नाही. प्रभाग समित्त्यांची कामे होत नाहीत. इकडे उत्पन्न वाढत आहे व आपण म्हणता की, नगरसेवकांची ही सर्व कामे झाली पाहिजेत. सर्व नगरसेवकांना आपल्या प्रभागातील लोकांच्या समस्या दूर करायच्या आहेत. सर्व सदस्यांची कामे झाली पाहिजे. सर्वांना प्रभागातील लोकांना काम करून दाखवायचे आहे. तिसरे आज जर वसुली वाढत आहे तर कामाचे स्वरूप देखिल वाढले पाहिजे. ते तर तुम्ही नाही देत. मी याचा खुलासा आमचे अतिरिक्त आयुक्त श्री. आर.के. सोनवणे यांचे कडुन घेवू इच्छितो कारण की त्यांना कर वसुल, पाणी पुरवठा वसुलीचा कार्यभार सोपविण्यात आला आहे ते याचा खुलासा करतील वसुली वाढली की नाही किंवा कसे ते हे सांगतील व निवडुन आलेल्या महासभेविषयी शासनाला लिहिले जाते. आयुक्तांनी सांगावे कोणत्त्या सदस्यांनी कोणत्त्या प्रकारचे तुम्हाला सहकार्य नाही केले. सर्व पक्षांनीच तुमचे हाथ मोकळे केले आहेत काम करण्यासाठी तुम्ही इथे तिन वर्ष रहा नाहीतर सहा वर्ष रहा सर्व पक्ष तुमच्या सोबत आहेत तुम्हाला आम्ही पाठींबा देतो. तरी तुम्हाला शासनाला आमच्या विरूध्द लिहिण्याची गरज काय भासली. काय लिहिले आहे तुम्ही याचा जरा महासभेत खुलासा झाला पाहिजे. श्री. आर. के. सोनवणे साहेब वसुलीबाबत खुलासा करतील. पाणी पुरवठा व सॅनिटेशनमध्ये कधी सुधारणा होईल याचा खुलासा करावा धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राजेश वदारियाः-</u>मा. आयुक्त साहेब तुम्ही सदनात हे सांगा की मागील वर्षी १.४.२००१पासुन ते ३१.३.२००२व या चालु वर्षात आजपर्यंत किती टॅक्सची वसुली झाली आहे. आणि पाणी पुरवठयाची वसुली किती झाली? प्रशासनाने किती लक्ष्य ठेवले होते?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>महापौरजी, स्थगन प्रस्ताव श्री. दिलीप लालवानी यांनी येथे मांडला आहे. हा जो प्रस्ताव आहे तो संपुर्ण राजकारणाने प्रेरीत आहे. अशी आमची विरोधी पक्षांची ठाम भुमिका आहे. त्याची कारणे जेव्हा जेव्हा सत्त्ताधारी पक्षाला काही राजकारण करायचे असते तेव्हा पाण्याचा प्रश्न



किंवा सार्वजनिक साफसफाईचा प्रश्न उपस्थित केला जातो. ऑगस्टमध्येय पाणी प्रश्न उपस्थित करून महासभेमध्ये प्रचंड गोंधळ घातला प्रशासनावर आरोप केले पाण्याची समस्या आहे. पाण्याची समस्या सूटली पाहिजे महणुन आम्ही त्यास सहकार्य केले होते. परंतु मागच्याच महिन्यात त्याबाबत गोल मैदान सारख्या विभागात पाण्याची बिकट समस्या आहे यासाठी सर्व सभागृहाचे लक्ष्य केंद्रीत केले आणि सभा तहकुब करून याठिकाणची पाणी समस्या सोडवावी. यासाठी विनंती केली परंतु सत्त्ताधारी पक्षानी ती फेटाळली आणि सगळीकडे पाणी पुण्रवठा व्यवस्थीत आहे, आबादा आबाद आहे असे सांगितले व विरोधी पक्षांची जी विनंती होती की लोकांना पाणी मिळावे ती फेटाळुन लावली. अशा प्रकारचे राजकारण या स्थगन प्रस्ताव किंवा लक्षवेधीच्या माध्यमातुन बहुमताचा आधार घेवून सत्त्ताधारी पक्ष करतो आहे. याठिकाणी विरोधी पक्षीयांनी कुठला मुददा उपस्थित केल्यानंतर त्याला बगल दिली जाते, टाळले जाते आणि आपले मत मांडण्यासाठी मात्र वाटेल ते आधार घेतले जातात. श्री. किशोर वनवारी यांनी सांगितले की, १९९७ मध्ये शिवसेना आणि भाजपाची सत्त्ता होती. तेव्हा श्री. प्रकाश महाडिक यांनी सांगितले होते की श्री. बाळासाहेब यांनी आम्हास सूचना दिलेल्या आहेत. ते आदर्श आहेत ठिक आहे ते आदर्श महापालिका नविन होती परंतु नेहमी बे एके बे, मागच्यावेळी असे झाले होते म्हणुन आम्ही असे करत आहोत. कधी कधी दोन दुणे चार सुध्दा झाले पाहिजे. किंवा फक्त बे एके बेच? कृपया आपण सभागृह नेता आहात. दुसरी गोष्ट अशी की स्थनग प्रस्तावाच्या माध्यमातुन सत्त्ताधारी पक्ष व विपक्ष एकच आहेत. दोघांचे मत आहे की शहरातील समस्या सुटल्या पाहिजेत. शहरातील सर्वसामान्य जनतेला

कुठलाही त्रास होता कामा नये. आज प्रशासनाच्या दुर्लक्षामुळै शहरामध्ये अनियमित पाणी पुरवठा सार्वजनिक साफसफाई कडे दुर्लक्ष तसेच करापोटीच्या उत्तपन्नात कमतरता यावर चर्चा करण्यासाठी याठिकाणी सभागृहात विषय आणलेला आहे. आणि स्थगन प्रस्ताव मांडत आहेत. उल्हासनगर महानगरपालिकेच्या आठ विशेष समित्त्या आहेत आणि चार प्रभाग समित्त्या आहेत. त्यावर वेगवेगळे पदाधिकारी आहेत सभापती आहेत. इतर सदस्य आहेत. प्रभाग समित्त्या व विशेष समित्त्या नेमु नयेत असा आमचा आग्रह होता. आज सत्ताधारी पक्षाचे प्रत्येक सभापती यांची तक्रार आहे, नियोजन समीतीच्या सभापतींची तक्रार आहे की, अनाधिकृत बांधकामे जोरात चालु आहेत. पाणी पुरवठा विभागाचे सभापती म्हणतात की आमच्याकडे पाणी पुरवठा होत नाही. आरोग्य समितीचे सभापती म्हणतात की आमच्याकडे सार्वजनिक साफसफाई होत नाही. तर मग समित्त्यांचा उपयोग काय आहे? स्थगन प्रस्ताव आणण्याऐवजी त्याविषयावर विस्तृत चर्चा करून जर सत्ताधारी पक्षास जर खरोखरच गांभीर्य असेल तर तया समित्त्यांचे राजीनामे देवून समित्त्या बरखास्त कराव्यात तोच निषेध असे समजुन तसेच प्रभाग समित्त्यांच्या माध्यमातुन जर कामे होत नसतील तर त्यांचेही राजीनामे देवून तोच निषेध समजुन प्रशासनास सतर्क करावे. अशी मी सर्व सभासदांना , सभागृहनेत्त्यांना व सर्व अधिका-यांना विनंती करतो. स्थगन प्रस्ताव देण्याऐवजी त्यावर विस्तृत चर्चा करावी हाच या समस्येचे निराकरण करण्याचा एकमात्र पर्याय आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>सभागृह नेता साहेब, एक वेळ आपण बोलला आहात कृपया आता आम्हाला बोलु दया. आपणच म्हंटला होतात की प्रत्त्येकाने एकेक वेळ बोलावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, मी जे बोललो ते यासाठी की बोडारे साहेब पाण्याचे बिल लाईट ऑफीसला घेवून गेले म्हणुन मी बोललो. आम्ही म्हंटले की आयुक्त साहबांनी महानगरपालिका बरखास्त करण्यासाठी शासनास पत्र लिहिले. त्याकडे बोडारे साहेबांचे लक्ष गेले नाही. मी म्हंटले की प्रभाग समित्त्यासाठी आम्ही पहिल्यांदाच तरतुद ठेवली आहे. सर्व सदस्यांच्या प्रभागातील



कामांसाठी तरतुद ठेवली आहे. आपले सुध्द काम व्हायचे आहे त्यासाठी, आयुक्त साहेब काम करत नाहीत. त्याकडे त्यांचे लक्ष गेले नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>मा. महापौरजी, श्री. किशोर वनवारी यांनी माझ्या बाबत उल्लेख केला म्हणुन मी बोलु इच्छितो.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>आपण माझ्यावर भाष्य केले होते त्यावेळी मी आपणासं उत्तर दिले होते का?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>जेव्हा आपणासं पाणी पुरवठा,सार्वजनिक साफसफाई कर वसुली यामध्ये राजकारण दिसले. त्यानंतर मी म्हंटले मागील पाच वर्षी दहा लाख नगरसेवक निधी होता. चार लाख झाले आहे. त्यात दोन लाख रू. चे काम झाले आहे. दोन लाख रू. चे नाही झाले. त्याकडे बोडारे साहेबांचे लक्ष नाही गेले. आता हे म्हणतात की सभापती काम नाही करत त्यांनी राजीनामा दयावा. ते स्वतःच जाणार का काम करायला. सभापती प्रशासनाला बोलणार, उपायुक्तांना बोलणार, संबंधित अधिका-यांना बोलणार. त्यांनी काम नाही केले तर आम्ही

महासभेत नाही ओरडणार तर काय उल्हासनगरमध्ये बाहेर ओरडणार. आणि बोडारे साहेब वारंवार म्हणातात की आम्ही राजनीती करतो. आम्ही राजनीती पक्षात नाही काय स्वतः पण ते नाही का राजनितीमध्ये. इकडे राजकारण नाही होत आहे. जेव्हा निवडणुका पुर्ण झाल्या पाच वर्षासाठी निवडुन आलो आता राजकारण नाही काम करायचे असते. राजनीती निवडणुकीच्या वेळी असते. निवडुन आल्यावर महासभेत आल्यावर तर पुर्ण शहराच्या विकासासाठी सदस्य उठुन बोलतो. ते म्हणतात मी वांरवार श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे नाव घेतो, नाही घेतले पाहिजे, पण मी घेत राहणार. मला ते मनापासुन आवडतात. जेव्हापण हा विषय येईल तेव्हा मा. श्री. बाळासाहेब ठाकरे आणी पप्पु कालानी यांचे उदाहरण देत राहील. भले त्यांना आवडो न आवडो त्यांनतर विरोधी पक्षाचे हे काम नाही की नेहमीच विराध करणे कधी कधी शहराचे मुददे जसे आयुक्तांनी काय लिहुन पाठवले आहेंही माहिती घेण्यासाठी म्हणुन स्थगन प्रस्ताव, नगरसेवक निधीचे काम झाले पाहिजे. प्रभाग समितीच्या सर्व सदस्यांसाठी एकेक लाखाचे काम उदयानासाठी ठेवले आहे. एक-एक लाख रू. पाण्याची लाईन, ५० हजाराचे रिपेरींग सर्व सदस्यांसाठी ठेवले आहे. जेव्हा मंजुर होईल तेव्हा तुमचे पण होईल. निश्चिंत रहा आणि असे नका म्हणु की आमचे ठेवले नाहीत. आम्ही सर्वांना सन्मानाने व सर्व पक्षीयांना एकत्र घेवून व सर्वांना न्याय देवून निधी एकसमोन ठेवला आहे. सत्ताधारीचे जास्ती विपक्षाचे कमी असे आम्ही नाही केले तुम्हाला न्याय दिला आहे. तुम्ही कसे म्हणता नेहमी आम्ळी बहुमताने करतो. यापुढे तुम्ही फक्त महासभेत बोलायचे आहे असे नाही. थोडे विचार करून बोला. सत्ताधारी पक्षांची जी भावना आहे त्यावर आम्हाला सहयोग दया. भविष्यात तुमचा पण असा मुददा असेल जो खरोखर साथ देणे योग्य असेल. तेव्हा सत्ताधारी पण तुमच्या सोबत असेल, दोन लक्षवेधी सूचना दिल्या एक विपक्षाची होती, ती योग्य वाटली आम्ही ती स्विकारली. रद ्द नाही केली. त्यावर चर्चा करण्यासाठी तयार आहोत. स्थगन प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर लक्षवेधी शेवटी घेण्यात यावी. आयुक्त सर्व पक्षाचे आहेत. कधी ते शिवसेना कार्यालयात सुध्दा जावून बसू शकतात तर कधी भाजपात तर कधी कॉंग्रेस कधी एन.सी.पीच्या कार्यालयात बसु शकतात. आयुक्त सर्वांना समान वागणुक देतात सर्वांकडे जावून बसु शकतात. त्यांना सर्वांचे ऐकायचे आहे. सर्वांचे काम करायचे आहे. अशी मी आयुक्तांकडे अपेक्षा करतो. आता सभागृहसमोर आयुक्तांनी जो गोपनिय अहवाल शासनाकडे पाठवला आहे ते कोणतीही भिती न बाळगता सांगावे भले ते महापालिका बरखास्त करण्यासाठी असो किंवा पुन्हा नगरसेवकांसाठी असो त्याची माहिती कृपया सभागृहाला दिली तर बरे होईल. धन्यवाद.

--२९--

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>मा. महापौर, मी तर आयुक्तांना सल्ला देईल की त्यांनी आपल्या पदावरून राजीनामा दयावा. आधी निवडणुकीमध्ये उभे रहा म्हणजे त्यांना माहित पडले की आम्ही कसे तोंड देतो यांच्या निष्क्रीयतेमुळे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी,.......

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>मा. महापौरजी या सभागृहाने अजुन आमची भावना ओळखली नाही. आम्ही फक्त चर्चा नाही करू इच्छित.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>परंतु, हे चुकीचे आहे विपक्षाला बोलु दिले नाही.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>मा. महापौर, श्री. दिलीप लालवानी यांना खाली बसवा. हि दादागिरी आहे. विपक्षाच्या लोकांना का बोलु दिले जात नाही. आमच्या लोकांना बोलु दया.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>काही विपक्ष सदस्य :-</u>हे लोक कधीही उभे राहुन बोलतात.

<u>काही सत्ताधारी पक्ष सदस्य :-</u>तुम्ही खाली बसा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>विपक्षांना बोलु देत नाही तुम्ही नेहमी दादागिरी करतात.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>तुम्ही सत्ताधारी पक्षात आहात तर काय झाले काहीही करणार?

<u>मा. उपमहापौर:-</u>जरा सर्वांनी शांत बसा.

<u>मा. महापौर:-</u>जमनुजीला बोलु दिले जावे तुम्ही सर्वजण बसा. एकेक जण बोला.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>आयुक्तांनी नगरसेवकांवर आरोप लावून ठेवला आहे तुमची इच्छा आहे का की महापालिका बरखास्त व्हावी.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-</u>आयुक्त साहेब तर शिवसेनेच्या कार्यालयात जातात बोलण्यासाठी आम्ही कुठे जावून बोलणार? आम्ही इथेच बोलणार त्यांच्याशी.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u> आयुक्त स्वत: असक्ष आहेत. ते कोणत्त्याही त-हेने जनप्रतिनिधींवर आरोप नाही लावू शकत.



<u>काही विपक्ष सदस्य :-</u>यांना खाली बसायला सांगा. आम्ही पण नाहीतर असेच बोलु.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>तुम्ही कोणत्त्या सरकारी योजनेचा लाभ या शहराला दिला. कर वसुली तुम्ही वाढवली का? सफाई विभागासाठी काय केले? मुलभुत सेवा आमच्यासाठी काय दिल्या.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>मा. महापौरजी, हा तुमचा अपमान आहे. यांना खाली बसवा.

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी, जेव्हा सत्ताधारी पक्ष बोलत होता. तेव्हा विपक्ष गप्प बसले होते. सभेमध्ये विपक्ष बोलण्याचा प्रयत्न करतो तेव्हा सत्ताधारी पक्ष मध्ये बोलण्याचा नेहमी प्रयत्न करतो. आता मी बोलेन कुणी ना कुणी नक्की मध्येच बोलेल. सभागृह नेता काय म्हणतात एका व्यक्तीने एकाच वेळी बोलावे. तरी पण मी त्यांचा मान ठेवून ते दुस-यांदा बोलले मी त्यांना बोलु दिले.*

*<u>मा. महापौरः-</u>जमनुजी तुम्हाला पण बोलण्याचा पुर्ण अधिकार आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>आपणांस जे बोलायचे आहे आपल्याला जे विचार प्रकट करायचे आहे ते करा.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मुददा हा आहे की सत्ताधारी पक्षाने गुपचुप बसुन ऐकावे.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>माफ करा. तुम्ही आम्हाला निर्देश देवू नका भावना सर्वांची एक आहे.*

*<u>काही विपक्ष सदस्यः-</u>परत मध्ये हेच बोलले.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>आम्ही जमनुजीच्या विचाराशी सहमत आहो. आम्ही नाक, डोळे, तोंड बंद करून बसतो.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौर, उपमहापौर, सर्व सदस्य एक म्हण आहे की सत्य हे कडू असते. जेव्हा जेव्हा कोणी खरे बोलण्याचा प्रयत्न केला तेव्हा लोकांना ऐवढे वाईट वाटले आणि मध्ये उठुन ते बोलतात.*

*<u>मा. उपमहापौरः-</u>जमनुजी आपण महापौरांच्या आदेशानुसार भुमिका मांडु नका तुम्ही मुदयावर या. खुप झाले तुम्हाला काय बोलायचे आहे ते बोला. मा. महापौरांनी तुम्हाला बोलण्याची अनुमती दिली आहे तुम्हाला जे बोलायचे आहे ते बोला. आपण मुददयावर या भुमिका मांडु नका.*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>हे सर्वांसाठी लागु असले पाहिजे.*

*<u>मा. उपमहापौरः-</u>ते बोलतच नाही त्यांना बोलायला सांगितले तर.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>स्थगन प्रस्ताव आणुन आम्ही सत्य समोर आणले आहे. आणि ते सर्वांना कडु लागत आहे.*



*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>सभागृहात जो स्थगन प्रस्ताव आणला आहे. ते खरे आहे. आम्ही मानतो तुम्ही सत्य जाणले आहे ते बरोबर आहे. जेव्हा एखादा ड्रायव्हर गाडी चालवतो. माझ्या गोष्टीमध्ये भुमिका आहे. जेव्हा एखादा ड्रायव्हार गाडी चालवतो तेव्हा तो मागे बसलेल्या कंडक्टरला नाही म्हणत की गाडीचा ॲक्सीडंट झाला. मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. जर नविन पत्रकार सभागृहात बसला असेल त्याला हे माहित नसेल की सत्ताधारी पक्ष महापौरांच्या उजव्या बाजुला आहे की डाव्या बाजुला.*

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-ही आमची महानता आहे आम्ही सर्वांना समान वागणुक देतो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपंचदानीः-परत मध्ये बोलले, मध्ये बोलायची सवयच आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-पाणी पुरवठा विभाग सभापती पाण्यासाठी नगारा वाजवत आहे. सेनीटेशनचे सभापती स्वच्छतेविषयी बोलत आहेत आणि अतिक्रमण विभागाचे सभापती अतिक्रमणाच्या गोष्टी सभेमध्ये आणत आहेत. आश्चर्याची गोष्ट आहे. सभापतींचा मुददा सभागृहात आला होता ज्यांच्यावर उल्हासनगर महानगरपालिका २० लाख रू. खर्च करते. आम्ही म्हंटले होते की प्रभाग समिती बनवा विशेष समित्त्या बनवु नका. परंतु चार प्रभाग समित्त्या, आठ सभापती ते म्हणाले होते की अंकुश लावला जाईल प्रशासनावर. परंतु आज शासन पुर्णपणे असफल झाले आहे. मला असे वाटते की रेल्वेचा अपघात झाला तर दिल्लीमध्ये बसलेले रेल्वमंत्री राजीनामा देतात. शहराची अशी स्थिती आहे तर आताच्या आता तुम्ही राजीनामे दिले पाहिजे. व नंतर स्थगन प्रस्तावावर चर्चा केली पाहिजे. खुर्चीवर बसले आहात १५ हजार रू. गाडीचा भत्ता घेत आहात. आणि सांगत आहात शहरात सफाई नाही. फारच शरमेची गोष्ट आहे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

सत्ताधारी सदस्यः-पुर्ण देश फेल झाला आहे श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी राजीनामा दयावा.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-भले दहा दिवस लागो तुम्ही राजीनामे दया आम्ही तुमच्या सोबत आहोत.

मा. सदस्य श्री. देंवद्रसिंग खेमाणीः-राम मंदीर अजुन तयार नाही झाले तुमची सरकार फेल झाली आहे.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-गुजरातमध्ये जिंकले आहेत, पेढे येथे वाटत आहेत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-खुर्चीला फेविकॉल लावला आहे. खुर्चीची लालूच सोडा आणि शहरासाठी काम करा.

मा. सदस्य श्री. देंवद्रसिंग खेमाणीः-पुर्ण शहरात दंगे होत आहेत, केंद सरकार का नाही राजीनामे देत.



मा. उपमहापौर(श्रीम. जया साधवानी):-श्री. जमनु पुरस्वानीजी तुम्ही असभ्य भाषा वापरू नका. नाहीतर मी पण तिथे खाली येवून असभ्य भाषा बोलु शकते.

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>असभ्य भाषा मी नाही वापरत तुमचे सत्ताधारी सदस्य वापरतात. मी काही असभ्य भाषेचा वापर केलेला नाही. असभ्य आम्ही शिकलोच नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>दंगे भडकवतात आणि निवडणुका जिंकुन येतात.*

*इकडे सत्ताधारी आणि विपक्ष सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते. श्री. राज असरोंडकर यांनी पाण्याची बाटली खाली फेकली.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>पाण्याची बाटली फेकतात कोणती सभ्यता आहे?*

*<u>मा. उपमहापौरः-</u>तुमच्या कानात कापुस ठेवला आहे तुम्हाला श्री. जमनादास पुरस्वानीचे बोलणे ऐकु येत नाही.*

*<u>मा. महापौरः-</u>श्री. जमनुजी तुम्ही योग्य भाषा वापरा.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मी कोणत्त्या असभ्य भाषेचा वापर केला ते सांगा.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>महापौर किंवा उपमहापौर दोघांपैकी एकानेच बोलावे काही समजत नाही.*

*<u>मा. उपमहापौरः-</u>मी महापौरांच्या परवानगीनेच बोलत आहे. तुम्ही परवानगी न घेता बोलत आहात.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>तुम्ही कशाला मध्येच बोलता.*

*<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>आता महापौर बोलत आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री. देंवदसिंग खेमाणीः-</u>जेव्हा पण विपक्ष सदस्य काही बोलतात पुर्ण वातावरणच बिघडवून टाकतात.*

*<u>मा. महापौरः-</u>ज्या मुददयावर चर्चा चालु आहे त्याच्यावरच बोला ना.*

*<u>काही विपक्ष सदस्य :-</u>माईक का बंद केला आहे आमचा.*

*<u>मा. उपमहापौरः- </u>मा. महापौरांनी केला आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणेः-</u>ही सभा इथेच स्थगित करा. पुढे चालवुच नका.*

*<u>काही विपक्ष सदस्य :-</u>आमचा आवाज बंद नका करू.*
*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वनीः-</u>'यात-हेने जेव्हा सत्ताधारी पक्ष असफल ठरला आहे परंतु जाणुन बूजुन दुस-यावर तो आरोप ठेवत आहे. ९७ मध्ये*



*नगरपालिका होती येथे एक मुख्य अधिकारी होता. फक्त एकच अधिकारी त्या शहराचे कामकाज सांभाळायचा. आणि आता आपल्याकडे एक सक्षम आय.ए.एस. अधिकारी आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>आम्ही पण तेच म्हणत आहोत.*

*<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>श्री. जमनादास आता बरोबर बोलत आहेत इतके अधिकारी असताना काम का होत नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>एक सक्षम आय.ए.एस. अधिकारी असुन देखिल हे जे सत्ताधारी पक्ष खुर्चीवर बसले आहेत.*

*<u>मा. उपमहापौरः-</u>तुम्ही पण तर खुर्चीवर बसला आहात ना? बसला नाहीत का?*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>आम्हाला खुर्ची दिली तर असा प्रसंग येणार नाही.*

*<u>मा. उपमहापौरः-</u>जनतेने तुम्हाला नाकारले आहे. आम्हाला का नाकारले नाही. जनतेशी जावून भांडा, बाहेर जावून ओरडा. चला बाहेर जावून ओरडा. जनतेने तुम्हाला ठुकरावले आहे.*
*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>जनतेने तुम्हाला काम करण्यासाठी इथे निवडुन आणले आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>भाजपा गटनेत्त्यांना त्यांचे म्हणणे तर पुर्ण करू दया.*

*<u>मा. उपमहापौरः-</u>तुम्ही मुख्य मुदयावर बोला. शहर तुमचे पण आहे, आमचे पण आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>महापौर महोदया भाजपा गटनेत्त्यांना त्यांचे म्हणणे तर पुर्ण करू दया.*

*<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>यात-हेने सत्ताधारी पक्षाने आणलेला स्थगन प्रस्ताव यासाठी आणला कारण की ते स्वतः नाकामयाब झाले. ही गोष्ट पुर्णतः खरी आहे. परंतु यामागे जे सत्ताधारी पक्षाचे खुर्चीवर बसलेले जे अधिकारी व सभापती आहेत त्यांना मी कारणीभुत समजतो आणि सांगतो की कृपया सकाळी लवकर उठुन आपल्या प्रभागात जा आपल्या प्रभागाचे काम करा. असे जर फीरलात तर बरे होईल. खुर्चीवर नुसते बसुन राहिलात तर काही होणार नाही. धन्यवाद जयहिंद, जयमहाराष्ट्र.*
*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मा. महापौरजी, चर्चा खुप झाली आता दोन गोष्टीचा खुलासा झाला पाहिजे. गोपनिय अहवाल शासनाकडे काय पाठवला ते आयुक्तांनी सांगावे. व कर वसुली व पाणीपट्टी वसुली बाबत व सेनीटेशन बाबत अतिरिक्त आयुक्त श्री. आर. के. सोनवणे साहेब सांगतील. श्री. जमनादास पुरस्वानी आमच्यावर आरोप लावत आहेत. आमचा असा काही विचार नव्हतो. आमचा उददेश आहे की, महासभेसमोर जे शासनाला पाठवले जेव्हा नगरसेवकांना स्थानिक स्वराज्य संस्थेतर्फे प्रशिक्षण देण्यात आले होते त्यावेळी सांगितले होते की, जर आयुक्तांनी गोपनिय अहवाल शासनाकडे पाठवला असेल आणि तो*

पाहायचा असेल तर सदनात आम्ही विचारू शकतो. हे लक्षात ठेवून आम्ही हा मुददा उपस्थित केला. तुम्ही म्हणता आम्ही सत्ता सोडावी. ५४संख्या असणारे सत्ता सोडणार तर काय २० संख्या असणारे सत्ता चालवणार. तर हे होवू शकत नाही. माझी आपणांस विनंती आहे की, तुम्ही सत्तेचे भुकेले आहात, दोन वर्ष तुम्ही शिवसेनेत होतात नंतर आमच्याकडे होतात. आता भाजपा कडे आहात. इकडे या म्हणणे सत्ता असेल.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>आम्ही तुम्हाला सभापती बनवु.

<u>मा. उपमहापौरः-</u>आम्ही तुम्हाला सभापती बनवु हे आमचे आश्वासन आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>याचा अर्थ अजुन तुम्हाला आमच्या सारख्या नेत्त्याची गरज आहे.

<u>मा. उपमहापौरः-</u> ,तुम्हाला नेता कोण बनवले आहे?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>शहराच्या जनतेने बनवले आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>गगगगग आम्हाला जे इथे पेढे दिले गेले. मा. मुख्यमंत्री श्री. मोदी यांची निवड झाली कोणत्त्याही पक्षाचे असो जनतेने त्यांना निवडले आहे. आम्ही पण त्यांचे अभिनंदन करतो. दोन दोन पेढे खाल्ले परंतु कित्येकदा असे मुददे आले की आम्ही पेढे वाटले तुम्ही तर ते घेतले देखिल नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. देंवेंदसिंग खेमाणीः-</u>तुम्हाला ऐवढा पण शिष्टाचार नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आम्ही आशा ठेवतो आम्ही तुमचे पेढे खाल्ले तुम्ही पण आमचे पेढे खाल.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>मा.महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब पहिल्यांदा तुम्ही लक्षवेधी सूचना आणली आम्ही त्याला मदत केली. दुस-यांदा आम्ही लक्षवेधी आणली पाण्यासाठी त्यावेळी तुम्ही ती मान्य नाही केली. आता तिस-यांदा तुम्ही स्थगन प्रस्ताव आणला आहे. म्हणजे एकाच वेळी तीन-तीनदा तुम्ही तुमचे धोरण बदलत आहात हे राजकारण नाही तर अजुन काय आहे? त्यांनतर आता श्री. किशोर वनवारी म्हणाले ते मा. बाळासाहेब ठाकरेंसाठी नव्हते बोलले. बे अेके बे, बे दुने चार हे प्रकाश महाडिक साठी ते म्हणाले. त्यावेळी तुम्ही असे म्हणालात आज तुम्ही तेच करत आहात.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>श्री. चव्हाणजी आम्ही शहरात काम करू इच्छितो म्हणुन प्रस्ताव आणला आहे. तुम्हाला ही गोष्ट मान्य नाही तुम्ही तर विरोध करतच आहात.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>आधी परिस्थिती खराब असते मग चांगली असते असा बदल होतो का?

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>तुम्हाला आमच्या कामाची पध्दत नाही आवडत तर तुम्ही मेहरबानी करून गप्प बसा.

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>तुम्ही कोण आम्हाला सांगणार गप्प बसा.*



*<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>आम्ही गप्प बसलो तर तुम्ही लगेच तयार व्हाल. श्री. रमेश चव्हाण विरोधी पक्षनेता आहेत त्यांच्याशी बोलताना जरा शिस्तीत बोलत जा.*

*<u>मा. सदस्य श्री. देंवेद्रसिंग खेमाणीः-</u>यांना राजकारण दिसत आहे याचा अर्थ हे साफसफाई पाणी पुरवठा कर वसुली याबाबतीत संतुष्ठ आहेत मेहरबानी करून यापुढे या मुददयांवर त्यांनी विरोध दर्शवू नये अशी मी आशा करतो.*

*<u>मा. महापौरः-</u>आता मी सर्व सदनाला सांगते की पुढचे विषय आहेत त्यावर चर्चा होवू दया. श्री. सोनवणे साहेब खुलासा करा. आता कोणाही सदस्यांनी चर्चा करू नये.*

*<u>मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, मा. उपमहापौर महोदया, मा. आयुक्त, सभागृहात उपस्थित सर्व सन्माननिय सदस्य या सभागृहातील माझे हे पहिलेच निवेदन स्थगन प्रस्तावाच्या रूपाने होत आहे. आणि स्थगन प्रस्ताव हा माझ्याकडे जे तीन विभाग देण्यात आलेले आहेत....*

*<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>कृपया हिंदीमध्ये बोला.*

*<u>मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>माझ्या माहितीप्रमाणे या सभागृहाच्या कामकाजाची भाषा मराठी आहे. म्हणुन मराठीत बोलण्याचा मी प्रयत्न केला.जर सन्माननिय सदस्यांना मराठीत समजले नाही तर मी नक्कीच हिंदीत बोलेन. व मला शक्य झाल्यास इंग्रजीमध्ये पण निवेदन करेन. ठिक आहे सर्व सभागृहाची इच्छा असल्यामुळे मला हिंदीत निवेदन करायला काही अडचण नाही. मा. महापौर महोदया,शहरातील सर्व नागरीकांच्या जीवनावश्यक गरजा ज्या आहेत त्यांच्याबाबत या सभागृहात आज चर्चा होत आहे. येथील सर्व नगरसेवकांचे निवदेन ऐकल्यानंतर एक गोष्ट दिसुन आली की, येत्त्या कालावधीत सर्वात गंभीर समस्या जी आहे ती आहे एक म्हणजे या शहरातील सॅनिटेशनची व दुसरी आहे शहरातील पाणी पुरवठा वाटपाची, पाण्याच्या वितरण व्यवस्थेची त्यात कसे काम केले पाहिजे. किंवा या सदनाची अपेक्षा काय आहे. त्याबाबत खुपशी माहिती मिळाली.या शहरातील पाणी वितरण व्यवस्थेबाबत मी मागील पंधरा दिवसात जी पण माहिती गोळा केली आहे त्याआधारावर मी या सभागृहास विश्वासाने सांगु इच्छितो की या शहरास पाण्याची कमतरता नाही. येथील पाण्याची जी वितरण व्यवस्था आहे ती खुप जुनी आहे म्हणुनच खुपशा समस्या निर्माण होतात. आज परिस्थिती अशी आहे की कित्येक लोकांना बारा तासा पेक्षा जास्त पाणी मिळते व काही लोकांना एक तासही व्यवस्थित पाणी येत नाही. या शहरातील सर्वात सेनसिटीव्ह झोन जो आहे त्यामध्ये मी या शहराचा सेक्शन नं. २० , २१, २२ गोलमैदाना काही विभाग ज्यात काही महिन्यापुर्वी व्यवस्थित पाणी येत होते. परंतु आता पाणी व्यवस्थित येत नाही. तसेच शास्त्री नगर यासारखे तीन चार विभाग आहेत ज्या विभागात खुपच कमी पाणी येत आहे. आम्हाला या महानगरपालिकेला एम.आय.डी.सी सारख्या संस्थेवर अवलंबुन रहावे लागत आहे. आज या शहराची २००१सालानुसार लोकसंख्या पहाता व जे पॉप्युलेशन या शहरात व्यापा-याच्या दृष्टीने ते पाहिले असता या शहरास ८४ एम.एल.डी. पेक्षा जास्त पाण्याची आवश्यकता नाही. जे नॉन्स आहेत त्या नॉन्सच्या हिशोबाने प्रत्येक व्यक्तीस प्रती दिन १४० लिटर पाणी जरूरीचे असते. व आता आम्ही जे पाणी देत आहोत त्या हिशोबाने पहाता १८० लिटर प्रतिदिन प्रत्येक व्यक्तीस जास्त पाणी दिले जात आहे. परंतु विषम वितरण*

व्यवस्थेमुळे शहरातील सर्व व्यक्तीस, प्रत्येक व्यक्तीस जेवढे पाणी मिळायला पाहिजे तेवढे मिळत नाही.

--३६--

आम्ही एम.आय.डी.सी कडुन टॅपींग पॉइंटने पाणी घेतो.व टॅपींग पॉइंटने जेवढे पाणी यायला पाहिजे तेवढे पाणी कधी येत नाही. मी उदाहरणाच्या रूपाने एक सांगु इच्छितो या महिन्याच्या १ तारखेपासनु कोणत्त्या टॅपिंग पॉइंटने किती पाणी आले ते जर आपल्याला सांगितले व किती यायला पाहिजे ते जर आपणांस सांगितले तर आपणासं समजेल की जेवढे पाणी यायला पाहिजे तेवढे पाणी काही दिवस सोडले तर तेवढे पाणी आज पाले गावाचा जो टॅपिंग पॉइंट आहे तेथे आम्हाला ३४ एम.एल. डी. ॲशूअर्ड केला आहे. परंतु तेथे आम्हाला ३४ एम.एल.डी पेक्षा कमी ज्यादिवशी पाणी येते त्यादिवशी त्या पाले टॅपिंग झोनपासुन जेवढया विभागास पाणी मिळते त्या विभागावर परिणाम होतो जर कमी पाणी मिळाले तर. जर ३४ चे ३२ झाले किंवा ३० झाले तरी काही विभागावर परिणाम होतो कारण की या शहराची भौगोलिक रचनाच अशी आहे. काही भागात पाणी जास्त मिळते जेथे सखल भाग आहे व उंचावर जो भाग आहे त्याठिकाणी पाणी यामुळे कमी मिळते ज्यादिवशी पाले टॅपिंग पॉइंटला ३४ पेक्षा कमी पाणी मिळते. तुमची न्युएमबीआर जी आहे त्याची कॅपिसीटी तर १०० एम.एल.डी आहे परंतु आम्हाला ३२ एम.एल.डी. कमीत कमी पाणी मिळावयास पाहिजे. जे तर मिळाले तर योग्य वितरण होवू शकेल. ओल्डएमबीआर जे आहे तेथे २५ एम.एल.डी. पाणी मिळावयाचा पाहिजे. तेथे पण २५ एम.एल.डी. पेक्षा कमी पाणी मिळते. शांतीनगर टॅपिंग पॉइंट जो आहे तेथे १२ एम. एल.डी पाणी मिळावयास पाहिजे परंतु मागील वीस दिवसाचे ॲवरेज आहे. सर्वात प्रमुख गोष्ट पाहिली गेली तर पाण्याचे वाटप कार्यक्षम करण्यासाठी जे जलकुंभ हवे त्यांची संख्या कमी आहे. जर आपण निकष काढला तर आपणांस महित असेल की तांत्रिकदृष्टया शहराला पाणी पुरवठा होतो त्याच्या <u>१/३</u> कमीत कमी जलकुंभ पाहिजे. आज ११० पाणी एम.एल.डी. दिले जाते. परंतु आपल्याकडे फक्त तीन जलकुंभ आहेत त्यांची क्षमता ४. १० एम.एल.डी पेक्षा जास्त नाही. सात जलकुंभ बांधण्याचे शहरात जे काम चालु आहे. ते पण लक्षात घेतले तर २४ एम.एल.डी. पेक्षा जास्त पाणी पुरवठा होण्याची क्षमता नाही. ऐवढेच नव्हे तर शहरातील ज्या वितरण वाहिन्या आहेत त्याचे डायमिटर आहेत त्यांच्या पेक्षा कमी व्यासाची वाहिनी फीडरच्या रूपात यात दाखविली आहे. म्हणजे जर पाणी वितरण वाहिनी १६ इंचाची असेल तर १२ इंचाची फिडर लाईनवर १६ इंचाची लाईन दिली आहे. तांत्रिक बाबतीत आमचे अभियंता बरोबर सांगु शकतील. परंतु मागील पंधरा दिवसात मी काही माहिती गोळा करण्याचे प्रयत्न केले. ती माहिती जाणुन घेण्याचा प्रयत्न केला व ती मिळवली त्याने मला असे वाटते की येथे पाण्याच्या वितरण व्यवस्थेत सुधारणा करून आणणे आवश्यक आहे. व मागील काही दिवसात जलकुंभ बांधण्याचे काम चालु आहे. त्यातील काही जलकुंभ ३१ मार्च पर्यंत पुर्ण होण्याची संभावना आहे व २ जलकुंभ जुन २००३ पर्यंत पुर्ण होण्याची आशा आहे. परंतु जलकुंभ असून देखिल जर पाणी वाटप व्यवस्थेत सुधारणा नाही केली तर पाणी लोकांना नीट मिळणार नाही. कारण की जलकुंभाव्दारे पाणी आपण आपल्या क्षेत्रापर्यंत आणु शकतो. परंतु प्रत्येक घराला, कुटूंबाला जर योग्य त-हेने पाणी दयायचे आहे तर पाणी वाटप व्यवस्थेत सुधारणा आणली पाहिजे. ते झाल्यावरच पाणी व्यवस्थीत सर्वांना मिळेल. काही क्षेत्रात पाणी बरोबर मिळत आहे. तिथे पण थोडया वर्षाने ही पाणी वाटप बरोबर नसल्याकारणाने किंवा असक्षम असल्याने समस्या निर्माण होवू शकतात. म्हणुन मी सदनाला विनंती करू इच्छितो की पाणी वाटप पध्दत बरोबर होण्यासाठी जी काही व्यवस्था असेल जलकुंभाच्या माध्यमातुन आणण्यासाठी ज्या काही योजना तयार केल्या जात आहेत. ते सदनासमोर ठेवून आम्हाला लवकरात लवकर मंजुरी दयावी लागेल. त्यांनंतरच पाणी वाटप व्यवस्था बरोबर होवू शकेल.

परंतु आता जलकुंभ बांधण्याचे काम चालु आहे. मला वाटते मार्च नंतर आपल्या शहरात पाणी वाटप स्थितीत बरीच सुधारणा होवू शकेल. साफसफाईचा जो प्रश्न आहे. साफसफाईमध्ये आमचा जो कर्मचारी वर्ग आहे १४ सॅनीटरी इंन्स्पेक्टर आहेत. ११८९ सफाई कामगार आहेत. चार प्रभाग समित्त्या तयार केल्या आहेत. आपल्या क्षेत्रात ती संख्या पुरेशी आहे असे मला वाटते. जर सफाई कामगारांनी काम



नाही केले तर मुकादमांनी कार्यवाही करून किंवा त्याचा रिपोर्ट सॅनिटरी इन्स्पेक्टरला दिला पाहिजे. सफाई कामगार आणि मुकादम दोघेही काम नसतील करत तरी इन्स्पेक्टरला रिपोर्ट दिला पाहिजे. जर तिघांनी काम नाही केले तर इकडे उपायुक्त आहेत त्यांनी कार्यवाही केली पाहिजे. आज पंधरा दिवसात मी पाहिले आहेत की लोक काम करत नाही यावर माझा विश्वास नाही. सफाई अभियान जे आम्ही एका आठवड्यासाठी घेतले. ज्यामध्ये प्रत्त्येक प्रभागातील सकाळी सात ते दुपारी १२ पर्यंत जे मुख्य रस्ते आहेत शहरात ते साफ केले जावे. व १२ वाजेपासुन दुपारी ३ वाजेपर्यंत एकेक प्रभाग घेवून, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियाना अंतर्गत एकेक प्रभागामध्ये पुर्ण सफाई केली जावी. ज्या पध्दतीने ते काम व्हावयास पाहिजे होते त्या पध्दतीने ते झालेले नाही. हे मी मान्य करतो. जेवढी सफलता त्यामध्ये मिळावयास पाहिजे होती ती मिळाली नाही हे सुध्दा मी मान्य करतो परंतु ही सुरूवात आहे. व मला असा रिपार्ट मिळाला आहे की, जे सफाई कामगार काम करत नव्हते ते आता हातात झाडू घेवन रस्ता साफ करताना दिसतात. गटारामधुन कचरा किंवा घाण जी काढायची असते ती ते काढतात. ज्या प्रभागात या अभियानाचा चांगला प्रतिसाद मिळाला त्या प्रभागाचे नगरसेवक स्वतः येवून मला भेटले व त्यांनी सांगितले की, आमच्या प्रभागात साफ सफाईचे काम चांगल्या प्रकारे होत आहे. काही प्रभागांमध्ये त्या अभियनात जेवढी सफलता मिळायला पाहिजे. तेवढी मिळाली नाही. त्या लोकांनी सुध्दा येवून मला सांगितले आहे की ज्या प्रकारे व्हावयास पाहिजे त्या प्रकारे झालेली नाही. ऐवढेच नाही की शहराच्या सफाईचा आरसा हा शहरातील जे मुख्य रस्ते असतात त्यांच्या साफसफाईवरून ठरते. बाहेरून जे लोक येतात ते शहरातील मुख्य रस्त्त्यांवरून जा ये करतात व रस्त्त्यांच्या बाजुला कचरा दिसला तर ते म्हणतात की या शहरामध्ये दुर्गंधी जास्त आहे. आम्ही सर्वजण मान्य करतो की या शहरामध्ये दुर्गंधी जास्त आहे. दोन घरांमधील ज्या नाल्या आहेत त्या कित्त्येक दिवसापासुन साफ केल्या नाहीत. परंतु मी आपणांस आश्वासन देवू इच्छितो की येणा-या काही दिवसात आम्ही प्रत्त्येक नाला, प्रत्त्येक रस्ता साफ करू व जास्त करून शहरातील मुख्य रस्ते, आमच्याकडे १२२ की.मी. रस्ते या शहरामध्ये आहेत. त्यामधील जे मुख्य रस्ते आहेत उदाहरणा दाखल कल्याण-अंबरनाथ रोड आहे किंवा शहाड स्टेशन पासुन आपल्या मुख्यालयापर्यंतचा रस्ता आहे. किंवा आपल्या मुख्यालयापासुन साईबाबा मंदीरापर्यंतचा जो रस्ता आहे असे काही मोजके जे रस्ते आहेत तेथे योग्य प्रकारे साफसफाई झाली पाहिजे. यासाठी आम्ही तीन लोकांचा एक गट तयार केला आहे त्यामध्ये दोन महिला सफाई कामगार, एक पुरूष सफाई कर्मचारी प्रत्त्येकाकडे सफाईसाठी योग्य ते साधन पाहिजे ते असे प्रत्त्येकावर मुकादम असेल व त्यांना बीट नेमुन दिलेली आहे. ५०० मी. ची एक बीट म्हणजे अर्ध्या कि.मी. ची एक बीट या तीन लोकांना सफाईसाठी दिलेली आहे. व हे तीन लोक अर्ध्या कि.मी. ची ही बीट सकाळी ७ वाजल्यापासुन दुपारी ३ वाजेपर्यंत साफ करतील. तेथे जेवढे काही कागदाचे तुकडे कचरा, प्लास्टिकच्या पिशव्या किंवा माती पडलेली असेल जे काही असेल ते उचलण्याचा बिल्कुल समयबध्द कार्यक्रम उदयापासुनच सुरू होईल. मुख्य रस्ते आपणांस स्वच्छ दिसतील. त्याबाबत आपल्या ज्या काही तक्रारी असतील त्याबाबत मी स्वतः आपल्या बरोबर प्रभागात येवून, या शहराची स्वच्छता जशी आपणांस हवी आहे तशी करण्यासाठी आम्ही आपणांस आश्वासन देतो. यासाठी

आम्ही प्रयत्न करू. तिसरी गोष्ट राहिली कराबाबतची मला वाटते की ही महानगरपालिका एका दुष्टचक्रात फसली आहे. महानगरपालिका शहरवासियांना योग्य प्रतीच्या सेवा पुरवू शकत नाही. महानगरपालिका लोकांच्या ज्या सुविधा आहेत त्या जसे की, वेळेवर पाणी पुरवठा, वेळेवर कचरा उचलणे, रस्त्यावरील दिवाबत्तीची कामे, रस्त्यामध्ये वाहतुकस काही अडथळा होवू नये म्हणुन या ज्या मुळ कमीत कमी शहरवासियांच्या अपेक्षा आहेत. त्या कमीत कमी अपेक्षा ज्या दिवशी महापालिकेकडुन पुर्ण होतील त्यादिवशी मला वाटते शहरवासी कर भरण्यासाठी आपोआप पुढे येतील. आज तर आम्ही विशेष चक्रामध्ये ते



तोडण्यासाठी सुरवात करण्याची जरूरत आहे. ती सुरूवात महापालिकेने केली पाहिजे आम्ही सुरवात देखिल केली आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, जितकी मालमत्ता आहे, तितके बिले जात नाही. मागच्या वर्षाचे उदाहरण घेतले तर १,३९,००० मिळकती शहरात आहेत. त्यात खुप तक्रारी आहेत. कुणा मालमत्तेला दोनदा टॅक्स लागला आहे. कुणाला अंडर ॲसेस केले आहे. कुणा संपत्तीची ॲसेसमेंटच झालेली नाही. एक माणुस कर भरतो, दुसरा त्याच्या शेजारचा भरत नाही त्याची मोठी बिल्डींग आहे त्याचे ॲसेसमेंट न झाल्याने त्याला बिल जात नाही. मला वाटते रिवाईज ॲसेसमेंटची गरज आहे. त्यासाठी एजन्सी नियुक्त करण्यात आली होती परंतु यश मिळाले नाही. हे काम पण परत करावे लागेल परंतु आज सर्वात मोठी आपल्याकडे आव्हान आहे ते म्हणजे जी मागणी आपण केली आहे यापुर्वी जी मोजमापणी झाली त्याची रिकव्हरी करणे. जर तुम्हाला माहित पडले की मागील ३१ मार्च २००२ मिळकत कर ४७ करोड ३८ लाख इतके आहे. येणारी जी मिळकत कराची मागणी आहे. ११ ते १२ करोड पेक्षा जास्त नाही. १,३९,००० इतक्या मालमत्ता आहेत. त्यांच्याकडुन ११ ते १२ करोड फक्त मिळालेत व आजपर्यंतची जी थकबाकी आहे जी ॲक्युमलेट होत आली आहे. ती आहे ४७ करोड ७८ लाख ती थकबाकी वसुल करण्यासाठी जी कालमर्यादा आणि प्रभावी पाऊल जे उचलले पाहिजे ते मेजर आम्ही आता सुरू केले पाहिजे. तुम्हाला ऐकुन आश्चर्य वाटेल. दोन दिवसात दोन हजार बिले आम्ही पोहचवली आहेत. आणि दोन दिवसाची वसूली जर तुम्ही पाहिली तर लोकांनी लगेच बिले भरण्यास सुरूवात पण केली. १८ तारखेला आम्ही बिले दिली. १९ तारखेची वसुली ११ लाखाची आहे. व आजची वसुली ९ लाखाची आहे. म्हणजे की, बिल सर्व्हे बरोबर न झाल्याने लोक कर भरण्यासाठी पुढे येत नव्हते. अशी माझी समज आहे. बिले दिल्यानंतरच आता कराची वसुलीमध्ये वाढ होईल मला पुर्ण विश्वास आहे की मागच्या वर्षीची जी ॲरीयस आहेत. ४७ करोड , पाणी पुरवठयाचे आहेत २८ करोड. चालु वर्षात मिळकत कर आणि वॉटर टॅक्स एकत्रित केला आहे. नॉन डॉमेस्टिक जे आहे, चार करोडची मागणी आहे. परंतु २८ करोड थकबाकी आहे. ही सर्व अेरीयस भरण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी ठेवला आहे. त्यात आधी बिल दिले जाईल. जर त्यांनी पंधरा दिवसात पैसे नाही भरले तर डिमांड नोटीस तजवीज केली जाईल. व यावेळी आम्ही ॲश्युअर करत आहोत जे ओव्हनर आहेत किंवा अक्युपायर आहेत त्यांनाच बिले दिली जावीत. कोणतीही कायदेशिर अडचण येवू नये म्हणुन पुर्ण प्रयत्न केले आहेत. जर काही कायदेशिर अडचण आली तर मालमत्ता जप्त करताना कायदेशिर अडचण येते. मालमत्ता जप्त केली तरी वसुली होवू शकत नाही. तर यावेळी पंधरा दिवसानंतर आम्ही डिमांड नोटीस इश्यु करू. जर त्यांनी पैसे नाही भरले तर कोणतीही तमा न बाळगता त्यांची मालमत्ता जप्त केली जाईल. मी सदनाला आश्वस्त करू इच्छितो की येणा-या तीन महिन्यात वसुलीचे जे उददीष्ट ठेवले आहे. ते ८० टक्के आहे. तिथपर्यंत पोहचण्यासाठी आपल्या सहकार्याची आवश्यकता आहे. तुम्ही सदनात जे आता प्रशासनाला सहकार्य देण्याविषयी जो उत्त्साह दाखवला त्यामुळे मला असे वाटते की आपल्या सहयोगाने थकबाकीची वसुली देखिल चांगल्या त-हेने करू शकु.

व महापालिकेच्या आर्थीक स्थितीबाबत नेहमी सांगितले जाते ती ठिक नाही. त्यात आम्ही काहीतरी सुधार करू शकु. तुमच्या सहकार्याने ही सुधारणा होवू शकते अशी आशा ठवतो व सदनाचे आभार मानतो. माझे म्हणणे तुम्ही शांतपणे ऐकुन घेतले त्याबददल आभारी आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>सोनवणे साहेब, एक दोन मुददे राहिले आहेत. तुम्हाला हाथगाडी विषयी निर्णय घेण्याचा जो कार्यभार आहे. आणि रस्त्यावर जे अतिक्रमण आहे त्याचा कार्यभार आहे. शहरात रस्त्यावर जे डिवायडर्स आहेत त्यावर देखिल रंग लावला पाहिजे. अतिक्रमण हटविणे, ना फेरीवाला क्षेत्र आम्ही जाहिर केले आहे. तिथुन हाथगाडया हलविणे ते आपण केव्हापासुन सुरूवात करणार?



<u>मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>शहराचे जे मुख्य रस्ते आहेत. आज हा विषय नव्हता म्हणुन मी उल्लेख केला नाही. या शहराची मोठी समस्या ही आहे की रस्त्यावर जो रहदारीस अडथळा येतो तो हॅाकर्समुळे येतो. रस्त्यावर वाहने उभी केली जातात. तिसरी जी समस्या आहे ती आहे स्लमची समस्या.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-</u>सन्माननिय महापौर, आम्ही लक्षवेधी या विषयावर ठेवली आहे. तेव्हा ही चर्चा होइलच. आता अतिरिक्त आयुक्तांनी नाही सांगितले त्यावेळी सांगावे. काय करणार आहेत? कधी करणार?

<u>मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, सभागृह नेत्त्यांनी जे विचारले त्याचे उत्तर देणे मी कर्तव्य समजतो म्हणुन मी उत्तर देत आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>अजुन एक गोष्ट साहेब, इतर महापालिकेत सफाईचे काम रात्री देखिल चालु असते तर उल्हासनगर महानगरपालिकेत सफाई कामगारांचे काम सकाळपासुन ते ३ वाजेपर्यंत संपते. ठेकेदाराला देखिल तेवढाच वेळ असतो तर रात्री सफाई होण्याबाबतीत आपले काय मत आहे?

<u>मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):-</u>मा. महापौर महोदया, रात्रीच्या सफाई बाबत जे विचारले आहे. जर तशी सुरूवात करायची असेल तर आमचे जे कर्मचारी आहेत त्यांच्या युनियनला नोटीस दयावी लागेल कारण कामाची वेळ बदलावी लागेल. युनियन बरोबर तशी चर्चा करून तो बदल करता येईल. किंवा रात्री जर सफाई करायची आहे मॅन्युअल नाही करायचे , पॅावर स्विपिंग करायचे असेल तर मुंबई मध्ये जसे, तसा विचार केला आणि तशी अंमलबजावणी होत आहे तर रात्री देखिल पॅावर स्विपिंगचा विचार होवू शकतो. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>धन्यवाद. सोनवणे साहेबांनी जी भुमिका सदनासमोर मांडली आम्ही त्यापासुन संतुष्ट आहोत. पंधरा वीस दिवसापुर्वी जो अधिकारी आला आहे त्यांचा काम करण्यामध्ये जो रस आहे तो किती अभ्यास करतो. व किती लवकर परिणाम दयायचा प्रयत्न करतो त्याचे उदाहरण श्री. आर. के. सोनवणे आहेत त्यांचे आम्ही अभिनंदन करतो. व त्याचबरोबर आम्ही आयुक्तांवर खुल्ला आरोप ठेवतो. जर एक अधिकारी पंधरा दिवसात ऐवढे रिझल्ट देतो. तर तुम्ही इतक्या महिन्यात तसा रिझल्ट दाखवत नाही आणि उलट नगरसेवकांवर आरोप ठेवता की ते तुम्हाला सहयोग देत नाही. महानगरपालिका बरखास्त केली पाहिजे ऐवढेच नाही तर वर्तमानपत्रात तुम्ही तसे लेख छापुन आणता. आणि त्यावर

तुम्ही खुलासा पण करत नाही. पंधरा वीस दिवसात जी करवसुली झाली जसे श्री. सोनवणे साहेबांनी सांगितले. इथले अधिकारी आणि कर्मचारी काम करू इच्छितात. कराची बिले नाही पोहोचली, जबाबदारी कोणाची होती? नक्कीच आयुक्तांची. शहरात अतिक्रमण वाढत आहे याला जबाबदार कोण? उपायुक्तांना निर्देश कोण देणार? जर पाणी वाटप बरोबर होत नाही तर याला जबाबदार कुणाला धरायचे? नक्कीच आयुक्त. जर साफसफाई व्यवस्थित झाली नाही, मुलभुत गरजा, सेवा पुरवल्या जात नाही याला जबाबदार कोण? फक्त आयुक्त. व आयुक्तांनी स्वतः ही जबाबदारी घेतली पाहिजे. जनप्रतिनिधीवर आरोप नाही लावले पाहिजे तर महाराष्ट्र सरकारवर किंवा आमदारांवर आरोप लावण्यात येवू नये. यशस्वी मुख्यमंत्री महोदयांवर आरोप नाही लावला पाहिजे. मला जेवढी माहिती मिळाली साफसफाई विभागासाठी जे साहित्य खरेदी करायचे



होते. त्यापैकी २० टक्के खरेदी करण्याचे आदेश दिले व बाकीचे कट केले पैसा नाही म्हणुन ही असक्षमता कुणाची आहे. तुम्हाला नगरसेवकांनी काय साथ दयावी. जकात दर वाढवुन ११ करून तुम्हाला वाढवुन दिले. नगरसेवकाचा निधी १० लाखाचा ४ लाख केला. त्यातुनही दोन लाखाचे काम झाले नाही. जनप्रतिनिधींनी अजुन तुम्हाला काय सहकार्य दयायचे? शासनाची जी योजना आहे दलित वस्तीसाठी जो निधी वापरायचा होता तो तुम्ही वापरला नाही. सुवर्ण जयंती, सुवर्ण रोजगार योजनेतील ४५ लाख रू. अकोला महानगरपालिकेकडे देण्यात आले.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>भुमिका दाखवत आहेत.

<u>मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकलः-</u>किती वेळ वाया घालवत आहात.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>भुमिका नका मांडु.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>एकुण मिलुन आयुक्त महोदय, तुम्ही वर्तमानपत्रात जे कथन केले वा शासनाकडे जे पाठवले ते निंदनिय आहे. आम्ही त्यांची निंदा करतो. व आपल्याकडे खुलासा मागतो त्याचबरोबर जनप्रतिनिधीसाठी महाराष्ट्र शासनाकडे जो अहवाल पाठवला आहे त्याचे स्पष्टीकरण इथे दयावे अशी आम्ही मागणी करतो.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-</u>महापौर महोदया व सहयोगी जेव्हा आमचे श्री. बोडारे साहेब बोलत होते की हा जो प्रस्ताव राजनितीने प्रेरीत आहे. आता आमचे सभागृह नेता व साथी आयुक्तांवर आरोप करत होते की तुम्ही चुकीचे बोलत आहात. परंतु आता जसे लालवानी म्हणाले त्यावरून तर स्पष्टपणे सिध्द होते की ज्यात-हने आयुक्तांवर आरोप लावले व अतिरिक्त आयुक्तांची प्रशंसा केली आणि दोघांमध्ये भांडण लावण्याचा प्रयत्न केला. त्यावरून हे स्पष्ट होते की हा जो ठराव आहे हा राजकीय हेतु सिध्द करण्यासाठी आहे अजुन काही नाही.

इकडे विपक्ष सदस्य शेम शेम म्हणुन ओरडत होते.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>ही काय राजनिती नाही आहे....

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>मा. महापौर मला हे विचारायचे आहे की अतिरिक्त आयुक्त कुणाच्या हाताखाली काम करतात.

*<u>मा. सदस्य श्री. देवंदसिंग खेमाणीः-</u>आधी मला बोलु दया.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. किरण मानेः-</u>अतिरिक्त आयुक्तांची प्रशंसा करतात आणि आयुक्तांची निंदा करतात.*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>मा. महापौर मला हे विचारायचे आहे की अतिरिक्त आयुक्त कुणाच्या हाताखाली काम करतात. आयुक्तांच्या देखरेखीखाली काम करत आहेत ना मग आयुक्त कसे निष्क्रीय झाले.*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>कधी कधी लहानां कडुन पण शिकावे लागते.*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>अतिरिक्त आयुक्त जे आयुक्त सांगणार तेच करणार ना.*

*--४१--*

*<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>'पाण्याचा जो ग्लास असतो तो अर्धा भरलेला असताना कुणाला वाटते अर्धाभरला आहे कुणाला वाटते अर्धा रिकामा आहे. तुम्ही त्यातले आहात ज्यांना अर्धा ग्लास रिकामा दिसतो आणि आम्हाला तो भरलेला दिसतो. असे का समजु नये की आयुक्तांना मॉरल बुस्टिंग करत आहोत. उपायुक्त का नाही शिकत प्रत्येकानी स्वतःची कार्यप्रणाली स्वतःच शिकली पाहिजे. आम्ही आयुक्तांना हे प्रेरणा देत आहोत.*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>आमच्या मते तर आयुक्तच हे काम करून घेत आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मा. महापौरजी, श्री. दिलीप लालवानी जे म्हणाले की वर्तमानपत्रात काही छापुन आले आहे. कात्रण त्यांच्याकडे आहे. आयुक्तांनी असे काही त्यात म्हंटले आहे की, नगरसेवक आम्हाला साथ देत नाहीत. मुख्यमंत्री महोदयांवर देखिल त्यांनी काही आरोप लावले आहेत. श्री. दिलीप लालवानी बोलत असताना त्याचवेळी असे पण म्हंटले की, मी आयुक्तांना विचारले तेव्हा ते म्हणाले की मी असे काही वर्तमानपत्रात दिले नाही. जेव्हा आयुक्तांनी त्याचवेळी त्यांना सांगितले की अशाप्रकारचे मी काही वर्तमानपत्रात दिले नाही आहे. तर त्या गोष्टीला वाढविण्याचा उगाचच प्रयत्न नाही केला पाहिजे. दुसरी गोष्ट अशी की, एकच मुददा वारंवार आणुन. मी मागील काही महिन्यापासुन पहात आहे की सत्ताधारी पक्ष या महासभेमध्ये आयुक्तांचे वारंवार अपमान करण्याचा प्रयत्न करतात हे एकदम चुकीचे आहे. आपले सत्ताधारी पक्षाचे हे काम नाही की आयुक्तांना वारंवार दोन तीन महिन्यानंतर अशाप्रकारचे काहीतरी मुददे आणुन काही ना काही बहाणा करून आयुक्तांवर हल्ला करावा. हे एकदम चुकीचे आहे. असे नाही झाले पाहिजे. जर आपणांस आयुक्तांविषयी काही तक्रार असेल तर आयुक्तांबरोबर बसुन त्यावर विचार विमर्श करू. असे काही बोलु नये हे काही चांगले नाही. यात काही सत्ताधारी पक्षाची शान नाही. आणि ती वाढत देखिल नाही म्हणुन मी तुमच्याकडुन आशा ठेवतो की यापुढे तुम्ही राईचे पर्वत करणार नाही. एक गोष्ट मी इथे बोलतो की आयुक्तांनी जर काही रिपोर्ट आमचे निवडुन आलेले जे सदस्य आहेत त्यांच्याविरूध्द जर काही अहवाल पाठविला असेल तर ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. व मला जेवढे माहित आहे स्थायी समितीमध्ये आयुक्तांना याविषयी विचारले असता आयुक्तांनी तिथे सांगितले होते की मी अशा प्रकारचा काही अहवाल पाठवला नाही. त्यानंतरही जर काही प्रस्ताव आला आहे तर आयुक्त साहेब आपण त्याचा खुलासा केला तर चांगले होईल.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सन्माननिय सदस्यांना हे माहित असले पाहिजे की आम्ही वारंवार मुददा उचलतो कारण की आयुक्तांनी पत्रकारांना, शासनाला सांगितले आहे. स्थायी समितीमध्ये त्यांनी स्पष्ट देखिल केले की मी तसा अहवाल दिला नाही त्यानंतर देखिल वर्तमानपत्रात छापुन आले. तुम्ही ही गोष्ट देखिल लक्षात ठेवली पाहिजे. सुरवातीपासुन आम्ही सांगत आहोत महासभेत खुलासा दया. एकदा नाही पन्नास वेळा स्पष्टीकरण दिले आहे. तुमचे काय उत्तर आहे. आपणांस असे वाटते की, त्यांनी समाधानकारक उत्तर दिले आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>आपली चर्चा संपल्यावर आयुक्त साहेब उत्तर देणार ना?*

*<u>मा. सदस्य श्री. देंवेंद्रसिंग खेमाणीः-</u>वर्तमानपत्रामध्ये नगरसेवकांविरूध्द जे छापुन आले आहे त्यासाठी जेव्हा श्री. दिलीप लालवानी यांनी निर्दशनास आणुन*



*दिले की तुमच्या नावाने वर्तमानपत्रात आले आहे. त्यांनी वैयक्तिकपणे सांगितले की मी काही असे बोललेलो नाही. परंतु वर्तमानपत्रात तर असे छापले आहे त्यांचे हे कर्तव्य आहे की त्यांनी त्याचे खंडन करावे. वर्तमानपत्रात त्यांनी तसे छापायला पाहिजे होते परंतु असे नाही केले याचे कारण आहे. जसे आमचे विरोधी पक्षाचे बंधु आहेत त्यांना प्रत्येक बाबतीत राजकारण दिसत आहे. सेनिटेशन, पाणी पुरवठा, कर वसुली यासाठी आम्ही जो स्थगन प्रस्ताव आणला आहे. त्यांना राजनिती दिसते. पंधरा दिवसापुर्वी आलेल्या अतिरिक्त आयुक्तांचे म्हणणे आम्ही जरा शांतपणे ऐकुन घेतो. त्यांनी ऐवढा चांगला अहवाल दिला त्यात पण त्यांना राजकारण दिसते. सव्वा वर्षापुर्वी आलेल्या आयुक्तांना आम्ही त्यांना नाही विचारणार तर कुणाला विचारणार आम्हाला जे काही सांगायचे आहे ते आम्ही मा. आयुक्तांनाच सांगणार. तुम्हाला प्रत्येक बाबतीत राजकारण दिसते याचे कारण एक आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>मा. महापौरजी....*

*<u>मा. सदस्य श्री. देंवेंद्रसिंग खेमाणीः-</u>श्री. मोहनदासजी मला माझे बोलणे पुर्ण करू दया.*

*<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>महापौरजी, आयुक्तांना सांगा तुम्ही खुलासा करावा.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. मीना सोंडेः-</u>मा. महापौरजी, विरोधी पक्ष नेत्त्यांनी पाण्यासाठी उपोषण केले होते ते काय राजकारण होते.*

*<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>मा. महापौरजी, जेव्हा अतिरिक्त आयुक्त कोणा नगरसेवकाबददल प्रभागाची समस्या पाहायला जात असतात तेव्हा आयुक्त म्हणतात तुम्ही नगरसेवकांना उगाच प्रोत्साहन देवू नका. आणि आयुक्त स्वतः कोणत्त्याही राजकीय पक्षाच्या कार्यालयात जावू शकतात. आयुक्त कार्यालय कशासाठी आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. देंवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, मला माझे बोलणे पुर्ण करू दया. विरोधी पक्षीय बंधूना आमच्या प्रत्येक गोष्टीत राजकारण दिसते. राजकारण करणारे आजच्या तारखेत उल्हासनगर शहरात आमचा हा आरोप आहे की, आमचे*

मा. आयुक्त महोदय हे राजकारण खेळत आहेत. मी त्यांना एक विनंती करतो की. इतक्या मोठ्या पदावर आय.ए.एस. अधिकारी असल्यानंतर त्यांना राजकारणाची ऐवढी हौस आहे त्यांनी हे पद सोडावे व आमच्या शहरात यावे इथे येवून निवडणुक लढावी. आम्ही त्यांना पुर्णपणे समर्थन देवू. व आमचा नेता बनवू. त्यांनी शहराच्या समस्येचे निवारण करावे अशी मी त्यांना विनंती करतो.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>मा. महापौरजी, श्री. दिलीप लालवानी यांनी स्थगन प्रस्ताव आणला आहे. श्री. लालवानीजी तुम्ही अतिरिक्त आयुक्त श्री. सोनवणे साहेबांनी कामाविषयी जे स्पष्टीकरण दिले आहे त्यापासुन खुश आहात. त्यांनी पंधरा दिवसात हे चांगले काम केले हे आपण कबुल करता. म्हणजे तुमच्या इच्छेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त मागील पंधरा दिवसापासुन चांगल्या त-हेने काम करत आहेत. प्रशासनातर्फे चांगला रिझल्ट देत आहे. तरी पण तुम्ही जर महिनाभर वाट पाहीली असती. नंतर स्थगन प्रस्ताव आणला असता तर बरे झाले असते. एका बाजुने आपण म्हणता की प्रशासनाचे



काम बरोबर नाही. प्रशासनाचे एक अंग असणा-या अधिका-याची त्याची तुम्ही पाठ थोपटत आहात याचा अर्थ काय? तुम्हाला स्थगन प्रस्ताव आणण्याची काही गरजच नव्हती. जर काम व्यवस्थित चालु आहे तर स्थगन प्रस्ताव का आणला? गरजच नव्हती. हेच तर आम्हाला म्हणायचे आहे. इतर विषय पण आहेत जर चागले काम चालु आहे. श्री. सोनवणे साहेबांसारखे अतिरिक्त आयुक्त इकडे आले आहेत. शासनाने त्यांना पाठवले आहे. पंधरा दिवसाच्या आत त्यांनी चांगले काम केले त्यांचे समाधान झाले तर मग स्थगन प्रस्ताव आणण्याची गरज काय?

<u>मा. सदस्य श्री रमेश चव्हाणः-</u>हे राजकारण आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>नाही. नाही महापौर महोदया हे आमच्यावर आरोप लावत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. देंवेंदसिंग खेमाणीः-</u>महापौरजी, हे राजकारण नाही आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>आधी आयुक्तांना खुलासा तर करू दया.

<u>मा. उपमहापौरः-</u>आयुक्त साहेब उत्तर देत आहेत.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>सन्माननिय महापौर महोदया, सन्माननिय सदस्य आजच्या महासभेमध्ये सन्माननिय सदस्य श्री. दिलीप लालवानी व श्री. दर्शनसिंग खेमाणी यांनी स्थगन प्रस्ताव आणला आहे त्याबाबत मी उत्तर देण्यासाठी उभा आहे. स्थगन प्रस्तावाच्या सूचनेमध्ये पाणी पुरवठा, साफ सफाई व महापालिकेच्या उत्पन्नाचा मुददा समाविष्ट आहे. त्याशिवाय सदनात अजुन दोन मुददे उपस्थित केले आहेत एक मुददा आहे की वर्तमानपत्रात ज्या काही बातम्या आल्या आहेत त्याबाबत आणि पाचवा मुददा आहे शासनास आयुक्तांनी काही अहवाल पाठविला आहे त्याबाबतीत सर्वांचे उत्तर मी देवू इच्छितो . हा जो कचरा साफसफाई, पाणी पुरवठा कर वसुली याबाबत खुप काही बोलु शकतो शहराचा आराखडा इथे आहे त्या स्टॅटस्टिक मध्ये मी जावू इच्छित नाही. थोडक्याच शब्दात मी सांगु इच्छितो. हा जो स्थगन प्रस्ताव आणला गेला आहे. मला असे वाटते जेव्हा मी या शहरात आलो त्याचवेळी खुपसे माझे मित्र वर्ग आहे त्यांनी मला सांगितले हे जे शहर आहे ते वेगळे आहे. त्यामध्ये प्रत्येक समस्या आहे. कच-याची समस्या

एक मोठी समस्या आहे. कच-याची साफसफाई होत नव्हती यासाठी इथल्या सन्माननिय नागरिकांना उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठवायला लागला. परंतु मी आल्यानंतर कोणतीही पी.आय.एल. दाखल झालेली नाही. या शहराच्या कोणाही नागरिकांने दाखल केलेली नाही. दुसरे असे की जेव्हा मी आलो त्याचवेळी डिसेंबर २०००मध्ये इथे कॉलरा झाला होता. जवळजवळ १०० लोकांना त्याची बाधा झाली होती. मे २००१मध्ये देखिल कॉलराची साथ आली होती. दोन तीन महिने ती साथ सुरूच होती. त्याने २५ -३० लोंकांना बाधा झाली होती. मी जुन २००१मध्ये आलो व त्यांनतर आम्ही जे काम केले त्यांनतर कॉलरा नष्ट झाला असे मी समजतो व त्याचे नाव निशाण पण आढळत नाही. या शहरात डेंगुचा ताप देखिल आला होता. तीन चार प्रकरणच डेंगुची आढळली परंतु आश्चर्याची गोष्ट ही आहे की जे शहर सर्वात घाण समजले जात होते त्या शहरात डेंगु महाराष्ट्राच्या खुपशा मुलखातुन आल्यानंतर इथे प्रादुर्भाव झाला आहे. तुम्ही तर सर्व वर्तमानपत्र वाचत असता. मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, नवी मुंबई व ग्रामीण भागात डेंगुची साथ आली व सर्वात शेवटी मला वाटते उल्हासनगरमध्ये आली. दुसरी एक गोष्ट मी सांगु इच्छितो जेव्हा पण पाऊस पडतो सर्व शहरात पुरसदृश्य स्थिती दिसुन येते मी आल्यानंतर जुन २००१व २००२च्या पावसाळयात साफ सफाई अशी झाली होती



की उल्हासनगर शहरात पुर आला तरी कुणाला बाधा झाली नाही. थोडेसे क्षेत्र सोडुन उल्हासनगर शहरात कोणत्याही भागात पुर सदृश स्थिती आढळली नाही. तुम्हाला सर्वांना माहित आहे ठाणे, डोंबिवली, कल्याण व खुपशा शहरात पुर परिस्थिती निर्माण झाली होती. आणि नागरिकांना खुप त्रास सहन करावा लागला होता. मला वाटते साफ-सफाई करण्याचा पुर्ण प्रयत्न केला आहे. हे जे संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान सुरू झाले आहे. याची सुरूवात आम्ही ऑगस्ट २००२मध्ये केली होती. आमच्याकडे पुर्ण अहवाल आहे. जसे की, रस्त्यावर माती पडली होती. बिल्डींग मटेरियल पडले आहे. मोठयाप्रमाणावर माती उचलली गेली, अजुनही ते अभियान सुरू आहे. ज्या शहराला अस्वच्छ शहर म्हंटले जायचे. कचरा साफसफाईसाठी लोकांना हायकोर्टात जावे लागत होते. आता अशी काही समस्या राहिली नाही परिस्थितीत बरीच सुधारणा झाली आहे. आम्ही समाधानी नाही अजुन सुधारणा करू इच्छितो आणि ती सुधारणा होईल असे मला वाटते. पाण्याविषयी जे चालु आहे मला आश्चर्य वाटते नागरिक नेहमी म्हणतात आज पाणी आले काल नव्हते आले. परत आले परत नाही आले. सभागृहात सुध्दा असे काही चालु आहे का? मागच्या दोन तीन महिन्यांच्या महासभेवर लक्ष दिले तर कधी म्हणतात पाणी येते कधी म्हणतात नाही येत हे काय चालले आहे. मला वाटते की, पाण्याची समस्या इथे जरूर आहे. पाणयाची आकडेवारी मी सांगितली आहे. या शहरात पाणी का कमी होते, पाणी आम्हाला मिळते. जसे आमचे अतिरिक्त आयुक्त म्हणाले ती कारण तर मी मागेच सांगितले होते. ३१ ऑगस्ट २००२च्या महासभेत सांगितले होते. खुपशी कारणे होती त्यात ही दोन कारणे प्रमुख आहे या शहरात पाण्याची वितरण व्यवस्था पध्दतशीरपणे नाही आहे. वितरण व्यवस्था खुप जुनी आहे. यात सुधारणा करणे अत्त्यावश्यक आहे. शहराची टोकोग्राफी उंचसखल आहे. मी त्याचवेळी हे सांगितले होते. कमीत कमी या शहराला १४ जलकुंभाची आवश्यकता आहे. आता इ.एस.आर. चे काम चालु आहे त्याचवेळी मी सांगितले होते की मार्च २००३ पर्यंत कित्त्येक जलकुंभाचे काम पुर्ण होईल नंतर आपली काहीतरी समस्या दुर होईल. पाण्याची समस्या सोडविण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. मी जेव्हा ठाणे महापालिकेत होतो, तेव्हा श्री. बक्षीसाहेबांकडे कार्यभार होता. त्यांनी मला सांगितले की पाण्याची खुप कठीण समस्या आहे तुम्हाला खुप काम करावे लागेल. त्यांच्याकडे एक मोर्चा आला होता. लोक मोठया प्रमाणावर भांडी घेवून आले होते.

मला वाटते आम्ही प्रयत्न करत आहोत. मी आल्यावर ऐवढा मोठा मोर्चा आला नाही. तरी पण आम्ही खुश नाही. पाण्यात सुधारणा करण्याचे आम्ही पुर्ण प्रयत्न करू. मला असे वाटते की त्यात आम्ही यशस्वी होवू.तुम्हा सर्वांना महिती आहे पहिल्या टप्याचे काम सुरू आहे. १८ . ८० करोडचे काम सुरू आहे. आता सुधारणा करण्यास सांगितली आहे हा प्रस्ताव आपल्यासमोर येईल त्याचे रिवाईज एस्टीमेंट २५ कोटी पर्यंत जावू शकते. दुसरा टपपा ४१ कोटीचा आहे. मार्च २००३नंतर ई.एस.आर तयार झाल्यानंतर काहीतरी सुधारणा होईल. व वितरण वाहिनीसाठी काहीतरी नेटवर्क तयार करू. तर या शहराची पाण्याची समस्या सुटून जाईल याशिवाय खुप काही कारणे आहेत शहरात पाण्याची समस्या खुप वर्षापासुन सुरू आहे. दुर्भाग्याची गोष्ट ही आहे की शासनाने आदेश दिले होते की ही जी पाणी पुरवठा योजना आहे ती ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालली पाहिजे. परंतु मी वांरवार आपणांसमोर दरवाढीचा प्रस्ताव ठेवला होता. आपण जे पाणी नागरिकांना देत आहोत एम.आय.डी. सीचा भाव प्रतिहजार लीटर ५रू. ७५ पैसे आहे आणि उलट आपण नागरिकांकडुन ३ रू. ७५ पैसे याचा अर्थ असा झाला की ज्या दराने आपण पाणी खरेदी करतो त्या दराने पाणी देत नाही कमी दरात देतो. यात अजुन समस्या निर्माण होणार आहे मी या माध्यमातुन तुम्हाला विनंती करू इच्छितो. अपील करू इच्छितो कमीत कमी पाण्याचे जे दर आहेत ते आम्ही ज्या दराने खरेदी करतो त्या दराने केले तर पाण्याची वितरण वाहिनी टाकण्यासाठी पैसा उपलब्ध होईल. मी टॅकरविषयी सुद्या अशीच सूचना दिली होती.सन्माननिय सदस्यांचे म्हणणे आहे.



पाण्याची समस्या आहे, आम्हांला टॅकरची गरज लागणार आहे. परंतु काय होते, ज्या माणसाला गरज नसते, तो देखील पाणी घेतो. प्रत्येक व्यक्तीची मानसिकता असते, विनामूल्य वस्तु मिळत असते, घेण्याची वृत्ती असते. या पाण्याच्या टॅकरवर कमीत कमी नाममात्र शुल्क जरी आकारले तर त्यावर खर्च कमी होईल. आणि तो पैसा विकासासाठी आपल्या कामी येईल. पाणी का कमी येते याची कारणे रिपीट करणे मला योग्य वाटत नाही. वसूली बाबत मी काही सेकंद बोलतो, याविषयावर आपली वारंवार चर्चा झाली आहे. डुप्लीकेट बिले चुकीची असेसमेंट याच सदनात याविषयी वारंवार चर्चा झाली आहे. यात सुधारणा होण्याची गरज आहे. आम्ही ते सुधारण्याच प्रयन्त करत होतो, परंतु काही अडचणी आल्या , त्यात आम्ही यशस्वी नाही होऊ शकलो. मला वाटते आपल्याला एक स्वतंत्र अधिकारी मिळाला आहे. तो यावर आपले पूर्ण लक्ष केंद्रित करेल. आणि त्यामुळे काही टक्के तरी समस्याचे समाधान होऊ शकते. नव्या अधिकारीला आल्यावर शहराची स्थिती सांभाळायला वेळ लागतो.जून २००१ मध्ये मी कार्यभार सांभाळला. त्यानंतर दोन-चार महिन्याने निवडणूका होत्त्या. निवडणूकात पाच-सहा महिने गेले. नंतर अंदाजपत्रक जेव्हा तयार केले जाते. तेव्हा निवडणूका होत्त्या, निवडणूका असल्यामुळे हे अंदाजपत्रक २००२ मध्ये अंतिम झाले. विकास प्रक्रिया त्याचवेळी सुरु होते, हे अंदाजपत्रक तुमच्यासमोर आहे. माझे काय प्रस्ताव होते, तुम्ही काय मान्य केले. काय अमान्य केले, हे सर्व तुमच्या समोर आहे. अंदाजपत्रक हा शहराचा आरसा असतो. या आरशामुळे लोकांना विकासप्रक्रिया किती उपलब्ध होणार आहे. दायित्त्व काय आहे. हे माहित पडते. मला वाटते या आरशामुळेच लोकांना किंवा वर्तमानपत्रांना माहिती मिळते. जून नंतर जसे अंदाजपत्रक कायम झाले. मान्यता मिळाली. त्त्यांनतर एक ऑक्टोंबर पासून आम्ही वसूली मोहिम सुरु केली. त्यावेळेपासून उत्त्पन्न वाढत आहे. तुम्ही जर आकडेवारी लक्षात घेतली तर ७ ,८ ,९ लाख असे उत्त्पन्न मिळत आहे. ऑक्टोंबर पासून ते चालू आहे. अतिरिक्त आयुक्त ते सांभाळतील. मला वाटते या शहरात काही समस्या राहणार नाही. तुम्ही जर ऑक्टोंबरची आकडेवारी पाहिली तर ८ ,९ लाखाची जी वसूली आपल्यासमोर झाली आहे, आकडेवारी तर कोणी लपवू शकत नाही. एकदा जर वसूली प्रक्रियेला

गती मिळाली, तर ती थांबत नाही. चालू वर्षाची बिले दिल्यावर वसूलीत अजून वाढेल. या माध्यमातून वसूलीत अजून वाढ होईल.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u> मा. आयुक्त साहेब , माझा यावर एक प्रश्न होता, नऊ महिने झाले बिले वाटली गेली नाहीत. याला जबाबदार कोण? दुसरे याबरोबर असे की,मागील महिन्यात जी रिकव्हरी झाली ती १५ टक्के झाली. २५ टक्के झाली, या महिन्यात किती टक्के झाली. २० तारखेपर्यंत किती टक्के झाली?

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u> आता माझ्याकडे नाही, तुम्हाला जर हवे असेल तर कार्यालयात येवुन घेवून जा. मी त्याचा खुलासा करतो. तुम्हाला जर बोलायचे असेल तर मी बसतो. तुम्हा सर्वांना माहित आहे की महाराष्ट्र शासनाचे एक धोरण आहे संगणकीकरण करणे म्हणुन महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार काही दिवसापुवी टाटा इन्फोटेक्ट कंपनीकडुन ॲसेसमेंट करण्याचे काम सुरू केले. परंतु आम्ही प्रयत्न करत होतो की जर टाटा इन्फोटेकचे काम चांगल्या त-हेने झाले तर लोकांना सुटका मिळेल. सर्व वसुली विभागाच्या कर्मचा-यांना म्हणत होतो की जर टाटा इन्फोटेकचे तुम्हाला बिल मान्य नाही तर त्याच्याविरूध्द तुम्हाला ठराविक असा चार्ट बनवावा लागेल वारंवार सांगुन देखिल त्याने काय चुक केली याचा अहवाल माझ्याकडे आला नाही. मला वाटते टाटा इन्फोटेकच्या प्रणालीचा जर आपण वापर केला असता तर वसुली बरोबर झाली असती. जसे की ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवडयात आम्ही निर्णय घेतला की,चालु वर्षाचे बिल देखिल आम्ही देवू आणि ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवडयात



विभागाने ठराविक अहवाल होता ज्याआधारे आम्हाला टाटाला टर्मीनेट करायचे होते. त्या आधारे आम्ही त्यांना टर्मिनेशनची कार्यवाही केली. व अजुन वेळ गेली नाही. मला अशी आशा आहे की बाकी थोडा अवधी आहे त्यात आपली वसुली होईल. दुसरा एक मुददा उपस्थित केला की, वृतपत्रात काही बातम्या आल्या त्याचा खुलासा करणे जरूरी आहे. हे जे वार्ताहर असतात जास्त करून मला वार्ताहरांना भेटण्यात रस नाही. मला ती सवय पण नाही. माझ्या विरूध्द एक तक्रार आहे की मी पत्रकारांना भेटत नाही किंवा कमी भेटतो. आपणांस माहित असेल की पत्रकार बंधुना मी महिन्याचा शेवटचा सोमवार त्यांच्यासाठी ठेवला आहे. त्या दिवशी देखिल मी बहुधा भेटत नाही. माझ्या कारकिर्दीत मी फक्त दोन-चार पत्रकार परिषदा घेतल्या आहेत. जास्त करून निवडणुकीमध्ये परिषद घेतली होती. मला प्रसिध्दी मध्ये काही रस नाही. त्यापासुन लांब रहायचे आहे. परंतु कधी कधी मला पत्रकार बंधु काही विचारतात तर सांगावे लागते तरी पण मी कधीही कोणत्त्या पत्रकाराला मी अजुन पर्यंत मी बोललो नाही की असे छापा, तसे छापा ना मी फोन केला ना मी बोललो. जेव्हा जेव्हा पत्रकार येतात तेव्हा महापालिकेची फॅक्टस आणि फिगर त्यावर चर्चा होते. या ज्या फॅक्टस व फिगर आहेत ते आमचे अंदाजपत्रक जे असते त्यात असते. त्यामध्ये उत्पन्न किती खर्च किती? दायित्त्व किती सर्व काही लिहिलेले असते. मी त्यावर पण काही पत्रकारांशी बोलणे गरजेचे नसते तरीही कधी कधी पत्रकार येतात जसे की माहितीचा अधिकार त्यांचा असतो तर काही माहिती ते मला विचारतात. या फॅक्टस व फिगरवर मी त्यांच्याशी थोडक्या शब्दात चर्चा करतो. मी त्यांना जास्त वेळ देत नाही म्हणुन पत्रकारबंधु माझ्यावर नाराज असतात. या ज्या फॅक्टस आणि फिगर आहेत त्या सांगतो. मी कधीही कुणाही लोकप्रतिनिधीविरूध्द भले तो सन्माननिय नगरसेवक असो, आमदार असो, मा. मुख्यमंत्री असोत मी कधी कुणाचे नाव घेतलेले नाही व ना ही कुणाचे नाव घेवून

वा पद घेवून त्यावर टिका टिप्पणी कधी केली नाही. व करणारही नाही आणि मला ती सवय देखिल नाही, मला त्यात रस देखिल नाही. कोणत्त्याही नेत्त्यास, नागरिकावर टिका करणे हे मला जमत नाही आणि माझा तो स्वभाव देखिल नाही परंतु मी पत्रकार बंधुना असल्या बातम्या छापल्यावर विचारतो की काय कारण आहे. आपण कोणत्त्याही पत्रकाराला विचारू शकता मी अशी टीका टिप्पणी केली आहे का? मी कधी कुणाला वाईट म्हंटले आहे का? किंवा मी स्वतःविषयी काही छापायला सांगितले आहे का? कधीच नाही. एकदा पण नाही. व पत्रकारबंधुना मी एकदा फोन केला की का तुम्ही अशी बातमी छापली मी तर असे बोललो नव्हतो. मी फक्त फॅक्टस आणि फिगर सांगितल्या त्यावर चर्चा केली होती. त्यांनी उत्तर दिले की मी असे काही बोललो नव्हतो तरीही पत्रकारांनी उत्तर दिले की मी कुणाचेही नाव घेतले नाही. व ज्या फॅक्टस आहेत त्यावर टिप्पणी केली आहे व दुसरी गोष्ट ते म्हणाले की ही जी नावे छापली आहेत त्यांनी एक शब्द वापरला तो म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र आहे मी म्हंटले की आमच्या भाषणात कशाला त्यांचा वापर करतात लोकांचा त्यामुळे गैरसमज वाढतो. व त्यास मी म्हंटले की तुम्ही याचे स्पष्टीकरण दया. माझा स्वतःचा अनुभव असा आहे की एक ओळखीचे आयुक्त होते जेव्हा अशी टिका टिप्पणी यायची तेव्हा मी खुलासा करायचो आयुक्तांच्या परवानगीने तर त्या आयुक्तांनी मला लिखित स्वरूपात दिले ते आज पण माझ्याकडे आहे. तो खुलासा मी कोणालाही दाखवु शकतो की तुम्ही याकडे दुर्लक्ष केले पाहिजे तुम्ही जर खुलासा करायला गेलात तर ते काय करणार? एक तर त्यांना छापायचे की नाही हा त्यांचा वैयक्तिक अधिकार आहे. वारंवार सांगुन देखिल ते खुलासा छापत नाही. आणि छापले तरी एखादी बातमी पहिल्या पानावर असेल तर आमचा खुलासा शेवटच्या पानावर आणि इतके लहान असते की कुणाच्या नजरेस देखिल पडत नाही. याकारणास्तव उल्हासनगर शहरात आल्यावर मला असा सल्ला दिला गेला होता की तुम्ही वर्तमानपत्र वाचुच नका. आणि मी वाचत पण नाही फक्त हेडलाईन वाचतो. सर्व सदस्यांना माहित आहे.

--४७--

शहरात आल्यानंतर मी एक निर्णय घेतला होता की ही वर्तमानपत्र महापालिकेत आणण्यासाठी बंदी केली होती. मला वाटते याविषयी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रार केली होती. शासनाच्या कार्यालयातुन माझ्याकडे फोन आला, माझ्यापासुन खुलासा मागितला मी तो पाठविला. वारंवार मी त्यांना विनंती केली की मला याविषयी काहीतरी उत्तर दया. त्यावेळी मला असे सांगितले गेले की आयुक्तांनी परत लिहिण्याची गरज नाही. सन्माननिय नगरसेवकांनी जेव्हा हा मुददा महासभेत उठविला तेव्हा त्यांच्या सन्मानासाठी म्हणुन मी माझा निर्णय मागे घेतला मी पुन्हा एकदा सांगु इच्छितो की कुणाही सदस्याचे कधीही नाव घेतले नाही. घेणार पण नाही. यदाकदाचित कमी वेळेत पत्रकार महोदय येतात . ते आग्रह करतात वसुली वगैरे विचारतात तर मी आकडेवारी त्यांना देतो इतर काही मी बोलत नाही. मला वाटते माझ्यावर हा जो आरोप लावला आहे तो चुकीचा आहे. मी कधीच कुणाचे नाव नाही घेतले. आणि माझा तसा स्वभावच नाही. शेवटचा मुददा असा की मी शासनास काही अहवाल पाठवला आहे वारंवार सन्माननिय सदस्य चौकशी करत आहेत की काय गोपनिय अहवाल दिला आहे. जेव्हा नव्हता पाठवला अहवाल तेव्हा देखिल म्हणत होते अहवाल पाठवला आहे. चार-पाच महिने अगोदर पण हेच विचारले होते. अहवाल पाठविला, अहवाल पाठविला त्यावेळी मी अहवाल पाठविला नव्हता कुणी म्हणते २५ मुददे आहे, कुणी म्हणते ३० ,४० मुददे आहेत. या शहरात अशा अफवा पसरतात. का अफवा पसरतात माहित नाही या शहराचे हे वैशिष्ठ आहे. व हा जो अहवाल आता पाठविला आहे मला असे वाटते की त्यात दुमत होवू शकते. हा अहवाल कदाचित ज्यास डिफरन्स ऑफ ओपिनियन म्हणजे मतभेद म्हणतात. गोपनिय देखिल म्हणु शकतो, गोपनिय नाही असे देखिल म्हणु शकतो. परंतु

आयुक्तांची नियुक्ती महाराष्ट्र शासन करते. आयुक्त महाराष्ट्र शासनाचा प्रतिनिधी असतो व कोणत्त्याही स्थानिक संस्थेवर कायदयान्वये ज्यास आपण मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ म्हणतो. त्यात एक प्रकरण आहे. क्रमांक २८ ज्याचे कलम किंवा सेक्शन मला असे वाटते की ४४८ पासुन सुरू होतात. ४५३ ला संपतो किंवा ४५४ वर संपतो. त्यात एका प्रकरणावर हेडींग शिर्षक आहे कंन्ट्रोल म्हणजे नियंत्रण. तर या स्थानिक संस्थेवर कोणत्त्याही महापालिकेवर शासनाचे नियंत्रण असते व या नियंत्रणाच्या माध्यमाव्दारे जसे मी शासनाचे प्रतिनिधीत्त्व करतो तर या शहराची जी सत्त्य परिस्थिती आहे आता पुर्ण अहवाल सांगणे बरोबर नाही परंतु तुम्हाला विश्वास देण्यासाठी म्हणुन त्याचा सारांश तुम्हाला सांगतो. त्यात मला असे नाही वाटत की त्यात काही गोपनिय आहे. तर आपणा सर्व गटनेत्त्यांना लक्षात असेल की २२ ऑक्टोबर २००२ ला सन्मानानिय महापौरांनी एक बैठक आयोजित केली होती व त्या बैठकीत सर्व गटनेता उपस्थित होते. सर्वच नसतील परंतु काही गटनेता उपस्थित होते व त्याचवेळी मी महापालिकेच्या आर्थीक स्थितीवर काही विवरण दाखल केले होते. त्यावर चर्चा केली होती त्याचे इतिवृत्त देखिल रेकॉर्ड आहे व आता पण माझ्याकडे आहे त्याचवेळी मी सांगितले होते सन्मानानिय सदस्यांना, गटनेत्त्यांना, महापौरांना की समोर माहिती दिली होती की हा जो कारभार आहे त्यात सुधारणा व करवाढ करणे गरजेचे आहे आज पण माझे तेच मत आहे. वसुली तर आम्ही करू. व यात सुधारणा झाली नाही तर शासनाला मला एक वस्तुस्थितीदर्शक अहवाल पाठवावा लागेल. हे आकडे वस्तुस्थिती दर्शक आहेत. त्यावर मी ना काही भाष्य केले आहे ना काही शिफारस केली आहे व वस्तुस्थितीचा अहवाल शासनास देणे हे माझे कर्तव्य ठरते. व त्यासाठी कायदयानुसार चॅप्टर २८ नुसार हे माझे कर्तव्य ठरते,मी शासनास असे काहीही सांगितले नाही की नगरसेवक असे आहेत, तसे आहेत व महापालिकेस असे केले जावे असे ही काहीही बोललो नाही. जेव्हा शासन विचारणा करेल, आज तर स्थिती चांगली आहे, संबंध चांगले आहेत जेव्हा स्थितीमध्ये परीवर्तन येईल वर काय करायचे ही पूढची गोष्ट आहे. परंतु मी आपणांस दिलासा देवू इच्छितो. सांगु इच्छितो मोकळया मनाने सांगु इच्छितो की मी अशा प्रकारचा कोणताही अहवाल पाठविलेला नाही. दि. २२.१०.२००२ च्या सभेमध्ये जी चर्चा केली होती तिचाच काही सारांश पाठविला आहे

--४८--

त्यामध्ये कोणतीही विशेष बाब नाही. हा जो गैरसमज झाला आहे. काही काही लोक म्हणतात की असा अहवाल पाठविला आहे. महापालिका बरखास्त करण्याबाबत शिफारस केली आहे. परंतु मी असे काहीही भाष्य केलेले नाही. व मी आपणास विश्वास देवू इच्छितो . तसेच विनंती करू इच्छितो की, आपण ही भावना मना मधुन काढुन टाका, आता मी मागील वर्षीसुध्दा आर्थिक स्थितीचे विवरण शासनास पाठविले होते व त्यामध्ये शासनास फक्त विनंती केली होती की मला मार्गदर्शन केले जावे. शासनाचे मागदर्शन घेणे आवश्यक आहे कारण की त्यांचे महापालिकेवर नियंत्रण आहे. त्यामध्ये गोपनिय असे काहीही लिहिले नाही सर्व अहवाल देणे तर बरोबर होणार नाही परंतु मी आपणास माहिती दिली आहे त्यामध्ये मी काहीही शिफारस केलेली नाही व मी शासनाच्या मार्गदर्शनाची वाट पहात आहे मला वाटते की, एवढया विवेचनावरून आपणास हे सर्व स्पष्ट होईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, आताच आपल्या आयुक्त साहेबांनी खुलासा केला की, त्यावेळी त्यांनी जी सभा बोलावली होती त्यावेळी मी सुध्दा उपस्थित होतो त्यांनी म्हंटले होते की पाण्याची दर वाढविले जावेत त्यावेळी आमचे सदस्य श्री. दिलीप लालवानी यांनी म्हंटले होते की आपण प्रत्त्येक ग्राहक २० रू

याप्रमाणे पाणीपट्टी बिल निश्चित कर असा निर्णय झाला होता. त्यावेळी श्री. धनंजय बोडारे, श्री. रमेश चव्हाण हे सर्व उपस्थित होते. त्यांनी जी आकडेवारी शासनास पाठविली आहे मला वाटते ते सभागृहास दाखविण्यास त्यांची काही हरकत असता कामा नये पूढील महासभेच्या वेळी जर त्याची प्रत तयांनी सभागृहास दाखविली तर आता त्यांनी खुलासा केला व आश्वासन ही दिले की असे काहीही लिहिलेले नाही. तर मग प्रत दाखविण्यात हरकत काय आहे? हे झाले एक दुसरे असे की, त्यांनी जलकुंभाबाबत जे म्हंटले त्याबाबत मी खुलासा करू इच्छितो की, हे जे आमचे जलकुंभ तयार होत आहेत ते मार्च २००२ मध्ये बांधुन जयार व्हावयास पाहिजे होते त्यास मार्च २००३ उजाडत आहे. हा जो एक वर्षाचा उशिर होत आहे त्यास जबाबदार कोण आहे? जलकुंभ तयार करण्यासाठी आम्हास पुर्ण कर्ज उपलब्ध केलेले आहे. अतिरिक्त प्राकलन तयार होणार आहे. त्यात ७ लाख रूपये वाढणार आहेत, एक वर्षे काम वाढत असल्याने जी प्राकलनीय किंमत वाढणार आहे त्यास जबाबदार कोण आहे? आयुक्त साहेबांनी फारच चांगल्या प्रकारे सभागृहात खुलासा केला त्यात आम्ही ८० टक्के समाधानी आहोत, पत्राची प्रत पाहिल्यानंतर १०० टक्के समाधान होईल. येणा-या महासभेत ते सर्व सदस्यांना त्याची प्रत देतील तर आम्ही जो स्थगन प्रस्ताव आणला होता की आयुक्त साहेबांनी शासनास काहीतरी अहवाल पाठविला आहे. आयुक्तांच्या खुलाशा वरून हे स्पष्ट झाले आहे की त्यांनी काही तरी अहवाल शासनास पाठविला आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:-</u>मी सभागृह नेता यांना एक प्रश्न विचारू इच्छितो की आपण कुणाच्या भाषणाने अधिक संतुष्ठ आहात? आयुक्तांचे की अतिरिक्त आयुक्तांचे?

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणी:-</u>विरोधी पक्षातील आमचे मित्र आयुक्त साहेब व अतिरिक्त आयुक्त यांच्यामध्ये मतभेद निर्माण करू इच्छित आहोत असे मला वाटते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>श्री. लाल पंजाबी यांना एक गोष्ट सांगु इच्छितो की आता जेव्हा अजेंडा चालु होणार आहे तेव्हा आम्ही सुध्दा आपण कुणाची बाजू घेत आहात ते पाहु. त्यावेळी आपल्यासारखे आम्ही सुध्दा आपणास विचारू जेव्हा मी नमस्कार करेन तेव्हा तुम्ही समजून जा की काय आहे ते. तर



कोणत्त्याही अधिका-याचे बाजुने आम्ही नाहीत जो अधिकारी पूर्ण शहरास परिणाम दाखविल. आम्ही त्याच्या बाजुने राहु. येथे असा एक अधिकारी आहे जो १५ दिवसांमध्ये परीणाम दाखवितो एक असा अधिकारी जो वर्षानूवर्षा पासुन काहीच परीणाम दाखवत नाही. तरीही आपण त्यांच्यावर ही ४० हजार, ५० हजार प्रतीमहा खर्च करत आहोत, प्रत्त्येक अध्का-यावर आपण असा खर्च करत आहोत. पगार, टेलिफान कार, चेंबर, इत्त्यादीसाठी सर्वांवर खर्च करत आलो आहोत परंतु शहरास परीणाम मिळाला आहे झिरो. नगरसेवकांचा निधी कमी कमी होत गेला आहे. सर्वांच्या कानावर एकच शब्द पडत आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती फारच खराब आहे. हे शब्द झोपेत सुध्दा ऐकावयास मिळतात म्हणुन आम्हास वाटते की आर्थीक परिस्थितीमध्ये सुधारणा व्हावी आमची आणखी काहीही भावना नाही. आज आयुक्त साहेब व अतिरिक्त आयुक्त हया दोघांचे संयुक्त प्रशासन आहे. त्यांच्यामध्ये कुणी एक कमी जास्त नाही शहरास परिणाम पाहिजे. उलट अतिरिक्त आयुक्त म्हणत होते की आयुक्त साहेबांचे मला चांगले सहकार्य आहे ते मला बरेचसे अधिकार प्रदान करत आहेत. आम्ही अशी अपेक्षा व्यक्त करतो की ते दोघेही एकमेकांना सहकार्य देतील दोघांचे ''लक्ष्य'' एक आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-आमचे मित्र श्री. लाल पंजाबी यांनी म्हंटले की आयुक्त महोदयाचे भाषण व अतिरिक्त आयुक्त महोदयांचे भाषण यामधील कुणाचे भाषण अधिक संतुष्ट-जनक आहे. मी आयुक्त महोदयांना विचारू इच्छितो की १५ दिवसामध्ये आमचे अतिरिक्त आयुक्त श्री. सोनवणे साहेबांच्या कामगिरीने ते संतुष्ट आहेत की नाही?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-आम्ही आयुक्तांचे कामावर संतुष्ट आहोत, प्रशासनाच्या कामावर संतुष्ट आहोत.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-हे पहा, आम्ही आयुक्तांचे प्रत्येक कामावर संतुष्ट आहोत. थोडयावेळापुर्वीच मी म्हंटले की जेव्हा ते नविनच आले होते. तेव्हा आमचे शहर हे एक घोणेरडे शहर म्हणुन ओळखले जात होते ते त्यांनी सुंदर केले आम्ही त्यांच्या या गोष्टीशी सहमत आहोत आम्ही त्यांच्या प्रत्येक गोष्टीशी सहमत आहोत परंतु आता श्री. लाल पंजाबी यांच्या मुददयावरून मी विचारत आहे श्री. मा. आयुक्तांनी सांगावे की श्री. सोनवणे यांच्या १५ दिवसाच्या कामात समाधानी आहात की नाही?

मा. सदस्य श्री. राजेश वदरियाः-मा. आयुक्त साहेब मी आपणास प्रश्न विचारला होता की मागील वर्षाची मिळकत कराची मागणी किती आहे व किती वसुली केली? यावर्षी वसुली किती यावयास पाहिजे व प्रत्यक्षात किती आली आहे? तर त्याचा खुलासा आपण अदयाप केला नाही.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-याचा खुलासा केला जावा.

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-सन्माननिय महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. दर्शनसिंग हर्यान लेखी निश्चित स्वरूपाचा प्रश्न विचारला तर आपल्या रिती रिवाजाप्रमाणे त्यास लेखी उत्तर दिले जाईल व दुसरे सन्माननिय सदस्य श्री. राजेश वदरीया यांनी जो प्रश्न विचारला त्यानुसार ज्या फॅक्चुअल फिगर आहेत त्या मी देवू इच्छितो आपणास जकातीचे आकडे पाहिजेत की मिळकत कराचे?

--५०--

मा. सदस्य श्री. राजेश वदरियाः-मिळकत कराबाबत मी आपणास विचारणा केली आहे व पाणी पटटी बाबत.

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-प्रत्येक वर्षी किती वसुली झाली त्याची आकडेवारी.....

मा. सदस्य श्री. राजेश वदरीयाः-ती माझ्याकडे आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-जकातीची आकडेवारी श्री. राजेश यांच्याकडे आहे पाहिजे तर ते ती देतील...

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-मिळकत कराची वसुली १९९७-९८ मध्ये ७ कोटी ३० लाख झाली होती, १९९८-९९ मध्ये ७ कोटी ९९ लाख झाली आहे. १९९९-२००० मध्ये २० कोटी २५ लाख झाली आहे. २०००-२००१ मध्यें

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-८० कोटी श्री. चंद्रशेखर यांच्या कालावधीत झाली आहे ना?

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-८० कोटी नाही, २० कोटी त्यानंतर २०००-२००१ म्हणजे ३१ मार्च २००२ पर्यंत ८ करोड ५७ लाख व मागील वर्षी ३१ मार्च २००२ मध्ये ११ कोटी ७ लाख याचे कारण हे आहे की ते निवडणूक वर्ष होते, निवडणूक वर्षामध्ये आम्ही जेव्हा वसुलीस जात होतो. तेव्हा बरेचसे नेता लोक म्हणत होते की कोणतीही कठोर कारवाई करू नका, व दुसरे कारण हे आहे की पाण्याचे जे दर आहेत ते मागील वर्षापेक्षा यावर्षी कमी झाले त्यावेळी पाण्याचे दर १२१ रू. चालले होते ते १०० रू. झाले. व्यापारी लोकांना १०० रू. होता तो ६० रू. झाला. या कारणामुळे झाले आहे व यावर्षी आम्ही अपेक्षा व्यक्त करतो की, त्याचे दुप्पट वसुली व्हावी. पाणीपट्टी व मिळकत कर यांची एकत्रित वसुली पाहिली तर १९९७-९८ मध्ये दोघांची ही वसुली ९ कोटी ४० लाख होती. १९९८-९९ मध्ये मिळकत कर पाणीपट्टीची वसुली होती. १४ कोटी १० लाख १९९९-२०००ची वसुली होती. २९ कोटी त्यानंतर २०००-२००१ची वसुली होती १४ कोटी व मागच्या वर्षी २१ कोटी ३२ लाख.

मा. सदस्य श्री. राजेश वदरियाः-यामध्ये पाणीपट्टीची वसुली किती आहे? कारण की आता आपण जी बिले पाठवत आहात त्यामध्ेय मिळकत कर व पाणीपट्टी समाविष्ट आहे? तर यामध्ये पाणीपट्टीची किती वसुली आहे व मिळकत कराची किती आहे? एक दिड वर्षापासुन आपण ही जी वसुली करत आहात त्यामध्ये पाण्याचे बिल सुध्दा समाविष्ट केलेले आहे.

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-पाणी बिलाची रक्कम स्वतंत्रपणे दाखविली जाते व थकबाकी वेगळी दाखविली जाते. याबाबत माझ्याकडे जे आकडे आहेत ते मी सांगितले आहेत. २०००-२००१ची वसुली मी सांगितली आहे. २१ कोटी ४२ लाख....

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-आयुक्त साहेब मी हे विचारू इच्छितो की १ एप्रिल पासुन आजपर्यंत किती वसुली झाली?



मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-आता ते आकडे माझ्याकडे नाहीत, माझ्या कार्यालयात आहेत एक मिनिट सांगतो १.४.२००२ ते ३०.११.२००२पर्यंतचे आकडे माझ्याकडे उपलब्ध आहेत त्यानुसार मालमत्ता कराची वसुली झाली आहे. १० कोटी २७ लाख पाणी पट्टी ३ कोटी ५८ लाख नोव्हेंबर अखेर वसुल १३ कोटी ८० लाख.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-तरतुद किती आहे?

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-१४ कोटी हा जो ट्रेंड आहे तो मागील कित्येक वर्षाचे वसुली पेक्षा चांगला आहे.

मा. सदस्य श्री. राजेश वदरिया:-यामध्ये एकुण लक्ष्य किती ठेवण्यांत आले आहे? या वर्षासाठी व मागच्या वर्षासाठी लक्ष्य किती होते?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-बजेटमध्ये आहे ना?

मा.महापौर:-लक्षवेधीवर चर्चा केली जावी.

श्रीम. मिनाजी सोंडे, श्री. जेसवानी, श्री.सतरामदास सभागृहातून बाहेर पडले.

मा. सचिव:-पहिली लक्षवेधी जी आहे ती श्री. राजेंद्र चौधरी यांचेकडुन आहे. ३३ रस्त्यांवर मोठमोठ्या गाडया उभ्या करतात. वाहतुकीस अडथळा निर्माण करतात त्याबाबत ते लक्ष वेधु इच्छितात.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:-मी, या लक्षवेधीव्दारे सभागृह व प्रशासनाचे लक्ष वेधु इच्छितो. उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे काही वर्षापुर्वी ३३ रस्ते तयार करायचे जे काम सुरू केले होते त्यातील काही रस्ते तयार झाले आहेत, काही रस्ते बाकी आहेत, परंतु जे रस्ते तयार झाले आहेत व ज्या उददेशाने ते तयार करण्यांत आले तो उददेश सफल झाला आहे असे दिसुन येत नाही यासाठी ही लक्षवेधी या सभागृहासमोर मांडत आहे रस्ते तयार करण्याचा जो उददेश होता तो लोकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात. वाहतुकीला काही अडथळे होऊ नये व फुटपाथ जे तयार केले आहेत ते लोकांसाठी आहेत. परंतु आज उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयाच्या बाजूलाच आपण गेलात तर आपणास दिसेल की काही रस्त्यावर दोन्ही बाजुला ट्रक उभे आहेत व गॅरेजवाले आपले काम करत आहेत. यामध्ये फुटपाथ तर कव्हर केलेलाच आहे. काहीनी काही सामान ठेवले आहे तर काहीनी भंगार ठेवले आहे परंतु त्यावर महानगरपालिकेचे प्रशासनाने बिल्कुल लक्ष नाही. मी मा. महापौर,उपमहापौर व आयुक्तांना निवदेन करतो की कल्याण अंबरनाथ, रोडवरून जो रस्ता काजल पेट्रोल पंपाकडे जातो त्या रस्त्यावरून आपण आपली गाडी नेवून दाखवा, आपण गाडी चालवु शकणार नाहीत. एवढया गाडया त्या रस्त्यावर उभ्या आहेत परंतु महानगरपालिका झोपत बसली आहे हे रस्ते तयार करण्यासाठी जो पैसा खर्च केला आहे त्याचा उदेशपण सफल झाला पाहिजे. अतिरिक्त आयुक्त साहेबांनी आता सांगितले की शहराचे मुख्य रस्ते हे शहराचा आरसा असतो मी त्यांचेच शब्दांचा पुर्नउच्चार करतो. हे रस्ते शहराचे आरसे आहेत या रस्त्यांवर आपण लक्ष देत नसाल तर ते चुकीचे आहे. तर मी असे काही रस्ते आपल्या लक्षात आणुन देवू इच्छितो की विठ्ठलवाडीपासून बोटक्लबकडे जाणारा जो रस्ता आहे तो सुध्दा पुर्णपणे अतिक्रमीत झाला आहे. शांतीनगर जकात नाक्यापासून पवईकडे जाणारा जो रस्ता आहे. शांतीनगर येथे एक भैया १०-१२ म्हैशी बांधतो परंतु महापालिका



तिकडे लक्ष देत नाही. त्यांनी रस्त्यावर तबेला तयार केला आहे. महानगरपालिकेकडे लेखी तक्रारी केल्या आहेत. परंतु तो तबला हटविण्याची ताकद महानगरपालिकेकडे नाही दुसरी गोष्ट अमृता हॉटेलच्या बाजूला एक ट्रक उभी आहे. ३ वर्षापासून उभी आहे. त्या ट्रकच्या आधाराने पोलिसांनी तेथे एनकाऊंटर केले होते. एका माणसास पोलिसांनी ट्रकच्या आडुन मारले होते ती ट्रक ३ वर्षापासुन तेथे उभी आहे. परंतु महानगरपालिकेचे अधिकारी लक्ष देत नाहीत. अशीच परिस्थिती आहे महापालिका मुख्यालयाचे बाजुला मोहटा माता देवीचे मंदीर आहे. तेथुन कल्याण अंबरनाथ रोड पर्यंतच्या रस्त्याची त्या रस्त्यावर अतिक्रमण झाली आहेत. ठेकेदार म्हणतो

अतिक्रमणे हटवून दया मी काम करण्यास तयार आहे. अतिक्रमणे हटविली जात नाहीत व ठेकेदार काम करत नाही. अशी आजची परिस्थिती आहे.

श्री. साधवानी मनोज, श्री. प्रमोद टाले, सभागृहातून बाहेर पडले.

<u>मा. सचिवः</u>-प्रशासनाकडुन श्री. पाटणकर साहेब, निवदेन देवू इच्छितात.
<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः</u>-एक मिनिट मला अनुमोदन दयायचे आहे. मा. महापौर महोदया, सन्माननयि सदस्य माझे सहकारी श्री. राजेंद्र चौधरी यांनी या लक्षवेधी सुचनेच्या माधमातुन एक महत्त्वपुर्ण विषय आपल्यासमोर ठेवलेला आहे. आधीपासुन गेले तीन चार तास या सभागृहामध्ये अगदी नाल्यावरच्या बांधकामापासुन अनाधिकृत बांधकामापर्यंत महापालिकेच्या आर्थीक दुरावस्थेपासुन सर्व विषयावर चर्चा झाली, लक्षवेधी सूचना मांडली बहुतेक स्विकारली जाईल असा अंदाज होता. त्यामुळे मनामध्ये विचार होता की, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातुन रस्त्त्यावरी अतिक्रमणे आणि एकुण महापालिकेचा कारभार यांच्यावर काही बोलता येईल. गेल्या तीन चार तासामध्ये या सभागृहामध्ये सत्ताधारी पक्षाचे बाकावरील सदस्यांनी विरोधी पक्षीयांचा बराचसा भार हलका केला. या विषया संदर्भात जे उरलेले मुददे आहेत. ते अगदी विचाराने नाही पण टप्प्या टप्याने या सभागृहा समोर ठेवण्याचा मी प्रयत्त्न करणार आहे. हा जो प्रकल्प ज्यावेळी या शहरामध्येय आणला गेला तेव्हा शहरामध्ये वातावरण असे होते की, अशाप्रकारचा प्रकल्प या शहरामध्ये राबविला जावू शकत नाही. या शहरामध्ये प्रचंड विरोधाची भावना परंतु तेवढे झाल्यानंतर सुध्दा इथल्या आयुक्तांनी, तत्त्कालीन आयुक्तांनी राजकारण्यांनी, लोकप्रतिनिधींनी लोकांना विश्वासामध्ये घेतले. लोकांना सांगितले की, त्यांच्यामध्ये तुमचे नुकसान नाही तर शहराचा विकास आहे. ही पुढचे अनेक वर्षासाठी केलेली तरतुद आहे. अशाप्रकारचे लोकांना आश्वासन दिले गेले. या ३३ रस्त्त्यांचे रूंदीकरण करताना जवळ जवळ ३००० घरांचे निष्कासन झालेले आहे. ३००० हुन अधिक लोक आपल्या मुळ ठिकाणावरून दुस-या ठिकाणी स्थानांतरण झालेले आहे. विस्थापित झालेले आहे. ही जी तयारी दर्शविली आणि हे जे आपण केले ते कशासाठी केले तर शहरातील वाहतुकीची जी कोंडी आहे. रहदारीची जी कोंडी आहे ती दुर करण्यासाठी आपण हे सगळे जवळ जवळ २५ ते ३० कोटीचा हा प्रस्ताव होता. आणि तो या महापालिकेने राबविला. इथे असे सांगितले जात होते की, हा प्रकल्प येथे राबविला जावू शकत नाही. तरीही महापालिकेने सक्षमपणे राबविला. काही ठिकाणी अनेक ठिकाणी अजुनही अर्धवट अवस्थेत काम असेल परंतु ब-याचशा अंशी मला वाटते. ८० ते ९० टक्के पुर्णत्त्वाला हा प्रकल्प आलेला आहे. आणि अशा परिस्थितीत जे रूंद झालेले रस्ते आहेत. त्यांची जी रूदीं आहे ती आपण सांभाळु शकलो नाही किंवा पाडु शकलो नाही तर मला असे वाटते की आपल्या सारखे कुणी अभागी नसेल. या रस्त्त्यावरील अतिक्रमणाचे अनेक प्रकार आहेत. एक तर मुख्य भागातुन जे रस्ते गेले आहेत जसे नेहरू चौकातुन शिवाजी चौकाकडे गेलेला रस्ता आहे, तसेच नेहरू चौकातुन फॉलवरलॅन कडे गेलेला रस्ता आहे. तसेचरू ४ ओटी वरून नेताजी मार्गे कुर्ला कॅम्प कडे गेलेला रस्ता आहे. यासर्व रस्त्त्यांवर दुकानवाल्यांनी



सुध्दा अतिक्रमणे केली होती. आपला माल बाहेर ठेवलेला आहे. बाकडे बाहेर ठेवलेले आहेत, सामान बाहेर ठेवलेले आहे. त्यानंतर दुसरा मुददा असा की चौकामध्ये ज्याठिकाणी रिक्क्षा स्टॅण्ड नाही त्याठिकाणी पुढे येवून उभे राहणे आणखीन एक प्रकार आहे तो फेरीवाल्यांचा त्याच्यामध्ये हातगाडीवाल्यांनी वाटेल त्याप्रमाणे आपल्या मनमानीप्रमाणे जागा अडवली आहे तर या सर्वांवर आपण काय कारवाई करणार आहात आपल्याकडे त्याबाबत काय योजना आहेत. आणि केवळ कारणे नकोत की

हे नव्हते ते नव्हते. पोलिस बंदोबस्त नव्हता अमुक नव्हते. यंत्रणा नव्हती. अशाप्रकारची कोणतीही कारण न सांगता टाळाटाळ न करता आपण या सर्वांवर काय उपाय योजना करणार आहात? हयाचे स्पष्टीकरण मागण्यासाठी ही लक्षवेधी सूचना माझे सहकारी श्री. राजेंद चौधरी यांनी मांडलेली आहे आणि त्याला माझे संपुर्णतः अनुमोदन आहे.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>सन्माननिय महापौर या विषयास मी पूढे वाढवत आहे. १७ सेक्शन हून कॅम्प ४ कडे आपण जातो या रस्त्यावर वनवे आहे. परंतु तेथे नेहमी तेथील ट्रव्हलर्सच्या गाडया उभ्या राहातात. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो त्याबाबत आपण काही करू शकतो की नाही. कृपया याचे सुध्दा उत्तर दिले जावे.

<u>मा. महापौरः-</u>श्री. पाटणकर साहेब उत्तर देत आहेत.
<u>मा. उपआयुक्त (श्री. श्रीधर पाटणकर, अ.बां.वि.) :-</u>रस्ते व फुटपाथ यावर वाहनांनी केलेली अतिक्रमणे वेळोवेळी दुर केली जातात परंतु सदरची वाहने पून्हा रस्त्याच्या दोन्ही बाजूला सदर वाहन मालक उभी करतात ही गोष्ट खरी आहे. रस्त्यावरील वाहने दुर करण्याची मोहिम दि.१३.१२.२००२ पासून हाती घेण्यांत आली आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः-</u>हिंदीत बोलले तर बरे होईल.

मा. महापौर सभागृहातून बाहेर पडले.

<u>मा. उपआयुक्त (श्री. श्रीधर पाटणकर) :-</u>रस्ते व फुटपाथवर जी अतिक्रमणे होतात की अनेकवेळा आम्ही दूर केली आहेत. तरीही वाहन मालक पून्हा आपली वाहने रस्त्याच्या बाजूला दुरूस्ती करण्यासाठी किंवा अन्य काही कारणास्तव उभी करतात हे सत्त्य आहे याबाबत दि.१३.१२.२००२ पासून आम्ही मोहीत सुरू केली आहे. तरीही एक नियोजन बध्द कार्यक्रम २३.१२.२००२ पासून सुरू करत आहोत व हयाबाबत मा. आयुक्तांनी ९.१०.२००२ रोजी आपले आदेश दिलेले आहेत. तेव्हापासुन प्रशासनाच्या वतीने दंडात्मक कारवाई केली आहे. तरीही रस्त्यावर ज्या गाडया उभ्या राहतात त्याचे सर्व्हेक्षण करून त्याचे पब्लिक न्युशन्स करीत आहेत त्याबाबत त्यांच्याविरूध्द आम्ही कारवाई करू व याबाबत आम्ही वाहतुक पोलिसांची सुध्दा मदत घेवू.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-</u>पाटणकर साहेब, आपण सांगितले की मोहीम सुरू केली आहे ती १३.१२. पासुन २३.१२ पर्यंत सुरू केली आहे करणार आहेत? कुठल्या रस्त्यावर अतिक्रमण आजपर्यंत आपण हटविले आहे? एकतरी उदाहरण दाखवा, कोणत्या गाडीवर तुम्ही दंड आकरला? कोणता रस्ता खाली केला? <u>१३/१२</u> ते आज <u>२०/१२</u> म्हणजे आज ८ दिवस झाले.
<u>मा. उपआयुक्त (श्री. श्रीधर पाटणकर) :-</u>मा. आयुक्तांचे आदेशानुसार येथील अधिका-यांना तसेच आरोग्य निरिक्षकांना पावती पुस्तक देवून अशा वाहनांवर दंड आकारणेचे आदेश दिलेले आहेत. सुमारे ४० हजार रूपये दंड आतापर्यंत जमा झालेला आहे.



<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानीः-</u>याकामी आपण ही कार्यक्रम तयार केला आहे का? त्याची अध्यक्षता कोण करत आहेत? कामकाज कोण पहात आहे?

*<u>मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-</u>श्री. सोनवणे साहेब, सन्माननिय सदस्यांस सष्टीकरण दया आपण जो कार्यक्रम तयार केला आहे त्याचे आपण स्पष्टीकरण करा.*

*<u>श्री. आर. के. सोनवणे (अतिरिक्त आयुक्त):-</u>मा. महापौर महोदया, मा. आयुक्त महोदय रस्ते व फुटपाथवर फेरीवाल्यांच्या हातगाडया तसेच जुनी वाहने किंवा दुरूस्तीसाठी जी वाहने तिथे उभी केली जातात त्यांचेविरूध्द एक दिवस दि. १३ तारखेला शांतीनगर पासुन साईबाबा मंदीरापर्यंत एक दिवसाची कारवाई केली होती. व पंधरा वीस हातगाडया जप्त सुध्दा केल्या होत्त्या त्यादिवशी ती मोहीम जेवढया प्रमाणात अपेक्षित होती तेवढया प्रमाणात नाही हे मी मान्य करतो व सभागृहास आश्वासन देउ इच्छितो की, रस्त्त्यावर जे हॉकर्स आहेत. त्यांच्याविरूध्द व रस्त्त्यावर जी वाहने दुरूस्त केली जात आहेत त्यांच्याविरूध्द कारवाई करू. महानगरपालिकेने हॉकर्स झोन व ना हॉकर्स झोन तयार केले आहेत त्यामध्ये ९ हॉकर्स झोन घोषित केले आहेत. जे लोक रस्त्त्यावर हॉकींग करतात त्यांनी  हॉकिंग झोनमध्ये जावूनच आपला व्यवसाय करावा याकामी त्यांना बाध्य करू. ही मोहिम चालविण्याअगोदर आम्ही हॉकर्स युनियनशी चर्चा कली आहे व त्यांनी मान्य केले आहे की हॉकर्स झोनमध्ये व्यवसाय करण्यासाठी महापालिकेने जर लायसन्स दिले तर ते तिथे जावून व्यवसाय करण्यास तयार आहेत. हॉकर्स युनियन बरोबर विचारविनिमय केल्यानंतर ही मोहीम आणखी गतीमान केली जाईल व फक्त हॉकर्स झोन मध्येच त्यांना लायसन्स देवून व्यवसाय करण्यास अनुमती देवू व ज्या रस्त्त्यांना महापालिकेने ना हॉकर्स झोन म्हणुन घोषित केले आहे तेथे कुणाला कोणत्त्याही परिस्थितीत हॉकींग करू दिले जाणार नाही तसेच रस्त्त्यावर जी वाहनांची दुरूस्ती केली जाते त्याबाबत सर्वेक्षण करू व जेवढी पण दुरूस्तीची कामे होत आहेत ते सर्व गॅरेज मालक किंवा गॅरेज धारक जे कोणी आहेत त्यांच्याविरूध्द पब्लिक न्युसन्स क्रिएट करतात. त्यांच्याविरूध्द भारतीय दंडसंहिता कलम १३३च्या तरतुदी अन्वये कारवाई करू.*

*<u>मा.सदस्य श्री. शांताराम निकमः-</u>सन्माननिय महापौरजी, सन्माननिय आयुक्त साहेब, मी मुददा उपस्थित केला होता की १७ सेक्शन येथे ज्या ट्रव्हलसच्या अनाधिकृत गाडया उभ्या राहतात त्या गाडया रस्ता अडवितात. दोन दोन, तीन तीन तास रस्त्त्यावर उभे राहतात त्या गाडयांबाबत आपण काय करू शकतो?*

*<u>श्री. आर. के. सोनवणे (अतिरिक्त आयुक्त):-</u>मा.महापौर महोदया, ट्रॅव्हलसच्या गाडया प्रवासी घेण्यासाठी उभ्या असतात त्यांच्याविरूध्द कारवाई करण्याअगोदर पार्कींग झोनसाठी व्यवस्था करावी लागेल. या शहराची अवस्था अशी आहे की रस्ते पार्कींगच्या जागा झाल्या आहेत. व रस्तेच बाजारपेठ झाल्या आहेत. पार्कींग्रची समस्या सोडविण्यासाठी जागेची सोय केली पाहिजे. आम्ही चार पाच जागा सुचविल्या आहेत. शहाड ब्रीजखाली पार्कींग होवू शकते किंवा अन्य कुठेही पार्कींगची सोय केली जावू शकते. आपल्या शहराच्या विकास आराखडयात जेवढया पण जागा पार्कींगसाठी आरक्षित आहेत किंवा ट्रक टर्मिनन्स म्हणुन आरक्षित आहेत तेथे प्रथम पार्कींग्रची सोय करावी लागेल त्यानंतरच रस्त्त्यावर ज्या गाडया उभ्या राहतात त्यांच्यावर कठोर कारवाई केली जावू शकते जोपर्यंत महानगरपालिका पार्किंगची काही व्यवस्था करत नाही तोपर्यंत रस्त्त्यावर पार्क होणारी बस असो वा मोटर सायकल त्यांच्यावर कारवाई करणे शक्य होणार नाही मला वाटते आपणही माझ्या या मताशी सहमत व्हाल.*

*__मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी:-__साहेब, महानगरपालिकेची जी उद्याने आहेत तेथे सुध्दा ऑटोरिक्क्षावाले रिक्क्षा पार्क करतात त्यांना कधी व कसे हटविणार? लोक हवा खाण्यासाठी येतात ॲटोरिक्क्षा तेथे उभ्या रहात असल्याने प्रदुषण पण नियंत्रित होणार नाही. असेच आमच्या महापालिका मुख्यालया बाहेरील अद्यानात ऑटोरिक्क्षा उभ्या रहातात, सपना गार्डन मध्ये सुध्दा आहेत.*

*__मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-__मी श्री. सोनवणे साहेबांना विनंती करते की, आपण फारच चांगले काम हाती घेतले आहे परंतु त्याची सुरूवात नेहरू चौकापासुन गोल मैदान पर्यंतच्या रस्त्यापासुन सुरू करावी. त्यामुळे शहरवासियांना हे पाहण्यास मिळेल, तेथे हातगाडीवाल्यांचा सर्वात जास्त उपद्रव आहे. तसेच मला अशी सुध्दा माहिती आहे की दुरू हॉटेलच्या बाहेर फुटपाथवर काही लोकांनी पक्की बांधकामे केली आहेत तर या रस्त्यापासुन आपण कारवाई सुरू केली तर शहरवासियांना हे दिसुन येईल की महानगरपालिकेच्या वतीने काही तरी कारवाई होत आहे. धन्यवाद.*

*__मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-__साहेब त्या रस्त्यावर फक्त दर मंगळवारी बाजार लागत होता आज काल तर अशी परिस्थिती आहे की, रोजच मंगळवार सारखा बाजार लागत आहे.*

*__मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-__महापौरजी हा जो ३३ रस्त्यांचा प्रश्न लक्षवेधीच्या रूपाने सभागृहासमोर आला आहे.*

*__मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकल:-__मा. महापौरजी, आमचा शहाड येथील सेंन्चुरी रेयॉन समोरील जो रोड आहे तो हॉकर्स झोनमध्ये आहे की,नॉन हॉकर्स झोनमध्ये मध्ये? कारण की मागच्यावेळी जेव्हा महासभा झाली होती तेव्हा मी नव्हते म्हणुन आता विचारते.*

*__मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-__हो जो ३३ रस्त्याचा प्रश्न आहे.*

*__मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-__रस्त्याचा प्रश्न नाही, त्यांच्याबाजुला जे फुटपाथ आहेत त्याच्या बाबतचा प्रश्न आहे.*

*__मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-__मी बोलतो आहे ते आपण प्रथम ऐकुन घ्या, आपणास घाई आहे का?*

*__मा. पिठासीन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-__आम्ही उशिरा पर्यंत बसण्यास तयार आहोत परंतु आपण मुददयावर बोला, मुददयांवर बोलणे जरूरी आहे.*

*__मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-__मी हे बोलु इच्छितो की, ३३ रस्त्या बाबतची लक्षवेधी आली आहे. मी श्री. सोनवणे साहेबांना विचारू इच्छितो की ३३ रस्त्यांवरील किती रस्त्यांवर अतिक्रमण आहे कारण की जेव्हा याबाबत कर्ज घेतले होते त्यावेळी एक अट घातली होती की हे रस्ते अतिक्रमण मुक्त असले पाहिजेत, काय सोनवणे साहेब हे सांगु शकतील का की या ३३ रस्त्यापैकी किती रस्त्यावर अतिक्रमण किती रस्ते मुक्त आहेत. श्री. सोनवणे साहेबांनी सांगितले की या रस्त्यावर हातगाडीवाल्यांनी अतिक्रमण केले आहे पण त्याच्यावर किती केबिन्स लागल्या आहेत श्री. सोनवणे साहेब मी आपणाशी बोलत आहे, त्याची माहिती आपणाकडे आहे का?*

मा. पिठसीन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-लक्षवेधी सूचनेवर मी निर्णय देत आहे. श्री. सोनवणे १५ दिवसांचे आत हॉकर्स झोन, नॉन हॉकर्स झोन रस्त्त्यावरील गॅरेजचे सामान उचलणे इत्त्यादी बाबतचा कार्यक्रम १५ दिवसात तयार करून त्त्याची कार्यवाही करावी दुसरी लक्षवेधी.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-माझी एक सूचना आहे, त्यांनी कोणत्त्या हॉकर्स युनियनला बोलावले होते.

मा. पिठसीन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):-कृपया खाली बसून घ्या, जेवण आहे १५ दिवसामध्ये आपणास कार्यक्रम मिळेल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-ठराविक एका हॉकर्स युनियनला बोलावून चालणार नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी, श्री. ठकुर बेहरानी सभागृहातुन बाहेर पडले.

मा. उपमहापौरः-नाही, आम्ही आपणास विश्वासात घेवू.

मा. सचिवः-दुसरी लक्षवेधी सूचना आहे, दुर्बल घटक वस्तीमध्ये विकास कामे होत नाहीत २ कोटी रूपये खर्चाची तरतुद आहे. तरी सुध्दा काम होत नाही.

मा. सदस्य श्री. शांताराम निकमः-सन्मानानिय महापौरजी, सन्मानानिय आयुक्त व सन्माननानिय सदस्य मी आपले लक्ष वेधू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेचा जो अर्थसंकल्प आहे, कोणत्त्याही महापालिकेचा जो अर्थसंकल्प असतो त्याचे ५ टक्के काम दुर्बल घटकांमध्ये झोपडयामध्ये दलितवस्तीमध्ये केले पाहिजे परंतु जेव्हा पासुन ही महासभा पुर्नघटीत झाली आहे तेव्हा पासुन कोणतेच काम झालेले नाही. कमीत कमी पाच सहा कोटीचे काम झाले पाहिजे. परंतु नऊ महिन्यामध्ये दुर्बल घटकामध्ये कोणतेच काम झालेले नाही फक्त नगरसेवक निधीतील दोन दोन लाखाचे काम झाले आहे. जर दोन महिन्यामध्ये पाच टक्के प्रमाणेच काम झाले नाही तर यावर्षीचा ५ टक्के प्रमाणेचा निधी लॅप्स होईल. (व्यापगत होईल) यासाठी यावर्षी हे काम झालें पाहिजे त्याचप्रमाणे उल्हासनगरमध्ये ४८ झोपडपट्टया घोषित आहे. व ६२ झोपडपट्टया अघोषित आहेत म्हणजे एकुण ११० झोपडपट्टया आहेत या झोपडपट्टयांमध्ये ५ टक्के निधीतुन काम झाले पाहिजे म्हणुन ही लक्षवेधी मी येथे मांडली आहे.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधवः-मा. महापौरजी, आयुक्तजी, अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे झोपडपट्टयांमध्ये सर्व कामे झाली पाहिजेत व जो काही निधी आहे तो पुर्णपणे वापरला पाहिजे. मा. नगरसेवक श्री. शांताराम निकम यांनी जे सुचविले आहे त्यांला माझे पुर्णपणे अनुमोदन आहे.

मा. सचिवः-प्रशासनाच्या वतीने श्री. भिवापुरकर साहेब निवदेन देतील.

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा.वि.):-मा. महापौरजी, मा. आयुक्त, मा. सभागृहाचे सदस्य दुर्बल घटक वसाहतीमध्ये नागरी सुविधाची कामे करण्यासाठी महापालिकेच्या उत्त्पन्नचे जे स्तोत्र आहे त्याचे ५ टक्के निधीतुन गलिच्छ वस्ती सुधार योजना व दुर्बल घटक वसाहतीत कामे करावयाची आहेत. २००२-२००३ ची जी अर्थ संकल्पीय पुस्तीका ओ त्यामध्ये गलिच्छ वस्ती सुधार योजने अंतर्गत एक कोटी रूप्याची तरतुद केलेली आहे. दुसरे दुर्बल घटक वसाहतीमध्ये काम

करण्यासाठी एक कोटीची तरतुद आहे. या तरतुदीनुसार जी काही कामे आहेत ती शासकीय निर्णय व परिपत्रकानुसार कामे करायची आहेत,

--५७--

समान धोरण समान काम जसे झापडपट्टयामध्ये गलिच्छ वस्त्यांमध्ये जी कामे करावयाची आहेत. यासाठी आम्ही सभापती गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती यांना आम्ही सांगितले होते व पत्र सुध्दा लिहिले होते की आपण सर्व गटनेत्त्यां बरोबर बसून तसेच गलिच्छ वस्ती निर्मुलन समितीच्या सर्व सदस्यांबरोबर बसून कामाची एक यादी तयार करावी. जो १ कोटी रूपयांच्या कामाचा कार्यक्रम आपणास तयार करायचा आहे त्याबाबत मी सुध्दा अनेकवेळा याचा पाठपुरावा केला आहे परंतु अंतीम यादी अदयाप त्यांच्याकडुन आलेली नाही दुसरे आहे दुर्बल घटक योजने अंतर्गत सभापती सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे त्यांनी जी यादी दिली होती. दुर्बल घटक वस्तीतील कामांची यादी दिली होती. तसे आम्ही २८ कामांची स्थळे दिली होती. त्या कामांची आम्ही प्राकलने तयार केलेली नाहीत. प्रस्ताव आहेत ते प्रस्ताव जर सभापती सार्वजनिक बांधकाम समिती हे निश्चित करत असतील तर ती प्राकलने २-४ दिवसात तयार होतील. व ते काम सुरू होइल निधीचे उपलब्धतेनुसार ते काम सुरू केले जाईल.

<u>मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौरजी गलिच्छ वस्तीतील कामाची ही जी २८ ठिकाणे दर्शाविली आहेत, तर दुर्बलघट घटक योजने अंतर्गत सर्व ठिकाणी समान धोरणानुसार कामे घेत आहात की फक्त २८ जागांनाच मान्यता दिली आहे.

<u>श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा.वि.):-</u>दुर्बल घटक जी योजना आहे. त्यामधील कामांची जी यादी दिली आहे. सभापती , सार्वजनिक बांधकाम समिती यांनी १६ वस्त्यांची यादी दिली आहे. त्यामध्ये समान धोरण ठेवले आहे. एक कोटीची जी तरतुद आहे ती समान वाटप केली जाईल.

<u>मा.सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब गलिच्छ वस्त्यांतील कामाबाबत मी सर्व नगरसेवकांना पत्र लिहिले आहे. ज्या ४८ अधिकृत /घोषित झोपडपट्टया आहेत त्याच्यामध्ये प्रत्येकी दोन दोन लाखाचे काम करायचे आहेत त्याबाबत मी आयुक्त साहेबांकडे सुध्दा गेलो होतो. त्यांना सांगितले की साहेब या वस्त्यांमध्ये कामे करणे जरूरीचे आहे. आर्थिक परिस्थिती बरोबर नसलयाने आयुक्त साहेबांनी सांगितले होते की थोडेसे थांबा नंतर काम केले जाईल. माझ्याकडे सर्व नगरसेवकांच्या प्रभागातील कामांची यादी आहे व पत्र सुध्दा आहे. ते मी आठ दिवसाच्या आत आपणांस सादर करतो. आपण ती कामे हाती घ्यावीत.

<u>श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा.वि.):-</u>आपल्याकडुन यादी प्राप्त झाल्यानंतर त्या हिशोबाने अंदाजपत्रक तयार केले जाईल व मंजुरीसाठी ठेवले जाईल.

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>माझ्या प्रभागात दोन अधिकृत / घोषित झोपडपट्टया येतात. गुरूतेजबहादुर नगर व गौतम नगर दोन्ही झोपडपट्टयामध्ये एक सुध्दा काम मंजुर होवून आले नाही त्यास कोण जबाबदार आहे?

<u>श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा.वि.):-</u>याचे उत्तर आपणासं सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती यांनी दिले आहे त्यांना आम्ही सांगितले होते की, समानधोरण तत्त्वानुसार समान काम वाटप करा. त्यानुसार जी यादी मिळवावयास पाहिजे होती. ती अदयाप मिळाली नाही. जर ती यादी आमच्याकडे आली तर त्या हिशोबाने काम केले जाईल.

मा. महापौर यांनी सभागृहात प्रवेश केला.

--५८--

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>तर आपण आता समायोजन करा. ज्याचे काम आले नाही त्यांचे थोडे थोडे काम घ्या.

<u>श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा.वि.):-</u>यादी आमच्याकडे आल्यानंतर त्या हिशोबाने प्राकलने तयार करण्याचे आमचे काम चालु होईल.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>ज्याचे प्रभागातील काम आले नसेल त्यांच्याबरोबर माझ्या प्रभागातील झोपडपट्टयांचे काम घेतले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>आठ दिवसामध्ये पुर्ण यादी मी आयुक्त साहेबांकडे देतो. त्यानुसार आपण शहरातील गलिच्छ वस्त्यांमध्ये कामे करावी.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः-</u>मा. महापौरजी, आमचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता श्री. भिवापुरकर साहेब यांनी असे सांगितले की अदयाप त्यांच्याकडे यादी आलेली नाही व आम्ही कामाचे दर सुचविले पाहिजे ही गोष्ट सारासार चुकीची आहे.

<u>श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा.वि.):-</u>मा. सभापती महोदय, मी आधीची गोष्ट केलेली नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेश वदरीयाः-</u>आपण त्यांना बोलु दया.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवारः-</u>सभापती म्हणुन मी ब-याच कालावधीपुर्वी झोपडपट्टीची यादी मा. आयुक्त साहेबांना दिलेली आहे. अमुक या या झोपडपट्टयांमध्ये अमुक अमुक ही कामे करायची आहेत. त्याची यादी देणे ही माझे काम आहे त्याप्रमाणे मी ते केलेले आहे. तसेच घोषित झोपडपट्टयामध्ये जे संबंधित नगरसेवक आहेत त्यांनी सुध्दा महानगरपालिकेस पत्र दिले आहे की, त्यांच्या झोपडपट्टयांमध्ये काम झाले पाहिजे त्यांनतर सुध्दा जर काम होत नसेल तर त्यासाठी वेगळया पध्दतीने वेगळा मार्ग अंगिकारला जातो ते बरोबर नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-</u>सन्माननिय महापौरजी, महानगरपालिकेच्या बजेट मधुन दुर्बल घटकांसाठी ५ टक्के हा निधी असतो तो निधी गलिच्छ वस्त्यांमध्ये खर्च करायचा असतो. तो निधी आता शिल्लक आहे का? किंवा कोणत्त्या गलिच्छ वस्त्यामध्ये खर्च झाला आहे?

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>माझ्या प्रभागात अधिकृत झोपडपट्टया आहेत यादी मध्ये आहेत. बोर्डावर लिहिलेल्या आहे.

<u>मा. महापौरः-</u>गौतमनगर व गरूटेकबहादुर नगर असे नाही सर्व झोपडपट्टयाची यादी आहे.

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. महापौरजी, येथे जो मुददा उपस्थित केला आहे. दुर्बल घटक, गलिच्छ वस्ती, दलित वस्ती या तिन्ही वस्त्त्यांमध्ये कामे झाली पाहिजेत. एक वर्षापासुन या वस्त्त्यांमध्ये एक रूपयाचे सुध्दा काम झालेले नाही. जो निधी शिल्लक आहे. १ कोटी दुर्बल घटक व एक कोटी गलिच्छ वस्ती यामधुन कामे झाली पाहिजे. दुर्बल घटक वस्तीमध्ये बजेटच्या ५ टक्के रक्कम खर्च करणे बाबत शासनाकडुन आपणास निर्देश आहेत. याबाबतची सर्व*



*प्राकलने आपण तयार करून ज्याप्रमाणे गलिच्छ वस्तीमध्ये समायोजित होत असेल त्यांचे गलिच्छ वस्तीमध्ये ज्याचे दलित वस्तीमध्ये समायोजित होत असेल त्याचे दलित वस्तीमध्ये व ज्याचे या दोन्ही वस्त्त्यांमध्ये समायोजित होत नसेल त्याचे दुर्बल घटक वस्तीतील कामामध्ये काम समायोजित करून महापालिकेच्या वतीने हे काम केले जावे. मेहरबानी करून असे केले तर योग्य होईल. जसे आमचे सभापती श्री. अशोक ठाकुर म्हणतात की मी फक्त यादी घेवून फिरतो तसेच आमच्या श्री. विनोद तलरेजा यांनी सांगितले की ४८ अधिकृत झोपडपट्टयामध्ये त्त्यांच्या प्रभागातील दोन झोपडपट्टया आहेत तर त्या झोपडयामध्ये सुध्दा ही कामे केली जावीत. तसेच भाभी कमला शर्मा यांच्या प्रभागात सुध्दा तसेच भाभी ज्याती कालानी....*

*<u>मा. सदस्या श्रीमती. कमला शर्मा :-</u>माझा पुर्ण प्रभाग झोपडपट्टीचा आहे. माझ्या प्रभागात एक सुध्दा सार्वजनिक शौचालय नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:-</u>माझ्या प्रभागात सुध्दा ४ झोपडपट्टया आहेत. अशोक नगर, गणेश नगर अशा ४-५ झोपडपट्टया आहेत. मेहरबानी करून त्यामधील कामांची शिफारस केली जावी.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>सर्वाच्या प्रभागात कामे झाली पाहिजेत.*

*<u>मा. महापौर:-</u>येणा-या २६ तारखेच्या सभेत त्याची यादी दिली जावी.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>आजची जी सभा आहे, तिला बराच वेळ झाला आहे. मी मा. महापौर महोदयांना विनंती करेन की, आजची जी सभा आहे ती २६ तारखेला सायंकाळी ४.०० वाजता ठेवली जावी. व आमचे अतिरिक्त आयुक्त साहेबांच्या नेमणकीचा जो विषय आयत्त्यावेळीच्या विषयान्वये आला आहे. त्यास विशेष सभा सूचनेवर घेवून त्यासाठी तीन दिवसाची नोटीस काढू या ती सभा सुध्दा २६ तारखेला ठेवली जावी. तर खुपच चांगले होईल कारण की २६ तारखेला ४.०० वाजता आपली आजची ही सभा व त्यानंतर श्री. आर. के. सोनवणे यांच्या नेमणुकी विषयीची सभा घेतली जावी तर मेहरबानी करून आजची सभा स्थगीत करून २६ तारखेला सायंकाळी ४.०० वाजता घेतली जावी व प्रतिनियुक्तीचा जो विषय आयत्त्यावेळच्या विषयान्वये आणण्यात आलेला आहे तो नियमित सभा सूचनेवर आणला जावा.*

*<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u>मा. महापौरजी, लक्षवेधी सूचनेव्दारे आर्थिक दुर्बल घटक वसाहतीमध्ये करावयाच्या कामाचा जो मुददा येथे मांडण्यात आला ती कामे येत्त्या दोन महिन्यामध्ये म्हणजे मार्चच्या आत झाली पाहिजेत नाहीतर तो निधी व्यपगत होईल.*

*<u>मा. सचिव:-</u>कोणत्त्या मुदयाबाबत? आपली इच्छा असेल तर असे होईल नाहीतर कार्यसूची वरून वगळले जाईल दुसरे काय?*

__मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-__मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, जो प्रश्न उपस्थित केला कृपया त्याचे उत्तर दिले जावे.

__मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-__मा. महापौर महोदया, ही जी लक्षवेधी दुर्बल घटक व झोपडपट्टयाबाबतची आहे त्याबाबत काही खुलासा उत्तर मी देवु इच्छितो, हा जो दुर्बल घटक, झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम असतो. दुर्बल घटकांवर अर्थ संकल्पाचे ५ टक्के रक्कम खर्च करायची असते. तो खर्च करणे अनिवार्य असते परंतु तरतुद तर अशी आहे.एकुण उत्पन्न वजा कमिटीड खर्च जे



निव्वळ उत्पन्न रहाते त्याचे ५ टक्के ही रक्कम असते. असे केले तर मला वाटते तो खर्च वजा आणखी कमी होईल कारण आमचे व ती वस्तुस्थिती आहे असे असले तरी ही काही कामे आम्ही करू इच्छितो. दुर्बल घटक व असलेल्या झोपडपट्टयामध्ये राहणारे लोकांना आम्ही न्याय देवू इच्छितो. परंतु मला वाटते आम्हाला खुपच राहत मिळाली आहे. मी आपणास सांगु इच्छितो की, ८-९ महिन्यापुर्वी आम्ही म्हाडाला एक प्रस्ताव पाठविला होता. राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम त्यांनी आमच्यासाठी दोन कोटी ५३ लाखाची मंजुर केले आहेत ते काम प्रगतीपथावर आहे. मला वाटते की, एवढी मोठी राहत मिळणार आहे त्यावेळी बांधकाम विभागास मी निर्देश दिले होते. सन्माननिय सदस्यांनी चर्चा करून यामाध्यमातुन या निधीतून ते जे काम करू इच्छितात त्यांचे प्रस्ताव सुध्दा तयार आहेत व ते डी. डी. आर साठी रवाना करण्यांत आले आहेत. तर ही मोठी खुशीची गोष्ट आहे. माझे वैयक्तीक मत असे आहे जेव्हा आमच्या कडे निधी उपलब्ध होत नाही. येथे आमच्या कमिटेड खर्च /निश्चित खर्च उत्पन्नापेक्षा जास्त आहे व सौभाग्याने आम्हाला हा निधी मिळाला आहे. मला वाटते की, यामध्ये आपण लक्ष केंन्दीत करावे व हे काम मार्गी लावावे. हे माझे वैयक्तीक मत आहे. मी आश्वासन दिले आहे की असे ही आम्ही काम करू इच्छित आहोत प्रश्न असा आहे की ही जी दोन कामे असतात ती कॉंट्राव्हर्सल कामे असतात. जेव्हा प्रशासन करते तर लोक प्रतिनिधींना मान्य होत नाही. दुस-या महानगरपालिकांमध्ये चांगली पध्दत आहे. दुर्बल घटक व झोपडपट्टयातील कामाबाबत मी सर्व गटनेत्त्यांना विनंती करतो की, आपण सहमती तयार करा व जी काही कामे करायची आहेत त्याची आम्हाला यादी दया. म्हणुन हे अनिवार्य आहे आपण सहमती तयार करा. व आम्हाला यादी दया, आमच्या कडे निधी उपलब्ध नाही तरीही आम्ही काही कामे करू इच्छितो व करू.

श्रीमती. सुजाता रिझवानी, श्री. लालबिहारी यादव सभागृहातुन बाहेर पडले.

__मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-__निधी नाही कामे कशी करणार?

__मा. सदस्य श्री. गोविंदराम लुंडः-__निधी नाही तर आपण कामे कशी करणार? प्रभाग समित्यामार्फत अदयाप काहीच कामे झाली नाहीत, ९ महिने झाले. सभापती असेच बसुन आहेत. त्यासाठी काय आहे?

__मोंमहापौरः-__आता हे आपण पूढच्या सभेत विचारों

__मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-__मा. महापौरजी, मी सुध्दा म्हंटले होते की, प्रभाग समिती मार्फत नगरसेवकांची कामे झाली पाहिजेत. याचा खुलासा केला जावा. आमचे गोविंदराम दादा कधी कधीच बोलतात.

मा. सदस्य श्री. गोविंदराम लुंडः-उत्तरच मिळत नाही. ९ महिने झाले काम काहीच झाले नाही, साहेब कधी कधी तर आमची कामे केली जावीत. आमचा मान ठेवला जावा.

मा. महापौरः-मी, आयुक्त साहेबांना निर्देश देते की, प्रभाग समिती मार्फत व नगरसेवक निधीतून कामे केली जावीत.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-मा. महापौर, आयुक्त साहेब, म्हाडाकडुन जी कामे मंजुर होवून आली आहेत ती कामे दोन तीन वर्षापूर्वी पाठविण्यांत आली होती. दलित वस्तीतील कामाबाबात नगरसेवकांनी जी प्त्र दिली आहेत. त्यानुसारचे काम निकडीचे व आवश्यक आहे तर शहरामध्ये त्या निधीतुन किती रक्कमेचे



काम केले जाईल? म्हणजे आम्हास आपसामध्ये बैठक घेवून समान वाटप करून काम करण्याचा निर्णय घेता येईल. त्यामधुन काही परिणाम आला आहे.

मा. सचिवः-अतिरिक्त आयुक्तांचे पद मंजुरीचा जो विषय आहे तो या कार्यसूचीवरून वगळण्यात येत आहे व पूढील वेळी नविन विषय तयार करून तो महासभेत आणला जाईल अशी सूचना आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-स्पष्ट ३ दिवसाची नोटीस देवून विशेष महावसभा बोलवा.

मा. सचिवः-या विषयासाठी २६ तारखेला विशेष सभा बालावू इच्छितात, हा विषय आताच्या कार्यसूचीवरून वगळुन नविन सभेच्या सभा सूचनेवर आणला जाईल. कुणाला काही हरकत आहे का?

मा. सदस्य श्री. भालेराव गौतम, श्री. ऐडके गणपत सभागृहातुन बाहेर पडले.

मा. सदस्य श्री. विनोद तलेरजाः-नाही, कुणाला काही हरकत नाही. विशेष सभा २६ तारखेला, ४ वाजता नियमित सभा त्यानंतर विशेष महासभा.

मा. सचिवः-अतिरिक्त आयुक्तांच्या पदास मंजुरी देण्याचा विषय आजच्या सभेत आयत्त्यावेळच्या विषयान्वये आलेला आहे. मा. महापौर महोदयांनी हा प्रस्ताव सभासूचनेवर समाविष्ट करण्यास स्विकृत दिली होती.

मा. सदस्य श्री. विनोद तलेरजाः-परंतु त्याबाबत आता विशेष महासभा बोलावू इच्छित आहेत.

मा. सचिवः-विशेष महासभेच्या नियमित सभा सूचनेवर हा विषय आणु इच्छितात.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-काय आहे? काही विशेष असे काही आहे का?

मा. सदस्य श्री. राजेंद चौधरीः-श्री. कोळेकर साहेबांचा विषय आजच्या सभेत...

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-२६ तारखेला ठेवू.

मा. सचिवः-नियमित सभा सूचनेवर हा विषय आणला तर चर्चेसाठी आपण अधिक वेळ मिळेल व आपण विस्ताराने चर्चा करू शकता.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-ते चांगले अधिकारी आहेत त्यांच्याबाबत काय चर्चा करायची?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. महापौरजी मी खुलासा करू इच्छितो की आज जेव्हा हा विषय आयत्त्यावेळचा विषय म्हणुन आला तर त्यास कामकाजात समाविष्ट करून घेण्यास सर्वांनी स्विकृती दिली. अतिरिक्त आयुक्त्तंच्या पदास मंजुरी देण्याचा प्रस्ताव जेव्हा प्रशासनाकडून आला तेव्हा सर्व पक्षांनी त्याचा स्विकार केला काही सदस्यांची माझ्याशी चर्चा झाली की अतिरिक्त आयुक्त पदाचा जो विषय आत्त्यावेळच्या विषयान्वये आणण्यांत आलेला आहे तो नियमित सभा सूचनेवर आणला जावा. २६ तारखेला नियमित सभा ४ वाजता घेतली जाईल. त्यानंतर हया विषयी विशेष महासभा घेतली जावी.

मा. महापौरः-आता जास्त चर्चा करू नका.



मा. सचिवः-ठिक आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-श्री. कोळेकर (उपायुक्त) यांना येवून एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला आहे.

मा. सदस्य श्री. जमनु पुरस्वानी हे बोलत असताना..मा. सदस्य श्री. किशोर वनवारी श्री. विनोद तलरेज व अन्य काही सदस्या एकाच वेळी बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात श्री. जमनु पुरस्वानी हे काय बोलत आहेत ते ऐकू येत नव्हते.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा/ श्री. किशोर वनवारीः-नाही, नाही, आम्ही विशेष सभा बोलावू इचिछतो.

मा. सदस्या श्रीमती. नीना प्रकाश नाथानी, श्रीमती. नीता आहुजा, श्रीमती. भारती छाबिया, श्री. मोहन रामरख्यानी सभागृहातुन बाहेर पडले.

मा. सचिवः-नियम असा आहे की, ज्या विषयास मा. महापौरांनी स्विकृती दिलेली आहे. हा विषय घेतला जावा किंवा नाही याचा निर्णय उपस्थितीत सदस्यांना २/३ ने बहुसंख्येने घ्यावा लागतो व बहुसंख्या जे म्हणेल तसे होईल पाहिजे तर आपण मतदान अन्वये निर्णय घ्या किंवा....

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-जेव्हा हा विषय आयत्त्यावेळच्या विषयाम्ध्ये आणला तेव्हा सर्वांनी मान्यता दिली ना, की सभेच्या कामकाज समाविष्ट करून घ्या म्हणुन?

मा. सदस्य श्री. विनोद तलेरजाः-नाही, नाही, विशेष महासभा बोलवली जावी.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-हा विषय विशेष महासभेत आणण्याचे कारण काय आहे?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः-शासनाकडे जेव्हा हा प्रस्ताव पाठवायचा होता तेव्हा पण विशेष सभा कायम करायचा आहे त्यास सुध्दा विशेष सभा? विशेष महासभा का?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-विशेष पदासाठी विशेष महासभा.

मा. सदस्य श्री. विनोद तलेरजाः-विशेष पदासाठी विशेष महासभा बोलविणे जरूरीचे आहे.

मा. सचिवः-हा विषय विशेष सभेत ठेवण्याचे बाजूने जे सदस्य आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-जर आपणास हा विषय विशेष सभेत आणायचा होता तर आयत्त्यावेळच्या विषयामध्ये आणला का?
मा. महापौरः-मी हा विषय मतास टाकत आहे.

मा. सचिवः- जे या कार्यसूचीवरून विषय वगळुन सदर विषयासाठी विशेष महासभा बोलावण्याच्या बाजुने त्यांनी आपले हात वर करावेत. प्रस्तावाच्या बाजुने ४० मते



प्रस्तावाच्या बाजुने :-

२५. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२६. श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर
२७. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
२८. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
२९. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
३०. श्रीमती. पाल आधारी राजाराम
३१. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
३२. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
९. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
१० श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
११ श्रीमती. गुप्ता आशा प्रभुनाथ
१२ श्री. पवार नाना आनंदा
१३ श्री. रूपाणी चिमन अमरूमल
१४ श्री. शांताराम निकम
१५ श्री. ठाकुर विनोद लालसिंग
१६ श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
१७ श्री. गायकवाड सुरेश नामदेव
१८ श्रीमती. वनवारी मोना अशोक
१९ श्री. वनवारी किशोर नारायणदास
२० श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
२१. श्रीमती. खिलनानी भावना रवि
२२ श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
२३ श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल
२४ श्री. पमनानी ईश्वर
२५ श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
२६ श्रीमती. पंजाबी दिपा नारायण
२७ श्रीमती. भाठिजा कोमल
२८ श्रीमती. माखिजा किरण लखी
२९. श्री. लबाना होशियारसिंग हरीसिंग
३०. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम

३१. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
३२. श्रीमती. दासानी मिनु
३३ श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
३४ श्री. जाधव प्रशांत
३५ श्री. जाधव सुरेश मधुकर
३६ श्री. साधवानी मोहन
३७.श्रीमती. साधवानी जया
३८ श्रीमती. वसीटा बेबी
३९ श्री. ठकुर अशोक भगवानदास
४० श्रीमती. मालती करोतिया राधाचरण

<u>मा. सचिव :-</u>जे या कार्यसूचीवरून विषय वगळुन सदर विषयासाठी विशेष महासभा बोलावण्याच्या विरोधात आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.



प्रस्तावाच्या विरोधात २० मते

२८. श्रीमती. जावळे संगिता रमेश
२९. श्री. नाथानी कन्हैयालाल घनश्यामदास
३०. श्रीमती. मोकल सिमा चंद्राराम
३१. श्री. उमाप रामदास राघोजी
३२. श्री. पुरस्वानी जमनादास खुपचंद
३३. श्री. रूपचंदानी बच्चाराम बाशोमल
३४. श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग
३५. श्रीमती. कृष्णानी रेखा
३६. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग विरसिंग
१० श्री. सोनावणे नथु
११ श्री. गायकवाड दिलीप
१२ श्रीमती. बामणकर नंदिनी
१३ श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा
१४ श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
१५ श्री. चव्हाण रमेश महादेव
१६ श्री. बोडारे धनंजय बाबुराव
१७ श्री. पाटील विश्वनाथ गौतम
१८ श्रीमती. ससाणे लक्ष्मी रोहिदास
१९. श्री. राजेंद चौधरी
२० श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल

<u>मा.महापौरः-</u>सदर प्रस्तावाबाबत खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

<u>विषयः-</u>श्री. आर.के. सोनवणे यांना उल्हासनगर महानगरपालिका सेवेत प्रतिनियुक्तीने अतिरिक्त आयुक्त पदावर नेमणुकीस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. युएमसी/२००२/१८३४/प्र.क्र.२४७/नवि-२४, दिनांक २१ नोव्हेंबर, २००२अन्वये उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर ''अतिरिक्त आयुक्त'' या पदनामाचे एक पद निर्माण करणेस मान्यता देवून श्री. आर. के. सोनवणे, उप-आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांची वरील पदावर प्रतिनियुक्तीने नेमणुक केली आहे. त्यानुसार आयुक्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी त्यांचेकडील आदेश क्र. सेवाप्र १४०२/प्र.क्र.१६५३/साप्र.मुका/०२, दिनांक २२.११.२००२ अन्वये श्री. आर.के. सोनवणे यांना कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सेवेतुन दि. २२.११.२००२ रोजी मध्यान्होत्तर कार्यमुक्त केले आहे. त्यानुसार श्री. आर. के. सोनवणे यांनी वरील पदाचा कार्यभार दिनांक २५.११.२००२ पासून स्विकारलेला आहे.

तथापी उपरोक्त शासन निर्णयात असे नमुद केले आहे की, श्री. आर. के. सोनवणे यांची ''अतिरिक्त आयुक्त'' उल्हासनगर महानगरपालिका यापदावरील नेमणुक ही कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व उल्हासनगर महानगरपालिका यांच्या अनुमती दर्शक ठरावास अधीन राहून करण्यात येत आहे. करिता श्री. आर. के. सोनवणे, अतिरिक्त आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांच्या प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस शासनाचे आदेशाप्रमाणे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अनुमती दर्शक ठरावास अधिन राहून अनुमती देण्यासाठी मान्यता मिळणेकामी महापालिकेच्या महासभेपुढे विषय प्रस्तावित आहे.

--६५--

महासभा ठराव क्र. ५४ ड दिनांक:-२०.१२.२००२.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

ही महासभा वरील प्रस्तावा संबंधिचा विषय आजच्या सभेच्या कार्यसुचीवर समाविष्ट करण्यास संमती देत नाही.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

बहुसंख्येने

महापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

__मा.सदस्य श्री. धनंजय बोडारे:-__परंतु भावना ही आहे की जर विशेष सभा बोलवायची होती तर निकडीचा विषय म्हणुन आयत्त्यावेळचा विषयान्वये आणण्याचे कारण काय होते?

__मा. सचिव:-__मा. महापौरांच्या निर्देशानुसार ही सभा स्थगीत करून २६ तारखेला ४.०० वाजता ठेवण्यात येत आहे. व कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जनगनमन या राष्ट्रगीताच्या सामुहीक गायनानंतर रात्री ८.४२ वाजता सभेचे कामकाज दि. २६.१२.२००२ रोजी सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत स्थगित करण्यांत येत असल्याचे मा. महापौरांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.